म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. 22

म.ग्रं.का.ग्रं.नं. 600
2-2-28

# अर्वाचीन कविता.

अर्थात्

## आधुनिक महाराष्ट्र कवींच्या काव्यांतील वेंचे

( पूर्वार्ध )

REFBK-0003735
REFBK-0003735

# अर्वाचीन कविता

अर्थात्

## आधुनिक महाराष्ट्र कवींच्या काव्यांतील वेंचे

( पूर्वार्ध )

REFBK-0003735
REFBK-0003735

पहिल्या आवृत्तीचे संशोधक,

**कवि चंद्रशेखर शिवराम गोरे, बडोदें**

दुसऱ्या आवृत्तीचे संशोधक,

**महाराष्ट्र भाषाभूषण जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर**

प्रकाशक

**दामोदर सांवळाराम आणि मंडळी**

ग्रंथसंपादक व ग्रंथप्रकाशक, नं. २८० ठाकुरद्वार, मुंबई

आवृत्ति दुसरी

सन १९२८ इ.

किंमत १॥ रुपये

क्र. 3634

हें पुस्तक, रा. रा. दामोदर सांवळाराम यंदे यांनीं नं. ३८० गिरगांवरोड, मुंबई येथें, आपल्या इंदुप्रकाश छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

सर्व हक्क प्रकाशकांनीं आपले स्वाधीन ठेविले आहेत.

# पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना

"मनुष्यजातीचें किंवा प्राणिमात्राचें कल्याण व्हावें,
हा उत्तम वाङ्मयाचा पवित्र हेतु असतो."

गणेश जनार्दन आगाशे

पूर्वकालीन महाराष्ट्रकाव्यामृताचा रसास्वाद स्वजनांस देण्याकरितां कै० परशुरामपंत तात्या गोडबोले ह्यांनीं 'नवनीत' हा ग्रंथ रचून प्रसिद्ध केल्यास आज सुमारें पन्नास वर्षे होत आलीं. त्याच्या अनेक आवृत्ति निघून त्यांच्या सहस्रावधि प्रति खपल्या आहेत, आणि खपत आहेत. हीच बहुतेक महाराष्ट्रीयांची स्वकविजनांशीं सार्वजनिक रीतीनें करून दिलेली पहिली ओळख होय. ह्या ओळखीवरून एवढें स्पष्ट कळलें कीं, महाराष्ट्रीयांच्या अंगच्या इतर वर्णनीय गुणांचा क्षय, कालमाहात्म्येंकरून होत असला, तरी काव्याभिरुचि, जी सर्व माणसांच्या ठायीं उपजतच थोडीबहुत असते आणि अभ्यासानें वाढते, ती इतर माणसांप्रमाणें जशीच्या तशीच आहे. ह्या काव्याभिरुचीचा चमत्कार असा आहे कीं, ती कोणत्या तरी रूपानें ज्याचे ठायीं वसत नाहीं, असा मनुष्यच नाहीं. ही ईश्वरी योजना आहे. कां कीं, काव्य हें सर्व प्रकारच्या कायिक आणि मानसिक परिश्रमांस मोठें विरजण–विश्रांतिस्थान–आहे. रस्त्यावरची माती वाहणारीं माणसें गाणीं गात असतात, तसेच तत्त्ववेत्तेहि महाकवींच्या पद्यांत विचारमग्न होऊन गुंगत असतात, हें सर्वांस ठाऊक आहेच.

झालें. तर मग आमच्या महाराष्ट्रीयांस काव्यें पाहिजेत; पण तीं निवडक असावीं. कां कीं, तीं साद्यंत वाचण्यास सवड नसते. ती वाण, जुन्या कवींच्या संबंधानें, परशुरामपंत तात्यांनीं पुरविली आहे. त्यांनीं मुकुंदराजांपासून रामजोशांपर्यंत कविपरंपरा आणून पोंचविली आहे. रामजोशीबावांचा मरणकाल इ. स. १८१२ हा आहे. तेव्हांपासून आजपर्यंत, म्हणजे सुमारें ऐंशी नव्वद वर्षांत महाराष्ट्रांत अनेक लहान मोठे कवि होऊन गेले आहेत. जशी राजपरंपरा चालते तशीच कविपरंपराही चालते. त्यांच्यामध्यें मोठें अंतर

एवढेंच आहे कीं, राजपरंपरा स्पष्ट असते व तिचा संबंध लोकस्थितीशीं फार असतो, ह्मणून तिचा सलंग इतिहास लिहितां येतो. परंतु, कवींच्या परंपरेचें तसें नाहीं. एक कवि नष्ट झाल्यावर त्याची जागा भरण्यास दुसरा कवि होत असेल, परंतु, अमक्याच्या जागीं अमकाच कवि अशी त्यांची पिढी चालत नसल्यामुळें आणि तिचा संबंध लोकस्थितीशीं निकट नसल्यामुळें, तिचा संगत-वार इतिहास सांगतां येत नाहीं. तथापि, चांगले असोत कीं वाईट असोत, राजांप्रमाणें राष्ट्रांत कवि निर्माण होत असतात, ह्यांत संशय नाहीं.

तर, पूर्वकालीन महाराष्ट्रकाव्याचा आस्वाद जसा 'नवनीत' ग्रंथाच्या द्वारें लोकांस मिळत आहे, तसा त्यानंतरच्या नव्वद पंचाणव वर्षांतल्या महाराष्ट्रकाव्याचा आस्वाद जनांस प्राप्त करून देण्याची कल्पना, दुसऱ्या एका परशुरामपंत तात्यांच्या मनांत येणें हेंही एक प्रकारें पूर्वोक्त परंपरेसारखेंच कांहींतरी असावें असें वाटतें. हे दुसरे परशुरामपंत तात्या म्हणजे कै. **दत्तात्रय कोंडो घाटे** बी. ए. हे होत. हे मोठे रसिक आणि मार्मिक होते. त्यांनीं ह्या आधुनिक नवनीताच्या रचनेस आरंभही केला होता. परंतु, त्यांजवर एका-एकीं मृत्यूचा घाला पडल्यामुळें त्यांचे सगळे विचार कांहीं दिवस तसेच जागच्याजागीं राहिले. परंतु, ही त्यांची कल्पना फार सुंदर होती,—राष्ट्राच्या कल्याणाची होती,—वाङ्मयाच्या अभिवृद्धीची होती,—आणि ती कोणत्या तरी युक्तीनें पार पाडणें हें इष्ट होतें, असें आम्हास वाटल्यावरून, आम्हीं हें काम कै० घाटे यांचे मित्र रा. रा. **चंद्रशेखर शिवराम गोऱ्हे** ह्यांस करावयास सांगितलें, व तें त्यांनीं पुष्कळ मेहनत घेऊन चांगलें केलें आहे. त्याचा पूर्वार्ध प्रस्तुत पुस्तक होय. हें कसें काय उतरलें आहे ह्याचा निर्णय करणें रसिकजनांकडे आहे.

तरी, एकंदर काव्यरचनेविषयीं अलीकडे सुशिक्षितांच्या कल्पनांत बरीच नवी भर पडली आहे. मनुष्य जन्मतः कवि पाहिजे. अभ्यासानें कोणी कवि व्हावयाचा नाहीं. कविता कानीं पडल्याबरोबर तिचा रस अंतःकरणांत संचा-रला पाहिजे. लॉर्ड मेकॉले ह्यांनीं असें एक मत काढिलें आहे कीं, राष्ट्रांत जसजशी सुधारणा वाढत जाते, तसतशी लोकांतली कविताशक्ति कमी कमी होत जाते. कोणी ह्मणतात, मनास रंजविणें हेंच काय तें काव्याचें उत्तम सार्थक्य

आहे; त्यांत खरें खोटें निवडीत बसण्याचें कारण नाहीं. कोणाचें मत असें पडतें कीं, काव्याच्या योगानें करमणूक होऊन मनाचा मळ झडला पाहिजे. अशीं अनेक मतें प्रचलित आहेत. ह्या इतक्या कसोटया आहेत, ह्या सगळ्या कसोटयांस सारखें उतरणें हें एक दिव्य आहे. पण, तें अंशतः तरी साधल्यावांचून कोणत्याहि शब्दरचनेस काव्य ह्मणतां यावयाचें नाहीं. ही एक मोठी परीक्षा आधुनिक महाराष्ट्र काव्याची व्हावयाची आहे. तिचा हा एक लहानसा प्रयोग आहे. ह्यांत कोणाचीं काव्यें कशीं उतरतात, हें पहावयाचें आहे. ह्या काव्यांमध्यें मागच्या काव्यांपेक्षां एक गोष्ट दृश्यमान् होईल. ती ही कीं, पाश्चात्यांच्या ज्या कल्पना पूर्वीं कधींही इकडे आल्या नव्हत्या–पूर्वींच्या कोणत्याही काव्यांत प्रकट झाल्या नव्हत्या–अशा कांहीं कल्पना नवीन काव्यांत प्रकट झाल्या आहेत. हा परिणाम आंग्लविद्याप्रसाराचा होय हें उघड आहे. ह्यानें महाराष्ट्र काव्यास थोडी अधिक पुष्टि येईल असें वाटतें.

बाकी, सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें असतां, काव्य ह्याविषयींच्या कल्पना सगळ्या जगभर कमजास्त प्रमाणानें एकसारख्या आहेत. काव्याची योग्यता मोठी आहे. काव्य ही एक महाशक्ति आहे. जगांत काव्यानें जीं कार्यें होतात, तीं दुसऱ्या कशानें व्हावयाचीं नाहींत. हें जाणूनच समर्थांनीं काव्यकर्त्यांचें फार स्तुतिस्तोत्र केलें आहे. ते म्हणतातः—

कवि धर्माचा आश्रयो, कवि मनाचा मनोजयो;
कवि धार्मिकांचा विनयो, विनयकर्ते. १

कवि वैराग्याचें रक्षण, कवि भक्तांचें भूपण;
नाना स्वधर्मरक्षण, ते हे कवि. २

नाना साधनांचें मूळ, कवि नाना यत्नांचें फळ;
नाना कार्यसिद्धि सकळ, कवींचेनि प्रसादें. ३

ऐसे पूर्वीं थोर थोर, झाले कवीश्वर अपार;
आतां आहेत पुढें होणार, नमन तयांसी. ४
आतां असो हा विस्तार, जगासी आधार कवीश्वर;
त्यांसी माझा नमस्कार, साष्टांग भावें. ५

असो. असे जे आमचे आधुनिक महाराष्ट्र कवि, त्यांच्या कृतींचे हे कांहीं मासले येथें सादर केले आहेत. कृति कवींची आहे, निवड **चंद्रशेखरांची** आहे. ती पुढें करणें एवढेंच काय तें आम्हीं केलें आहे. गोड करून घेणें रसिकांकडे आहे!

मनुष्य योजतो एक, आणि ईश्वरी सूत्र कांहीं वेगळेंच असतें, आणि तेंच घडून येतें. प्रकृत ग्रंथाच्या रचनेंत असें झालें आहे हें वर दर्शविलेंच आहे. त्याबरोबर आणखी असें सांगावयाचें आहे कीं, ह्या ग्रंथाच्या प्रस्तावनेचेंही तसेंच झालें आहे. ही प्रस्तावना कै. न्या. महादेव गोविंद रानडे लिहिणार होते. तिची त्यांनीं थोडी तयारीही केली होती. ती त्यांच्या हातून पूर्ण होती तर ती ह्याच भागाच्या आरंभीं घालतां आली असती. परंतु मृत्यूनें त्यांत खो घातला! जणूं ग्रंथरचना आणि प्रस्तावनारचना ह्यांचें सादृश्य राहण्याकरितांच कीं काय न कळे! असो. ती प्रस्तावना आतां आमचे सन्मान्य विद्वान् मित्र रावसाहेब **गणेश जनार्दन आगाशे, बी. ए.,** ह्यांनीं लिहिण्याचें कृपा करून कबूल केलें आहे. ती उत्तम व्हावयाची, हें आमचें भविष्य खचीतखचित खरें व्हावयाचें आहे. प्रस्तावना ह्या ग्रंथाच्या दुसऱ्या भागाच्या आरंभीं घालावी असें योजिलें * आहे.

**प्रकाशक**

---

* दुर्दैवानें दुसऱ्या भागाचा योग आला नाहीं व रा. सा. आगाशेही आतां जिवंत नाहींत. अर्थात् ईश्वरी योजनेपुढें मानवी योजना व्यर्थ आहे हेंच खरें!

# दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना

ह्या ग्रंथाची पहिली आवृत्ति सन १९०३ मध्यें प्रसिद्ध झाली. ती महाराष्ट्र काव्यप्रिय वाचकांस पसंत पडून त्यांजकडून तिचें सप्रेम स्वागत झालें; आणि मुंबई विश्वविद्यालयाच्या अभ्यासक्रमांत तिचा समावेश होऊन तिगस्त सालीं बी.ए. च्या परीक्षेकरितां या आधुनिक नवनीताची निवड करण्यांत आली. ह्यामुळेंच आज पंचवीस वर्षांनीं तरी ही दुसरी आवृत्ति काढण्याचा योग आला याबद्दल मुंबई विश्वविद्यालयाचे आम्ही कृतज्ञतापूर्वक आभार मानतों. पहिल्या आवृत्तीच्या प्रसंगीं आमच्या कित्येक विद्वान् मित्रांकडून ज्या सूचना आल्या होत्या त्या सर्व गृहीत धरून योग्य त्या सुधारणा ह्या आवृत्तींत केल्या आहेत. विशेष हें कीं, ह्या आवृत्तींत पूर्वीचे सर्व कवि कायम ठेविले असून शिवाय विठोबा अण्णा दप्तरदार, नारायण कृष्ण बुवा सुपेकर, कै. दत्तात्रय कोंडो घाटे, व ज. र. आजगांवकर याप्रमाणें आणखी चार कवींच्या कांहीं निवडक कविता दाखल केल्या आहेत. शिवाय पहिल्या आवृत्तीचे प्रसंगीं कांहीं कवींच्या उत्तम कविता अप्रसिद्ध राहिल्या होत्या, त्या ह्या आवृत्तींत घेऊन सर्व कवी कालानुक्रमानें लाविले आहेत; आणि प्रत्येक कवीचें त्रोटक चरित्र त्यांच्या कवितेच्या आरंभींच दिलें आहे. त्यामुळें प्रत्येक कवीच्या कवितेचा रसस्वाद त्यांच्या चरित्रासह एकत्र घेण्यास मार्ग झाला आहे. पहिल्या आवृत्तीप्रमाणें ह्या आवृत्तीच्या प्रसंगीं आमचे कविमित्र चंद्रशेखर गोऱ्हे यांचें साहाय्य घेणें आम्हास अशक्य झालें; परंतु त्यांची उणीव आमचे मित्र महाराष्ट्र भाषाभूषण कवि जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर यांनीं भासूं दिली नाहीं, याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत. ह. भ. प. नानाबुवा सुपेकर, श्री. ज. र. आजगांवकर, श्री. दत्तात्रय कोंडो घाटे, यांच्याप्रमाणेंच आणखी कांहीं निवडक कवींच्या कवितांचा समावेश याच भागांत करण्याचा मानस होता; परंतु या भागाची पृष्ठसंख्या प्रमाणाबाहेर वाढल्यामुळें निरुपायानें हा भाग येथेंच थांबविणें भाग पडलें. या भागास योग्य आश्रय मिळाल्यास पुढील भाग लवकरच हातीं घेण्याचा आमचा विचार आहे. तसा योग जुळून आल्यास अर्वाचीन कवींपैकीं अनेक प्रतिभासंपन्न कवींच्या कवितांचा लाभ आमच्या वाचकांस लवकरच आम्हांकडून मिळेल असें आश्वासन आम्ही देऊन ठेवतों.

# अनुक्रमणिका


| कवि. | कविता. | पृष्ठांक |
|---|---|---|
| १ **हंसराजः**--( चरित्र ) | ... ... ... | १ |
| | १ मंगल. ... ... ... ... ... | २ |
| | २ ईश्वर कोणास म्हणावें ? ... ... ... | ६ |
| | ३ ईश्वर कोठें आहे ? ... ... ... ... | ६ |
| | ४ अधिकारी कोण ? ... ... ... ... | ७ |
| | ५ अधिकारानंद. ... ... ... ... | ८ |
| | ६ चतुर्विधा वृत्ति. ... ... ... ... | ९ |
| २ **परशुराम बल्लाळ गोडबोलेः**--( चरित्र ) | ... ... | १३ |
| | १ गतानुबोधन. ... ... ... ... | १४ |
| | २ सीताराम, व सीताविरहकल्पना. ... ... | १५ |
| | ३ सीतापरित्याग, व सीतास्वप्नप्राप्ति. ... ... | १६ |
| | ४ वासंतीवाग्दंड व जनकवात्सल्य. ... ... | १७ |
| | ५ क्षत्रिय ब्रह्मचारी, व प्रियाराधन. ... ... | १८ |
| | ६ रणझंझा, व कुरुक्षेत्र. ... ... ... | १९ |
| | ७ भारतीय नरसिंह व दारिद्र्यप्रभाव. ... ... | २० |
| | ८ चारुदत्त. ... ... ... ... | २२ |
| | ९ वर्षावर्णन. ... ... ... ... | २३ |
| | १० वसंतसेनेचा अपमृत्यु, व न्यायाधीशाचीं लक्षणें. ... | २५ |
| | ११ अन्यायी न्यायसभा, व दैवलीला. ... ... | २७ |
| ३ **विठोबाअण्णा दप्तरदारः**—( चरित्र )... | ... ... | २८ |
| | १ स्वात्मनिवेदन. ... ... ... ... | २९ |
| | २ रामजन्म. ... ... ... ... | ३१ |
| | ३ रामशोक. ... ... ... ... | ३३ |
| | ४ संन्यासी अर्जुन. ... ... ... ... | ३४ |

| कवि. | कविता. | पृष्ठांक |
|---|---|---|
| ४ कृष्णशास्त्री चिपळूणकर ( चरित्र ) | ... ... | ३५ |
| | १ उज्जनीवर्णन. ... ... ... ... | ३६ |
| | २ कैलास. ... ... ... ... | ३८ |
| | ३ अलकावर्तीतील मौजा. ... ... ... | ३९ |
| | ४ यक्षमंदिर. ... ... ... ... | ४० |
| | ५ यक्षपत्नि. ... ... ... ... | ४२ |
| | ६ यक्षसंदेश. ... ... ... ... | ४३ |
| | ७ विरहीविलाप. ... ... ... ... | ४६ |
| | ८ अन्योक्तिसंग्रह. ... ... ... ... | ४९ |
| ५ गणेश सदाशिव शास्त्री लेले ( चरित्र ) | ... ... | ५४ |
| | १ रामकृत शिवबोध. .. ... ... | ५५ |
| | २ नंदिनी आणि दिलीप. ( वेंचे रघुवंशांतील ) ... | ५७ |
| | ३ सिंह आणि दिलीप. ... ... ... | ५९ |
| | ४ भाटांनीं केलेला अजस्तुतिपाठ. ... ... | ६५ |
| | ५ इंदुमतीपाणिग्रहण. ... ... ... | ६७ |
| | ६ अजविलाप. ... ... ... ... | ६८ |
| | ७ वासंतवनश्री. ... ... ... ... | ७४ |
| | ८ दशरथमृगया. ... ... ... ... | ७८ |
| | ९ दक्षिण महासागर. .. ... ... ... | ८३ |
| | १० दर्शनीय स्थलांचें पुनदर्शन. ... ... ... | ८५ |
| | ११ उद्ध्वस्त झालेली अयोध्या. ... ... ... | ९३ |
| ६ राजा सर टी. माधवराव ( चरित्र ) | ... ... | ९७ |
| | १ प्रस्ताव. ... ... ... | ९७ |
| | २ स्फुट आर्या. ... ... ... | ९८ |
| | ३ कावेरीवर्णन व गृहिणीचे अलंकार. ... ... | १०४ |
| ७ भास्कर दामोदर पाळंदे ( चरित्र ) | ... ... | १०५ |
| | १ परमेश्वरप्रार्थना व अष्टपदी. ... ... | १०६ |
| | २ पदें. ... ... | १०७ |

कवि. कविता. पृष्ठांक.

८ **महादेव मोरेश्वर कुंटे ( चरित्र )** ... ११९
१ कोल्हापूरकर राजाराम महाराज छत्रपति यांचें बालपण. १२०
२ संभाजीची बालक्रीडा. ... ... १२१
३ शृंगार. ... ... १२२
९ **बापूसाहेब कुरुंदवाडकर ( चरित्र )** ... ... १२४
१ स्वसुतास राजाचा उपदेश. ... ... १२५
२ साधुरीति व गंगास्तुति. ... ... १२६
३ हिमालयवर्णन. ... ... ... ... १२७
४ हिमालयावर भिल्लांची शिकार. ... ... १२९
५ केदारेश्वर. ... ... ... ... १३१
६ ग्रीष्मऋतु. ... ... ... ... १३२
७ श्रीविंध्यवासिनी. ... ... ... १३३
८ गंगेशीं इतर नद्यांचे संगम. ... ... ... १३५
१० **बजाबा रामचंद्र प्रधान ( चरित्र )** ... ... १३७
१ दैवसेनी आणि जयसेन यांची भेट. .. ... १३७
२ दैवसेनी व जयसेन यांचें भाषण. ... ... १४०
११ **विनायक कोंडदेव ओक ( चरित्र )** ... ... १४४
१ उद्यांचा काय नेम व आंब्याचें झाड. ... ... १४५
२ एका शेतकऱ्याचे विचार. ... ... ... १४६
३ ग्रंथकारास वंदन व वृद्धाचा पश्चात्ताप. ... ... १४८
४ मनुष्याची दुर्बलता. ... ... ... १४९
५ लेखणीची प्रार्थना.... ... ... ... १५०
६ मनुष्य आणि घड्याळ. ... ... ... १५१
७ मंचाबाईस अहल्याबाईचा बुद्धिवाद. .. ... १५२
८ मेघान्योक्ति. ... ... ... ... १५३
९ देवापाशीं मागणें व आनंदीबाई आणि राघोबादादा. १५५
१० उद्योगाची त्वरा करावी. ... ... ... १५७
११ धन्याची ओळख. ... ... ... ... १५८

| कवि | कविता | | | | पृष्ठांक |
|---|---|---|---|---|---|
| | १२ मग पाहिजे तसा वाग. | ... | ... | ... | १५९ |
| | १३ विचारशक्ति हाच देव. | ... | ... | ... | १६० |
| | १४ दुःखाबद्दल उपकार. | ... | ... | ... | १६१ |
| | १५ जीवाची ओढाताण. | ... | ... | ... | १६२ |
| | १६ जगला कोण म्हणावा. | ... | ... | ... | १६३ |
| | १७ इतिहासाचें म्हणणें. | ... | ... | ... | १६४ |
| | १८ अहिल्याबाई आणि मंचाबाई. | | .. | ... | १६५ |
| | १९ राजपुत्र आणि शुक. | ... | ... | ... | १६६ |
| | २० जन्मांध मुलाचे उद्गार. | ... | ... | ... | १६७ |
| **१२ पांडुरंग गोविंद शास्त्री पारखी ( चरित्र )** | | | ... | ... | १६९ |
| | १ वसंतऋतु. | ... | ... ... | ... | १७० |
| | २ ग्रीष्मऋतु. | ... | ... ... | ... | १७५ |
| | ३ वर्षाऋतु. | ... | ... ... | ... | १८० |
| | ४ शरद्ऋतुवर्णन. | ... | ... ... | ... | १८८ |
| | ५ हेमंतऋतुवर्णन. | ... | ... ... | ... | १९४ |
| | ६ प्रार्थना. | ... | ... ... | ... | २०१ |
| **१३ शिवराम रामकृष्ण नित्सुरे ( चरित्र )** | | | ... | ... | २०२ |
| | १ मंगलाचरण. | ... | ... | ... | २०४ |
| | २ प्रस्ताव. | ... | ... | ... | २०५ |
| | ३ धनप्रशंसा. | ... | ... ... | ... | २०८ |
| | ४ विद्यामहिमा. | ... | ... | ... | २०९ |
| **१४ नारायण धोंडदेव खांडेकर ( चरित्र )** | | | ... | ... | २१७ |
| | २ ईशस्तवन. | ... | ... ... | ... | २१८ |
| | ३ प्रातःस्मरणपंचक. ... | ... | ... | ... | २१९ |
| | ४ दीनविज्ञापनाष्टक.... | ... | ... | ... | २२० |
| | ५ दीनाक्रंदनपंचक | ... | ... ... | ... | २२१ |

| कवि | कविता | पृष्ठांक |
|---|---|---|
| | ६ आकांक्षापंचक ... ... ... ... | २२२ |
| | ७ मानसोपदेश ... ... ... ... | २२३ |
| | ८ अपराधोल्लापपंचक ... ... ... | २२५ |
| | ९ प्रबंध ... ... ... ... | २२८ |
| | १० अभंग ... ... ... ... | २२९ |
| **१५ डॉ. कान्होबा रणछोडदास कीर्तिकर ( चरित्र )** | | ... २३० |
| | १ वेंचे विलापलहरींतील ... ... ... | २३१ |
| | २ भक्तिसुधेंतील ( ईश्वरस्तोत्र ) ... ... | २४४ |
| | ३ दांभिक पितृप्रेम ... ... ... | २४४ |
| **१६ विठ्ठल भगवंत लेंभे ( चरित्र )** | ... ... | ... २२५ |
| | १ शोकावर्त ... ... ... ... | २२६ |
| | २ उद्यानभाग ... ... ... ... | २५७ |
| | ३ संध्याकाळ ... ... ... ... | २५८ |
| | ४ गोदावरीचा प्रदेश ... ... ... ... | २५९ |
| | ५ आई आणि मूल ... ... ... ... | २६० |
| | ६ शेतकरी ... ... ... ... | २६१ |
| | ७ मातेचें प्रेम ... ... ... ... | २६३ |
| **१७ विष्णु मोरेश्वर महाजनी ( चरित्र )** | ... | ... २६५ |
| | १ हिमालयावर बसून केलेलें ईश्वराचें प्रातःस्तवन ... | २६६ |
| | २ विश्वमंदिर ... ... ... ... | २६७ |
| | ३ माधवीचें पुष्प ... ... ... ... | २६९ |
| | ४ सृष्टि व बाळपण ... ... ... ... | २७० |
| | ५ साध्वीनदी ( रूपक ) ... ... ... | २७१ |
| | ६ चंद्र व प्रियाप्रेक्षिणी युवति. ... ... ... | २७२ |
| | ७ युवतीचा पश्चात्ताप व रमणोपालंभन ... ... | २७३ |
| | ८ सुशील भार्या ... ... ... ... | २७५ |

| कवि. | कविता. | पृष्ठांक. |
|---|---|---|
| | ९ काल आणि प्रिया ... ... ... | २७६ |
| | १० कालमाहिमा ... ... ... ... | २७७ |
| | ११ मातृविलाप ... ... ... ... | २७८ |
| | १२ मित्रवियोग ... ... ... ... | २८१ |
| | १३ उदरंभर ... ... ... ... | २८२ |
| | १४ धन्य नर ... ... ... ... | २८३ |
| | १५ शांति ... ... ... ... | २८४ |
| | १६ जीवितसार ... ... ... ... | २८५ |
| १८ पांडुरंग व्यंकटेश चिंतामणिपेंठकर ( चरित्र ) | ... | २८७ |
| | १ गंगेपासून होणारे ऐहिक उपयोग ... ... | २८८ |
| | २ कनोज ... ... ... ... | २८८ |
| १९ कृष्णाजी नारायण आठल्ये ( चरित्र ) | ... ... | २९३ |
| | १ सासरची पाठवणी ... ... ... | २९४ |
| | २ एका नाटक्याचा पश्चात्ताप ... ... ... | ३०२ |
| | ३ पद्यपुष्पांजलि ... ... ... ... | ३०६ |
| | ४ मृत्यु ... ... ... ... ... | ३०९ |
| | ५ कालक्षेप ... ... ... ... | ३१० |
| | ६ तुफान. ... ... ... ... | ३१२ |
| | ७ वृक्षोपदेश. ... ... ... ... | ३१५ |
| | ८ स्त्रियांचे गुणधर्म. ... ... ... ... | ३१९ |
| | ९ भीमकर्मा राघोबा. ... ... ... ... | ३२१ |
| २० पुरुषोत्तम बाळकृष्ण जोशी ( चरित्र ) | ... | ३२३ |
| | १ समाधिशतावली. ... ... ... ... | ३२४ |
| | २ राजे प्रतापवंत विठ्ठल सुंदर. ... ... ... | ३२८ |
| | ३ अहल्याबाई आणि मुक्ताबाई. ... ... ... | ३३५ |
| | ४ मृत्यु. ... ... ... ... | ३३७ |

| कवि. | कविता. | पृष्ठांक. |
|---|---|---|
| | ५ स्वप्नांतील हिमालय. ... ... ... | ३३८ |
| | ६ परिषदाभिनंदन. ... ... ... | ३४१ |
| | ७ परिषद् प्रहसन. ... ... ... | ३४५ |
| | ८ परिषद प्रहसन उत्तरार्ध. ... ... ... | ३४९ |
| | ९ श्रेष्ठत्वाचा झगडा अथवा दगडाचा मानवजातीस उपदेश. | ३५३ |
| | १० भरतभूमीचें भावी स्वराज्य व तत्प्राप्त्यर्थ आंग्लजन हिंदीजन यांस विनंति. ... ... | ३६५ |
| | ११ भारतस्थ तरुणांस विनंति. ... ... | ३६८ |
| **२१ मोरो गणेश लोंढे ( चरित्र )** ... ... ... | | ३७० |
| | १ काम कर. ... ... ... ... | ३७१ |
| | २ मधमाशी. ... ... ... ... | ३७२ |
| | ३ हंगाम. ... ... ... ... | ३७३ |
| | ४ आयुष्य. ... ... ... ... | ३७४ |
| | ५ ओढा. ... ... ... ... | ३७५ |
| | ६ पश्चात्ताप. ... ... ... ... | ३७६ |
| | ७ उंदीर आणि त्याची आई ... ... ... | ३७७ |
| | ८ आई. ... ... ... ... | ३७८ |
| | ९ जन्माचें सार्थक. ... ... ... ... | ३७९ |
| **२२ गंगाधर रामचंद्र मोगरे ( चरित्र )** ... ... | | ३८० |
| | १ मराठी ग्रंथकारांस विनंति. ... ... ... | ३८१ |
| | २ महाश्वेतेची कथा. ... ... ... | ३८४ |
| | ३ प्रेमबंधन. ... ... ... | ३८८ |
| | ४ प्रेमसंदेश ... ... ... | ३९३ |
| **२३ गोविंद वासुदेव कानिटकर ( चरित्र )** ... ... | | ३९५ |
| | १ प्रभात आणि प्रमदा ... ... ... | ३९६ |
| | २ संमोहलहरी. ... ... ... | ३९८ |

| कवि. | कविता. | पृष्ठांक. |
|---|---|---|
| | ३ स्वातंत्र्याची योग्यता. ... ... ... | ४१७ |
| | ४ चांदणी रात्र. ... ... ... ... | ४१८ |
| २४ वासुदेव वामनशास्त्री खरे ( चरित्र ) ... ... | | ४१९ |
| | १ विक्रमादित्याची उज्जयिनी ... ... ... | ४२० |
| | २ कोटा शहरांतील सायंकाळ. ( वेंचे यशवंतराव महाकाव्यांतील. ) ... ... ... | ४२३ |
| | ३ पुणेंप्रदेशवर्णन. ... ... ... | ४२५ |
| | ४ पुणें आणि त्याचें रूपांतर ... ... ... | ४२७ |
| | ५ महाअरण्यांतील चांदणी रात्र. ... ... | ४३० |
| २५ एकनाथ गणेश भांडारे. ( चरित्र ) | | |
| | १ वेचें कीर्तिमंदिरांतील. ... ... ... | ४३५ |
| | २ आर्यमातेचा शोक. ... ... ... | ४३९ |
| | ३ श्मशानशांतता व प्रणयकलह. ... ... | ४४० |
| | ४ वृद्धप्रणयी. ... ... ... ... | ४४१ |
| २६ हरी कृष्ण दामले ( चरित्र ) ... ... ... | | ४४२ |
| | १ मातृविलाप. ... ... ... ... | ४४२ |
| | २ पतिविलाप. ... ... ... ... | ४४३ |
| | ३ पत्नीविलाप. ... ... ... ... | ४४४ |
| २७. कीर्तनकेसरी नारायण कृष्णबुवा सुपेकर ( चरित्र ) ... | | ४४६ |
| | १ परमेश्वरचिंतन व जगाची अशाश्वता. ... ... | ४४७ |
| | २ दामाजीपंत चरित्रांतील प्रसंग. ... ... | ४४८ |
| | ३ शंकराचार्य—परकायाप्रवेश. ... ... | ४५० |
| | ४ रामायण अयोध्या कांड. स्फूट व्याख्यानें ... ... | ४५१ |
| | ५ रुक्मिणीस्वयंवरांतील प्रसंग, व | |
| | ६ कृष्णशिष्टाईतील प्रसंग. ... ... ... | ४५६ |

| कवि. | कविता. | पृष्ठांक. |
| --- | --- | --- |
| २८ **वामन दाजी ओक ( चरित्र )** | ... ... ... | ४५८ |
| | १ कवि व कविता. ... ... ... | ४५९ |
| | २ मानसिंगाचा भीमास निरोप ... ... ... | ४६० |
| | ३ राजे लोकांस दान हिवाचे शब्द ... ... | ४६२ |
| | ४ थेउरास जातेवेळीं राघोबादादाचें आनंदीबाईशीं भाषण ( आर्या ) ... ... ... | ४६३ |
| | ५ कन्या ... ... ... | ४६६ |
| २९ **जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर ( चरित्र )** ... ... | | ४६७ |
| | १ आत्मनिवेदन ... ... ... | ४६८ |
| | २ स्फुट अभंग व पदें. ... ... ... | ४७१ |
| ३० **दत्तात्रय कोंडो घाटे ( चरित्र )** | ... ... ... | ४७२ |
| | १ जननी आर्यभूमी. ... ... ... | ४७५ |
| | २ सखे सुमनमाले ! ... ... ... | ४७६ |
| | ३ विश्वामित्रीच्या कांठीं. ... ... ... | ४७७ |
| | ४ शेवटचें मागणें. ... ... ... | ४७९ |

# अर्वाचीन कविता.

५७३५

## भाग १ ला.

### हंसराज.

हा साधु पुरुष शके १७२० त जन्मला. हा गोदातीरीं परभणी म्हणून गांव आहे तेथील राहणारा. जातीचा ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण. ह्याचें पहिलें नांव नारायण. परंतु पुढें दीक्षा घेतल्यानंतर ह्यास हंसराज असें म्हणत. हंसराज हा रामदासांच्या शिष्यपरंपरेंतील होय. ह्यानें वेदांत विषयावर लहान मोठे मिळून अकरा ग्रंथ केले आहेत, व ते बहुतेक सर्व उपलब्ध आहेत. ह्याची कविता अगदीं साधी व सरळ आहे. वेदांतासारखा अतिगहन विषय, परंतु तो मुळींच पाल्हाळ न लावितां भूमितीच्या सिद्धांतपद्धतीप्रमाणें क्रमशः प्रतिपादन करून वाचकांच्या मनांत पूर्णपणें बिंबवून देण्याची ह्याची शैली कांहीं विलक्षण आहे. ती ह्या पुस्तकांत घेतलेल्या कांहीं वेंच्यांवरून सहज दिसून येईल. हा महापुरुष शके १७७७ त वैशाख शुद्ध ८ स समाधिस्थ झाला. ह्याची समाधि परांडा येथें आहे.

---

**टीप**–नवनीताची प्रथमावृत्ति सन १८५४ त छापिली. नवनीतांत शेवटचे प्राचीन कवि रामजोशी, ह्यांचा मरणकाळ सन १८१२ दिला आहे. त्यापुढील काल अर्वाचीन कवितेचा धरल्यास सदरहू उपलब्ध झालेला कवि पहिला अर्वाचीन कवि म्हणण्यास हरकत दिसत नाहीं; व ह्याचा काळ हा अर्वाचीन कवितेच्या प्रारंभाचा द्योतक आहे, असें तूर्त म्हटलें असतां चालेल. निदान रामजोशी यांच्या मरणानंतर अगदीं निकटच्या कालांत नांवारूपास आलेला व ह्याच्या अगोदरचा असा दुसरा कवि मिळेपर्यंत हाच पहिला म्हणून निर्वाह करावा. ह्या विषयीं सविस्तर माहिती हंसपद्धति नामक ग्रंथाच्या सातव्या अष्टकांत आहे

## मंगल.

### ओंव्या.

सच्चिदानंद परिपूर्ण, या जगवृक्षाचें कारण । अनंतविष्णूतें नमन, सदोदितासी ॥ १ ॥ सृष्टिपूर्वी जें सदोदित, आहेच आहे निभ्रांत । जें ज्ञानाज्ञानातीत, केवळ ब्रह्म. ॥ २ ॥ पूर्वी कांहीं जरी न होतें, तरी जग कासयावरी दिसतें । यास्तव आहेच आहे तयातें, नाहीं म्हणे कोण ? ॥ ३ ॥ ऐसें उत्पत्तीपूर्वी संचलें, सृष्टीमध्येंही व्यापलें । नामरूप जितुकें झालें, त्या त्या पदार्थी ब्रह्म. ॥ ४ ॥ मृत्तिकाचि असे घटीं, कीं तंतूचि असे पटीं । सर्पामाजीं गोमटी, दोरीच अवघी. ॥ ५ ॥ तैसीं पांचभूतें चारी खाणी, दिसती जीं जीं लोचनीं । चंचलतत्त्वें भासकपणीं, आहे तें ब्रह्म. ॥ ६ ॥ आहेपणा वेगळा केला, तरी काय रूप असे त्याला । विचारें समजून बोला, कोणी तरी. ॥ ७ ॥ जैसें नामरूप उद्भवलें, तैसेंचि मागुती लया गेलें । पुढें ब्रह्मचि संचल, पूर्वरीतीं. ॥ ८ ॥ एवं पूर्वी तेंचि उपरीं, मध्येंही तैसेंचि निर्धारीं । तिहीं काळींही दुसरी, अवस्था नसे. ॥ ९ ॥ तरंगापूर्वी पाणी असे, तरंग होतां माजीं दिसे । लय होतांही अपैसें, पाणीच पाणी. ॥ १० ॥ असो तिहींकाळीं जें आहे, सद्रूपें ब्रह्म तेंचि पाहें । लक्षण ब्रह्मोचें समजा हें, स्वरूपरूपें. ॥ १२ ॥ आतां चिद्रूप ब्रह्म बोलिजे, येणें जडत्व निवारिजे ॥ लक्षणें भिन्न न होइजे, स्वरूपभेद. ॥ १३ ॥ चिद्रूप मायेचें लक्षण, बोलतां बहुत दूषण । जयाचे भासाभासमान, या श्रुतीसी विरोध. ॥ १४ ॥ आणि स्वतंत्र झाली माया, हें बोलणेंचि वायां । तरी अवधारा निश्चया, चिद्रूप तें ब्रह्म. ॥ १५ ॥ मायेसहित सर्व जडांतें, ब्रह्मचि स्वप्रभें जाणतें । माया चिद्रूप ऐसें वाटतें, अज्ञाच बुद्धि ॥ १६ ॥ उपनेत्रें स्पष्ट दिसतें, परि डोळा नसतां काय पहातें । तैसें सर्वांसीही अनुभवितें, ब्रह्म सर्वज्ञपणें. ॥ १७ ॥ सर्व असतां सर्वांतें जाणे, सर्वांचा लय पाहिला जेणें । शून्यासही प्रकाश करणें, स्वप्रकाशत्वें. ॥ १८ ॥ वृत्ति नसतां सुषुप्ति, जाणतां हे स्वयंज्योति । तैसाचि हा चिन्मूर्ति, अभाव देखणा. ॥ १९ ॥ अभाव होतां मायेचा, लय मानिती ज्ञानाचा । ज्ञानाचे नाहींपणाचा, साक्षी कवण ? ॥ २० ॥ चिद्रूप दुसरें असतें, तरी ज्ञान लया साक्षी होतें । हें तों प्रत्यक्ष कळतें, अनुमान कासया ! ॥२१॥

आपुला लय आपण, पाहिला म्हणतां दूषण । देखिलें स्वयें आपुलें मरण, कोठें कोणें तरी ? ॥२२॥ चिद्रूपाचा लय झाला, तो सद्रूपें जाणितला । ऐसें म्हणतांचि साधला, पक्ष आमुचा. ॥२३॥ सद्रूपा चिद्रूपत्व आलें, तरी चिद्रूपही सत्य झालें । आणि सत्यांचें जडत्व गेलें, अनायासें ॥२४॥ एवं सत् तेंचि चित्, ब्रह्म जाणावें निश्चित । आणि आनंदही प्रतिपादित, लक्षण तिसरें ॥२५॥ ब्रह्मीं आनंद कैसा, नसे सुखदुःखवळसा । हाही तिहीं काळीं अपैसा, आहेच आहे. ॥ २६ ॥ आहेपणा तेथेंचि ज्ञान, तैसाचि आनंदही पूर्ण । हीं तीन्हीं लक्षणें, एकेचि ठायीं ॥ २७ ॥ पाणी द्रवत्व गोडी, यांवेगळें कोण निवडी । तैसें एक न राहे अर्धघडी, एकेंविण. ॥ २८ ॥ सुखदुःखाभावीं आनंद, तरी जडजाता नसे खेद । आणि आहेपणा तेथें प्रसिद्ध, सुखही असावें ॥ २९ ॥ ऐसें आक्षेपितां बरवें, येविशीं उत्तर ऐकावें । जड चेतन हे जाणावे । विकार दोन्ही ॥ ३० ॥ विकारीं सुखदुःखें असती, यास्तव नसे आनंदव्याप्ती । चेतनीं सुखदुःखें दिसती, जडत्वीं गुप्त ॥ ३१ ॥ रंकासि राज्यपद येतां, सुख प्रगटे तत्वतां । तेंचि पुन्हां नष्ट होतां, दुःख दिसे ॥ ३२ ॥ जड उत्पन्न जेव्हां झालें, तें सुख ऐसें अनुमानिलें । लय होतां दुःख कल्पिलें, पाहिजे तेथें. ॥ ३३ ॥ जेथें सुखदुःखें दिसती, तेथें आनंदाची समाप्ती । विकार जातां आदिअंतीं, प्रगटचि आहे. ॥३४॥ तस्मात् सुखदुःखाचा अभाव, तेंचि निजानंदाची ठेव । निजदुःख कल्पितां नांव, नसे कोठें. ॥ ३५ ॥ एवं सत्–चित्–आनंद, तिन्ही एकचि अभेद । याचि हेतु श्लोकीं असे पद, कंद शब्दें ब्रह्म. ॥ ३६ ॥ आतां ब्रह्म जाणावें अनंत, सजातीयादिभेदरहित । आणि परिच्छेद जेथें न होत, तेंचि तें तिहीं काळीं ॥ ३७ ॥ येथें आक्षेप असे थोर, सृष्टिपूर्वीं जें साचार । तेथें नसे भेदमात्र, परि उत्पत्तिकाळीं असे ॥ ३८ ॥ जीव ईश उद्भवतां, हा सजातीय भेद तत्वतां । तैसें जडही दिसतां, विजातीय भेद ॥ ३९ ॥ होतां स्वरूपस्फुरण, हें स्वगतभेदाचें लक्षण । एवं सृष्टिकाळीं भेदभान, तेव्हां अनंत कैसा ॥ ४० ॥ याचें उत्तर श्रवण करा, जीवेशभेद नव्हे खरा । दर्पणींचा भास दुसरा, साह्य कोणी करी. ॥ ४१ ॥ तैसें अविद्यामायेंत बिंबलें, तेंचि जीवशिव ऐसे बोलिले । खोटें साच ऐसें वाटलें, परि तें नव्हे ॥ ४२ ॥ उपाधि तोंवरी मिथ्या भास, वाच्य ऐसें म्हणावें त्यास । लक्ष्यांश तेंचि एकरस,

परब्रह्म ॥४३॥ यास्तव भेद नव्हे सजातीय, तैसाचि नाहीं विजातीय। जडजात हा समुदाय, सत्यत्वें कोठें ॥४४॥ ब्रह्म सत्यत्वावांचून, जड होय जरी निर्माण, ऐसें नसतां भेदभान, विजातीया कैंचें ॥ ४५ ॥ स्फुरणीं स्वगतभेद भाविला, तरी सत्यत्व कैंचें त्याला। स्वरूपाहून भिन्न कळला, कधीं कोणासी ॥ ४६ ॥ असो त्रिविधभेदाचें, सृष्टिकाळींही नांव नवचे। आदिअंतीं तों सहजाचें, अनंतत्व पूर्ण ॥ ४७ ॥ त्रिविधभेद न होती जैसे, परिच्छेदही नसती तैसे। परिच्छेदाचें रूप कैसें, जाणावें आधीं ॥ ४८ ॥ पर्जन्यकाळीं आहे, उष्णकाळीं नासताहे। हा काळपरिच्छेद पाहें, विनाशी वस्तूसी ॥४९॥ पर्वतावरी भासलें, जळामाजीं हारपलें। देशपरिच्छेद या बोलें, मानिजे ऐसा. ॥ ५० ॥ असे पदार्थी एखादिया, नाढळे पहातां दुजिया। वस्तुपरिच्छेद ऐसिया, लक्षणें समजा. ॥५१॥ ब्रह्म सर्वदा सर्वकाळीं, काळपरिच्छेद नसे समूळीं। व्यापकपणें सर्वांस्थळीं, नव्हे देशपरिच्छेद. ॥ ५२ ॥ ब्रह्मस्वरूपावांचून, पदार्थचि असे कवण। वस्तुपरिच्छेदाचें लक्षण, ब्रह्मीं नाहीं. ॥५३॥ एवं त्रिविधभेदाचें, अथवा तिहीं परिच्छेदांचें। नांवचि नसतां अनंताचें, लक्षण सिद्ध. ॥ ५४ ॥ अथवा कवणा नळगे अंत, म्हणोनि नामें अनंत। तिहीं काळीं अबाधित, लक्षण हेंहि ॥५५॥ जितुकें दिसतें भासतें, उद्भवून सर्व लया जातें, । अपूर्ण जाणावे पदार्थ ते ते, पूर्ण तें एक स्वरूप. ॥ ५६ ॥ आकाश जरी उपमावें, तेंही एकदेशी स्वभावें। ऐसें पूर्णत्व समजावें, लक्षण ब्रह्मींचें. ॥ ५७ ॥ एवं सच्चिदानंद तीन, अनंतादि परिपूर्ण। हीं इतुकींही ब्रह्मलक्षणें, अकृत्रिम असती. ॥५८॥ 'सदोदित' पदीं बोलिलें, येणें हेंचि येथें सुचविलें। इतुकिया लक्षणें सत्य केलें, तिहीं काळीं. ॥५९॥ तिहीं काळीं लक्षणाचा, ओहटचि नसे त्याचा। या नांवें बोलिजे वाचा, स्वाभावलक्षणा. ॥६०॥ जैसा प्रकाश वर्तुळ दाहक, तिहीं लक्षणीं एक अर्क। जें कधीं नव्हे न्यूनाधिक, स्वाभाविक या नांवें. ॥ ६१ अतां आगंतुक लक्षण बोलिजे, तेणेंहि ब्रह्म ओळखिजे। जें क्षणभरी आणि भसिजे, एकदेशी. ॥ ६२ ॥ उखरभूमी मृगजळ, आणि पाहिजे मध्यान्हकाळ। स्वकिरणीं दिसे जळ, यास्तव हेतू सूर्य. ॥६३॥ तैसा जगरूप खळ, मृगजळापरी केवळ। परी याचें पाहतां मूळ—अधिष्ठान ब्रह्मचि ॥ ६४ ॥ मध्यान्ह पाहिजे मृगजळा, येथें पाहिजे सृष्टिवेळा। टळतां मृगजळ न दिसे डोळां, क्षय होतां जग नाहीं. ॥६५॥ जळ उखरभूमीं पडे, जग स्वकर्मी आतुडे।

मृगजळ असे एकीकडे, जगही एकदेशी. ॥६६॥ सूर्यावीण मृगजळ पडेना, स्वरूपावीण जग दिसेना। उभयकार्यांचे हेतु जाणा, मार्तंड ब्रह्म. ॥ ६७ ॥ तस्मात् या सर्व जगाचें, कारण ब्रह्मचि साचें। केवळ मूळ उत्पत्तीचें, ऐसें नव्हे ॥६८॥ जैसा उत्पत्तीसी कारण, तैसा स्थितिलयां प्रयोजन। सृष्टिस्थितिसंहार होणें, एका अधिष्ठानीं. ॥ ६९ ॥ माया हाचि सूक्ष्म मोडा गुणसाम्य जाणावें खोड। त्रिगुणशाखा ह्या वाड, भूतें उपशाखा ॥ ७० ॥ स्थावरजंगमादि खाणी, पत्रें पुष्पें तयालागुनी। सुखदुःखें फळें दोनी, आठोळी कर्म. ॥ ७१ ॥ येथींचा भोक्ता जीव, बरें वाईट ठेवूनि नांव। असो ऐसा प्रपंच सर्व, वृक्षरूपी. ॥ ७२ ॥ या जगद्रोपाचें कारण, अहंब्रह्म झालें स्फुरण। तेंचि माया परी जाण, स्वरूपावीण नसे. ॥ ७३ ॥ माया ह्मणजे झाली नाहीं, रज्जूवरील जैसा अहि। परी सत्य अधिष्ठान पाहीं, केवळ ब्रह्म. ॥ ७४ ॥ तेंचि ब्रह्म जगीं व्यापलें, सच्चिद्रूपें कोंदाटलें। अस्तिभातिवीण देखिलें, पदार्थ कोठें ? ॥ ७५ ॥ ऐसें जें ब्रह्म व्यापलें, तया विष्णु ऐसें बोलिलें। हेंही लक्षण पाहिजे कळलें, आगंतुक. ॥ ७६ ॥ जोंवरी पदार्थ दिसती, तोंवरी व्यापक ऐसें म्हणती। झालिया पदार्थसमाप्ति, व्यापकता कोठें ? ॥ ७७ ॥ ह्मणून हेंही लक्षण, आगंतुक जाणावी खूण। परी हें ओळखीचें चिन्ह, ब्रह्म जाणावया. ॥ ७८ ॥ आधीं या लक्षणें समजावें, मग सच्चिदादि ओळखावें। ब्रह्मज्ञान याचि नांवें, वेदांतसिद्ध. ॥ ७९ ॥ चतुर्भुज घनसांवळा, कंठीं शोभे वनमाळा। उभय लक्षणीं जैसा कळला, विष्णु एक. ॥८०॥ तैसें दोहीं लक्षणेंवीण, नव्हे कदा ब्रह्मज्ञान। ह्मणून प्रवर्तती सज्जन, येथिंच्या विषयीं. ॥ ८१ ॥ असो विष्णु आणि जगहेतू, सच्चिदादि अनंतू। या लक्षणेंशीं युक्तू, ब्रह्म जें कां ॥ ८२ ॥ ऐसिया स्वरूपाकारणें, अनन्यभावें नमन। जें मी नव्हें याहून भिन्न, स्वात्मत्वें ऐसें. ॥ ८३ ॥ सदादिरूपें वर्णिलें, हेंचि परादिकीं स्तविलें। अंतःकरणें आठविलें, हेंचि स्मरण. ॥ ८४ ॥ नमन तेंचि अभिन्न, त्रिविधमंगलाचें लक्षण। ग्रंथारंभीं झालें पूर्ण, एकाग्र भावें ॥ ८५ ॥ मंगलाचें करोनी मिष, वर्णिलें ब्रह्म निर्दोष। श्रवणमननेंचि भवविष, तत्क्षणीं जाय ॥ ८६ ॥

## ईश्वर कोणास ह्मणावें ?

ज्याच्या भयें सूर्य चंद्र चालती, ज्याच्या भयें वायु प्राण वाहती। ज्याच्या भयें अग्नीसी ज्योति, मृत्यु धांवे ज्या भयें. ॥ १ भूमीतें धारण द्रवत्व आपीं, काळही युगादि क्षण मापी। ब्रह्मा विष्णु शिव प्रतापी, जयाच्या भयें. ॥ २ ॥ ऐसा अंतर्यामीं एकला, अंतरीं नियामकत्वें राहिला। सर्व नियंतिया करूं लागला, नियंतृत्व. ॥ ३ ॥ सर्वांचें ज्या ज्या रीतीं होणार, त्या त्याचा प्रेरक निर्धार। त्यावांचून तृणही साचार, पडिलें न हाले ॥ ४ ॥ ऐसा नियंता सर्वांमाजीं, अलिप्तत्वें राहून सहजीं। प्रेरणा करी होणार जी जी, ब्रह्मादि कीटकांत. ॥ ५ ॥ स्फूर्ति विद्याऽविद्या ज्ञानाज्ञान, मन बुद्धि इंद्रियें प्राण। हें ब्रह्मादि कीटकांत देहीं समान, असे जयापरी. ॥ ६ ॥ तैसेंचि बुद्धीं प्रतिबिंब जयाचें, तो जीवजीवन करी जडाचें। वृत्तींत भासकत्व-तया ईशाचें, नाम ईशान शक्तीस्तव. ॥ ७ ॥ ईशन म्हणिजे प्रेरणा करावी होणारा ऐसी बुद्धि योजावी। त्या रीती जीवें सुखदुःखें भोगावीं, पराधीनत्वें. ॥ ८ ॥ स्वतंत्रपणें प्रेरणा करी, परी कर्तृत्वाचा अभिमान न धरी। ह्मणून अलिप्त निरहंकारी, बंधन न पावे. ॥ ९ ॥ एवं रजसत्वतमात्मक, त्रिगुण-उत्पत्तिस्थितिलयकारक। यया तीन्ही गुणांसि प्रवर्तक, तो येक ईश्वर. ॥१०॥

## ईश्वर कोठें आहे ?

तरी तो ईश्वर कोठें राहतसे, त्रिगुणांसी कैसा प्रेरीतसे। म्हणाल तरी अवधारा अल्पसें, बोलोनि दाऊं ॥१॥ ईश्वर जरी सावयव असता, तरी देहाबाहेरी म्हणों येता। जेवीं बुद्धि तेथें जीव ऐता, तेवीं स्फूर्ति तेथें ईश्वर ॥ २ ॥ बुद्धींत अविद्येस्तव पडिलें, प्रतिबिंब तें जीवत्वा पावलें। तेवींच विद्यामायेनें चैतन्य फळलें। स्फूर्तींत तो ईश्वर ॥ ३ ॥ जीवासी स्वतंत्रता असेना, कारण कीं कल्पिलें तैसें घडेना। म्हणून ईश्वर करीतसे प्रेरणा, प्रारब्धउदया ऐसी ॥४॥ प्रारब्धभोग असे जीवासी, तें सुखदुःख नव्हे ईश्वरासी। म्हणोन जीव नव्हे तो स्वतंत्रत्वेंसी, प्रेरणा मात्र करी ॥५॥ जीवाचें होणार नव्हे स्वाधीन, परतंत्रत्वें भोगी आपण। म्हणून प्रेरक येक असे ईशान, चाळक बुद्धीचा ॥ ६ ॥ असो जीव जैसा बुद्धिआंत, राहत असे सदोदित। तेवींच ईश्वर गुणांसहित, स्फूर्तींत वसे. ॥ ७ ॥ ब्रह्मादि कीटकांत एकला, अंतर्यामित्वें हृदयीं राहिला। अलिप्तपणें नियंता सर्वांला, असे स्वसामर्थ्यें. ॥ ८ ॥

## अधिकारी कोण ?

क्रियादिकांचा नलगे मळ, अहंकृतीचा होय विटाळ । या हेतु बोलिलें निर्मळ, सदाचरण हें. ॥ १ ॥ ऐशिया सदाचारांत, बोलिजे तें निभ्रांत । कोण अधिकारी श्रवणांत, निरोपिजे तो. ॥ २ ॥ वेदांतासिद्धज्ञानाची, सिद्धि व्हावी योगियाची । त्या योगियाचे लक्षणाची, ओळखी ऐका ॥ ३ ॥ योगी शब्दें नव्हे ज्ञानी, जो कां पूर्ण समाधानी । जरी योजावा अधिकारालागुनी, तरी विरोध ॥ ४ ॥ ज्ञानसिद्धि व्हावया म्हणतां, अधिकारी नव्हे कीं ज्ञाता । हठयोगी कल्पूं आतां, तरी अवधारा ॥ ५ ॥ कोंडून बैसला वारा, केव्हां प्रवर्तावें विचारा । त्यासि शून्यामाजीं थारा, अधिकारा पात्र नव्हे. ॥ ६ ॥ मुद्रा आसनें करिती, लोळी धोती आणि पोती । ते देहमळाचे सांगाती, अधिकार कैंचा त्यां ? ॥ ७ ॥ मंत्रयंत्रजपीतपी, नानासाधनी प्रतापी । तीर्थवासी खटाटोपी, अधिकारी नव्हे ॥ ८ ॥ अविवेकें नागवे झाले, नखें केश वाढविले । खाती वृक्षाचे पाल, न होती पात्र ते. ॥ ९ ॥ पात्र नव्हे वेदाध्ययनी, अथवा नव्हे व्याकरणी । न्यायाची करी वेवादणी, कुतर्कें तोही नव्हे. ॥ १० ॥ नानाशास्त्रें अधीत, जयचि इच्छी गर्वित । त्यासी कैंचें आत्महित, श्रवणमननें ? ॥ ११ ॥ उपासक नव्हे अधिकारी, त्या मायिकाची भीड भारी । कर्मी तो नव्हेचि निर्धारी, फलाभिलाषी ॥ १२ ॥ काम्य निषिद्ध त्यागिलें, नित्य नैमित्तिक अनुष्ठिलें । तेही अधिकारा प्राप्त झाले, ऐसें न घडे. ॥ १३ ॥ तया क्रियेचा अभिमान, न पडावें कांहीं न्यून । त्यासी न घडे श्रवण मनन, यथासांग. ॥ १४ ॥ अंतर क्रियेकडे लागलें, वरिवरि श्रवणें काय झालें? असो, हे अवघे गुंतले, मायिकासी ॥ १५ ॥ आतां कोणता अधिकारी, बोलिजे तो अवधारीं । निश्चयेंशीं श्रवण करीं, देवदत्ता. ॥ १६ ॥ जो प्रपंचीं पोळला, त्रिविधतापें तापला । अनुतापें अवघा त्याग केला, तोचि अधिकारी. ॥ १७ ॥ सर्वही मिथ्या कळलें, सत्य तें असे एकलें । ऐसें जेणें निवडिलें, तोचि अधिकारी. ॥ १८ ॥ द्रव्य दारा देखतां नयनीं, वमनासमान जो मानी । पदार्थमात्र न इच्छी मनीं, तोचि अधिकारी. ॥ १९ ॥ मनाचा थोर मोडिला, तृष्णेचा घातचि केला । स्वप्नजागृति विसरला, तोचि अधिकारी. ॥ २० ॥ विषयजातांतें त्यागिलें, इंद्रियांचें मडगें मोडिलें । विवेकें तया दमविलें,

तोचि अधिकारी. ॥ २१ ॥ कष्टें शिणतां निजे प्राणी, तैसा सर्वकर्म उपमर्दूनी। सुखी झाला स्वात्मशयनीं, तोचि अधिकारी. ॥ २२ ॥ प्रारब्धें सुखदुःख भोगितां, अथवा पूजितां कीं गांजितां। निरभिमानें सोशी तत्त्वता, तोचि अधिकारी. ॥ २३ ॥ गुरुपदीं आवडी कैशी, वियोगें घडी कल्पा ऐसी । काया अर्पिली सेवेशीं, तोचि अधिकारी. ॥ २४ ॥ वेदांतश्रवणीं आवडी, स्वानुभवें तर्क काढी। अर्थीं मनें मारिली बुडी, तोचि अधिकारी. ॥ २५ ॥ देहाचें सुख-दुःख विसरे, मनाची धांव सर्वही पुरे। विश्रांती पावला निर्धारें, तोचि अधिकारी. ॥ २६ ॥ हा भवपाश कधीं तुटेल, मोक्ष केव्हां मज होईल। अत्यंत साधन फळेल, ह्मणे तोचि अधिकारी. ॥ २७ ॥ श्रवणमनन न सांडी, गुरुपदीं मारिली बुडी,। संशया करी देशधडी, तोचि अधिकारी. ॥ २८ ॥ बळेंचि ज्ञान आकळी, अज्ञाना कांप सुटे चळी। देहबुद्धीची खांदिली मुळी, तोचि अधिकारी. ॥ २९ ॥ देहावीण जितुकें अंग, तो श्रीगुरूचें निःसंग। नामरूपाचा सांडिला संग, तोचि अधिकारी. ॥ ३० ॥ माया अविद्या जीव शिव, या अवघ्यांचें मोडोनि नांव । एकलाचि उरे गुरुदेव, तोचि अधिकारी. ॥ ३१ ॥ सर्व दृश्यातें ग्रासिलें, भासातें वेगळें काढिलें। शून्यासही ओलांडिलें, तोचि अधिकारी. ॥ ३२ ॥ श्रीगुरुचिया निजकृपें, भवसिंधु मारिला थापें। काळही जयासी कांपे, तोचि अधिकारी. ॥ ३३ ॥ परोक्षें सर्वही कळलें, सच्चिदानंद ओळखिलें। ऐक्यविचारा प्रवर्तले, तेचि योगी अधिकारी. ॥ ३४ ॥ असो, ऐसा जया अधिकार, त्या सुगम येथींचा विचार। तत्क्षणीं पावे परपार, सद्गुरुप्रसादें. ॥ ३५ ॥

## अधिकारानंद.

आतां मज तें काय भय, सद्गुरूनें दिधलें अभय। आतां कासया संशय, तरणोपायाचा ? ॥१॥ जेव्हां माथा ठेविला कर, तेव्हांचि झालों असें अमर। आतांचि हा भवसागर, करीन कोरडा. ॥ २ ॥ आतां बळ चढलें अपार, करीन अवघ्यांचा संहार। आवेशें रगडून अधर, कर चुरून बोले ॥३॥ कामातें जीवें मारूं, कीं क्रोधाचा घात करूं। आसडून पाडूं मत्सरू, मोहा हाणूं लाता. ॥४॥ लोभाचें मूळ उपडूं, कीं शोकातें चिरडूं। कीं भयाचें निःशेष मोडूं, असतेपण. ॥ ५ ॥ अहंतेची करूं हानी, कीं ममता पाडूं

उताणी । कीं प्रयत्नाची घाणी, करूं आतां ॥ ६ ॥ इच्छेचा मोडूं मडगा, कीं आशेचा करूं गळगा । वासनेशीं करवूं शिमगा, लावूं देशधडी ॥ ७ ॥ तृष्णेचें करूं निःसंतान, पाताळीं घालूं अभिमान । कीं असूयेचें रक्तपान, करूं मुखें ॥ ८ ॥ इंद्रियांचे पाडूं दांत, कीं प्राणांचें वळूं सूत । मनातें बांधूं त्यांत, सहित बुद्धि ॥ ९ ॥ हें असो संचितातें, बिंदुलें घालूं हातें । क्रियमाण मारूं लातें, सहप्रारब्ध ॥ १० ॥ गुरूनें थापटितां पाठी, बळ चढलें शतकोटी । आवेश उडोनि जगजेठी, पिटी भुजा ॥ ११ ॥ आतां उपडून काढूं मेरू, कीं आकाशा देऊं धीरू । उडवूं सप्तसागरू, हस्तचपेटें ॥ १२ ॥ उपडूं सप्तही पाताळ, त्यां दाखवूं सूर्यमंडळ । कीं सूर्यासि भूमीचा तळ, दाखवूं आतां ॥ १३ ॥ नक्षत्रें करूं गोळा, वायूची करूं माळा । कीं भूमीचिया चडळा, कालवूं आपीं ॥ १४ ॥ कीं हीं चवदा भुवनें, वैकुंठ कैलासादि स्थानें । एकत्र करूं आसनें, देवांदैत्यांचीं ॥ १५ ॥ विष्णुशिव दोन्हीं धरूं, हृदयामाजीं सगळे भरू । कीं कांखेमाजी आवरूं, ब्रह्मदेवा ॥ १६ ॥ निजानंदक्षीरसागरीं, मोक्षसंजीवनी गिरि । आणूं क्षणार्धामाझारी, मारुती ऐसा ॥ १७ ॥ अहंकाररावणें शक्ति, मारिली प्रेमलक्ष्मणाप्रती । तो उठवून गुरु रघुपती, भेटवूं अतां ॥ १८ ॥ भाव भरत अंतरला, दुरीच्या दुरी राहिला । आतां निवटूनि राक्षसांला, अनुभूति सीता आणूं ॥ १९ ॥ निजसुखविमानारूढ, गुरुरामा करवूं दृढ ॥ पुरवूं भरताचें कोड, कासल्या - सुमतीसह. ॥ २० ॥ ऐसा मुखें बडबडी, हर्षें नाचे मारी उडी । हें देखोनि लवडसवडी, सद्गुरुनाथें ॥ २१ ॥ ह्मणती यासी ज्ञान नसतां, हर्ष दाटला अवचिता । अतां आह्मीं उपेक्षितां, बहकेल उन्मत्तपणें. ॥ २२ ॥

## चतुर्विधा वृत्ति.

### घोरवृत्ति

घोर म्हणजे रजाची वृत्ति, मूढ तेचि तमाची गति । सत्वगुणाची असे शांति, परी विकाररूपें. ॥ १ ॥ त्यांत घोरवृत्तीचे विकार, बोलिजताति सविस्तर । येणेंचि जन्ममरण-वेरझार, जीवाची न चुके. ॥ २ ॥ अमुक पदार्थ मज असावा, अप्राप्त तो प्राप्त व्हावा । दृष्ट श्रुत तो यत्नें साधावा,

या इच्छा नांव काम. ॥ ३ ॥ त्यासी प्रतिबंध जेणें केला, मग तो असो थोर धाकुला। परी तो वैरी वधीन पहिला, या नांव क्रोध. ॥ ४ ॥ प्रारब्धें प्राप्त जे जे विषय, यांचा कधींही न व्हावा क्षय। अति आवडीनें करी संचय, या नांव लोभ. ॥ ५ ॥ ऐसे हे काम क्रोध लोभ तिन्ही, जीवासी व्याघ्रचि अविचारानीं। वळें घोळसून जन्ममरणीं, कल्पांतबंधनीं घालिती. ॥६॥ कांहीं न सुचावें तो मोहो, बहु संशय तो संदेहो। वचनें न मानी तो दुराग्रहो, निग्रह ही घोरवृत्ति. ॥ ७ ॥ दंभ तोचि जनीं दाखवावा, आपुला चांगुलपणा मद जाणावा। मत्सर द्वेष स्वाभिमान ध्यावा, हेही घोरवृत्ति. ॥ ८ ॥ स्वजनाचा कळवळा ते प्रीति, क्रीडा विहार विषयासक्ति। नटनाट्यादि आवडती, हेही वृत्ति घोर. ॥ ९ ॥ कामना असूया तिरस्कार, फळाविषयीं बहु आदर। प्रपंचाविषयीं बहु सादर, हेही घोरवृत्ति. ॥ १० ॥ भय लज्जा निंदा प्रयत्न, शोक साक्षेप कृतघ्न। आर्जव मैत्री बहु भाषण, हेही घोरवृत्ति ॥ ११ ॥ ऐसें कोठवरी बोलावें ? प्रपंचाचें लक्षण वरवें,। दान कर्म धर्मही आघवें, रजोगुणीं घोरवृत्ति. ॥ १२ ॥

## मूढवृत्ति.

आतां तमोगुण तो निरर्थक, प्रपंच ना परमार्थ, ना लौकिक। वृथा मात्र आयुष्याचा घातक, हे मूढवृत्ति. ॥ १ ॥ सदा आळस असावा, असावधता प्रमाद जाणावा। किंवा काळ निद्रेंत जावा, हे मूढवृत्ति. ॥ २ ॥

## शांतवृत्ति.

सत्वगुणाची शांतवृत्ति, क्षमा तितिक्षा दया शांति। विरक्ति श्रद्धादि संपत्ति, शम दम प्रकार. ॥ १ ॥ श्रवण मनन सारासार, मुमुक्षुता परमार्थे उद्धार। त्यागाचि करी सर्व संसार, हेचि शांतवृति. ॥ २ ॥ सदा सत्संग आवडे, सच्छास्त्राचें अति कोडें। सर्व भूतीं आत्मता जोडे, हेचि शांतवृत्ति. ॥ ३ ॥ ऐसें हें चिन्ह शांतवृत्तीचें, हेळावे उठती सत्वगुणाचे। परि ते दानीं उत्पन्न सुखाचे, नाश पावतां दुःख. ॥ ४ ॥ तयासी केवळ सुख न म्हणावें, सुख दुःखवृत्तीनें शीण पावे। तस्मात् हे विकार जाणावे, सत्ववृत्तीचे. ॥५॥ हे वृत्ति रजतमा निर्दाळी, पाडी परमार्थाचे सुकाळीं। उद्भवतां मात्र होय वेगळी, निमतां मेळवी सुखा. ॥६॥ तस्मात् उद्भवतां होतसे विकार, 'यास्तव केवळ सुख नोव्हे निर्विकार। एवं घोर मूढ शांत प्रकार, तीन त्रिगुणा चे. ॥७॥

## उदासवृत्ति.

या तिहींवेगळी उदासवृत्ति, उगीच समानवृत्तीची स्थिति। त्रिगुणाची ही नव्हे उत्पत्ति, सहजपणें स्तब्धता. ॥ १ ॥ इंद्रियविषयाचें विस्मरण, विवेकादि कांहीं नातळे मन। आळसादि नसतां सावधान, हे उदासवृत्ति. ॥२॥ स्तब्धता परी जड नव्हे, सावध परी न हेलावे। उगेपणही न स्मरावें, हे उदासवृत्ति. ॥३॥ सुखाकार वृत्ति गोचर, अनुभवीतसे तदाकार। तेथें हेंचि सुख ऐसा उद्गार, तरी तया सुखा मुके ॥४॥ तेथें सुखरूप होऊनि असावें, आठवूं जातां भिन्न पडावें। परी ते सामान्यवृत्तीनें अनुभवे, मौनेंचि अंतरीं ॥ ५ ॥ पुढें वृत्ति उद्भवतां करी मनन, म्हणे काय होतों सुखसंपन्न? तया सुखांतून हेलाऊन, वृत्ति उमटे. ॥ ६ ॥ जीवनावरून वायु जातां, किंचित् दूर धांवे शीतळता। तेवीं उगेपणापासून निघतां, वृत्ति सुखाकार निघे. ॥ ७ ॥ अन्य पदार्था वृत्ति धरी, तेव्हां तें सुख हरपे निर्धारी। वायु जेवीं जातां बहु दुरी, शीतळता लोपे. ॥ ८ ॥ जरी तैसीच वृत्ति हेलाऊन, पुन्हां त्या सुखीं होय लीन। न अवलंबी पदार्थ आन, तरी तें सुख न लोपे. ॥ ९ ॥ जरी वायु जळींच भ्रमे, तरी शीतळता ते न निमे। तेवीं वारंवार अनुक्रमें, वृत्ति उठे विरे सुखीं. ॥ तरी सुख तें न वोहटे, तदाकारत्वें स्वयें भेटे। वृत्ति हेलाऊन पुन्हां आटे, तया सुखामाजी. ॥ १० ॥ ऐसिया सामान्यवृत्तीमाजी, निजात्मसुख प्रगटे सहजीं। ते काळीं अनुभवावया दुजी, वृत्ति नसे ॥ ११ ॥

## प्रीतिमीमांसा आणि सच्चिदानंद.

सर्वांसी सर्व प्रिय असती, ते कवणाचे निमित्तें आवडती? ते विवेकें पाहतां कळों येती, कीं आपणाप्रीत्यर्थ. ॥ १ ॥ ते ते जरी आवडती खरे, तरी क्षणक्षणां ना विटती सारे। आपणां उबग येतां येरें, भोग्यजातां उपेक्षी ॥२॥ पति स्त्रियेची आवडी धरी, क्षणां विटुन परती सारी। तिनें प्रार्थितांही चाड न धरी, छळितां अधिक त्रासे ॥३॥ स्त्रियेसी भोगइच्छा नसतां, बळात्कारें भोगही घडतां। आवडी उपजेना कदा चित्ता, इच्छी तरी प्रिय वाटे.॥४॥ पुत्र प्रिय मातापितरां, यास्तव चुंबिती त्या लेंकुरा, त्याचे प्रीतीस्तव तरी तें अवसरां, कांटाळून रडे ॥५॥ मायबापें आपणा रक्षिती, म्हणून आपणानिमित्त आवडती। आपणांसि जे उपेक्षिती, त्यांची आवडी कोणा? ॥६॥ ऐसेंचि भ्राता मित्र स्वजन,

पशु वृत्ति राज्यादि धन। आपणांसाठीं भोग्य संपूर्ण, आवडते होती. ॥ ७ ॥ दुर्ब्राह्मण्य आपुलें जावें, यास्तव वेदशास्त्र पढावें, अतिप्रेमें देवासी भजावें, परी सुखी व्हावें आपण ॥ ८ ॥ मोक्षप्राप्ति आपणा व्हावी, यास्तव गुरुपदीं आवडी धरावी। श्रवणादि साधनेंही करावीं, आपुलिया हेतू ॥ ९ ॥ ऐसे जागृतीआदि मोक्षावरी, आपणानिमित्त आवडी सारी। तस्मात् ते ते प्रियताची नव्हे खरी, उगी वरिवरी धरियेली ॥ १० ॥ आपुलें कार्य जोंवरी होणें, तोंवरी अन्याशीं प्रीती करणें। तूं मज आवडता जिवें प्राणें, परी तें उपरोधिक. ॥ ११ ॥ उपरोधिका म्हणावें खोटें, खोटें तें कधीं जाय पालटे। ऐसी आपुली आवडी कोठें, अन्यानिमित्त ॥ १२ ॥ निमित्तावांचून सहज आवडी, आपुली आपणा असे गाढी। स्फूर्तीही न होतां धडफुडी, आहे तैसी आहे. ॥ १३ ॥ स्फूर्ति म्हणजे मी किती आवडता, ऐसा भाव उत्पन्न न होतां। निरिच्छ आवडी असे तत्वता, अकृत्रिमपणें. ॥ १४ ॥ भाव उठे जया प्रीतीसी, अकृत्रिम न म्हणावें तिसी। अन्यत्वीं उमटे तें अपैसी, नाशही पावे. ॥ १५ ॥ उठे जे स्त्रियादिकांचे ठायीं, त्या प्रीतीसी राग नाम पाहीं। अप्राप्त वस्तूंचे समुदायीं, इच्छा शब्दें बोलिजे ॥१६॥ यागादि कर्मीं जे श्रद्धा, त्या आवडीसी नांव सुबुद्धा। गुरुदेवांचे चरणीं जे मेधा, प्रीती ते भक्ति ॥ १७ ॥ ऐसी उठिल्या प्रीतीसी नांवें, चारीही भिन्न भिन्न अपूर्वें। हें असती सहेतुक सर्वें, म्हणून कृत्रिम रूप ॥ १८ ॥ तैसी आवडी आपुली नसे, अभावीं भावीं सारखी असे। तस्मात् आत्मप्रियता ते वसे, अकृत्रिमपणें ॥ १९ ॥ उत्पन्न होय तें नाश पावे, म्हणोनि उद्भवे ते प्रीती नव्हे। उत्पन्न न होतां जें स्वभावें, तेंचि प्रिय निर्हेतुक ॥ २० ॥ ऐसी प्रियता आत्मरूपाहुनी, दुजी नाहीं नाहीं सत्य सत्य वाणी। जरी देहांत वृत्तीपासोनी, आवडी परी आत्मार्थ ॥ २१ ॥ देहादिकांची ही जे प्रीती, वाउगीच ते पुढें बोलिजेती। प्रस्तुत येथें ममत्वरीती, निषेधिली पुत्रादिकांची ॥ २२ ॥ असो आपुली जे आत्मप्रियता, जे निर्हेतुक अकृत्रिमता, हांचि आनंद असे तत्वता, लक्षण तिचें. ॥ २३ ॥ आनंद लक्षणही कल्पांतीं, अविनाशपूर्ण सहज-गती। तस्मात् हेंचि सद्रूप निश्चिती, चिद्रूपही तेंचि ॥ २४ ॥ एवंअस्तिभाति प्रियरूप आत्मा, हाचि सच्चिदानंद परमात्मा। याहून भिन्न त्या त्या रूपनामा, भ्रम हा बोलिजे ॥ २५ ॥

---

# परशुराम बल्लाळ गोडबोले.

हे लोकप्रिय नवनीताचे संपादक आणि नामांकित अर्वाचीन कवि इ. स. १७९९ सालीं श्रीक्षेत्र वांई येथें जन्मले. हे जातीचे कोंकणस्थ हिरण्यकेशी ब्राह्मण. ह्यांचें लहानपणचें शिक्षण वांई येथेंच झालें. नंतर रा. रा. नारायणशास्त्री देव ह्यांजपाशीं यांनीं संस्कृताचा अभ्यास केला. पुढें पुणें येथें आल्यावर कांहीं कालपर्यंत हे आपल्या मातुलांच्या–जोगांच्या–पेढीवर कारकून होते. ह्यांचें मोडी अक्षर फार सुंदर असून ह्यांना जमाखर्चाची माहिती चांगली होती. कविता करण्याचा नाद पूर्ववयांतच लागला, व तो त्यांच्या वयाबरोबर उत्तरोत्तर वृद्धिंगत होत गेला; आणि त्यायोगानेंच हे प्रसिद्धीस आले. पुढें मराठी भाषेचा कोश तयार करण्यासाठीं सरकारी शिक्षणपरिषदेनें जें शास्त्रीमंडळ नेमिलें, त्यांत ह्यांची योजना झाली. कोश लिहिण्याच्या कामीं तीन चार वर्षे गेल्यावर तो छापण्याचें काम पुणें येथील सरकारी छापखान्यांत सुरू झालें, त्यावर ह्यांस मुख्य नेमलें. हें काम करीत असतां पुण्याच्या कालेजांतील अगदीं पहिले मुख्य गुरु मेजर क्यांडीसाहेब ह्यांचा आणि परशुरामपंतांचा परिचय झाला. नंतर मराठी क्रमिक पुस्तकें रचण्याकरितां सदरहू साहेबांना मराठी भाषांतरकार म्हणून नेमिलें. तेव्हां त्यांनीं तात्यांस मराठी पंडित या नात्यानें आपल्या मदतीसाठीं मागून घेतलें. त्या पुस्तकांतून कविता घालण्याचें काम क्यांडी साहेबांनीं यांजकडेच सोंपविलें होतें. त्यांच्या कारकीर्दींत विद्याखात्यानें जे जे ग्रंथ प्रसिद्ध केले त्यांचें तात्यांनीं मोठ्या मार्मिक रीतीनें शोधन केलें आहे. त्याच साहेबांच्या सूचनेवरून ह्यांनीं प्राचीन मराठी काव्यांतून वेंचे निवडून ते **नवनीत** ह्या नांवानें प्रसिद्ध केले. ह्या नवनीतद्वारा महाराष्ट्रीयांस आपल्या प्राचीन मराठी कवींची प्रथम ओळख तात्यांनींच करून दिली, असें म्हटलें असतां हरकत नाहीं. गद्यपद्यात्मक संस्कृत नाटकांचीं मराठी भाषेंत प्रतिबिंबें उतरण्याचा क्रमही त्यांनींच सुरू केला. उत्तररामचरित्र, वेणीसंहार, मृच्छकटिक, वगैरे नाटकांचीं ह्यांनीं केलेलीं भाषांतरें सर्वोत्कृष्ट असून प्रसिद्ध आहेत. पुढें रा. माधव चंद्रोबा यांनीं मराठी काव्यांचा जीर्णोद्धार करण्याकरितां सर्वसंग्रह प्रसिद्ध करण्याचें काम

सुरू केलें. त्याचें संपादकत्वही परशुरामपंत तात्यांकडेच होतें. सर्व मराठी काव्यांत मोरोपंतांच्या कवितेचे ते मोठे चाहते असत; व त्या कवीविषयीं त्यांना फार अभिमान वाटे. त्या कवीचें केकावलींतील हृद्गत ह्यांनीं आपल्या केकादर्श-नामक ग्रंथांत मराठी वाचकांस व्यक्त केलें आहे. ह्याशिवाय ह्यांनीं केलेले बाल-बोधामृत, वृत्तदर्पण, मराठ्यांच्या इतिहासावरील सोप्या स्फुट कविता, नामार्थ-दीपिका वगैरे ग्रंथही प्रसिद्ध आहेत. ह्या कवीची कविता फार प्रौढ, सुलभ आणि हृदयंगम आहे. हे आपल्या वयाच्या ७५ व्या वर्षीं पुणें येथें (?) निवर्तले. हे गृहस्थ मोठे उद्योगशील, सज्जन आणि ईश्वरभक्त असत.

---

## गतानुबोधन.

### पद.

आठवतें तुज काय? सीते! ॥ ध्रु० ॥
ह्याच गिरीवर आपण होतों, पाहत निर्झरशोभा, सीते!
आठवतें तुज काय? सीते! ॥
अपुलें मानस स्वस्थ कराया, लक्ष्मण फार झटे गे सीते!
आठवतें तुज काय? सीते! ॥
दिवस सुखानें नेले येथें, संगतिनें अनुजाच्या सीते!
आठवतें तुज काय? सीते! ॥
ह्या श्रीगोदावरिचें केलें, स्नानें पानें सेवन सीते!
आठवतें तुज काय? सीते!
गोदावरिच्या तीरीं आपण, केले फार विहार सीते!
आठवतें तुज काय? सीते! ॥

### दिंड्या.

एक दिवशीं आपण एक शयनीं, एकमेकांसी करीं आलिंगोनी,
कांहिं कांहीं बोलतां मंद वचनीं, आंगिं उठले रोमांच थरारोनी.
एकमेकांशीं लावुनियां आंगा, गाल गालाशीं, भूज भुजासंगा,

काढितांही त्या गोष्टिच्या प्रसंगा, मनीं नाहीं आणिलें क्रमभंगा. ॥
असें होतां आनंद उभयतांतें, रात्र सरली बोलतां बोलतां ते.
नाहिं झालें ठावकें आपणांतें, काय आठवतें? सांग सखे तूतें. ॥

## सीताराम

### ओव्या.

तिन्ही अवस्थांमाजीं साचें, झालें अद्वैत सुखदुःखाचें ।
एकरूप उभयतांचें, जें स्नेहाशीं अनुरूप. ॥
जें हृदया विश्रांतिस्थान, जेथें प्रेमरसाचें मान ।
कधींही होईना न्यून, वयोभेद झाला तरी. ॥
मध्यें आलिया आवरण, कालेंकरून त्याचें निवारण ।
होतां, पहिल्यापरी पूर्ण, स्नेहसत्वीं जें राहिलें. ॥
ऐशिया सुमाणुसासी, असावी सर्वदा भद्राशी ।
कोण तयाच्या अभद्राशी, जन मानसीं चिंतील? ॥

## सीताविरहकल्पना.

### पद.

न कळे होइल गति कैशी, आतां काय करूं! ॥ ध्रु० ॥
विपरित काळाचें लक्षण, झाला जीवलोक निर्वाण,
सरलें जगण्याचें कारण, आतां प्राण केविं धरूं!
भासे मजला जग हें शून्य, दिसतें जैसें जीर्ण अरण्य,
सरलें माझें सर्वहि पुण्य, होउनि वन्य काय फिरूं?
पूर्वीं मानवला संसार, वाटे आतां तोच असार,
शरिरीं होती कष्टहि फार, नाहिं अधार कुठें फिरूं!
सीतेवांचुनि मजला क्षण, होतिल कल्पासमान जाण,
वाटति सोडावे हे प्राण! खोंचुनि बाण काय मरूं?
न कळे होइल गति कैशी, आतां काय करूं!

## सीतापरित्याग.

पद.

जन्मुनि रविवंशीं ऐसा, झालों निर्दय मी कैसा! ॥ धृ० ॥
चित्तीं ठेवुनियां विश्वास, माझ्या अवलंबुनि हृदयास,
निजली पाहुनियां चित्रास, झाला जिला फार आयास,
सर्वथा उचित जिचा अत्याग, तीचा कारितसें मी त्याग,
जीवर नित्य करीं अनुराग, तिजवर झाडितसें मी आग!
काढितों जळामधुनि मासा, झालों निर्दय मी कसा!
जी ही शोभा सदनाची, मूर्तिच केवळ मदनाची,
विश्रांती मम हृदयाची, माझी प्राणसखी साची,
तिजला घालितसें फांसा, झालों निर्दय मी कैसा!
जींच्या उदरीं गर्भ कठोर, होतो चंचळ वारंवार,
नुचले निजगर्भाचा भार, जीचे अवयव अतिसुकुमार,
तिजला देतों मी कुदशा, झालों निर्दय मी कैसा!
द्यावा बळी राक्षसाला, तैसा टाकितसें हिजला,
नाहीं लाज दया मजला, कराया कर्म असें सजला,
झाला नसे कोणि ऐसा, झालों निर्दय मी कैसा!

## सीतास्वप्नप्रतीति.

दिंड्या.

असे कोठें तो प्राणनाथ माझा,
दाखवा हो लवकरी रघूराजा,
कसा गेला टाकूनि एकलीला,
शीर अंकीं ठेवून नीजलीला ॥
काय कारण जाहलें जावयाला,
कोण आलें हो त्यास न्यावयाला
तुझ्या संगें येईन मी वनांत,
बोलिला तें नाहींच का मनांत? ॥

स्वप्न आतां तैसाच मला झाला,
नाथ माझा टाकूनि मला गेला;
हाक मारित फीरतें प्राणनाथा,
येइं येईं सत्वरी जगन्नाथा!

तेंच झालें कीं खरें हा कपाळा!
कुठें पाहूं मी प्रिया जगत्पाळा?
असो आतां पाहीन त्यास जेव्हां,
त्यावरी मी होईन रुष्ट तेव्हां.

### वासंतीवाग्दंड.

पद.

किति रे असती तूं निष्ठुर रामा! नवमेघश्यामा! ध्रु०
कुसुमाहुनिहि जी अतिसुकुमारी, मिथिलेशकुमारी,
उदरा गर्भाचें ओझें भारी, ती स्त्री कांतारीं,
विजनीं नेउनि त्यजिली कशी, एकाएकीं निजविश्रामा! १
प्राणांहुनिही जी प्रिय तुजला, मोकलिलें तिजला!
प्रेमा तिजविषयीं कोठ गेला! उर नाहीं भिजला!
वचना राहुनि काम मनांतिल पुरवो ऐशी त्यजिली रामा! २
अबलेचा त्या गति होइल कशी, स्मृति नाहा ऐशी!
व्याघ्राच्या वदनीं गाई जैशी, त्यजिली त्वां तैशी!
प्रभु तूं! तुजला काय म्हणावें! इच्छिसि तैशा करिशी कामा. ३

### जनकवात्सल्य.

दिंड्या.

बाइ माझे लाडके सिताबाई, बाळपणचें कौतूक वदूं काई,
तुझें पाहतसें बाळपणीं मूख, होय मजला तैं काय वदूं सूख!
विनाकारण रोदन हास्य यावें, तिहीं वदनातें फार शोभवावें;
थोडथोड्या कोंवळ्या दंतपंक्ती, जयांमाजीं उगवल्या शुभ्रकांती;
जयांपासुन बोबडे बोल गोड, निघुन माझें पुरविती सर्व कोड.

## क्षत्रियब्रह्मचारी.

### ओव्या.

पृष्ठीं बांधले भाते दोन, माजीं भरले बहुत बाण;
त्यावरी चूडा लंबमान, सुटोनियां रुळताहे.
धनुष्याची दोरी विचित्र, तिचें केलें असे कटिसूत्र;
मंजिष्ठानें रंगविलें वस्त्र, अंगावरी घेतलें.
वामकरीं भव्य कोदंड, दक्षिणहस्तीं अश्वत्थदंड;
रुद्राक्षांचीं वलयें अखंड, मनगटामाजीं शोभती.
भस्म रेखिलें सर्वांगीं, मृगचर्म धरिल ऊर्ध्वभागीं,
कौपीन असे अधोभागीं, ब्रह्मचारीलक्षण हें.

## प्रियाराधन.

### साक्या.

कां गे कोपातें करिशी, चित्तीं तापातें धरिशी, ध्रु०
माझ्या आज्ञेवांचुनि पाउल टाकित नाहींस अशी,
मजला पुसल्यावांचुनि बाहिर निघूनि गेलीस कशी ! १
कां गे मजवरी मनःप्रिये त्वां ऐसा केला रोष !
तुझिया कोपा विषय नव्हे हा लावुं नको मज दोष. २
काय चुकी मजपासुनि घडली ह्मणुनि मला सोडोनी,
निघूनि गेलिस न कळत पुसतों हात तुला जोडोनी. ३
जें दृढबंधन तव कंठीं म्यां निज भुजपाशें केलें,
होतां निद्रावश प्रमादें काय शिथिल तें झालें ? ४
किंवा निद्राभरांत सखये कुशीस वळतां चुकलों,
वदन तुजकडे न करुनि पाठीमोरा होउनि निजलों ? ५
अन्य स्त्रीशीं भाषण करितां स्वप्नीं दिसलों तुजला,
यास्तव शंका धरूनि चित्तीं दोष लाविशी मजला ? ६

तव अपमान सखे मजपासुनि झाला असेल शयनीं,
परि म्यां समजुनि नाहीं केला, पाहसि हें तूं नयनीं. ७
तुजला सोडुनि शयनिं कधींही आधीं नाहीं उठलों,
तुझियासंगें विषयसुखातें कधिंही नाहीं विटलों. ८
काय नसें मी तुज वश किंवा न करीं त्वदुचित कांहीं?
मीनाऽवनसें तूं मज जीवन, दुसरें जाणत नाहीं! ९
तूं देवी, मी भक्त तुझा अपराधा ठेवीं न मनीं,
आहे आज्ञांकित दास तुझा! तत्पर तुझिया भजनीं. १०
कां गे कोपातें करिशी! चित्तीं तापातें धरिशी!

## रणझंझा.

ओव्या.

वायुवेगें कडाडती, डाहळ्या उडोनि गगनीं जाती,
धुळीचे कल्लोळ ऊठती, व्याप्त होती दशदिशा.
गरगर फिरतां अतिसत्वर, वरती चढती पांसुनिकर,
अंतरिक्षीं ध्वजाकार, स्तंभ दीसती धुळीचे.
भूमिपृष्ठावरोनि खडे, उडोनि जाती चोहींकडे,
स्कंधघर्षणीं अग्नी पडे, धूमपुंज उडताती.
प्रासादांचिया शिखरीं, शिरतां गवाक्षांभीतरीं,
नवीन मेघांचिया परी, गंभीर ध्वनी उद्भवती.
ही प्रचंड वाताची उकळी, शांत होईल अल्पकाळीं,
मी असतां तुझ्या जवळी, कां व्यर्थ भीशी भयशीले!

## कुरुक्षत्र.

ओव्या.

जेथें गजमस्तकें थडकती, रुधिरमांसांचे चिखल होती,
ध्वजांसहित बुडोनी जाती, रहंवर ज्या स्थळीं.

बुडालिया रथांवरी, पाय ठेवूनि वीरचतुरीं,
विक्रमाची कलाकुसरी, दाखवीजे ज्यामाजीं.
मांसाशनें, रुधिरपानें, भालू ओरडती विक्राळस्वनें,
तींच मंगलतूर्यें भावोनि मनें, कबंधें जेथें नाचती!
ऐशिया लोकभयंकरीं, संग्राममहार्णवाभीतरीं,
संचार करावया भूमीवरी, पंडित एक पांडुपुत्र.

### भारतीय नरसिंह.

अभंग.

नव्हे मी राक्षस किंवा नव्हे भूत, नव्हे यमदूत कां हो भीतां!
शत्रूच्या रक्तानें भरलें माझें अंग, केला यज्ञ सांग युद्धाचा मी.
प्रतिज्ञासागर असतां अपार, पडलों मी पार दैवयोगें.
जातीचा क्षत्रिय स्वभावें क्रोधन, करूं नका मन त्रस्त कांहीं!
रणाग्निज्वाळेंत वीरलय झाला; त्यामाजीं वांचलां दैवें तुम्ही!
अश्वगजप्रेतांआड कां लपतां? कां हो ओरडतां धाकें आतां!
आतां भय नाहीं कोणाचें तुह्मांसी, स्वस्थ व्हा मानसीं पळूं नका.
पुसतों तें सांगा भिऊं नका मना, कोठें याज्ञसेनी आहे दावा!

## दारिद्र्यप्रभाव.

शार्दूलविक्रीडित.

ज्या माझ्या सदनांगणांत विमल द्वारप्रवेशीं बली,
होते सारस, हंस, भक्षित सदा, तैशीच हे देहली;
तेथें सांप्रत हीं पहा उगवलीं झाडें तृणें दीसती,
त्यांमध्यें पडतां बली, झटुनियां मुंग्या, किडे, भक्षिती!

उपजाति.

भोगून दुःखें सुख शोभतें जनीं, घनांधकारांत दिवा जसा वनीं;
सुखापुढें होय दरिद्रता नरा, असोनि देहीं मृततुल्य तो खरा.

वसंततिलका.

माझें मलाच घर तापद फार झालें,
क्षीणार्थ जाणुनि जनीं गृह वर्ज्य केलें,
गेला सुकोनि मद कालवशेंचि ज्याचा,
जातात भृंग कट सोडुनि त्या गजाचा.
नाहीं खरें विभवनाशज दुःख मातें,
दैवानुसार मिळतें धन आणि जातें;
हें दुःख फार मज नष्टधनास, सारे
झालेच मित्र पण सोडुनि पाठिमोरे

ओव्या.

दारिद्र्य लज्जेचें कारण, लज्जा करी तेजाचें हरण,
निस्तेज पुरुषास अपमान, पदोपदीं होतसे.
अपमान निर्वेदा उठवी, निर्वेद शोकातें पेटवी,
शोक बुद्धीतें आटवी, निःशेषपणें.
बुद्धीनें सोडिलें जयासी, नाश गांठी त्या नरासी,
अहो ! इतुक्याही अनर्थासी, मूळ पाहतां दारिद्र्य !

शार्दूलविक्रीडित.

चिंतेचें घर हेंच, वैर दुसरें लोकांत होतें सदा,
निंदा मित्रजनांत, कारण निजद्वेषास हें सर्वदा;
जाया बुद्धि वनास देइ सहसा, जाया सदा लाजवी,
शोकाग्नी ह्रदयस्थ हा, परि तनू जाळी न, संतापवी !
निर्द्रव्या पुरुषा न बंधुजनही साह्यास संतोषती,
त्याचे जे प्रियमित्र तेहि फिरती आपत्तिही वाढती;
जातें तत्त्व लयास शीलविधुची कांति क्षया पावती,
जें केलें जन पापकर्म इतरीं तें त्याकडे लाविती !

त्याची संगत कोणिही न करिती, त्या मान कोठें नसे,
जातां तो धनिच्या घरा सुवचनें त्याला न कोणी पुसे;
थोरांपासुनि दूरदूर फिरतो लाजून दुर्वृत्तक,
वाटे निर्धनता मला खचित हें साव्हें महापातक.

उपजाति.

दारिद्य मित्रा ! वससी शरीरीं, माझ्याच तूं मानुनि सौख्य भारी;
तुझ्याविशीं हें मज दुःख मोठें, मेल्यास मी जाशिल सांग कोठें !

इंद्रवंशा.

जेव्हांहि भाग्यक्षय दुर्दशा नरा, येते अशी काळकृता सुदुर्धरा;
घेतात मित्रेंहि अमित्रता तदा, कंटाळती लोकहि रक्त जे सदा.

( शार्दूलविक्रीडित. )

वेगातें करितो तुरंग गमना चालावयाला अती,
त्याचीं तीं परि पावलें नच तशीं शक्तिक्षयें चालती;
तैशा पूरुषचित्तवृत्ति चपला चोहोंकडे धांवती,
खिन्ना होउनि त्या पुन्हां परतुनी चित्ताप्रती पावती.

चारुवृत्त.

ओव्या.

हा दीनांचा कल्पतरू, सज्जनांचा साहाय्यकारू,
विद्यासंपत्तीचा भारू, होतां फार लवलासें.
हा शिक्षितांचा आदर्श, उत्तमाचरणाचा निकष
सद्गुणरत्नांचा कोष, शीलवेलेचा समुद्र हा.
हा सर्वांचा सत्कारकर्ता, नव्हे कोणातें अवमानिता,
मित्रमंडळीचा संतोषदाता, चतुर आणि उदार.
ऐसे विशेष गुण ज्याचे अंगीं, तोच दांचला म्हणावा जगीं,
येर ते प्रेततुल्य अभागी, श्वास मात्र सोडिती.

शार्दूलविक्रीडित.

शाखा सद्गुण, पालवी विनयही, विश्रंभ मूळें, दया,
छाया, स्वाचरण प्रकांड, फुललीं चारित्र्य पुष्पें जया;
सत्कारोपकृती फळें, रससुधातुल्या गिरा वाहती,
ऐशा सज्जनपादपावरि सुहृत्पक्षी सुखें राहती.

वर्षावर्णन.

वसंततिलका.

आनंदले नटति पाहुनि ज्यास मोर, त्रासोनि हंस नच ठाकति ज्या समोर;
तें हें अकालिकाचि दुर्दिन होय भारी, कामीजनास गगनासहि रोधकारी.
हा मेघ आर्द्रमहिषोदरतुल्य काळा, शंखाकृती धरि करांत बलाकमाळा;
विद्युत्प्रभा वसन पीत कसोनि हातें, वाटे दुजा हरिच आक्रमितो नभातें.

आर्या.

माधवगात्रश्यामल शुभ्रबलाकासमूहरचितदर,
विद्युत्पीतवसन हा शोभे अंभोद जेंवि चक्रधर.

ओवी.

मेघोदरांतूनि जळाच्या धारा, भूमीवरी पडती झरारा,
जैशा शुद्ध रजताच्यीं तारा, विद्युत्प्रकाशें झळकती.

शार्दूलविक्रीडित.

कांहीं हंसमयूरकोकबकसे वेगें उडों पाहती,
कांहीं कांसवमीननक्रसुसरी पाण्यामधें पोहतीं;
कांहीं पर्वतवृक्षतुंगशिखरप्रासादसे दीसती,
वातें हालवितां नभीं घन असे नानाकृती शोभती.
भासे कौरवराष्ट्रतुल्य नभ हें जें अंधकारा धरी,
हर्षानें बहु गर्जना करि शिखी दुर्योधनाचे परी;
घूतीं निर्जित धर्मसा पिक वनीं आला असे संप्रती,
गेले स्त्रीसह हंसपांडव तसे अज्ञातवासाप्रती.

वसंततिलका.

होऊनि शैलशिखरावरि लंबमान, हे गर्जतात घन दुंदुभिच्या समान;
ऐकोनि शब्द उडती शिखि पक्षत्रातें, कीं वीजिती मणिमयव्यजनीं नभातें.

शार्दूलविक्रीडित.

धाराजर्जर दर्दुर प्रसरती पंकीं उड्या घालिती,
झाले मोर विमुक्तकंठ, फुललीं झाडें पहा डोलती;
साधूला खळमंडळी तशिच ही चंद्रास मेघावळी
झांकी, ती कुलटेसमान चपला राहे न एके स्थळीं.

आर्या

पवनाचि जवन तुरग ज्या, जलमयधाराचि शस्त्रधारा ज्या,
ज्या स्तनितदुंदुभिध्वनि शोभे विद्युत् पताक ज्या राज्या,
तो मेघराज नेतो हरुनि नभीं करसमूह चंद्राचा,
राजा जसा स्वनगरा नेतो करभार अबल शत्रूचा.

साक्या

तडिद्दलाका यांच्या योगें कर्बुर झालेल्यांनीं,
गर्जुनि विरहिजनाच्या चित्तीं क्षत केलें मेघांनीं.
त्यावरि दुर्मति हताश बक हा पहा करितसे मार,
'प्रावृट्' 'प्रावृट्' ऐसें बोलुनि, घाली क्षतांत खार !

शार्दूलविक्रीडित.

मेघीं आर्द्र तमालपत्रमलिनीं आकाश आच्छादिलें,
बाणीं हस्तिस तेविं वारुळशता धाराशतें भेदिलें;
शोभे वीज घनावरीहि, दिवटी प्रासादमाथां जशी,
चंद्राची हरिली प्रभा जलधरें, स्त्री दुर्बलाची तशी !

साक्या

ज्यांच्या पाठीवर बांधियले विद्युल्लेखा दोर,
धांवुनि धाराधर हे खालीं धारा सोडिति थोर.
जाणों हे गज शक्राज्ञेनें रजताच्या दोरांनीं,
ओढुनि नेती या पृथ्वीला वर अपुल्या जोरांनीं.

### शिखरिणी.

विजेच्या चापल्यें क्षुभित घन नीलाभ वळले
महावातें अभ्यंतरिं उदधि जैसे खवळले;
तिहीं गंधोद्दामा हरिततृणसस्यांकुरवती,
असे केली धाराशतशरविदीर्णा वसुमती.

### शार्दूलविक्रीडित.

मोरांनीं बहु आदरें करुनि जो ये ये असा बाहिला,
वेगें जाउनि जो बलाकततिनें सोत्कंठ आलिंगिला;
हंसांनीं निजपंकजें त्यजुनियां त्रासोनि जो पाहिला,
तो हा मेघ दिशांस झांकित नभीं निलांबरें राहिला.

### ओव्या.

तारा गेल्या नाशाप्रती, जैशी दुर्जनावरी उपकृती,
कांतवियुक्त युवती, तैशा भासती दशदिशा.
पेटतां विद्युल्लताज्वलत, अंतरीं गेले संतापोन,
वाटे विरघळलें गगन, जळरूपें पडतसे.

### आर्या.

उतरे चढेहिं वर्षे गर्जे पाडी घनांधकारातें,
भासनवश्रीपुरुषापरि मेघ धरी अनेक रूपांतें.

### उपजाति.

विद्युल्लतांनीं जळतेंच काय ? धाराजळांनीं गळतेंच काय ?
बलाहकांनीं हंसतेंच काय ? वायुभ्रमें निःश्वसतेंच काय ?

### इंद्रवज्रा.

मेघोदरा भेदुनियां निघाल्या, पंकांतुनी जेविं मृणालि आल्या;
धाराच चंद्रव्यसनें हजारा, सोडीतसे हे दिव अश्रुधारा.

### आर्या.

सज्जनचित्तसुनिर्मल विजयशरसमान कर्कशाकारा,
चंडानिलसंचोदित जलधर हे वर्षतात जळधारा.

सोडिति जलद जलाचे बिंदू बलरामवस्त्रसमकाय,
इंद्राच्या कोशांतिल घेउनि मुक्ताच टाकिती काय !

अनुष्टुप्.

तमालपिष्टनीलांनीं, मेघांनीं नभ लिंपिलें,
संसक्तशीतसुरभि, वातांनीं उपजीविलें !

इंद्रवज्रा.

अंभोधराशींच गमे रमाया, आली पहा आपण होउनीया;
कांता जशी येउनियां प्रियातें, आलिंगिते वीज तशी तयातें.

ओवी.

विद्युज्जिव्हा लांबवूनि, जलधर हनुवटी खालवूनी,
इंद्रचाप भुज उभारोनी, जांभई देतें अंतरिक्ष.

उपजाति.

ताडावरी कर्कश शब्द होतो, जळीं स्थळीं केवळ मंद हो तो;
जशा विण्याचा झडतात तारा, तालानुसारें पडतात धारा.

## वसंतसेनेचा अपमृत्यु.

ओव्या.

दाक्षिण्योदकाची तटिनी, गेली काळभूमींत जिरोनी !
वाटे रति विलासिनी, गेली निघोनि स्वदेशा !
हा वस्त्रालंकारशोभने ! हा सुशीले सुवदने !
हा क्रीडारसभाजने ! हा वामनयने रंभोरु !
हा सौजन्यप्रवाहिनी ! हा सुहासपुलिनशोभिनी !
हा चतुरे गजगामिनी ! आश्रयदायिनी आह्मांतें.
मन्मथव्यापाराचा बाजार, सौभाग्यपण्यांचा आकार,
ऐसें तुझें शुभ शरीर, व्यर्थ नाशा पावलें !

## न्यायाधीशाचीं लक्षणें.

शास्त्रज्ञ आणि निराकुल, कपटोद्धारणीं अतिकुशल,
वक्ता आणि क्षमाशील, न्यायद्रष्टा असावा.

मित्रा, स्वकीया आणि परा, समदृष्टीनें पाहणारा,
प्रश्न करितांचि उत्तरा, देई ऐसा असावा.
दुर्बलांचा पालनकर्ता, दुर्मदांचा मदहर्ता,
धर्मन्यायीं लोभधर्ता, ऐसा द्रष्टा असावा.
द्विर्भाव येतां पुढारीं, परतत्वातें हृदयीं धरी,
राजाचा कोप दूर सारी, ऐसा अधिकारी असावा.

### अन्यायी न्यायसभा.

**ओव्या.**

चिंतासक्त जयांचें हृदय, ऐसे मंत्रीसमुदाय,
हेंच ज्यांत विपुल तोय, दूत लाटा उसळती.
वार्ता सांगणारे चार, तेच येथें ग्राह मकर,
वधनियुक्त अश्व कुंजर, हिंस्र जलचर तेच येथें.
नाना अनुवादक पक्षी फिरती, लेखक हे सर्प भासती,
नीतितटांतें ढांसाळिती, कुतर्कवादी जलौघ हे.
ऐसें राजकीय न्यायागार, हिंसक असती जेथें फार,
वादि प्रतिवादी यांस भयंकर, समुद्रापरी दिसतसे.

### दैवलीला.

**ओंव्या.**

कोणाला करितसे दूषित, कोणाला सुयशें प्रपूरित,
कोणाला उच्चपदांस्थित, खालीं पाडितें कवणाला.
कोणा कधीं देतसे सुखातें, कोणा कधीं वाढवी दुःखातें,
भय, चिंता आणि शोक यांतें, कधीं कोणा देतसे.
कधीं देतें परस्पर प्रीती, कधीं वाढवितें वैरवृत्ती,
कधीं दारिद्र्य कधीं संपत्ती, कर्मानुसारें देतसे.
ऐशी दाखवी लोकस्थिती, दैव क्रीडतें स्वतंत्रगती,
कूपघटीयंत्राची रीती, तीच येथें जाणावी.

# विठोबाअण्णा दप्तरदार.

हें नामांकित सत्पुरुष आणि कवि इंग्रजी अमदानीच्या आरंभींच कऱ्हाड येथें होऊन गेले. हे शांडिल्य गोत्री देशस्थ ब्राह्मण; यांचें आडनांव वेदरे. मोगलाईत वेदर येथें यांचे पूर्वज रहात असत. सुमारें १५० वर्षांपूर्वी अण्णाचे पितामह बाळाजीपंत यांनीं नानासाहेब पेशव्यांकडून कऱ्हाड पेठ्यांतील दप्तरदारीची सनद मिळविली. त्यांचे पश्चात् त्यांचे पुत्र महादजीपंत यांस ती जागा मिळाली. महादजीपंत यांस शके १७३५ ( इ. स. १८१३ ) सालीं एक पुत्र झाला, तेच प्रसिद्ध विठोबाअण्णा दप्तरदार होत. वयाच्या दहाव्या वर्षापुढें अण्णांचें अध्ययन सुरू झालें व पुढील कांहीं वर्षांत संस्कृत विद्येचा पूर्ण अभ्यास करून ते मोठे विद्वान् झाले ते पहिल्या प्रतीचे वक्ते असून पुराण सांगण्यांत व कीर्तन करण्यांत त्यांची बरोबरी करणारे लोक त्या वेळीं फार थोडे होते लहानपणापासून त्यांचा ओढा हरिभक्तीकडे होता. त्यांनीं गजेंद्रचंपू, सुश्लोकलाघव, हेतुरामायण, प्रयोगलाघव, वगैरे अनेक संस्कृत ग्रंथ लिहिले. याशिवाय त्यांनीं मराठी पदें, कटाव, वगैरे वरीच स्फुट कविता, लिहिली आहे. ही त्यांची कविता पूर्ण प्रासादिक व अत्यंत रसवती आहे अण्णा मोठे करारी होते. मातुश्रीच्या मरणापासून त्यांनीं शेला पागोटें घालण्याचें सोडून दिलें. पुढें पुढें त्यांची परमार्थप्रवणवृत्ति वाढत चालली. अमृतराय नामक सत्पुरुषाचा उपदेश त्यांनीं घेतला होता. १८६८सालीं पुणें येथें विधवाविवाहाच्या सशास्त्रतेविषयीं झालेल्या वादांत अण्णांनीं भाग घेतला होता. वैद्यकशास्त्रांतही त्यांची चांगली गति होती हे थोर पुरुष शके १७९५ चैत्र वैद्य एकादशीचे दिवशीं अर्धांगवायूच्या विकारानें स्वर्गस्थ झाले.

### स्वात्मनिवेदन ( पद )

उत्तम जन्मा येउनि रामा गेलों उगा वायां ।
दुष्ट पातकी शरण मी आलों सत्वर तव पायां ॥ ध्रु० ॥

आधीं चुकलों मुकलों मी निज वेदस्वाध्याया ।
कर्में श्रौत स्मार्त न घडलीं सद्गति साधाया ।
पुराण परिसुनि सादर झालों यशहि न तव गाया ।
स्वस्थपणें कधिं नाहिं फावलें तुजला भजाया ॥ १ ॥

आर्जविलें बहु लवणभंजनें न्याह्याजांवाया ।
क्षुधित अतिथि कधिं नाहिं घेतला प्रेमें जेवाया ।
उदार कर कधिं केला नाहीं पैसा एक द्याया ।
नाम फुकटचें तेंहि न आलें स्वामी वदना या ॥ २ ॥
कपट करुनियां निपट भोंदिल्या बहु आयाबाया ।
केली धनगृहक्षेत्रस्त्रीपशुशिशुवरि बहु माया ।
नित्य सजविली वसनभूषणें निंद्या ही काया ।
सिद्ध ठेविली सदाहि रसना सज्जन निंदाया ॥ ३ ॥
वटवट निशिदिनिं केलि चहुंकडे मन हें रमवाया ।
केलें स्नान न संध्या जपतप दुष्कृत शमवाया ।
क्षणहि न केला साधुसमागम भवदव निववाया ।
सद्यःकामुक झालों पाहुनि परधन परजाया ॥ ४ ॥
नाहीं विद्या कलाकुशलता तुजला रिझवाया ।
शुद्ध मधुर वाणीही नाहीं तुजला विनवाया ।
बुद्धिहि नाहीं नकळे कांहीं शरणागत व्हाया ।
थकलि मजल सर्वथा दयाळा स्वहित आचराया ॥ ५ ॥
हरि कनवाळू करि दीनावरि करुणेची छाया ।
निगम नगारा गर्जे ऐसा निखिलां कळवाया ।
यावरि विश्वासुनियां आलों जवळ तुझ्या पाया ।
शुद्ध दगड हा पंतविठ्ठल स्वामी रघुराया ॥ ६ ॥

## पद

रामकृष्ण नरहरे, स्वामिन्, कधिं करिशिल बा
दया, दयाळा । गर्भवास हा पुरे ॥ ध्रु० ॥
काय करूं मी बरें । सांगा । कळों येति मज
माझे दोष गुण । चित्त परी नावरे ॥ १ ॥

विषयीं मन वावरे । सदोदित । काम क्रोध हे
चोर लुटिति मज । प्राण होति घाबरे ।। २ ।।
धांव धांव धांव रे । सत्वर । बुडतो भवसागरीं
दीन हा । उद्धरिं आपुल्या करें ।। ३ ।।
विचार मज न स्फुरे । कांहीं । कैंवी गति होईल
म्हणुनियां । जिव हा अंतरिं झुरे ।। ४ ।।
प्रार्थितसें आदरें । अतां एक । असें करीं तव
नाम निरंतर । पंतविठ्ठल स्मरे ।। ५ ।।

## पद

राघवा तुझा, तुझा लागो छंद । न जडो दुर्मतिचा गंध ।। ध्रु० ।।
न रुचो विषय, विषय विषावाणी । आवडो संतांची वाणी ।। १ ।।
अंगिं रोमांच, रोमांच नयनिं पाणी । झिरपो तुझि गातां गाणी ।।२।।
विठ्ठलपंतासी, पंतासि हेंचि काम । आवडो सदा तुझें नाम ।। ३ ।।

## पद

राम राम बोला वाणी, मन लावा राघवचरणीं ।। ध्रु० ।।
कर्मतत्त्व गहन कळेना, कळलें तरि सांग घडेना ।
कर्तृताभिमान उडेना, कामाचा दोष झडेना ।
ब्रह्मार्पणबुद्धि जडेना, पुण्याशीं गांठि पडेना ।
अंधारि निशा उजडेना, हित कोठुनियां आडरानीं ।। १ ।।
साधूचा संग धरावा, नाहीं ज्या आपपरावा ।
स्वकरें तच्चरण चुरावा, हरिमहिमा श्रवण करावा ।
प्रेमभाव हृदयिं धरावा. कीर्तनीं करा सुगरावा ।
भवसिंधु सुखें उतरावा, जन्माची होय शिराणी ।। २ ।।
विषय हे विषापरी विटती, स्वयमेव क्लेशाही सुटती ।
वासना समूळही आटती, चित्ताच्या वृत्ती तुटती ।

ज्ञानांकुर हृदयीं फुटती, सहज सर्व संशय फिटती ।
कर्मबंध सहसा तुटती, स्वानंदसुखाची खाणी ॥ ३ ॥
शास्त्रदीप घेउनि निघतां, निगमागम शोधुनि पाहतां ।
संतासी हितगुज पुसतां, सुगम हाचि दावी पंथा ।
आहेत मतांतरकंथा, ज्या रुचल्या नाहिं अनंता ।
म्हणुनि हाचि विठ्ठलपंता, पथ गमला निर्मल वाणी ॥ ४ ॥

पद

करिं अतित्वरा । घडि घडि घडि पल पल जप ।
अमृतधाम रामनाम करुनि आदरा ॥ ध्रु० ॥
अतिदुर्धर अपरिहरा । येइल जंव तुजसि जरा ।
लट लट लट हल्लल मान, धनुसमान तनु पुमान होत बावरा ॥१॥
अंतसमय परम घोर । दोषत्रय करिति जोर ।
घुरु घुरु घुरु कंठ होय, भरिल भ्रम हरिल स्मृती करिल घाबरा ॥२॥
जो इंद्रियसंघ दक्ष । तो निज कल्याण दक्ष ।
त्यज वटवट खटपट उगि, झटपट करिं कपटरहित भज रमावरा ॥३॥
विनवि पंत मिठ्ठल शरम । किमपि धरीं विरम विरम ।
विषयिं न रम अमरमहित, चरम तनू परम लाभ न करिं मातिरा॥४॥

पद ( रामजन्म )

पुष्पसमय मधुमास पुण्यतम शुक्लपक्ष तिथि ते नवमी ।
रवि मंगल गुरु शुक्र शनैश्चर ग्रह होते हे उच्चतमीं ॥
कर्कलग्न नक्षत्र पुनर्वसु मेषराशिगत खररश्मी ।
उदगामिजीवेंदु मध्यदिन असतां संकुल सुकुमीं ॥
हृत्पद्मीं दृढयोग युङ्मुनी चिंतिताति ज्या यमनियमीं ।
चिन्मय निष्कल एक शुद्ध इति विविध गाइला जो निगमीं ॥ १ ॥
भक्तकामकल्पद्रुम तो प्रभु करुणरसें पूर्ण द्रवला ।
श्रीमदयोध्या नगरीं दशरथराजगृहीं हरि अवतरला ॥ ध्रु० ॥

सांद्र पयोधर श्याममनोहर रूप जया मन्मथ लाजे ।
हिरेजडित शिरपेंच तुरा वरि शिरिं किरीट बरवा साजे ॥
भाळिं तिलक कविजनां न वदवे कुटिलालककृत शोभा जे ।
मकराकृति कुंडलें श्रवणयुगिं सुप्रसन्न लोचनजलजें ॥
इंदुवदन नवकुंदरदन शुचि मंदहास अधरीं भ्राजे ।
ग्रामत्रय मधुरिमार्थ कंठीं जडला जणुं रेखाव्याजें ॥
मौक्तिकहार उदार सुशोभित मध्यें कौस्तुभमणि रुळला ।
श्रीमदयोध्या नगरीं० ॥ २ ॥

कटींतटीं उद्दाम पीतपट मंजु किंकिणी गजबजती ।
जानुजंघ सकुमार गुल्फयुग वलय नूपुरें रुणझुणती ॥
सहज मृदुंग आरक्त पदतल ध्वजादि चिन्हें विराजती ।
रम्य मनोहर सरळ अंगुली पूर्णचंद्रसी नखकांती ॥
त्रिभुवनकलुषक्षपणानिपुणतर मंदाकिनि झुळझुळ श्रवती ।
पादयुगुल यत्क्षणिक चिंतनें कर्मबंध सहसा तुटती ॥
दिव्यरूप पाहतां जननिच्या प्रेमपूर हृदयीं भरला ।
श्रीमदयोध्या नगरीं० ॥ ३ ॥

प्रसन्न दिक्चक्रवाक सुंदर मंद गंधवह संवहती ।
स्वयें हुताशन आयतनातः प्रदक्षिणार्चिः प्रज्वलती ॥
शृंगारुनि गृहरत्नतोरणें नागरिक ध्वज उभारिती ।
द्वारपरिसरीं कुंभदासिका शातकुंभजल निषिंचिती ॥
उजळुनि दीपज्योति कारुजन नीराजनविधि आचरती ।
वारवधू सालंकृति नाचती मंजुल हरिहर गुणगाती ॥
तननं तननं धिगिति धिगिति धिक् थय्य थय्य रव घुंबरला ।
श्रीमदयोध्या नगरीं० ॥ ४ ॥

पद ( रामशोक )

मंदभाग्य मी ऐसा । सुखि होय कसा ॥ ध्रु० ॥
राज्यश्रीच्युत झालों, विपिनासि आलों ।
माता तात सुहृत्प्रिय स्वजनां मुकलों ।
परि तें मी सीतायोगें नाहीं स्मरलों ।
त्याहि तशा देवीला कैसा मुकलों ॥ १ ॥
या विरहींच मरावें, परि कां चुकलों ।
होते हे डोळ्याचे सोहळे उरले ।
होता बंधु सुहृत् प्रिय मग या विरलों ।
रक्षुनि बहुधा मजला बहु धैर्य दिलें ॥ २ ॥
म्हणे मी होतों याच्या भुजशक्तिवरी ।
दुष्टशिरोमणि रावण मर्दिन समरीं ।
अंकीं घेइन पुनरपि क्षितिची कुमरी ।
अर्पिन राज्य बिभीषण निज भक्तकरीं ॥ ३ ॥
बा सखया सुग्रीवा ! तुज कष्टविलें ।
तूंही श्रम बहु केले परि नाहिं फळले ।
पाहुनि लक्ष्मणगतिला हृदय चुरलें ।
कैकयिनवस समस्तहि आजि बा पुरले ॥ ४ ॥
तूं तरि वृथा कां मरसी मम मित्रवरा ।
यश कोठुनियां ? हा मी दुर्दैवी पुरा ।
तूं तरि क्षेम असें बा जा निज नगरा ।
लक्ष्मणवद्गति माझी हा नेम खरा ॥ ५ ॥
सर्वहि पूर्वजकिर्ति म्यां मालविली ।
सून सुमित्रेची उगि आजि नागविली ।

जन्मुनि मी कौसल्या उगि भागविली ।
तत्पदिं विठ्ठलपंतें मति वागविली ॥ ६ ॥

पद (संन्यासी अर्जुन.)

अर्जुन होउनि संन्यासी । झाला द्वारावतिवासी ॥ ध्रु० ॥

बरवा परिकर लंगोटी । गुलाबी खडखडीत छाटी ।
प्रणवोच्चार स्थिति ओठीं । स्मरणीं चालतसे बोटीं ।
अंगीं विभूतिची ऊटी । कपटी वेष कांति मोठी ।
पाहुनि जन भुलले त्यासी । झाला द्वारावतिवासी ॥ १ ॥

लोटली द्वारावति सारी । झाली खेट मठद्वारीं ।
पुजाया नाना उपचारीं । वेळा साधिताति चारी ।
दुर्लभ यतिदर्शन भारी । ढोंग माजविता कंसारी ।
पडल्या भेटीच्या राशी । झाला द्वारावतिवासी ॥ २ ॥

यतिची सतत मौनवृत्ती । समाधिस्थिति बहु एकांतीं ।
वेदांतस्थ रहस्योक्ति । बोलतां फार सरस युक्ति ।
त्यांतुनि तीव्रतर विरक्ति । उपजली सर्व जनां भक्ती ।
येउनि बसति तयापाशीं । झाला द्वारावतिवासी ॥ ३ ॥

वर वर वर नियोगमुद्रा । गडबडतसे मनिं सुभद्रा ।
भरतें येत स्मरसमुद्रा । रात्रंदिवस नये निद्रा ।
हें एक ठावें यादवेंद्रा । उपजवी प्रीती बलभद्रा ।
कुतूहल पंत विठ्ठलासी । झाला द्वारावतिवासी ॥ ४ ॥

---

# कृष्णशास्त्री चिपळूणकर

हे लोकविख्यात पंडित, ग्रंथकार आणि कवि इ. स. १८२४ ह्या वर्षी ( पुणें येथें ? ) जन्मले. जातीचे आश्वलायन ब्राह्मण. ह्यांच्या वडिलांचें नांव हरिपंत असें होतें. लहानपणीं ह्यांच्या वडिलांनीं ह्यांजकडून वेदाभ्यास करविला. १४ वर्षांचे झाल्यावर ह्यांना विश्रामबागेंतील मराठी शाळेंत घातलें. तेथें एक पाठशाळाहि होती. नामांकित मोरशास्त्री साठे हे तिचे मुख्य अधिकारी होते; व तींत अनेक शास्त्रें पढवीत असत. ह्या पाठशाळेंत कृष्णशास्त्री यांचा प्रवेश झाल्यावर त्यांच्या हुशारीबद्दल त्यांस विद्यावेतन मिळूं लागलें. शास्त्रीबोवा उपजतच मोठे बुद्धिमान् होते. त्यांनीं अल्पकाळांत अलंकार, न्याय व धर्म ह्या तीन शास्त्रांचा अभ्यास इतका उत्तम केला कीं, केवळ विनोदार्थ एकावेळीं त्यांचा व मोरशास्त्री साठे ह्यांचा पूर्वपक्ष उत्तरपक्ष होऊन त्यांत कृष्णशास्त्री यशस्वी झाले. तेव्हां मोरशास्त्री फार संतुष्ट होऊन त्यांनीं आपल्या अंगावरची शालजोडी कृष्णशास्त्री ह्यांच्या अंगावर घातली; आणि ‘ इच्छेत्सर्वत्र विजयं शिष्यादिच्छेत्पराजयम् ’ ह्या वचनांतील समाधानाचा त्यांनीं पूर्ण उपभोग घेतला. तेव्हांपासून मोरशास्त्री त्यांना ‘ बृहस्पति ’ म्हणूं लागले. पुढें विश्रामबागेंतील वाड्यांत ते इंग्रजी शिकूं लागले. तेव्हां कृष्णशास्त्री यांनीं त्या भाषेचा सुमारें पांच वर्षें अभ्यास केला. नंतर त्यांनीं सरकारी नोकरी पतकरिली. ते अनुक्रमें भाषांतरकार, ‘ ट्रेनिंग कॉलेज ’ चे ‘ प्रिन्सिपॉल ’ व वर्तमानपत्रें आणि पुस्तकें यांचे ‘ रिपोर्टर ’ होते. विशेषतः शेवटची कामगिरी त्यांनीं इतक्या उत्तमरीतीनें बजाविली कीं, त्यांच्या इतकें काम साहेबलोकांसदेखील करितां आलें नाहीं, असें सरकारनें म्हटलें. वादविवादांत तर त्यांच्या पुढें कोणाची मात्रा चालत नसे. मराठी भाषा त्यांच्या पुढें केवळ हात जोडून उभी होती. अर्वाचीन कविमालिकेंत हें एक मोठें रसिक व मर्मज्ञ कविरत्न चमकून गेलें. ह्या कवींनीं ‘ पद्यरत्नावलि ’ म्हणून एक लहानसा काव्यसंग्रह केला असून तो सर्वत्र प्रसिद्ध आहे. त्यांतील रचना किती सरस व रमणीय आहे, तें येथें नव्यानें सांगण्याची जरूर नाहीं. हे कवि इ. स. १८७८ च्या मे महिन्याच्या २० व्या तारखेस पुणें मुक्कामीं काळजाच्या रोगानें निवर्तले.

## उज्जनीवर्णन

साक्या

पुढें अवंती देशीं जाउनि पाहें पुरी विशाला,
स्मरती जेथिल वृद्ध नागरिक उदयनभूपकथांला.
सुकृतिजनांनीं भूवरि येतां उरलेल्या सुकृतानें,
स्वर्गभाग जणुं आणिला खालीं त्या नगरीरूपानें.
सारसपक्ष्यांचे जो मंजुल मधुर स्वन विस्तारी,
नवीन फुलल्या कमलां लागुनि त्यांचा सुगंध हारी.
ऐसा क्षिप्रावात पहांटे श्रमल्या युवतिजनाला,
आलिंगुनियां, कांतापरि दे जेथें बहुत सुखाला.
धुऱ्या सुगंधी करिती जेथें सुकवाया केसांतें,
धूर तयांचा गवाक्षमार्गें येउनि पोशिल तूतें.
उभारुनीयां थोर पिसारे प्रासादांवरि मोर,
हर्षे नाचावया लागतिल देखुनि तुला समोर.
तरुण सुंदरी फिरतां त्यांच्या रंगित जीं चरणांहीं,
त्या सौधाग्रांवरी विसावा घ्यावा, जलदा, कांहीं.
महाकाल जो त्रिभुवनपति, त्या वंदाया मग जावें,
प्रभुकंठाची प्रभा मानुनी, गण तुज बघतिल भावें.
तया स्थलींचीं बालोद्यानें हलवी मारुत मंद,
विलसित पद्मां डोलवुनी जो हरी तयांचा गंध.
जेथें जवळचि गंधवतीचा प्रवाह सुंदर वाहे,
विलासिनींच्या स्नानें परिमल जयास बहु येताहे.
दुसऱ्या समयीं पोंचलास तरि, जों सूर्योदय होई,
तोंवरि थांबें, पुढें जावया न करी कांहीं घाई.
सायंतनपूजासमयीं प्रभुच्या दुंदभिकार्य करोनी,

मंद गर्जना सफल घडो तव, शिवसेवेलागोनी.
चरणीं वाजति मंजुळ पैंजण ज्याकरितां नृत्यातें,
करीं धरूनी चातुर्यें ज्या डोलविती चवऱ्यांतें.
नानापरिचीं रत्नभूषणें झळकति बहुत जयांचीं,
श्रमें होउनी लाल शोभती सुंदर वदनें साचीं.
त्या गणिकांवरि तेथें शीतल जलबिंदू तव कांहीं,
पडतां त्या तुजकडे पहातिल हर्षभरित नयनांहीं.
उमलुनि कमलें निघति तयांतुनि भृंगसंघ कीं जैसे,
घना, तयांचे काळे चंचळ कटाक्ष दिसतिल तैसे.
तांडव करितां शंभु तयाचें भुज निज पटलें व्यापीं,
संध्यातेजें रक्त होय जें मुळचें कृष्ण तथापी.
ऐशा सौम्योपायें येतां ओल्या गजचर्माची,
शोभा पाहुनि तुजवरि गिरिजा प्रसन्न होइल साची.
अंधार पडतां दाट त्यांमधीं चोरुनि दयितगृहांतें,
जाया निघती तरुण कामिनी रात्रीं, घना, तयांतें.
न भेडवीं, बा, करुनि गर्जना अबला त्या जाणोनी,
तरी, दाखवीं मार्ग तयांप्रति दिवटी वीज करोनी.
श्रमतां विद्युल्लता प्रिया तव, घेउनि तीस निवांत,
मंदरशिखरीं कोठें तरि मग व्हावें त्वां विश्रांत.
रवी उगवतां पुन्हां क्रमाया लागावें मार्गास,
कधीं न गणिती सज्जन करितां मित्रकार्य आयास.
मानखंडणा केली ज्यांची टाळुनि संकेतातें,
त्यायोगें ज्या रुसुनि बैसती गाळित अश्रुजलातें.
त्या दुःखित कामिनींस वल्लभ समजावया सकाळीं,
येती, यास्तव न लांबवावें काळोखा त्या काळीं.

नीहाराश्रू कमलमुखींचें नलिनीच्या स्वकरानें,
पुसावयास्तव रवि परदेशाहुनि येतां वेगानें.
मार्गीं येशिल अडवा तर तो तुजवर बहु कोपेल,
प्रियतमजनसंगमास ऐसें विघ्न कोण साहेल ?

---

## कैलास

साक्या

कस्तूरीमृग बैसुनि जेथें शिला सुगंधित होती,
कर्पूराच्या राशीपरि जीं हिम वर्षुनि दिसताती.
हिमगिरिच्या त्या शिखरांवरि तुज बघुनि घेत विश्रांती,
लोकां होइल सपंकशृंगत्र्यंबकवृषभभ्रांती.
सुटूनि वायू देवदारुतरु घांसुनि परस्परांतें,
पेटुनि वणवा चमरीपुच्छें जाळुनि गिरिराजांतें.
पीडा देतां सत्वर वर्षें जळ त्यांतें शमवाया,
सज्जन संचय करिती केवळ दुःखितदुःख हराया.
शिलातलावरि असतिल तेथें उठलीं पदें शिवाचीं,
भक्तिपुरःसर पूजा करिती मुनिजन नित्य जयांची.
ज्यांच्या दर्शनमात्रें भावुक जन जाळुनि पापांतें,
मरणानंतर सुखें पावती स्थिर सायुज्यपदातें.
वंदुनि त्यांतें प्रदक्षिणाहि करुनी अनन्यभावें,
सुकृत यापरी जोडुनि पुढती मार्गा त्वां लागावें.
मिळुनि गिरीवरि किन्नरनारी त्रिपुरविजय गातांना,
सुटूनि वायू वेळूंतुनिही मधुर स्वर निघतांना,
गुहांत तव गर्जना घुमोनी मृदंगकार्य करील,
गिरिशयशाचें गायन तरि मग यथासांग होईल.

## अलकावतींतील मौजा

साक्या

विलासिनींच्या हस्तीं येथें कमलें, कुंदकळ्याही,
शिरीं शोभती, मुखीं पांडुता येई लोध्ररजां ही.
कर्णीं विलसे शिरीष सुंदर, केशीं कुरबक साजे,
नीपपुष्पही दिसतें भांगीं, सुचवी घनागमा जें.
जेथें नित्य फुलूनि तरू त्यांवरी गुंगती भुंगे,
नित्य डोलती विकसुनि नलिनी कलहंसाच्या संगें.
नित्य नाचती मोर उभारुनि सुंदर थोर पिसारे,
प्रकाशुनीयां नित्य चंद्रही उजळी प्रदेश सारे.
अन्य हेतुंनीं न अश्रु जेथें, तें केवळ आनंदें,
दुजा न जेथें कामज्वरची निवार्य जो स्वच्छंदें.
प्रेमकलहची, दुजें न भांडण जेथें विदित जनांला,
तारुण्याविण अन्य वय नसे ठावें कधिंहि तयाला.
मधुर मृदंगादिक वाद्यांचे ध्वनी ज्यांत उठताती,
तळीं जयांच्या बिंबुनि तारा फुलांपरि दिसताती.
अशा मंदिरीं रत्ननिर्मितीं यक्ष बसुनि आनंदें,
सर्व प्राशिती विलासिनींच्या मधुर मधु स्वच्छंदें.
गंगातीरीं कल्पतरुतळीं सुटतां मंजुळ वारे,
क्रीडति धन्या किन्नरकन्या जेथें बहु प्रकारें.
कोणी कोणी कनकवाळुकेमाजीं लपविति रत्नें,
शोधुनि काढावया लागती कोणी तीं अति यत्नें.
कांतासह एकांतीं करितां विनोद सहज सुटोनी,
गांठ निरीची, सईल शालू होतांना देखोनी.
प्रियें ओढितां लाजुनि युवती रत्नदीप विझवाया,

मुठी भरूनी गुलाल टाकी, परि जाती त्या वायां.
क्रीडारंगीं दंग सुंदरी होता कांतासंगें,
दृढालिंगनादिकें करूनी उबलीं अपुलीं अंगें.
शीतळ व्हाया गळां घालिती चंद्रकांतमणिहार,
पडुनि चांदणें वरी जयांतें सुटती पाझर गार.
अखंड लक्ष्मी नित्य करितसे वास जया नगरींत,
किन्नर सुस्वर गाती जेथें धनदस्तुतिपर गीत.
जेथिल उद्यानीं कामीजन तरुण अप्सरांसंगें,
परोपरीचे विलास करिती होउनि दंग अनंगें.
ठायीं ठायीं फुलें सुटोनी वेण्यांतुनि पडलेलीं,
कोठें कोठें सुवर्णकमलें कर्णांचीं गळलेलीं.
तशीं विखरलेलीं मोतींही तुटुनि गळ्यांतिल हार,
दाविति जेथें रात्रीं झाला तरुणींचा संचार.
कुबेरमित्रत्वास्तव जेथें करितो शंकर वास,
भयें तयाच्या चाप धराया धैर्य नसे मदनास.
तथापि, करिती विलासिनींचे कटाक्ष काम तयाचें,
अचुक टाकिती हृदय वेधुनी जे कीं कामिजनांचें.
वस्त्रें उत्तम, सुगंध सुमनें, मदिरा मधुरहि फार,
परोपरीचीं रत्नकंकणें, तसेंच मौक्तिकहार.
लाल कराया पाय रंगही, उटी तशी अंगास,
सर्वहि देई कल्पवृक्षची एक जिथें वनितांस.

---

## यक्षमंदिर

साक्या

त्या नगरींत धनेशगृहाच्या उत्तरेस दिसतें जें,
दुरूनि सुंदर मंदिर मोठें, तेंच जाण घर माझें.

नानारत्नीं खचित जयाचें द्वार उंच बहु साजे,
अपूर्व शोभा पाहुनि ज्याची, इंद्रचापही लाजे.
असे जवळ त्या एक नवीनचि कल्पवृक्ष सुकुमार,
थोर फुलांचे गुच्छ येउनी जो लवलासे फार.
प्रिया करांनीं नित्य घालुनी पाणी सायंकाळीं,
अति कनवाळूपणें जयाला मुलासारिखा पाळी.
आहे सुंदर तळेंहि तेथें लहानसें, ज्यामाजीं,
नित्य शोभती बहुत फुलोनी सुवर्णकमळें ताजीं.
पाचेच्या पायऱ्या सभोंतीं असति ज्यांत उतराया,
जयांत नेमस्तचि जल असतें क्रीडा स्त्रीस कराया.
वर्षाकाळहि येतां तेथें हंस सुखें वसताती,
जवळहि असतां मानस तिकडे कधींहि ते न च जाती.
त्याच तळ्याच्या कांठीं आहे क्रीडापर्वत ज्याचें,
नीळमण्यांचें चमके सुंदर उंच शिखर तें साचें.
ज्याच्या भोंतीं सुवर्णकदली झळकति चित्रविचित्रा!
विजेसहित तुज देखुनि मजला आठवतो तो, मित्रा.
मध्यें मंडप मधुमालतिचा, गुलाब शोभति भोंतीं,
काय वर्णुं तीं सुखें, त्या स्थलीं जीं अनुभविलीं होतीं!
त्या कुंजाच्या जवळ बकुळिचा एक सुबक तरु आहे,
तसा तांबडा अशोक तेथें चंचलपल्लव पाहे.
पहिला मजपरि तुझ्या सखीच्या वदनांतिल मदिरेतें,
वांछी, दुसरा तिच्या इच्छितो वामचरणघातातें.
असे मांडला पाचमण्यांचा पिंजरा तेथें थोर,
बसे त्यामधें कनकयाष्टिवर रात्रीं अमुचा मोर.
प्राणांची मम धनीन शिकवी नाचायास जयातें,
रक्तकंकणीं युक्त करांनीं धरूनियां तालातें.

जेथें ऐशीं सकल लक्षणें मित्रा तुज दिसतील,
ज्याच्या द्वारीं शंख पद्महीं लिहिलेले असतील.
तेंच आमुचें गृह, नसल्यानें मी जें उदास भासे,
सहस्ररश्मी गगनीं वसतां कैसें कमल विकासे?

...... ..... ..

## यक्षपत्नी

साक्या

अंग जयेचें पातळ, रंगहि चंपकफुलासमान,
दंतपांक्ति कीं कुंदकळ्यांपरि दिसते विराजमान.
जेविं तोंडलें पिकलें तेवीं ओंठ खालचा लाल,
विरहें असती शुभ्र जाहले जीचे नाजुक गाल.
विशाळ, चंचल, काळे डोळे जे कां विलासखाणी,
मनांत झुरती हरिणबाळकें बघुनि जयांचें पाणी,
कंबर बारिक असे, उरावरि कुचही लकुचाकार,
जेविं शोभती कनकलतेला पुष्पगुच्छ सुकुमार.
मत्तगजापरि मंद चालणें, उणें न कोठें कांहीं,
विधिच्या हातुनि दुसरें ऐसें रूप उतरलें नाहीं.
भाषण जीचें परिमित, मंजुल, सरस आणि हितकारी,
मी नसल्यानें जवळ, एकटी पडुनि झुरे जी भारी,
वर्षाकाळीं मज आठवुनि क्षणोक्षणीं दुःखानें,
वाळुनि गेली असेल जी बहु, नलिनी जेविं हिमानें,
रडुनिरडुनियां सुजले डोळे असातिल खचित तियेचे!
उष्ण श्वासें कोमल ओंठहि सुकले असतिल साचे!
गाल टेंकुनी हस्ततलावरि जी चिंतातुर बैसे,
अलक लोंबती मुखावरी तैं, कमलीं मधुकर जैसे.
किंवा तूंची, घना झांकिशी जेवीं शशिबिंबाला,

तींच साजत बरवी उपमा, म्लान तिच्या वदनाला.
पहाशील तूं तिला कदाचित् देवातें पुजितांना,
किंवा घ्याउनि माझी मूर्ती चित्रपटीं लिहितांना.
असेल अथवा पिंजऱ्यापाशीं उभी पुसत मैनेला
" कां गे, आठवतो तुजला तो प्राणसखा रंगेला!"
घेउनि हातीं सारंगी वा काळक्रमण कराया,
स्वयें रचियलीं मजविषयींचीं लागे गीतें गाया,
तैं डोळ्यांतुनि गळुनि अश्रुजळ जाई भिजुनी तार,
स्वयें घेतला मधेंच विसरे अलाफ वारंवार,
किती लोटले विरहदिवस हें कळावयाकरितां जीं,
ठेवियेलेलीं फुलें प्रतिदिनीं पुनःपुन्हां ती मोजी,
किंवा ध्यानीं मजला आणुनि माझा मानससंग,
अनुभवुनी, त्या परमानंदीं झाली असेल दंग!

---

## यक्षसंदेश

साक्या

खिडकिंत पाहुनि तुला, चकित ती होतां विस्मयभावें,
यापरि मधुरस्वरें तिला तूं आश्वासुनि बोलावें:—
" पतिव्रते, मी तुझ्या पतीचा जिवलग मित्र असोनी,
आलों आहें येथें त्याचा निरोप तुज घेवोनी.
प्रवासिकांतें स्वगृहीं जाया त्वरा करुनियां नित्य,
तज्जायांतें सुखित करावें आहे हें मम कृत्य."
यापरि भाषण तुझें परिसुनी आनंदुनि ती फार,
सीता जवीं वायुसुताचा, करिल तुझा सत्कार.
आयकेल ही तुझ्या मुखांतुनि कुशलमयी मम वार्ता,
निरोप पतिचा आणि गांठ हीं सम गणिती विरहार्ता.

सांगावें मग तिला " तुझा पति रामगिरीवर राहे,
खुशाल असती कीं ! ऐसें तुज त्यानें पुशिलें आहे."
तुह्मांसारखे बहुत गांजले जन जे दुर्दैवानें,
त्यांनीं कुशल प्रश्नचि करिजे परस्परां पहिल्यानें.
वाळुन गेला असे फार तो, तूंही कृश झालीस,
विरहज्वर भाजितो तयातें, तूंहि तशी जळतीस.
जसें तयाच्या तसें तुझ्याही न खळे जळ डोळ्यांचें,
तुह्मां उभयतां उत्कंठेचें दु:खहि समान साचें.
अशी सर्वथा समदु:खा तूं प्राणसखी, तुज, गे तो,
दूरस्थहि मम सखा, मनेंची दृढालिंगना देतो.
सख्यांसमक्षहि उघडपणें जें वचन कथायाजोगें,
तें सांगाया चुंबनलोभें जो तव कानीं लागे.
दुर्दैवें तो प्रियकर आजी फार दूर पडल्यानें,
प्रेमभरित हें भाषण तुजला बोलत मद्वदनानें:—
" कोमल वेलींमधें भासतें अंग तुझें सुकुमार,
तसा पिसाऱ्यामधें शिखींच्या दिसे तुझा कचभार.
हरिणबालकांजवळ उमगती चंचळ डोळे काळे,
मंद नदीच्या लहरींमाजी तव भृकुटींचे चाळे.
लावण्य तसें तुझ्या मुखाचें अढळे पूर्ण शशांकीं,
मत्त मतंगीं मंदगती ही तुझी दिसते लोकीं.
यापरि, सखये, दृष्टीं पडतें कोठें कोठें कांहीं,
परंतु तुलना पूर्ण तुझी ज्या, ऐसें एकहि नाहीं !
सखे, प्रीतिच्या कलहें जणुं तूं मजवरि फार रुसोनी,
बसलिस ऐसें चित्र शिळेवर रंगांनीं काढोनी.
समजावाया ठेवुं लागतों जों पायांवर डोई,

अश्रुजळें तों नयन भरूनी दिसेचनासें होई !
किती दुष्ट तरि दैव असावें न शकें वदावया हें,
याहि परीची, सखे, आपुली भेट जयास न साहे !
स्वप्नीं पाहुनि तुजला, सखये, प्रेमें कवळायास,
घट्ट उरीं, मी लांबवितांना आकाशांत करांस.
देखुनि वनदेवता दयेनें द्रवती चित्तीं फार,
लतापल्लवीं अश्रु तयांचे गळती वारंवार !
हिमाचलींच्या वनस्पतींचा घेउनि मधुर सुगंध,
तेथुनि वायू दक्षिणेस जो वाहे निष्प्रतिबंध,
तयास आलिंगितों, प्रिये, मी नित्य बहु प्रीतीनें,
कीं तो तुजला स्पर्शुनि आला असेल या बुद्धीनें.
लांब रात्र ही क्षणासारखी लहान होईल केवीं ?
तीव्र उष्णता दिवसाची ही लयास जाइल तेवीं.
ऐशी चिंता उगिच करूनी त्यांत नसे फळ कांहीं,
जरी जाणतों असें, तथापी ती मज सोडित नाहीं.
जरी होतसे तुझ्या वियोगें मजला दुःख अपार,
धीर धरितसें, पुढिल सुखाचा चित्तीं करुनि विचार.
सखे शाहणी असती, यास्तव विवेक करुनी तूंही,
अपुल्या आश्वासशील हृदया नानाविध हेतूंहीं.
सदा कोण गे दुःखी ? अथवा कोण सुखी या लोकीं ?
सुखदुःखें ही चक्रन्यायें येती हें अवलोकीं.
कार्तिकमासीं शाप संपतो माझा, तुज हें ठावें,
चार मास हे मिटूनि डोळे कैसे तरि कंठावे.
नंतर, सखये, यथेच्छ पुरवूं मनिचें सर्वहि कोड,
करुनि विलासां, पूर्व वियोगें होतिल जे अति गोड.

मिठी एकदा गळां माझिया मारुनि तूं निजलीस,
मधेंच अवचित मोठ्यानें तूं रडत, सखे, उठलीस.
पुनःपुन्हां मी कारण पुसतां हंसुनि बोललिस गालीं,
ठका, पाहिलें स्वप्नीं मजला गुप्त सवत त्वां केली !
खुणेवरुनि या एकांतांतिल निश्चय तुज होईल,
खरा दूत हा माझ्या पतिचा, आहे तोहि खुशाल.
विपरीत जनीं वार्ता परिसुनि संशयांत न पडावें,
विश्वासातें मजवरिच्याही किमपिहि न ढळूं द्यावें.
कोणी कोणी ह्मणती, विरहें जातो स्नेह लयातें,
हरिणलोचने, परंतु न खरें वाटे मत मजला तें.
प्रियवस्तूचा वियोग होतां न ढळे सत्य प्रीती,
उलटी वाढे अधिकाधिकची ! ऐशी मम प्रचीती."
प्रथम वियोगें पीडित सखिला यापरि आश्वासोनी,
तिच्यापासुनी निरोप आणी खूणहि बा घेवोनी.
परत झडकरी यावें तिकडुनि मजला सुखित कराया,
वाट तुझी मी पहात बसतों येथेंची घनराया.

---

## विरहिविलाप

शिखरिणी

अहा कैसा झाला अवचित विधी निष्ठुर असा !
प्रिया एकाएकीं अमरसदना गेलि सरसा !
मना आतां कोणा कथिशिल जिवींच्या हितगुजा !
सुखाच्या शब्दांनीं कवण निववू तापहि तुझा ?
घरातें मी येतां, दचकुनि उठोनी हंसुनियां,
विशाला नेत्रांहीं अमृतरसवृष्टी करुनियां,
न कां चित्ता आजी मधुरवचनीं हर्ष करिशी ?

असे झाली माझ्या अगळिक करें कोगति अशी ?
बुजालें दुःखानें स्मरण विषयांचें अवधिया,
अनभ्यासें गेली मज सकळ विद्या त्यजुनियां;
जिचे डोळे काळे बघुनि मृगबाळेंहि झुरती,
वसे चित्तीं देवी-परि सतत ती मात्र सुदती.
निघोनीयां जातां अवचित सखी मुक्तिसदना,
दयाशीला, वाटे, विसरलि दयाही सुवदना !
कटाक्षांही नीलांबुजमदहरांहीं मजवरी,
कृपालेशातेंही प्रकट ह्मणुनी आज न करी.
पडायाच्या भीतीस्तव मम करातें धरुनियां,
विवाहीं पाषाणीं चढलिस, सखे, तूं जपुनियां;
कशी ती तूं, आजी चढशि मज सोडोनि, गगनीं,
करी ऐशी शंका हृदय शतधा, येउनि मना !
तुझें जाणें, प्राणेश्वरि, परिसुनी स्वर्गभुवनीं,
अलापातें शंका त्यजुनि करिती कोकिल वनीं.
निमाली चिंताही सकल कमलांची अजि अहा !
कशी आतां चंद्रा अतुल सुषमा लाधलि, पहा !
सखे, विद्युल्लेखास्फुरणचपला देउनि मला,
सुरेंद्राच्या कांहीं दिवस उपभोगांस अतुला,
अहा मंत्रभ्रष्ट क्षितिपतिस लक्ष्मी त्यजि जशी,
लया पुण्यें जातां, त्यजुनि तशि गेलीस मजशी.
असोनि त्वां भूमी-वर चढविलें ज्या सुरपदीं,
प्रिया, नाथा, ऐशा अतिमधुर संबोधनपदीं;
तया मातें, कैशी धरणितलधूलींत सखये,
दिवस्था होऊनी ढकलिशि; दया कां तुज न ये ?

अपूर्वा लावण्या, अनुपम सुशीला, सुविनया,
अपारा चातुर्या, अगणित कलांतेंहि, सुनया;
गुणां ऐशा कोणा निरविशि, सखे, आणि मजला ?
नसे थारा त्यांतें, मजहि दुसरा ज्ञात तुजला.
प्रभापावित्र्यांहीं स्वसम तुज पाहून, दहना,
अला वाटे हेवा मनिं बहुत त्या कृष्णवदना;
तयानें त्या रोषें, मज गमतसे जाळिलि तुला,
दया त्या कैंची ! जो स्वजननिहि खाऊं न चुकला !
सुधास्पर्शें जेवीं निवति नयनें जीस बघुनी,
जिचा कंठी वाटे कर कमलहारापरि मनीं;
करी जी उल्हासा अतुल, कविता सुंदर जशी,
तुला नाहीं कोठें मनुजभुवनीं योग्य तिजशी;
न पाही स्वप्नींही पतिविण कधीं जी नर दुजा,
स्पृहायुक्तें चित्तें, जितकमलनालोत्तमभुजा.
सुशीला तूं ऐशी, परपुरुष जो निर्गुण, तया,
कशी पाहूं जाशी, हरिणनयने, सत्वरतया ?
गुणांनीं जी पूर्णा, अणुसम नसे दोषहि जिला,
अलंकारीं साजे, रस वसतसे जींत पहिला;
मृदू जीचे वर्ण श्रवणसुख देती परिसतां,
वसे ती पद्माक्षी जशि हृदयिं माझी सु-कविता.
न जाणों दुर्दैवें अगळिक असे काय घडली,
जिच्या योगें ऐशी तवमनिं अढी थोर पडली;
ह्मणोनी सोडोनी मज, रुसुन गेलीस सदनीं,
सखी मुक्तींच्या तूं, असुनि विमला कीर्तिहि जनीं.
सुधातुल्यें हास्यें करुनि अभिषेकास मजला,
कटाक्षांनीं वर्षे जणुं मजवरी नीलकमलां;

मृगाक्षी, मांगल्यप्रद, विधिविधात्री, सुवदना,
न सोडी चित्तातें क्षणभरिहि ती कुंदरदना.
बसोनी पर्यंकीं दयितगुण गातां निजमुखें
दिनें नाहीं झालीं बहु निरखुनीयां तुज सखे!
न कां आजी देशी प्रतिवचनही एक मजला?
असा कां माझ्याशीं अवचित अबोला धरियला?
स्वरूपें काव्याच्या अजवरि सखे, जे प्रकटले,
विलास प्रीतीचे सरस अमृतातुल्य घडले,
तयांचा दुर्दैवें अवचित असा नाश घडतां,
पुढें आतां कैशी मधुर मम होईल कविता!

वसंततिलका

तीं भाषणें मधुर जीं अमृतासमान,
लावण्य तें रतिहि देत जयास मान,
तें शील ज्यास तुलना न मिळेचि कोठें,
कोणास हृष गुण हे स्तवितां न वाटे!

## अन्योक्तिसंग्रह

### श्लोक

कोकिलान्योक्ति

येथें समस्त बहिरे वसतात लोक,
कां भाषणें मधुर तूं करिसी अनेक,
हे मूर्ख यांस किमपीहि नसे विवेक,
वर्णावरून तुजला गणतील काक.

ज्याचे शब्द सुधेसमान पडतां कानीं मुनीही मनीं,
ध्याऊं लागति योषिदास्यकमलें बैसोनि योगासनीं,
स्पर्धेतें करितां न लाजसि कसा काका तया कोकिला,
सांग रे अथवा स्वभाव अपुला नीचें कधीं टाकिला.

ज्याचे पूर्वीं वसंतीं परिमलबहलीं आम्रवृक्षीं सुखाचे,
गेले गुंजारवातें दिवस परिसतां मत्त भृंगांगनाचे,
कैसे त्या कोकिलातें अधम करिति हे कावळे चंचुघाता,
कोठें थारा मिळेना गरिब पळतसे वांकडा काळ येतां.
कां बा सुस्वर शब्द काढिसि पिका, राहें उगा काळ हा,
लोटे तों तरुकोटरीं लपुनियां कोठें तरी तूं रहा,
पानें तीव्र हिमें गळोनि दिसती झाडें जळाल्यापरी,
गर्जे कर्कश शब्द थोर करुनी काकावली त्यांवरी.

मेघान्योक्ति

ते अन्य मेघ तव जे हरिती तृषेतें,
का व्यर्थ आरडुनि शोषविसी जिभेतें,
हे चातका घन रिते शिशिरांत येती,
जे गर्जती परि न वारिकणाहि देती.

नवीं पद्में जेथें विकसुनि सुगंधा विखरती,
तळीं ऐशीं तोयें सतत भरलीं फार असतो,
तरी पर्जन्याचे जलकणचि कां चातक पितो ?
गमे मातें मानी शिर नमविण्या लाज धरितो.

मयूरान्योक्ति

झाडें पेटुनि वाजती कडकडां त्यांचा ध्वनी होतसे,
ज्वाला राहुनि राहुनी उठति या, विद्युल्लताही नसे,
काळा धूर नभीं बहू पसरला, हा मेघ नोहे खरा,
वर्षाकाळ न हा दवानल असे, मोरा पळें रे घरा,
रत्नाचा जणुं ताटवा झळकतो मोरा पिसारा तुझा,
हर्षें नाचशि तैं गमे त्रिभुवनीं पक्षी न ऐसा दुजा,
मोठा सुंदर तूं खरा परि दया नाहींच भिल्लांस या,
हे घेतील तुझ्या जिवा झडकरीं सोडीं अरण्यास या.

शुकान्योक्ति

तुझी वाणी कोणी म्हणति गुण हा अद्भुत असे,
मला वाटे मोठा तुजजवळ हा दोषच वसे,
शुका, तीच्या योगें सतत पिंजऱ्यामाजि पडशी,
गड्या, स्वातंत्र्याच्या अनुपम सुखां सर्व मुकशी,
बसुनि उपवनीं या जोंवरी कावळा हा,
करित कटकटीनें लोककर्णांस दाहा,
बस निमुट शुका तूं तोंवरी स्वस्थ कोठें,
कमिपण गुणवंता काय मौनात मोठें ?

3074

खद्योतान्योक्ति

गेला लोकांतरातें दिनकर सकला द्योतवी जो जगातें,
अस्तातें जाय तोही हिमकिरण जया सौख्यदा विश्व गातें,
मेघांनीं व्याप्त ऐशा गगनिं नच दिसे एक ताराहि कोठें,
रे खद्योता, अतां तूं चमक बहु; तुझें दैव, बा, फार मोठें,

सिंहान्योक्ति

मेघांच्या गर्जनेनें खवळुनि वरतीं सिंह पाहे स्वभावें,
काका, त्वां भीति सारी त्यजुनि तरुवरी मांसखंडास खावें
जो उन्मत्तां गजांच्या खरतरनखरीं फोडुनी मस्तकांतें,
धाला रक्ता पिऊनी, नच मृत पशुंच्या इच्छितो तो कणातें.
भृंगे गुंजारवातें करिति शिरिं असे मत्त हत्तीहि जीतें,
डोळां देखोनि होते पळत भयभरें सोडुनीयां धृतीतें,
जेथें मुक्ताफळांचा खच बहु पडला, त्या गुहेमाजि आतां
सिंहाच्या क्षुद्र कोल्हे कलकल करिती मृत्युनें त्यास नेतां,
कृतीचीं आयाळें जडवुनि गळा पुष्ट करुनी,
बसे श्वा सिंहाच्या पदिं बहुत आवेश धरुनी,
तरी जो ऐकोनी भिउनि पळती मत्तहि करी,
कसा त्या नादातें क्षणभरहि तो पामर करी ?

गजान्योक्ति

माझी शक्ति अपूर्व बाग अवघा म्यां मोडुनी टाकिला,
ऐसें मानुनि हर्ष फार तुजला चित्तीं खरा वाटला;
ग्रीष्मीं तीव्र रवी तपोनि करितां आंगीं तुझ्या काहली,
ती पीडा टळण्यास कोणति गजा, युक्ती तुवां योजिली ?
कंठीं मोठा बळकट असे पाश पायांत बेडी,
बैसोनीयां शिरीं नर तुझ्या अंकुशें गंड फोडी;
जीपेक्षां कीं मरण बरवें भासतें, त्या दशेतें,
पावोनीयां अजुनिहि गजा, दाविशी कां मदातें ?

हरिणान्योक्ति

जाळें तोडुनियां बळें हरिण तो टाळोनि दावाग्निला,
व्याधाचे चुकवूनि बाणहि महावेगें पुढें चालिला;
तों घाईंत उडी चुकूनि पडला आडामधें बापडा,
होती सर्वहि यत्न निष्फळ जरी होई विधी वांकडा.

वृक्षान्योक्ति

दावाग्नी खवळोनियां तरुवरा जाळावया जैं बळे,
जाती सर्व पळोनि कोकिल शिखी रांवे तसे कावळे;
भक्षायास फळें चहोंकडुनियां एकत्र जे जाहले,
येतां संकटकाळ होय जवळीं ऐसा न कोणी मिळे.

चंदनान्योक्ति

आहे एक सुगंध मात्र जवळी तों त्यास राखावया,
ऐसे घोर भुजंग पाळिसि जनां जे धांवती खावया,
येतीं गोड फळें फुलेंहि बरवीं दैवें तुला चंदना,
त्यांच्या बा करितास काय न कळे संरक्षणा योजना !

आम्रान्योक्ति

पावोनी तव आश्रया द्विजकुळें लक्षावधी पोसती,
सारेही वनिंचे तरू तुजपुढें क्षुद्रापरी भासती,
ऐसा तूं गुणवंत बा असुनियां, आम्रा, पिका वायसा-
मध्यें जाणसि तारतम्य न मनीं हा मोह बा कायसा ?

छाया शीतल गोड पुष्कळ फळें देऊनि संतोषवी,
जो पांथा, म्हणुनी मिळे जवळि ज्या दाटी जनांची नवी;
आम्रा काढुनि त्या कसा बसविला त्याचे ठिकाणीं अहा !
दैवें सोडुनियां दया अवडता काका कडूनिंब हा !

सूर्यान्योक्ति

देखूनी उदया तुझ्या द्विजकुळें गाती अती हर्षुनी,
शार्दूलादिक सर्व दुष्ट दडती गिर्यंतरीं जाउनी;
देशी ताप परी जसा वरिवरि येशी नभीं भास्करा,
अत्युच्चीं पदिं थोरही बिघडतो हा बोल आहे खरा.

चंद्रान्योक्ति

आकाशांत शशांक पूर्ण उदया आला, तया पाहुनी,
आले तुरु त्वकोरमंडल सुधापाना करायास मनीं;
तापक्लेश उणा जनास तुकता होऊं असे लागला,
तों दैवें इतक्यांत मेघ अणुनी कैसा मर्वे घातला !

मेघान्योक्ति

गर्वे पर्वतमस्तकीं जलधरा धारा वृथा वर्षसी,
पीडा कष्ट करूनि नाविकजनां दुष्टापरी हर्षसी;
पाण्यावीण लता तरू सुकति हे वृष्टी जरी यांवरी,
रे मेघा, करितास कीर्ति भुवनीं होती तुझी, बा, खरी.

हंसान्योक्ति

पानांमाजीं तरूच्या लपुनि बस कुठें, राजहंसा, कसाही,
जाती वर्षर्तुचे हे दिवस तंववरी सर्व कष्टांस साहीं;
येऊनी शारदश्री पुनरपि फुलतां पद्मवृंदें तयांचा,
भोक्ता नाहीं कुणीही तुजविण दुसरा जाण हा नेम साचा.

भ्रमरान्योक्ति

आंबे चंदन चंपकादिक तरू सारेच का वाळले ?
पद्मांनीं भरले जलाशय लया कीं सर्वही पावले ?
झालीं निर्मद आणि शुष्क करिंचीं कां सांग गंडस्थलें ?
रे मूढा भ्रमरा करीरकुसुम त्वां आज जें चाखिलें.

# गणेश सदाशिव शास्त्री लेले

## जन्म इ. स. १८२५ मृत्यु इ. स. १८९८

हे प्रसिद्ध कवि आणि ग्रंथकार गोदावरीच्या उगमावरील श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथें इ. स. १८२५ ( भाद्रपद शुद्ध ४ शके १७४७ ) ह्या वर्षी जन्मले. हे जातीचे कोंकणस्थ हिरण्यकेशी ब्राह्मण. ह्यांचें मराठी शिक्षण त्र्यंबक येथें झालें. नंतर मुंबई येथें 'एलफिन्स्टन' विद्यालयांत इंग्रजी अभ्यास करून हे प्रवेश-परीक्षेंत उत्तीर्ण झाले. ह्याच विद्यालयांत स्तोत्रकार कवि भास्कर दामोदर पाळंदे आणि प्रस्तुत कवि हे उभयतां सहाध्यायी असत. पुढें 'एलफिन्स्टन' कॉलेजांत ह्यांस पगारी विद्यार्थ्यांची जागा मिळाली होती. परंतु मुंबईची हवा मानवत नसल्यानें हे कवि तेथून पुणें येथें गेले; आणि तेथील पाठशाळेंत त्या वेळच्या नामांकित गुरूंजवळ ह्यांनीं अलंकारशास्त्राचें अध्ययन केलें. हे मोठे व्युत्पन्न, रसिक, समयोचित वक्ते, आणि सरस्वतीचे निःसीम भक्त असत. ह्यांनीं आपलें बहुतेक आयुष्य ग्रंथरचना करण्यांकडे लाविलें, असें म्हटलें असतां चालेल. ह्यांचा गद्यापेक्षां पद्यरचनेवरच विशेष कटाक्ष दिसून येतो. ह्यांनीं केलेलें 'रघुवंशाचें पद्यात्मक भाषांतर' हें लोकप्रिय व प्रसिद्ध आहे. सबब, ह्या ग्रंथांत प्रस्तुत कवींच्या नांवाखालीं असलेले बहुतेक वेंचे ह्यांच्या रघुवंशांतूनच घेतले आहेत. ह्यांची कविता प्रौढ, जागोजागीं अलंकृत आणि रमणीय आहे. हे कवि गोदातीरीं लासलगांव येथें इ. स. १८९८ ( वैशाख शुद्ध ७ शके १८२० ) ह्या वर्षी निवर्तले. ह्यांनीं केलेले पद्यग्रंथ येणेंप्रमाणेः—

१ रघुवंशाचें पद्यात्मक भाषांतर. २ शिवाजीचरित्र. ३ हिंदुलोकांचे सण. ४ गंगाचरित्र. ५ सीमंतिनीचें आख्यान. ६ शिवस्तुति. ७ कृष्णाकुमारी. ८ अमरुशतक. ९ महिम्नस्तोत्र. १० श्री. तुकोजीराव महाराज होळकर यांजवरचा कटाव. वगैरे वगैरे.

## रामदासकृत शिवबोध

आर्या

कोणे एके काळीं येई श्रीरामदास नृपसदनीं,
चाले संतत ज्याचा पूत श्रीरामनामजप वदनीं.
तो नर नव्हेचि, परि हो धर्म स्वयमेव मूर्त कीं आला–
साधूपदेशयोगें निजमार्गा दाविण्यास नरपाला.
त्या पाहतांचि सत्वर ये भूपा कळविण्या प्रतीहारी;
कर जोडूनि म्हणे–' जी कोणि महासाधु पातले दारीं.'
' हां हां कोठें दावीं ' ऐसें तो संभ्रमें पुसे नृपती;
साधूंच्या आगमनीं सुविनयसंपन्न ते असे जपती.
अत्यादरपूर्वक नृप जाउनि त्याच्या पदीं करी नमन;
सत्कुलभवा नराचें विमुख कधीं साधुवंदनीं न मन.
स्वीय शिरीं मुकुटमणिश्रेणी तेचि प्रदीपशुभराजी;
तद्योगें नमनमिषें नृप गुरुचें पादपद्म नीराजी.
' विजयी भव वत्स !'–अशा आशीर्वादास देतसे दास;
सदनुग्रहें कदापी मानव होतो न पात्र खेदास.
' स्वामी ! इकडुनि ' ऐसें बोलोनी नृप तयास सदनांत
नेवोनि, आसनावरि बैसावि तो हृष्ट जो निजमनांत.
पाद्यार्घ्यादिक पूजा करित असे भक्तिनें नृपति त्याची;
ऐसी दृढभक्ति जनीं पुत्रालाही नसे निज पित्याची.
कर जोडोनि म्हणे नृप ' केलें जैसें पवित्र गेहातें,
पादरजें, तेविं करा उपदेशें करुनि याहि देहातें.
संसारसागरीं मी स्वामी ! बुडतों, ययाचिया तरणीं;
भवदुपदेशावांचुन नचि दुसरी हो मला दिसे तरणी. '
दास म्हणे ' वत्सा ! तुज झाली मति हे सुपुण्यराशीनें,
सकलां अशुभां निरसुनि जी अंतीं सत्पदा नराशी ने.

स्रक्‌चंदनवनितादिक विषयां वांताशनापरि त्यागीं–
वैराग्यबोध करिते वेदांताची अशाच रीत्या गीं.
यास्तव गृहदारादिक विषय त्यागुनि समस्त आसक्तीः
श्रीमद्भगवत्पदयुगकमलाची सर्वदा करीं भक्ती.
कामक्रोधादिक षड्–वैरी हे त्रास देति जीवास;
त्यांतहि मानवदेहीं करिते हृदयांत काळजी वास.
तुझें धरूं नये बा दुष्ट जनांच्या कदापि संगतिला;
तत्सम दुसरा न दिसे प्रतिबंधनहेतु वत्स सद्गतिला.
उपडुनियां टाकावें प्रथमचि रे या मनांतुनी कामा;
सर्वानर्थकराचि तो, म्हणुनि तयाची स्थिती न ये कामा.
कामावाप्ति न होतां क्रोधाची येतसे मनीं उकळी;
जेथें क्रोधोत्पत्ती, तेथें आहेचि बा अगाउ कळी.
कामानें सर्वांचें बाटविलेंसे नरोत्तमा ! चित्त;
तेणें पूत विरक्ती न रुचे, रुचतें सदारसुतवित्त.
असती युवती करिती परोपरी नरवरा सदा नखरे;
न खरे मानावे ते, देती जे सुमतिच्या गळीं नख रे !
कांता धनकनकादिक जैसां देतें मनास अति माज;
तैसा भांग अफू मधु यांचाही देत नाहिंच समाज.
षड्रिपुंमाजी भूपा ! जाणें बा अग्रगण्य काम खरा;
तत्पर होतो नर जो, अणुमात्रहि तो उणा असे न खरा.
भग्न मनोरथ होतां क्रोधानें व्याप्त होतसे नर तो;
यास्तव मुळींच कामीं चित्त तुझें नरपते ! कधीं न रतो.
तो नर नव्हेचि अंध क्षितीश्वरा ! जो विहीन नयनांहीं;
क्रोधाधीनचि अंध श्रेष्ठ वदति, त्यांत अन्यथा नाहीं.
पापाला मूळ असे लोभ, असें सर्व बोलती संत;
जो त्यागी लोभातें त्याच्या सौख्या नसेचि बा अंत.

अज्ञानें मोह पडे, यास्तव तूं ज्ञान आधिं संपादीं;
नसतांही सर्प दिसे अज्ञानाच्या वशेंचि जी वादी.
मोहाच्या योगानें ज्ञान्याही भ्रांति पडतसे मोठी;
त्यावरि ईशदया बहु, तोचि दूर ह्या मनांतुनी लोटी.
धनयौवनादियोगें येतो जो माज तोचि मद जाणें;
रावणबाणार्जुनमुख नाशियले वश करोनियां ज्यानें.
परदुःखसुखांनीं जो क्रमें करित सौख्य, दुःख मत्सर तो;
त्यातें सोडुनि संगीं चित्त तुझें साधुच्याचि वत्स ! रतो.
त्रैलोक्याही जिंकी, त्याला विजयी अम्ही कधीं न म्हणूं;
परि ह्या षड्रिपुवर्गा जिंकी त्यालाच मात्र विजयि गणूं.
आहे एक जगाच्या सृष्टिस्थितिनाशनास कर्ता रे !
जेणें इच्छामात्रें निर्मियले भूखगोल खग तारे.
श्रीरामादिक रूपां घेउनियां जो जगांत अवतरतो,
त्यातें प्रेमपुरःसर भजतां निश्चय मनुष्य भव तरतो.

## वेंचे-रघुवंशांतील

### नंदिनी आणि दिलीप.

स्रग्धरा

प्रातःकाळीं सुगंधाक्षत विमल फुलें वाहिलीं धेनुकेला,
भार्येनें भूपतीच्या मुनिवरहवनासाठिं तद्दोह केला;
वत्सातें आंखडोनी नरपति तिजला सोडि रानांत जाया,
सत्कीर्ती हेंचि ज्याचें धन नृपति असा तीस लागे भजाया.

उपजाति

समुद्र चार स्तन तेचि होती, गोरूपिणी हे धरणीच हो ती;
कल्पोनि ऐसें जणुं भूमिपाळ, करी तिचें रक्षण तो कृपाळ.
व्रतार्थ गोसेवक जाहला स्वतां, तो सेवकां देखिल धाडि मागुता,
रक्षा परापेक्ष तया कधीं नसे, अशी प्रतापी मनुसंतती असे.

आस्वाद ज्यांना बहुसाळ येई, असे तृणग्रास मुखांत देई;
अंगें तिचीं खाजवि तो नरेश, करीं निवारी अपकारि दंश.
वाटे मनाला तिकडेच जाय, परी करीना तिस अंतराय;
तीच्या धराधश्विर तैं स्वभावें, सेवेंत तो तत्पर होय भावें.
राहे उभी ती मुनिधेनु जोंवरी, ठाके उभा सादर भूप तोंवरी;
स्वेच्छावशें ती जंव होय चालती, तो चालता होय तईं धरापती
बसे तईं तोहि बसे महीप, ती पी जला तैं जल पी दिलीप;
छायेपरी धेनुस तो नृपाळ, लक्षूनि वर्ते वनिं सर्वकाळ.

शार्दूलविक्रीडित

होम श्राद्ध तसोंचि दान असल्या कार्यार्थ जीची स्थिति,
ती धेनू परते वनांतुनि, तिच्या मागें फिरे भूपती;
सन्मान्यें विधिनेंचि युक्त विलसे श्रद्धा जशी का जनीं,
तैशी भूपतिनें युता विलसती झाली तईं नंदिनी.
धेनूमागुनि ये वनांतुनि पती, तेव्हां तयाची प्रिया,
पाहे त्यासाचि टक्क लावुनि सती युग्में स्वनेत्रांचिया;
तैं डोळ्यांस उपास फार घडले होते अशा हेतुनें,
प्राशोनी नृपतीस त्यांनिंच गमे केलें जणूं पारणें.

इंद्रवज्रा

मागें तिच्या भूपति येत होता, आली पुढें जैं नरनाथकांता;
दोघांमध्यें ती विलसे तईं जी, संध्या जशी कां दिनरात्रिमाजीं

वंशस्थ

नमूनियां घालि तिला प्रदक्षिणा, गंधाक्षतांनीं मग ती सुदक्षिणा;
विशाल भालस्थल पूजि धेनुचें, प्रत्यक्ष जें द्वारचि अर्थसिद्धिचें.

शार्दूलविक्रीडित

वत्साच्या विषयीं समुत्सुक जरी ती होउनी सुस्थिरा,
घे पूजा, अतएव हर्ष उभयां अत्यंत झाला खरा;

भक्तांचे हितकारि धेनुपरि जे त्यांचा प्रसाद स्वयें,
होतां सत्वर अर्थसिद्धि घडते, हें जाणिजे निश्चयें.

पृथ्वी

सदार नृपती तिच्या जवळि दिव्य ठेवी बली,
तसीच उजळोनियां रुचिर मांडि दीपावली;
बसे बसालियावरी, निजलिया वरी तो निजे,
सकाळिं उठतां उठे, तिस नरेश ऐसें भजे.

## सिंह आणि दिलीप.

उपजाति

अशा प्रकारें नृपती समर्थ, करी सदार व्रत तो प्रजार्थ;
त्रासे न ज्याचें मन सत्कृतीस, क्रमी असे तो दिन एकवीस.

राजाचें भजणें खरेंचि अथवा खोटें, यया तोलुनी,
पाहावें अशि वासना दृढ मनीं येवोनियां नंदिनी;
गंगौघाजवळी सुकोमलतृणें होतीं जिथें चांगलीं,
त्या शैलेशगुहोदरीं भयकरीं एके दिनीं पातली.

वसंततिलका

पीडावया हिस न हिंस्र मनेंहि शक्त, ऐसा मनीं धरुनि निश्चय धेनुभक्त;
शोभेकडे नयन दे गिरिच्या प्रदेशीं, तों सिंह दृष्टि चुकवोनि धरी तयेशीं.

शार्दूलविक्रीडित

आक्रोशा करि धेनु, तो ध्वनि महाशैलोदरीं दाटला,
एकाएकिंच आर्तवत्सल नृपें तत्काल तो ऐकिला;
होती दृष्टि निमग्न शैलपतिच्या आलोकनीं जों, तंव,
तीतें ओढुनि आणि दोरिपरि तो तद्दीर्घहंबारव.
धेनू रक्त तिचे वरी मृगपती होता बळें बैसला,
तो बाणासनधारकें नृपवरें वीरें तईं देखिला;

गेरूचा बहुलाल जो गिरि तयाच्या पृष्ठभागीं असे,
लोध्राचा तरु फुल्ल, त्यापरि तया तैं केसरी तो दिसे.

उपजाति

चुके नृपाचें अवधान तैं जरी, दयाब्धि सिंहावरि चाल तो करी;
वधार्थ भात्यांतुनि ओढण्या शर, मागें त्वरेनें नृपती करी कर.

शार्दूलविक्रीडित

भूपें दक्षिणहस्त तूणित शरग्राहार्थ जैं घातला,
तेथें बैसुनियां बहू चिकटुनी तैसाचि तो राहिला;
मुष्टीमाजि पिसें सुरंग, विलसे कांती नखांची वरी,
शोभे भूपतिची भुजा अचल तैं भित्तिस्थचित्रापरी.
बाहुस्तंभवशें बहु क्षितिपति क्षोभोनि चावी रदां,
घ्याया सूड करी प्रयत्न, परि तच्छक्ती न चाले तदा;
होतां क्षीणबल त्वरें अहि महा मंत्रौषधांनीं जसा,
क्रोधानें जळतो, मनीं तडफडे भूपाळ तेव्हां तसा.

उपजाति

अपूर्व दैवें स्थिति जाहली असी, देखोनि तो विस्मित होय मानसीं;
बोले तईं सिंह मनुष्यवाणिनें, नृपास आश्चर्य दिलें बहू तिनें.
“ आतां, नृपा, हे श्रम सोड साच, हें शस्त्र माझ्यावरि बा वृथाच;
जरीहि वायू उपडी तरूशीं, चाले कसें तद्बल पर्वताशीं.

शार्दूलविक्रीडित

कैलासापरि शुभ्रवर्णवृषभीं बैसावयास त्वरें,
मत्पृष्ठीं पद ठेवितो शिव ह्मणोनी हें असे शुद्ध रे;
भूपा, जाण निकुंभतुल्य मजला, मी शंभुचा किंकर,
बा कुंभोदरनाम, गोष्टित यया कांहीं नसे अंतर.
आतां देखशि तूं समोर अपुल्या हा देवदारू तरू,
ज्याला शंकर मानितो निशिदिनीं कीं आपुलें लेंकरूं;

प्राशोनी गिरिजाघटस्तनगता माधुर्ययुक्ता पया,
झाला तद्रस जाणता, गुहचि बा जाणें नृपाळा जया.

उपजाति

एके दिनीं कुंडु सुटे कपोला, ह्मणोनि वन्यद्विप एक आला;
घांशी बळें तो जंव या नगातें, गेली ययाची निघुनी त्वचा ते.
दैत्यांसवें युद्ध करी कुमार, ते त्यावरी टाकिति अस्त्रभार;
तदा जसा खेद उमा करी तो, झाली तईं खिन्न तयाच रीती.

शार्दूलविक्रीडित

तेंव्हांपासुनि रक्षणार्थ तरुच्या ईशें मला ठेविलें,
व्हावा त्रास गजांस फार ह्मणुनी सिंहत्वही हें दिलें;
प्राणी येइल कोणि दैवगतिनें येथें तया मारुनी,
खावें, ही मज वृत्ति जाण, नृपते ! देवें दिली नेमुनी.

भुजंगप्रयात

नृपा ! जाहलीसे क्षुधा फार दीप्त, हिच्या पारणेनेंचि होईल तृप्त;
हिला अंतरीं प्रेरिलें ईश्वरानें, ह्मणोनीच झालें इचें येथ येणें.

जसा अंबरीं आकळोनी विधूला,
पितो राहु त्याच्या सुखानें सुधेला;
तसा धेनुला मी धरोनी स्वयें या,
पितों रक्त हीचें सुखें देख, राया !
अतां येथुनी जाय, भूपा ! घराला,
न संकोच वाटो तुझ्या बा मनाला;
तुवां दाविली शिष्यभक्ती गुरूला,
न अन्याय वाटेल यामाजिं त्याला.

शार्दूलविक्रीडित.

जेव्हां रक्षण वस्तुचें, नृपवरा ! शस्त्रप्रयोगें घडे,
तेव्हां शस्त्रवशें अवश्य, नृपते ! लोकीं करावें पडे;

शस्त्रोपाय न जेथ, वस्तु मग तें नाशास पावे, तरी,
नोहे दूषण शस्त्रधारक नरा; ही गोष्ट आहे खरी."

स्रग्धरा

ऐसी वाणी प्रगल्भा परिसुनि हरिची, होय भूपास ठावें,
कीं ही माझ्या बलाची प्रतिहति घडली सर्व शंभुप्रभावें;
तेव्हां ही जी अवज्ञा मम घडलि, न ती ग्राह्य होणार लोकीं,
ऐशी शांती मनाची करुनि नरपती, खेद टाकी विवेकी.

भुजंगप्रयात

बघे इंद्र वज्रास टाकावयास, शिवें दृष्टिनें स्तब्ध केलें तयास;
तसा बाण मारावयाचा उपाय, न चाले तईं बोलता होय राय.

इंद्रवंशा

"चेष्टा न कांहीं मम चालते अतां, बोलेन त्याही हंसशील तत्त्वतां;
तूं जाणशी सर्व मनोगतास रे, मी सांगतों यास्तव सर्वथा खरें.

वसंततिलका

सृष्टि स्थिति प्रलय जो करितो जगाचे,
तच्छासन स्फुट मला अविलंध्य साचें;
हें अग्निहोत्रिधन सन्निध नाश पावे,
याचेंहि रक्षण मला उचित स्वभावें.

भुजंगप्रयात

यया एक, सिंहा! असे रे उपाय, तुवां भक्षिजे आज माझाच काय;
जिचा वत्स तान्हा घरीं वाट पाहे, तिला सोडण्याची करावी कृपा हे."

इंद्रवज्रा

ऐकोनि हें भाषण सिंह हांसे, तेव्हां तयाचें मुख फार वासे;
दंष्ट्राप्रभेनें दरिच्या तमाला, नाशूनि तो उत्तर दे नृपाला.

उपजाति

"प्रभुत्व साऱ्या क्षितिचें तुला असे, तारुण्य लावण्यहि अंगिं हें वसे;
बहूत अल्पास्तव टाकुं इच्छिसी, ह्मणोनि मूढ क्षितिपाल! दिससी!

भुजंगप्रयात

दयेनें जरी अर्पिसी हा स्वकाय, तरी एकली मात्र वांचेल गाय;
तुझ्या वांचण्यानें प्रजापालनाचें, महत्कार्य साधेल साऱ्या जगाचें.

शार्दूलविक्रीडित

"धेनूच्या मरणामुळें गुरु बहु क्षोभेल अग्नीपरी,
त्यातें शांत कसा करूं ?' भय असें वाटे जरी अंतरीं;
एकीबद्दल कोटि धेनुहि तुला द्याया नसे सांकडें,
देती बा प्रतिवेळिं दूध भरुनी ज्या मोठमोठे घडे.
यासाठीं सुखभोगसाधन तनू देऊं नको ही घसी,
एतत्तुल्य बहूपयुक्त दुसरी नोहेच वस्तू असी;
भूमीचें सुसमृद्ध राज्य बरवें जें होय, राया ! तया,
इंद्राचें पद बोलती बुध, नसे संदेह गोष्टींत या."

वसंततिलका

ऐसें वदोनि मृगराज उगाच ठेला, त्याचा प्रतिध्वनि गुहोदरिं थोर झाला;
सिंहोक्ति जी नरपतीस, गिरीहि तीतें, उच्चस्वरें कथितसे जणुं भूपतीतें.

भुजंगप्रयात

असें बोलतां सिंह गंभीरवाणी, भयें धेनु पाहे नृपा दीनत्राणी;
दयेनें द्रवे अंतरीं तो नृपाळ, पुन्हां बोलुं लागे तयाशीं कृपाळ.
"क्षतापासुनी तारिती, याचि बीजें, जनीं क्षत्र हा शब्द रूढीत साजे;
घडे तद्विरुद्धा कृति स्त्रीयहातें, जळो जीव आणीक साम्राज्यही तें !

वसंततिलका

धेनू बहूत दुभत्या दिधल्या गुरूस,
होईल केविं परि तोष तिहीं तयास;
ही कामधेनुस उणी अणुमात्र नोहे,
त्वां ताडिली शिवबळेंचि, न अन्यथा हें.

उपजाति

आतां हिचें रक्षण तूजपासुनी, असे मला न्याय्य तनूहि वेंचुनी;
साधेल एणें तव पारणें, हरे ! होणार नाहीं मुनिकर्म लुप्त रे.

शार्दूलविक्रीडित

तूंही जाणसि पारतंत्र्यजनितें दुःखें कशीं काय तीं,
रक्षाया तरु हाहि पाहिं तुजला आयास होती किती?
झाला वस्तुविनाशही, तरी करी जो आंगराखूपण,
त्याला शक्य नसे धन्यास अपुलें दावावया आनन.

उपजाति

धरोनि कांहीं हृदयांत हेतू, मातें वधायास न इच्छिशी तूं;
तरी यशोरूप तनूहि माझी, रक्षावयाची करिजे कृपा जी !

शालिनी

पांचा भूतांपासुनी देह होतो, नाशा पावे निश्चयानें, अहो, तो;
त्याच्या ठायीं आमुच्यासारिख्यांची, नोहे आस्था गोष्टि हे जाण साची.

उपजाति

'स्नेहास संभाषण होय कारण,' हें बोलती सर्वहि जाणते जन;
पडोनियां गांठ वनांत आपुली, संभाषणें दैववशेंहि जाहली.

शालिनी

तेणें झाला स्नेहसंबंध आजी, आतां जी कां प्रार्थना तूज माझी,
तीचा तूतें योग्य नोहे नकार, आणी याचा अंतरीं बा विचार."

उपजाति

'तथास्तु' ऐसें वदतां मृगेंद्र, संतोषला फार मनीं नरेंद्र;
होता तयाचा चिकटोनी हात, तो मोकळा होय तदा क्षणांत.

द्रुतविलंबित

मग शरासन ठेवि धरेवरी, नृप समाहित होउनि अंतरीं;
मृगपतिप्रति आमिषपिंडसी, स्वतनु अर्पुनि घे सुख मानसीं.

शार्दूलविक्रीडित

आतां क्रूर मृगेंद्र घालिल उडी, ऐसें मनीं जाणुनी,
खालीं तोंड करोनि भूप बसला तो धीरचूडामणी;
आकाशांतुनि पुष्पवृष्टि बरवी त्याच्यावरी तत्क्षणीं,
केली विस्मितमानसें करुनियां विद्याधरांच्या गणीं.
'वत्सा ! ऊठ ' अशी सुधासुमधुरा वाणी उठे तैं बरी,
ती ऐकोनि नृपाळ पाहि वरि तों त्याला दिसेना हरी;
धेनू मात्र उभी स्वमातृसदृशी होती पुढें एकली,
जीच्या स्नेहवशें स्तनांतुनि पयोधारा त्वरें चालली.

## भाटांनीं केलेला अजस्तुतिपाठ

शार्दूलविक्रीडित

" गेली रात्र पहा विचारचतुरा, ऊठ प्रभो ! लौकरी,
क्षोणीरक्षणभार हा अपुलिया ध्यायास खांद्यावरी;
दोघे पूरुष योजिले कमलजें, दोहींकडोनी, तिहीं,
खांदे देउनियां वरी उचलिजे, ऐसी असे गोष्ट हीं.

वसंततिलका

त्यांतोनि एक तव तात असे कुमारा ! एकीकडोनि धरितो उचलोनि भारा.
बाजू दुजी उचलण्या तुजलाचि तेणें; बा योजिलें, म्हणुनि ऊठ अतां त्वरेनें.

शार्दूलविक्रीडित

निद्राधीनमनें तुवां क्षणभरी लक्ष्मी तिरस्कारिली,
तेव्हां खंडितनायिकेपरि मनस्तापास बा पावली;
चंद्र त्वन्मुखकांतियुक्त म्हणुनी त्याच्याकडे जाय ती,
विश्रांत्यर्थ, परंतु तोहि बघ रे झाला फिका संप्रती.

वसंततिलका

आतां मनोज्ञनयनांसहि पंकजांस,
बा एकदाचि अजि येउ नवा विकास;

नेत्रांत गर्गर तुझ्या फिरताति तारा,
पद्मांत भृंगततिका करि येरझारा.
ऐसी विकासि कमलें अणि नेत्र यांचें,
अन्योन्यसाम्य घडुं दे नरवीर ! साचें;
कां कीं सहस्रदलबंधु नभःप्रदेशीं,
येवोनि सूर्य कमलांप्रति हा विकाशी.

शिखरिणी

प्रभातीं फुल्लांभोरुहसमुदयालागिं भजतो,
तसा वृक्षांच्याही शिथिल कुसुमांलागिं हरितो;
तुझ्या श्वासामध्यें परिमल निसर्गेंचि वसतो,
जणूं तत्प्राप्त्यर्थ स्फुट पवन हा यत्न करितो.

शार्दूलविक्रीडित

वृक्षाचीं नवकोमलारुण अशीं स्नेहांशशाली दलें,
त्यांमाजीं दंव शुभ्र मौक्तिकसराऐसें दिसे चांगलें;
हास्याची रुचि दंतकांतिसहिता आतां बहू पांढरी,
जेवीं शोभतसे, तुझ्या नृपसुता ! रक्ताधरोष्ठावरी.

पृथ्वी

प्रतापनिधि सूर्य हा जरि न ये वरी अंबरीं,
तरी अरुण सत्वरी अधिंच त्या तमा संहरी;
रणीं अतुलविक्रमी असुनि वीर तूं तत्त्वतां,
न कारण रिपूंवरी रघुस जावयाला स्वतां.

उपजाति

कुशीवरी दोहिं निजूनि जे क्रमें,
रात्रीस निद्रासुख घेति अश्रमें;
जागेवरोनी उठताति कुंजर,
तैं शृंखळांचे रव होति दुर्धर.

न त्यांचिया दंतयुगास लागला, तैं रक्तिमा पर्वतधातुचा भला;
तथापि बालार्करुची तयांवरी, तैं गैरिकाचा भ्रम पाहत्यां करी.

शिखरिणी

इराणी घोडे जे पटघटितविस्तीर्णसदनीं,
निबद्ध स्वच्छंदें उठति बघ निद्रेस त्यजुनी;
तयांतें चाटाया पुढति धरिती सैंधव नवें,
मुखोष्म्यानें होतें मलिन जरि तें स्वच्छ बरवें.

स्रग्धरा

पुष्पें गेलीं सुकोनी ह्मणुनि विरलता फार हारांस आली,
निस्तेजस्क प्रदीपावलि नृपतनया! देख ही सर्व झाली;
जीं जीं बा त्वां उठावें ह्मणुनि वदतसों रम्यवाक्यें, सुखानें,
तीं तीं हा पंजरस्थ प्रकट वदतसे, देख रावा मुखानें.

शार्दूलविक्रीडित.

ऐसी बंदिसुतोक्त वाणि मधुरा ऐकोनियां, जागृत,
होवोनी शयन त्यजी झडकरी तो भूपतीचा सुत;
जागा होउनि राजहंसविरुतें गंगेचिया सैकता,
जेवीं सोडुनि सुप्रतीक उठतो, तैसा, दिसे हा स्वतां.
प्रातःकालिं उठोनि यापरि, मग श्रद्धालु भूपात्मज,
श्रुत्युक्तें विधिनें करी क्रमवशें तो स्नानसंध्या अज;
केला त्यास यथार्ह वेष चतुरीं तेव्हां नृपाळांचिये,
वर्गीं जाइ, तदा स्वयंवरविधीसाठीं मिळे जो स्वयें.

## इंदुमतीपाणिग्रहण

शार्दूलविक्रीडित

नेसोनी शुचिवास, राजसुत तो कामापरी शोभला,
तें अंतःपुररक्षकीं सविनयीं कन्येकडे आणिला;

चंद्राच्या किरणीं सफेनजलधी मर्यादवेलीकडे,
जैसा नेइजतो, तशाच रिति ही गोष्टी अजाची घडे.
तेथें भोजपुरोहित श्रुतमती तेजस्वि अग्नीपरी,
त्याचें पूजन या सुतें रघुचिया केलें सुखाचे भरीं;
तेव्हां त्याहि पुरोहितें यजियलें वन्हीस आज्यादिकें,
केलें लग्न तदग्निसाक्षिक तयां दोघांजणांचें निकें.
हस्तें हस्त तिचा धरोनि अज तैं पूर्वींहुनी शोभला,
त्याला योग्य असा रसालतरुचा दृष्टांत वाटे मला;
ज्याच्या सन्निकटीं अशोकलतिका संबद्धही त्या असे,
तीचे पल्लव तद्दला झगटतां शोभा विशेषा दिसे.
कांटा दाट अजाचिया मणगटीं तेव्हां उभा राहिला,
स्निग्ध स्वेदहि येइ इंदुमतिच्या दिव्यांगुलीला भला;
ऐसा सात्विकभाव रम्य मदनें वाटून दोघांमधीं,
या वेळीं दिधला, अशा करिति तैं तर्कास गंभीरधी.
अन्योन्यास पहावयास उभयां वाटे मनीं लालसा,
तैं चोरून हळूच यत्न करिती, पाहावयाला जसा;
दृष्टादृष्टि घडे, तईं विरमुनी खालीं बघूं लागती,
संकोचें रमणीय फारचि दिसे तल्लोचनांची स्थिती.
कुंडीं अग्नि सुदीप्त होउनि वरी ज्वाला महा चालली,
जेव्हां तीं उभयें प्रदक्षिणविधी त्याला करूं लागलीं;
मेरूच्या निकटीं क्रमें दिननिशा संगें जशीं चालती,
तैसीं दिव्य वधूवरें सुरुचिरें काळीं तया शोभती.

## अजविलाप

शार्दूलविक्रीडित

झाली तैं व्यजनादि साधनवशें मूर्छा अजाची दुरी,
राणी इंदुमती तशीच पडली निश्चेष्ट भूमीवरी;

मर्त्यांचें अवशिष्ट कांहीं असतें आयुष्य हो जोंवरी,
आशेनें उपचार लोक करिती ते चालती तोंवरी.

शालिनी

ताराहीना होय वीणाच जैसी, राणी भासे चेतनाशून्य तैसी;
अंकीं तीतें घे करांनीं नृवीर, ज्याच्या चित्तीं प्रेम राहे अपार.
मृत्यूनें ती जाहलेली विरूप, अंकीं घेतां भासला तेविं भूप;
फिक्की प्रातःकाळिं वातायुलेखा, अंकीं ज्याच्या तो शशी जेविं देखा.

शार्दूलविक्रीडित.

होता धीर तरी, अधीर बहु तो होवोनियां अंतरीं,
दाटे कंठ, तसाच भूमिपति तैं शोकें विलापा करी;
लोहाला कठिणाहि मार्दवचि दे जो ताप तो प्राणियां,
लोकामाजि मृदू करील, न असे आश्चर्य गोष्टींत या.
" स्पर्शाला सुकुमार फार असती लोकांत जीं कां फुलें,
होतीं तींहि समर्थ जीवित हरायाला स्वकीयें बलें;
मारायास नरास निष्ठुर विधी चित्तीं धरी वासना,
सांगा हो, मग काय त्यास जगतीमाजीं उणें साधना !
किंवा जें मृदु होय त्यास मृदुनें मारीतसे अंतक,
ऐसा सर्व जगांत विश्रुत असे त्याचा बहू लौकिक;
भारी कोमल आणि शीतल असे लोकांमधें जें दंव,
तद्योगें नलिनी मरोनि पडते, हें जाणती मानव.
माळा मारक होय, हेंहि म्हणणें मिथ्याच वाटे मना,
कां कीं ठेवितसें उरीं, तरिहि ती कैसी मला मारिना !
कोणाला विष तारितें, अमृतही कोणास मारीतसे,
तस्मात् मृत्युस हेतु एक मजला ती ईश्वरेच्छा दिसे !
किंवा दैवगती विरुद्ध ममही, सध्या नसे ती सुधी,
या हेतुस्तव वीज ही जणुं अतां निर्मी स्वबुध्या विधी;

वृक्षाचा करितां न नाश अणुही स्वीयें बलें संप्रती,
तीनें पाडियली तदाश्रित लता मारोनियां खालती.
केले मी अपराध फार, तंवही केली न तूं हेलना !
आतां तो अपराध अल्पहि नसे हें ठाउकें त्वन्मना;
ऐसेंही असतां, न पात्र मम हा संभाषणाही असे !
ऐसें मानुनियां सखे! मज, अजी मौना धरीलें कसें ?
मी आहें शठ, धूर्त, वंचक, असें तूं ओळखूनी अतां,
झालीसी परलोकवासि, पुसल्यावांचून मातें स्वतां !
दुष्टाचें न मुखावलोकन पुन्हां होवो, असें चिंतुनी,
तेथोनी परतोनि येउंच नये, हें धारिलें कीं मनीं !
कांतेच्या सह जाइ जीव मम हा, ही गोष्ट झाली बरी,
तीतें सोडुनियां निघे परत तो, ही तों अयोग्या खरी;
धिग् जीवा ! करणें तुझें न बरवें वाटे मनीं शोधितां,
त्याचें दुःसह कष्टरूप फल हें बा भोगिं तूं तत्त्वतां !

वैतालीय

सुरतश्रमजन्य घर्म हा, वदनीं सुंदरिच्या दिसे पहा !
परि ती तरि या क्षणीं असी, त्यजुनी सर्वही झालि नाहिंसी !

उपजाति

पळामधें हा घडला प्रकार, हें पाहतां देह दिसे असार !
असे बहू भंगुर तात्स्थिती ते, देवा! असो धिक्कृति जाण तीतें !

शिखरिणी

मनेंही म्यां केलें कधिंहि न तुझें अप्रिय सये !
मला टाकायाची मति तव मनीं केंवि आजि ये ?
पति क्षोणीचा मी परि वरिवरी प्रीति तिकडे,
खऱ्या प्रेमाचा तों भर सकल वाहे तुजकडे !

शार्दूलविक्रीडित

ज्यामाजीं भरलीं फुलें सुरुचिरें, जे नील भृंगापरी,
ज्यांचे पेड वळोनि सुंदर अशी वेणी दिसे साजरी;
त्या केशांस समीर लागुनि सये! ते हालती जैं अतां,
होतो भास मनास कीं जिव तुझा येतो जणूं मागुता !
कोणी एक लता हिमालयगता तेजास जी वागवी,
रात्रीं होउनियां प्रकाशित, तमा ती तेथ त्या घालवी;
तैशी सावध होउनि मम सखे ! ऊठ स्वयें सुंदरी !
माझी ही विरहव्यथा सकळिका आतां करीं गे दुरी.
रात्रीचें मिटतें सरोज उदरीं ज्याच्या अली कोंडती,
ते शब्दा करिती न, तैं दिसतसे त्याची जशी का स्थिती;
तैसें भाळ विशाळ, युक्त अलकीं, ऐसें तुझें जें मुख,
तें निःशब्द विलोकुनी मज गडे, वाटेल कैसें सुख ?
चंद्राला रजनी पुन्हां मिळतसे, कोकास कोकांगना,
त्यांचा सावधि तो वियोग ह्मणुनी सोसे तयांच्या मना;
आतां भेट तुझी अशक्य ह्मणुनी संताप जो हा असा,
होतो त्वद्विरहें, सखे! मज न तो जाळील कीं अग्निसा ?
शय्या सुंदर पुष्पराजिरचिता तोही खुपावी जिला,
ऐशी शारदपूर्णचंद्रवदने ! तूझी तनू कोमला !
तो काष्ठीं घटिता भयंकर चिता दीप्ताग्निनें संयुता,
गे सोशील कशी ? सरोजनयने ! सांगें अतां तत्त्वतां.

वसंततिलका

एकांतिंची सहचरी तव मेखला ही,
तीही अतां मधुर शब्द करीत नाहीं!
याचेवरोनि मज हे करभोरु ! भासे,
कीं ती तुझ्याचि विरहें मृत जाहलीसे !

तूं मंजुल स्वर दिला सखये ! पिकांस,
हंसीस मंदगति, दृष्टि चला मृगांस;
वातें वनांत डुलती लतिका सुरेख,
त्यां हावभाव दिधले रमणीय देख.
मातें घडो सुख ह्मणोनिच पाठिमागें,
ह्या ह्या स्थळीं स्वगुण ठेवियले तुवां गे;
त्यांनीं मला सुखविजे, परि तेचि पाहीं,
आतां मदीय तनुची करितात लाही !

शार्दूलविक्रीडित

देखें ही सहकार आणि फलिनी बागामधें संप्रती,
या दोघांस परस्परें सुचतुरे! त्वां कल्पिलीं दंपती;
त्यांचें मंगलकार्यही न करितां गेलीस लोकांतरीं !
आहे हें करणें तुझें उचित कीं ? सांगें मला सुंदरी
केला दोहद तूं अशोक तरुला, त्याला फुलें पातलीं,
होतीं सुंदर योग्य वेणिस तुझ्या जीं भूषणें चांगलीं;
झालीसी परलोकवासि सखये! या कारणानें असा,
तीं वाहूं तव पिंडदानसमयीं पिंडावरी गे कसा?
ज्याचे नूपुर वाजती छुमछुमा ऐशा पदाचा मला,
झाला अद्भुत लाभ, हें मनिं सये! हा आठवोनी भला;
पावे चंद्रमुखी ! अशोकविटपी शोकास तो अंतरीं,
पुष्पांचें मिष दाउनी करितसे ही बाष्पवृष्टी खरी !

शिखरिणी

तुझ्या श्वासाऐशीं बकुलकुसुमें सौरभयुतें,
कराया तन्कांची अपण बसलों येथ निरुते;

वदूं काई कांते! त्यजुनि तिस आधींच सुभगे!
अशी निद्रा घेशी, उचित तुज हें सांग मज गे !
तुझ्या दुःखें दुःखी, तव सुखभरानें बहु सुखी,
अशा तूझ्या संगें असति सखया जाण सुमुखी;
जसा शुक्लीं पक्षीं विधु सुभग वाढे प्रतिदिनीं,
तसा आहे तूझा तनय गुणशालीहि सदनीं.
तुला जें कां वाटे प्रिय मजहि वाटे प्रियचि तें,
मनीं दोघांच्याही रुचि अणुहि भिन्ना न वसते;
अशी सर्वांशानें स्थिति सकल साख्यास्पद मना,
असोनी हा कैसा हृदयिं धरिला निष्ठुरपणा !'

शार्दूलविक्रीडित

झाली ध्वस्त रती; धृतीहि सकला अस्ताचला पावली,
संपे गायन; उत्सवींहि ऋतुच्या नाहीं रुची राहिली;
तैसें कारण अल्पही न उरलें या भूषणांचें स्वता,
शय्या शून्यचि जाहली मम अजी जी जाळिते पाहतां!
तूं माझ्या असती धनीण घरची; मंत्री विचारांतली,
एकांतांतिल मित्र शिल्पकृतिची गे पट्टशिष्या भली;
ऐशी तूं! तुजला दयारहित या दैवें बलें हारितां,
नेलें सर्वहि! काय शेष उरलें? तें तूं वदें तत्त्वतां!
काढोनी दयिते! मधु स्वमुखिंचें जें तूज म्यां अर्पिलें,
तें प्राशोनिच संप्रती मन तुझें संतुष्ट कीं जाहलें;
त्या पानावर हें तिलोदक कसें स्वर्गी रुचेल प्रिये!
झालें दूषित जें मृगांकवदने! उष्णाश्रुंनीं माझिये.
मोठाले विषयोपभोग घडले मातें तुझ्या संगतीं,
उद्यानांत वसंतकालिं दयिते! झाली यथेष्टा रती;

आहे वैभव तें, परंतु न असे वस्तू अजा मोहक,
झालें त्वद्विरहें असें गणितसें दुःखामधें हें सुख !
ऐसें तो करुणस्वरें बहुपरी बोलोनि कांतेप्रती,
उद्यानस्थ तरूंसही रडविता झाला तईं भूपती;
वाहे जो मकरंद फुल्ल कुसुमांपासोनि त्यांखालतीं,
तद्रूपेंच तईं गमे, जनमना अश्रूच ते ढाळिती !

## वासंतवनश्री

द्रुतविलंबित

यमकुबेरजलेशसुरेश्वरा, सम जया गणताति नरेश्वरा;
अभिनवीं कुसुमीं पुजण्या तया, जणुं वसंतचि ये समयीं यया.

वसंततिलका

तों दक्षिणेकडुनि उत्तरदिक्प्रदेशा
जावें, असें गमतसे मनिं त्या दिनेशा;
उष्णें प्रभातसमयीं हरि तो हिमाला,
ने त्या दिशेस रविसूत तुरंगमाला;
आधीं फुलें मग नवीन दलें तरूंला,
त्यानंतर भ्रमरकोकिलसंघ आला;
ऐशा क्रमेंचि रमणीय ऋतू वसंत
होई तईं प्रकट तो गहना वनांत.

शार्दूलविक्रीडित

भूपें साधुहितार्थ या जमविली न्याय्यें पथें संपदा,
तीतें लक्षुनि याचकौघ मिळती तीभोंवतीं सर्वदा;
तैसे या ऋतुनें सुपुष्ट नलिनी पाहोनि तीतें सरीं,
तैं हंसभ्रमरादि पक्षि पडती येवोनि तीच्यावरी.

पृथ्वी

वसंतऋतुमाजि त्या बहुत सौख्यदें जीं मना,
न केवल फुलेंच तीं करिति मन्मथोद्दीपना;

अशोकतरुचीं नवीं श्रवाणिं घालिती कामिनी,
दलेंहि करिती बहू मद विलासियांचे मनीं.

शिखरिणी

वनश्रीचे भाळीं तिलक रचिले जेविं मधुनें,
मरंदा देणारीं अशिं विलसती ज्यांस सुमनें;
असे शोभाशाली कुरबकतरू दिव्य असती,
मिलिंदांच्या वृंदाप्रति बहुत वाचाळ करिती.

शार्दूलविक्रीडित.

कांता घेउनियां चुळास मधुच्या बुंधावरी टाकितां,
ज्याला सुंदर मद्यगंधि सुमनें आलीं वनीं तत्त्वतां;
तेव्हां तन्मकरंदलोलुप अशा झुंडी अलींच्या महा,
येवोनी बकुलाख्यवृक्ष अवघे व्यापूनि गेले पहा!

पृथ्वी

पलाशतरुला वनामधिं वसंतलक्ष्मी भली,
तईं अरुणवर्ण दे विपुल कुड्मलें चांगलीं;
असंकुचितमानसा मदवशा पतीला जशी,
क्षतें नखवशें करी, सुभग दीसती हीं तशीं.

शार्दूलविक्रीडित

कांतांचे अधरोष्ठ सक्षत तयां जें फार बाधा करी,
ज्याचा जोर विशेष, यास्तव वधू कांची करीती दुरी;
ऐशा तीव्र हिमा समूळ हरण्या सामर्थ्य सूर्याचिया,
अंगीं तें नव्हतें, परी हळुहळू न्यूनत्व आणी तया.
शोभाढ्या सहकारकोमललता वातें बहू कांपतां,
जाणों या शिकताति भाव करण्या, ऐसें गमे तत्त्वतां;
उद्यानीं कलिकाचयें सुविपुसें युक्ता बऱ्या डोलती,
कामक्रोधाहि जिंकिती नर, तयांलागींहि त्या मोहिती.

पृथ्वी

वसंतऋतु पातला तंव सुगंधशाली फुलें
अलीं बहुत साजिरीं ह्मणुनि तैं तरू शोभले;
वनीं प्रथम कोकिला करिति मुग्धनारीपरी,
मनोज्ञ मितभाषणा, सुखवि जें जना अंतरीं.

इंद्रवज्रा

बागांतल्या सुंदर वेलि देख, त्या नर्तकी भासति तैं सुरेख;
आले तयां पल्लव जे नवीन, तें पाणियुग्म स्फुट होय जाण.

उपजाति

वातें हले जैं सुकुमार पाला, तो पाणिचा भाव गमे मनाला;
शिरीं तयांच्या अलिवृंद गाती, त्या रूपकीं ह्या गमताति गीती.
पुष्पें तयां जीं रमणीय होतीं, शोभे तयांची जणुं दंतकांती;
अशापरी रूपक नर्तकीचें, शोभे भलें वेधक जें मनाचें.

शार्दूलविक्रीडित

नाना रम्यविलास फार करितां येती जयाच्या वशें,
सौगंध्यें अपुल्याचि केसरभवा पुष्पांस जिंकीतसे;
ऐसें मद्य पतीसवें मधुर हो पीती तईं अंगना,
स्वादा संतत देउनी करितसे जें मन्मथोद्दीपना.

पृथ्वी

प्रफुल्ल कमलें जलीं, भंवति पक्षिही बोलती,
सुमंजुलरवा अशा विपिनवापिका शोभती;
सुहास्यवदना, ढिल्या सरव ज्यांचिया मेखला,
अशा युवतिंचा तयां उचित वाटतो दाखला.

शार्दूलविक्रीडित

झाली फार कृशा वसंतसमयीं, तैशी मुखाची दिसे
कांती फारचि पांडु, इंदु उदयालागीं जईं येतसे;
यासाठीं पतिची न भेट असली जी नायिका खंडिता,
तीशीं तुल्य अशी स्थिती रजनिला आली तईं तत्त्वतां.

मालिनी

दंव किमपि पडेना, त्यामुळें स्वच्छ झाले,
किरण शशधराचे, ज्यांस सौंदर्य आलें;
श्रम हरिति रतीचे देखुनि त्या स्मराला,
तरुणमनिं शिरांया फार आवेश आला.

शिखरिणी

प्रदीप्ता अग्नीच्या परि बहुत तेजस्वि दिसतें,
वनश्रीचें स्वर्णाभरणचि जनालागिं गमतें;
असें कोरांट्याचें कुसुम पतिनीं कोमल करीं,
दिलें तें प्रेमानें कमलनयना घालिति शिरीं.

शार्दूलविक्रीडित

काळा अंजनसा द्विरेफगण हो ज्याच्यावरी बैसला,
ऐसा तो तिलकाख्य वृक्ष बरवा बागामधें शोभला;
तेणें भव्यवनस्थली अतिशयें श्रीच्या दिसे कीं तशी,
लोकामाजि सुधांशुकांतवदना शोभे तिलानें जशी.
येतो फार सुगंध जीस मधुचा, जो वेधितो कीं मन,
आरक्ताधररूप रम्य दिसतो पाला जिला शोभन;
पुष्पें हींच जिचें मनोज्ञ हंसणें ज्याची प्रभा पांढरी,
एणें ती नवमल्लिकाख्य युवती चित्ता प्रमोदा करी.
शेले रंगित, लालजर्द चुनड्या, कानीं यवांचे तुरे,
तैसे कोकिलशब्द, ऐकुनि जयां कांतावियोगी झुरे;
ऐशी ही मदनाख्यभूपतिचमु तीणें विलासीजन,
केला स्त्रीपरतंत्र; त्याविण कुठें लागे न त्याचें मन !

पृथ्वी

मरंदवश होउनी भ्रमर बैसले जीवरी,
कणीं सुघवलींहि जी बहुत पुष्ट झाली खरी !

अशी तिलकमंजरी उपवनीं भली शोभली;
जशीं कचभरीं तिच्या विमल मौक्तिकें गुंफिलीं.

शार्दूलविक्रीडित

बागांतील समीरणें उडविला पुष्पोत्थ रेणुव्रज,
शोभे जेविं उभा धनुर्धररतीशाचा विशाल ध्वज;
किंवा तो ऋतुलक्ष्मिचा शितमुखालंकार चूर्ण स्वयें,
ज्यातें लक्षुनि धांवती मधुकरश्रेणी तई निश्चयें.
हिंदोळपाठिरि बैसुनि पतिसवें कांता वसंतोत्सवीं,
चातुर्यें दृढ रज्जुला धरुनियां, दोला स्वयें हालवी;
'आतां मी पडतें,' ह्मणोनि वदनें बोलोनियां तत्क्षणीं,
रज्जू टाकुनि भीमिषें करितसे आशा धवालिंगनीं.
"कोपा टाकुनि द्या, तुह्मीं रुसुं नका, चित्तांत ईर्ष्या पुरे!
स्त्रीहो! यौवन फार चंचळ असे, गेलें न मागें फिरे"
ऐशा मन्मथशासना जणुं कथी तो कोकिलांचा गण,
वाटे कीं युवती यथेष्ट रमती त्या शासना ऐकुन.

## दशरथमृगया

शार्दूलविक्रीडित

शोभे ज्या मधुविष्णुकामतुलना ऐसा नृपीगग्रणी,
रूपानें रतिशा विलासचतुरा कांता सवें घेउनी;
भोगोनी विविधा यथेष्ट विषयां तेव्हां वसंतोचिता,
इच्छी कीं मृगयाविहार करिजे आतां वनीं तत्त्वतां.
कौशल्यें चललक्ष्यभेद करितां येतो, तशीं चेष्टितें,
पाहोनी पशुचीं, मनोगत कळे तत्कोपभीत्यादि तें;
होतें कष्टवशें शरीर हलकें ऐसे शिकारीमधीं,
जाणोनी गुण, मंत्रियांस पुसुनी जाई वनीं तो सुधी.

भूपानें मृगयोपयोगि असल्या वेषा करोनी, भलें,
कंठाला लटकाविलें निज धनू जें मौर्विनें शोभलें;
अश्वाचे खुर लागुनी रज उडे नाहीं तयाला मित,
आच्छादी सकला नभास, दिधलें त्याला जसें कीं [illegible]
केशांचा बुचडा कसोनि कुसुमस्रग्बंधनानें शिरीं,
पानांशीं तरुच्या समान हिरव्या वर्णा शरीरीं धरी;
घोड्याच्या गतिनें सुरेख हलती कानांतलीं कुंडलें,
ऐसा जाय वनीं नृपाळ, चरती जेथें मृगांचीं कुळें.
आल्याला वनदेवता शिखुनी वेलीमधें राहती,
दृग्व्यापार मधुव्रतीं निजबळें ठेवोनियां पाहती;
भूपा कोसलिंच्या जनास सुखदा त्रात्यास पूत्यास त्या,
ऐशा देखुनियां प्रसन्न विभुला, संतुष्ट झाल्या सत्या.
जेथें तस्कर, दलदलीहि, वणवे नाहींत ऐशा वनीं,
कुत्रे आणि किरात धांवाति पुढें जाळीं सवें घेउनी;
पक्षी, एण, गवे यथेष्ट चरती, गोड्या जळाचे झरे,
मैदानें बहु लांब रुंद बरवीं, भूपाळ तेथें शिरे.
चिंताशून्य मनांत जो दशरथ प्रख्यात रूपें नरीं,
चापाच्या कठिनस्वयें पळविले ज्यानें महा केसरी;
जैसें भाद्रपदांत इंद्रधनु तें ज्या वीज मौर्वी बरी,
तैसें सज्ज करोनि तो धनु करीं घेई वनाभ्यंतरीं.
स्तन्यार्थी हरिणीस आडविति तैं मार्गी तयांचीं पिलें,
दर्भांचे सुकुमार अंकुर मुखीं ज्यांच्या बहू शोभले;
टौंकारूनि पुढें सदा विचरती ते कृष्णसाराह्वय,
ऐसे ते मगयूथ भूमिपतिच्या आले पुढें सान्वय.

द्रुतविलंबित

सजव वाजिवरी नृप बैसला, निशित बाण शरासनिं लाविला;
नृपति यापरि धांवतसे वनीं, निरखुनी हरिणी सभया मनीं.

उपजाति

स्वस्थळा धांवति घाबरोनी, त्या पाहती व्याकुळ लोचनांनीं;
... कटाक्षीं तंव हो तयांचे, तें श्याम शोभे वन सर्व साचें.
सुस्निग्ध नीलोत्पलदीर्घपत्रें, जैं हालती वातवशें विचित्रें;
तींहीं जसें श्याम अरण्य होतें, तसें मृगीदृष्टिवशें दिसे तें.

शार्दूलविक्रीडित

लावी बाण वधावयास विपिनीं एक्या मृगा भूपती,
तों त्याची दयिता मधेंच अडवी आली अकस्मात ती;
राजा कामिमनोगतज्ञ म्हणुनी त्याला दया येउनी,
कर्णान्तावधि ओढिला शर, तरी तो घे तई काढुनी.

वसंततिलका

तो भूमिपाळ इतरांहि अनेक एणां, मारावयास्तव धनूवरि लावि बाणा;
तेव्हां मनीं मृग भयातिशयास घेती, या हेतुनें नयन चंचल फार होती.
तें पाहुनी नृपतिच्या स्मरणांत आले, प्रौढांगनानयनविभ्रम पाहिलेले;
येई दया नृपतिच्या हृदयांत थोर, तेव्हां अशी घडलि अद्भुत गोष्ट फार.
आकर्णकृष्ट बहु घट्ट तथापि त्याची, झाली ढिली सहज मूठ तया नृपाची;
डोहींचिया चिखलिं सूकर बैसलेले, तेथूनि ते निघुनि शीघ्र वनांत गेले.
अर्धेंच चर्वित मुखांतिल जे लव्हाळे, मार्गीं पदोपदिं तई दिसती गळाले;
त्यांचीं पदेंहि वठलीं वळिनोचि ओळीं, तींही तया नृपतिनें अवलोकियेलीं.
ऐशा खुणा बघुनि भूमिपती सवेग, त्या धोरणींचि करि सत्त्वर पाठलाग;
थोडा पुढें लवुनि वाजिवरोनि भूप, तो सूकरांप्रति हणी शरजाल खूप.
वृक्षांस कंबर तयें खिळिली शरांनीं, नाहींच जाणियलि त्या क्षणिं सूकरांनीं;
क्रोधें उभे करुनि केसर भूपतीला, तेचि स्वयें उलट इच्छिति मारण्याला.

ऐशापरी बहुत कोपुनि सूकरांचें; गेलें निघूनि तंव मान समग्र साचें.

शार्दूलविक्रीडित.

आघातोद्यत एक वन्यमहिषा देखोनियां सत्वर,
त्याच्या नेत्रबिळांस लक्षुनि शरा मारी धराधीश्वर;
रक्तानें नाचि तो भिजे जरी निघे भेदोनियां आंतडें,
पीडा बाण अर्धी अरण्यमहिषा, त्या मागुनी तो पडे. ॥१॥
शिंगें तोडुनि तीक्ष्णबाणनिकरीं भूमीपती सत्वरी,
गेंड्यांचीं बहुधा शिरें नरपती तो हालकी तैं करी;
दुष्टांचा दमिता न सोसुनि नृप प्राधान्य त्यांचें, करी,
त्यांचा नाश, परंतु जीवहरणा वांछी न तो अंतरीं ! ॥२॥
'आ' वासोनि दरीस्थ वाघ जंव त्या भूपावरी धांवती,
भग्ना वातवशेंचि सर्जतरुच्या शाखा तसे भासती;
दावोनि करलाघवास भरलीं त्यांचीं मुखें निर्भयें,
भूपें बाणगणीं, क्षणांत गमले भातेच तीं निश्चयें ! ॥३॥
जाळीमाजि लपून सिंह बसती त्यां क्षोभवोनी स्वतां,
मारावें ह्मणुनी भयानक करी मौर्वीरवा तत्वतां;
'राजा' शब्द मृगांस लक्षुनि यया लोकांमधें लाविती,
त्याचा मत्सर वाटुनी करितसे ऐसें जणूं भूपती. ॥४॥
ज्यांच्या वक्र नखोदरांत शिरलीं होतीं नवीं मौक्तिकें,
ज्यांचें फारचि तीव्र दंतिततिशीं शत्रुत्व होतें निकें;
त्यां सिंहांस वधूनि भूमिपतिनें ऐसें मनीं आणिलें,
कीं, युद्धांत सहाय जीं गजकुलें त्यांच्या ऋणा फेडिलें. ॥५॥
घोड्याला चमरांसभोंवति नृपें तैं धांववोनी त्वरें,
त्यांचीं तीव्रशरीं हरोनि ढवळीं तीं घेतलीं चामरें;
यामागें इतरांहि भूमिपतिचीं तीं घेउनीं सोडिलें,
जैसें त्यांस, तसेंचि यांहि चमरां जीवित्व त्यानें दिलें. ॥ ६ ॥

वसंततिलका.

अश्वासमीप अवचीत उडूनि मोर, आला वनीं नृपतिच्या अगदीं समोर;
होता जरी दशरथास तईं वधाई, त्याचा विचित्र दिसला नृपतीस बर्ह.

शार्दूलविक्रीडित.

केशांचा बुचडा सपुष्प रतिच्या काळीं सुटोनी बरी,
वेणी पाठिवरी सुदीर्घ दिसते स्त्रीची जशी साजरी;
तीची होउनियां स्मृती नृपवरा चित्तांत येई प्रिया,
त्यांयोगें शर मारण्यास बरवें वाटे न भूपा तया!

वसंततिलका.

कष्टामुळें नृपतिच्या वदनांबुजाला,
तेव्हां वनांत फिरता बहु घाम आला;
पाल्यास जो हलवि आणिक शीत जो का,
तो त्यास वायु सुकवी निमिषांत एका.

शार्दूलविक्रीडित.

राज्याचा तंव कार्यभार दिधला होता स्वमंत्र्यांकडे,
अन्याही विषयाकडे न मन त्या भूमीपतींचें जडे;
ऐसा हा मृगयेस संतत भजे या हेतुनें संप्रती,
आकर्षी चतुरा विलासिनिपरी ती या नृपाळाप्रती. ॥१॥
शय्या कोमल पत्रपुष्परचितां जैं भूपतीची सुधी,
दीपस्थानिं विराजती ज्वलनशा रानांतल्या औषधी;
कोणीही परिवार सन्निध नसे, ऐशी कधीं यामिनी,
काढी तो मृगयानुरक्तहृदय क्षोणीपती काननीं. ॥२॥

## दक्षिणमहासागर.

शार्दूलविक्रीडित.

सांगातें जनकात्मजेस अपुल्या घेवोनियां सत्वरी,
जाई व्योमपथें विमानिं बसुनी श्रीरामनामा हरी;
तैं रत्नाकर पारशून्य सहसा पाहोनियां खालता,
एकांतीं दयितेस तो गुणनिधी झाला असें बोलता. ॥१॥
" हा पाहें मम सेतुनें जलनिधी झाला द्विधा मैथिली !
लाटा या मलयावधी उसळती तैशाच फेनावली;
तारांचे गण जेथ शोभति शरत्कालीं बहू निर्मळ,
त्या छायापथ जेविं भेदि गगना, तैसा दिसे सोज्वळ." ॥२॥
" पूर्वीं जैं सगर क्रतूस करिता झाला, तईं सुंदरी !
अश्वाला कपिल स्वयें हरुनि तो पाताळिं ने सत्वरी;
तच्छोधार्थ, वसुंधरा खणिलि तत्पुत्रीं खनित्रीं महा,
केला वर्धित पूर्वजीं मम असा सिंधु प्रिये ! हा पहा." ॥३॥
" याचें घेउनि अंबु, वृष्टि करिती अंशू रवीचे जनीं,
होती चंद्रमुखी ! अमोलिक असे पोटांत याच्या मणी;
अंभोभक्षक वाडवाग्निहि जलीं यानेंच गे पोशिला,
लोकानंदन चंद्रमाहि सखये ! यापासुनी जन्मला. ॥४॥
विष्णूची स्थिति भिन्नभिन्न असते तेवींच याची असे,
जेवीं व्यापक विष्णु तेविं दयिते ! दिग्व्यापि हाही दिसे;
यासाठीं निजरूप अंबुनिधिचें विस्तीर्णताही खरी,
विष्णूचे परि, जानकी ! न समजे कोणासही भूवरी. ॥५॥
ज्याच्या नाभिसरोरुहीं बसुनियां ब्रह्मा स्तुतीतें करी,
शक्तीनें सकला जगांस उदरीं जो आवरोनी धरी;

शेषाच्या शयनावरी निजसुखें श्रीपुंडरीकाक्ष गे,
कल्पांतीं जलधींत या निजुनियां तो योगनिद्रेस घे. ॥ ६ ॥
पक्षच्छेद करोनियां सुरवरें हारीस ज्यां आणिलें,
ते अब्धींत शतावधी गिरि सुखें येवोनियां राहिले;
शत्रूंनीं अतिपीडित क्षितिपती ते जेविं धर्मान्विता,
मध्यस्था नृपतीस आश्रिति, तसें हेंही दिसे पाहतां. ॥ ७ ॥
साधी उद्वहनाक्रिया कृतयुगीं कोलावतारी हरी,
तेव्हां ह्या जलधींतुनी वसुमती ती शीघ्र येई वरी;
कल्पांतीं उसळे बळें जळ बहू याचेंचि तें भ्यावना,
झालें कीं मुखवस्त्र तें क्षणभरीं, वाटे असें गे मना. ॥ ८ ॥
अर्पायास मुखास सिद्ध असती धृष्टा नद्या सत्वर,
तैसा फाराचि दक्ष तोयधि असे द्याया तरंगाधर;
सिंधूंच्या वदनास पी, पिवविही त्यांना सुखें स्वाधरा,
ऐसा सागर हाचि एक चतुर स्त्रीभोगकर्मीं खरा. ॥ ९ ॥
लांबी शंभर योजनें बघ, शिरीं राहे जयांच्या बिळ,
ज्यांचें नांव तिमी अशा जलचरीं हा अंबुधी संकुल;
हे मासे नदिच्या मुखीं जमलिया सप्राणि तोया पिती,
डोळ्यांला मिटुनी, बिळांतुनी वरी पाणी त्वरें झोंकिती. ॥१०॥
मातंगकृति नक्र या जलनिधीमध्यें उड्या मारिती,
तेणें फेनगिरी फुटोनि तुकडे होवोनि नानारिती;
तेही उंच उडोनि कर्णयुगुला नक्राचिया लागती,
पाहातां नयनीं जना क्षणभरी हे चामरें भासती. ॥ ११ ॥
येती सर्प वरी बिळांमधुनि हे वेलानिला प्यावया,
या लाटाच असा जनां ग्रह मुळीं होतो बघूनी ययां;
सूर्याच्या किरणव्रजें चमकती जेव्हां फणांचे मणी,
तेव्हां निश्चय होय कीं, पसरले आहेत येथें फणी. ॥ १२ ॥

ओष्ठाचे परि रक्तविद्रुम तुझ्या आहेत, त्यांच्यावरी,
लाटा लागुनि शंख येउनि पहा हे ठेपती सत्वरी;
त्याचे अंकुर तैं मुखांत शिरती शंखांचिया सुंदरी!
त्यांतें सोडुनि जावयास सखये! हे कष्टती अंतरीं. ॥ १३ ॥
आकाशांतिल मेघ सिंधुसलिला प्यायास ओणावला,
पाण्याच्या भ्रमणामुळें गरगरा तेथें फिरों लागला;
त्याला पाहुनियां मनांत वनिते! येतें असें संप्रती,
कीं हा मंदरशैल या घुसळितो सिंधूप्रती मागुती. ॥ १४ ॥
हे वैदेहि! दुरून सिंधु दिसतो हा लोहचक्राकृती,
त्याभोंतील तमालवृक्षनिकरीं कृष्णा विराजे क्षिती;
येथोनी बहु दूर यास्तव दिसे ती फार सूक्ष्मा तशी,
चाकाच्या भंवतील काळि दिसते रेखा मळाची जशी. ॥ १५ ॥
ऐसा उत्सुक जाहलों त्वदधरा चुंबावया तत्वतां,
कीं भूषेमधिं काल जाय मजला तोही न सोसे अतां;
जाणों हें समजोनि केतकरजें घेवोनियां निर्मल,
सीते! त्वद्वदनास लावित असे हा मंद वेलानिल. ॥ १६ ॥
शुक्ती भंगुनि सैकतीं विखुरल्या मुक्तावळी शोभती,
जेथें नारळि पोफळीहि लावल्या भारें फळांच्या अती;
ऐशा सिंधुतटीं विमानगतिनें अत्यल्पकालें पहा,
आलों आपण इंदुसुंदरमुखी! आश्चर्य वाटे महा. ॥ १७ ॥

---

## दर्शनीय स्थलांचें पुनर्दर्शन.

शार्दूलविक्रीडित.

विघ्नें सर्व निरस्त देखुनि जनस्थानीं पुन्हां हे मुनी,
पूर्वी जीं त्यजिलीं निजाश्रमपदें आतां तिथें येउनी;

ज्याची शक्ति जशी तशींच उटजें बांधोनियां ते स्वयें,
आनंदें करिती निवास दयिते! टाकोनि सारीं भयें. ॥ १ ॥
त्वच्छुद्धीस वनीं करीत असतां शोकाचिया निर्भरीं,
कांते! नूपुर एक म्यां निरखिला दैव धरित्रीवरी;
तो त्वत्पादवियोगदुःखित जणूं बोलेच ना दुर्बळ!
ऐसें वृत्त घडे, जिथें जनकजे! तें हेंचि पाहें स्थळ. ॥ २ ॥
ज्या मार्गे तुजला निशाचरपती नेई बळें सुंदरी!
त्या मार्गा वचनेंकरूनि वदण्या शक्ती नसे ज्यां बरी;
वाताकम्पितपल्लवांगुलिवशें त्या ह्या लतांनीं मला,
सीते! घोरवनीं दयार्द्रहृदयें पंथा तुझा दाविला. ॥ ३ ॥
लागेना तव शोध यास्तव बहू मी व्यग्र हें अंतरीं,
जाणोनी हरिणी तृणा त्यजुनि ह्या, तोंडा करोनी वरी;
दृष्टी फेंकुनि दक्षिणेस अपुली त्यांनीं मला सूचना,
केली कीं, बघ! या दिशेसचि असे बापा! तुझी अंगना. ॥४॥

स्रग्धरा.

आतां हें अग्रभागीं हिमकरवदने! माल्यवान् पर्वताचें,
आकाशस्पार्शि ऐसें शिखर बघ दिसूं लागलें थोर साचें;
जेथें एकेच काळीं विमल नवजला सोडिलें शीघ्र मेघें,
तैसें बाष्पोदकातें व्यथित बहुत म्यां होउनी त्वद्वियोगें. ॥ ५ ॥
जो सीते! गंध चाले भिजुनि नवजलें मृत्तिका पल्वलांची,
वाणी सुस्निग्ध मेघागममुदित अशा तैं मयूरव्रजाची;
नीपांच्या रम्यपुष्पांतिल मृदुल असे तंतु बाहेर येती;
या गोष्टी याच शृंगीं मज तव विरहें दुःसह्य फार होती. ॥६॥

शार्दुलविक्रीडित.

येथें ऐकुनियां सरोजनयने! मेघांचिया गर्जिता,
ज्याचा थोर उठे प्रतिध्वनि गुहेमाजी सखे! तत्वतां;

ऐशा वेळिं मिठी गळ्या मम तुवां गे घालिजे साध्वसें,
तें येवोनि मनीं श्रमें दिवस ते म्या कंठिले राजसे ! ॥ ७ ॥
रक्तें कंदलिचीं फुलें उमललीं जैं काननीं चांगलीं,
पर्जन्यें भिजुनी क्षिती बहु तिची ती वाफ त्यां लागली;
तीं पाहोनि विवाहकालिक तुझीं धूमारुणें लोचनें,
चित्तीं आठवुनी मला श्रम इथें झाले मृगांकानने ! ॥ ८ ॥
ज्यांच्याभोंवतिं फार दाट विलसे हें वेतसीचें कुल,
तैसे सारस पक्षि देख दिसती लांबोनि किंचिच्चल;
त्या पंपासलिला दुरून बघुनी ये खालतीं धावुनी,
श्रांता होउनि दृष्टि ही मम सखे! पीतेच वाटे मनीं. ॥ ९ ॥
या पंपेवर चक्रवाकमिथुनें होतीं सुखें बैसलीं,
ज्यांनीं उत्पलकेसरें नवनवीं अन्योन्यतुंडीं दिलीं;
ऐशीं भीरु तुझा वियोग असतां तीं जोडपीं पाहिलीं,
तेव्हां त्वत्स्मरणें मदीय तनुची झाली बहू काहली. ॥ १० ॥
तीरीं ही विलसे अशोकलतिका, जीचे स्तनाचेपरी,
गुच्छां पाहुनि पीन, तूंच सखये ! आहेस हें अंतरीं;
भासोनी मज, जाई जों झडकरी आलिंगण्याला तिला,
वारी लक्ष्मण, ही लता ह्मणुनि, तों येई रडें गे मला. ॥ ११ ॥

शिखरिणी.

विमानाला घंटा असति लघु ह्या हेमघटिता,
तयांपासोनी हा मधु रव निघे यान करितां;
तयाला ऐकोनी वरि उडति हीं सारसकुलें,
जणूं सामोरीं तीं तुज जिवलगे ! येति सकलें. ॥ १२ ॥

शार्दुलविक्रीडित.

जेथें आम्रतरू तुवां घटजलें मोठ्या श्रमें पोशिले,
तोंडें ऊर्ध्व करोनि धांवति जवें जेथें मृगांचीं कुलें;

ती ही पंचवटी अजी बहुदिनीं संप्राप्त झाली असे,
जीतें पाहुनियां मदीय हृदया आनंद गे होतसे. ॥ १३ ॥
गोदातीरवनीं करूनि मृगया आल्यावरी सुंदरी !
वेताच्या सदनीं इथें शिर तुझ्या ठेवूनि अंकावरी;
विश्रांत्यर्थ निजें, तईं झुळझुळां वाहोनि वायू भला,
होई सौख्य अपार जें समयिं त्या, तें आठवे गे मला! ॥ १४ ॥
ज्यानें तो नहुषाख्य भूप पृथिवीमाजीं बहू उद्धत,
भ्रूभंगें सहसा महेंद्रपदवीपासोनि केला च्युत;
येतां जो उदयास पंकिल जलें होती अती निर्मळ,
पाहे आश्रम त्या अगस्त्यमुनिचा हा भूवरी सोज्ज्वळ. ॥ १५ ॥
त्याच्या अग्निगृहांतुनी इथवरी हा धूम कीं चालला,
त्यायोगें दयिते ! विमानपथ हा चोहींकडे व्यापला;
त्याला येइ मनोज्ञ गंध हविचा, त्या हुंगितां म्यां स्वतां,
जावोनि रज, चित्त होउनि लघू भासे बहू शुद्धता. ॥ १६ ॥

वसंततिलका.

हीं शातकर्णि मुनिची जलकेलिभू कीं;
पंचाप्सर प्रथित नाम हिचें विलोकीं;
मेघामधूनि दिसतें विधुबिंब जैसें,
झाडींत अंधुक दिसे स्थळ दूर तैसें. ॥ १७ ॥

शिखरिणी.

मृगांच्या संगें हा वनिं फिरतसे भक्षुनि तृणा,
विलोकूनी याचें तप, भय सुटे वासवमना;
तईं धाडी इंद्र प्रकृतिसुभगा पांच युवती,
तयाला त्या एणापरि निजबळें बद्ध करिती. ॥ १८ ॥

शार्दूलवि०

सौधा बांधुनियां जळांत वसतो हा येथ रात्रंदिनीं,
उल्लासें परिसे मृदंगमुख जीं वाद्यें तयांचे ध्वनी;

त्यांचा हा प्रतिशब्द होउनि नभामाजीं, यया पुष्पकीं,
झाला फारचि संप्रती गलबला, देखें प्रिये जानकी ! ॥ १९ ॥

वसंततिलका.

चोहींकडे ज्वलन पेटवुनी दुपारीं,
माथ्यावरी तपतसे जंव सूर्य भारी;
बैसोनियां मुनि सुतीक्ष्ण ह्मणोनि हा कीं,
पंचाग्निसाधन करी अबले ! विलोकीं. ॥ २० ॥
नांवेंचि हा विदित लोकिं सुतीक्ष्ण पाहें,
हे जानकी ! प्रकृतिनें तरि सौम्य आहे;
नांवावरोनि न कधीं करिजे परीक्षा,
लक्षांत ठेविं सखये ! मम ही सुशिक्षा. ॥ २१ ॥

शार्दूलवि०

याच्या पाहुनियां विलक्षण तपा पावोनि चित्तीं भया,
धाडी तैं युवती सुरेंद्र मुनिला रंभादि मोहावया;
डोळे घालिति, मंद हास्य करिती, त्या मेखला दाविती,
त्यांचे आंगिकभाव हे न अगदीं याच्यापुढें चालती. ॥ २२ ॥

शालिनी.

रुद्राक्षांची शोभते ज्यास माला, ज्यांच्यायोगें खाजवी तो मृगाला;
जेणें छेदी दर्भ ऐसा ययाचा, देखें सीते ! ऊजवा हस्त साचा. ॥२३॥
त्या हस्तानें एकल्यानें मुनी तो, आतां माझ्या सत्कृतीला करीतो;
डावा बाहू ऊर्ध्व ज्याचा सदाही, काष्ठाऐसा जाहला त्यास पाहीं. ॥२४॥

शार्दूलवि०

हा मौनी ह्मणुनी मम प्रणतिला अत्यादरें घ्यावया,
किंचिन्मस्तक डोलवूनि करुनी प्रत्युक्तिची सत्क्रिया;
गेलें जैं निघुनी विमान मधुनी व्योमांत एकीकडे,
तेव्हां लावि मुनी पुनश्च अपुल्या दृष्टीस सूर्याकडे. ॥ २५ ॥

आहे हा शरभंगनाम मुनिचा संशुद्ध गे आश्रम,
जेथें दीन जनास सौख्य मिळतें अद्यापि सर्वोत्तम;
ज्यानें अध्वरिं फार होम करुनी अग्नीस संतर्पिलें,
शेखीं आत्मतनूसही शुचिमनें अग्नीमधें होमिलें. ॥२६॥
पांथांच्या बहुला श्रमास हरिती देवोनियां सांवली,
क्षुद्बाधा हरितातितेविं विपुलीं जे आपुल्या सत्फलीं;
वृक्षांच्या असल्या गणां अतिथिचा सोंपून पूजाविधी,
सत्पुत्रास पितां तसा, त्यजि निजा देहा तपांचा निधी. ॥२७॥

भुजंगप्रयात.

दरीरूप ज्याचें असे तोंड थोर, निघे सर्वदा ज्यांतुनी शब्द घोर;
असे शृंगलग्ना महामेघराजी, जणूं टक्करा मारितां पंक या जी ॥२८॥
असे माखला या अशा चित्रकूटा, सखे! देख तूं जो असे उंच मोठा;
वृषाचें बहू साम्य साजे यया जी, निघेना यथा सोडुनी दृष्टि माझी॥२९॥

शार्दूलविक्रीडित.

वाहे निर्मळ आणि सुस्थित बहू पाणी जयेचें असे,
येथोंनी बहु दूर यास्तव लघू तो ओघ जीचा दिसे;
आहे ही तटिनी समीप गिरिच्या मंदाकिनीनामिका,
मोत्यांचा जणु हार हा पृथिविच्या कंठांत शोभे निका. ॥३०॥
येथें हा गिरिच्या शिरीं जिवलगे! देखें तमालद्रुम,
याचा पल्लव घेतला खुडुनि मी ज्या गंध ये उत्तम;
हे दैवहि! तई मनोहर असा कानावरी खोंविला,
ईषत्पांडु यवांकुरापरि तुझ्या वक्रीं बहूं शोभला. ॥ ३१ ॥
शिक्षेवांचुनि शांत जंतु असती जेथें स्वतां सत्तम,
पुष्पावांचुनि पादपांस नियमें येती फळें उत्तम;
ऐशा चित्तचमत्कृतीस करितो जेथील सीते! क्रम,
तो हा साधन सत्तपास वनिते! उद्दाम अत्र्याश्रम. ॥३२॥

गंगास्नान तशीं पवित्र कुसुमें हीं योग्य पूजाकर्मीं,
हें जाणोनि महासती सुरनदी आणी स्वकीयाश्रमीं;
प्रातःकाळिं उठोनियां सुविधिनें स्नानास संसाधिती,
सप्तर्षि स्वकरें सुवर्णकमलें तोडोनि आराधिती. ॥ ३३ ॥
ध्याताती हृदयीं परेश विमुळा वीरासनीं बैसुनीं,
जैसे शोभति योगि अत्रिमुनीच्या शाखीहि तैसे वनीं;
जे वेद्यासनिं बैसुनी विलसती आरूढ योग्यापरी,
एकांतीं तनुकंपशून्य अगदीं आहेत हे सुंदरी. ॥ ३४ ॥
पूर्वीं श्याम असा प्रसिद्ध पृथिवीमाजीं तुवां आर्चिला,
हस्ता जोडुनियां व्रतीं पतिशुभासाठीं बहु प्रार्थिला;
पाहे तो वट हा महाफलभरें सर्वांगिं वेंटाळला,
सद्रारुत्मतपद्मरागमणिंच्या राशीपरी शोभला. ॥ ३५ ॥
मुक्तायष्टिच इंद्रनीळमणिनीं शोभे जशी वेढिली,
किंवा शुभ्रसरोजपंक्ति खचिली इंदीवरांनीं भली;
श्वेता हंसतती जशी मिसळतां कादंबकांच्या गणीं,
वा कृष्णागरुमिश्र पत्ररचना भूची दिसे चान्दनी. ॥ ३६ ॥
छायेमाजिं दडोनि राहि तम जें तेणें जशी चंद्रिका,
रात्रीं वेगळि वेगळी दिसतसे ती पाहतां जेविं कां;
किंवा शारदमेघराजि गगनीं तीच्या स्वरंध्रांतुनी,
आकाश स्फुट कृष्णवर्ण दिसतें जैसें सखे ! लोचनीं. ॥ ३७ ॥
किंवा शुभ्र विभूतिनें शिवतनू जी कां दिसे पांढरी,
ती ही कृष्णभुजंगभूषणगणीं होते जशी साजरी;
तैसा जन्हुसुताप्रवाह दिसतो गे पांढरा शुभ्र हा,
त्याला हा यमुनौघ कृष्ण मिळुनी वाहे कसा तो पहा. ॥३८॥
जी कां सुंदर शुभ्रवर्ण विलसे गंगा जगत्पावनी,
कालिंदी बहु कृष्ण वर्णहि तशी विख्यात जी कां जनीं;

त्यांचें मेलन होउनी स्थिति दिसे जी भिन्नभिन्न स्थळीं,
ती हे देउनी दाखले विविध गे सुव्यक्त केली भळी. ॥ ३९ ॥
गंगा सूर्यसुता नद्या उभयतां यांच्या महासंगमीं,
स्नाना जे करितात ते शुचिमनें प्राणांचिया निर्गमीं;
जीवात्मैक्यविभावना न करितां मोक्षास जाती त्वरें,
त्यांचें मागुति या जगांत तनुला घेवोनि येणें सरे. ॥ ४० ॥
पाहे ही नगरी गुहाख्य अमुचा जो मित्र त्याची, प्रिये !
येथें मस्तकभूषणा त्यजुनियां बांधीं जटा मी स्वयें;
तेव्हां तो सुमती सुमंत्र रडुनी ऐसें मुखें बोलला,
कीं 'गे केकयकन्यके ! अजि तुझा इष्टार्थ आला फला!' ॥४१॥
ब्रम्ह्याचें सर मानसाख्य सखये ! विख्यात पृथ्वीवरी,
जेथें यक्षवधूगण प्रतिदिनीं पानीयकेली करी;
त्यापासोनि निघे पवित्र सरयूनामें नदी ही तशी,
अव्यक्तांतुनि बुद्धि जेविं निघते हें सांगताती ऋषी. ॥ ४२ ॥
यज्ञस्तंभ विशाल ह्या सरयुच्या तीरीं बहू शोभती,
साकेताजवळोनि निर्मळ जलें हीचीं पहा वाहती;
इक्ष्वाकुक्षितिपाळ हे अवभृथस्नाना सवान्तीं जळीं,
पूतात्मे करिती ह्मणोनिच अती संशुद्ध ती जाहली. ॥ ४३ ॥
हीच्या उत्तरकोशलेश पुलिनोत्संगीं सुखें खेळले,
तैसें पुष्कळ आणि निर्मळ पय प्राशोनियां पोसले;
या हेतूस्तव वाटतें मम मनीं, कीं, ही नदी निश्चयें,
त्यांची एकचि सर्वही मिळुनियां माता असे, हे प्रिये ! ॥ ४४ ॥
मातेच्या परि ही वियुक्तचि असें मान्यें नृपानें धुनी,
मी आलों वनवास भोगुनि असें ती मानसीं जाणुनी;
वातें शीत तरंगरूप कर जे त्यांनींच आलिंगिते,
जाणों ही मजला, सुधांशुवदने ! ऐसें मला भासतें ! ॥ ४५ ॥

संध्या रक्त जशी तशीं अवनिचीं मोठीं उडालीं रजें,
त्यांतें पाहुनि, वाटतें मम मनीं कीं संभ्रमें वायुजें;
नंदिग्रामिं महोत्सवें कळविला वृत्तांत माझा बरा,
ऐकोनी भरत त्वरें मजकडे येण्या निघाला खरा ! ॥ ४६ ॥
मारोनी खरदूषणादि रिपुंला येतां फिरोनी सखे !
रक्षूनी तुज लक्ष्मणें मम करीं जैसें दिलें कीं सुखें;
आलों तातकृता खरी करुनि मी आज्ञा तशी मागुती,
लक्ष्मी रक्षित केलि ती भरत हा देईल माझ्या हतीं ! ॥ ४७ ॥

## उद्‌ध्वस्त झालेली अयोध्या.

शार्दूलविक्रीडित.

एके वासरिं अर्धरात्रसमयीं वाड्यांत दिपावळी,
झाली निश्चल, आणि सर्व निजली होती जईं मंडळी;
जागा होउनि एकला कुशचि तें देखे नवी कामिनी
जी कां प्रोषितभर्तृकेपरि धरी वेषास खिन्ना मनीं. ॥ १ ॥
राज्यश्री उपभोगिती सुविपुला ज्याच्यासवें सज्जन,
तेजस्वी मघवाची जो जिणियले ज्यानें रिपूंचे गण;
त्याच्या येउनि ती पुढें 'जय असो ! राजा,' असें बोलुनी,
राहे तेथ उभी सुदीनवदना बद्धांजली होउनी. ॥ २ ॥
जैशी निर्मळ दर्पणांत शिरते छाया त्वरेनें तशी,
दारें बंद असोनिही गतिभरें गेहांत आली कशी ?
आश्चर्यें नरपाळ तो उठुनियां बैसोनि शय्येवर,
तेव्हां त्या वनितेप्रती वदतसे ऐसें धराधीश्वर. ॥ ३ ॥
'दारें बंद असोनि राजसदनीं आलीस कैशी बरें !
योगाचें बळ हें म्हणूं तरि तुझ्या अंगीं दिसेना खरें;

शैत्योपद्रव होउनी कमलिनी म्लाना दिसे जी वनीं,
तैशी तूं दिसतेस आर्त, म्हणुनी होशी न गे योगिनी.' ॥ ४ ॥
'कोणाची दयिता? वदें! कवण तूं आहेस गे कामिनी
येण्याचें इकडे कशास्तव तुवां संधारिलेंसे मनीं;
आम्ही राघव तों जितेंद्रिय असूं अस्मन्मनाची गती,
अन्यस्त्रीविषयीं पराङ्मुख सदा हें जाणिजे निश्चितीं.' ॥ ५ ॥
तेव्हां ती युवती कुशास वदली कीं 'जी पुरी संप्रती,
रामानें अपुल्यासवें सकळहीं नेली स्वलोकाप्रती;
त्या आहें अधिदेवता नगरिची मी भूपते! जाण गा,
सध्यां नाथ नसे मला म्हणुनि मी झालें अशी दुर्भगा! ॥ ६ ॥
पूर्वी या नगरीमधें नरपती झाले बहू चांगले,
राजन्वत्पदवी जिणें मिळविली बा याच हेतूमुळें,
ऐश्वर्यें अलकेस मोजित नसें जी मी तिची हे कुशा!
तूं सूर्यान्वयिं पूर्णशक्ति असतां झाली अशी दुर्दशा! ॥ ७ ॥

शालिनी.

सौधें, वाडे, मंदिरें, चंद्रशाला; प्राकारेंही नाश यांचा जहाला;
स्वर्गालागीं जेधवां नाथ गेला, तेव्हां बापा पावलें या दशेला. ॥८॥
जेव्हां भानू अस्तमानास जातो, झंझावायू उग्र जेव्हां वहातो;
उद्ध्वास्ता तैं हो जशी मेघराजी, नाथामागें जाहलें मी तशी जी.॥९॥

शार्दुलविक्रीडित.

पादीं नूपुर वाजती खणखणा ज्यांचे बहू भास्वर,
त्या जेथें अभिसारिका स्मरमदें बा चालती सत्वर;
उल्का तोंडिं धरोनि रात्रिसमयीं त्या राजमार्गी स्वतां,
भालू शब्द करीत शोधित मृगा बा आमिषां तत्वतां. ॥ १० ॥
नारी स्वीयकरीं करीत असतां वापीजलीं ताडन,
क्रीडेच्या समयीं उठे निनद तो भासे मृदंग-स्वन;

तेथें वन्यलुलाय संप्रति निजें शृंगें बळें ताडिती,
ते आक्रोश कराल थोर विहिरीमाजी सदा चालती. ॥ ११ ॥

गेले मोडुनि खांब यास्तव शिखी वृक्षीं बसूं लागले,
वाद्यें बंद म्हणोनि आवडिचिया नृत्या तिहीं सोडिलें,
त्यांचीं चित्रविचित्र सुंदर पिसें गेलीं गळूनी बरीं,
क्रीडेचेहि मयूर वन्य बनले भूमीपते! यापरी! ॥ १२ ॥

लाखेचा रस लावुनी स्वचरणां पूर्वील पौरस्त्रिया,
सोपानावरतीं मनोज्ञ गमना ठेवीत होत्या तया
आतां व्याघ्र तिथें वनीं मृगगणां मारोनियां भेसुर
रक्तानें भरल्या अशा निजपदां ते स्थापिती सत्वर. ॥ १३ ॥

हत्तीं आणिक हत्तिणी निजसुखें क्रीडा करीती जलीं,
देती खंडितकेसरें करिवरां तै हत्तिणी चांगलीं;
चित्रें यापरि थोर मत्त करिचीं आहेत भिंतीवरी,
त्यांच्या मस्तकिं रोंविती निजनखें क्रोधें खरे केसरी. ॥ १४ ॥

खांबाच्यावरि चित्रवर्ण पुतळ्या नानापरी शोभल्या,
त्यांचे रंग उडोनि धूसर अशा आतां दिसों लागल्या;
कांती सुंदर ज्या भुजंग अपुल्या त्यांचेवरी टाकिती,
कांचोळ्यापरि त्याचि तत्स्तनयुगा आच्छादिती संप्रती. ॥ १५ ॥

काळाच्या गतिनें नृपाळभवनीं गच्चावरीचे चुने,
काळे होउनियां तिथें उगवलीं नानापरीचीं तृणें;
मोत्यांचे सर जेविं तेविं धवला ज्योत्स्ना जरी त्यांवरी,
रात्रीची पडते, तथापि न दिसे पूर्वींपरी साजरी. ॥ १६ ॥

फांद्यांना लववोनि कोमल करें पूर्वी विलासी स्त्रिया,
होत्या नेत नवीं खुडोनि कुसुमें त्या प्रत्यहीं स्वालया;

आतां भिल्ल, किरात, वानरहि ते वेलींस मोडूनियां,
जाती दुष्ट निघूनि यास्तव नृपा ! उद्यान गेलें लया. ॥ १७ ॥
रात्रीं ज्यांमधुनी दिवे न दिसती अंधार भारी जिथें,
नारींचीं वदनें न दृष्टि पडती पूर्वींप्रमाणें जिथें;
जाळीं लागलिं थोर जेथ कृमिचीं, सौगंध्यशाली अतां,
चाले धूर न ज्यांमधून खिडक्या झाल्या अशा तत्वतां. ॥१८॥

भुजंगप्रयात.

नदीच्या तटीं वाढला वेतसांचा, जथा गंधही येइना ऊठण्यांचा;
दिसे वाळवंटीं न पूजाप्रकार, रितें तीर देखोनि मी खिन्न फार ॥१९॥

पृथ्वी.

कुशावति म्हणोनि जी तव पुरी, तिला संप्रती,
त्यजोनि गमना करी स्वकुलराजधानीप्रती;
तुझा जनक टाकुनी मनुजमूर्तिला सत्वरी,
स्वकीय तनु वैष्णवी नृपवरा ! जशी तो धरी. ॥ २० ॥

उपजाति.

ऐशा तिच्या ऐकुनि याचनेला, संतोषुनी भूप 'बरें' म्हणाला;
प्रसंन्न होवोनि तई स्वचित्तीं, अदृश्य झाली पुरदेवता ती. ॥ २१ ॥

# राजा सर टी. माधवराव.

हे लोकप्रसिद्ध, राजकार्यधुरंधर गृहस्थ तंजावर प्रांतांत कुंभकोणम् येथें इ. स. १८२८ ह्या वर्षी जन्मले. ह्यांच्या तीर्थरूपांचें नांव रंगराव. हे जातीचे देशस्थ ब्राह्मण. ह्यांचा विद्याभ्यास मद्रासच्या हायस्कुलांत झाला. हे फार विद्वान् व राजनीतिनिपुण असून ह्यांस फावल्या वेळीं मराठी कविता वाचण्याची आणि नवीन कविता करण्याचीही आवड होती असें दिसून येतें. ह्यांनीं अनेक स्फुट कविता केल्या आहेत, व त्या बहुतेक आर्या छंदांत आहेत. कविता साधी व सरळ असून ती नीति आणि उदात्त विचार यांनीं शृंगारिलेली आहे. देशपरत्वें, तींत भाषेसंबंधानें कित्येक स्थळीं दोष आढळतात. तथापि, दोषांपेक्षा गुणांचा भाग विशेष दिसून येतो. ही कविता, कवींचे चिरंजीव रा. रा. टी. रामचंद्रराव ह्यांनीं दोन भागांत छापिलेली उपलब्ध आहे. ह्या ग्रंथांत, ह्या कवींच्या ज्या वेंच्यांचा संग्रह केला आहे, त्यांतील एक दोन खेरीज करून बाकीचे वेंचे सदरहू दोन्ही भागांतून घेतले आहेत. हे थोर गृहस्थ त्रावणकोर इंदूर व बडोदें ह्या संस्थानांत प्रधानपदानें काम करून आणि राजे व प्रजा ह्या उभायतांचे धन्यवाद मिळवून इ. स. १८९१ च्या एप्रिल महिन्याच्या ४ थ्या तारखेस कुंभकोणम् येथें मरण पावले.

---

### प्रस्ताव.

आर्या.

कविवर मयूर यांच्या, आर्यामृतसेवनें चढे लहरी;
कवनविषयमद्यत्नें, सफल कराया दया करील हरी ॥ १ ॥
त्यासम न होति आर्या, हें तरि आहे मदीय लक्षांत;
गरुडासमान चिमणी, कशि गमन करील अंतरिक्षांत ॥ २ ॥
बुधजन सदय मनानें, माझ्या या वक्ष्यमाण कवनाला;
मानावें मधुप जसे, मानिति हो केवलाल्प सुमनाला ॥ ३ ॥

## स्फुट आर्या.

ईश्वरनियम असा कीं, समस्त सुखदुःख मिश्र भोगावें;
निर्दोष सौख्य नाहीं, सुखांशवृद्धि प्रयत्न योजावें ॥ ४ ॥
संसार पोषणाला, साधन लागेल तेंच दे देवा;
किंचित्तदधिक द्यावें, परासि कांहीं करावया सेवा ॥ ५ ॥
उत्तम मनुष्य तो कीं, स्वकीय परकीय दुःख सम मानी;
परहितवर्धन योजी, दीनजनाचा यथार्थ अभिमानी ॥ ६ ॥
इहलोकीं जी वसती, असती अत्यंत अल्प कालाची;
तजवीज लोक बहुधा, कांहो करिती हजार सालाची ॥ ७ ॥
असतां उन्नतपदवी, चालति तुझिया समोर सरदार;
जाशिल परंतु एकाचि, सोडुनि तूं मृत्युलोक घरदार ॥ ८ ॥
जरि निजमरणानंतर, वदतिल जन मित्र हा भला गेला;
तरि हें समजेल मला, जन्म सकलही फलास मीं नेला ॥ ९ ॥
सकल स्थिति मनुजाची, भेदतसे कालचक्र फिरतांना;
धनबलसुखादिविषयीं, लेश भरंवसा नसे असें माना ॥ १० ॥
आयुष्य कृत असुनी, क्षणक्षणीं तें लयास जात असे;
व्यर्थचि तद्व्यय करिती, पुष्कळ दिसती विचारशून्य असे ॥ ११ ॥
लेतो उत्तम वस्त्रें, हस्तकड्या हेमरत्नमयहार;
यापरि भूषित तनु ही, श्मशानवन्हींत भस्म होणार ॥ १२ ॥
इहलोक सोडितांना, नेतो निज पुण्यपापफलमात्र;
तेव्हां राहति मागें, निज बंधुपुत्रपौत्र प्रियपात्र ॥ १३ ॥

२

स्वमनीं वास करावें, देवा सन्मार्ग दाखवीत मला;
काया वाचा मनसा, पापें घडवूं नको महा-विमला ॥ १४ ॥
नसल्या संकट कांहीं, व्यंकटरमणास कोणही स्मरतो;
आधिव्याधित्रासित, मनुष्य निरुपाय होय तो भजतो ॥ १५ ॥

ज्यापरि उत्तम भाषण, करण्याला पाहिजेच बहुयुक्ती;
त्यापरि समयविशेषीं, मौनहि धरण्यास पाहिजे शक्ती ॥ १६ ॥
सर्प, व्याघ्र, लुटारू, स्वेच्छेनें वागणार भूपाल;
वर्जी वस्ती यांची, सुखरूप सदा क्रमावया काल ॥ १७ ॥
जेथें अनीति वाढे, नयधर्म बुडे तशांत काय मजा;
एतद्विध राष्ट्राला, प्रबळ क्षयरोग लागला समजा ॥ १८ ॥
स्मरणीं धर जनपाला, सत्वर तव सुख सरूनि जाईल;
जनपरिपालनकृत्यें, यांची सत्कीर्ति मात्र राहील ॥ १९ ॥
जिकडे कांचनलोभी, भूपति सचिवादी मंडळी असती;
तिकडील राजधानी, रक्तपितीव्याधिपीडिता दिसती ॥ २० ॥
कोणी नृपाल कर्णीं, यथार्थ हितचिंतकांस जो दूषी;
दारुण विषसर्पासम, दुष्टमती मंडळीस तो भूषी ॥ २१ ॥
ईश्वर-उदारहस्तें, पुष्कळ सुखसाधनें दिलीं असतां;
यांचें अलक्ष्य करुनी, दात्याला अप्रसन्न कां करितां ॥ २२ ॥
शास्त्राविरोध सुख जें, भोगुनि आपुली कृतज्ञता गावी;
सुख देउनि इतरांला, जगदीशाची कृपाहि साधावी ॥ २३ ॥

३

अपुल्याहुनि असताती, कैसे किति भाग्यहीन लोकांत;
हें समजुनि तृप्तमनें, सदाचि वंदा तुम्ही रमाकांत ॥ २४ ॥
समजे विचारयोगें, पापें घडती क्षणक्षणामाजीं;
जाणुनि निजभक्ताला, कृपाळुदेवा ! करा क्षमा माझी ॥२५॥
ज्याच्या हृदयीं नाहीं, परमेश्वरभक्ति आणि विश्वास;
वर्ततसे तो प्राणी, जैसा नसल्या लगाम अश्वास ॥ २६ ॥
फलपत्रपुष्प सर्वहि, अनेकरसरम्यरंगवासांचीं;
जन्मति एकया ठायीं, अद्भुत करणी जगन्निवासाची ॥२७॥

पंडितमहामतीला, वंदन करणें स्वधर्म जाणावा;
त्यांच्या सहाययोगें, विद्याज्ञानप्रकाश साधावा ॥ २८ ॥
वीरास मान द्यावा, युद्धीं जो सिद्ध जीव देण्यास;
समरीं उभाच राहे, न भीत तरवारलोहगोळ्यांस ॥ २९ ॥
परिमळ फुलास साजे, भूषण नारीस धैर्य वीरास;
सचिवास दीर्घदर्शन, सख्यास ममता, क्षमाहि राजास ॥३०॥
जन्मुनियां इहलोकीं, मनुष्यकर्तव्यधर्म जाणावा;
परहिंसा न करावी, परोपकारप्रयत्न साधावा ॥ ३१ ॥
निजमत अवलंबावें, इतर मतांवरि विरोध न करावा;
परहित वर्धन करुनी, परमात्म्याचा प्रसाद जोडावा ॥ ३२ ॥
ईश्वरभजन करावें, मनुष्य सारे स्वबंधु मानावे;
हें मत सत्पुरुषाचें, याच्यावरि सर्व चित्त लावावें ॥ ३३ ॥
मन निर्मळ राखावें, गीतेची नीति पूर्ण साधावी;
परहितउद्देशानें, दृढचित्तें दोषबुद्धि अवरावी ॥ ३४ ॥
धनबलयशजीवाचा, काय भरंवसा मनुष्य ! मानावा;
साधुनि निजधर्मातें, जगदीशाचा प्रसाद मागावा ॥ ३५ ॥
सारंग, भृंग, लक्ष्मी, पंकजपत्रावरील जलबिंदू;
सर्वहि समान चंचल, समजवितों मी तुझा खरा बंधू ॥३६॥
सर्वहि नश्वर समजा, समुद्र अटतील, शैल झिजतील;
सकल प्राणिहि मरतिल, गगनतळीं सूर्यचंद्र विझतील ॥३७॥
जी स्थिति विधिनें दिधली, मानुनि तिजला स्वधर्म पाळावा;
तृप्तमनें नांदावें, सत्कृत्य करूनि मान मिळवावा ॥ ३८ ॥
अंतःकरण जयाचें, विशुद्ध आहे तयास भय नाहीं;
वज्रकवचधारी तो, दूषणबाणहि न लागती कांहीं ॥ ३९ ॥
कानीं तुळशी दडपी, निजतनुही गोपिचंदनें मळवी;
ऐसा जो दंभ करी, यानें तो ज्ञानशून्यता कळवी ॥ ४० ॥

ईश्वर सहाय असल्या, विषही होतें समान पथ्यास;
नसल्या विषसम पथ्याहि, यद्यपि याचा असेल अभ्यास ॥४१॥
जलजश्रीजित-मुख तें, सुकतें जें अन्यदुःख पाहून;
विलसित परसुखयोगें, काय असे वर्णनीय याहून ॥ ४२ ॥
शशिमुख खरेंच तें कीं, ज्याला अवलोकितांच ताप हरी;
मृदु सरस भाषगानें, अनेक दुःखी जनांस शांत करी ॥४३॥
चंचल विशाल नयनें, आवडति कितिएक रसिक लोकांला;
उत्तम परंतु तों जीं, द्रवती पाहून अन्य दुःखाला ॥ ४४ ॥
याचक अनेक येतां, ज्यांची स्वभ्रूलता न वक्रा हो;
भूषण याच्यापेक्षां, सुंदर वदनास काय सांगा हो ॥ ४५ ॥
कर्णाहि उत्तम तो कीं, ऐकत नाहीं असत्य परनिंदा;
अप्रतिम हर्ष मानी, श्रवण करुनि तो सुशब्द 'गोविंदा' ॥४६॥
रमणीय आणि सुंदर, मानावें दानदक्ष हस्ताला;
ज्याणें संतत मिळती, उदरभरण साधनें दरिद्र्याला ॥४७॥
मानस उदार तें कीं, उपकारस्मृति सदैव राखील;
शांत स्वभाव राहुनि, अपकारस्मृति पुसूनि टाकील ॥ ४८ ॥
सुखदुःखभाग घेती, ऐशी भार्या पतिव्रता ज्याला;
संसारसागराला, सहज तराया प्रयास कां त्याला ॥ ४९ ॥
संसारसौख्य घ्यावें, तरि मन अवरूनि राग सोडावा;
सतत प्रीति करावी, परस्परांचा कुतर्क सोसावा ॥ ५० ॥
कोणी निजहित कथिल्या, स्वीकारावें प्रसन्न वदनानें;
द्यावें तयासि उत्तर, शांत मनानेंहि मधुर वचनानें ॥ ५१ ॥
विद्याधन जोडावें, अजरामर मी असेंचि चिंतून;
धर्माचरण करावें, सत्वर यम येतसेच लेखून ॥ ५२ ॥
उत्तम जिज्ञासेनें, तुम्ही पुसता यथार्थ सुख काय;
जाणा सुशील भार्या, विद्याधन, भक्ति, तृप्ति, दृढ काय ॥५३॥
इंद्रियभोग जयाला, फारचि आवडे तयास धिक्कार;
इंद्रिय सत्वर थकतें, मनुष्य उरतो अशक्त निःसार ॥ ५४ ॥

विषमय मानस असुनी, अधरापासून मधुर मधु गळतें;
तोच मनुष्य भयंकर, नागापेक्षां म्हणूनि मज कळतें ॥ ५५ ॥
परिमळ कस्तूरीचा, अपाप जैसा चहूंकडे पसरे;
तैसें स्वयेंचि पसरें, सौजन्यानें मिळेल जें यश रे ॥ ५६ ॥
खेळाचा बाळपणीं, मग तरुण वयांत कामिनीचाही;
तदुपरि कांचन याचा आग्रह असतोच, अन्यथा नाहीं ॥५७॥
गाईला तृण दिधलें, तरि ती बदला करीच दुग्धानें;
सर्पास दुग्ध दिधल्या, प्रतिक्रिया ती विषप्रदानानें ॥ ५८ ॥
उत्तम रत्नालाही, हेमाश्रय पाहिजेच झळकाया;
पंडित, वल्ली, तरुणी, यांसहि आश्रय अवश्य शोभाया ॥५९॥
हीनकुळीं जनन तरी, सुज्ञजनांचा करा न परिहास;
उद्भव यद्यपि चिखलीं, तरि मानिति सर्व लोक कमलास ॥६०॥
अतिसावधरीतीनें, वापर तूं सर्व आयुधें प्रखर;
वाक्पटु बहुमृदु जिव्हीं, यापरि नाहींच शस्त्र तीव्रतर ॥ ६१ ॥
जेथें अभिज्ञ राजा, समर्थ मंत्री सुशील अबलाही;
तेथें जन सुख पावुनि, नीतिन्यायास बाध लव नाहीं ॥ ६२ ॥
याच्या विरुद्ध जेथें, तेथें होतोच भंग धर्मांचा;
हतसुख जनशापानें, विशंक घडतो विनाश सर्वांचा ॥ ६३ ॥
जेथें विचार नाहीं, यश मिळतें दुष्ट मूर्ख कपट्यांस;
तेथें विशंक होइल, बहु कलह सरस्वतीस लक्ष्मीस ॥ ६४ ॥
सामर्थ्य, सत्य, आदिक, बहुगुणसंपन्न एक लक्षांत;
दुर्लभ मनुष्य ऐसे, सदैव राहोत राजलक्षांत ॥ ६५ ॥
अल्पमतीला दिधला, प्रबलाचि अधिकार या जनांमाजीं;
तरि तो दुर्बल पीडुनि, करील सर्व प्रजेसि नाराजी ॥ ६६ ॥
राजाश्रयांत असतां, समजा कीं राज्यवृक्षफल घ्यावें;
जरि आहे कल्पतरू, तरिही त्यातें समूळ नच खावें ॥ ६७ ॥

अतिशय परिचययोगें, समजा कीं मानहानि संभवती;
मलयाचल प्रदेशीं, चंदन तरुचींच इंधनें होतीं ॥ ६८ ॥
अत्यंत प्रबलासहि, समान शत्रू असेल भेटाया;
पाषाण जाहला तरि, आहे कीं वज्रशस्त्र भेदाया ॥६९॥
आश्रित दूरहि असतां, प्रेम उणें कां सुशील पुरुषाला;
यद्यपि अति दूर वसे, तरि विकसवितोच सूर्य कमलांला ॥७०॥
ग्रंथांपासुनि जाणा, निश्चय आहे अपार उपयोग;
त्यांच्या योगें घडतो, प्रिय विद्वज्जनसमूहसंयोग ॥ ७१ ॥
अवसरपठिता वाणी, साधी असली तरी बरी खुलती;
जशि रतिसमयीं रमणी, भूषणहीना सुखप्रदा होती ॥७२॥
मुढास मूढ जमती, स्वजातिगुण वर्णिती स्वभावांनीं;
आश्चर्य काय सांगा, गर्दभगाण्यास उंट वाखाणी ॥ ७३ ॥
वेश्यास्वरूप, भाषण, भूषण, वस्त्रें सुगंध पाहून;
बहु तरुण–पुरुष भुलती, जैसा मासा गळास लेखून ॥ ७४ ॥
असतां वस्तू हस्तीं, किंमत तीची उणीच मानवती;
सुंदर जरी निजपत्नी, तरि दिसति परांगनाच रूपवती ॥७५॥
विद्या, गायन, युवती, यांच्यापासून जो न घेच मजा;
ऐसें हृदय जयाचें, तो यति अथवा पशू असें समजा ॥७६॥
शरवृष्टि होत असतां गिरिसम निभतो प्रवीर धैर्यानें;
तोही परंतु हरतो, प्रियकर कांताकटाक्षबाणानें ॥ ७७ ॥
विद्या निज पुत्रांला, शिकवित नाहीं असाच जो बाप;
त्यांचा यथार्थ शत्रू, ऐसा तो मानवेल आपाप ॥ ७८ ॥
मानवमनोरथाला, विवेकपर सारथी न केल्यास;
कामक्रोधादिक हय, ओढुनि नेतील हो विनाशास ॥ ७९ ॥
पाहुनि मृगजल जैसें, धांवति हरिणें तृषेस शमवाया;
बहु जन भुलूनि तैसे, श्रम करिति अलभ्य सौख्य मिळवाया॥८०॥

## कावेरीवर्णन.

श्रीमत्कावेरीला, वंदाया कारणेंची आगमन,
करितों प्रणाम तिजला, लावुनि विश्वास भक्तिपूर्ण मन ॥१॥
गिरिसम मोठीं पापें, विघरति तिचिया पवित्र उदकानें;
जैसे बर्फसमुच्चय, अथवा नवनीत सूर्यकिरणानें ॥ २ ॥
तिचिया समागमानें, पृथिवी झाली विशेष रूपवती;
विलसित असतां दिसती, हिरव्या साडीसहीत पुष्पवती ॥३॥
जन्मुनि तिचिया तीरीं, गेलों बहु दूर देश देखाया;
तिचिया अनुग्रहानें, अनेक राजप्रसाद पावाया ॥ ४ ॥
धनयशइच्छा सारी, पुरवुनि सुखलाभ पूर्ण घेऊनी;
भेटाया पुण्यजला, स्वयेंचि आलें सवेग परतूनी ॥ ५ ॥
किति हो सत्वर गेलीं, बाल्यापासून अर्धशत वर्षें;
मित्रहि अनेक गेले, जे मज भेटति समोर बहु हर्षें ॥ ६ ॥
दोघे बंधू होते, तेही झाले प्रविष्ट परलोक;
सर्वत्र रिक्त दिसतें, कोण हरी हा अपार निजशोक ॥ ७ ॥
स्मरती मजला नारी, यतिही भुलतील जीस पाहून;
तीची चंद्रमुखश्री, हरिली वैधव्य दुःख साहून ॥ ८ ॥
मन बहु खिन्नचि झालें, परंतु तो प्रबल दैवसंकल्प;
आहे तें सुख घ्यावें, समजुनि आयुष्य राहिलें स्वल्प ॥ ९ ॥
प्रार्थीं मी इतुकें कीं, कावेरी तूं स्वदेश रक्षावा;
आश्रित जन पाळावा, आणिक मजला स्वदास मानावा ॥१०॥

## गृहिणीचे अलंकार.

सद्वर्तन, पतिनिष्ठा, सस्मितवदन स्वकांतहितमनन;
नियमितधनसंतुष्टा, सलील वाणी सदैव शांत मन ॥ १ ॥
कोमलता, भूतदया, आदर, लज्जा, सुगंध, सत्कार;
वाचन, गायन, कांहीं निर्धन बंधूजनांस उपकार ॥ २ ॥
बालकलालनपालन, निर्मलता, जागरूक, गृहभरणें;
ज्ञानी सारे म्हणती, समजा कीं हीच अंगनाभरणें ॥ ३ ॥

# भास्कर दामोदर पाळंदे.

हे निबंधकार आणि कवि श्रीक्षेत्र वाईजवळ कृष्णातीरी मेणवली म्हणून एक गांव आहे, तेथें इ.स.१८३२ ह्या वर्षी जन्मले. हे जातीचे कोकणस्थ हिरण्यकेशी ब्राह्मण. ह्यांचे वडील वे. मू. दामोदर भट पाळंदे हे मोठे विद्वान् वैदिक ब्राह्मण असत. त्यांची फार गरीबी होती. मेणवलीस चरितार्थ चालेना, म्हणून ते तेथून ठाण्यास येऊन राहिले. तेव्हां प्रस्तुत कवि ३ वर्षांचे होते. ह्याच सुमारास दुर्दैवानें ह्यांची मातोश्री मरण पावली; आणि पुढें वडिलांनीं दुसरें लग्न केलें. तथापि ते ह्यांस जीवापलीकडे जपत असत. त्यांनीं ह्यांस कांहीं कमी पडूं दिलें नाहीं. ह्यांचें शिक्षण अनुक्रमें ठाणें व मुंबई येथें 'एलफिन्स्टन' पाठशाळेंत झालें. हे विद्याभ्यास मोठ्या आस्थेनें करीत, त्यामुळें ह्यांचे गुरु ह्यांजवर फार प्रेम करीत असत. ह्यांच्या वेळेस शिक्षणाचें मानपत्र पदव्यांनीं मोजलें जात नव्हतें. तथापि, एम्. ए. पदवीधर इतकी ह्यांनीं आपली योग्यता प्रगट केली. अभ्यास पुरा झाल्यानंतर ह्यांनीं सरकारी नोकरी पतकरिली, आणि आपल्या अंगच्या गुणांनीं अत्यंत गरीब स्थितींतून चढत चढत हे शेवटीं स्मॉलकॉजकोर्टांतील न्यायाधीशाच्या पदास पोहोंचले. हे उत्तम लेखक असत. ह्यांनीं विविध विषयांवर अनेक निबंध लिहिले आहेत. कै.वा. परशुरामपंत तात्या गोडबोलेकृत वृत्तदर्पणांत निरनिराळ्या वृत्तांचीं उदाहरणें देण्यासाठीं ह्यांच्या कांहीं कविता घेतल्या आहेत, असें शोधाअंतीं समजतें. तसेंच ह्यांनीं विक्रमोर्वशीय नाटकाचें गद्यपद्यात्मक भाषांतर व गीतेचें ओवीबद्ध भाषांतर आणि 'रत्नमाला' नांवाचा एक सर्वोत्कृष्ट ईश्वरभक्तिपर पद्यग्रंथ लिहिला आहे. त्यांतील पद्यें गोड आणि भक्तिरसानें ओथंबलेलीं आहेत; व तीं बहुतेक ह्या ग्रंथांत घेतलीं आहेत. अर्वाचीन कविमालिकेंत आपल्या कवित्वाचा उपयोग केवळ ईश्वरभजनाकडे करणारे ह्यांसारखे कवि, आणि रत्नमाले'सारखीं भाविकजनप्रिय काव्यें क्वचितच आढळतात. हा कालमहिमा होय! असे उद्गार काढिल्यावाचून राहवत नाहीं. असो. हे स्तोत्रकार कवि पुणें येथें इ. सन १८७४ ह्या वर्षी दिसेंबर महिन्याच्या १८ व्या तारखेस परलोकवासी झाले.

## परमेश्वरप्रार्थना.

( शार्दूलवि० )

पावो हा प्रणिपात त्या प्रभुवरा जो हेतु विश्वोदया,
ज्यापाशीं चिरकाळ वास करिती ऐश्वर्य आणि दया;
ज्ञानी, नित्यसुखी, अनादिलय, तो स्वामी हरो हृत्तमा,
तोडो हा भवपाश आणि सकळां देवो सुखा उत्तमा ! ॥ १ ॥

( अनुष्टुप् )

सच्चिदानंद-मूर्ती जो करुणाकंद ईश्वर,
संसारबंध तोडाया त्यास मी मंद, वंदितों ॥ २ ॥

( दिंडी )

कृपासागर तूं अससि जगन्नाथा ! नम्र करितों मी चरणिं तुझ्या माथां;
असे पापी, मी पतित, दुराचारी; तूंचि होउनि बा सदय मला तारीं॥३॥

---

## अष्टपदी.

( ललित लवंग लता० या अष्टपदीचे चालीवर )

हरिन तहान सदा परमेश्वरपादकमलमधु-पानें ॥
त्यजुनि मधुरमकरंद कसें जल-पान किजे मधुपानें ! ॥
पळविन भवाहिम नाम धुपानें ॥
मिळविन मग चिर शांति सुखाप्रति, तदितर कामधुपानें ॥ध्रु०॥
लेइन चरणसरोवर-समुदित सुंदरनख-रुचि मुक्ता,
न इतर भूषण रुचिर गमे मज अस्थिर-सुख-रुचि-मुक्ता ॥१॥
जो शरणागत-कल्पतरू तो त्रिभुवनपति गवसावा,
पद सहकार तरूवर मम मन कोकिलविहग वसावा ॥ २ ॥
यदमलकीर्ति दिगंत मुदित करि नतजनतावन-वासा,
मिळवुने तच्चरणाश्रय चुकविन भवजनिता वनवासा ॥ ३ ॥

अनुदिन गाइन भगवदमलयश जें सहज निजपदा ने,
फळ न मिळेल तसें कितिहि करूनि दुःसह तप, जप, दानें ॥४॥
निशिदिनिं पाहिन भगवंताचें चरणकमल नयनांहीं,
इतर विलोकुनि विफल, जसें बहुदान, जरि विनय नाहीं ॥५॥
विषयरसासि विरसकर निर्मल मधुर विपुल रस नामीं,
पिउनि सतत भवभयहर तो रस करिन सफल रसना मीं ॥६॥
पळहि न सोडिन पदयुग जें हरि पतितनमज्जन-भीतें,
तारक नाव कशी त्यजिजे तरि जलधि निमज्जनभीतें ? ॥७॥
सुखकर मजला विश्वपतीचें पदरज नच वसुधा ही,
तच्चरण-कमल-मकरंदासम देइल न चव सुधाही ॥ ८ ॥ ४ ॥

---

## पदें.

( १ )

प्रभु मज छंद तुझाचि असावा ॥ ध्रु० ॥
छंद असावा सतत तुझा, प्रभु, विसर कधींहि नसावा ॥ प्रभु० ॥
दीनदयाळा तुजविण मजला नाहीं अन्य विसावा ॥ प्रभु० ॥
मंदमती, प्रभु, तव करुणेच्या नौकेमाजिं बसावा ॥ प्रभु० ॥
त्वपद जेणें, प्रभु, मज साधे तो सन्मार्ग दिसावा ॥ प्रभु० ॥
दास विनवितो, प्रभु, भवपंकीं प्राणी हा न फसावा ॥प्रभु०॥५॥

( २ )

पतितहि हा तव दास तरावा ॥ ध्रु० ॥
दास तरावा भवजलधि सुखें, भीति त्रास नुरावा ॥ पतित० ॥
दे प्रभु, मजला वर ऐसा कीं जेणें ताप सरावा ॥ पतित० ॥
थोर तुझ्यासम कोण असे ज्या दीनें 'आ' पसरावा ॥पतित०॥
कोण दुजा, प्रभु, विनवुन ज्याला, दुःखाब्धी उतरावा ॥पतित०॥
दास विनवितो अनुदिन देवा, माझा लोभ धरावा ॥पतित० ॥६॥

( ३ )

झडकरि हा भवताप शमावा ॥ ध्रु० ॥
दीनसख्या तव चरणीं माझा मस्तक नित्य नमावा ॥ झडक० ॥
चित्तचकोर त्वत्पदचंद्रीं देवा अनिश रमावा ॥ झडक० ॥
तव करुणेचा जनसौख्यास्तव सुंदर मेघ जमावा ॥ झडक० ॥
तव यश लिहितां न कधीं माझा देवा हात दमावा ॥ झडक० ॥
दास तुझा मी विनवितसे कीं भवदुःखाग्नि निमावा ॥ झडक० ॥ ७ ॥

( ४ )

अनलस मी तुज नित्य भजावें ॥ ध्रु० ॥
नित्य भजावें नित्य नमावें नित्य शरण तुज जावें ॥ अनलस० ॥
तव पदकमलीं अलिसम दीनें आनंदांत निजावें ॥ अनलस० ॥
नश्वर येथें सौख्य सकळही हें पुरतें समजावें ॥ अनलस० ॥
नित्यसुखाचा लाभ तव पदीं सत्वर हें उमजावें ॥ अनलस० ॥
भक्तिलतेचें देवा माझ्या चित्तीं बीज रुजावें ॥ अनलस० ॥ ८ ॥

( ५ )

प्रभुराया पायीं ठाव मिळावा ॥ ध्रु० ॥
शीघ्र तव भयें षड्रिपुमेळा देवा दूर पळावा ॥ प्रभुराया० ॥
दुष्ट कृतींनीं न कधीं देवा माझा हात मळावा ॥ प्रभुराया० ॥
नश्वर ऐहिक संपत्तीचा सर्वहि गर्व गळावा ॥ प्रभुराया० ॥
संशयपटलें निरसुन मजला सत्पथ शीघ्र कळावा ॥ प्रभुराया० ॥
दास विनवितो सतत मजकडे करुणामेघ वळावा ॥ प्रभुराया० ॥ ९ ॥

( ६ )

प्रभु मज सत्सहवास घडावा ॥ ध्रु० ॥
तव पद जेणें अंतरतें तो बुद्धिकलंक झडावा ॥ प्रभु मज० ॥
संशय निरसुन नित्य तव पदीं देवा भाव जडावा ॥ प्रभु मज० ॥
काममदादिक रिपुकटकांतुन हा नर पार पडावा ॥ प्रभु मज० ॥

तव भजनाच्या आनंदसरीं देवा दीन बुडावा ॥ प्रभु मज० ॥
तव चरणांच्या सेवेमध्यें दास सदैव गढावा ॥ प्रभु मज० ॥ १० ॥

( ७ )

प्रभुराया थोर तुझी चतुराई ॥ ध्रु० ॥
अद्भुत केली सृष्टि जगाची काय जणूं सुखराई ॥ प्रभुराया० ॥
काय फिरस्त्या जीवांकरितां केली रम्य रसाई ॥ प्रभुराया० ॥
तव कृति दिसतां स्वकृती भासे अद्रिपुढें लघु राई ॥ प्रभुराया० ॥
तव करुणेचा होइल कैसा देवा नर उतराई ॥ प्रभुराया० ॥
दास विनवितो तव मदभजनीं न घडो, प्रभु कुचराई. ॥प्रभु०॥११॥

( ८ )

प्रभुविण संकट कोण निवारी ॥ ध्रु० ॥
दीनसखा तरि कोण असा कीं दुःख हरी भय वारी ? ॥ प्रभु० ॥
संकटसमयीं शरण रिघावें कोण असा कैवारी ? ॥ प्रभुविण० ॥
कोण असा कीं षड्रिपु यांची हटविल थोर सवारी ? ॥ प्रभु० ॥
व्यथित जिवांना कोण सदय तो देइल शांतिमवारी? ॥ प्रभु० ॥
दास विनवितो मजवरि देवा सोडि कृपेचें वारी ॥ प्रभु० ॥ १२ ॥

( ९ )

प्रभु मज उद्धर दीन जनाला ॥ ध्रु० ॥
मंदमती मी देवा करितों दीन तुझ्या स्तवनाला ॥ प्रभु मज० ॥
दीनदयाळा प्रभु जाळावें माझ्या पाप-वनाला ॥ प्रभु मज० ॥
भवताप हरी सत्वर जो, त्या सोडि कृपापवनाला ॥ प्रभु मज० ॥
कोण तुझ्याविण करिल दयाळा दीनाच्या अवनाला ॥ प्रभु० ॥
अर्पितसें मी पद्यावलि ही प्रभु तुज सुखसदनाला ॥ प्रभु० ॥१३॥

(१०)

सतत तुझें प्रभु मीं यश गावें, तव भजनीं रंगावें ॥ ध्रु० ॥
त्वदितरलोभें प्रभु नच माझें चित्त कधीं जंगावें ॥ सतत० ॥

न घडे प्रभु मज जरि तव सेवा तरि कां व्यर्थ जगावें ! ॥सत०॥
त्वत्प्रेमामृत याचितसें मी काय इतर मागावें ? ॥ सतत तुझें० ॥
घनमकरंदीं तव पदकमलीं मनभृंगें गुंगावें ॥ सतत तुझें० ॥
दास विनवितो दीनसख्या तुज, मद्घनगा भंगावें ॥सतत०॥१४॥

( साक्या. )

देवा अससी सर्वकाळ तूं माझा चित्तविसावा,
वांछितसें मी निशिदिनिं हें कीं तव मुखचंद्र दिसावा ॥ १ ॥
तव करुणेनें देवा माझा बुद्धिभ्रम निरसावा,
प्रभु तुजवांचुनि मज इतराचा छंद कधींही नसावा ॥ २ ॥
देवा आहे मंदमती मी नकळे मजला कांहीं,
अज्ञानतमीं भ्रमतों श्रमतों बहुविध मी शंकांहीं ॥ ३ ॥
निर्दोष करी चक्षू माझे सुज्ञानशलाकांहीं,
करिशिल करुणा तर मग उरतिल संशयपटलें कांहीं ? ॥ ४ ॥
रविशशिभूषित नक्षत्रांच्या केल्या कल्पित माला,
त्या मी घालूं तुजविण देवा कोणा पूज्यतमाला ? ॥ ५ ॥
वाहुन त्यांतें प्रभो तुला, मी चुकविन भवभ्रमाला,
भजतां तुजला कृपाच करिशिल काय उणें मग माला ! ॥६॥
अपराध करूं क्षणोक्षणीं प्रभु त्यांची गणती नाहीं,
काय करावें क्षमा न करिशिल तरि मग या दीनांहीं ! ॥ ७ ॥
सदया तूं नच निंद्य अक्षरें वदसी कधीं 'न' 'ना' हीं,
यास्तव तुजला छळितों देवा आम्हीं स्वयाच नाहीं ॥ ८ ॥
तुझ्या कृपेनें देवा करिती मेघ विपुल वृष्टीतें,
औदार्यच कीं मेघमिषानें गोचर जनदृष्टीतें ॥ ९ ॥
सौंदर्यहि आच्छादित असतां होय बहुत कष्टी तें,
तेजःपुंज सुगोलान्वित नभ होउनि दे तुष्टीतें ॥ १० ॥

चुकलों बहु तरि देवा माझा नच अव्हेर करावा,
क्षमा करावी दीनवत्सला चित्तीं लोभ धरावा ॥ ११ ॥
अज्ञानोत्थित माझ्या मतिचा प्रभु अंधार हरावा,
दया करावी ऐशी स्वामी कीं हा पतित तरावा ॥ १२ ॥
तुझेचि ह्मणवुनि आम्हीं जोडूं देवा प्रीतिज नातें,
पालनपोषण करिसी मग कां न जडे प्रीति जनांतें ! ॥ १३ ॥
सुखार्थ जें जें ज्यास असावें देसी प्रभो जनां तें,
क्षुधितास जसें यथेच्छ द्यावें सक्षिप्रभोजनातें ॥ १४ ॥
थोर पराक्रम थोर तुझें यश थोर दया देवाजी,
तुजपाशीं मीं नच मागें गज न म्हणे कीं दे वाजी ॥ १५ ॥
इच्छिसि तरि दे ऐहिक सुख मज तिळही नच दे वा जी,
नित्य सुखप्रद दे स्थिति पायीं हे सदया देवाजी ! ॥ १६ ॥
पतित परंतु पदीं पडतां प्रभु थोर करिसि घनसाकी,
सदय सलोभ सदा सकळांसहि कीं मज विदित न साकी ॥१७॥
मधुर मधासम ती मजला मत जीस ह्मणति जन साकी,
अर्पितसें तुज मधुर तिचा रस यासि असे मनसाकी! ॥१८॥१५॥

( आर्या. )

विश्वातें करिसी जो, त्या सदया ईश्वरा नमीं तूंतें;
द्यावें ज्ञान मला प्रभु, जेणें विसरेन मी न पायांतें ॥ १ ॥
अत्यंत दुर्बळाला, सांभाळावें मला परवशाला;
राहील कृपा मजवर, नित्य अशा दे प्रभो भरंवशाला ॥ २ ॥
कफवातपित्तदोषीं, गांजून क्षीण देह हा केला;
वाटे क्षणोक्षणीं मज, कीं मारी काळ असह हांकेला ! ॥ ३ ॥
केलें व्याकुल मनही, कामक्रोधादिकीं नव शरांनीं;
करिती शरप्रहारें, व्याध मृगाला जसे स्ववशरानीं ॥ ४ ॥

देहीं संतप्त, तसा संत्रस्त मनीं, पहा बहुत झालों;
प्रज्वल अग्नीमध्यें वाटे मी सांपडून हुत झालों ॥ ५ ॥
शमविल अशा प्रसंगीं कोण दुजा मित्रराय दाहातें;
देवा तूंच सदय हो प्रार्थी तुज दीन सर्वदा हातें ॥ ६ ॥
धरिलें हतभाग्याला भयदु:खादि प्रचंड मगरांनीं;
सुटतां त्यांतुन गांठिति मददंभव्याघ्र त्यास मग रानीं ॥ ७ ॥
दुर्वासना फणींचा मज भोंतीं मेळ थोरला जमला;
निज दुर्दशेसि पाहुनि देवा वाटे अपार लाज मला ॥ ८ ॥
असतां प्रभू तूं माझा स्वामी, जो पाळितोस जगताला;
न गणींच संकटाला भावी जें त्यास बा अजगताला ॥ ९ ॥
धरिली आस कृपेची पुरवावी दीनबंधु सत्वर ती;
दे साक्षी जग सारें प्रभु होय तुझी अपार सत्वरती ॥ १० ॥
नित्य सुखप्राप्तीस्तव अनुदिन मीं याचितों वदान्यातें;
फल काय दीनवाणें प्रार्थून उगाच सर्वदाऽन्यातें ! ॥ ११ ॥
दोही अजागलातें होय निरर्थक न कीं इजा त्यातें;
धान्याविरहित कितिही फिरवुन कीं पीठ येइ जात्यातें ॥१२॥
ऐहिक वस्तूंनीं प्रभु, तृप्ती नाहीं मला असारांनीं,
तव चरणारामीं मज दे स्थिति, ठेवूं नको असा रानीं ॥१३॥
न कधींहि चित्त माझें, अस्थिर सौख्यास पाहुनि वळावें
दुर्वासनांमुळें जें गढुळ असे तें फिरून निवळावें ॥ १४ ॥
केली बहुत कृपा जी, हे देवा दीनबंधु, मजवरती;
तेणें निभावलों मी, आणि निभावेन राहिल जंवर ती ॥ १५ ॥
त्वत्करुणेवांचुन मी देवा क्षण एकही न राहावें;
साह्य तुझेंच समर्था ज्ञानवलीं पंगु त्या नरा हावें. ॥ १६ ॥
प्राकृतभाषेमध्यें आर्या ह्मणती जिला जुनाट कवी;
गीति असून खरी ती संस्कृतछंदोविदा जना ठकवी. ॥ १७ ॥

तव यश कथनीं जरि मत आर्या हें नांव युक्त कां नाहीं;
त्वद्दासकृत स्तुतिरस जन सर्व पिवोत मुक्त कानांहीं ॥ १८ ॥

(भुजंगप्रयात.)

जगत्पाळ चित्तांत माझ्या वसावा, दयालेभ त्याचा सदाही असावा;
न तत्सेवनीं जीव माझा चुकावा, कधींही न तो नित्यसौख्या मुकावा ॥ १ ॥
दयासिंधु मीं नित्य तूतें स्मरावें, तुझ्या पादपद्मांस चित्तीं धरावें;
पुढें वासनाभृंग तेथें जमावे, कधींही न अन्यस्थलीं ते रमावे ॥ २ ॥
प्रभो, बाल अज्ञान होतों मुका मीं, असे सर्वही अंग माझें निकामीं,
अहोरात्र होई बहु मीं भुकेला, तशा संकटीं तूंच सांभाळ केला ॥ ३ ॥
पुढें, तूं दिली शक्ति देवा क्रमानें, तशी बुद्धि वाणी दिली त्याच मानें;
करूं लागलों मी स्वतां उद्यमातें, तरी साह्य देवा तुझें सर्व मातें ॥ ४ ॥
कृपेनें तुझ्या विश्वविस्तार सारा, जनाच्याच सौख्यार्थ केला पसारा;
न देशी जरी इष्ट तूं विश्वपाळा, तरी प्रार्थिजे अन्य कोणा कृपाळा ॥ ५ ॥
कशाचेंहि सादृश्य ज्याला पटेना, कधीं थोर ऐश्वर्य ज्याचें घटेना;
जनप्रीति ज्याची कधींही सरेना, सदा सेवितां त्यास पीडा उरेना ॥ ६ ॥
शशी सूर्य हे नित्य आज्ञेंत ज्याच्या, पदाला सदा मीं नमीं त्या अजाच्या ;
हरो ताप माझा, जळो पापराशी, नसे इष्टदाता दुजा या नराशीं ॥ ७ ॥
अह्मांला सुखानें भवाब्धी तराया, कृपेची तुझ्या नाव दे देवराया;
नसे भंगभीती अशी अन्य नाहीं, न ती प्राप्त होतां बुडावें जनांहीं ॥ ८ ॥

(शिखरिणी.)

दयासिंधो देवा, अनुपम तुझी होय करणी,
न साधे कोणाही रुचिर असली सृष्टिसरणी;
कशी केली नेणों अमितसुखभांडार धरणी,
दिली वाटे आह्मां प्रभु, तदुपभोगास वरणी ॥ १ ॥
अनाथाच्या नाथा, कृपण नसशी तूं वितरणीं,
तरी द्यावी मातें स्थिति सतत देवा स्वचरणीं;
असें पापी मोठा ह्मणुन न पडोंदे विसरणीं,
झटो वाचा माझी अनिश तव कीर्तिप्रसरणीं ॥ २ ॥

उणें वाटे जें जें कर सकळ त्याची पुरवणी,
असे ही दीनाची सतत तुजपाशीं विनवणी;
न होवो विश्वेशा भवजलधिमध्यें बुडवणी,
सदा होवो देवा तव अवकृपेची चुकवणी ॥ ३ ॥
बसावें गुंजावें, प्रभु तव पदाब्जीं भ्रमरसें,
हंसावें डोलावें मग अमित सौख्यें अमरसें;
मधा प्यावें त्याच्या अनिश अमृताशीं सम रसें,
सुधा तीही वाटे विरसचि अशा उत्तम रसें ॥ ४ ॥
दयामेघा देवा, द्रवसि तर संताप शमती,
कराया वृष्टीतें प्रभु तुज असे काय कमती;
प्रभो विश्वाधारा, जरि पतित मी मंद कुमती,
तरी जाणें त्यांतें, फळसि तुज जे दीन नमती ॥ ५ ॥
नृलोकीं जे मोहें क्षणिक सुखभोगांत रमती,
सुखाची ज्यां वाटे नच इतर सीमा परम ती;
धनादिप्राप्तीच्या क्षणभर न यत्नीं विरमती,
अशा मुढां द्यावी स्वपदभजनीं सुस्थिर मती ॥ ६ ॥
तुझ्या ऐश्वर्याची प्रभु तुजविना होय न मिती,
जगद्वंद्या नाहीं नवल नर हे पाय नमिती;
अनंत ब्रह्मांडें अनिश न शिरें काय नमिती?
न ज्या जन्मान्ताची लिखित युगवर्षायनमिती ॥ ७ ॥
तुझ्या सामर्थ्याचें मनन करितां मान सरती,
कळे गर्विष्ठांतें स्वधनबलसीमा न सरती;
तुझे पायीं देवा अनुदिन असो मानसरती,
जशी कीं हंसांतें अभिमत असे मानसरती ॥ ८ ॥

(पृथ्वी.)

प्रभो प्रणतवत्सला! बहुत पातकी दीन मी,
निराश्रित अजाणता तुज सदैव चित्तीं नमीं;
चुकें तर पदोपदीं, पण न भीं नसें घाबरा,
क्षमाच करिशील तूं भरंवसा मला हा बरा ॥ १ ॥

अगाध महिमा तुझा बुधहि गावया नेणती,
यथामति वदावया मजाचि लाज ती कोणती !
पिईन परमेश्वरा विमलकीर्तिगानामृता,
भिईन न कदापि मीं मग पुढें जित्या वा मृता ॥ २ ॥

सुखास्तवच आमच्या अति अपूर्व केली धरा,
कमी किमपिही नसे जिजमधें यशःश्रीधरा;
प्रशस्त पडली, सुखा विपुल देत आह्मांस ती,
धरून हृदयीं जशी प्रियकरां स्वबालां सती ॥ ३ ॥

तिच्यांत अति सुंदर प्रभु, मणी बहू शोभती,
सुवर्णरजतादि ते सकळ धातुही लाभती;
असोत पण ते, सदा उदक–अन्न ती देतसे,
अपार उपकार हा, नच तिचा, तुझा होतसे ॥ ४ ॥
असंख्य दिसती नभीं रुचिर गोल जे प्रत्यहीं,
तुझें यश कथावया उदित दैवतें सत्य हीं !
दिलीस गति ज्यांस जी सतत तीच संभाळिती,
सुबोध करण्यास त्यां, स्वनियमां न जे पाळिती ॥ ५ ॥
तुझी कृति दिसावया, रवि तमास उच्छेदितो,
स्वकीय किरणामृतें सकल विश्व आल्हादितो;
अशेष तरु, जीव, यां भयद शीत तें नाशितो,
तुझ्या प्रभु, कृपेंमुळें सतत त्यांस तो पोशितो ॥ ६ ॥
शशी विमलकांति जो गगनमंडला भूषितो,
अदृश्य असतां रवी पथिक यांस संतोषितो;
पहा, प्रतिदिनीं कसा क्षयविवर्धना भोगतो,
प्रभो ! तुजविना नसे किमपि, नित्य हें सांगतो ॥ ७ ॥
समुद्र, सरिता, गिरी, तरु, जित्रांस तूं निर्मिले,
विचित्र रचना तुझी बुधहि वर्णितां शर्मिले;

अनादि सकळज्ञ जो मुदित नित्य त्या मी नमीं,
असो प्रभो दयार्णवीं पतित एक हा मीन मी ॥ ८ ॥

(प्रमाणिका.)

जगत्पते ? दयाघना ? करूं नको विडंबना !
करूनि दास आपला, भवाब्धि पार ने मला ॥ १ ॥

(मणिबंध)

मंदमती मी काय करूं ? हा भवसिंधु केविं तरूं !
तारक व्हावें बा पतिता, निर्मिसि जो तूं या जगता ॥२॥

(चंपकमाला.)

गांजिति मातें षड्रिपु भारी, सत्वर त्यांतें ईश निवारी;
पाहि दयाळा प्रेमकटाक्षीं, दीन असे मी तूं मज रक्षी ॥ ३ ॥

(शालिनी.)

वंदा वंदा ईशपादारविंदा, सेवा सेवा सच्चिदानंदकंदा;
तोडा तोडा वासना लाज तोडा, जोडा जोडा शाश्वतालाचि जोडा॥४॥

(इंद्रवज्रा.)

देवा तुझ्या मी नमितों पदातें, जें वारितें सर्वहि आपदांतें;
तारी मला दीन सख्या अनाथा, ठेवी तुझ्या सन्निध विश्वनाथा ॥ ५ ॥

(उपजाति.)

वंदून भावें परमेश्वराला, भवाब्धिला लंघिन दुस्तराला;
विश्वेश होतां अनुकूल मातें, न कीं निवारील भवभ्रमातें ॥६॥

(तोटक.)

करुणाकर दीनसख्या सदया, जग सर्वहि आणिसि जो उदया;
भवताप हरी प्रभु सौख्यसरा, सुखदायक मित्र नसे दुसरा ॥ ७ ॥

(भुजंगप्रयात.)

मना तूं धरी ईशपादारविंदा, रहा तृप्त सेवून त्याच्या मरंदा;
नकोरे भुलूं ऐहिका या सुखाला, सुधा सांडुनी लुब्ध कां तूं विखाला॥८॥

(हरिणीप्लुता.)

प्रभु केविं तरूं भवसागरा, फिरविती विषयानिल गर्गरा;
भगवन्! करुणाकर कोमला, अभयदायक अन्य नसे मला॥९॥

( वंशस्थ. )

पळोपळीं मी बहु पातकें करीं, तथापि त्याची प्रभु तूं क्षमा करीं;
दयाघना मी अतिदीन लेंकरूं, न तारिसी तूं तरि काय मी करूं ॥ १० ॥

( इंद्रवंशा. )

स्वेच्छाप्रभावें जगतासि निर्मिसी, स्वेच्छेंच अंतीं प्रभु त्यासि मोडिसी;
दुर्ज्ञेय आहे भगवन् तुझी कृती, वर्णू तिला बा मतिमंद मी किती ॥ ११ ॥

( प्रहर्षणीय. )

पावावें मज जगदीश सौख्यसिंधू, तारावें मज पतितास दीनबंधू;
ठेवावें पदकमलीं मला अनाथा, पाजावें अमृत सदैव विश्वनाथा ॥ १२ ॥

( वसंततिलका. )

हे दीनबंधु जगदीश अनाथनाथा, दावीव सत्वर मला प्रभु मुक्तिपंथा;
अत्यंत दुःसह असे भवबंध यातें, छेदून शीघ्र मज ने स्वपदांबुजातें १३

( मालिनी. )

वरतनु भगवंतें जी दिली या नरांना,
न विषय सुखभोगा जेविं ती वानरांना;
त्रिभुवनपति जो, त्या नित्य भावें भजावें,
मन भवजलधीतें स्वस्थ लंघून जावें ॥ १४ ॥

( हरिणी. )

क्षणहि तुमची देवा, सेवा, नसे घडली मला,
मलिन बहु मी झालों, ल्यालों अघांबुधिच्या मला;
परि न नरकीं रंका टाका, सदा ममता धरा,
शरण नर जो आला, त्याला तुम्ही प्रभु उद्धरा ॥ १५ ॥

(शिखरिणी.)

भजें मी विश्वेशा, बहुत अपराधी जरि खरा,
नुपेक्षावें मातें मदनत अनाथा प्रभुवरा !
नद्या, ओढे, नाले, मिळति समभावें जलधिला,
असाधू वा साधू शरण रिघतां पावति तुला ॥ १६ ॥

(पृथ्वि.)

भवाब्धिपतिता मला प्रभु तुझी कृपानाव दे,
दुजा सदय कोण कीं मज न भी ! असें जो वदे;
असें जड अनाथ मी, तरि सहाय हो तूं मला,
कसा द्रव नये तुला, प्रभु दयानिधे कोमला ॥ १७ ॥

( मंदाक्रांता. )

स्वामी आहें व्यथित बहु मी शीघ्र पीडा हरावी,
आश्वासावें प्रभु मज असें कीं न भीति धरावी;
आहें पापी बहुत जरि मी कींव माझी करावी,
त्वत्प्रीती बा प्रभु नच कधीं दीनबंधो सरावी ॥ १८ ॥

(शार्दूलविक्रीडित )

नाना जीव, वनस्पती, जड तसे निर्मून लक्षावधी,
स्वेच्छेनें जग हें विचित्र सजवी, तींनेंच याला वधी;
जो कोणी असला समर्थ भगवान् त्या मी नमीं मंदधी,
सर्वाधार दयालु आठविल तो संसारदुःखोदधी ॥ १९ ॥

( स्रग्धरा. )

नेणें बा विश्वकर्त्या, तव गुण अथवा नामरूपादि कांहीं,
नेणें मी कोण, कोठें, जग उदित कसें, स्वामि, हें गुढ कांहीं;
नेणें कर्तव्यकर्मा, म्हणुन विनवितों भ्रांति माझी हरावी,
अज्ञानें मी दयाळा किति जरि चुकलों तत्क्षमा त्वां करावी ॥२०॥

( दिंड्या. )

कुठें वाणी ही मूढ सेवकाची, कुठें कीर्ती ती विश्वपालकाची;
कुठें चंचू ही अल्प पांखरांची, कुठें थोरी ती अतुल सागराची ॥१॥
काय वर्णूं मी स्वामिच्या यशाला ! काय सूर्याला उजाळिती मशाला !
काय तूलानें जोखिजे नगाला ! काय वस्त्रानें झांकिजे जगाला ॥२॥
तुला वंदीं मी दास देवराया, नसे बुद्धी बा त्वत्स्तुती कराया;
असे पापी मी दीन, ये सहाया, शक्ति नाहीं बा दुःख हें सहाया ! ॥३॥
तुझे पायीं दे ठाव पामराला, पुन्हां पाहूं दे मूळच्या घराला;
होय दिंडी हें मधुर पद्य याला, प्रभो ! अर्पी मी सेवकप्रियाला ॥ ४ ॥

# महादेव मोरेश्वर कुंटे.

हे लोकप्रसिद्ध वक्ते, आणि कवि साताऱ्याजवळ कृष्णातीरीं श्रीक्षेत्र माहुली येथें इ. स. १८३५ ह्या वर्षीं जन्मले. हे जातीचे कोकणस्थ आश्वालायन ब्राह्मण. ह्यांनीं बालवयांत आपले वडील वे. मू. मोरभट कुंटे यांजपाशीं बहुतेक 'ऋक्संहिता' ह्मटली होती; पण ते लवकरच निवर्तले. पदरीं गरीबी असून लहानपणीं कोणी शास्ता नसल्यानें हे फार हूड असत. परंतु बारा वर्षांचे झाल्यानंतर ह्यांस विद्या शिकावी असें वाटलें. ह्मणून हे आईस न विचारितां एकदम घरांतून निघून पुण्याकडे पळून गेले. पण मग पुढें ह्यांच्या मातोश्रींनीं ह्यांस कोल्हापूर येथें विद्याभ्यासास ठेविलें. तेथें माधुकरीवर निर्वाह करून ह्यांनीं मराठी आणि इंग्रजी अभ्यास चांगला केला. पुढें इंग्रजीचें ज्ञान वाढविण्याच्या हेतूनें हे इ. स. १८५६ ह्या वर्षीं मुंबई येथें डॉक्टर वुइल्सन ह्यांच्या शाळेंत विद्यार्थी झाले. हे स्वभावतः जबरदस्त अभ्यासी असल्यानें वुइलसन साहेबांचें ह्यांजवर प्रेम जडलें, आणि ते ह्यांस थोडेंबहुत निर्वाहासही देऊं लागले. त्यामुळें अभ्यासक्रम सुरळीत चालून हे इ. स. १८६४ ह्या वर्षीं बी. ए. झाले. पुढें दुसऱ्या वर्षीं ह्यांस कराचीच्या हायस्कुलांत 'हेडमास्तर'ची जागा मिळाली. नंतर इ. स. १८६७ पासून १८७१ पावेतों कोल्हापुर येथें आणि इ. स. १८७१ पासून ( मध्यंतरी एक दोन वर्षें खेरीजकरून ) इ. स. १८८८ पर्यंत हे पुणें येथील 'हायस्कुलां'त 'हेडमास्तर' होते. ह्याच वर्षीं आक्टोबर महिन्याच्या ८ व्या तारखेस सायंकाळीं त्यांस पक्षघातानें देवाज्ञा झाली. हे उत्कृष्ठ वक्ते व शिक्षक असून ह्यांस कविता करण्याचाही नाद असे. ह्यांनीं 'राजाराम महाराज' 'राजा शिवाजी' आणि 'मन' अशीं तीन काव्यें केलीं आहेत; व तीं स्वतंत्र पुस्तकरूपानें प्रसिद्ध आहेत. हे कवि व ह्यांची कविता, निरंकुश आहेत. तथापि, कोठें कोठें तिचें स्वरूप वास्तविक प्रसन्न व उज्ज्वल दिसून येतें.

## कोल्हापुरकर राजाराम महाराज छत्रपति यांचें बालपण.

इंद्रवज्रा.

गेली तुझी बाळपणींच माय ! ती राजकन्या उरली न हाय !
माता कशी हें तुज काय ठावें ? तूं राजवाडयांत सदा रहावें ॥ १ ॥

भुजंगप्रयात.

तुला बाळसें फार रे गोड होतें, तुझें रूप आतां मनीं सर्व येतें ;
पळावें लडाडां धरावें मुलांला, जिथें राजवाडयांत ती बालशाला ॥२॥

द्रुतवि०

चिमुकलीं शिकतात मुलें जिथें, जवळ मंडप सुंदरसा तिथें ;
सकल अज्ञ मुलें दिसती कशी ? दुडदुडां पळती हरिणें जशीं ॥ ३ ॥

इंद्रवज्रा.

येती फुलें दाट गणेश बाग, पाणी मधें काय सुरेख रंग !
चक्राप्रमाणें फिरवून पाणी, कोणीहि आनंद मुलांत आणी ॥ ४ ॥

शालिनी.

कारंजें हें छान आहे समोर, पाणी चाले शोभतो बाग फार ;
त्याच्यामध्यें चक्र आहे मजेचें, पाणी जेथें नागमोडींत नाचे ॥ ५ ॥

भुजंगप्रयात.

मुलांनीं जमावें, तिथें त्वांहि यावें, फिरावें, बसावें, मनीं तृप्त व्हावें ;
किती खेळ व्हावे ! किती नाचणें तें ! मनीं सर्व येतां, मला दुःख होतें ॥६॥

इंद्रवज्रा.

ती बालशाला तुज गोड लागे, रे खेळतांना बहु चित्त रंगे !
तो काळ जाऊनिहि काळ आला ! हा हा गडया त्रास उदंड झाला ॥७॥
आह्मांमधें तूं मिसळून जावें, आम्हांमधें फार सुखें फिरावें ;
रे मित्रसें त्वां मज वागवावें ! तो काळ जातां मग तूंहि जावें ॥८॥
शाळेंत जेव्हां लुटती मिठाई, तेव्हां मुलें रे करिती लढाई ;
तेव्हां तुला न्याय कसा कळावा ? तेव्हांच कल्लोळ मिटून जावा ॥९॥

भुजंगप्रयात.

मुलें नाचतांना तुला मौज लागे, तुझ्या सर्वदा हौस चित्तांत वागे;
कितींनीं हंसावें कितींनीं रुसावें! कितींनीं बसावें असे रंग व्हावे ॥१०॥
हे रंग रे बाळपणींच झाले, हे खेळ तूं सोज्वळ फार केले;
राजा! तुला मृत्यु धरून नेतां, रे! दुःख चित्तीं उमळेच आतां ॥११॥

## संभाजीची बालक्रीडा.

भुजंगप्रयात.

असे बोलती माय तो शंभु आला, घुसे आंत, काठीवरी स्वार झाला;
हंसूं लागली सुज्ञ आजी मुलाचा, करी लाड ताईत मानी गळ्याचा ॥१॥
पुरीं तीन वर्षेंहि नाहींत झालीं, तरी माय बाळास टाकून गेली;
लळा आजिचा त्यास लागे ह्मणून, मुले माय ह्या आजिमागें फिरून॥२॥

द्रुतविलंबित.

चिमुकली पगडी झळके शिरीं, चिमुकली तरवार धरी करीं;
चिमुकला चढवी वर चोळणा, चिमुकला सरदार निघे रणा ॥३॥
छबुकडा चिमणा करितो गुण, चिमुकलें धरलें मग रंगण;
दुडदुडां पळतां पळतां पडे, गडबडे रडतां मुख बापुडें ॥ ४ ॥

भुजंगप्रयात.

तशी वृद्ध आजी उठे त्यास घे ती, पुढें पोटिशीं, तोंड त्याचें पुशी ती;
हंसूं लागला तो, सुखें ऊर दाटे, फुटे प्रेमपान्हा तिला स्वर्ग भेटे ॥५॥
शिवाजीसही फार संतोष झाला, उठे बाळ घेऊं स्वतां तो निघाला;
धरी त्यास हातांत घेऊन झेली, महा रम्य खेळे, महा मात झाली ॥६॥
असे टेकडी दूर राजापुरीं जी, तिचे पाय तो सिंधु साक्षात पूजी;
तिची नित्य सेवा करी अग्नि भारी, मिळे ऊन पाणी सकाळीं दुपारीं ॥७॥
तिच्या मस्तकीं वृक्षशोभा चकाके, निघे सूर्य तेव्हां महातेज फांके;
किती रम्य हें स्थान गंगा पहा ती, त्यजी थोर काशी स्वतासिद्ध ये ती॥८॥

इथें पांच कुंडें वहाती भरून, महापूर येतो धरित्री फुटून ;
मध्यें कुंड मोठें तडाडे जळाचें, चहूं बाजुला चार कुंडें स्थळाचें ॥९॥
पडे तेज नामी असें हें स्वरूप, दिसे बाळ तेथेंचि आजीसमीप ;
नसे तो शिवाजी सुशोभे मनोज्ञ, घरीं कांति दाटे रमे राज सुज्ञ ॥१०॥
गमे त्या सुमातेस संतोष मोठा, जशी राणपक्षीण बांधी घरोटा ;
बहु उंच जागीं जिथें डोंगराचा, कडा भेगळे जोर त्या पारध्यांचा ॥११॥
खटे, तेथ पिल्लें तिचीं वाढतात, उडों लागती तों झुले ती मनांत ;
तिच्या भोंवतीं तीं उड्या मारतात, पुढें सर्व चूं चूं असें बोलतात ॥१२॥
अशी शोभली ती सुमाताहि भारी, पुढें बाळ नाचे, मिठी तीस मारी ;
पळे, खेळ मांडी दडे गोड चाळे, करी तों सती ती सुखा फार लोळे॥१३॥
पुढें ती शिवाजीस माता ह्मणालीः-'उठीं जेव बाबा ! किती रात्र झाली ;
'तुला भूक लागे कशाला उशीर,' रडे शंभु कांहीं धरीनाचि धीर॥१४॥

## शृंगार.

इंद्रवज्रा.

हें स्थान रे ! सुंदर कोण आहे ? शोभा स्वयंभू रमणीय राहे ;
पुष्पें किती रम्य सुगंध चाले; नामी किती झालर ! रंग डोले ॥१॥

शालिनी.

कारंजें हें, हें उडे रम्य पाणी; लोकांमध्यें हौस आरास आणी ;
तेजाची तों कांति दाटे सभोंती, सौंदर्याचे हे जणों पूर येती !॥२॥

इंद्रवजा.

हातांत वीणा बसली सुशोभा, हें रूप कीं सोज्वल दिव्य रंभा ;
बोटें तिचीं तीं धरितात वीणा, फांके किति कांति मनांत आणा ॥३॥
डोळे किती भव्य कटाक्ष गोड ! चित्तास लावील सुरूप वेड ;
वेणींत, भांगांत, अवर्ण्य डौल ! ती हास्यमुद्रा, खुलतात गाल ॥ ४ ॥
चोळीस उत्कृष्ट जरीकिनारी, वर्णूं किती रूप सुरेख नारी ;
गाण्यास लागे रममाण रूप ! तों पाझरे हें जणु चित्तरूप ॥ ५ ॥

पृथ्वि.

'मनांत झुरतें किती ! मज सख्या ! कसा सोडसी !
उगीच करशी अहा ! कपट काय आतां मशीं !

दिलें सकळ मीं तुला मन, करूं नको राग हा !
प्रसन्न तुज कीं करूं, ‘मनन’ हेंच चित्तीं पहा ॥ ६ ॥
सदोदित मला तुझा बहुत छंद ये ये प्रिया !
स्वरूप रुचतें तुझें, मदन तूं, तुझी मी प्रिया;
नसेच जगतामधें जन दुजा तुझ्यासारखा,
स्मरीत बसलें अहा ! गुण तुझे मनीं तूं सखा ॥ ७ ॥
दडून बसशी मनीं; निवळ रूप बिंबे तिथें,
समोर दिसशी कधीं जलद धांव सुझा इथें;
खरोखर पुढें गड्या ! रमत तूं उभा राहशी,
सुरेख बहु मूर्ति ही ! मजसवें न कां बोलशी ॥ ८ ॥
तुझी अवयवप्रभा बहुत गोड तूं शोभशी !
अहा ! सकळ नीट हें, पण मुका ! न कां बोलशी ?
रुसून पळशी मनीं मज नको सख्या ! भागवूं,
किती दिवस मी पुन्हां तुज मनीं असा वागवूं ॥ ९ ॥
सख्या ! मन तुझें खरें, पण नको बसूं ह्या मनीं,
स्वरूप नयना रुचे निरखिती तुला कामिनी;
मनांत वसशी जसा, कढत लोहसा भासशी,
निवे नयन शीत तूं, घडण ही तुझी रे ! कशी ॥ १० ॥
तुझ्या स्मृतिमुळें सख्या ! सकळ देह हा भाजतो,
तुझ्या रुचिर दर्शनें प्रकट चंद्र कीं भासतो;
गुणेंच विपरीतसा मज दिसे सखा कीं जसा,
कधीं सुखद चंद्र तूं, जणु कधीं खरा सूर्यसा ॥ ११ ॥
जगीं सकळ ह्या मला सकळ तूंच हें भासतें,
पदार्थ दिसतात जे भ्रमविती तुझे भास ते;
अनंत भुवनें अहा ! तुजविणें मला हीं फिकीं,
जगून करणार मी नच कळे पुढें काय कीं ॥ १२ ॥

# बापूसाहेब कुरुंदवाडकर.

हे लोकप्रसिद्ध राजकवि कुरुंदवाड येथें इ. स. १८३८ ह्या वर्षी जन्मले. ह्यांच्या लहानपणची विशेष माहिती कांहीं कळली नाहीं. तरी, हे गर्भश्रीमान् असल्यामुळें ह्यांचें बाळपण स्वस्थतेंत आनंदानें गेलें असावें, हें उघड आहे. तरी हे स्वभावतःच विद्याव्यसनी होते. ह्यांचा साधारण लिहिण्या वाचण्याचा अभ्यास चांगला होऊन हे संस्कृत पुष्कळ शिकले. त्यांत ह्यांची गति इतकी झाली होती कीं, हे त्या भाषेंत चांगल्या चांगल्या शास्त्री पंडितांशीं वादविवाद करीत असत. इ. स. १८६९ ह्या वर्षाच्या सुमारास, कै. वा. रा. सा. महादेव मोरेश्वर कुंटे ह्या कवींचें 'राजा शिवाजी' हें प्रसिद्ध झालेलें काव्य, प्रस्तुत राजकवींच्या पाहण्यांत आलें. तेव्हां त्यावर ह्यांनीं कांहीं प्रतिकूल टीका केली असतां ह्यांचे चुलते स्व. वा. श्री. आबासाहेब हे ह्यांस किंचित् लावून बोलले; कीं, "टीका करणें सोपें आहे, पण कृति करणें कठिण आहे." हें उत्तर ह्या राजकवींच्या मनास फार लागलें, आणि लागलीच त्याच रात्रीं ह्यांनीं शिवाजीवर आठ दहा नवीन श्लोक रचून आबासाहेबांस दाखविले. ते त्यांस फार आवडले, व संतोष वाटला. हाच प्रस्तुत राजकवीच्या काव्यरचनेचा आरंभ होय. ह्यांनीं 'गंगा-वर्णन', 'गणेश पुराण आर्या', 'भट्टवंश काव्य', 'स्ववंश वर्णन' इत्यादि काव्यें केलीं आहेत. प्रकृत ग्रंथांत घेतलेले वेंचे बहुतेक गंगावर्णनांतील होत. ह्यांची कविता बहुधा आर्या छंदांत असून ती प्रौढ व अलंकारमंडित आहे. ती वाचतांना जागोजाग प्राचीन कविवर्य मोरोपंत यांची आठवण होते. ह्या राजकवींस काळजाचा रोग जडला होता; व त्यामुळें इ. स. १८९९ च्या जुलै महिन्याच्या २९ व्या तारखेस रात्रीं जेवीत असतांना ठसका लागून त्यानें ह्यांचा आकस्मिक अंत झाला. यांचें पूर्ण नांव, श्रीमंत गणपतराव हरिहर ऊर्फ बापूसाहेब पटवर्धन. ह्या राजकवींचीं काव्यें, त्यांच्या पत्नी श्रीमती जानकीबाई साहेब, ह्यांनीं कृपा करून आम्हांकडे पाठविलीं, त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत. श्रीमती जानकीबाईसाहेब ह्याही काव्यरचना करीत असतात. त्यांच्या कविता आमचेकडे आल्या आहेत. परंतु त्यांतील वेंचे ह्या ग्रंथाच्या दुसऱ्या भागांत घेण्याचा विचार आहे.

## स्वसुतास राजाचा उपदेश.

आर्या.

सुतवाक्यें मनिं हर्ष, परि वरि करि कोप नृप महा मात्र;
शिक्षार्थ शब्द टोंची कलभा अंकुश जसा महामात्र ॥ १ ॥
अपकृति वर्जीं उपकृतिकर, धनवचनासुलाहि अर्पोन;
शरणागतसंरक्षण सत्यत्यागेंहि जीभ कर्पो न ॥ २ ॥
श्रुतिगुरुजननिंदेतें, द्रोहातें वा कदापि न मनेंही;
करिं; विप्रां दे दानें, रक्षीं साधूंसि करुनि नमनेंही ॥ ३ ॥
स्वप्निंहि परदारादर करिं न त्यागीं स्वदारऋतुगमन;
पतिला अत्यावश्यक, नातरि तो भ्रूणहाचि होय जन ॥ ४ ॥
परनिंदा, आत्मस्तव, भक्षण न कदापि करिं अभक्ष्याचें;
किल्बिषसेवा स्थापन, अविवेकें कोणत्याहि पक्ष्याचें ॥ ५ ॥
जननी जनकादि गुरु द्विजगोसुरसेवना न सोडावें;
दीनांधकृपण लोकां देउनि वस्त्रान्न पुण्य जोडावें ॥ ६ ॥
दंडभयेंचि स्वापरभाव मनीं ठेवुनी स्वधर्मरत;
जन होय म्हणुनि दंड्या, दंड करीं शास्त्रपंडितांस मत ॥ ७ ॥
विश्वास्य जनिंहि अल्पाचि विश्वासीं परि न तूं अयोग्य जनीं;
कृतवैरहि विश्वासा दाविल त्याचें न आणि वदन मनीं ॥ ८ ॥
अधमकृतस्तोत्राचा, निंदेचा, रोषतोषही न मनीं;
आणीं हो सतत सदय जो, अपकारीहि वांकला नमनीं ॥ ९ ॥
चाराचि दृष्टि नृपाची, दूतचि मुख दंडताचि रक्षणही;
आधार मंत्रगुप्तिच; ह्मणुनि त्यागीं तयांसि न क्षणही ॥ १० ॥
बहिणी सुतासुनाशा, पाळी जो स्वप्रजेसि त्या पुत्रा;
विषयोपभोगभूषण मानावा; इतरथा नृपहि कुत्रा ॥ ११ ॥

आधीं देहगता, मग जिंकाया बाह्य शत्रुला धांवें ;
न्याय्ये षड्गुणयोगें नित्य नवें राष्ट्र शीघ्र साधावें ॥ १२ ॥
ऐसें बहुत वदे नृप, कीं स्वसुता सर्व लोक सेऊत ;
साजो तद्यशहि जगीं शुभ्रपयाचा जसा असे ऊत ॥ १३ ॥

## साधुरीति.

आर्या.

मातेचे पाय जसे, छळ करि त्याचे तसेचि जो पाहे ;
साधु निवे नच कोपे, न दुरुक्तक्षोभ मानसीं राहे ॥ १४ ॥
भोजन दे चोरांला, आदर आग्रह करी स्वयें मोठा ;
साधु प्रसन्न चित्तें, बांधुनि लागे वहात्रया मोटा ॥ १५ ॥
रीति न कोणाचीही, या अतितर सरळ रीतिशीं तुकली ;
साधु ह्मणे तस्करहो, घ्या तुमची एक आंगठी चुकली ॥ १६ ॥
वाढवि जन्याणुगुणां साधु सदा, वायु जेविं फुगगीतें ;
सुयशानें जरि साजे, लाजे परि फार आत्मगुणगीतें ॥ १७ ॥
ज्यासह घडतें दैवें, सहज पथीं चालणें पदें सात ;
त्या मित्र ‘साधु’ ह्मणती देतीच व्यसनसागरीं हात ॥ १८ ॥
हस्तीं धन आलें जें, तें देव ब्राह्मणांसि अर्पावें ;
स्वापत्य तसें प्रेमें अन्नार्थि प्राणिजात तर्पावें ॥ १९ ॥
साधु प्राणी पाहुनि, संसारीं तापले असुख पावे ;
व्हावें जग मुदित ह्मणे, तद्दुःखें आपले असु खपावें ॥ २० ॥

## गंगास्तुति.

आर्या.

आर्या देवी गंगा म्हणुनि तिचा स्तवहि योग्य आर्यांनीं ;
आर्यांनींच करावा नच माझ्यासारिख्या अनार्यांनीं ॥ १ ॥

ठावें म्हणुनि स्तवितों, जरि नाहीं ज्ञान किमपि मज खोल;
मातेला न दुजें प्रिय बाळाचे जेविं बोबडे बोल ॥ २ ॥
त्वत्तोयपतितपशुही देवेंद्रातेंहि वांकुल्या दावी;
देवहि म्हणती माते! आह्मां गंगाजलस्थ यादात्वी ॥ ३ ॥
आसन्नमृति नरातें न्याया यमदूत उग्र तरवारी;
घेउनि येती त्यांतें प्रोक्षित तव जलधि शीघ्रतर वारी ॥ ४ ॥
गच्छंति ह्मणुनि गंगा-पदसाम्या करिति निम्नगा बहुत,
परि तूं शक्ता न दुजी करावया देह शुद्ध पापहृत ॥ ५ ॥
आंगें याव लागे दूर कराया तमासि तरणीतें;
त्या त्वत्स्मरणचि नाशी काय वदूं या त्वदीय करणीतें ॥६॥
शक्त असे रवि, परि नच, नाशाया तो गुहागत तमातें,
नरहृद्गुहातम, श्रुति सांगति, तूं नाशिसी सतत माते ॥ ७ ॥
हरि रवि तमासि परि खर, शीतल विधु परि हरी तमान तसें;
शीता तमोहराही पाहुनि तव चरणिं होति जन नतसे ॥८॥
पर्वतनाश कराया वाटे तो पावला पवि त्रास;
नरपापनगविनाशन सुकर असे तव जला पवित्रास ॥ ९ ॥
ब्रह्मघ्न, गोघ्न, मद्यप, हेमस्तेयी, हरीहि परदार;
स्नातजलीं जरि तुझिया, नरकाचें पाहतो न नर दार ॥१०॥

---

## हिमालयवर्णन.

आर्या.

सुंदर हें स्थळ आपुल्या ठायीं भूंतील सर्व रस नेतें;
ज्याचें वर्णन करितां होऊं द्यावा न गर्व रसनेतें ॥ १ ॥
ज्यावरि सतत पडे हिम यच्छकलें भासताति जेविं हिरे;
देतां प्रकाश अधिकचि शोभतें पावताति हो मिहिरें ॥ २ ॥

रविकिरणपात होतां प्रतिशिखरीं दीसताति बहुत रवी;
आहे हिममय भूमी प्रतिबिंबातें म्हणोनि बहु तरवी ॥ ३ ॥
हिमशैलशुभ्रशिखरांवरि निश्चल सर्वदाहि घनमाला;
राहे पाहे कौतुक ऐरावत केविं खालता आला ॥ ४ ॥
स्वर्गद्वार असे जो, जो आहे बहु महर्षिचें वतन;
श्वशुरहि सदाशिवाचा कन्यात्वें पार्वतीस करि जतन ॥ ५ ॥
ज्यावरि आकाशांतुनि हिमशकलें पडति कीं जशा गारा;
भवतापतप्तमानव वसति जिथें टाकुनी निजागारा ॥ ६ ॥
भूवरि असा न भू-धर ज्याचीं योजनमितें महाशिखरें;
असती उन्नत, लटिकें वाटे, परि जाशि तरि पहाशि खरें ॥ ७ ॥
जवळचि याच्या दुसरें शिखर असे म्हणति ज्यासि गिरिधवल;
नवल न कोणा होइल गेले मेघां करावया कवल ॥ ८ ॥
अतिशीतशुक्ल ज्यावरि वाहति वारी-प्रवाह चोंहिकडे;
जाणों मुक्ताहारा घालिति कंठीं हिमाद्रिचेहि कडे ॥ ९ ॥
जैसा पर्वत मोठा तैसें त्याचें अरण्यही मोठें;
छाया सर्वत्र दिसे, दिसतो सूर्यप्रकाश नच कोठें ॥ १० ॥
यद्यप्यकृत्रिमाचि तें वन, परि लोकांसि पाहुनी चित्र;
वाटे हाणति स्वकरें, रेखुनि लिहिलें पितामहें चित्र ॥ ११ ॥
ईशविनिर्मित जितुकें, आहे पृथ्वींत सर्व तरुजात;
किति सांगूं त्यांतुनियां असती कीं बहुत निश्चयें ज्यांत ॥ १२ ॥
असती बहुत अखातहि त्यांमाजीं पूर्ण जीं जलें अमलें;
वेष्टित बकादिकांनीं, फुललीं तैशींच तज्जलीं कमलें ॥ १३ ॥
घनविरल रम्यरुक्षा, देशातें वृक्ष जेथ दाखविती;
त्यांवरि करोनि घरटीं, निर्भय पिल्लांसि पक्षि लाख विती ॥ १४ ॥
सिंह व्याघ्रगजादि, क्रूर पशूंचे थवे बहुत असती;
ज्यांची नव्हे नवीना, आहे तेथें पुरातनी वसती ॥ १५ ॥

हरिगार्जित करिबृंहित कोठें घूत्कार घोर घूकांचे;
घूत्करण वराहांचें तैसें फूत्करण दंदशूकांचें ॥ १६ ॥
श्रवणीं येतां कांपति अंतःकरणांत शूरहि भयानें;
दुसरीकडेस तेथुनि जाया पळतीच ते मग रयानें ॥ १७ ॥
तों तच्चित्ता रमविति सुंदर केकाध्वनी मयूरांचे;
सुस्वर शब्द पिकांचे, कोठें तें गुंजगान मधुपांचें ॥ १८ ॥
अनिलें हलती वेली, हलविति अपुले शिरासही ताल;
त्या नृत्यातें शिकती, जाणों ते वृक्ष दाविती ताल ॥ १९ ॥
अन्योन्यघर्षणोत्थें अनलें स्वकुलासि जाळितां वंश ;
कथिती कलहा करि तरि पावे नाशा असाचि नरवंश ॥ २० ॥
असती कोठें कोठें, मोठे अत्युच्चपुष्पितपलाश ;
दिसती दुरोनि जैसे रक्तानें नाहले बहु पलाश ॥ २१ ॥
मृगनाभिगंधवासित-पाषाणावरि महाभुजग फिरती;
जिकडे तिकडे अपुल्या वदनांतिल उग्रगरल ते किरती ॥ २२ ॥
पाहुनि दुरोनि त्यांवरि मधुभ्रमें बैसतां भ्रमर मरती;
चित्तीं करा निदर्शन योग्य न सहसा कुठेंहि परम रती ॥ २३ ॥
फिरती करेणुमागें मदलुब्धभ्रमरनिकर करट करी ;
खरतर परस्परांतें देती वदनीं धरोनि कर टकरी ॥ २४ ॥
जेथें सिंहहि असती, ज्यांचीं अतितीक्ष्ण पाहतां नखरें ;
मंदपदन्यासादिक मदमत्तगजा न सूचती नखरे ॥ २५ ॥

---

## हिमालयावर भिल्लांची शिकार.

आर्या.

अतिदुष्ट शबर करिती संतत या पर्वतावरी मृगया;
हाचि स्वधर्म सुखकर इतरांतें ह्मणति ते अशी न गया ॥ १ ॥

शर लागतां शरीरीं व्याकुळ होवोनि मृग वनीं दडती;
पळतां मार्गीं ज्याच्या आंगांतुनि रक्तबिंदुही पडती ॥ २ ॥
शोणितचिन्हितमार्गें जाउनि, ते दुष्ट त्या मृगां धरिती;
हरिती प्राण कुकर्में, एवंविध उदर आपुलें भरिती ॥ ३ ॥
प्रतिकूल काल येतां, हित असतें तेंचि अहित बा होतें;
मृगवध कारण झालें जें केवल जीवरुधिर कीं होतें ॥ ४ ॥
व्याघ्रा मागें लुब्धक घेउनि शरचाप त्यां वधायाला;
जाति, परंतु, असतां कंदर ते कोठुनी बधायाला ॥ ५ ॥
उठविति तरुस्थ कपिला व्याघ्र न दिसतां वनांत भिल्लांतें;
कीं ते त्यांसि पहातां ओरडती धरिति घट्ट पिल्लांतें ॥ ६ ॥
शब्दस्थानीं जाउनि, तरुण शबर ह्मणति-ते गुहेमाजीं;
गेले, काय करावें ? वृद्ध ह्मणे-युक्ति ऐक हे माझी ॥ ७ ॥
न दिसे शरीर यद्यपि, तिमिरींही चमकताति तन्नेत्रें;
त्यांतें लक्षुनि, तीक्ष्णें बाणें हाणाचि भेदुनी गात्रें ॥ ८ ॥
ऐकुनि हें, वृद्धपदीं आनंदें शबर मंडळी लोळे ;
वृद्ध ह्मणे-घेतों यश, काय करूं मंद जाहले डोळे ॥ ९ ॥
राहूनि दरीद्वारीं व्याघ्राच्या खर शरें वधा करुन;
येती आनंदानें अपुल्या सदना महद्यशा वरुन ॥ १० ॥

वनगोपुच्छसुकेशें पुष्ट करायासि आपुल्या कबरी;
गोवध करावयाला स्वपतीतें प्रार्थिती तिथें शबरी ॥ ११ ॥
स्ववधोद्यत पाहुनि त्यां, त्या पळती कंदरीं लपायाला;
तेथें सिंह पहातां कंप न कैसा सुटेल पायाला ॥ १२ ॥
न वधा, वधाचि धेनुस, कथिति दया तत्प्रियाहि त्यांसि तदा;
द्रोघीहि तुष्ट होती कापिति गोपुच्छगुच्छ शबर यदा ॥ १३ ॥
जनहो गोवध निर्दय शबरस्वांतींहि देई अनुकंपा;
मग कैसी इतरांची पावावी तद्वधीं न तनुकंपा ॥ १४ ॥

जलपान कराया मृग येती दुसरे, परंतु तेचि सरीं;
व्याघ्रा पाहुनि पळती, युक्त तयाची कुणा नयेचि सरी ॥१५॥
तेथें दडोनि रात्रीं, बैसति ते शबर बांधुनी माळा;
येतां व्याघ्र शरानें मारुनि तत्प्राण अर्पिती काळा ॥ १६ ॥
लाघव शबरकराचें औद्धत्याहि सूकरांगिचें तैसें;
मृगयाकुशलजनांही विस्मयभीतीस तें न दे कैसें ॥ १७ ॥
धांवति केश उभारुनि, ओकिति कोपोनि घांस जे गिळिले;
नेणति परि शबरशरें वृक्षीं देहासि आपुल्या खिळिलें ॥ १८ ॥
मारिति तें उग्रांतें, नच दीनांतें ह्मणूं नकाचि असें;
वधिताति मत्स्यकच्छपबकलावकनीलकंठहारिणससे ॥ १९ ॥
ऐसेही धन्यचि ते कीं, मिळतें गांगजल यथेष्ट तयां;
पानस्नान कराया तेणें तत्पाप पावतें विलया ॥ २० ॥

---

## केदारेश्वर.

आर्या.

तेथुनि माते ! तुजला दिसतो श्रीशंभुदेव केदार;
ऋतुलांगलपर्जन्यावांचुनि जें मुक्तिफलदके ! दार ॥ १ ॥
जातां मार्गीं इकडे यात्रिकजन बहुत सोशिती कष्ट;
लुटती चोर, व्याघ्रहि भक्षिति होती कितीक अहिदष्ट ॥ २ ॥
खोरे खोल भयंकर यास्तव जायासि बांधिती शिंकीं;
हा एक पणचि आहे यांतुनि जाईल तो यमा जिंकी ॥ ३ ॥
जाउनि तिथवर कोणी होउनि भयभीत कांपविति कंठ;
धाडस ह्मणती गेल्यावांचुनि भेटेल केविं शितिकंठ ॥ ४ ॥
बैसुनि जातां त्यांतुनि, नेत्रें भ्रमती नरा दिसे न तळ;
काय वदूं जरि शिंके तुटलें तरि मरण लागतां न पळ ॥ ५ ॥

होती दुःखें ज्यांची होऊं न शके कदापिही गणिती;
देवाधिदेव तोही होईल श्रीगणेश जरि गणिती ॥ ६ ॥
ऐसेंहि कष्ट भोगुनि, जाती जन दर्शनासि देवाच्या;
ह्मणती तारीं, मारीं, परि तव पदसन्निधान दे वाचा ॥७॥
मार्गीं मोठें आहे गौरीवदनासमीपचि उन्हाळें;
परिमितचि उष्ण उदकें पथिक सुखी होती ज्यामधें न्हाले ॥८॥
स्वर्गारोह कराया हेंचि स्थळ होय भव्य निश्रेणी,
ब्रह्मर्षिराजऋषिच्या गेल्या इजवरुनि हो बहु श्रेणी ॥ ९ ॥
देहा टाकिति ते ज्यां वाटे संसार वाचिक पसारा;
होतो यत्स्वीकारें आयुष्याचा फुकाचि खप सारा ॥ १० ॥
मरतांचि ते असति जे उर्वश्यधरामृतासि तान्हेले;
स्वर्गीं सुरदूतांही त्यांतें तेथोनि पाहतां नेलें ॥ ११ ॥
स्वर्ग नसे, कां मरतां ! कथितां हें नास्तिकेंहि आधुनिकें;
बोल न ऐकावे ते म्हणती तज्ज्ञ स्वकर्मसाधु निकें ॥ १२ ॥
इंद्रपुरीसम सदना टाकुनि धर्मादि नृपति जे गेले;
ते कां मूर्ख ह्मणावे ? कीं ते येथेंचि गळुनियां मेले ॥ १३ ॥
येथें शरीर गळतें, परि होतें दिव्य, काममात्र गळे;
जैसें सुवर्ण जळतां पहिल्याहुनि होय शुद्ध, मळचि जळे ॥ १४॥
गंगे ! तुजला येथें जन ह्मणति सरस्वती अलकनंदा,
राहो स्नानहि ज्यांचें स्मरणाचे देतें मनासि आनंदा ॥ १५ ॥

---

## ग्रीष्मऋतु.

आर्या.

ग्रासी रसासि ह्मणुनी या ऋतुला ग्रीष्म हेंचि नाम असे;
ह्मणति निदाघहि या कीं आंगीं अत्यंत दाहकत्व वसे ॥ १ ॥
आरंभींच जयाच्या कर्दमरूपाचि होति आप सरीं;
त्रासुनि उष्णें बैसुनि अनातपीं जीवजात 'आ' पसरी ॥ २ ॥

सूर्याचे तापानें झाली संपूर्ण जर्जरित धरणी;
केवल तरंगिणीची रविकिरणसमूह दाविती करणी ॥ ३ ॥
धांवति मरीचिकेला जल माननि तृषित मृग उगें दमती;
मिथ्या विषया, सत्य-भ्रांतीनें भ्रमति जेविं मंदमती ॥ ४ ॥
दिवसान्त सूख वाटे, लागे पडतांचि नीज छायेंत;
स्नानें सुखकर होती, कमलवनावरुनि वायुही येत ॥ ५ ॥
झाल्या कर्दमशेषा, होत्या भरल्या जलें अशाहि नद्या;
मेघा गंगाचि ह्मगे, राहिन पूर्णा जलासि द्या किं न द्या ॥ ६ ॥
रवितापें भू तडके, वृक्षहि सुकती, महाह्रदहि अटती;
यद्यप्यतिमृदुल, तरी, कमलांचे ताटवे कसे नटती ॥ ७ ॥
अंतर्गृहांत निजती दिवसान्तीं दाविती जन स्वमुख;
जाउनि जळांत लोळति तुझिया, तें वर्णवे मला न सुख ॥ ८ ॥
सोशीरजलप्राशन हें ग्रीष्मीं मुख्य तर्पणचि असुचें,
कीं यावांचूनि दुसरें लोकांतें अन्नभक्षणहि न सुचे ॥ ९ ॥
ह्मणती त्वज्जलपानें होतां निर्वाच्य तोष लोकांस;
ह्मणसी, वृथाचि अमृता ! घालुनि गंगाजया अलों, कास ॥१०॥
यावी नीज ह्मणोनी, स्वकरीं घेवोनि हलविती व्यजना ;
परि हलतां नीज न ये, ताप रहातां करी प्रबुद्ध जना ॥११॥
रविहुनि अधिका तापा, जेव्हां लोकांसि देतसे सिकतां ;
ह्मणती थोरापासुनि निंद्य गुणचि नीचहो कसे शिकतां ॥ १२ ॥
येतों ग्रीष्मऋतूंतचि गंगे ! तुज पूर परि न हें चित्र ;
हिमशैलगतहिमातें विघरवितो कीं स्वदीप्तिनें मित्र ॥ १३ ॥

## श्रीविंध्यवासिनी.

आर्या.

बैसुनियां याचि रथीं देवि श्रीविंध्यवासिनी पाहूं ;
जाऊं चलाची सत्वर, नश्वर देहासि तत्पदीं वाहूं ॥ १ ॥

गंगादक्षिणतीरीं विंध्याचलपाद एक जो आहे;
त्यावरि जगदंबा, श्रीशंकरसर्वस्व-पार्वती राहे ॥ २ ॥
महिषरूपधरा त्या, जी, दुष्टा असुरनायका मारी;
हास्यरसें वश होउनि, अर्पि जिला स्वार्धकाय कामारी ॥ ३ ॥
जे तद्भक्त निरंतर, शुंभनिशुंभवधविक्रमा गाती;
त्यालागि ह्मणे देतें व्हावें तरि पदहि शाक्र मागा ती ॥ ४ ॥
ह्मणती जन विधिहरिहर, उत्पत्तिस्थितिविनाश देहींचा;
करिती परि तत्कार्या, त्यातें शक्ति प्रसाद दे हींचा ॥ ५ ॥
व्यापी सकला विश्वा जी जगदंबा स्वकीय शक्तीनें;
मुनिदेवपूजिता जी, तीतें माझें नमोस्तु भक्तीनें ॥ ६ ॥
साक्षाद्ब्रह्माचि निर्गुण, सगुणत्वें ह्मणति ज्यासि हेरंब;
होउनियां त्वद्बालक, तो श्रीगजमुख तुला म्हणे अंब ॥ ७ ॥
'त्वद्वाहनासि भीं मी' ह्मणुनी दृढ तव गळां मिठी घाली;
तूं तल्लीलाप्रमुदित पाहुनि शिववदन हांससी गालीं ॥ ८ ॥
गंगास्नान करोनी श्रीदेवी दर्शनासि नर जातां;
वाटे नोहे पर्वत, चढतों हे स्वरधिरोहिणी आतां ॥ ९ ॥
दुर्गे! स्मरतां तुजला घालविसी सर्व भीति जंतूंची!
द्याया अभीष्ट भक्तां सिद्ध असिसि सर्वदा अई तूंची ॥ १० ॥
मूर्ति असे अत्युग्रा, दीनजनी करिसि परि असीम दया;
गर्जे, दिसे भयंकर, तरि देतो मेघ जेविं शीतपया ॥ ११ ॥
आश्विनशुल्कीपक्षीं नवरात्रीं होय उत्सवारंभ;
सप्तशतीपठणातें करिती बल्यादि बहु समारंभ ॥ १२ ॥
नक्तव्रतें स्त्रिया ज्या तोषविती तूज हे अनादि सती!
पतिसुतविरहित होउनि केविलवाण्या न त्या जनां दिसती ॥ १३ ॥
राहति येथें होउनि बहुजनसमुदाय तव चरणसक्त;
वैदिकतांत्रिक-मंत्रें अर्चिति माते! तुला तुझे भक्त ॥ १४ ॥
वामाचारप्रिय तूं असती, या भ्रांतिनें किती लोक;
अतिविपरीताचारा स्वीकारुनि, पावती पुढें शोक ॥ १५ ॥

केलें स्वेष्ट ह्मणोनी गणप-शिवा-विष्णु-सूर्य-शर्वांहीं ;
दक्षिणवामाचारा, स्वीकारूं परि नयेचि सर्वांहीं ॥ १६ ॥
वेदस्मृतिविहिताचि जो दक्षिण, त्याच्या विरुद्ध तो वाम;
केवळ अधर्मकारी, व्यसनशताचेंहि होय हा धाम ॥ १७ ॥
धर्म श्रौतस्मार्ताचि सेव्य सदैव द्विजातिलागि असे;
त्याज्यचि तंत्रादिक तें संमत जें कीं श्रुतिस्मृतीस नसे ॥ १८ ॥
स्त्रीमद्यव्यसनीं जे नर अत्यासक्त जाहले असती;
त्यांतें तत्त्यागाचे कथिले उपदेश, तरि कसे ठसती ॥ १९ ॥
यास्तव मदिरापाना–द्युपभोगालाहि धर्मता कथिती ;
कीं या मिषें तयांची हळूहळू दुष्ट बुद्धि ते मथिती ॥ २० ॥
रुततां कंटक, त्यातें काढिति जन अन्यकंटकेंचि जसे;
दुर्वार व्यसनाच्या नाशार्थचि वामकर्म होय तसें ॥ २१ ॥
ह्मणुनि भ्रष्ट जनांसचि सेव्य असे तंत्रमार्ग, इतरांला ;
श्रुतिमतधर्मचि तारक होय गयाक्षेत्र जेविं पितरांला ॥ २२ ॥
जाणुनि न धर्मतत्त्वा मद्यपजन घेउनी छुरीस करीं;
मांसेच्छेनें वधिती श्रीजगदंबे पुढें किती बकरीं ॥ २३ ॥
करिती अधर्म यद्यपि, तरि जगदंबे दयाचि करशील;
त्यावरि दुर्गुणिं बालीं मातेचें शील तूंहि वरशील ॥ २४ ॥
त्वत्पदवंदुनि जातों मी त्वत्पतिदर्शनासि काशीला;
ईशानुग्रहभाजन होइन ऐशाचि देईं आशीला ॥ २५ ॥
स्वपतिप्रसन्न पाहुनि, एकांतीं दास हा निवेदावा;
माते ! त्वां कीं जेणें द्यावा यातें, सहानि वेदावा ॥ २६ ॥

---

## गंगेशीं इतर नद्यांचे संगम.

आर्या.

काश्युत्तरसीमा जी वरुणा तिजलाहि घेउनी संगें;
भेटायासि समुद्रा त्वरित निघालीस तेथुनी गंगे ॥ १ ॥

तेथुनि अनेक झटिनी; नामें असती प्रसिद्ध ज्या लोकीं;
गंगासंगम पांउनि मानिति त्यां धन्य आजि जालों कीं ॥ २ ॥
इतरा महानद्यांशीं अपुल्या महिमेंकरूनि जी तुळते;
श्रीमद्भागीरथितें ती सुप्रख्यात गोमती जुळते ॥ ३ ॥
गंगेंत तेहि विरली, नामानें म्हणति घोगरा जीला;
लाजवि तिला अपावन ओघ तिचा, जेविं भोग, राजीला ॥ ४ ॥
सरयू नामें पूर्वी लोकीं विख्यात हे नदी होती;
तत्तीरींच अयोध्या--नगरी कवणा न ठाउकी होती ॥ ५ ॥
ह्यवंशहि रामादिक--रविकुलभ नृपति तज्जलीं न्हाले;
परि गंगेस मिळे तों तज्जल तैसें पवित्र नच झालें ॥ ६ ॥
यद्वत पाषाणाच्या देवाच्या मूर्ति उत्तमा होती;
ऐसी गंडकितटिनी गंगेतचि लीन जाहली होती ॥ ७ ॥
भ्रातृगुणा अत्युग्रा गंगाभिमुखाचि कौशिकी धांवे ;
परि ही वसिष्ठतुल्या शांता पाहूनि विरतितें पावे ॥ ८ ॥
भोगावतीहि मिळुनी गंगेला, ख्यात जरि जगीं आहे;
स्वातंत्र्या त्यागुनियां गंता परतंत्र होउनि वाहे ॥ ९ ॥
पावोनि रामगंगा गंगेतें शांत जाहली, जैसी;
प्रख्यात महानंदा, त्वरितचि येवोनी भेटली तैसी ॥ १० ॥
होतें सुकर्मनाशन यत्स्पर्शें म्हणुनि होय तन्नाम;
घेईल कर्मनाशा लाजुनि गंगेंत केविं न विराम ॥ ११ ॥
यद्यपि अवघ्या लोकीं आहे विख्यातनाम नदशोण;
गंगासंगम होतां त्याचें अभिधान जाणतो कोण ॥ १२ ॥
जैसें अधीश्वरातें राजे सामंत अर्पिताति कर;
गंगेतें कररूपा स्वोघातें अर्पिती नदी-निकर ॥ १३ ॥
मिळता महानद्या या गंगेचें पात्र वाढलें भारी;
ग्रीष्मऋतूंतहि यद्वत कीं अतलस्पर्श जाहलें वारी ॥ १४ ॥

# बजाबा रामचंद्र प्रधान.

हे कवि आणि ग्रंथकार इ. स. १८३८ ह्या वर्षी एप्रिल महिन्यांत कोकणांतील दापोली येथें जन्मले. हे जातीचे कायस्थ प्रभू. ह्यांचा अभ्यास दापोली व पुणें येथें झाला. 'म्याट्रिक्युलेशन'ची परीक्षा उतरल्यावर पुणें येथील पाठशाळेंत ह्यांनीं कांहीं वर्षें अभ्यास केला. तेथें आपल्या बुद्धिमत्तेनें आणि वाचनाच्या नादानें ह्यांनीं आपल्या सोबत्यांमध्यें नांव मिळविलें. पुढें ह्यांनीं शाळाखात्यांत नोकरी पतकरिली, व आपल्या कर्तबगारीनें चढत चढत हे इ. स. १८८४ ह्या वर्षी 'एज्युकेशनल इन्स्पेक्टर' झाले. सृष्टिसौंदर्याच्या ठायीं ह्यांचें लहानपणापासूनच प्रेम असे. हे एक उत्तम महाराष्ट्रभाषालेखक व कवि होऊन गेले. ह्यांनीं सर वॉल्टर स्कॉटच्या 'लेडी ऑफ् धि लेक' ह्या काव्यांतील कथाभागाच्या आधारें 'देवसेनी' नामक एक लहानच, पण सरसरमणीय काव्य केलें आहे. काव्यग्रंथाच्या नशीबीं दुसरी आवृत्ति निघण्याचा सुयोग आमच्या देशांत बहुधा असत नाहीं. तथापि, ह्या काव्याच्या दोन आवृत्त्या (पहिली सन १८६७ सालीं व दुसरी सन १८७४–७५ साली) निघाल्या. यावरून त्याची योग्यता व्यक्त होत आहे. सदरहू काव्यांतील दोन वेंचे ह्या ग्रंथांत घेतले आहेत. त्यावरून ह्या काव्याचा रसास्वाद वाचकांस कळून येईल. असो. हे कवि इ. स. १८८६ सालीं एप्रिल महिन्याच्या १७ व्या तारखेस मुंबई मुक्कामीं कुलाब्याच्या दांडीकडे भाड्याच्या गाडींतून जात असतां वाटेंत त्यांचा आकस्मिक अंत झाला.

---

## दैवसेनी आणि जयसेन यांची भेट.

मालिनी.

पुरुष जवळ ऐसा पाहतां हे कुरंगी,
दचकुनि भय पावे, लज्जिता अंतरंगीं ;
इतर जन नसेही, संकटीं काय कीजे ?
वदन करुनि खालीं मानिनी ते विराजे ॥ १ ॥

दिंड्या.

पुरुष पाहुनि ये भीति अंतरंगीं, चित्त सहसा दचकेहि, कंप अंगीं;
अधोवदनें झांकोनि दृष्टि राहे, कठिण संकट जाणोनि कष्टताहे ॥ २ ॥
धैर्य गेलें, मुखचंद्र उतरलाहे, चित्त घाबरलें, हृदय उडो पाहे;
करी चिन्ता–करुं काय अगे बाई! धांव ठाकुरजी! धांव चंडिकाई ॥३॥
अशी मुद्रा पाहोनि गोरटीची, वीरराणा पांथस्थ वदे वाचीं;
भीरु बाले त्यज भीति दुःख आतां, होय मानव मी व्यर्थ तुझी चिन्ता॥४॥
पिता प्रियकर पाहीन–असा हेतू, धरुनि आली असशील कन्यके तूं,
परी आशा भंगोनि अचंबाही, व्यर्थ उपजवितो भीति तुझे ठायीं ॥५॥
वनीं आलों मृगयेस जाण आजी, रात्र झाली मज तोंच तयामाजीं;
कुठें ठायां शोधीतसें विरामा, तोंच दैवें तव दाखविलें धामा ॥ ६ ॥
पाहुणा मी तरि आजि तुझ्या गेहीं, निराश्रितसा अपरात्र जाहली ही;
जरी तुजशीं आतिथ्य याचियेलें, कसा करशिल अव्हेर दयाशीले ॥७॥

इंद्रवज्रा.

लज्जावती उत्तर दे न कांहीं, हाले न, तैशी वरतें न पाही;
पांथस्थ ऐशांत करी उधाया, नौकेंत तो पाहतसे रिघाया ॥ ८ ॥

साक्या.

नौकेमाजी अग्रस्थानीं दूर परी तो बैसे,
यौग्य रीति, मर्यादा, उत्तमशील त्यजील कैसें ? ॥ ९ ॥
सस्मितमुख जयवंत मानुनी उत्कंठितही भारी,
चित्त परी साशंक पहाया चंद्रमुखी सुकुमारी. ॥ १० ॥

दिंडी.

स्वयें अवलें घेऊनि करीं वेगें, नाव हलु हलु लोटीत जळासंगें;
भीरु युवती विसरोनि देहभाना, स्तब्ध राहे तिज शब्द बोलवेना ॥ ११ ॥

साक्या.

चालविलें जलयान तयानें चित्त नसे अवधानीं,
लक्ष न जाय अवश्यक कामीं नसतां तें स्वस्थानीं ॥ १२ ॥

सुविचारांतीं पुनरपि चंचल आवरि तो स्वमनाला,
सदयहृदय बहु विनय धरूनी काय वदे सुशिलेला ॥ १३ ॥
बाले ! सुंदर तरुणी तूं ही, मी परपुरुष असें कीं,
ह्मणुनी वदनीं मौन तुझ्या हें-चित्त असे मन शंकी ॥ १४ ॥
व्यर्थ परंतु शंका सारी जाणें तुझी सुशीले,
दूषिल कैशी रीति जनाची आतिथ्यादर बोलें ॥ १५ ॥
एकाकीही कुलीन कन्या, पांथातें स्वस्थांनीं,
सत्कारुनियां आदरिताती, ऐकियलें त्वां कानीं ॥ १६ ॥

दिंड्या.

जाय जरिही तव तात इतर कामा, कुलोचित हें तुज-नेइं मला धामा ;
तुझ्या पदरीं उपकार बांधुनीयां, त्वरें जाइन उदइक निजा ठायां ॥१७॥
जणों मानवले बोल कन्यकेतें, करी किंचित आयास बोलण्यातें ;
पुन्हां लज्जा वदनास करी वायां, अर्धशंकित निर्भीडसें वदाया ॥१८॥
" अहा "- ऐसा जों शब्द बोलताहे, तोंच नौका थडकोनि उभी राहे ;
मोहपाशीं पांथस्थ गुंतलेला, द्वीप सन्निध नकळेचि हें तयाला ॥ १९ ॥
नाव जेव्हां स्थिर होय, हे कुरंगी, भूमिवरतें उतरोनि जाय वेगीं ;
पाहि ऐसें पांथस्थ चपापोनी, ह्मणे जाइल कीं एकली निघोनी ॥ २० ॥
परी पाहे साल्हाद नवल दृष्टीं, कुलिन सात्विक युवतीस उदककांठीं ;
उभी राहे संकोच निवारोनी, वदे पांथस्था विनय सांवरोनी ॥ २१ ॥
अहो ! याजी उतरोनि चला गेहा, रात्र अथवा दिनरात्र सुखें राहा ;
परी नाहीं प्रिय तात घरीं आला, घरिं एकुलती मीहि तया बाला ॥ २२ ॥
असो, घालविणें योग्य अतिथियाला, उचित नोहे हे तातकुलिनतेला ;
तुह्मां तरि मी निजगेहिं नेत आहे, परी, इतुकें बोलुनि उगी राहे ॥ २३ ॥
असे सन्निध येतात जों गृहाचे, धाम पाही पांथस्थ सुंदरीचें ;
क्षेत्र आंतिल बहु थोर नसे कांहीं, स्पष्ट सांगे एकांतवास हाही ॥ २४॥

अपरिचितसा पांथस्थ जाय गेहीं, नेत्र लावुनि जों भुवन सर्व पाही;
चित्त दचके, बहु नवल मनीं खोंचे, वीरपुरुषाचें धाम असे साचें ॥२५॥
व्याघ्रशार्दुलमृगशशकचर्म–भारे, रीस, जंबुक, वृक, अंथरिले सारे;
परी तेथें आश्चर्य तया भारी, स्तब्ध राहे रोखोनि दृष्टि सारी ॥ २६ ॥
दोन तेथें जीं पाहिलीं निशाणें, लिखित वरुतीं संज्ञीक याप्रमाणें–
"मालपुरचा ठाकूर बादशाही," "दुजावरतीं जयपूर जय सवाई" ॥२७॥
होय मानस उद्विग्न देखतां हें, उभा कोठें ! हें कोण ! काय आहे !
देहभाना विसरोनि स्वस्थ ठेला, व्यर्थ शोधोनी श्रमवि कल्पनेला ॥२८॥

## देवसेनी व जयसेन यांचें भाषण.

दिंड्या.

चंद्रवदना सत्प्रीतिचीच खाणी, वदे पांथस्था काय मधुर वाणी–
काय तें हो ! आश्चर्य काय येथें ? काय पाहतसां नवल कोणतें तें ॥१॥
स्वस्थ आधीं बैसोनि घ्या विसांवा, चर्म अंथरिलें, अल्प असे सेवा ;
कृपा करुनी परि एक मला सांगा, कोण आपण कोठील महाभागा ॥२॥
वयें तेही बहु अल्प कोमलांगी, वर्ष चवदावें वागतसे अंगीं ;
परी इतुकें चातुर्य बोलण्याचें ! थोर वाटे आश्चर्य मना साचें ॥ ३ ॥
वदन सस्मित पाहोनि तिला दृष्टीं, प्रीति उपजे, आनंद भरे पोटीं ;
स्वस्थ निजनेत्रें प्राशुनी सुधेला, वदे उत्तर पांथस्थ सुंदरीला ॥ ४ ॥
प्रिये ! बाले ! सौजन्य तुझें भारी, तुला कथितों तरि गोष्ट एक सारी ;
तुला ठावें जयपूर कीं सुजाणे ! भूप तेथिल जयसेन महाराणे ? ॥५॥
तया पदरीं मी करुनि असें सेवा, राजसहवासें सौख्य नित्य जीवा ;
सदा परहितव्यवसाय या चिदंगीं, विजय मजला म्हणतात गे शुभांगी ॥६॥
परी पुसलें त्वां नवल कोणतें तें ? सांग पुसतों तरि सर्व चरित्रातें ;
पिता कोठिल तव कोण तुम्ही आहां ? काय म्हणुनी एकांत सेवितां हा ॥७॥
सर्व चिन्हें येथील भासताती, शौर्य कीर्ति प्रत्यक्ष उभ्या मूर्ती;
तेज ऐसें विपिनांत तरी वांया, गुप्त कारण तें काय लोपवाया ॥८॥

होय ऐसें हें विजय पूसतांची, स्थिती कैशी विपरीत कुमारीची !
पूर्व गोष्टीच्या आठवणें चित्तीं, खेद गहिंवर तत्काळ लोटताती ॥ ९ ॥
दाखवाया गृहवस्तु परजनांते, साहाजिक जें औत्सुक्य मनीं होतें;
सर्व विलया जावोनि दुःखसिंधु, उचंबळला स्रवताति बाष्पबिंदु ॥१०॥
कंप किंचित अधरास, दुःखचर्या, नसे आवर मोहास दुर्निवार्या;
वस्त्र वदना लावोनि शांतदृष्टी, दुःख लपवाया व्यर्थ होय कष्टी ॥ ११ ॥
अशीं दुःखें अवचीत सुंदरीचीं, विजयसेनें अवलोकियलीं साचीं;
मनीं कळवळ, चांचल्या नेत्रपद्मीं, दयाकुसुमें विकसोनि हृदयसद्मीं. १२
उठूं पाहे, परतोनि शांत होई, अंग सरसावुनि तोल पुढें देई;
गमे तिजला हृद्यास दृढ धराया, दुःख अवलेचें स्वोदरांत घ्याया. १३
काय बाले ! तुज काय दुःख झालें? काय दुखवीलें हृदय कठिण बोलें?
काय तुजला प्रिय आज आठवीलें, काय अथवा भय मानसीं उदेलें. १४
तुला कथिली मम गोष्ट मात्र आतां, तुझ्या पुसलें कीं ह्मणती काय ताता;
जरी कारण दुःखास तुझ्या हेंही, गोष्ट विपरित ही गुप्त असे कांहीं॥१५॥
तुझ्या गहिंवर अवचीत भरे चित्तीं, काय तुमची मग ऐशि ती विपत्ती ?
तरी वद वद वद गोष्ट तुझी सारी, शक्य असल्या होईन साहकारी. १६
वदे—धिग्दैवा ! हाय ! महाताता ! काय वैभव तें काय गती आतां !
कसे नसिबा विपरीत तुझे ताळे ! सर्व आठवतां चित्त हाय पोळे ॥ १७ ॥
काय जयपुर ते ! काय हा प्रसंग ! नृपद्रोह्यांशीं व्यर्थ खरा संग !
काय भावी परिणाम तो कळेना, तुझें ताता हें दैव देवसेना ॥ १८ ॥
तुह्मी वदलां जयपूरचे अहों कीं, कसा ठावा मत्तात नसे शंकीं ;
कालगति जो जाणोनि दूर गेला, नसे स्मरणींही ठाव कसा त्याला. १९
देवसेनाचें नांव जयपुराला, पुरुन उरलें हें ठाउकें जगाला;
राजभक्तीनें सुदृढ चित्त ज्याचें, हाय ! दुःखी परि तेंच काज साचें. २०
मालपुरचा ठाकूर नृपद्रोही, नृपाज्ञेनें कीं त्यास जिंकितांही ;
आह्मीं स्वामीचा बोल मान्य केला, हाच दैवा अपराध काय झाला ॥२१॥

अहा सदया जयसेन महाराजा ! देवसेनावरि कोप काय काजा ?
उपेक्षा का करितोस हे कृपाळा ? कसा अमुचा अव्हेर असा केला ॥२२॥
द्वारकेशा सर्वज्ञ ! सत्य सांगे ! भाव अमुच्या चित्तांत कसा वागे ?
सदा प्रेमें मत्तातमनीं आर्ती, कधीं डोळां पाहीन राजमूर्ती ॥ २३ ॥
रायचित्तीं हा व्यर्थ कोप तापे ! व्यर्थ दूषविलें हृदयही विकल्पें !
शौर्य कीर्ती जरि विपुल मतिपत्याची, कशी स्वामीला भीति सेवकाची. २४
कसा रायाचा कोप या भयानीं, व्याप्त झाला कीं वास वनीं रानीं;
तीन वरुषें ही भोगितों विपत्ती, किती आठवुं ती कष्टदशा चित्तीं ॥२५॥
दैव कैसें विपरीत हा कपाळा ! नृपद्रोह्यांशीं संग अह्मीं केला !
दुष्ट कपटी ते मैर दुराचारी, स्नेह दाखवुनी छळिति अह्मां भारी ॥ २६ ॥
विजयसेना जयपूरचीं सुवृत्तें, अधीं कळवा तीं प्रीय स्वस्थचित्तें;
जरी अंतरली ती स्वजन्मभूमी, हृदय सद्गद होईल तिच्या नामी ॥२७॥
कुठें अमुचा जयसेन महाराणा ? नाम ज्याचें आधार असे प्राणा !
तयांचीं तीं पाहातसां निशाणें, सौख्य तैसें आह्मांसि दुःख जेणें ॥२८॥
एक दावित मत्तातभावभक्ति, दुजें तैसें सत्कीर्ति शौर्यशक्ति;
मालपुरचा ध्वज काय देखियेला,—प्राप्त झाला समरांत मतिपत्याला॥२९॥
असें भाषण सप्रेम मनोभावें, करुनि रमणी क्षणएक ती विसावे;
स्वजनवार्ता निष्कपटज्ञा मनाला, सदा वाटे उल्हास कथायाला ॥३०॥
उभा राहे, अस्वस्थचित्त होई, तिच्या जवळीं जाऊनि उभा राही;
पुन्हां निरखुनि सप्रेम सुंदरीतें, वदे दुःखित होऊनि काय तीतें ॥३१॥
सखे बाले सुकुमार दैवसेने ! तुह्मां कैसे हे क्लेश दुर्दशेनें !
नको बोलूं तव गोष्ट ठावकी ती ! कशीं निजकृत्यें सुजन नाठवीती. ३२
असो विघटित गत गोष्टि त्या न होती, तसा नलगे पाल्हाळ पाटवोक्ति ;
तुला वदलों होईन सहाकारी, तरी पुरविन तें वचन सत्प्रकारीं ॥ ३३ ॥
तुला ठावें सन्निहित या स्थलाला, महाराणा जयसेन तोचि आला ;
नृपद्रोही दुःशील मैर दुष्ट, तयां तच्छळीं भोगविले कष्ट ॥ ३४ ॥

तुझी वार्ता नेशील तया कानीं, कष्टमोचन होईल सत्य मानी !
त्वरित अविलंबे तेथवरि जाणें, असे सन्निधही भूपतिचें ठाणें ॥ ३५ ॥
असें ऐकुनि चपलाक्षि तया कालीं, चकित घाबरली म्लानमुखी झाली !
वृत्ति चंचल–करुं काय–होय ऐशी, दीन वदनें प्रार्थीत ते तयाशीं ॥३६॥
अहो बाई ! होईल कसें आतां ! तात माझा ! हे धांव उमाकांता !
तुह्मी तरि जा सुद्याला विजयराया ! तात माझा-प्रियतात-वांचवाया।३७
सुप्रभातीं मृगयेस वना गेला ! कसा नाहीं अद्यापि गृहा आला ?
त्यास कांहीं विपरीत सत्य मानीं ! नेणुं नेलें कीं राजसेवकांनीं॥ ३८ ॥
भीरु बाले ! तुज व्यर्थ भीति पाहीं ! कसा तुजला विश्वास असा नाहीं ?
जरी नेलें नृपसेवकीं तयाला, असें ठावा त्वत्तात त्या नृपाला ॥ ३९
कठिण हृदये ! कां मानिशी नृपातें, क्रूर, कपटी, उद्यक्त विनाशातें ?
नको शंका हृदयांत अशी कांहीं, त्वरित जाऊनी तूंच तया पाही "॥४०॥
पुरुष निष्ठुर, बहु धीट विचाराचे, कसें कळणें सामर्थ्य तें स्त्रियांचें ?
भीरु अबला, अज्ञान अह्मीं पंगू, मान, लज्जा, कुलिनत्व, हीं न भंगू. ॥
नसे परिचय परिपाठ कुठें जाणें, भेट देतिल मजलागिं कसे राणे ?
धीट चालकता समय साधण्याची, स्त्रीस्वभावा कोठून असायाची ॥४२॥
व्यर्थ जन्मुनि मी ! व्यर्थ हें स्त्रियांचें, जिणें धिग्दैवा ! काय करायाचें ?
जरी असता मज्जन्म पुरुषदेहीं, दशा ऐशी कां तात भोगिता ही ॥४३॥

# विनायक कोंडदेव ओक

हे लोकप्रसिद्ध ग्रंथकार व कवि, रत्नागिरी जिल्ह्यांत गुहागर येथें आपल्या आजोळीं इ. स. १८४० ह्या वर्षी जन्मले. हे जातीचे कोंकणस्थ हिरण्यकेशी ब्राह्मण. ह्यांचीं आईबापें हे चार पांच वर्षांचे असतांच मरण पावलीं. ह्यांचें बाळपण ह्यांच्या मूळच्या गांवीं ह्मणजे हेद्वी येथें गेलें. लहानपणचा विद्याभ्यास घरीं खासगी पंतोजीजवळ झाला. पुढें कांहीं दिवस हे चिपळूणच्या मराठी शाळेंत विद्यार्थी होते. त्यानंतर इ. स. १८५८ पासून १८६१ पर्यंत ह्यांस सातारा येथील इंग्रजी शिक्षण मिळालें. पुढें इ. स. १८६१ पासून इ. स. १८९५ च्या मार्च महिन्यापर्यंत ह्यांनीं एकुणतीस वर्षें शिक्षकाचें व सहा वर्षें दुय्यम 'एज्युकेशनल इन्स्पेक्टरां'चें काम केलें, आणि नंतर 'पेनशन' घेतलें. ह्यांचा मराठी भाषेंत गद्य व पद्य लिहिण्याचा व्यासंग मोठा होता; व तो सुमारें तीस चाळीस वर्षें सतत चालू होता. त्या योगानें मराठी भाषेंतील सुप्रसिद्ध ग्रंथकारांत ह्यांची गणना झाली आहे. इतर विषयांवरच्या पुस्तकांखेरीज ह्यांनीं मराठी पहिलीं पांच क्रमिक पुस्तकें लिहिलीं आहेत. शिवाय मुंबईमध्यें निर्णय-सागर छापखान्यांत **बालबोध** ह्मणून जें मासिक पुस्तक २५ वर्षें नियमितपणें चाललें होतें, त्यांतील सगळे लेख यांचेच असत. ह्या नवनीतांत ज्या कविता त्यांच्या ह्मटल्या आहेत, त्या सगळ्या बालबोधांतून निवडून घेतल्या आहेत. शिवाय, **पुष्पवाटिका**, ह्मणून एक लहानसें कवितांचें पुस्तक ह्यांनीं लिहिलें आहे. हे कितीएक वर्षेंपर्यंत इंदुप्रकाशाचे मराठी एडिटरहि होते, विविधज्ञानविस्तारांतही ह्यांचे कितीएक निबंध प्रसिद्ध झालेले दिसतात. यांची कविता, व्याकरणशुद्ध आणि सरळ असून बोधपर आहे. प्रस्तुत कवीनीं पुष्कळ वर्षें सरकारी पेन्शनीचा उपभोग घेऊन व मराठी वाङ्मयांत अनेक लहान मोठ्या सुबोध ग्रंथांची भर घालून, वयाच्या ७४ व्या वर्षी ता. ९ आक्टोबर सन १९१४ रोजीं मुंबई शहरीं त्यांचें देहावसान झालें. त्यांचा ग्रंथलेखनाचा व्यासंग शेवटपर्यंत उत्साहपूर्वक आणि अव्याहत चालू होता.

## उद्यांचा काय नेम ?

भुजंगप्रयात.

तुझीया मनीं चांगलें व्हावयाचें ; तरी आज हो पर्व हें सोनियांचें !
असे वागले मोठमोठे शहाणे ; उद्यां काय होईल तें कोण जाणें ? ॥ १॥
धरित्रीवरी काल जीवंत ठेले ; तयांतील पाहा किती आज मेले !
तुला ही अवस्था नसे का वहाणें ? उद्यां काय होईल तें कोण जाणें॥२॥
पुढें हें करूं, तें करूं, पुण्य साधूं ; धनें मेळवूं मंदिरें थोर बांधूं ;
भ्रमीं वेड या शुद्ध आहे रहाणें ; उद्यां काय होईल तें कोण जाणें ॥३॥
दरिद्री, मुके, आंधळे, पाहतोसी ; असे नेम का कीं तसा तूं न होसी ?
अकस्मात ये हें जिणें दीनवाणें ; उद्यां काय होईल तें कोण जाणे?॥४॥
नसे आळसासारखा चोर लोकीं ; अमोलीक आयुष्य तो चोरतो कीं ;
'उद्यां हो उद्यां' हे तयाचे बहाणे ; उद्यां काय होईल तें कोण जाणें॥५॥
म्हणोनी तुला वाटतें जें करावें ; करायास तें आज बा लाग भावें ;
दुजा आजच्या सारखा वेळ नाहीं ; विचारोनी चित्तीं खरें काय पाहीं. ६

## आंब्याचें झाड.

वसंततिलका.

आम्रा ! तरू दिसति या शतशा वनांत,
नाहीं तुझ्यासम दुजा गमतें मनांत ;
आहेत कीं गुण तुझे उपयुक्त मोठे,
नाहीं तयांस तुलना भुवनांत कोठें ॥ १ ॥
आहेत पल्लव तुझे शुभकार्यचिन्हें,
संतोषती जनमनें बघतां विखिन्नें ;
अन्यांत हा गुण पहा तिळमात्र नाहीं ;
वंदूं नये मग तरो ! तुज कां जनांहीं ? ॥ २ ॥

उष्णीं दमोनि तवसान्निध ये प्रवासी,
छाया तुझी प्रथम दे सुख बा तयासी;
त्यानंतरें अमृततुल्य तुझ्या फलांहीं
होतें अमूप सुख कोण म्हणेल नाहीं ? ॥ ३ ॥
सर्वीं समानपण केवळ मूर्तिमंत
ठायीं तुझ्या वसतसे गुण हा पसंत;
कीं कोकिळीं अधिक लोभ उणा न काकीं
वाखाणितात गुण हा सुर सर्व नाकीं ॥ ४ ॥
कोणाकडून उपकार कधीं न घेणें,
जें देववेल सुख तें इतरांस देणें;
या वर्तना बघुनि साधुहि लाजताती,
कीं भक्ति ते करुनि मुक्तिस मागताती ॥ ५ ॥
ज्या ईश्वरें जनु दिलें तुज भूमिलोकीं,
त्याची अशीच निरपेक्ष कृती विलोकीं !
बापांतलें वळण पूर्ण मुलांत आलें,
आश्चर्य तें तरुवरा ! वद काय झालें ॥ ६ ॥

## एका शेतकऱ्याचे विचार.

आर्या.

इतर व्यवसायाहुनि कृषिकर्म मला खरें भलें गमतें;
उत्तम ह्मटलें आहे तेंचि यथायोग्य होय लोकमतें ॥ १ ॥
पृथ्वी, पय, वायु, तसा प्रकाश, हीं साधनें तया असती;
तीं ईश्वरदत्त सकल, हातीं मनुजांचिया मुळीं नसती ॥ २ ॥
पृथ्वी ही सर्वांची माय, हिची करुनियां विमल सेवा;
पोट भरावें हें बहुमान्य असे मानवां तसें देवा ॥ ३ ॥

खोटें भाषण करणें अथवा परवंचना नको यांत ;
शुद्ध व्यवहारानें मनुजांचे हेतु पूर्ण होतात ॥ ४ ॥
शेतामध्यें श्रमतां होतो व्यायाम विपुल देहातें ;
रोगांचें मूळ सकळ अजीर्ण तें सहज कीं लया जातें ॥ ५ ॥
वायु सुनिर्मळ मिळतो, तेणें होतो मनास आनंद ;
पादपकोटिनिरीक्षण हा सुखकर लागतो मना छंद ॥ ६ ॥
चित्रविचित्रां वर्णी पुष्पांच्या पाहतां स्वनयनांतें ;
होय समाधान, शके वर्णाया तें नये कधीं मातें ॥ ७ ॥
येतो तसाच परिमळ अत्यंत मनोरम प्रचुर त्यांचा ;
होतो हर्ष तयानें त्याचा गौरव किती करायाचा ॥ ८ ॥
त्यांत चमत्कृति पाहुनि मन परमेश्वरकर्ताकडे वळतें ;
तेणें त्याचें मोठेपण चातुर्यहि खरोखरी कळतें ॥ ९ ॥
बीजांतुनि वृक्ष कसा, वृक्षापासून बीज हें कैसें ;
उत्पन्न होय आधीं कोण मग घडी बरोबर न बैसे ॥ १० ॥
स्त्रीपुरुषांच्या जाती प्राण्यासम पादपांतही असती ;
हें अनुभवोनि बघतां कुंठित होते खरोखरीच मती ॥ ११ ॥
तेंचि पिकतसे क्षेत्रीं जें आपण करुनि यत्न पेरावें ;
ह्याचा प्रत्यय येतो व्यवहारीं यावरून हेरावें ॥ १२ ॥
करितां प्रेम जनांवर, जन करिती प्रेम आपणांवरती ;
करितां साह्य तयांना व्यसनीं ते साह्य आपणां करिती ॥ १३ ॥
करितां परमेशाची भक्ति, करी तो कृपा कधीं न चुके ;
देती साक्ष महाजन आजवरी अमित जाहले तितुके ॥ १४ ॥
याचा अनुभव घ्यावा, यांतचि आयुष्य सकल खरचावें ;
संसारसुखा भोगुनि या पंथें सरळ नीट घर जावें ॥ १५ ॥

## ग्रंथकारांस वंदन.

भुजंगप्रयात.

अहो ग्रंथकर्त्ते ! तुम्ही थोर साचे, खरें साधितां कीं हिता माणसांचें ;
करावें तुम्हां वंदना भक्तिभावें, यशा तूमच्या निर्मला नित्य गावें ॥ १ ॥
अनंतीं युगीं फार मागील कालीं, अनंतें मनुष्यें क्रिया हीं जहालीं ;
तयां जाणणें, हें सुदु:साध्य होतें, तुह्मीं साध्य केलें स्वकर्मे अहो तें ॥२॥
अहा ! राम कोठें, तसा कृष्ण कोठें, कुठें बौद्ध तो, वाटतें चोज मोठें ;
तयांचीं जनां दर्शनें व्हावयासी, तुह्मीं निर्मिला मार्ग सोपा प्रयासीं ॥३॥
कथी व्यास आम्हां स्वयें भारतातें, तसें दाविती योध युद्धक्रियांतें ;
गुरू ऐकवी भाषणातें स्ववाचे, असे भोग घेतों नवांही रसांचे ॥ ४ ॥
जनां या जगीं काय जें सौख्य होतें, कृतींनीं खरें तूमच्या कीं अहो तें ;
पुढें राहिलें काय सांगावयाचें ? न वाटो अलंकार हा व्यर्थ वाचे ॥५॥
तयांनीं झडे पापसंताप सारा, मनातें मिळे ज्ञानसौख्यांत थारा;
क्षमा, शांति, वैराग्य, इत्यादि येती, स्वयें तीं लया दु:खशोकास नेती. ६
स्वतां ईश्वराला खरें ओळखाया, तसा स्वर्गलोकाप्रती नीट जाया ;
तुह्मीं दाविला मार्ग साधा जनातें, करावें किती तूमच्या गौरवातें ॥७॥
सदा देव देवो तुम्हांला यशाला, करावें तुम्हीं साह्य आह्मां जनांला ;
अशी प्रार्थना ही करोनी तुम्हांतें, करीतों पुन्हां एकदां वंदनातें ॥ ८ ॥

---

## वृद्धाचा पश्चात्ताप.

भुजंगप्रयात.

मला वाटतें काय आतां करावें, कुणाला शिरीं या प्रसंगीं धरावें ;
जना तोंड दावावया लाज वाटे, नये वर्णितां दु:ख हा कंठ दाटे ॥१॥
दिसेना तसें आयकायास येना, प्रपंचांतलें कार्य कांहीं घडेना ;
नये दाम तो एकही मेळवाया, तरी लागतें खावया प्यावया या ॥ २ ॥

मुलें माणसें मानिती तुच्छ मातें, धरे भार मी वाटतों या जनातें ;
'मरेना कधीं एकदां !' बोलताती, उठे कां न माझी जगांतून माती ॥३॥
असें व्हावया कारणें काय झालीं, अतां माझिया पूर्ण लक्षांत आलीं ;
परी 'वैल जाऊन झोंपा करावा,' तसा जाहला कीं प्रकारू पहावा ॥४॥
अहा बाल्य तारुण्य पौगंड्य होतें, तदा वेंचिलें व्यर्थ मीं कीं अहो तें ;
असा वेळ येईल ऐसा मनाला, विचारू कधीं माझिया ही न आला. ५
न संपादिली चांगली शास्त्रविद्या, दिलें लक्ष तैसें न गद्या न पद्या ;
न केला मुळीं संग्रहो सद्गुणांचा, अतां भोगितों हा विपाकू तयाचा ॥६॥
अशी दुर्दशा ही न यावी तुम्हांतें, जपावें तुम्हीं आपुलाल्या वयातें ;
असा हेतु आणोनि चित्तीं तुम्हांला, कथा जाहलों सिद्ध सांगावयाला. ७
हरीच्या कृपें ही घडो बोधकारी, तुम्हांतें स्वभावें अनेकीं प्रकारीं ;
तिनें तूमचें नित्य कल्याण व्हावें, असें ईश्वरा मागतों एकभावें ॥ ८ ॥

---

## मनुष्याची दुर्बलता.

### आर्या.

काय तुझ्यानें सूर्य प्रकाशणें लांबवेल वद आधीं ;
नाहीं, तर तुजला मग समर्थ मी ही कशास बा व्याधी ॥ १ ॥
वायु वहाणें आहे कां बा तुझिया मुळीं तरी हातीं ;
नाहीं, तर मग तुजला सामर्थ्याची कशी अहंता ती ॥ २ ॥
पर्जन्यवृष्टि करणें येतें तुज काय सांग सांग खरें ;
मग निज सामर्थ्याचा गर्व मिरविशी कशास फुकट बरें ॥ ३ ॥
तारुण्य बहु सुखावह काय तुला धरुनि ठेवितां येतें ;
नाहीं, तर वायां कां मन गर्वो व्यर्थ बा तुझें घेतें ॥ ४ ॥
वार्धक्य दुःखदायक, तें टाळवतें तुला वदें काय ;
नाहीं ! मग मी मोठा, हा डाल कशास रे तुला हाय ॥ ५ ॥

गेलें पळ आणाया आहे सामर्थ्य काय वद मागें ;
नाहीं, तर तूं मोठा कशावरुनि तें मला स्वयें सांगें ॥ ६ ॥
सोडोनि खऱ्या देवा भजती जन भलतिया तयां वाटे ;
लावायाचें आहे बळ का तुजला तुला कसें वाटे ॥ ७ ॥
निजराष्ट्र हितपथाला टाकुनि बहकोनि लागले जाया ;
त्यांना न आणवे तुज मार्गावर गर्व कां करिसि वायां ॥ ८ ॥
इतर असोत, तुला तव चित्त स्वाधीन ठेववेना हें ;
दुर्बलपण अल्प नव्हें ! शांतपणें मनन करुनियां पाहें ॥ ९ ॥
कामक्रोधादि सहा रिपु नेती मानवास नरकास ;
हें जाणत असतां तुज त्यांची बा सोडवे न ही कास ॥ १० ॥
मग मी मोठा ज्ञानी, कर्त्ता सामर्थ्यवान हा गर्व ;
तूं करतोस कशाला ? दे टाकुनि एकदांचि तो सर्व ॥ ११ ॥
हो नम्र सकल लोकीं, विनय धरीं विपुल आपल्या कामीं ;
कर परहित, संतत मग यशसुख नांदेल बा तुझ्या धामीं ॥ १२ ॥
व्हायाला प्रिय लोकां, तैसा परमेश्वरासही नाकीं ;
सत्यविनयपरहितधी धरीं हृदीं मीपणा सकल टाकीं ॥ १३ ॥

---

## लेखणीची प्रार्थना.

साक्या.

अये लेखनी ! चरित असे तव वर्णनीय कीं मोठें !
त्याशीं साम्य कराया दुसरें नाहीं जगांत कोठें ॥ १ ॥
ह्या धरणीवर जनन जहालें तुझें कधीं हें ठावें ;
नाहीं कोणा, तेव्हां त्याचें वर्णन कसें करावें ॥ २ ॥
आजवरी जे मोठे मोठे होउनि गेले पाहीं,
त्यांचें तुजला हातीं धरिल्यावीण चाललें नाहीं ॥ ३ ॥

तुजला हातीं धरल्यावांचुनि विधिचें काम न चाले ;
मग मर्त्याचें न चले, तेथें विशेष काय जहालें ॥ ४ ॥
मनोभावना असती साऱ्या खरोखरीच अकाय,
काढायाला चित्र तयांचें तूंच एक सदुपाय ॥ ५ ॥
करिसि अनंगा सांग, शक्ति हे विचित्र आहे मोठी !
लाभ जहाले तिजपासुनियां जनांस कितेक कोटी ॥ ६ ॥
आजवरी जो धरणीवरती ज्ञानसंग्रहो झाला,
तो केवळ तूझिया प्रसादें; ऐसा अनुभव आला ॥ ७ ॥
करिसि कृपा तूं ज्यावर तो जन यशधनसुखही लाधे ;
दुर्गुण दुःख तयाला सहसा व्यवहारांत न बाधे ॥ ८ ॥
देवाजीचा गौरव देखिल तुझिया कृपेंचि झाला ;
हें खोटें कीं खरें, पुसावें सकलां भक्तजनांला ॥ ९ ॥
तुला प्रार्थना आहे आह्मां एकचि करावयाची ;
कृपा करुनि ती मान्य करावी साधु म्हणुनियां साची ॥ १० ॥
सद्गुण होती नित्य सुखावह, दुर्गुण दुःखद होती ;
हें ठसवावें तत्त्व जनांच्या दृढतम अखंड पोटीं ॥ ११ ॥

---

## मनुष्य आणि घड्याळ.

शार्दूलविक्रीडित.

मनुष्यः—

कां तूं ही किटकीट लाविसि कळे ना माझिया बुद्धिला,
आहे काय अशांत लाभ तुजला तूं सांग आधीं मला ;
एकी मागुनि एक नित्य घटिका जाती निघोनी तयां,
येतें काय तुला धरोनि अथवा बांधोनि ठेवावया ॥ १ ॥

घड्याळः—

नाहीं लाभ तयांत एक तिळही मातें पहाता जरी,
आहे त्यांत परोपकार उपमा नाहीं असा कीं तरी ;

अत्यंत प्रिय आयु जें नकळतां तें चाललेंसें कसें,
दावावें सगळ्यांस सावध करूं हा हेतु माझा असे ॥ २ ॥
मनुष्यः—
हा तो हेतु असे खरोखर तुझा देवादिकांच्या परी,
वर्णाया न शके बृहस्पतिहि कीं माहात्मता ती खरी ;
ज्ञानी दावुनि राहणें निमुट हें सुज्ञां न शोभे कधीं,
तीचें वारण सांगणें सुजनता मोठी असे यामधीं ॥ ३ ॥
घड्याळ:—
देवानें मनुजां तुम्हां प्रथमता उत्पन्न केलें पहा,
मातें जन्म दिलें तुम्हीं रचुनियां युक्तिप्रयुक्ती अहा ;
जैसा देव तुम्हां पिता, जन तुम्हीं माझे पिते हें खरें,
बोधावें कवणा कुणीं निजमनीं पाहोनि सांगा बरें ॥ ४ ॥
देवानें सुविचारबुद्धि दिधली आहे तुह्मा मानवां,
आहे कारण ती अहो ! तुमचिया या सारिया वैभवा ;
वेळाचा व्यय ती तुह्मां जपुनियां सांगेल खासा तसा,
निष्ठापूर्वक हो करा मग सुखें आनंदरूपें बसा ॥ ५ ॥
देवाला भजणें, नयें विचरणें, सुज्ञान संपादणें,
अन्याचें हित साधणें बुधजनां सप्रेम सन्मानणें ;
चित्तीं शांतिदयाक्षमादि धरणें, दीनास संभाळणें,
यांमध्यें घटिका पळें खरचणें, ऐसें जगीं राहणें ॥ ६ ॥

---

## मंचाबाईस अहल्याबाईचा बुद्धिवाद.

आर्या.

मंचाबाई ! तुजवर ओढवला कीं प्रसंग दुस्तर हा !
ठेवुनि देवावरतीं भार तरी करुनि चित्त शांत रहा ॥ १ ॥

आतां याविण दुसरा मार्ग तुला सुगम राहिला नाहीं;
आग्रह धरोनि भलतें साहस सहसा करूं नको कांहीं ॥ २ ॥
परमेश्वरें तुला हा देह तशी बुद्धिही दिली आहे;
त्याचा सद्व्यय कैसा होईल हें नीट तूं मनीं पाहें ॥ ३ ॥
जातां सती तुझा हा देह तशी बुद्धि जळुनि जाईल;
हें सत्कर्म म्हणाया सुज्ञांची जीभ काय वाहील ॥ ४ ॥
आहे तुझियावरतीं स्वामित्व तुझेंच एकटीचें का ?
आइच्या नात्यानें अंश नसे त्यांत कायगे लेंका ॥ ५ ॥
स्वपतीची तूं भार्या, या बाळाची तशीच तूं आई,
या पोरकें कराया तुजला अधिकार बोलगे काई ॥ ६ ॥
मी तव माता, कां तूं मजला दुःखार्णवांत बुडवावें ?
समजुनि उमजुनि पायांखालीं कां नीतिशास्त्र तुडवावें ॥ ७ ॥
मी राज्ञी, तूं माझी आहेस खरी प्रजा यथान्याय;
तुझिया जीवावर वद, माझी सत्ता मुळीं नसे काय ॥ ८ ॥
देवानें तुज दिधला देह तशी बुद्धिही करोनि दया;
जाळोनि टाकितां त्या नाहीं येणार काय राग तया ॥ ९ ॥
पुत्राची, मातेची, राजाची आणि विश्वपालाची
सत्ता तव जीवावर आहे; शास्त्रोक्ति हे पहा साची ॥ १० ॥
या सर्वांस न गणितां जातें म्हणतेस आग्रहेंचि सती !
त्या तुज काय विबुधजन ह्मणतील खरोखरी पवित्र सती ॥११॥
कर पुत्राचें पालन, देवाचें भजनपूजनप्रचुर;
ऐसें आयु खरचितां साध्वी म्हणतिल तुला मुली ! चतुर ॥१२॥

---

## मेघान्योक्ति.

आर्या,

बा जलदा ! कठिण हृदय करोनियां कुतुक पाहसी काय ?
ये ना दया तुज कशी ? जरि करिती तडफडोनि जन हाय ॥१॥

शेतें वाळुनि गेलीं, नद, वापी, कूप, कोरडे झाले;
सर्वांचेही कंठीं प्राण निघुनि जावयास कीं आले ॥ २ ॥
पाहोनि दुर्दशा ही, ये ना तुजला दया कशी बापा;
सदय समर्थ असुनि तूं होसी कां व्यर्थ पात्र बा शापा ॥ ३ ॥
येइल समीर मोठा उडवुनि टाकील तूजला जेव्हां;
करशील काय ? वद, रे ! निजरक्षण तूं करावया तेव्हां ॥ ४ ॥
अथवा हिमालयासम नग तुज ओढील निजशिरीं जेव्हां;
जाईल फुकट जल तव, करशिल वद, काय त्यास बा तेव्हा ॥५॥
अथवा दिनकर टाकिल निजकिरणीं बाष्प करुनियां तूतें;
मग उपकार कराया साधन राहील काय ? वद, तूं तें ॥ ६ ॥
हें आणोनि निजमनीं त्वरा करीं उपकृती करायाची;
बा संपत्ति अशाश्वत, दुपारची सांवलीच ही साची ॥ ७ ॥
जल आहे जवळ तुझे, तों तें दीनास दे उदारपणें;
नाहीं येणार पुढें ही संधी करुनि खटपटी जपणें ॥ ८ ॥
मग पश्चात्तापानें हाइल तें दुःख परम दुःसह रे !
तें टाळायाकरितां सावध होणें खरोखरीच बरें ॥ ९ ॥
दाता होणें दुर्लभ, तें घ्यावें पर्व तूर्ण साधोनी;
याचकता सहज मिळे, नलगे आणावयास मागोनी ॥ १० ॥
द्रव्याला मार्ग असति जायाला तीन सांगती लोकीं;
दान प्रथम, दुजा तो उपभोग, तिजा विनाश अवलोकीं ॥ ११ ॥
दान न दे, भोग न घे, त्याच्या वित्तास नाश यायाचा;
हा नियम दिला लावुनि विधिनें न कदापि तो चुकायाचा ॥१२॥
निज संपत्तीचा लव उपभोग न घ्यावया तुला ये कीं !
कर दान, कीं तियेचा विनाश होऊं नये उगा शेखीं ॥ १३ ॥

## देवापाशीं मागणें.

भुजंगप्रयात.

मला रोजचें अन्न दे देवराया ! क्षुधा लागते शांत तीतें कराया,
न खाण्याविणें जीव हा स्वस्थ राही; म्हणोनी तुला भाकितो याचना ही॥१॥
तसें धैर्य दे दुःख सोसावयासी, घडे पावलोपावलीं जे जिवासी :
तयानें सदा दुःख सारें उणावे, नसें तें तिथें तें स्वभावें दुणावे ॥ २ ॥
खरें ज्ञान दे भ्रांति वारोनि सारी, जगीं वर्तना होय जें साह्यकारी ;
न कीं वाउगें कर्म हातीं घडावें, न पाऊल वाईट मार्गीं पडावें ॥ ३ ॥
मनें आणि देहें जनांचें करावें, बरें, त्यांत आयुष्य सारें सरावें; ;
अशी बुद्धि दे अक्षयी विश्वपाला ! घडावें तिनें सार्थकू या जिवाला ॥४॥
सदा संग दे सज्जनांचा वसाया, सुखाचें खरें स्थान कीं तें बसाया ;
शिवेना तिथें दुःख, आनंद सारा ! म्हणोनीच तो मागतों मीं उदारा॥५॥
सुधर्मीं सदा दे मला शुद्ध निष्ठा, मनाला गमो तीच सारी प्रतिष्ठा ;
तिनें सर्व कांहीं जगीं प्राप्त होतें, न ती ज्यांस, ते नित्य खातात गोते॥६॥
तुझ्यावीण अन्यास हें द्यावयाची, नसे शक्ति कोणास ही गोष्ट साची ;
म्हणोनी तुला प्रार्थितों एकभावें, करोनी कृपा पूर्ण तें तूं करावें ॥ ७ ॥

---

## आनंदीबाई आणि राघोबादादा.

आर्या.

आनंदीबाई:–

इकडे मेलें काहीं नकले याला उपाय काय करूं ?
सोसुन अपमान असा, दिवस किती आंवरून जीव धरूं ॥१॥
हिंदुस्थानीं जावें, यवनातें करुनि समर जिंकावें ;
त्याचें फल इतरांहीं बसुनि घरीं चैन करुनियां खावें ॥ २ ॥

अणखी वरत्या चेष्टा करिती, त्या सोसणें निमूटपणें !
याला काय ह्मणावें ! सदनाहुनि सुखद तें वनीं वसणें ॥ ३ ॥
अपमानही न कळणें हें भोळेंपण कधीं न शोभावें !
वाटे टाकुनि सगळें काशीरामेश्वरीं तरी जावें ॥ ४ ॥
राज्योपभोग अथवा परमार्थ तरी जपोनि साधावा ;
इहपर लाभ नसोनी इकडेतिकडे उगाच कां धांवा ॥ ५ ॥
हें एवढें न कळणें याहुनि अज्ञान कोणतें मोठें ?
या बावळेपणाला उपमा नाहीं जगामधें कोठें ॥ ६ ॥
देवा कोणी न पुसे, तेथें गुरवास कोण हो पुसतें ?
अणखी काय वदावें ? मरण वरें या जिण्याहुनी नुसतें ॥ ७ ॥

राघोबादादाः—

ऐसें भलतें कां तूं वदसी तुज काय लागलें वेड ?
आणावी काय ह्मणुनि मनीं अशी व्यर्थ सांग ही तेढ ॥ ८ ॥
कलहानें आजवरीं कोणाचेंही बरें नसे झालें ;
हें जाणत असतां, हें भूत कसें अंतरीं तुझ्या आलें ॥ ९ ॥
नारायण तो बालक, त्याला राज्यासनीं बघोनि मला
आनंद फार होतो त्याचा अनुभव कधीं न ये तुजला ॥ १० ॥
सगळी प्रजा जयाला देवासम वंदिते मनोभावें,
त्यानें तुझिया माझ्या चरणीं होउनि विनम्र लागावें ॥ ११ ॥
याहूनि भाग्य मोठें दुसरें देवास काय मागावें ?
मोठ्या पुण्यावांचुनि वांट्यांला हें अगे ! कसें यावें ॥ १२ ॥
ऐशी केली समजुत पुष्कळ बोलोनियां तरी गेलें
सारें फुकट ! जणूं तें रोदन रानांत राघवें केलें ॥ १३ ॥
लागोनि परिस होतें लोखंडाचें सुवर्ण म्हणति कवी ;
ज्ञाता विषांतुनि महा-यत्नें अमृता कधीं कधीं पिकवी ॥ १४ ॥
परि दुर्जन चित्तातें कोणी न शके कदापि वळवाया !
कृष्णाचे विदुराचे श्रम गेले जाणतां तुम्ही वाया ॥ १५ ॥

"खल न खलत्व त्यागी, जरि सामें गौरवोनी बोळविला ;
लकुच कटुहि, अमृतकरा करवींहीं शर्करेंत घोळविला" ॥ १६ ॥
ऐसें जें पंतांनीं म्हटलें त्याची प्रतीति दाखविली ;
पुतण्याच्या रक्तानें आनंदानें स्वभूमि माखविली ॥ १७ ॥

## उद्योगाची त्वरा करावी.

शार्दूलविक्रीडित.

जा बाबा ! कर उद्यमा लवकरी सत्कार्य साधावया,
आतां हाच असे तुला समय कीं हातीं खरा घ्यावया ;
गेला काल निघोनि तो न मिळणें कांहींहि केल्या तुला,
येता काल तयावरी भरंवसा कोणीं धरावा मुला ॥ १ ॥
हां हां हां म्हणतां कितकि जन हे जाती त्यजोनी जगा,
देतें आज उद्यां उद्यां करुनि हें आलस्य मोठा दगा ;
ते सारे फसले, चुकोनी भरले जे लोक याच्या भरीं,
पाहोनी इतिहास घे करुनिया तूं आपली खातरी ॥ २ ॥
जें आहे तुझिया मनांत करणें, तें तूं करीं लौकरी,
नाहीं जोंवरि दूसरा जन कुणी स्पर्शे तयातें करीं ;
ज्या पुष्पावर दृष्टि ठेविलि तुवां त्याला दुजा स्पर्शतां,
नाहीं कीं तुज त्या कदापि कर हा येणार बा लावितां ॥ ३ ॥
ज्या स्थानीं तुजला असेल बसणें तेथें स्वयें जावया,
मार्गा धांव, उगाच कां थबकसी पाहोनि लोकांस या ;
जो तो मग्न असे सदा निजहितीं त्याला सुचेना दुजें,
अन्यांचें हित आपुल्याहुनि जनां बा नित्य वाटे खुजें ॥ ४ ॥

हा सारा जन जीवनार्थकलहीं गुंतोनियां भूवरीं,
अन्यांच्या पुढती स्वयें सुखपथीं जाया प्रयत्ना करी ;
तोंडें पाहुनि वेळ ही दवडणें, हें काम नाहीं बरें,
हें माझें कथणें तुला तव हितासाठीं गमावें खरें ॥ ५ ॥
आहे जोंवर आयु, तोंवर करी तूं आपली उन्नती,
यासाठींच तुला कृपा करुनियां देवें दिली सन्मती ;
तीचा सद्व्यय तूं करोनि अपुलें कल्याण घे साधुनी,
केला बोध असाच थोर ह्मणती त्या चागल्या साधुंनीं ॥ ६ ॥

---

## धन्याची ओळख.

अभंग.

श्वान तेंही जाणें, आपुल्या धन्यासी, विसंबेना त्यासी, क्षणभरी ॥ १ ॥
राखी त्याचें घर, राहे त्याच्या संगें ; पाहोनियां रंगे, त्याला रंगीं ॥२॥
त्याला तुष्टवाया, झटे जीवें भावें; दुसरे न भावे, त्याला काहीं ॥ ३ ॥
परंतु जयानें, जन्मासी घातलें; खाऊं पिऊं दीलें, अन्नपाणी ॥ ४ ॥
विचार कराया, बुद्धि दिली मोठी; तैशा युक्ति कोटी सुचविल्या ॥ ५ ॥
चागलें वाईट, पढविलें सारें; शास्त्रें ही अपारें, दाखवीलीं ॥ ६ ॥
पंचमहाभूतें, सेवेला लावावीं; अशी थारी यावी, असें केलें ॥ ७ ॥
तया विश्वंभरा, विस्मरोनी जातो; नादाला लागतो, वेड्या वेड्या ॥ ८॥
मी आलों कोठोनी ! जावयाचें कोठें ?काय काम मोठें, करायाचें ॥९॥
भजावें कोणाला ? मिळवावें काय ? कोणता उपाय, तारणाचा ॥१०॥
हें काहीं जनांचें, मनीं नये जेव्हां; समजावें तेव्हां, काय त्यांसीं ॥११॥
त्यासी त्या श्वानाशीं, तुळीतां जें वाटे; बोलतां तें दाटे, कंठ भारी ॥१२॥
आह्मी काहीं नाहीं बोलत तें स्पष्ट; श्रोत्यांवक्त्यां कष्ट,कशाला ते ॥१३॥

---

## मग पाहिजे तसा वाग.

वसंततिलका.

साधोनि सज्जनसमागम नित्य लोकीं,
लोकस्थिति स्थिर करोनि मना विलोकीं ;
तूं आपलें समज नीट जगांत नातें,
येईल तें मग करीं तुझिया मनातें ॥ १ ॥
शास्त्रांत वंद्य म्हटलें सकलांत आहे,
तें नीट नेत्र उघडोनि सदैव पाहे ;
तें मात्र हो सतत सिद्ध करावयातें,
येईल तें मग करीं तुझिया मनातें ॥ २ ॥
माता, पिता, गुरु, तुला कथितात जें, तें,
निःसंशयें समज तूं बहु सौख्य देतें ;
तें निश्चयें करुनि लाग करावयातें,
येईल तें मग करीं तुझिया मनातें ॥ ३ ॥
बोलें सदा धरुनि धैर्य खरेंच वाचे,
जेणें प्रबंध तुटती अवघे जिवाचे ;
कोणासही मग नको तुज भ्यावयाला !
येईल तें मग करीं तुझिया मनाला ॥ ४ ॥
जें बोलती सुजन निर्मळ, तें करावें,
कोणासही न डरतां सुपथा वरावें ;
देईल तो फल अभीष्ट, मनीं धरावें,
येईल तें मग मनास तुवां करावें ॥ ५ ॥
स्वेच्छानुरूप असल्या कर वर्तनातें,
देईल शांति सुख तें तुझिया मनातें ;
जीवा तुझ्या सुगति होईल या स्वभावें,
योगास या अनुभवोनि तुवां पहावें ॥ ६ ॥

## विचारशक्ति हाच देव.

साकी।.

लोह लागतें सानां थोरां सगळ्या व्यवसायांसी;
जिकडेतिकडे तें मनुजांतें मिळतें अल्पायासीं ॥ १ ॥
ही केली योजना जयानें, त्यानें सर्वांसाठीं;
उद्धाराचा मार्ग निर्मिला, तो सर्वांच्या हातीं ॥ २ ॥
त्या मार्गाला लागत नाहीं मोठें ज्ञान पढाया;
अथवा मोठेमोठे घांटहि मोठ्या श्रमें चढाया ॥ ३ ॥
बसल्या जागीं तो सांपडतो अज्ञातें सुज्ञातें ;
गुह्य वाटतें प्रथमदर्शनीं हें बहु लोकमनातें ॥ ४ ॥
परंतु नाहीं गुह्य ह्यामधें हें पुरतें समजावें;
तें कैसें, तें संतांपासुनि लवकर समजुनि घ्यावें ॥ ५ ॥
डोळे असती तयांस दिसतें सहज रीति आकाश ;
तें दावाया लागत नाहीं कोणा तिळ प्रयास ॥ ६ ॥
तैशी ज्यांतें विचारदृष्टी देवें दिधली आहे;
त्यांच्या पुढतीं उभा सदोदित उद्धारमार्ग राहे ॥ ७ ॥
चित्ताला जें पुण्य वाटतें तें संतत साधावें;
इतर कुणाच्या नादीं सहसा न कधींही लागावें ॥ ८ ॥
पुण्य ह्मणुनि जें केलें त्याला ईश्वर साक्षी असतो
साधु म्हणति सत्कर्माजवळीं संतोषें तो वसतो ॥ ९ ॥
विचारशक्ती हाच खरोखर परमेश्वर या लोकीं ;
तिला धरुनि चालती निरंतर संत म्हणावे हो कीं ॥ १० ॥
ह्या शक्तीचें आजवरी जे निःसीम भक्त झाले,
ते जगताच्या व्यवहाराच्या प्रखर कसोटिस आले ॥ ११ ॥

ह्याची वचतां इतिहासातें साक्ष बरोबर पटती;
ह्याविषयींची शंका सगळी आपोआपचि हटती ॥ १२ ॥
ह्यास्तव सगळ्या अंतःकरणें विचारशक्ति धरावी;
इहपरकल्याणास्तव दुसरी नलगे रीति वरावी ॥ १३ ॥

---

## दुःखाबद्दल उपकार.

—:०:—

ओव्या.

होती जेव्हां इष्ट गोष्टी, तेव्हां होते बहु संतुष्टी;
ती वेळ जाय उठाउठी, बहु त्वरें निघोनियां ॥ १ ॥
तरी तेव्हां तुझे आभार, मानावे आह्मीं फार फार;
कीं सर्व ते तुझे उपकार, विश्वाचिया पालका ॥ २ ॥
तथापि येती मोठीं संकटें, प्रचंड दुःख देहीं प्रगटे;
तेव्हां देखील आह्मीं सुभटें, तुझे उपकार मानावे ॥ ३ ॥
आमुचें हित आह्मांहूनी, जाणशी तूं अधिक मनीं;
हें निश्चयें समजोनी, विश्वासावें तुजवरी ॥ ४ ॥
कीं जें आमच्या हितासाठीं, व्हावें तेंचि तूं कृपादृष्टी ;
न मागतां पाठविशी हाटीं, दयाळूपणें आपुल्या ॥ ५ ॥
माता बालका औषध देते, तें कधीं कधीं कडू लागतें;
तरी तें आरोग्य पिकवितें, आई जाणें निश्चयें ॥ ६ ॥
तशीं दुःखेंही सुखांवाणी, पाठविशी तूं जगाचा धणी !
तीं सारीं आमच्या हिताकारणीं, ऐशीं आह्मीं समजावीं ॥ ७ ॥
आह्मीं जाणावी तुझी दया, जावें शरण तूझिया पायां;
जीवा चिंताक्रांत व्हावया, कारण नाहीं खरोखरी ॥ ८ ॥
ह्मणोनि तुजपाशीं मागणें, सुख वा दुःख गाऊनि गाणें,
सुज्ञां वाटे व्यर्थवाणें, तेंच आहे प्रशस्त ॥ ९ ॥

जें जें येईल तें तें घ्यावें, त्यांतचि सावध रहावें;
निरंतर तुजकडे पहावें, स्वस्थचित्तें करोनियां ॥ १० ॥
यांत चित्ता बरें वाटे, संसाराचें न खुपती कांटें;
आपोआप चिंता आटे, मनांतली माणसाच्या ॥ ११ ॥
ह्मणोनि हा मार्ग धरावा, यानें हा प्रपंच तरावा;
उगाच वावरू न द्यावा, जीव आपुला तयानें ॥ १२ ॥
या आचरणें शांति राहे, शांतींत सगळें सुख आहे;
हें तत्त्व जीव नित्य वाहे, ऐसें करीं दयाळा ॥ १३ ॥
हें सर्व करणें तुझ्या हातीं, ह्मणोनि वरिली शरणागती;
आशा करावी सफल पूर्ती, हेंच आहे मागणें ॥ १४ ॥

## जीवाची ओढाताण.

भुजंगप्रयात.

ह्मणे तोंड हें दे मला गोड खाया, ह्मणे नाक दे चांगला वास घ्याया;
मऊ चांगलें वस्त्र हें अंग मागे, स्वताच्या हिता मंडळी नित्य जागे ॥ १ ॥
तसा लोभ बोले मला द्रव्य व्हावें, ह्मणे क्रोध लोकीं मला भीत जावें;
समस्तांपुढें मागतों जावयाला, महा मत्सरू कोण वारी तयाला ॥ २ ॥
अशा मागण्या एक का दोन सांगूं ? तयां पूरवाया किती नित्य भागूं;
जरी वेंचिला जन्म त्यां पूरवाया, तरी तो गमे खर्चिला सर्व वायां. ३
अशी चालते सर्वदां तोड जेथें, तुझी भक्ति व्हावी कशी सांग तेथें !
गमे चालला जन्म हा व्यर्थ साचा, कसा शेवटू चांगला व्हावयाचा. ४
अशी खेदकारी स्थिती होय माझी, रहावें कसें हींत मीं सांग राजी ;
मला गांजिती हे मनोभाव भारी, तुझ्यावीण देवा तयां कोण वारी ॥५॥
तुला सेविल्यावीण मुक्ती मिळेना, मनाची मुळी ओढ कांहीं खिळेना ;
मनस्वी असे हाल होतात माझे, मुखें सांगतां चित्त हें फार लाजे ॥६॥
तुझा मी तसे हे मनोभाव सारे, खरे होत कीं त्वत्कृतीचे पसारे ;
व्यवस्था कृपें लाव तूं आज त्यांची, असें हें तुला दीन हा दास याची.७

## जगला कोण ह्मणावा ?

( वसंततिलका. )

जन्मासि येउनि बरें तितुकेंचि केलें,
आरंभिलें सकल कर्म तडीस नेलें ;
नाहीं कधीं विसरला निज सुस्वभावा,
तो मात्र एक जगतीं जगला ह्मणावा ॥ १ ॥
मान्यां जनां बहुत मान दिला सुभावें,
सत्याविणें व्रत दुजें न जयास ठावें ;
सर्वांस जो गमतसे निजमित्र व्हावा,
तो मात्र एक जगतीं जगला ह्मणावा ॥ २ ॥
संपत्तिवंत असतांहि विनम्र झाला,
संतोषवूं श्रमभरें झटला जनांला;
सर्वां जनीं नमुनि जो स्वमुखें स्तवावा,
तो मात्र एक जगतीं जगला ह्मणावा ॥ ३ ॥
सद्वर्तनीं झिजविला निजदेह सारा,
झाला अनाथजनदुःखल्यास थारा;
मित्रां परां समचि होय सदा विसांवा,
तो मात्र एक जगतीं जगला ह्मणावा ॥ ४ ॥
साधोनियां परहित स्वहितास केलें,
वेंचोनियां धन धनीपद जोडियेलें;
कोणा कधीं दुखविलें न धरोनि हांवा,
तो मात्र एक जगतीं जगला ह्मणावा ॥ ५ ॥
ऐसें जिणें मिळविण्यास सदा खपावें,
त्याला जगत्पति अपाप सदैव पावे;
आला असा अनुभवो बहु साधुसंतां,
जो घ्या तुह्मी त्यजुनियां अवघी अहंता ॥ ६ ॥

## इतिहासाचें म्हणणें.

आर्या.

मी प्राचीन किती हें कोणा नाहीं कधीं कळायाचें,
मजला कळल्यावाचुनि कांहीं नाहीं कधीं टळायाचें ॥ १ ॥
ज्ञाता माझ्या ऐसा दुसरा कोणी जगामधें नाहीं,
नाहीं ठाऊक मला ऐसें नाहीं जगामधें कांहीं ॥ २ ॥
पुण्य असो, पाप असो, त्याची नाहीं मला मुळीं चाड,
तत्संग्रहीं न माझ्या कोणी येऊं शकेल कीं आड ॥ ३ ॥
चोरुनियां मजपासुनि राहों न शके कदापि ही गोष्ट,
इतर असो मज कळतो हालविते जो पिपीलिका ओष्ठ ॥ ४ ॥
इतकें असोनि नाहीं काडीइतकाहि कीं मला गर्व,
राय असो, रंक असो, मी गणितों मित्रें आपुले सर्व ॥ ५ ॥
मी नित्य हात जोडुनि साह्य कराया तयां उभा आहें,
मी सेवक त्याचा जो होउनि मद्भक्त मजकडे पाहे ॥ ६ ॥
अवघीं शास्त्रें माझीं मुलें तयां ज्ञान मीं दिलें सारें,
तीं नित्य चालताती लोकीं निःसंशयें मदाधारें ॥ ७ ॥
यास्तव जनांस ह्मणतों कीं मजला संग्रहीं सदा ठेवा;
घ्या मजकडूनि निजहित साधाया पाहिजे तशी सेवा ॥ ८ ॥
नाहीं तुह्मांस मसलत मी भलतीशी कदापि द्यायाचा,
कीं त्यांत पाप मोठें, तें मी नाहीं कधीं करायाचा ॥ ९ ॥
माझा सहवास करा, मति तुमची सत्पथास लागेल,
निजकर्तव्य कराया रात्रंदिन ती तुह्मांस भागेल ॥ १० ॥
इहलोकीं परलोकीं मार्ग हिताचा तुह्मांस लाधेल,
जें पाहिजे तुह्मां तें त्याच्या योगें अखंड साधेल ॥ ११ ॥
जे भजले मजला, ते चुकवुनियां दुःख, बहु सुखी झाले,
धाले जीव तयांचे, देवमनुष्यांचिया मना आले ॥ १२ ॥

हें एवढें पुरे मज, गमतें आतां तुह्मांस सांगाया,
आत्मस्तुति मज, वाटे संकोच खरोखरीच ही गाया ॥ १३ ॥
परि परहितबुद्धीनें वदलों याची मला क्षमाचि करा,
या माझ्या उपदेशा स्वपरहितास्तव मनांत नित्य धरा ॥ १४ ॥

---

## अहल्याबाई आणि मंचाबाई.

आर्या.

हरहर ! मुली करूं मी काय ? मला त्वद्दशा पहावेना,
होउनि दगड बसावें वाटे, पण बोलतां रहावेना ! ॥ १ ॥
नेले यमधर्मानें माझे यजमान हरुनि परलोकीं,
अंधेरांत बसविलें मजला लोटुनि सुदुःसहीं शोकीं ॥ २ ॥
नंतर नुकता परवा त्यानें नेला मदीय सुत माली,
तेऱ्हां या विधवेची नाहीं तिळभर दया तया आली ॥ ३ ॥
आतां जामाताला न्यायाला त्यास वाटलें गोड,
यानें पुरलें त्याचें मज न कळे कोणतें असें कोड ॥ ४ ॥
कोड कशाचें माझें प्रारब्धचि उलटलें असें वाटे,
फिरतां काळ, घरांतहि फिरतां पायांस लागती कांटे ॥ ५ ॥
यमधर्माला ठेवूं नांव कशाला उगीच मी बाई,
तो दूर कोण कुठला माझी त्याला असे दया काई ॥ ६ ॥
मोठ्यामोठ्यांनाही द्यायाला दुःख जो चुकत नाहीं,
तो मजला अबलेला विधवेला कां भिईल गे बाई ॥ ७ ॥
याचें असो, पण पहा तूं माझी लाडकी सखी कन्या,
अन्याय न्याय तुला कळतो ह्मणतात लोक तुज धन्या ॥ ८ ॥
नाहीं मद्वचनातें जन्मांत कधींहि मोडिलें तूं तें,
आज कराया बघसी काय ह्मणावें त्वदीय हेतूतें ॥ ९ ॥

जाऊं नको सती तूं हरिभजनीं काल घालवूनि रहा,
हा मार्ग मनुष्याला देवालाही असे पसंत पहा ॥ १० ॥
कर दानधर्म पुष्कळ, हर दुःखितदुःख झिजवूनी काय,
देहा जाळुनि घेणें यांत असे पुण्य वद अगे ! काय ॥ ११ ॥
मातुश्री तूं ज्ञानी म्यां तुजला ज्ञान काय सांगावें ?
वद कोकिळापुढें लघु काकानें कां उगाच तें गावें ॥ १२ ॥
' राया कुलार्थ पुरुष ग्रामार्थ कुलहि समस्त सोडावें,
ग्रामहि देशार्थ मही आत्मार्थ बुधें भलेंचि जोडावें ' ॥ १३ ॥
' पतिपूर्वी स्त्रीस मरण तें लग्नाहूनि काय हो ऊन ?
न रहावेंचि सतीनें पळभरहि विरूपकाय होऊन ' ॥ १४ ॥
ऐसें वदलें श्रीमन्मयूर कवि तें तुला मला ठावें,
यास्तव सहगमन तुला अश्लाघ्य मदीय हें न वाटावें ॥ १५ ॥
दे आज्ञा, जाऊं दे पतिसह भोगावया सुखें नाकीं,
आड न येतां ह्मण गे ' मंचाबाई सती सुखें जा कीं ' ॥ १६ ॥

## राजपुत्र आणि शुक.

शार्दूलविक्रीडित.

' ये ये ये लघु पक्षिया जवळ ये माझ्या बसाया सुखें,
' सोन्याचा पिंजरा तुला घर तसें खाणें मधासारखें;
' देतों मी रुचिरा प्रफुल्लित महाबागामधें तूं रहा,
' सोडोनी वनवास राजसदनश्रीतें स्वनेत्रीं पहा ॥ १ ॥
' हे धन्या ! कुलभूषणा ! नृपसुता ! बोलावितोसी मला,
' तूझा हा उपकार फाराचि खरा माझ्यावरी जाहला;
' ऐकें बा परि जें लहान घरटें माझें तरूच्या शिरीं,
' तें रत्नांकित पंजराहुनि मला संतोष दे अंतरीं ॥ २ ॥

'आकाशीं उडता, वनीं विचरतों, आम्रावरी बैसतों,
'केकीनर्तन पाहतों, ध्वनि करी चंडोल तो ऐकतों;
'नाना पुष्पलतांमधें जिवलगा मित्रांसवें खेळतों,–
'भोगूं दे मज या सुदुर्मिळ सुखा, ऐसें तुला मागतों ॥ ३ ॥
'देवानें विविधें फळें रुचकरें निर्माण केलीं वनीं,
'तीं खावोनि यथेच्छ, पीऊनि जला, हिंडोनि, धातों मनीं;
'सृष्टीची रमणीय पाहुनि नवश्री नित्य आनंदतों,–
'भोगूं दे मज या सुदुर्मिळ सुखा, ऐसें तुला मागतों ॥ ४ ॥

---

## जन्मांध मुलाचे उद्गार.

अभंग.

उजेड उजेड, कशाला ह्मणतां । तें मज सांगतां, नये तुह्मां ॥ १ ॥
तो मला नाहीं हो, कधीं दिसायाचा । निश्चयची साचा, ऐसा वाटे ॥२॥
वस्तु पाहोनीयां, कैसें सुख वाटे । मला आंधळ्या तें, सांगा सांगा ॥३॥
ऊन माझ्या आंगा, ऊनसें लागतें । तयानें दीसतें, कैसें बोला ॥ ४ ॥
तयाच्या योगानें, दिनरात्री होती । कळेना ही गोष्टी, माझ्या मना ॥५॥
या जन्मीं मला तें, नाहीं कळायाचें । दुःख मीं तयाचें, कां करावें ॥६॥
मी माझी करितों, दिन आणि रात्र । असा मी समर्थ, आहें पहा ॥७॥
खेळत असतों, तो माझा दिवस । जातों निजायास, तीच रात्र ॥ ८ ॥
नका माझ्यासाठीं, कष्टी होऊं कांहीं । मला दुःख नाहीं, काडीमात्र ॥९॥
स्थिती दिली मज, जी माझ्या देवानें । तींत आनंदानें राहतों मी ॥१०॥
जें माझ्या प्रभूला, आवडलें फार । तें कां मीं असार, मानावें हो ॥११॥
नाहीं ज्या दुःखाचा, उपयोग लोकीं । कां मी त्याच्या शोकीं, पडूं सांगा. १२
हात पाय कान, नाक वाचा दीली । देवें मला भली, कृपा मोठी ॥१३॥
तैशी दिली बुद्धि, विचार कराया । शांतीतें धराया विपत्कालीं ॥ १४ ॥

हें कां थोडें झालें त्याचें देणें माते । माझिया सुखातें, पुरे वाटे ॥१५॥
त्यासाठीं मानोनी, तयाचे आभार । तया फार फार, वंदीतों मी ॥१६॥
तेणें माझ्या चित्ता, होतो अत्यानंद । असुखाचा गंध, येत नाहीं ॥१७॥
यासाठीं उद्गार, काढोनी दुःखाचे । स्वास्थ्य या चित्ताचें, मोडूं नका.१८
राहूं द्या मजला, सदा समाधान । हेंच मला दान तुह्मीं द्यावें ॥ १९ ॥
खेळन झोंपेन, प्रभूला भजेन । ऐसा घालवीन, जन्म सारा ॥ २० ॥
मेल्यावर त्याच्या, जवळ जाईन । त्यापाशीं राहीन, निरंतर ॥ २१ ॥
याहूनी दूसरें, काय मेळवावें ? जगीं धन्य व्हावें, याची पंथें ॥ २२ ॥
या लोकींचें दुःख, बापुडें तें काय ? निवोनियां जाय, हातोहातीं. २३
देवाच्या जवळी, सौख्य तें अखंड । भोगीन उदंड, सर्व काळ ॥२४॥
आनंद आनंद, आनंद जीवाला । तयाच्या भक्ताला कमी नाहीं ॥२५॥
अशी माझी वृत्ती, नित्य राहो देवा ! हाचि मला ठेवा द्यावा मोठा. २६

# पांडुरंग गोविंदशास्त्री पारखी.

हे ग्रंथकार आणि कवि पुणें जिल्ह्यांत खेड तालुक्यांतील मौजे कडूस येथें इ. स. १८४४ च्या नोव्हेंबर महिन्याच्या २४ व्या तारखेस जन्मले. हे जातीचे देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण, कडूस येथील वृत्तिवान् असून सतत तीन पिढ्यापावेतों नाना फडणवीसांचे आश्रित होते. ह्यांच्या मातोश्री, हे अगदीं लहान असतांच निवर्तल्या. सबब, हे आपल्या चुलत्याच्या परिवारांत असत. ह्यांचें बहुतेक बाळपण उनाड मुलांच्या संगतीं खेळण्यांत गेलें, व त्यांत विद्येची फार हेळसांड झाली. हे सुमारें १३ वर्षांचे झाल्यावर आपल्या वडिलांजवळ अध्ययन करूं लागले. नंतर पुण्यास येऊन तेथील संस्कृत पाठशाळेंतील प्रसिद्ध पंडित बाळशास्त्री देव ह्यांजपाशीं ह्यांनीं व्युत्पत्ति, व्याकरण आणि अलंकार-शास्त्रांचें चांगलेंच परिशीलन केलें.. पुढें घरच्या गरीबीमुळें ह्यांना सरकारी नोकरी पतकरावी लागली. संस्कृत भाषेचे चहाते डॉ. सिंक्लेअर साहेब वऱ्हाडांत डायरेक्टर झाल्यावर त्यांनीं इ. स. १८६७ सालीं तिकडील शाळा-खात्यांत पुण्याहून कित्येक लोक नेले, त्यांत रा. पांडुरंगशास्त्रीहि होते. तिकडे गेल्यावर ह्यांनीं शालोपयोगी अनेक विषयांचें व इंग्रेजीचें ज्ञान संपादन करून सरकारी नोकरी उत्तम प्रकारें बजाविली, आणि मोठमोठ्या विद्वान् अधिकाऱ्यां-कडून वाहवा मिळविली. नंतर वडिलांच्या वृद्धापकाळामुळें ह्यांस नोकरी सोडून पुण्यास परत जावें लागलें. तेथें गेल्यावर ह्यांनीं आनंदाश्रमांत व डॉ. भांडार-करांच्या हाताखालीं शास्त्री या नात्यानें चांगलें काम केलें. पुण्यास असतांना हे कवि सरकारी 'पेन्शन' घेऊन नाना फडणवीस यांच्या बेलबागेंतील संस्थानांत पुराण सांगत असत. ह्या कवींनीं अनेक गद्य ग्रंथ व 'षड्ऋतुवर्णन,' 'कृष्णा-कुमारी,' 'बोधामृत' वगैरे काव्यें केलीं आहेत. प्रस्तुत ग्रंथांत ह्यांच्या नांवा-खालीं असलेले सर्व वेचें ह्यांच्या 'षड्ऋतुवर्णन' ह्या नांवाच्या एकच पण उत्तम काव्यांतून घेतले आहेत. कित्येक ठिकाणचे क्लेशदायक श्लेष वजा केले असतां ह्या कवींची कविता प्रौढ, नानारसालंकारांनीं मंडित व उच्च प्रतीच्या वाच-कांचें मनोरंजन करणारी आहे. हे कवि सन १९११ सालांत मार्च महिन्याच्या ११ व्या तारखेस स्वर्गस्थ झाले.

## वसंतऋतु.

( शार्दूलविक्रीडित )

द्यावी हे कवणास आद्य पदवी धाता विचारीं पड,
तोली तो सकलां ऋतूंस, मधलें खालीं पडे पारडें;
योजी त्या प्रथमीं पदीं, तप चढे तापास, वर्षा रडे,
अन्योत्कर्ष बघून दुःखित सदा चित्तीं कुधी चर्फडे ॥ १ ॥

( वसंततिलका. )

आला ऋतूंतिल सहा पहिला वसंत,
ज्या वर्णितात कवि जेविं, तसेच संत;
कामी जनांस पळ घेउं न दे उसंत,
दांतांसही प्रगटुनी करितो अशांत ॥ २ ॥

( मालिनी. )

सकल ऋतुमधें हा शोभतो फार रम्य,
ऋतु सकल गुणांहीं युक्त नाहींच अन्य;
मनुज बहुत भोगां भोगुनी होय धन्य,
दिवस दवडितो हे व्यर्थ तो सत्य वन्य ॥ ३ ॥

आर्या ( गीति. )

वातें ललित शोभे, तारा-पति-मंडल-स्फुरत्कांति;
रामातुरनेत्रांनीं, दृष्ट जसा वातसुत सुरभिमूर्ति ॥ ४ ॥

दिंडी.

पुराणांतें टाकिती बहु दलांतें, नविन विटपा आश्रिती पलाशां ते;
अर्धी कूद्रुव, मधुसक्तही तशांत, कां न वृत्तिभ्रष्टत्व हो अशांत ॥ ५ ॥

साक्या.

कोमल मंजुल किसलय फुटती तरुंवर दिसती शेंडे,
वाटे मजला पंचशरानें रोंवियलें कीं झेंडे ॥ ६ ॥
रसाल तरुंवर मंजु मंजुऱ्या हालति लटलट साऱ्या,
मदन नृपाची स्वारी आली ह्मणुनिच फिरती चौऱ्या ॥ ७ ॥

मंजरिवरि ते सुंदर मधुकर करिती मधुर रवांतें,
अनंगराजा आला ह्मणुनिच वाजविती वाद्यांतें ॥ ८ ॥
पल्लवमध्यें कलिका खुलती, झुलती वरती भृंग,
कामुक जणुं कीं केव्हां होइल नूतन–युवतीसंग ॥ ९ ॥
भृंग, अहङ्कृतिसह तैं कारिती झंकृति मज वाटे ते,
मनोजहुंकृति विरह्यांला, कीं टंकृति तद्धनुची ते ॥ १० ॥
मकरंदातें प्राशित खेळत, मधुकर करिति विलास,
दुजे मजेचे शोकी लोकीं नाहिंत दुसरे खास ॥ ११ ॥
कुंजीं मधुकर पुंजी होती, गुंजी शब्द विराजे,
वनदेवीच्या मंजीरांचें सिंजित जणुं हें साजे ॥ १२ ॥
स्मरदेवाचे मधुकर मांत्रिक जपुनि जणूं मंत्रातें,
परागभस्मा फुंकुनि करिती वश मन्मथ–विमुखातें ॥ १३ ॥

( दिंडी. )

त्यजुनि जाती परिभुक्त–मंजरींतें, भोगिती अलि उत्फुल्ल मल्लिकेतें ;
मलिनचंचलवृत्तिंची प्रीति एकीं, राहणें हें अति कठिण असे लोकीं॥१४॥
लता पुष्पित उपमर्दसहा भृंगा, बहुत असती त्यांशींच करी संगा ;
मुग्धअस्फुटपुष्पाहि असे बाला, अकालीं रे भोगिसी मल्लिकेला. ॥१५॥

( शार्दूलविक्रीडित. )

हा भृंगा मधुपानसक्त सुरसा हर्षें धरी मंजरी,
आत्माराम करूनि गार बसतो पुष्पोद्भवीं पिंजरीं;
जातो गात, सुगंध घेत फिरण्या, बैसे शिरीं कौंजरीं,
कुंजीं खेळुन सुंदरीसह पुढें कंजीं पडे पंजरीं ॥ १६ ॥

( दिंड्या. )

आम्र तरुवर पिक मधुर काय गाती,
“ असा तरुवर जागिं नान्य ” हे सुकीर्ति ?
बोध लोकीं करितीच कीं अहो ते,
मधुर वचनें प्रियताच जगीं होते ॥ १७ ॥

पादपांतर सोडून रसालीं ते,
गाति कोकिल मृदु पंचमस्वरातें;
तोहि कलिका-रोमांच उभारूनी,
रसिक करि त्या सानंद पहा ज्ञानी ॥ १८ ॥

( शार्दूलविक्रीडित. )

पांथांनो स्वगृहांस जाउनि तुह्मी द्या स्त्रीजना धैर्य रे ,
माना सोडूनि मानिनी, प्रियकरां संतोषवा जा त्वरें;
आला हा स्मरराज सोडित पहा बाणां वियोगातुरीं,
कामाचे पिकदूत सर्व मनुजां कीं सांगती यापरी ॥ १९ ॥

( आर्या. )

कोकिल रसालशिखरीं, स्वगुणीं विख्यात होतसे तैसा,
कुलीन सात्विक मानव, समयीं स्वगुणांस दावितो जैसा ॥२०॥

( साक्या. )

धरणीवरती अनेक तरुवर असती बहूपयोगी,
आम्राच्यापरि गुणी न सकलां सुलभहि पर भूभागीं ॥ २१ ॥

( शार्दूलविक्रीडित. )

बागमाज दुजा सुशोभित तरू नाहींच आम्रापरी,
ज्याची कोमल पालवी झणि मना सर्वांचिया ते हरी;
ज्याचा मोहर ओढुनि स्थिर करी भृंगांस गंधानिलें,
आम्ल, स्वादु, तशींच मिश्र, सुरसें संपूर्ण, ज्याचीं फळें ॥२२॥

( वसंततिलका. )

उद्यानमंडप जणूं घन आंबराई,
छायाफलादि करुनी बहु तोष देई;
संपूर्ण-जंतु-मन वेधि असा प्रवीण,
आहे दुजा क्षितिवरी तरु सांग कोण ॥ २३ ॥

( शिखरिणी. )

पलाशाचीं झाडें कुसुमित कशीं लाल दिसतीं !
जसे कंदर्पाचे शर, भरित रक्तेंच गमती ;
वनश्री नेसोनी वसन नटली लाल जणुं ती,
सुरंगानें शोभे रुचिर सुकुमारी ऋतुमती ॥ २४ ॥

( वसंततिलका. )

पुष्पें पलाशतरुंचीच गमून भृंग,
जाती तदा शुकमुखांवरि हे सवेग ;
हीं जांभळेंच अलि आलिं अशा भ्रमें कीं-,
राघू तयांस धरण्या बघती विलोकीं ॥ २५ ॥

( शार्दूलविक्रीडित. )

रेरे किंशुक, किं शुका भुलवुनी हो लाभ, सांगे मला,
खासा दाविशि पुष्परंग परि त्यां देशी न तूं सत्फला ;
नादीं लागुं नकोस तूं शुकवरा, जा अन्यवृक्षावरी,
दावूनी वर रंग नीच फसवी अन्यास बा, यापरी ॥ २६ ॥

( दिंड्या. )

लता हर्षित सुमवृष्टि करिति पाहीं,
मदनबाणचि सुटताति काय दाही ;
पुष्पशय्या रचिल्याच ठायठायां,
वसंतें स्मरमित्रास आदराया ॥ २७ ॥
कितिक चंपक उत्फुल्ल पीतपुष्प,
अशोकहि किति आरक्त सुम अमूप.
गुलाबंहि किति मोगरे बकुलमाला,
कितिक रंगां दावितो ऋतु अमोलां ॥ २८ ॥

( वसंततिलका. )

हे गायकप्रवर गाति सुगीत भृंग,
मागूनि सूर किति देति तयां विहंग ;

वीणा पिकध्वनि घुमे कलवाक् मृदंग,
कंदर्प, मित्रमधु, हे श्रवणांत दंग ॥ २९ ॥

वसंततिलका.

हे नाचती रुचिर मोर समोर फार,
ज्यां बर्ह रम्य फुटले नव चित्र थोर.
जाणों बघून शिखिनृत्यकला वसंतें
हा अर्पिलाच नवरत्नकलाप यांतें ॥ ३० ॥

( स्रग्धरा. )

वायूची मंद वाहे झुळुक, खुलतसे कोंवळी पालवी ती,
पुष्पांचा गंध मार्गी सकलमन हरी, गोड अंजीर होती;
चित्तानंदी पिकांचा निनद झडतसे पंच पंचेंद्रियातें,
मोहाया एककालीं, मधु जणुं उपदा पंचबाणा करी ते ॥ ३१ ॥

(मंदाक्रांता.)

द्राक्षावेलींवर लटकले घोस खासे सुपर्वी,
अंजीरांचे तरु फळभरां दाविती काय गर्वी;
कोठें रंभा भलभरनता कांकड्या थंड आणि,
दाडिंबाम्रप्रचुर मधु तो भेट कामास आणी. ॥ ३२ ॥

( शिखरिणी. )

गुलाबाच्या रांगा विकसित कशा रम्य सगळ्या,
सुमल्ली संफुल्ल, मधुर गुलनारीं स्फुट कळ्या ;
फुलें नानारंगी, रुचिर मरवा पाच हिरवा,
तृतीया ही आणी सुरभि उपदा सुंदर नवा. ॥ ३३ ॥

सुरूंचे, पेरूंचे, सुतरु हिरवे गार फुटती,
सुपारी-केळींचीं बहु सरळ झाडें विलसती ;
चकोत्रे, संत्रेंही, अननस, सुदाडिंब, बकुळी,
प्रफुल्ल त्या वल्ली, विलसति फुलें लाल, पिंवळीं ॥ ३४ ॥

(वसंततिलका)

वासंत वायु नटतो जणुं काय कामी,
सौगंध्य सुंदर फुलांतिल घेत नामी;
जाई हळूच तटभिंति चढून वेगें,
कांतांबरीं करि विहार तदा सुरागें ॥ ३५ ॥

(शिखरिणी.)

वसंतस्वामीचें प्रकटन बघूनि प्रकट त,
वनश्री लाजूनी किसलयपटें कींच नटते;
अलिश्रेणी वेगी सुतनुवर भूषा सुमतती,
स्वसौंदर्यें ऐशा विकसुनि हरी चित्त झणि ती ॥ ३६ ॥

(मालिनी.)

सशरधनु मनोजा घेउनी त्वां सहाय,
बहु पथिक वियोगी मारिले दीन हाय!
ऋतु तुज घडला हा दोष मोठाच आहे,
सितकुसुमयशीं रे डाग भृंगालि राहे ॥ ३७ ॥

---

## ग्रीष्मऋतु.

(शार्दुलविक्रीडित.)

अंगारीं खचिलीच काय दिसते भूमी तसें अभ्रही,
वायू उष्ण सधूलि चालत असे व्यापूनि सर्वा मही;
वापीमाजि, नदीसरांत, उदकें अत्यल्प उष्णोष्ण तीं,
ग्रीष्मीं भास्करदाहकारकबृहद्भानूपरी तत्कृती ॥ १ ॥
गेलें शीत कुठें ? कुठें निवसती हेमंत, शीतांशु ते,
कोठें मेघ परोक्षजलपक, जडीं संयुक्त जे नित्य, ते;

वात्याशब्दमिषें निदाघ वदुनी फेंकी खडे, धूळ ती,
शत्रूच्यावरि चाल भूमि-पतिची दे त्रास अन्याप्रती ॥ २ ॥

( साकी. )

उष्ण-किरण बहु तापद होई त्यातहि मध्याह्नांत,
छायाही ते व्याकुळ होऊनि जाई कीं झाडींत ॥ ३ ॥

( दिंडी. )

किरणबाणीं रवि-भिल्ल हणी तीक्ष्ण,
शीत-हरणें पावती फार शीण;
किती लपती गेहांत अंधकारीं,
किती विपिनीं पळताति दरीं खोरीं ॥ ४ ॥

( हरिणी. )

दिनकरकराघातें होतें विशीर्ण शरीर तें,
ह्मणुनि पळुनी जाई घाई करूनिच शीत तें,
स्थळ हुडाकितां होई ल्हाही दडे सलिलांतरीं,
जलगृहिं, लताजालीं, खोली-मधून लपे घरीं ॥ ५ ॥

( वसंततिलका. )

तप्ता मही विरहिवृत्ति-समान भासे,
चंडांशु तापद करीं कु-नृपाळ जैसे;
छाया न सोडि चरणास जशी सती ते,
दीनत्व पांथ-वदनीं कृपणा-परी तें ॥ ६ ॥

( स्रग्धरा.)

माध्यान्हीं उष्ण तापे चटचट तनुला म्लानता दाह फार,
वृक्षच्छायेंत मार्गीं नर, पशु, बसती टाकिती श्वास थोर;
झाडांच्या मध्यशाखा धरुनि बसति ते सांवलीमाजिं पक्षी,
पोटाखालील छायेमधुनिच पशुचीं बालकें जाति लक्षीं ॥ ७ ॥

मालिनी.

प्रखर बहुत तापे उष्ण तैं शोष लागे,
वनिं नर, पशु, पक्षी, धुंडिती वारि वेगें;
पुसति, बघति पाणी, भाजि पायांस वाळू,
परि झणि न दिसे तें, शुष्क हो कंठ ताळू ॥ ८ ॥

वसंततिलका.

मार्गीं सरें हुडकितां दिसती भयाण,
त्याच्यांत पांथ जल धुंडिति ते सयान :
तेथें मिळे न जल चक्षुस लावण्याला,
भेगा प्रचंड दिसताति मधें तयाला ॥ ९ ॥
अर्थी निराश परतोन इथोन गेले,
तेणें सरो-हृदय कींच विदीर्ण झालें ?
जें देइ जीवन सदा पथिकांस वाटे,
दात्या न त्या जल मिळे, उर कां न फाटे ! ॥ १० ॥
सकल विकल होती शोधिती थंड छाया,
क्षणभरि तिजमध्यें अल्प विश्रांति घ्याया;
विरलच परि मार्गीं ते दिसे वृक्षमूलीं,
शरणच तरुपादां तप्त होऊन गेली ॥ ११ ॥

दिंड्या.

हरिण तापें वैक्लव्य पावताती, थकुनि कंटकवृक्षांत बैसताती ;
दुःख सात्विक पावती भाग्यहीन, नीच सेवा करण्यांत जसे दीन !॥१२॥
उष्ण चमके माध्यान्हकाल होतां, जलभासा करितेंच तें पहातां;
मृगजला मग पाहून धांव घेती, जसे धांवत यमपुरीलागिं जाती! ॥१३॥

साक्या.

पशु, पक्षी,ते तापें विव्हल बसति तरुच्छायेंत,
जिकडे तिकडे शून्यच भासे ग्रामीं आणि वनांत ॥ १४ ॥

छाया–नायक चंड जाहला म्हणुनी तत्स्त्री छाया,
पति जाळीलचि भयें जणूं या लपवी स्वकीय काया ! ॥ १५ ॥

दिंडी.

नाग शिरण्या बघताति हस्तिशुंडीं । सर्प दर्पा सोडून शिखि–शिखंडीं ;
निजच्छाया महिषीस पंक वाटे। ग्रीष्मकालीं उष्णांशु चंड वाटे ॥१६॥

वसंततिलका.

संताप देशि जरि तूं सकलां उदंड,
याचा असे परि पुढें परिणाम गोड ;
बा, उष्णता तव शिरे पृथिवींत राहे,
तेणें मही फलवती नच अन्यथा हे ॥ १७ ॥

शार्दुलविक्रीडित

स्थानें दग्ध कितीक दग्ध करण्या आहेत बाकी किती,
देखाया वणवा समुत्सुक चढे शुष्कद्रुमीं पर्वतीं ;
ज्वालाशद्बमिषें पहा खदखदां हांसे जणूं वाटतें,
संघर्षोद्भव मित्रवायुसह तो पाहीच कीं विश्व तें ! ॥१८ ॥

इंद्रवज्रा.

दावाग्नि पेटे बिलगे द्रुमाग्रां, ज्वाला विशाला दिसताति उग्रा ;
ज्वाला न जिव्हा पसरून शाखी, संतप्त ते जीवन मागती कीं ! ॥ १९ ॥

मालिनी.

रज, तृण, बहु पानें, घेउनी चक्रवात,
गरगर फिरुनी तो शीघ्र अत्युष्ण जात ;
कधिं लघु कधिं मोठा सोट अत्युच्च होई,
नर, पशु, विहगांतें, देत संत्रास जाई ॥ २० ॥

शार्दुलविक्रीडित.

जातीनें लघु हे रजःकण जयां मोजी न कोणी कधीं,
पायांनीं जन नित्य ज्यां तुडविती घेशी शिरीं त्यां अधीं ;
आपल्यें क्षितिभृच्छिरीं बसविशी लोकेक्षणां पीडुनी,
हे त्वद्देह मलीन, पांसु करिती वाता ! पहा लक्षुनी ॥ २१ ॥

वसंततिलका.

वेगें प्रताप उलटासुलटा सुटून,
ग्रीष्मांत भीतिकर होइ महा तुफान;
जाण्या समुद्रिं धजती न च तीं जहाजें,
लाटा प्रचंड उठुनी जल फार वाजे ॥ २२ ॥

आर्या.

दुर्लभ तपतप्तातें झुळूक शीतल सुहर्षकारी ते,
निर्धन संसाऱ्यांतें सहसा जैशी धनाप्ति सुख करिते ॥ २३ ॥

मालिनी.

तळमळ बहु होई दाह अंगास घाम,
दिवसभर सुचेना कांहींही कामधाम;
रुचि किमपि न अन्ना जाइ पाणीचि फार,
तनुवरि तनुवस्त्रें वाटती थोर भार! ॥ २४ ॥

वसंततिलका.

अत्युग्र थोर बहुतापद वासराचें
ग्रीष्मांत रूप बघुनी जणुं काय साचें;
झाली भयेंच रजनी कृश भीत भारी,
भर्ता प्रचंड बघुनी जशि भीरु नारी ॥ २५ ॥

साकी.

फुलें, चंद्रिका, जलमंदिरही, चंदनचर्चित योषा,
शीतलजल, तनुवसनें, वाळा, ग्रीष्मिंच देई तोषा ॥ २६ ॥

मालिनी.

विकसितसुमगंधादान शीतांबु आणी,
जल-गृह, विधुकांती, सुंदरीची सुवाणी;
जल पडत सभोंती, बागही गर्द छाया,
करिल मग कसा तो ताप काया अपाया! ॥ २७ ॥

मंदाक्रांता.

मोतीयाचे रुचिर गजरे घालती वेणिमाजीं,
रामा अंगा मलयज-रसा लाविती कर्पुरा जी !
उष्णें म्लानप्रकृति नर, ते प्राशुनी सुंदरींचा,
होती ताजे, अधर, जणुं तो घोट कीं हो सुधेचा ! ॥२८॥

## वर्षाऋतु.

आर्या.

वर्षाऋतु हा आला अंबुदसैनिक समागमें थाट,
ग्रीष्माहित हननाला शर-वर्षावें करून कीं दाट ॥ १ ॥
आस्थिर अनेक-रागी गुणरहित असून वक्र तें अणिक,
इंद्रशरासन तेव्हां शोभे असती-मनापरी क्षणिक ॥ २ ॥
गुणवत्संगें होती, निर्गुण गुणवान् असे असें महित,
सगुणाभ्रासह राहुनि, कुटिला चापा कसा गुणें रहित ! ॥ ३ ॥
वाहे सोसाट्यानें चालू असतां समीर आसार,
कंपित शीतजलानें होऊन जाई त्वरेंच हें सार ॥ ४ ॥
प्रावृट्शीतलवातें होई संत्रस्त अभ्र त्या काळीं,
तद्वारणार्थ घेतें अंगी कीं मेघकंबला काळी ॥ ५ ॥
जीवनदात्या चपला त्यजुनी जाई क्षणांत अन्यत्र,
अस्थिरवृत्ति प्रमदा क्वचितचि रमतात नित्य एकत्र ॥ ६ ॥
सुकालिं हर्षच होतो, बघतांक्षणिं धूलि-धूसरा जलदा,
पुत्रापरि मलिनांबर करुनी गर्जूनि खेळतात तदा ॥ ७ ॥

इंद्रवज्रा.

आकाश उन्मत्त करी तयावरी, आरूढ होई घनराज सत्वरी;
घेऊनि संगे बहु कृष्ट सैनिक, मारी झणी तापद शत्रु घातुक ॥ ८ ॥

उपजाति.

नदी–तडागादिजला हरूनी, शुष्का धरा वृक्षालता करूनी ;
उष्णांशु कोठें लपला पहाती, विजा–दिवे घेउनि मेघ हातीं ! ॥ ९ ॥

दिंडी.

मेघ–बंदुकरांगेस वीजतोडे,
पेटवी ऋतु तत्काल ते धडाडे ;
तीक्ष्ण गारा गोळ्याच सोडुनी कीं,
ग्रीष्म शत्रुस मारितो मत्त लोकीं ॥ १० ॥

वसंततिलका.

विग्रुद्दशा बघुनि ताप अहो जनांचा,
होई दयार्द्र घनराज उदार साचा ;
ज्या थोर अल्पहि समानचि सर्व होत,
वृष्टी करूनि जनताप हरी क्षणांत ॥ ११ ॥

शार्दूलविक्रीडित.

स्वार्थाच्याचिकडे सदाहि गढलें आहे जयाचें मन,
ऐसे फार, परोपकार करण्या उद्युक्त थोडे जन ;
भक्षी वाडव नित्य पोट भरण्या अंभोनिधीतें पहा,
सिंधूचें जल घेउनी घन करी वृष्टी, हरी ताप हा ॥ १२ ॥

दिंडी.

द्रव्य घेतां स्वार्थार्थ कालिमा ते । मुखा येते, नाश्चर्य यांत होतें ;
परार्थाही सामुद्र मेघ तोय । घेउनी ते होतात कृष्णकाय ॥ १३ ॥

स्रग्धरा.

अभ्राची पोतडी हा करुनि ऋतु जणूं गारुडी खेळ लोकां,
दावी, सर्वां कळाया हितरत दिसण्या वाजवी व्योमिं ढक्का ;
मेघांतें वायुसूत्रीं पळवि घडिघडी रंग दावूनि मोही,
दावी सूर्येंदु-दीपां लपविहि चपलानर्तकी नाचवी ही ॥ १४ ॥

उपजाति.

सूं सूं सुटे वायु मधूनि फार, भरूनि येई बहु दाट अभ्र;
सर्वीवरी येति महा सरीही, अंधारुनि येइ दिसे न कांहीं ॥ १५ ॥

शिखरिणी.

मृदंग-ध्वानांतें जलद करिती त्यांस बघुनी,
सुहृक्-पौषा-वेणी-सम-रुचि कलापां पसरुनी;
सुनृत्यातें केकी करित असती हे बघुन ती,
सरोमांचा होते नवतृणमिषें कीं वसुमती! ॥ १६ ॥

मालिनी.

घन करुनि निनादा वारि-वृष्टी करीती,
सकल वसुमती ती आर्द्र अत्यंत होती;
वनगिरिंवर धो धो अंबु चाले सुवेगें,
अलघु लघु नद्याही पूर्ण होती जलौघें ॥ १७ ॥

साकी.

शैलाग्राच्या वरुनि उड्या हे टाकित असति जलौघ,
उष्णारीच्या पाठीं लागत धांवति जणु हे मेघ ॥ १८ ॥

वसंततिलका.

नामापरी कृति असे विरला यथार्था,
आहे क्षमाधरिं परी अचलींच सार्था;
ज्यांच्यावरी जरि कितीकहि वृष्टि राही,
अत्यल्पहि तरि न हे ढळतात पाहीं ॥ १९ ॥
पूरीं नद्या सकल पूर्ण भरूनि जाती,
त्यांच्यांत वृक्ष किति जंतुहि वाहताति;
पेटीं न चालति अगाधजलांत नौका,
पांथस्थ वैसती तटस्थ तटस्थ देखा ॥ २० ॥

उपेंद्रवज्रा.

तरंगिणी गे जडसंगतीनें, चराचरा नाशुन तूं मदानें
स्वकूलही भ्रष्ट करून जाशी, ह्मणून पंकाविल सत्य होशी ॥२१॥

दिंडी.

पडति धारा वांकड्या किति समोर, असंख्यावधि उडतात जलतुषार,
सच्चनगेहें गळताति तींहि थोर, तदन्यांचा कोठून हो गुजार ॥ २२ ॥

साक्या.

अतर्क्य लीला जगदीशाची होतां वर्षण भासे,
कोठुनि जल हें इतकें येतें, जातें कोठें, कैसें ? ॥ २३ ॥
क्षारसमुद्रोदक घेउनि घन करिती मधुर तयातें,
चतुरजनाच्या हातें कैशिहि गोडच कृति ते होते ॥ २४ ॥
एकसारखी चालू राही मोठी अखंड धार,
जिकडे तिकडे पाणिच पाणी ओलें हो घरदार ॥ २५ ॥
ओढे, विहिरी, तलाव, यांनां पाणी अपरंपार,
रस्ते, वाटा, यांवरतीही चालति मोठे पूर ॥ २६ ॥
डरांव् डरांव् ते बेडुक करिती मोठ्यानें पाण्यांत,
टो टो करिताचि सर्पहि निघती शिरतां पाणि बिळांत ॥ २७ ॥
सिंह व्याघ्रहि मेघ-गर्जना ऐकुनि विनिद्र होती,
पुच्छे अपटुनि डुरक्या फोडित बघती शत्रु सभोंती ॥ २८ ॥
स्त्रिया मुलांना, मृगी पाडसां, गाई वत्सां, पोटीं
धरूनि बैसती घट्ट, गर्जना होतां प्रचंड मोठी ॥ २९ ॥
कडकड कडकड बीज कडकडे मध्यें एकाएकीं,
ऐकुनि चकिताचि सकलहि होती पडेल कीं या धाकीं ॥ ३० ॥

आर्या.

धाराशस्त्रें घनराट् ग्रीष्मर्तुदवानलारि नाशुनियां,
विद्युन्नयनीं पाहुनि गर्जे विजयी अयुक्त हें न तया ॥ ३१ ॥

शार्दुलविक्रीडित.

मेघा, तूं पडुनी चराचर जगा आनंदविशी खरें,
विद्युत्स्त्री तव चंचलाचि पडता होई चुराडा अरे !

पाहूनि भुलतोस गोमटि वधू, बैसे तुझ्या ती शिरीं,
नाचे ज्यापरि नाचुं देशि तिजला हे रीत नोहे बरी ॥ ३२ ॥
निर्व्यापार असे समग्र जनही स्वीया-लयीं बैसती,
जाण्या कोणि धजे न अन्य सदना होई अशी हो स्थिती;
गाई, व्याघ्र, पशू, बकादि नयनां झांकूनि पक्षी किती,
ध्यानस्था मुनिच्यापरी किति बकध्यानीहि ते राहती ॥ ३३ ॥

साकी.

शेतकरी ते धान्यें घेउनि उत्सुक शेतीं जाती,
पेरुनि त्यांतें अभिमतवर्षण व्हावेंसें इच्छीती ॥ ३४ ॥

मालिनी.

नवनवजलयोगें अंकुरोद्भेद होई,
तृणदलनिकरानें रम्य हो रानराई;
सकल तरु-लतांनां वृष्टिनें येई तेज,
नरपशुखग यांच्या दृष्टिला होई चोज ॥ ३५ ॥
फुटुनि तृण सुमार्गी झांकि तेव्हांच दाट,
झडकरि उमगेना जावया गांवि वाट;
बहुत दिवस जातां जेविं अज्ञान योगें,
स्फुरति समयिं विद्या पंडितांही न वेगें ॥ ३६ ॥

वसंततिलका.

पृथ्वी तृणें हिरविगार वरी किडे हे,
सोनेरि, लाल, पिवळेहि, रुपेरि, पाहें;
हें चित्रवस्त्र करुनी ऋतुनें प्रियेला,
नेसावयास दिधलें गमतें मनाला ॥ ३७ ॥
संतापदायि अधिकार तपर्तुचा तो,
जातां अतां सकल शांतच लोक होतो;
वर्षर्तु-राज्यिं कवणासहि ताप नाहीं,
साजे खला सुपुरुषा उपमा बरी ही ॥ ३८ ॥

दिंड्या.

नृत्य गणिका पुष्पिता करिति देख, भ्रमर वाद्यच जणुं वाजंवी सुरेख ;
पारिजातां अनुराग हर्ष होतो, वक्र गुलछबु पाहून हांसतो तो ॥ ३९ ॥
लतावृक्षीं टवटवी खुले फार, दलांवर सित पडताति बिंदु गार ;
जीवनानें आनंद पावताती, लता तरुवर मौक्तिकें ओतिताती ॥ ४० ॥

आर्या.

स्वकरीं खुरपीं घेउनि, शेतकरी करिति काम शेतांत,
काढिति तृणझाडांतें, स्त्रियाहि तप्तति मुलेंहि तत्तात ॥ ४१ ॥
खंडांशुकयुत कर्षक, कांपत करितात काम ते रानीं,
जडसंगें मलिनधना, पीडिसि दीनां अखंड धारांनी ॥ ४२ ॥
करुं दे कामें त्यांनां, सोडुं नको कांहिंकाळ फार जला,
मेघा, जीवनदाता मानिति जरि पीडिशीच, ते तुजला ॥ ४३ ॥

शार्दूलविक्रीडित.

गंभीरध्वनि अंबुदालि करती, विद्युल्लता चालती,
वाहे शीत समीर सोदक तदा भृंगालि ही गुंजती ;
चंद्राकारक चंद्रका पसरुनी बर्ही कसे नाचती,
ह्या कालीं अबला त्यजून निघती पांथा श्रमा पावती ॥ ४४ ॥

दिंडी.

"बालहरणी–चलंलोचना सुनेत्री,
स्तनित ऐकुनि धांवूनि ये सुगात्री ;
दृढालिंगुन मज भीरु शांत नोहे,"
पांथ बोले 'मजवीण कशी राहे ॥ ४५ ॥

साकी.

प्रियविरहानें सतीहि दुःखित होऊनि करिते शोक,
इष्टजनाच्या वियोगकालीं, नाहीं होत विवेक ॥ ४६ ॥
सुगंध शीतल मारुत, अंबुद, गर्जत वरती येती,
मयूर नाचत येती मेळे ! दुःखद मजला होती ! ॥ ४७ ॥

अगपण बाई ! तूं स्त्री असुनी चपले हंसशी कैशी ?
वियोगिनी हें बोलुनि पडते, रंभा वातें जैशी ॥ ४८ ॥
सुगंधि शीतल वायु येउनि सावध करितो तीशी,
उठुनि प्रियकर शोधाकरितां, जाई ती आवेशीं ॥ ४९ ॥
खिन्ना रुष्टा रमणी बोले, मेघा ! मज दीनास,
नाडावें या हेतूनें त्वां, केले किती प्रयास ॥ ५० ॥
पंकें भूही, जलधारांनीं गगन, दिशा चपलांनीं,
व्याप्त नद्याही पूरीं, तैशीं विपिनें वृक्षलतांनीं ॥ ५१ ॥
प्रियकर शोधा मी निघतां रे तुजला असह्य झालें,
अबला घाताकरितां मेल्या ! मलिना हें त्वां केलें ॥ ५२ ॥
इतकें करुनी गर्जसि वरतीं, काळ्या लाजच नाहीं !
ऐसें रमणी बोलुन शोकें मूर्छित फिरून राही ॥ ५३ ॥

स्रग्धरा.

झांकूनी चंद्रकांती घननिजमहिमा दाविण्यासाठिं जाय,
होई सारें परी तें उलट, मलिनिमा व्यक्त त्याचाच होय,
जे कां विद्वज्जनांचे, मलिनजन, गुणां झांकुनि, स्वीय बुद्धी,
दावावया जाति, त्यांचे अवगुण दिसती स्पष्ट सर्वांस आधीं ॥

आर्या.

ह्या वर्षाऋतुमाजी, स्वकीय वैभव जनांस तम दावी,
अंबुद समागमानें, शोभा त्याची किती मग वदावी ॥ ५६ ॥
मेघावरणें रात्रीं दर्शनमार्गास आड येति तमें,
मलिनाच्या संगानें दर्शनमार्गास आड जेविं तमें ॥ ५७ ॥
लिंपी तम सर्व जगा, अंजनवृष्टीच अभ्र कीं करितें,
विफला सुदृष्टि होते, सेवा असदालयीं कृतापरी ते. ॥ ५८ ॥
सकलाभेतें नाशी अज्ञान, प्रोच्च नीच हो स्थानीं,
व्यर्थचि विचार होती, होतां दुर्जन तमिस्र ही स्थानीं ॥ ५९ ॥

साक्या.

कस्तूरीच्या दाट रसानें, कज्जलपंकानें कीं,
विषकंठाच्या कंठाभेनें, व्याप्तच विश्व विलोकीं ॥
कालिंदीजल–कस्तूरी–करिघटेशगलनीलाब्ज,
वर्षारात्रितमाचे बालक, दिसतो बरवा साज ॥ ६० ॥

दिंडी.

काकवर्णासारिखा अंधकार, त्यास अंबुदजडमालिनसंग थोर;
" अधीं मर्कट" इत्यादि तसें झालें, अंधकारें सर्वांस अंध केलें ॥६१॥

इंद्रवज्रा.

गाढांधकारीं फिरताति चोर, स्थानांस सांकेतिक जाति जार;
वंचून भर्त्यां असतीच जाती, चित्तीं न त्या आणिति वर्ण जाती ॥६२॥

वसंततिलका.

"जातेस तूं घनतमांत कुठें मृगाक्षी,
मत्प्राण जो रमण तत्सदनास लक्षीं;
नाहीं कसें भय तुला? " पुसतांच कोणी,
बोले सवें मदन सज्ज–धनुष्य–पाणी ॥ ६३ ॥

शिखरिणी.

" सवें सज्जाऽनंगानुचर असतो, तूं विधुमुखी,
जडावाची भूषा चमकत असे ते लखलखी;
रणन्मंजीरें तीं जणुं हृदयभू–दुंदुभि झडे,
अशा थाटें जातां चकित बघशी कां चहुंकडे ? ॥ ६४ ॥

मालिनी.

" जनपशुतिमिरांची भीति नाहींच मातें,
पर, कुसुमधनूनें मद्गतेषु–घातें;
व्यथित कितिक केले पामरा, त्वत्समान,
बघतबघत जातें त्यांस रे हेंच मान ! " ॥ ६५ ॥

## शरदृतुवर्णन.

शिखरिणी.

सदानंदातें जो सुखभर करी स्वाद्भुत रसें,
कराया रामा जो प्रिय विहृतिकर्मी म्हणतसे ;
असे ज्याला प्रेमा कुसुमितवनीं केलिविषयीं.
शरत् श्रीकृष्णाचें चरित ऋतु दावी सुसमयीं ॥ १ ॥
हरिद्वस्त्रा नेसे बहु रुइफुली कांठ सरसे,
अलिश्रेणी वेणी तिलक निटिलीं शोभत असे ;
सुचंद्रातें घाली सुबकहि फुलें केतक दिसे,
सुवर्णालंकारीं शरदमलरंभोरु विलसे ॥ २ ॥

इंद्रवज्रा.

रम्यप्रसन्नेंदुमुखी दिसे जे, शुभ्रांबरानें रमणी विराजे ;
हो हंस कीं भूषित पद्मनेत्री, वाटे शरच्छ्री जणुं ही सुगात्री ॥ ३ ॥

हरिणी.

प्रिय–विधुकराश्लिष्टा तुष्टा पयोधरशांति ती,
त्वरित घडते, होते शांता कटाक्षचला–तती ;
बहुसुखभरोत्कर्षं तोषे प्रसन्न शरद्वधू,
बहुत दिवशीं येतां भर्ता कितीक सुखें वदूं ! ॥ ४ ॥

वसंततिलका.

ह्यामाजि ऐंद्रधनु न प्रगटे सुरंगी,
नानापरी न घनही दिसती स्वभागी ;
व्योमीं ! कधीं फिरति मेघ रिते सुशुभ्र,
शोभे सदंतरिव निर्मल रम्य अभ्र ॥ ५ ॥
आतृप्तिजीवन समग्र चराचराला,
देऊनि ताप हरुनी बहु हर्ष केला ;
हे मेघराज अजि निर्वसु जाहलाशी,
शोभाचही तुज दिसे जगतात खाशी ! ॥ ६ ॥

साक्या.

रुचिकर लागुनि पचनीं पडतें, अन्नोदक ज्यामाजी,
प्राबल्यातें पावुनि दिसते, सुंदर तनु ही ताजी ॥ ७ ॥
नर, पशु, पक्षी, सर्व प्राणी हुशार दिसती ताजे,
प्रफुल्ल वल्ली मल्ली तरुवर सुरेख खुलती तेजें ॥ ८ ॥
ग्रामवनीं बहु कुसुमित वल्ली सुंदर दिसती दाट,
सौंदर्यानें पूर्ण श्री कीं करून आली थाट ॥ ९ ॥
पुष्पवाटिका प्रफुल्ल होती, घमघम सुवास येतो,
वरूनि मारुत झुळुझुळु येउनि सुखद तनूला होतो ॥ १० ॥
किति प्रफुल्लित विनम्रवल्ली फलिनी कितीक तैशा,
तरुणी सुमुखी स्तनभारानें लज्जित सुतनू जैशा ॥ ११ ॥

शालिनी.

जाई शोभे मंडपीं पुष्पिताग्रा, शेवंतींही शोभते पुष्पनम्रा ;
झेंडू, मर्वा, पाच, चांफा, गुलाब, मोतीयाही देतसे गंध लांब ॥१२॥

दिंडी.

शुभ्र जाई शेवंति पातळातें, नेसुनी कीं आलीच शरत्स्त्री ते ;
झेंडुचे ज्या जरिकांठ गुलाबाचे, छटे मधिं मधिं मन मोहिते जनांचें ॥१३॥

वसंततिलका.

ह्या झेंडुच्या कितिक पुष्पित रम्य रांगा,
बागांत आणिक घरोघरिं ही सुरंगा ;
जाती तयांमधिं अनेक सुरेख गोल,
कीं गालिचे पसरले ऋतुनें अमोल ॥ १४ ॥
शोभेंत थोडिंच फुलें तुझियासमान,
आहेत झेंडु ! पृथिवीवरि सत्यमान ;
बारे, तुझ्यांत असता जरि कां सुवास,
बागेमधें न मिळता इतरास वास ! ॥ १५ ॥

शार्दूलविक्रीडित.

शेवंती, गुलनार, गुल्छबु, गुलाब, श्रेष्ठ चित्ता हरी,
झेंडू, पद्म, कण्हेर, मालतिलता, जास्वंद, यांच्यावरी ;
नानारंग सुगंध, आकृति, कृती ज्याची असे शोभन,
कारागीर असा असे कवण तो पाहा मनीं शोधुन ! ॥ १६ ॥

शिखरिणी.

सुपुष्पा वेली ह्या तरुस धरुनी स्वेच्छ रमती,
सुकालीं हा युक्त क्रम, पर चमत्कार दिसती ;
कुमारीही पुष्पें सहित असती सांप्रत किती,
रजो-हीना मल्ली मलिन-मधुपासक्त असती ! ॥ १७ ॥

वसंततिलका.

कैशी प्रफुल्ल दिसते नवकेतकाली,
घेई सुगंध मधुपालि बसून काळी ;
हे केवडे न गमती स्मर-कुंत तीक्ष्ण,
मारावया सविष हे विरह्या सकोण ॥ १८ ॥

साक्या.

गौर केतकी, दलकर नखरीं पीडुनि मधुव्रतातें,
समणि भुजंगा देखुनि देशी त्याप्रति गे संगातें ;
मंडप-मखरीं नवीन पुष्पित, असती वेली शृंगा !
चलद्‌लहस्तीं नाहीं म्हणतां, मलिना ! करिशी संगा ॥ १९ ॥

शिखरिणी.

पडोळीं, घोसाळीं, परवर, फळें मंडपतळीं,
तशीं शेंगावांगीं बहुमृदुल बागेंत कवळीं;
किती पेरू, केळीं, अति-मधुर सीता-फळतती,
लतावृक्षीं नाना फलकुसुमराजी विलसती ॥ २० ॥

साकी.

जिकडे तिकडे सुंदर शेतें, दिसती हिरवीं गार,
सुलतालिंगित पर्वत तरुही दिसती सुरेख फार ॥ २१ ॥

वसंततिलका.

क्षेत्रें अनेक दिसती रमणीय खाशीं । लक्ष्मी वनांत रमते परिपूर्ण हौशी;
हर्षे कृषीवल मधें करतात धंदे । पक्षी सहर्ष करिती स्थल पूर्ण नादें ॥२२॥

साक्या.

कणसे हळु हळु नवीन निवर्ती, शोभा त्यांची फार,
कोमल दाणे दिसती सुंदर, सृष्टीचें तें सार ॥ २३ ॥
कणसांवरती नवीन दाणे, ओळीनें ते दाट,
शरदें लोकां मौक्तिक–कणसें तार्टी आणिली भेट ! ॥ २४ ॥
कर्षक माळ्यांवर बैसूनी, कोलाहल करितातीं,
गोफण धोंडे गुंगत हाणुन, पक्ष्यांतें उडवीती ॥ २५ ॥

मालिनी.

सकल सकल पक्षी रम्य वृक्षीं बसूनी,
मग फलरसधान्यां भक्षिती थोर रानीं ;
विमल जल नदीचें प्राशुनी खेळताती,
उडतउडत हर्षे स्वेच्छ लीला करिती ॥ २६ ॥
पशु नविन तृणातें भक्षुनी पुष्ट होती,
करुन वर सुपुच्छां उच्च शब्दा करीती ;
समद वृष नदीचें तीर हुंदाडिताती,
भिडवुनि खर शृंगां मत्त झुंजा करीती ॥ २७ ॥

साक्या.

निर्झर मौक्तिकशुभ्रहार जणुं धरिती अंगिं सुरेख,
हिरव्या वेषा करुनी सुलता आलिंगिति गिरि देख ॥ २८ ॥
शरन्नद्या त्या पुलिनें हळुहळु दावित असती रम्य,
नवीत संगमलज्जित बाला स्वांग जसें पतिकाम्य ! ॥ २९ ॥

दिंडी

नदीपात्रीं रमणीयता विशेष, स्वच्छ उदकें देतात मना तोष;
प्रसन्ना ह्या चालती नद्या वाटे, त्वरेनें कीं प्रियसंगमेच्छु वाटे ॥३०॥

उपजाति.

सुज्ञाचिया संगतिनें विशुद्ध, होती खलांचीं कुमनें प्रसिद्ध ;
ऋतूचिया या सुसमागमें हीं, तैशीं जलें निर्मल शांत पाहीं ॥ ३१ ॥

शिखरिणी

तुला सत्पात्रांची सतत असते संगति बरी,
तसे दोन्ही भागीं प्रबल असती रोधहि तरी ;
जला चांचल्यातें धरुन असती नीचग खरें
स्वभंगा पावूनी फिरत असशी संभ्रम-भरें ॥ ३२ ॥

साकी.

जलाशयीं ह्या ऋतूंत कमलें प्रफुल्ल होती फार,
मधुकर गुंजारव वर करिती शोभा दिसते थोर ॥ ३३ ॥

दिंड्या.

जलामध्यें सर्वदा असे स्थान, मधुपवृंदा सप्रेम देइ मान ;
कंटकाशीं आजन्म सख्य आहे, मुदित मित्रोदयिं पद्म तरी राहे ॥ ३४ ॥
करी जागृत सन्मित्र करीं लोकां, येइ तुजही करण्यास पाहुनी कां ?
मिटीसि डोळे तरी तूंहि कुमुदिनी गे, कशी वाटत तुज लाज नसे सांगें ॥

उपजाति.

रत्नाकराचा सुत शांत कांत, श्रीचा असे बंधु कलानियुक्त ;
सुधाकरांनीं सुखवी अनेकां, अशासवें पद्मिनि रुष्ट तूं कां ! ॥ ३६ ॥

साकी.

अरविंदावरि मिलिंद दाटी करून किति वसती ते,
पंचशरें हे विषयुत शरचि स्थापित पांथ-वधातें ॥ ३७ ॥

दिंड्या.

तुझ्या ठायीं पद्मिनी गुण अनेक, परी त्यांचें प्रागल्भ्य नसे स्तोक ;
ह्याच हेतु श्रीयुक्त-रम्य-कोशें, मधुपसंघा पाळिसी सदा तोषें ॥ ३८ ॥
करस्पर्शें मातंग पद्मिनीस, भ्रष्ट करिती पाहून तैं अलीस ;
राग येइ स्वप्रिया-घर्षणानें, फोडण्या तच्छिर जाति जणूं मानें ॥ ३९ ॥

साकी.

कर्णीं ताडित मधुपहि सध्वनि फिरून गंडीं जाती,
द्विजदानार्थी तीक्ष्णताडनाप्रति नाहीं मानीती ॥ ४०॥

शालिनी.

कंजांदोलीं बैसुनी हंसहंसी, झोला घेती वायुयेण्या विलासी;
अंगीं घेती अष्ट–गंधी पराग, भृंगी–गीतें डोलती कीं सुराग ॥४१॥

आर्या.

रवि ह्या ऋतूंत तापद, करितो प्राण्यास फार तो कष्टी,
माध्यान्हीं उष्णानें, होती संपूर्ण कृष्ण मृग पृष्ठीं ॥ ४२ ॥
धरितांचि दक्षिणाशा, तेजस्वि–प्रख्यही जरी द्युमणी,
अपणा केवल नाहीं, स्वाश्रित दिवसां लघुत्वही आणी ॥ ४३ ॥

दिंडी.

शुष्कपंका निर्धूलि भूमि शोभे, लता–पुष्पीं गुंजती भ्रमर लोभें;
मंद शीतल सद्गंध वात येतो, पांथ–जनता–चित्तांस मोहितो तो ॥४४॥

शिखरिणी.

शरत्कालीं शस्त्रें स्मर विधुसुहृत् घे निजकरीं,
सुगंधी पुष्पांचें नवधनु तदा चित्रित धरी ;
प्रगुंजन्मत्तालि ध्वनिच जणुं मौर्वी–रव करी,
सुदृक्–दृक्-बाणांतें हणुनि विरहि-प्राणच हरी ! ॥ ४५ ॥

वसंततिलका.

पुष्पें प्रफुल्ल धनु मन्मथ भृंगमौर्वी,
सुभ्रूदृगंतशर काम तयास लावी ;
यन्मित्र चंद्र जडमूर्ति जरी अनंग,
जिंकीं जगा, न महतां क्षम काय सांग ! ॥ ४६ ॥

दिंडी.

सौख्यकंदच तो होय शारदेंदु, कुमुदकुंदीं चंद्रिका विशद बिंदु ;
मोद देती, चालतो मंद मंद, वात घेउन मकरंद रम्य गंध ॥४७॥

## हेमंतऋतुवर्णन.

इंद्रवज्रा.

प्राण्यांस सर्वां स्वकळेंत गोवीं, हेमंत अंगां बहुकंप लावी ;
यत्नाविणें शीतळ वारि ठेवी, भोगार्हरात्री अतिदीर्घ दावी ॥ १ ॥
हेमंत-रात्री हिमशुभ्र-दंता, हे तारका-चंचलदृष्टि कांता ;
गाढांधकेशा द्विगुणाहि राहे, मत्तांगनेच्या परि मंद गा हे ॥ २ ॥

आर्या.

त्वत्कृति हे हेमंता, कचितचि ते सौख्य देइ कोणास,
सौख्यद हो स्त्रीयुक्ता तावद त्या यत्कलत्र कोणास ॥ ३ ॥
त्वत्करणी हेमंता, वाटे मज गर्हणास्पदा कांहीं,
द्विजशुचि कांपवुनि रे अपटिसि बहु त्यास आपदा कां ही ॥४॥

साकी.

संपूर्णांगें थंडीनें तीं खुडखुड काकडताती,
दंतावरतीं दंतहि अपटुनि तडतड सुशब्द होती ॥ ५ ॥

दिंडी.

शीत मारुत वाहतो शीत धूळी,
थंडवस्त्रें जणुं वाटताति ओलीं ;
शीत उदकें झोंबती सर्व-देहीं,
अग्निचीही नचलेचि शक्ति कांहीं ॥ ६ ॥

साक्या.

अतिशीतानें उदकावर तो दिसतो पडदा दाट,
शीतभयें जल पासोडीतें पांघरितें कीं घट्ट ॥ ७ ॥
अग्नीचीही दाहकशक्ति प्रनष्ट हेमंतीं ते,
निकटस्थापित दहन जरीही थंडच वाटे शीतें ॥ ८ ॥
अन्यऋतूंची दहशत नाहीं हेमंताची राही,
ज्याला थरथर नरपशुपक्षी कांपत असती पाही ॥ ९ ॥

आर्या.

श्वानें चुलिच्या मध्यें, डोळे मिटुनी सकंप बसतात,
करचरणांगां उदरीं, कूर्मापरि जंतुही अखडितात ॥ १० ॥
सस्त्री-बालक मानव, करुनी ज्वलितेंधनाग्नि तो सविध,
शेकत बसती हर्षे, हाहा हूहू करून ते विविध ॥ ११ ॥
पुरुष स्त्रियाहि बालक, हातपुढें करुनि शेकती बहुत,
कीं प्रार्थिती हुताशा, शीताचें तूं प्रभो ! करींच हुत ॥ १२ ॥

शार्दूलविक्रीडित.

पक्षी वानर कांपती थरथरां वृक्षांवरी बैसती,
उड्डाणीं कृतनिश्चय स्वनयनां झांकून ते राहती ;
शीतानें पशु आर्त होउनि तृणा टाकून हो पाहता,
प्राणी सर्वच शीत-पीडित असे कर्तव्यही सोडिती ॥ १३ ॥

साकी.

लता दलांवर हिमकण शीतल शुभ्रहि दिसती फार,
ऋतुसंगें श्रमबिंदुच पडले अंगावर किं अपार ! ॥ १४ ॥

वसंततिलका.

धान्यें खळ्यावर ढिगावर ढीग ठेले,
त्यांतें मळून कृषिकांहिं तयार केलें ;
राशी अनेक करुनी स्वगृहास नेले,
लक्ष्मी गव्हा-हरभऱ्यावरि तैंच डोले ॥ १५ ॥

मालिनी.

हरितहरित धान्यें सौख्य दृष्टीस देती,
हलति बहुत ओंब्या रम्य वांटे सभोंती ;
प्रिय-युत जन ओंब्या मिष्ट खाती हुळाही,
रुचिकर बहु लागे गोड जाती अधीं ही ॥ १६ ॥

शिखरिणी.

जशी नारी जातां स्वपति परदेशास विरहें,
उदासीना होते त्यजुनि सुखभोगास कृश हे;
धनांच्या संयोगें सरुचि वनलक्ष्मी खुलतसे,
वियोगानें फिक्की अनुदिन कृशाही दिसतसे ॥ १७ ॥

शार्दूलविक्रीडित.

अन्यर्तूत तशी नसे चव जशी हेमांतिं अन्ना असे,
पाणी शीतल मिष्ट निर्मल मना संतोषवीही तसें;
वस्त्रें रूभरि लोंकरी मृदु जना देती किती सौख्य तीं,
मृद्वंगी-तनु-संग-सौख्य मनुजा ह्या माजि होई अती ! ॥ १८ ॥

वसंततिलका.

जातें भरून जिकडेतिकडे धुकें तें,
प्राण्या दिसे न जरि वस्तु समीपही ते;
कीं शत्रुचा उगविण्या जणुं सूड शीतें,
हा कोंडिला ज्वलन-धूम्र गमेच मातें ! ॥ १९ ॥

आहेत लोकिं रस पातळ ते अनेक,
उष्णें करून करिती घन त्यांस लोक;
आहे तुझीच कृति एक अनन्यगम्य,
शीतेंहि घट्ट करिशी जल तूंच धन्य ! ॥ २० ॥

सूर्याग्नि घट्ट करण्या झटती जलातें,
रूपांतरासि धरुनी परि जाइ हो तें;
दोघेहि तापति तथापि उपाय-शून्य,
जागीं जडा अवळिसी घन तूंच धन्य ! ॥ २१ ॥

कंटाळले जन तुला जरि बा अतां रे,
गेल्यावरी गुण तुझे स्मरतील सारे;

नोष्मा कधीं, सतत निर्मल तोय थंड,
रात्री सुखाध्ययन-योग्य जरी प्रचंड ॥ २२ ॥

इंद्रवज्रा.

उद्योगमभ्यास करीच गोडी, हें शीत त्यांनां न कदापि पीडी ;
आलस्य सोडूनि तुह्मी ह्मणूनी, नित्यप्रयत्नांस करा झटूनी ॥ २३ ॥

भुजंगप्रयात.

हिमें झांकलेले किती थंड-देशीं, वनीं पर्वत प्रोच्च ते श्वेत-वेशी,
जणूं थंडिनें फार होऊनि भीत, सदूर्णांशुकानेंच आच्छन्न होत ॥ २४॥

आर्या.

मार्ग क्रमण्या लोकीं, जागृत केला जरी पथिक वाटे,
करपद पोटीं लावी, त्यातें उठण्यास दुःख बहु वाटे ॥ २५ ॥

शार्दूलविक्रीडित.

चाले शीतल वायु, शीतहि तसें अंगास पीडा करी,
कुंदीं आणि नवारविंदिं बकुलीं भृंगालि गुंजी करी ;
शीता नाशि जयाचिया जवळि ह्या काळीं नहो सुस्तनी,
दुर्दैव्या क्षणशः युगापरि तया होती व्यथा-दायिनी ॥ २६ ॥

शिखरिणी.

गृहीं पांथा, रामा त्यजुन परदेशास निघशी,
प्रिया नाहीं, वा तद्विरहदहनाऽविज्ञ असशी;
अरे ! कालीं ऐशा कुठुनि मग सोडूनि तिजला,
सुचे जाणें कोठें; मरणच जणूं नेत तुजला ! ॥ २७ ॥

मालिनी.

परुष वच न पांथा, मानसीं त्वां धरावें,
स्वसदन-रमणीतें जाउनी तोषवावें;
सुखद मदन-लीला शीतकालोचिता त्या,
करून, सुखित हो रे, फीर मार्गे सुकृत्या ! ॥ २८ ॥

सतत पिहित राहे द्वार अंतर्गृहाचें,
ज्वलित दहन राहे नेहमीं दीप्त साचें;
मृदुवसन उबेचें सर्व अंगांत आहे,
जवळ मृदुल गात्री शीत कोठून राहे ! ॥ २९ ॥

शालिनी.

सौख्या देई सेवितां ती हसंती, हेमंतीं ती सुंदरीही हंसती;
पूर्वाऽभावीं अल्प शीतार्ति होते, अन्याऽभावीं दुःख अत्यंत होतें॥३०॥

मालिनी.

बहुत कुपित झाल्या सुंदरी ह्या दिनांत,
तरिहि ऋतु तयांचा कोप राहूं न देत;
दिनभर बसती त्या रोषयुक्ता न रात्रीं,
करून मिष हिंवाचें, भर्तृसक्ता सुगात्री ॥ ३१ ॥

शार्दूलविक्रीडित.

"पीडी दैव सुदुर्बळां" स्मरण हें होई मला पाहतां,
सच्छिद्रा–शुक–युक्त–निर्धन जनां हें शीत हो बाधितां;
जेथें तें दृढ गेह ज्यांत वसती श्रीमंत ते सर्वदा,
तेथें शीत न जातसे जरि हळूं गेलें न पीडी कदा ॥ ३२ ॥

---

## शिशिरऋतुवर्णन.

आर्या.

शिशिरीं शीत लयातें, जातां जंतूस दुःख तें करितें,
अधिकारी जे कुमती, जातां जातांहि ताप करिती ते ॥ १ ॥
जातां शीत लयातें, प्रवृद्ध होतेच चेतना स्नेह,
दीप जसा क्षयकालीं, वृद्धीतें पावतो विनास्नेह ॥ २ ॥

साक्या.

ऋत्वर्षांच्या नंतर शीतहि; हळुहळु निघून जातें;
उष्ण-शत्रुची स्वारी लवकर येईल भिऊनि कीं तें ॥ ३ ॥
धान्यें ताटें आदि करूनी खटला घेउनि जाते,
लक्ष्मी, ह्मणुनी उदासीनता शिशिरा तुजला येते ॥ ४ ॥

वसंततिलका.

गोधूम धान्य चणकांवरचीहि लक्ष्मी,
जाई त्यजूनि विपिना शिशिरीं स्वधामीं ;
जी कीं असे सकलभूषण तीच जातां,
शोभा कुठूनि मग राहिल तेथ आतां ॥ ५ ॥

आर्या.

लक्ष्मी त्यजुनी जातां, विशोभा शिशिरा, मह‍ा तुझ्या ठायीं,
धनधान्यर्द्धिहि जाउनि राहे अवशिष्ट धूळ त्या ठायीं !
शिशिरा श्रीविण जीवन, व्यर्थ तुझें वाटतें मज विरामा,
जाणुनि हेंच विधीनें, अपमानें योजिलें तुज विरामा ॥ ६ ॥

शिखरिणी.

गृहातें टाकूनी क्षणभरच जातांहि रमणी,
नवी वस्तू वाटे विकल सदनीं ही भणभणी ;
उदासीनत्वानें मनुज यदभावीं भटकती,
वनश्री स्त्री नाहीं, तुज कुठुनि शोभा विलसती ॥ ७ ॥

वसंततिलका.

तूं जीर्णता लपविण्या करिशी स्वकाया,
जाणो सुवर्णमय पीत करून माया ;
लक्ष्मीस मोह करण्या बरि युक्ति केली,
नाहीं परी तुज गड्या तरि साध्य झाली ॥ ८ ॥

जीर्णा त्वदीय तनु पत्रमिषें गळे ते,
पाहोनि कृत्रिम तुझी कृति चंचला ते;
लक्ष्मी त्यजून तुज जाइ पराकडेस,
भर्ता श्लथेंद्रिय रुचे नच सुंदरीस ॥ ९ ॥

शीतोष्णभूप इतरेतर-शत्रु खास,
झुंजा करूनि हटवीति परस्परांस ;
येतां मधें शिशिर त्यांक्षणिं हो चुराडा,
शोभा स्वकीय दवडून बसेच वेडा ! ॥ १० ॥

विश्रांति कर्षक जनांप्रति तूंच देशी,
अन्यर्तुमाजि न मिळे क्षणही तयांसी ;
होती कृषीवल फिरून नव्या दमाचे,
नाल्पोपकार तव त्यांवर होति साचे ॥ ११ ॥

नाहीं तुझ्यांत अति उष्ण, न शीत फार,
आहेस तूं सुखद यास्तव होशि थोर ;
कार्यें अनेक करण्या दिन हेच योग्य
आहेत, यापरि किती ह्मणतात योग्य ॥ १२ ॥

बारे ! सुवर्णमय तूं बहुनीच खाशा,
त्या मोहरांस जरि दाविशिही स्वकोशा;
कारागिर प्रथम तूं असतां तयांचा,
देती वसंतऋतुला जन मान साचा ! ॥ १३ ॥

सुव्यक्त कारण असे कथितों तुला बा,
श्रीशास मान जन देति न ते गरीबा ;
आहे समान कृति ही सरशीहि खाशी,
नांवावरीच भुलती जन रीति ऐशी ! ॥ १४ ॥

## प्रार्थना.

### पद.

गड्यांनो, तो जगदीश भजा ! ॥ ध्रु० ॥
कृपें जयाच्या साहि ऋतूंमधिं, आहे बहुत मजा ॥ ग० ॥
वसंतशीतलवात फुलांतिल, फिरतो घेत रजा ॥ ग० ॥
द्राक्षाम्रादिक मधुरस सुफलें, करितो फार चिजा ॥ ग० ॥
सुपीक होण्या करी उष्णता, ग्रीष्मीं तो न दुजा ॥ ग० ॥
वर्षुनि वर्षा हर्षा देतो, शमवुनि ताप रजा ॥ ग० ॥
शरदीं धान्यें सुजलें करितो, शोभा करि जलजा ॥ ग० ॥
सुफलीं पुष्पीं मुदित करी तो, घनमल जाति विजा ॥ ग० ॥
हेमंतीं रुचि अन्नजला अंति, देतो सुख मनुजां ॥ ग० ॥
शिशिरीं माहीं कमी रंग, पण लवकरि तुह्मि उमजा ॥ ग० ॥
ऋतुवर्षादिक रूपें त्याचीं, कालचि तो समजा ॥ ग० ॥
कृतकर्माचा, अहंकृतीचा, सोडुनि द्या गमजा ॥ ग० ॥
लक्षीं ठेवा, पापापासुनि, होइल सौख्य वजा ॥ ग० ॥
सर्पापरि हा काल जातसे, पाहुनि त्यास बुजा ॥ ग० ॥
भजनसमाजीं प्रभुकीर्तीच्या, गजरा संतत जा ॥ ग० ॥
विभु-दृढनावें संसारार्णव तरण्या शीघ्र धजा ॥ ग० ॥

# शिवराम रामकृष्ण नित्सुरे

यांचें मूळ गांव रत्नागिरी जिल्ह्यापैकीं दापोली तालुक्यांतील आंजर्लें हें होय. ह्यांचा जन्म ह्यांचे आत्याचे घरीं अहमदनगर जिल्ह्यांतील एका गांवीं झाला (बहुधा पारनेर) हे आश्वलायन शाखेचे चित्तपावन ब्राम्हण होत. ह्यांचें घराणें गांवांतील प्रमुख घराण्यांपैकीं असून, सबंध नित्सुरे घराण्याकडे गांवाचें उपाध्येपण असल्यामुळें यांचे घराण्यांत चांगले वेदविद्या विशारद असे बरेच लोक होऊन गेले. सदरहू कवींचे वडील चुलते एक नामांकित विद्वान् म्हणून प्रसिद्ध होते. कवींचे वडील व एक चुलते यांनीं मात्र पालटलेल्या मनू प्रमाणें आंग्ल भाषेचें थोडें बहूत अध्ययन केलें होतें. यांचे वडील पुणें जिल्ह्यांतील न्यायखात्यांत नौकरीला असून त्यांचें वास्तव्य बरींच वर्षे खुद्द पुणें येथें सदाशिव पेठेंत साठे यांचे वाड्यांत होतें. श्री. शिवराम रामकृष्ण यांच्या मातोश्री फारच लहानपणीं म्हणजे सुमारें १ । १॥ वर्षांचे असतांनाच वारल्यामुळें त्यांचे संगोपन त्यांच्या आजी व चुलते यांचे देखरेखीखालीं झालें. मुक्काम आंजर्लें येथें त्यांचें प्राथमिक शिक्षण झाल्यावर पुढील शिक्षणाकरितां ते पुणें येथें आपले वडिलांकडे गेले. त्यांचें पुढील म्हणजे मॅट्रिक पर्यंतचें शिक्षण पुना कॉलेजांत झालें. त्यावेळीं व्यंकटराव रामचंद्र या नांवाचे कोणी अध्यापक तेथें होते. अशक्त प्रकृती व सापत्न मातोश्री यामुळें त्यांचे शिक्षणाचे कामांत बरेच व्यत्यय आले, व मट्रिक होण्यापूर्वींच म्हणजे ता. १२ जून सन १८६७ रोजीं यांनीं मुंबई येथें डोंगरीचे शाळेंत प्रथम नोकरी धरिली. त्यावेळीं त्यांस पगार अवघा २५ रु. मिळत होता. ते इ. स. १८६८ या वर्षी माट्रिकची परीक्षा पास झाले. या वर्षी परीक्षेस एकंदर ८३५ विद्यार्थी बसले होते व त्यापैकीं १४२ च पास झाले. इ. सं. १८६७ पासून इ. स. १८७७ पर्यंत यांनीं डोंगरी येथील अँग्लोव्हर्नाक्युलर शाळेचे मुख्य अध्यापकाचे जागेवर काम केलें. त्यावेळीं ते गिरगांवांत गोपीनाथ खत्री याचे मागचे

चाळींत राहात होते. त्यावेळीं बाळ यशेश्वर या नांवाचे कोणी गृहस्थ त्यांचे शेजारी राहत होते. त्याकाळीं हल्लीं प्रमाणें दळण वळणाचीं चांगलीं साधन उपलब्ध नसल्यामुळें त्यावेळचा प्रवास बराच बिकट असे. अशाच प्रकारच्या एका प्रवासांत मुंबईस जात असतां नागोठण्याजवळ बैलगाडी उथलून त्यांस बरीच दुखापत झाली व हात मोडला. यावेळीं तेथें असलेले पोष्टमास्तर रा. नामजोशी यांनीं त्यांस फारच मदत केली. वरील अपघातपासून त्यांची मुळची अशक्त असलेली प्रकृती बरीच ढांसळली. इ. स. १८७३ या पुढें इ. स १८७७ चे जून अगर जुलै महिन्याचे सुमारास त्यांचे शिष्य व त्यांचेच येथें मुंबई मुक्कामीं विद्याभ्यासास असलेले गृहस्थ रा. ब. सिताराम विश्वनाथ पटवर्धन हे शाळाखात्यांत बऱ्याच मोठ्या हुद्द्यावर ( बहुधा डेप्युटी इन्स्पेक्टर ) आले व त्यांचेच शिफारशीनें शिवरामबापूंची पंढरपूर येथें बढतीवर नेमणूक झाली होती. सदरहू पंढरपूर येथील जागेवर ते हजर झाले कीं नाहीं हें निश्चित सांगतां येत नाहीं. परंतु बहुधा झाले नसावे असें दिसतें. गेलेच असले तर फारच थोडें दिवस गेले असावे. प्रकृती अस्वास्थ्यामुळें ते आपले गांवीं म्हणजे आंजर्लें येथें येऊन राहिले. परंतु तेथेंही आराम वाटेना म्हणून जवळच असलेल्या आपल्या श्वशुरांचे गांवीं म्हणजे केळशी येथें गेले. तेथें बरें वाटेना म्हणून अगदीं डोंगरांत असलेल्या रेंवलें नांवाच्या खेड्यांत ते गेले व तेथेंच त्यांचे इ. १८७८ त देहवसान झालें.

प्राचीन कवीं प्रमाणें ईश्वर भक्ति हा जरी यांचा मुख्य गुण नसला तरी यांची गणपतीवर फारच भक्ति होती. व ज्योतिषावरही यांचा फारच विश्वास होता. हे स्वतः कीर्तनही करीत असत, व गांवचे देवीचे यात्रेंत साधारणपणें लहानपणींच त्यांनीं ३।४ कीर्तनें केल्याचा दाखला आहे. हे स्वतः चांगले कवी तर होतेच, परंतु आपले सहवासांतील इतर मंडळीसही हे कविता करण्यास प्रोत्साहन देत असत. या त्यांच्या प्रोत्साहनामुळें त्यांची सहचारिणीही चांगलीं कवनें करीत असे असें वृद्ध माणसें सांगतात. परंतु त्यांच्या कवनापैकीं आज कांहीं उपलब्ध नाहीं.

## मंगलाचरण.

शार्दूलविक्रीडित.

ज्याचीं पादरजें सदा सुखविती ब्रह्मादि ज्या सेविती,
ज्यातें आठवितां क्षणें निरसती त्या विघ्नराशी किती ;
भावें भाविक भक्त ज्यासि नमिती तैं कार्य आरंभिती,
ज्याचें मंगल नाम हो गणपती मी वंदितों त्याप्रती ॥ १ ॥
प्रार्थोनी तुज मागतों, शिवसुता ! विघ्नें लया पाववीं,
माझीया वदनें रसाळ चरितें तूं मोरया गाववीं;
भ्रांतीतें निरसोनियां सकलही दे स्फूर्ति ह्या बुद्धिला,
हेतू जो धरिला मदीयमतिनें तो पाववीं सिद्धिला ॥ २ ॥

वसंततिलका.

जें कां करूं नच शके अजि तें कराया,
घे धांव हा जडमती जगदेकराया ;
व्हावा प्रसाद शरणागत किंकरातें,
लावीं प्रभो! धरुनियां सुपथीं करातें ॥ ३ ॥

आर्या

आतां सरस्वतीं मी करितों जोडून हात तुज नमन,
चद काव्य मन्मुखानें कीं जें बहु रंजवील सुजनमन ॥
निर्भय तवाश्रयें कवि करिती वर्णार्णवांत केलीला,
विधिहरिहरांसहि तुझी नकळे त्रैलोक्यचालके लीला ॥ ४ ॥

वसंततिलका.

वेदादिकांहि न तुझा गुणपार लागे,
तो पामरास तरि देवि कसा मला गे !
जीचा अतर्क्य महिमा त्रिजगीं न माये,
त्या वर्णवेल तुजला मज केविं माये ! ॥ ५ ॥

वसंततिलका.

मागे धरोनि बहु छंद न ये करा तें,
स्नेहाळ माय पुरवी तरि लेंकरातें ;
माझ्या तसेंचि पुरवोनि मनोरथांतें,
माते ! मुखें सुरस गे वदवी कथांतें ॥ ६ ॥

आर्या.

कर जोडुनियां माझें सकळांही सज्जनां असो नमन,
काय उणें मज आतां लीन तयांच्या पदीं असोन मन ! ॥ ७ ॥

भुजंगप्रयात.

अहो प्रास विप्रास ह्या साह्य आतां, करा येउनी ह्या चरित्रास गाता;
बहु त्रास मित्रांस होतो तुह्मांतें, परी अन्यथा कार्य साधे न मातें ॥८॥
जरीकां ह्मणां आमुचें काम नाहीं, कशी सिद्धिला पावते कामना हीं;
तुह्मीं साह्य केलें तया वामनाला, तसा तूमच्या हाहि यावा मनाला. ॥ ९ ॥

---

## प्रस्ताव.

आर्या.

यापरि वंदुनि सकलां सांगतसें, चरित आयका हो तें,
श्रीशरयूच्या तीरीं विजयपुर ह्मणोनियां नगर होतें ॥ १ ॥
त्या नगरीं राज्य करी परमानंदाख्य भूप शूरवर,
मोठा धार्मिक ज्याची कीर्ति पसरली जगांत दूरवर ॥ २ ॥
होता दुर्जय नामें दुर्व्यसनी एक तनय राजास,
झाला दुःखद मोठा, वाटे नसता तरी बरा ज्यास ॥ ३ ॥
विद्याकलादिकांतें कांहीं न करी प्रयत्न साधाया,
ऐसा निज पितयातें होइल सुत पात्र तो कसा धाया ! ॥ ४ ॥
अंतःपुरीं स्त्रियांसह बहु रुचला ज्याचिया मना वास,
लावील न कां ऐसा, वडिलांच्या पुत्र, डाग नांवास ? ॥ ५ ॥
जाती कुपथीं सुत तरि दुःसहचि तुह्मां न काय हो तात !
जातां तेचि सुमार्गीं सर्व सुखाचे उपाय होतात ॥ ६ ॥

होतां वृद्ध, सुताची राजा स्वमनांत काळजी वाहे,
हो जरठीं पितरांच्या धनसुतचिंताच काळजी वाहे ! ॥ ७ ॥
जो पढवी न सुतातें तो तच्छत्रुचि, ह्मणूं नये तात,
घातक निजात्मजाचा, दोष तयाला म्हणून येतात ॥ ८ ॥
जाणुनि सुनीति ऐशी सुपथीं लावावया निज सुतातें,
पंडित चतुर मिळविले, केला बोध स्वयेंहि बहु वातें ॥ ९ ॥
झालें सकल विफल तें, स्वांतीं तो बहु, पिता असुख पावे,
कांचावे, न ह्मणे या चितापाशीं असे असु खपावे ॥ १० ॥
सचिवाधीन करुनि मग राज्य वनीं जाय तो तप कराया,
आराधी दुर्गेतें दुःखद हृत्ताप सर्वहि हराया ॥ ११ ॥
सोसुनि वनीं हिमातप तर्पुनि जठराग्नि पर्णरसपानें,
तिष्ठुनि एक पदावरि केलें अत्युग्र त्या तप नृपानें ॥ १२ ॥
मासांतीं प्रगटुनियां देवि ह्मणे, भागलास बा साधो,
वर ईप्सित वर आतां, कार्य तुझें राजसत्तमा साधो ॥ १३ ॥
पाय नमुनि राय ह्मणे, काय वद उपाय अंबिके वरदे,
जेणें सुपथीं मत्सुत लागे हा, गे अभीष्ट मज वर दे ॥ १४ ॥
देवि ह्मणे खगरूपें येउनि तुझिया स्वयेंच बा धामीं,
बोधुनियां त्वत्तनया पळविन अज्ञानरूप बा धामीं ॥ १५ ॥
होऊन सारिका मग, ती गेली राजमंदिरा देवी,
पक्षी लक्षुनि सुंदर, भूपज निज मंदिरीं तिला ठेवी ॥ १६ ॥
तिथेंचि मनुजवाणी बोलुनियां बोध करुनि नृपजास,
लावी सुपथीं ती मग पढवी विद्या अनेक नृप ज्यास ॥ १७ ॥
देवी ह्मणे नृपसुता ! त्यागीं दुर्व्यसन सर्व बापा हें,
लाविल तुझ्या कुळाला अपकीर्तीचा कलंक बा पाहें ॥ १८ ॥
झाला तोचि, स्वकुला भूषवि जो आपुल्या गुणेंकरून,
नातरि या भवचक्रीं जनन न ते कवण पावती मरुन ॥ १९ ॥

भूतलवटीं चहुंकडे गाजतसे कीर्ति आज रायाची,
तत्सुत तूं मूढ असा ! लाज असावी तुला जरा याची ॥ २० ॥
सुगुणी पुत्र सुजाया जोडिति फळ नर करोनि सुतपा हें,
नरकीं निज पितरांतें घाली जन्मोनि मूर्ख सुत, पाहें ॥ २१ ॥
त्वत्तात जरठ, तूंही शस्त्रास्त्रज्ञानहीनचि असा रे,
ऐसें ऐकुनि, घाला राज्यावरि शत्रु घालतिल सारे ॥ २२ ॥
यास्तव यत्नें आधीं विद्यासंपन्न नृपकुमारा हो !
ज्ञानार्क प्रगटुनि मनीं, ठाव न अज्ञानमय तमा राहो ॥ २३ ॥
जिंकुनि विवेकखड्गें आलस्य प्रथम शत्रु घातकर,
बा कीर्तिश्री जोडुनि, त्रैलोक्यामाजि धन्य तात कर ॥ २४ ॥
स्त्रीविषय परम घातक, दशमुख सेवूनि यासचि बुडाला,
भक्षुनि आरोग्यातें पावेल कसा गदार्त, चिबुडाला ॥ २५ ॥
अजरामरवत् प्राज्ञें विद्याश्रीचा न यत्न सोडावा,
धर्माचरणीं, सन्निध कल्पुनि मृत्यूस, धर्म जोडावा ॥ २६ ॥
म्हणसी विद्या असुगम, कैसें करवेल साध्य तीस मज,
संतत पथ क्रमुनि नर दुर्गम गिरिशिरहि पावती समज ॥२७॥
दुस्तरभवार्णवांतुनि विद्यानौका सदा जनां उतरी,
श्रममात्र आतरास्तव मागे ऐशी दुजी नसे सुतरी ॥ २८ ॥
विद्येनें भूषित हो, वस्त्राभरणीं तसा न, नरकाय,
पशुसम विद्येवाचुनि वांचुनि भूभारभूत नर काय ॥ २९ ॥
विद्येस मान लोकीं मिळतो, नपवे कदा तसा धन तें,
विद्येसमान लोकीं ह्या अन्य न जीवनार्थ साधन तें ॥ ३० ॥
विद्याधन वर म्हणती, बा इतर धनीं दुजें न ज्यापरिस,
या अर्थी सुरस कथा कथितें, ती नृपवरात्मजा परिस ॥ ३१ ॥

## धनप्रशंसा.

वसंततिलका.

तेव्हां धनादिप शिवास ह्मणे विलोकीं,
बापा ! धनासम न थोर दुजें त्रिलोकीं ;
विद्यादि साधन धनार्थचि या करीती,
संपादिती जन तयास अनेक रीतीं ॥ १ ॥

भुजंगप्रयात.

जयाच्या घरीं नांदते संपदा ही, तयाला जगीं मानिती लोक दाहा ;
बहु तो शहाणा बहू तो कुलीन, तयाच्या पुढें सर्वही लोक लीन ॥२॥

वसंततिलका.

कोणी पुसे न पदरीं जरि हेम नाहीं,
निर्द्रव्यता असुख दारुण दे मना ही ;
कांताहि लेखिति पतींस तृणासमान,
कोठेंचि नाहिं तरि निर्धनिकास मान ॥ ३ ॥

भुजंगप्रयात.

अनेकापरी योजुनि साधनांतें, मनीं वांछिती सर्व एका धनातें ;
धनप्राप्तिच्या वेष्टिलें वासनांहीं, धनावांचुनि शांति जीवास नाहीं ॥ ४ ॥
धनाकारणें त्यागुनी पुत्र दारा, विदेशीं पडे हिंडणें दारदारा ;
धनीच्या पुढें होउनी दीनवाणें, सदा बुद्धिमंतांसही ये रहाणें ॥ ५ ॥
धनाकारणें कष्ट देऊन जीवा, करावी जनां लागते नीचसेवा;
धनप्राप्तिला यत्न लागे उदंड, धनासाठिं ये भोगणें देहदंड ॥ ६ ॥
धनासाठिं जे मित्र ते शत्रु होती, धनासाठिं या बंधुही प्राण घेती ;
धनाकारणें सर्व मानाभिमान, धनाकारणें घेति कापून मान ॥ ७ ॥
जनीं सर्वही लोभ ह्याचा करीती, हवी नातरी कासया चाकरी ती ;
धनाकारणें सर्व लागे पसारा, धनावांचुनी व्यर्थ संसार सारा ॥ ८ ॥

धनाचीच कांता धनाचेचि पुत्र, धनाचे मिसें सर्वही प्रीतिपात्र;
धनें लाभतें इच्छिलें सर्व कांहीं, धनायेवढें थोर कांहींच नाहीं. ॥ ९ ॥

## विद्यामहिमा.

साक्या.

शंभु ह्मणे, सखया ! तुज झाली संगति नित्य धनाची,
ह्मणउनि, वाटे ऐसी भ्रमली तुझिया वृत्ति मनाची ॥ १ ॥
चंचल धनसंपदा, कदाही एके ठायिं न राहे,
करुनि पलायन शोकसागरीं सहसा बुडवि नरा हे ॥ २ ॥
वाहे निशिदिनिं धनी काळजी रक्षाया धनराशी,
ढकली दुष्कृतकूपीं धन हें, करुनि मदांध नरासी ॥ ३ ॥
दहनावाचुनि मना निरंतर जाळितसे धनचिंता,
ऐसी धनगति ! सखया ऐकें विद्यामहिमा आतां ॥ ४ ॥
तस्कर जें कां लुटों न शकती, साध्य न हो नरनाथा,
बंधु जयाचा भाग न मागति, शिणवि न भारें माथा ॥ ५ ॥
व्यय करितांही वृद्धिच पावे ! संतत सन्निध राहे,
ऐसें सर्व धनांहुनि उत्तम बा विद्याधन आहे ॥ ६ ॥
विद्या दे विनयास, विनय तो दे पात्रत्व नरासी,
पात्रत्वें धन, धनें धर्म तो, पावे मग सुख–राशी ॥ ७ ॥
विद्यायोगें मिळे चतुरता, चतुराईनें मान,
ज्यातें लोकीं नसे मान, तो मानव पशूसमान ॥ ८ ॥
विद्यासंगें निघे प्रवासी, साह्य करी मनुजातें,
न विसंबे पळही, संरक्षी माय जसी तनुजातें ॥ ९ ॥
मनुज पाहतां केवळ भूचर, परि बैसोनि विमानीं,
विद्यायोगें गमन निराळीं केलें सुमन तयांनीं ॥ १० ॥

जो लक्षावधि कोस पसरला, खोल जयाचें पाणी,
ऐसा सिंधुहि विद्यायोगें केला सुतर तयांनीं ॥ ११ ॥
विद्यासामर्थ्येंचि नरांनीं पावक, सेवक केला,
पवन पुढें कर जोडुनियां ये मारितांच हांकेला ॥ १२ ॥

वसंततिलका.

आंगीं तरूणपण, कांतिहि दिव्य ज्याला,
कीं जन्म तोहि सुकृतें सुकुळांत झाला;
विद्येविणें नर असाहि न तो विराजे,
निर्गंध किंशुक तया उपमेस साजे ॥ १ ॥

भुजंगप्रयात.

बहू सोयरे, धायरे, मित्र, लोकीं, । परी संकटीं एक नाहीं विलोकीं,
सुखासाठिं ते सर्व आले मिळोनी,।विपत्काल येतांच जाती पळोनी ॥१॥
असे मित्र विद्या जरी मानवातें, त्रिलोकीं उणें काय आहे तयातें !
असो संपदा त्या नसो वा दसोडी,तरी साह्य दे त्यास विद्या, न सोडी ।२।

## नगरदहनानें झालेली लोकांची धांदल.

शार्दूलविक्रीडित.

कोणी धाउनियां प्रदीप्त सदनांबाहेर ये अंबरें,
यत्नें रक्षिति पात्र भूषणहि ये हातास जें जें बरें;
कोणी जाउनि निद्रितांस उठवी, काढी दुजा लेंकरें,
गोष्टीं बंधनमुक्त एक करि जीं होतीं गुरें वांसरें ॥ १ ॥

भुजंगप्रयात

ह्मणे एक गेहांत धांवोनि, जाळें,
नका व्यर्थ भाजोनि घेऊं कपाळें;
अहो आयका ! राहु द्या सर्व आधीं,
पळा ! नातरी होय जीवास आधी ! ॥ २ ॥

असें वारितो एक राहे दुजा तो,
तिजा फार लोभी त्वरें आंत जातो;
धरे येतसे तों कडाडोनि वाडा !
करी सर्वही बोलण्याचा निवाडा; ॥ ३ ॥

मालिनी.

सदनिं हुरपळोनी घाबरा एक झाला,
तडफडताचि कष्टें शीघ्र बाहेर आला;
गडबड तयिं भूईं बापुडा फार लोळे,
त्वरित असुहि सोडी, पांढरे होती डोळे ॥ ४ ॥

शिखरिणी.

तयाची जे कान्ता, बसुनि निजकान्ताजवळि ते,
रडे, फोडी माथा, फिरफिरुनि नाथा कवळिते;
ह्मणें स्वामी ! गेलां त्यजुनि अबलेला तरि कसे ?
असा कांहीं धन्या ! मजकडुनि अन्यायहि नसे ! ॥ ५ ॥

इंद्रवज्रा.

हा रोष केला तरि आज कां गा ? अन्याय झाला तरि काय ? सांगा !
कांहीं तरी हो पतिराय बोला ! कांहो असा राखितसां अबोला ? ॥६॥

शार्दूलविक्रीडित.

किंवा जाउनियां प्रदीप्त सदनांमाजीं बहू भागलां,
विश्रामार्थ महीतळीं घडिभरी डोळा असे लागला ?
पुष्पांच्या पहुडे सदा मृदुलशा शेजेवरी काय हा,
आहे योग्य पडावया क्षितितळीं धुळीवरीं काय हा ॥ ७ ॥
कीं वाचाळ सदा प्रिया प्रियवचां मागे, अशी हांवरी,
टाकोनी वरिली सुशील सुखदा निद्रा दुजी नोवरी ?
कीं कांहीं वदलें कठोर ह्मणुनी हा रोष केला असा ?
कैसा अंत तरी पहाल इतुका ? भारी कृपाळू असां ! ॥ ८ ॥

कीं द्यावें प्रिय जें अपूर्व मज तें आलें असें अंतरीं,
तें नाहीं क्षितिमंडळीं ह्मणुनियां शोधार्थ गेलां वरी !
झाला शोध, पुरे ! नको प्रियतमा ! सारें मला पावलें !
लाहें मी अनुपम्य सौख्य तुमचीं हीं सेवितां पावलें ॥ ९ ॥

शिखारिणी.

अहा दैवा ! कैशी विपरित अशी गोष्ट घडली ?
कुऱ्हाडी आकाशींहुनि अवचितां केविं पडली !
करूं काई आई ! मज उदरिं दे ठाय जगती !
असारीं संसारीं पतिविण सती व्यर्थ जगती ! ॥ १० ॥

द्रुतविलंबित.

घडघडां बडवी मग ऊर ते ! नयनिं वाहति गा जळपूर ते !
फिरफिरोनि शवासह बोलते, वदवती न तिचे मज बोल ते ॥११॥

वसंततिलका.

घेवोनियां कितिक ते जन कुंभ हातीं,
यत्नें जळें अनल तो विझवूं पहाती;
त्यांची तयापुढती काय असे कथा रे !
आगीसमीप जन एकहि तो न थारे ॥ १२ ॥

द्रुतविलंबित.

पवनही अति दारुण ऊठला, सकळिकांस तदा पळ सूटला,
रडति वृद्ध तरूण समस्त कीं ! कितिक हाणिति भूमिस मस्तकीं ॥१३॥
बडविती तयिं ऊरहि बायका, कितिक त्यांतच बोलति, आयका !
सुजवितां तरि नेत्र रडून कां ? फुकट शोकभरें चिरडूं नका ॥ १४ ॥

स्वागता.

एक ते सदय लेंकुरवाळी । पोळतां शिशु, तया कुरवाळी;
धावते हृदयिं त्यास धरोनि । जाय तो तडफडोनि मरोनि॥१५॥

भुजंगप्रयात.

पळे एक, पाठीस तों मूल लागे। ह्मणे काय टाकोनि जासी मला ! गे !
नको एकली जाउं ! मातें सवें घे ! ह्मणोनि त्वरें जाय, मातेस वेढें ॥१६॥

द्रुतविलंबित.

ह्मणतसे तंव एक कसें करूं ! विसरलें सदनांतचि लेंकरूं !
बहुत तांताडिनें पळतां अहो ! स्मृतिच ती मज बाइ कशी नहो ॥१७॥

भुजंगप्रयात.

कळेना जितें राहिलें कीं जळालें ! करूं कायगे धैर्य माझें गळालें !
पहायास बाळास जातें ह्मणून, न तशाहि त्या पावकातें गणून॥ १८ ॥
स्वगेहासि ये मागुती माय जेव्हां, दिसे दीप्त सारेंचि ते तीस तेव्हां;
पडे भूइं ते मोकली धाय माय, शिशूचें तिच्या दुःख पोटीं न माय ॥१९॥
ह्मणे एक, कोठें नसे सासुबाई ! कळेना असे की नसे सा–सु बाई !
अशी घाबरी स्वांतरीं तें असून, दुजी ते ह्मणे, जाहली काय सून? ॥२०॥
ह्मणे एक आहे गृहीं वृद्ध आई ! करूं मी कसें काय आतां अगाई !
दुजी तों मुलीचा ह्मणे थांग नाहीं! असा मांडिला घोळ पौरांगनाहीं॥२१॥
शिशू एक मारी स्वमातेस हांका, दुजा तों ह्मणे जाहला काय काका ?
तिजा बोलतो दाखवीं माय मामा, रडे, दे म्हणे प्यावया एक आमा!॥२२॥
गृहा लागतां आग एका, पळाली, मुलें माणसें सर्व ती वेगळालीं;
शिशू एक मांडीवरी जो निजेला, चुकोनि गृहामाजिं तो राहियेला ॥२३॥
असे पावकें वेष्टिली सर्व जागा, अशामाजिं तो जाहला बाळ जागा !
सभोंवार तों देखिला जाळ जेव्हां, भयें धाकलें धाकलें बाळ तेव्हां!॥२४॥

शिखरिणी.

अधोभागीं चोहींकडुनि जायें वन्ही धडकला,
नये जाया, माडीवरिच शिशु तेव्हां अडकला;
तयातें काढाया कितिक जन ते यत्न करिती,
नये एकातेंहि परि चढुनि जायाहि वरती ॥ २५ ॥

द्रुतविलंबित.

खिडकिमाजिं उभा मग राहुनी, शिशु रडे जननीप्रति बाहुनी;
जन समस्त अधःस्थळिं पाहती, नयनिं अश्रु ढळाढळ वाहती! ॥२६॥

भुजंगप्रयात.

अगे माउली धांव ! गा धांव ताता !
जळालों ! कसें मी करूं काय आतां;
ह्मणे हांक मारोनियां मायबापा,
न मागेन मी आजपासून पापा ! ॥ २७ ॥
न मागेन खाऊ ! नको साय मातें !
रुसेंना कधीं आजपासून माते !
अहो घ्या मला ! बांहुटे तो उभारी,
तया देखतां कष्टले लोक भारी ॥ २८ ॥

## नगरदहनानें झालेली एका स्त्रीची धांदल.

वसंततिलका.

एका गृहांत तरुणी सुकुमार साची,
होती नवप्रसवली सतरा दिसांची;
देखोनि तो दहन फार समीप आला,
घेऊन तीस ह्मणि कांत सवे निघाला ॥ १ ॥
पोटीं धरोनि लघु बालक ते शुभांगी,
आली पथीं, परम दुःखित अंतरंगीं;
नेतां असा शिशु, पडे श्रम फार तीतें,
बोले ह्मणोनि पति मंजुळ भारतीतें ॥ २ ॥

इंद्रवज्रा.

तूं सत्वरी चाल पुढें सये ! तों, मागून मी घेउन यास येतों;
ऐकोनि ऐसें ललना निघे ते, लोकासवें धांव पथांत घेते ॥ ३ ॥
झडकरी करिं वस्त्रहि आंवरी, पदर सांवरिते वरचेवरी;
सुतनु घाकलि धाकलि मानसीं, चपळ ते पळते हरिणी जसी ॥ ४॥

इंद्रवज्रा.

ऐशापरी धांवत दूर आली, ते गोरटी श्रांत अपार झाली;
आंगीं तियेच्या बहु घर्म आला, म्लानत्वही ये मुखपंकजाला ॥ ५ ॥

वसंततिलका.

विश्रांतिला मग उभी क्षणमात्र राहे,
येतो पती ह्मणुन मार्ग विलोकिताहे;
धांवा ! पळा ! अशि उठे तंव थोर हांक,
सारेच तैं पळति पावुनि फार धाक ! ॥ ६ ॥

इंद्रवज्रा.

दाटी पथीं फारच हो जनांची, इच्छा समस्तां निज जीवनाची;
एकापुढें धांवति एक वेगें, हे भागली राहिलि दूर मागें ॥ ७ ॥

शिखरिणी.

मनीं धाके, हांकेसरासि मग भारीच पळते,
उभी राहे, पाहे फिरफिरुनि मागें चपळ ते.
अशी जाता जातां अडखळुनि रंभोरु पडली,
महावातें कीं ते डळमळुनि रंभा उपडली ! ॥ ८ ॥

इंद्रवज्रा.

आधींच होती सुकुमार बाळी, जे धांवतां श्रांत अशांत झाली;
ऐशांतही आपटतां कपाळीं, ते भीरु सोडी असु तेची काळीं ! ॥ ९ ॥

वसंततिलका.

तो पावला सशिशु नाथ तया सतीचा,
देखे असा तयिं अचेतन काय तीचा !
'आलों' ह्मणे 'जवळि दूर नसें पहा हा !
कां जाहलीस सखि ! मूर्च्छित तूं अहाहा ! ॥ १० ॥

द्रुतविलंबित.

मग तिला कुरवाळुनियां करें, पवन शीतळ घालुनि अंबरें;
उठवि मारुनि हाक घडीघडी, परि न ते नयनांबुज ऊघडी ॥ ११ ॥

वसंततिलका.

न्याहाळितां फिरफिरोनि मुखा सतीच्या,
तो आठवोनि करि शोक गुणांस तीच्या;
नाहीं कठोर वदलीस कदा मुखानें,
होतो ह्मणे क्रमित काळ तुझ्या सुखानें ! ॥ १२ ॥

शिखरिणी.

गृहीं यावें जेव्हां श्रमुनि बहु बाहेरुनि सदा,
निजावें देखोनी तव वदनचंद्रासचि तदा !
प्रिये ! एकाएकीं त्यजुनि तरि कां गेलिस मला ?
तुझ्या चित्ता कैसा प्रियतर दुजा लोक गमला ! ॥ १३ ॥

वसंततिलका.

कीं श्रांत कोमल तुझी तनु फार झाली,
यालागिं गाढ तुज सुंदरी ! झोंप आली;
मार्गीं असें न निजणें बरवें अगे हें !
आलीं पहा जळत फार समीप गेहें ! ॥ १४ ॥

शिखरिणी.

अहा जाये ! कायेसम मृदु न कार्पास तुझिया !
कशी गे ! तापातें क्षणतरी सहाशील अजि या ?
रुसोनी कां मौना धरिसि तरि माझ्यासह सये !
नको रोधूं प्राणेश्वरि! जवळि बैसोनि हंस ये ! ॥ १५ ॥

द्रुतविलंबित.

स्वकरिं घे धर ऊठ मुलास ये ! कशि नसे ममताच तुला सये !
क्षुधित कोमल हें निजलें करीं; न धरिं निष्ठुरता निज लेंकरीं ॥ १६ ॥

वसंततिलका.

धात्या विचित्र करणी तरि केविं केली ?
गेली ! प्रिया त्यजुनि ते मज आज गेली !
झालें मला त्रिजग शून्यच कीं अहाहा!
जाळी न आज मज पावक कां महा हा ! ॥ १७ ॥

# नारायण धोंडदेव खांडेकर.

हे कवि, साताऱ्यानजीक तीन चार कोसांवर कृष्णातीरीं निंब नांवाचें एक खेडेंगांव आहे, तेथें इ. स. १८४७ (कार्तिक वद्य १० शके १७६९) ह्या वर्षीं जन्मले. हे जातीचे ऋग्वेदी कऱ्हाडे ब्राह्मण. हे सुमारें ५ वर्षांचे असतां ह्यांचे तीर्थरूप वे. मू. धोंडदेव, हे यांस बडोदें येथें घेऊन आले; व हे ११ वर्षांचे होईपर्यंत त्यांनीं यांजकडून वेदाध्ययन करविलें. परंतु वेदाची केवळ घोकंपट्टी करण्याचा कंटाळा आल्यानें यांचें लक्ष त्या विद्येकडे लागेनासें झालें. सबब, ‘ ही विद्या ह्याचे कपाळी नाहीं ’ असें समजून वडिलांनीं ह्यांस मराठी शाळेंत घातलें. तेथें यांनीं तीन वर्षेंपर्यंत सामान्य व्यवहारोपयोगी शिक्षण मिळविलें. नंतर खाजगी ह्यांनीं गणितशास्त्र, संस्कृत काव्यें व अलंकार-शास्त्र ह्यांचें बरेंच परिशिलन केलें. आपल्या वयाच्या २२ व्या वर्षीं यांनीं सरकारी नोकरी पतकरिली. मार्कंडेयचरित्र, रतिविलाप, शंकरदिग्विजय, भट्टपादचरित्र, व शंकराचार्यजन्म अशीं पांच आख्यानें, व इतर स्फुट कविता मिळून ह्या कवींनीं सुमारें १००० कविता रचिली असून ती येथील प्रसिद्ध ह. प. अन्याबाबोवा व बजाबाबोवा यांच्या संग्रहास आहे. प्रस्तुत ग्रंथांत घेतलेले वेंचे आह्मांस ह. प. बजाबाबोवा यांजपासून मिळाले. ह्या कवींची कविता प्रौढ व नीतिपर असुन तींत शब्दलालित्य हा गुण प्रधानत्वानें दिसून येतो. प्रस्तुत कवि हल्लीं बडोदें येथें फडणीस कचेरींत कारकून आहेत.

---

## ईशस्तवन.

पृथ्वी.

अशेषजगदुद्भवस्थितिलयाचिया हेतुला,<br>
असो नमन सर्वदा भव शमात्रया हें तुला.<br>
सदा करिति माधवा तव पदाब्ज भक्तीस जे,<br>
त्यास वरण्यास ती करुनि हार मुक्ती सजे. ॥ १ ॥

चतुर्विध पुमर्थही तव पदांबुजीं वागती,
भवें परम तापल्या तव पदांबु जीवा गती.
तुला भजति त्यांचिया पुरविशी वरा कामना,
गमे मग तयांचिया सुरभिही वराका मना ॥ २ ॥

तुझी परम शोभते त्रिभुवनीं यशोभारती,
गमे मज तिच्यापुढें विगतकायशोभा रती.
ह्मणूनि तुझिया यशा विबुध गाति कुंदाऽमला,
कृतार्थ करिं उद्धरीं झडकरी मुकुंदा मला ॥ ३ ॥

महर्षि तुज अर्पिती करुन यज्ञ देवाऽसवा,
छळें तव विमूढता गुरु नयज्ञ दे वासवा.
प्रभो ! लवहि दर्प तूं नुरविला नगाऽरातिचा;
अचिंत्य कृति ही तुझी निगम हा नगारा तिचा ॥ ४ ॥

तुझ्या मनुज चिंतनें तरु जसा वसंताऽगमें,
सतेज दिसतो विभो ! ह्मणुनि तोच संता गमे.
जसा असासि तूं प्रभो ! सतत भक्तवृंदाऽवनीं,
तसा न रविनंदिनीपुलिनिं सक्त वृंदावनी ॥ ५ ॥

तुला असुर पाहतां बहु गदाधरा कांपती,
स्वदासकुमुदांस तूं गमसि नित्य राकापती.
तुवा पतित तारिले जन अनेक राधावरें
बुडे भवजलांत हा करि विभो ! त्वरा धांव रे ॥ ६ ॥

अगा भवचिकित्सका ! मनुज काय हा नाडिला !
प्रभो ! भगवदार्त्त हा निजकरें पहा नाडिला;
हतें लवहि अर्थ म्यां बत न आपुला साधिला,
भवामय हरी, करीं अगद तूं मला साधिला ॥ ७ ॥

मला नवल वाटतें मम तनू गदें वांकली,
तथापि मम मानसा करि सराग देवा ! कली !

कधीं त्रिविध ताप हा मम असह्य देवा ! सरे ?
कृपा करुनि आपुल्या मज पदाब्जिं दे वास रे ॥ ८ ॥

## प्रातःस्मरणपंचक.

वसंततिलका.

श्रीरामचंद्रपदकंजनखप्रभा ती,
निश्रेयसार्थ मनिं मी स्मरतों प्रभातीं;
जी चिंततांचि हरि अंतरिंच्या तमाला,
ध्याती जिला ह्मणुनि संतत संतमाला ॥ १ ॥
ध्यातों रघूत्तमपदांबुज मी क्षपांतीं,
वज्रांकुशध्वज जयावरि शोभताती;
वंदारुदेवमुकुटामलरत्नकांति,
व्याजें जयास करि आरति इंदिरा ती ॥ २ ॥
उद्घाटुनी हृदयपंकजकोश योगी,
चिंतूनि ज्यास अविनाशि सुखास भोगी;
तें रामभद्रपदपद्म अनन्यवृत्ति,
ध्यातों उषःसमयिं मी अमृतार्थ चित्तीं ॥ ३ ॥
गंगोत्तमांग असुनी शिव चंद्रयुक्त,
यच्चिंतनें गरलदुःसहतापमुक्त
झाला, तया दशरथात्मजपादकंजा,
मी चिंतितों दिनमुखीं हृतपापपुंजा ॥ ४ ॥
यत्स्पर्शनें त्वरित जाहलि दिव्यकाया
ती, जी शिलामय असे मुनिवर्यजाया;
त्या वंदितों रघुवरांघ्रिजरेणुला मी,
व्हावें ह्मणूनि चिरमंगलमार्गगामी ॥ ५ ॥

जो या वंदे नर उषःस्मृतिपंचकाला,
तो सेवि मुक्तिसदनीं सुखमंचकाला;
त्या चिंति जो सतत शर्मकलापदात्या,
त्याच्या दिगंति पळती सकलाऽपदा त्या ॥ ६ ॥

## दीनविज्ञापनाष्टक.

मंदाक्रांता.

वाणी माझी कुटिल वचनें दक्ष बोलावयाला,
एणाक्षींचीं वदनकमलें नेत्र पाहावयाला;
वेश्यागारीं चतुर असती पाय हे जावयाला,
मत्सर्वांगें अहित अपुलें शूर साधावयाला ॥ १ ॥
नाहीं पृथ्वीवरि मजहुनी अन्यदुर्मार्गगामी,
नाहीं माझा सुचपल मनोवाजि माझ्या लगामीं;
कामक्रोधादिक षडरि हे गांजिती क्रूर भारी,
मद्दुःखातें त्वदितर विभो ! कोण आतां निवारी ? ॥ २ ॥
आली काशस्तबकसदृशा शुभ्रता मच्छिराला;
वार्द्धक्यानें सतत सुटला कंप माझ्या कराला;
गेले दंत त्यजुनि वदना, जाहलें सर्व गात्र,
या दीनाचें सदयहृदया केशकृद्रोगपात्र ॥ ३ ॥
स्वर्गद्वारा उघडिल असा धर्म केला न देवा !
केली नाहीं कधिंहि तव मी भक्तिनें युक्त सेवा !
या मंदाला किमपि न सुचे काय आतां करावें
कोणाचे मी तुजविण विभो ! पाय देवा धरावे ? ॥ ४ ॥
या भूलोकीं मदितर नसे पातकी रामराया !
गेलें माझें असुलभ विभो ! सर्व आयुष्य वायां !

सीताकांता ! तुजविण मला तारि ऐसा न अन्य
आर्त्तत्रात्या ! करुनि करुणा तूं करी यास धन्य ।। ५ ।।
नित्य प्रेमें पुरुष रतला जो तुझ्या पादपद्मीं,
त्वन्मूर्तीतें सतत अपुल्या ठेवुनी चित्तसद्मीं;
माता त्याची गमलि मजला पुत्रिणी तीच धन्या !
कारुण्याब्धे ! त्रिभुवनिं तिच्या वाचुनी वांझ अन्या ।।६।।
श्रीरामा ! जे पदयुग तुझें एकदां वंदिताती,
संसारांभोनिधिस तरुनी शीघ्र ते पार जाती;
ऐशी वाणी सतत वदती वेद, शास्त्रें, पुराणें,
या विश्वासा धरुनि मनिं मी वंदितों चक्रपाणे !।। ७ ।।
गेलें गेलें विफळ वय हें ! पुण्य कांहीं न केलें !
तीर्थध्वांक्षापरि जनन मीं पिंड भक्षूनि नेलें !
तारी देवा ! मज, मम तुला याचना अन्य नाहीं,
श्रीरामा ! तूं श्रवण करि गा दीनविज्ञापना ही ।। ८ ।।

---

## दीनाक्रंदनपंचक.

मालिनी.

मम सम नर कोणी पातकाचा निकाय
अजवरि न जहाला, आजि नाहीं, न होय.
त्वदितर सुर भीती पाप माझें हराया,
दृढ कशि रघुराया ! कास या उद्धरायीं ! ।। १ ।।
करशिल मदुपेक्षा तूं जरी दीनबंधो !
वद मग गति माझी काय कारुण्यसिंधो !
तुजविण कवणाला दीन वाचे वदावें ?.
सुरतरुसरि रामा ! काय एरंड पावे ? ।। २ ।।

मजविषयिं कशी तूं ही उदासीन वृत्ती,
धरिलिस रघुनाथा ! आपुल्या आज चित्तीं ?
श्रवण करिशि माझी कां न तू दीन हाक ?
शिवशिव ! नियतीचा केविं हा दुर्विपाक ! ॥ ३ ॥
द्युमणिकुलललामा त्वद्दयासिंधु गेला,
वद वद मद्भाग्यें काय तो शुष्कतेला ?
अजि तुज करुणाब्धे लागली झोंप काय ?
तरि मग करूं आतां काय मी हाय हाय ! ॥ ४ ॥
कटक निकट माझ्या क्रूर आलें यमाचें !
भयचकित विभो ! मी जाहलों, जाण साचें.
करिल बहुत माझी दुर्दशा तें अनंता !
प्रकट करि दयाब्धे ! दीनवात्सल्य आतां ॥ ५ ॥

## आकांक्षापंचक.

शिखरिणी.

कदा मच्चित्ताला वमनसम वाटेल वनिता ?
कदा या मंदाच्या तृणसदृश बुद्धीस धनिता ?
कदा स्त्रीपुत्रादिस्वजनममता टाकिन सुखें ?
कदा प्रेमोद्रेकें जपिन शिवनामावलि मुखें ? ॥ १ ॥
कदा श्रीगंगेच्या करिन वसती पावनतटीं ?
कदा कौपीनानें कसुनि कटि मी होइन जटी ?
कदा चांचल्यातें त्यजुनि शशिभृत्पाद्नलिनीं,
मनोवृत्ती माझी अनवरत होईल अलिनी ? ॥ २ ॥
महापापी हा मी शरण गुरुला जाइन कदा ?
गलत्प्रेमाश्रूंनीं भिजविन कदा देशिकपदा ?

कदा भक्त्युल्लासें गुरुपदयुगीं ठेविन शिर ?
कदा ठेवील श्रीगुरुहि आपुला त्यावरि कर ? ॥ ३ ॥
कदा भिक्षान्नानें करिन जठराग्निप्रशमन ?
कदा योगाभ्यासें सतत वश हें चंचल मन ?
कदा सत्संगानें हरिन अपुला मानसमल,
अशा योगानें मी क्रमिन कधिं आयुष्य सकल ? ॥ ४ ॥
गुरूची प्रेमानें शिशिरतर संपादुनि दया,
भवातंकाला मी त्वरित कधिं नेईन विलया ?
कदा ब्रह्मानंदीं निरत मन हें होइल सदा ?
कदा आकांक्षा ही मम सफल होईल सुखदा ? ॥ ५ ॥

## मानसोपदेश.

पंचचामर.

वियत्तरंगिणीतरंगशीतवातपावनी,
नितांत शांत होउनी करी मना ! तपा वनीं.
न सेवि निष्कृपा नृपा, कृताश्रितार्त्तिमोचना,
अनन्यवृत्ति होउनी मना ! भज त्रिलोचना ॥ १ ॥
चहूंकडे कलत्रपुत्रपोषणार्थ धांवशी,
परंतु एकही कधीं कपर्दिका न पावशी !
स्मर स्मरारिच्या सदा स्वभक्तकामदा पदा.
वदान्य शक्र तो तुझी करील दूर आपदा ॥ २ ॥
यथार्थ सांगतों तुला, असेल वित्त जोंवरी,
तुझ्या समीप राहतील आप्तवर्ग तोंवरा.
कृतांतदूतिका जरा दिसे तुझ्या शिरावरी,
अतां तरी विचार तूं हितार्थ आपुल्या करी ! ॥ ३ ॥

तुला विलासिनीविलास गोड वाटती मना !
परंतु जाण याहूनी न अन्य दुष्ट कामना !
त्यजूनि ढंग हे विनिंद्य चिंति चंद्रशेखरा,
अमंगलक्षयार्थ तूं तदीयदास हो खरा ॥ ४ ॥

विरक्त हो नितंबिनीजनांतरंगरंजनीं.
सदैव रक्त हो अनंगभंजनीं निरंजनीं.
अमूल्य जन्म हें वृथा करी सख्या न मानसा !
अजस्र होउनी मदुक्तसक्त मुक्त हो कसा ! ॥ ५ ॥

पृथ्वी.

मना ! विषयवासना समज बा नसे ही भली,
इणें बहुत होतसें अहित पावलोपावलीं.
त्यजूनि निजवृत्ति ही, विषयिं जी असे बावरी,
विवेक करुनी अतां सतत शांतिला बा वरी ॥ १ ॥

तयांस वरि दुर्दशा विषयीं वृत्ति ज्यांची जडे,
विचार करुनी पहा मृगपतंगभृंगाकडे.
हिला वरुनि सांग रे कवण तो नसे कावला ?
विषाक्त सुरि खोचुनि उरिं न मृत्युला पावला ? ॥ २ ॥

विशालविषयाटवी दुरवगाह्यभूमी असे
स्मराव्हय यदंतरीं प्रबल भिल्ल ताता वसे.
विशंक फिरशी परी करिल तो तुझा घात कीं !
नसे त्रिभुवनीं असा खचित सांगतों घातकी. ॥ ३ ॥

कृतांत करितो तुझा बहु सगर्व दावा मना !
ह्मणुनि तुज सांगतों प्रणत सर्वदा वामना
सख्या ! शरण जाउनी मग तया असें मागणें,
विभो ! मम हरीं जनुर्मरण. ऐक हें सांगणें ॥ ४ ॥

त्यजूनि दुरहंकृती धरि सदैव तूं सन्मती,
न ठेवि विषयीं रती करि अजस्र सत्संगती;
पवित्र करि भारती स्तवुनि नित्य लक्ष्मीपती,
अशी करिशि तूं कृती तरिच पावशी निर्वृती ॥ ५ ॥

शिखरिणी.

जयाच्या वाणीला कधिंहि अनृत स्पर्श न असे,
कधींही हृत्कंजीं परधन, परस्त्री, नच वसे;
सदा श्रीकांताच्या चरणकमलाची मधुकरी
मनोवृत्ती ज्याची, पदयुग तयाचे दृढ धरी ॥ १ ॥
मदांधा ! शांतीला समज सरला काम–कपिला,
तिला का टाकूनी भजसि तरला कामकपिला ?
कधींही पीडा दे न मदन जिला, संतत तिला,
मना ! सेवी ताता विमलमतिला संत–ततिला ॥ २ ॥
वसे वाणी ज्याच्या अमृत मधुरा नित्य वदनीं,
जयाच्या अन्यस्त्री क्षणहि न वसे चित्तसदनीं;
अमंदानंदातें वितरण करी जो मम मना !
तया संतश्रेष्ठा सतत भज संतापशमना ॥ ३ ॥

## अपराधोल्लापपंचक.

शार्दूलविक्रीडित.

प्यालों कर्णयुगें कथामृत तुझें नाहीं कधीं मीं विभो !
प्रासादीं तव दर्शनार्थ न कधीं केला प्रवेश प्रभो !
सत्प्रेमें न निमेषमात्र कधिंही त्वन्मूर्ति मीं पाहिली,
भक्तीनें कधि बिल्व कोमलदलें नाहीं तुला वाहिलीं ॥ १ ॥
सद्भावें कधिं एकवेळहि तुला केलें न मी वंदन
त्वद्ध्यानांत निमग्न एक पळही शंभो ! न केलें मन;

नाहीं मी स्तविलें तुला, न जपिली त्वत्पूतनामावली,
केली मंतुपरंपरा बहुविधा मी पावलोंपावलीं ! ॥ २ ॥
श्रीकंठा ! मदनांतका ! पुररिपो ! मृत्युंजया ! शंकरा !
कारुण्यैकनिधे ! चराचरगुरो ! त्रैलोक्यनाथा ! हरा !
ऐसें गाउनि उच्चगद्गदरवें, दीनास दावी मला;
संसारार्णवपार, यापरि कधीं न प्रार्थिलें मीं तुला ॥ ३ ॥
देवा ! पातक फार आजवरि मीं संपादिलें वांचुनीं,
या पाप्यास दयानिधे ! गति नसे आतां तुझ्यवाचुनीं;
दीनाला मज एकवार करुणापांगें पुरारे ! पहा,
नाशी मद्भवदावपावकखरज्वालावलीताप हा ॥ ४ ॥
नाहीं जाणत पूजनादिविधि मी, त्वद्भक्ति नाहीं मला,
नाहीं शर्मद वेदशास्त्र पढलों, देवा न धी निर्मला;
पापाचा नग जो तयास सदया तारावया शंकरा !
त्वच्चित्तांत असेल कौतुक तरी या उद्धरीं किंकरा ॥ ५ ॥

## पद.

( चाल-पतीत पावन नाम ऐकुनी आलों मी द्वारीं )

दीनाला मज दीन दयाळा तारिशि कधिं रामा ॥
तापत्रय कधिं विलया नेशिल मम मेघश्यामा ॥ ध्रु० ॥
या भूलोकीं ममसम अन्य न पातकैकराशी ॥
यास्तव पीडिल मजला घालुनि यम निजभुजपाशीं ॥
सीताकांता ! केव्हां येइल तुज मम काकुलती ॥
मजविषयीं अशि निष्ठुर धरिली रीति कशी भलती ॥
अहिवरशयना सरसिजनयना श्लाघ्यसुगुणधामा ॥
तापत्रय कधिं विलया नेशिल मम मेघश्यामा ॥ १ ॥
लवमात्रहि मीं सुकृत न केलें, नेलें वय वाया ॥
हतभाग्यें म्यां व्यर्थ दवडिली ही मानव काया ॥

तरावया भव धरिले नाहीं बळकट गुरुचरण ॥
पतितपावना झडकरि करि मम जननमरण हरण ॥
करुणापांगें विलोकुनी मज नेई निजधामा ॥ तापत्रय० ॥ २ ॥
कामक्रोधादिक षड्रिपु हे गांजिति मज भारी ॥
रघुकुलतिलका ! अति दुःसह हें संकट मम वारी ॥
सांपडलों मी पुत्रकलत्रादिकममताजालीं ॥
यापासुनि मज कोण सोडविल तुजाविण ह्या कालीं ? ॥
करुणासिंधो बंधो ! मुनिजनमानसविश्रामा ताप० ॥ ३ ॥
तुजविण मजला कोणी नाहीं तारक या लोकीं ॥
दीनवत्सला ! बुडुनी गेलों दुस्तर भवशोकीं ॥
एक वेळ वद ! नारायण हा देवा ! मम आहे ॥
कृपाकटाक्षें एक वेळ तरि मजला तूं पाहें ॥
सार्थकता तरि येइल रामा तव पावन नामा ॥ ताप० ॥ ४ ॥

## पद.

[ चाल—काय मला भूल पडलि भान हरपलें ]

अन्य कामना मना ! न कधिंहि तूं धरी ॥
दउनी तिला तिलांबु शांतिला वरी ॥ ध्रु० ॥
होशि कामदास का मदास पावुनी ॥
कामदास गुरुपदास शरण जाउनी ॥
रघुललाम रामनाम सतत गाउनी ॥
होइ धन्य, मुक्तिजन्य सुख तुझ्या करीं ॥ अन्य का० ॥ १ ॥
ज्यांत कामनक्रचक्रशक्र वसतसे ॥
तरुनि जाति भवनदीन पीनमीनसे ॥
ज्यांस कुमतिपर्व गर्व खर्वही नसे ॥
हो विरक्त भक्त सक्त त्यांसि घडिभरी ॥ अन्य काम० ॥ २ ॥

अदयहृदय नरवरा न सेवि तूं कदा ॥
कधिं न होय तुष्ट, दुष्ट रुष्ट तो सदा ॥
अवन करुनि तव न करिल दूर आपदा ॥
त्यजुनि इतर कारभार जवळ हरि करीं ॥ अन्य का० ॥३॥

## पद.

( गव्यांनों अपुल्या कृष्णाला-या चालीवर. )

हातीं धरुनि नरा माला ॥ कां रे भजशि न रामाला ? ॥ध्रु०॥
होई न कधिं नरवरदास ॥ निशिदिनिं त्या स्मर वरदास ॥
वश होई कधिं न मनास ॥ रघुपतिपदिं करि नमनास ॥
नतजनदुःखविरामाला ॥ कां रे भजशि न रामाला ? ॥ १ ॥
प्रेम न ठेवुनि नव रामीं ॥ मम रमणी ही नवरा मी ॥
मानिसि, परि जे नर कामी ॥ बा ते जाती नरका, मी ॥
कथितों तुज अभिरामाला ॥ कां रे भजसि न रामाला ? ॥२॥
चिंती ज्याला मदनारी ॥ त्या स्मर सोडुनि मद नारी ॥
धरुनी शमदमतरवारी ॥ षड्रिपु दुःसहतर वारी ॥
सुयशःकुसुमारामाला ॥ कां रे भजसि न रामाला ? ॥ ३ ॥

## प्रबंध.

( अतां रामपायीं मना लाग वेगें-या चालीवर. )

अतां शांत होई सख्या मानसा रे !
विषय विषतुल्य हे मान सारे ॥ ध्रु० ॥
केलि केलीस तूं शैशवीं यौवनीं,
स्त्रीस तूं निशिदिनीं मोहलासी ॥
वागुराबंधनीं हरिण गुंते जसा,
गुंतलासी तसा तद्विलासीं ॥ अतां ॥ १ ॥
वित्तमदमत्तजनचित्तसंतोषणीं,
आप्तजनपोषणीं कावलासी ॥

ग्रीष्मभीष्मातपीं फिरुनि बहु यातना,
पावलोपावलीं पावलासी ॥ अतां० ॥ २ ॥
कुटिल खल कामिजन सेविले सर्वदा,
फार तूं निंद्य हें कर्म केलें ॥
लेशही आपुलें हित न तूं साधिलें,
पामरा जन्म हें व्यर्थ नेलें ॥ अतां० ॥ ३ ॥
करुनि ताता अतां मजवरी तूं दया,
झडकरी कास धरि सज्जनाची ॥
तथ्य तुज पथ्य मी सांगतो जाण रे,
वाट ही अमृतसरिं सज्जनाची ॥ अता० ॥ ४ ॥

## अभंग.

ज़याच्या जिव्हेला, अनृताचा वारा॥ नसे परदारा, ठावी जयां ॥ १ ॥
जयाचें केवळ, अमृतचि बोल ॥ नाहीं जया मोल, त्रैलोक्यांत ॥ २ ॥
जयांचे मानस, शुद्ध आणि शांत ॥ ज्यांत रमाकांत, वास करी ॥ ३ ॥
जयांच्या चित्तांत, स्वल्पहि न गर्व ॥ गुण ज्यांचे सर्व, विश्ववंद्य॥ ४ ॥
कामादि षड्वैरी, अत्यंत हे क्रूर ॥ पाहुनी ज्यां दूर, पळताती ॥ ५ ॥
जे न कधिं होती, विषयीं लंपट ॥ नुरली खटपट, प्रापंच्याची ॥ ६ ॥
चित्तवृत्ति ज्यांची, नित्य निरंजनी ॥ भजनीं पूजनीं, जडलीसे ॥ ७ ॥
नारायण ह्मणे, ऐसे जे सज्जन ॥ करितों वंदन, तया तें मी ॥ ८ ॥

( २ )

कमला रमणा, माझी विज्ञापना ॥ एक दयावना ! दिनबंधो ॥ १ ॥
नाहीं आचरीले, वर्णाश्रमधर्म ॥ जें जें केलें कर्म, अवाच्य तें ॥ २ ॥
देवा नाहीं अन्य, मत्सम पातकी ॥ करील घात की, अंतक तो ॥ ३ ॥
घालुनी नेईल, कंठीं मम पाश ॥ करील की नाश, कीनाश तो ॥ ४ ॥
अपराध केले, कोटीच्या मीं कोटी ॥ देवा घाल पोटीं, कृपासिंधो! ॥५॥
देवा या संसारीं, फार मी कावलों ॥ तापातें पावलों, पदोपदीं ॥ ६ ॥
दूर करी जन्म,–मरणाचे फेरे ॥ मज यमहेरे, न हेरावें ॥ ७ ॥
जन्ममरणाचें, दुःख हें निवारी ॥ तारि या संसारीं, नारायणा ॥ ८ ॥

# डॉ. कान्होबा रणछोडदास कीर्तिकर.

हे सुप्रसिद्ध ग्रंथकार आणि कवि मुंबई येथें इ. स. १८४९ च्या मे महिन्याच्या २४ व्या तारखेस जन्मले. हे जातीचे सूर्यवंशी पाठारे प्रभु. ह्यांचें मराठी आणि प्राथमिक इंग्रजी शिक्षण प्रभुशाळा, 'एलफिन्स्टन इन्स्टिटयूट' व 'विलसन स्कूल' ह्या विद्यालयांत झालें. हे इ. स. १८६६ त एफ. ई. ए. च्या परिक्षेंत उत्तीर्ण झाले. नंतर कांहीं दिवस 'एल्फिन्स्टन कॉलेजां'त गेले. ह्या दोन्ही कॉलेजांत ह्यांस विद्यावेतन मिळत असे. इ. स. १८७४ सालीं हे आंग्लवैद्यकाचा अभ्यास करण्यासाठीं इंग्लंडास गेले. तिकडे मोठमोठया नामांकित पाठशाळांत उत्तम प्रकारें अभ्यास करून व अनेक बक्षिसें मिळवून इ. सन १८७७ ह्या वर्षी हे 'इंडियन मेडिकल सर्व्हिस' नांवाच्या परिक्षेंत चांगल्या रीतीनें उत्तर्णि झाले. पुढें हिंदुस्थानांत येऊन हे सरकारी दवाखान्यांत नोकरीस राहिले. नोकरीच्या संबंधानें ह्यांस हिंदुस्थानांत पुष्कळ ठिकाणीं फिरावें लागलें; इतकेंच नव्हे, तर ह्यांना बलुचिस्तान व अफगाणिस्तान ह्या देशांतही मोठा कष्टतर प्रवास करून जावें लागलें. हे मेकंड येथील (?) संग्रामांतही होते. आणि याप्रसंगीं त्यांस 'लेफटेनंट' अशी पदवी मिळाली होती. रत्नागिरीस 'सिव्हिल सर्जन'च्या हुद्यावर असतांना यांनीं चांगला लौकिक मिळविला. ह्यांचें पदवीसह संपूर्ण नांव 'सर्जन लेफटनंट कर्नल कान्होबा रणछोडदास कीर्तिकर' असें होतें. हे मोठे शोधक वैद्य, उत्तम वक्ते आणि शास्त्रीय विषयांवर मराठींत व इंग्रजींत ग्रंथ लिहिणारे असून एक चांगले अर्वाचीन कवि होते. ह्यांनीं भक्तिसुधा, विलापलहरी, इंदिरा, हीं काव्यें आणि इतर गद्य ग्रंथही बरेच केले आहेत. ह्या कवींची कविता प्रसन्न आणि रसाळ आहे. विशेषतः विलापलहरी हें काव्य हृदयंगम उतरलें असून ह्या ग्रंथांत ह्यांच्या नांवाखालीं असलेले बहुतेक वेंचे त्याच काव्यांतून संगतवार लावून घेतले आहेत. हे कवि सन १९१९ सालीं स्वर्गस्थ झाले.

## वेचे—विलापलहरींतील.

शार्दूलविक्रीडित.

इंद्राचें धनु दिव्य शोभत असे आकाशपंथावरी,
सौंदर्यें भरल्या दिशा, विलसती तैं रंग नानापरी;
झाली शीतल मेघवृष्टि, फुलल्या गंधी फुलांच्या कळ्या,
होतां तुष्ट धरा वनीं विकसल्या रम्या लता कोंवळ्या ॥ १ ॥
वारा वाहुनि मंद मंद परिसा आनंद दे मानसा;
शोभें विश्व, असें खुले अखिल हें कीं, नीववी तामसा;
ऐसा रंग सुरंग तो जिथतिथें होतां मला एकट्या,
कां दुष्काळ पडोन घोर सदनीं ह्या पेटल्या आगट्या ॥ २ ॥
अंगाची बहु आग जाहलि, तसें अंतस्थ पेटे अहा !
केली का म्हणुनी तये निशिं विभो ! पर्जन्यवृष्टी महा ?
ओतीले जलधी सहस्र युगही कायेवरी या जरी,
होई का हृद शांत ती परतुनी आल्याविना गोजरी ? ॥ ३ ॥
हे मृत्यो! तुज काय वाण पडली, घाला इथें घातला,
प्रेमानें स्वसुखा झटूं वधुवरें हा न्याय का जाचला ?
नाहीं मौल्य असेंचि दुर्मिळ महा चोरोनि नेलें धन ;
शोभा या गृहिंची समूळ सरली, ओसाड जैसें वन ॥ ४ ॥
सर्पाचा पुरवेल दंश, कडवी ती काचरी खाववे,
अग्नीनें घृत तापलें कढत तें युक्तीकरें प्राशवे;
ज्वाळा जाळिति दिव्य जैं दशदिशा मार्गीं तया चालवे,
विंच्वांनीं भरल्या अशा भयकरी वस्त्रासि त्या घालवे ॥ ५ ॥
काळा! दंश परी तुझा प्रबल तो केव्हां नहीं साहवे !
दुष्टा! काचरिहून तूं कटु, तुझ्या वाऱ्या न तें राहवें;
अग्नीहून तुझा महा प्रखर तो आहे मनींचा दहा,
झालें काय जिवांत आजवरि तें सांगूं कुणा मी अहा ! ॥ ६ ॥

भार्ये ! तूजसमा सुमित्र जगिं या कोणी दुजा गे नसे !
कान्ते! पायिं तुझ्याच सौख्य सगळें गेहीं सदा तें वसे !
शोभा शून्य गृहास या उपरि गे येणार नाहीं कदा !
होत्या सन्मुख बैसतां हरत त्या संसारिच्या आपदा ॥ ७ ॥
अंतर्याम न भिन्न तें जरि दिसों देहीं निराळे जना,
केलें नाहीं कधींहि जें न रुचलें दोघांचिया गे मना ;
आतां यापरि एकलाचि जरि मी राहें तुझ्या नंतरें,
नाहीं मी करणार वाटत नसे जें तूजलागीं बरें ॥ ८ ॥
नाहीं सन्निध तूं सुमंदिर परी आहे हृदीं या तुझें,
भासे दुःसह शून्य विश्व, परि का ज्योत्स्ना हृदींची विझे ?
गेलें मर्त्य शरीर पावुनि लया, राहे परी अंतरीं,
दिव्यी गे प्रतिमा तुझी! स्मरतसें नित्या गुणांच्या परी ॥ ९ ॥
होतों भावित एक मी, घडुनियां आलें परी दूसरें !
नाहीं गे सरलें घडी तुजविणें, आतां कसें तें सरें ?
होतो बैसत नित्य एकवट हीं भर्ता सुभार्या सती;
जाशी टाकुनि एकटीच नकळे होईल कैशी गती ॥ १० ॥

(२)

जाशी सोडुनि एकटी कुणिकडे ? सोने ! प्रिये सुंदरे !
लोभें सांठविलें सुखा, घडिमधीं कैसें मला अंतरे !
पाहें जैं मुखचंद्रमा मन रिझे, हृत्ताप सारा हरे ;
आतां लागलि हाय हाय, वदतों नित्या 'अहा' 'हा' 'हरे' ॥११॥
गेलीशी अजि टाकुनी भवसुखा, वाटेस गे बापडी !
जातां त्वां अपुल्यासवें सुनयने ! नेला न कां सौंगडी ?
कंठूं काळ कसा सखे ! तुजविणें या मंदिरीं रांजसे !
पाहीं जेथ तिथें उदास अवघें आतां मला गे दिसे ॥ १२ ॥

भर्त्यावीण, सखे घडीहि गमलें नाहीं तुला गे कधीं,
होशी खिन्न समीप मी नसलिया, कंपेस चित्तामधीं ;
गाजी दुःख महा, विवेक करुनी, पोटींच तें ठेविशी,
भार्ये धन्य ! वियोगजाळ मनिंचा कोणा न गे दाविशी ॥ १३ ॥
झाला मास तुला, अघोर दिन हे यूगांपरी वाटले,
नित्या मी रडतों परी नयनिंचे अश्रू न हे आटले;
कैसे गे इतक्यांत आटतिल ते ? काया जिवे जोंवरी,
रक्ताचे नयनीं झरे करुनि गे, न्हाणीन मी नोवरी ॥ १४ ॥
नाहीं गे तुज दीधली निजकरें सप्रेम तीलांजली,
रात्रंदीन रडें परी न सरली ही वृष्टि नेत्रांतली;
नाहीं ओदन-पिष्ट-पिंड दिधले, केलें न वा तर्पण,
सारा देह तुलाच पिंड म्हणुनी केला न का अर्पण ? ॥१५॥
अंतर्पाट जये सुकाळीं सुटला, आनंद होतां महा,
झाली भेट सखे ! तुझी प्रथम जैं, येतां वर त्वद्गृहा;
' स्वाहा ' गे म्हणुनी तये समयिं, ह्या देहा तुला दीधलें !
द्याया पिंड अतां नस बळ मला, काळें हृदा विंधलें ! ॥१६॥
जेव्हां ऐकियलें सुरत्न मिळतें, घेतां तुझ्यासारिखें,
स्वीकारोन तुला झणी भरियलें आयुष्य नानारसें;
आनंदें भरला, त्यजोनि अवघें घ्याया तुला धांवलों,
प्रेमें नांदुनि पूर्ण गे उभयतां नित्या सुखा पावलों ॥ १७ ॥
काळी वस्तु कधीं न साहत अशी आहे वदंता कुलीं,
जाया श्वेत सुगौरवर्ण वरिली, कां नाहिं ती जीरली ?
काळें गौर, लहान थोर, न कदा काळापुढें टीकती,
घाला घालि बळें गमे जिथतिथें, येवोत दुःखें किती ॥ १८ ॥
जावें त्वां मजला प्रिये ! पुरवतें,-दुःखें रडावें सदा,
कंठावा अवघाचि काळ विरहें-भोगूनियां आपदा;

ह्याणावा हृद्र हाय हाय करुनी, भूमीवरि लोळुनी,
सोसावें विरहानळा, जरि असें गेलों पुरा पोळुनी ॥ १९ ॥
सारें हें पुरवें, न तें पुरवतें होतां दुज्या गे परी,
जातों आधिं जरी तुला ढकलुनी शोकाचिया सागरीं !
होतां ही विपरीत गोष्ट पडता आकांत निस्सीम तो !
नाहीं सोसवता तुला, विरह जो यत्नें बहू सोसतों ॥ २० ॥
सौभाग्या तव रक्षिलें प्रभुवरें हा लाभ झाला भला,
सोसावें न तुवांचि दुःख परि म्यां, हें योग्य वाटे मला;
मी आहें रणशूर, शांत अबला तूं भीरु गे कोमला !
चिंता का, जरि देह होइ दुबळा, शोकें तुझ्या कोमला ॥२१॥
युद्धाठायिं वरा तुझ्या प्रभुवरें संरक्षिलें सुंदरी,
होतां सन्निध काळ तो परि तदा कृत्रीम ना आचरी !
पाठीं रक्षक सत्कृपाकवच तें घालोन राहे उभा;
टाळीलें अशुभा, तुझ्या पदरिं गे बांधोन दिव्या शुभा ॥२२॥
भ्यालों नाहं रणीं, पराङ्मुख कदा झालों न मी संगरीं,
धिःकारोन तुला, न भीति धरली मृत्यो ! तुझी अंतरीं;
होतों मानित युद्धिं धैर्य करुनी त्रैलोक्य म्यां जिंकिलें,
मृत्यो ! त्वां हरिलें परी घडिमधीं दुःखार्णवीं लोटिलें ॥२३॥
मोठा तस्कर तूं शिरोन सदनीं नेलें अमोला जिवा,
घालोनि झडपे झणी रविसमा मालीवलासी दिवा !
झाला घोर गृहांतरीं तिमिर ! तें वाटें अरण्यासमा,
नाहीं अंत वियोग–दुःख–जनिता संसारिंच्या या तमा ॥ २४ ॥
धूम्रावीण जसा सवें भडकुनी अग्नी महा कोपतो,
तैसें संकट येतसे कधिंकधीं तै जीव तो व्यापतो;
होतें सौख्य किती ! पहा क्षणिं कसा दुःखार्णवीं बूडलों,
जातां एकचि दिव्य प्राण विरहें आजन्म मी नाडलों ॥ २५ ॥

ऐसें अल्पवयात का हरपण्या निर्माण केलें हिला,
काळातें बलि अर्पिण्यास वसुनें का भार हा वाहिला ?
प्रेमें वाढविली हिला जननिनें का अर्पिला आहुती,
हे बाहो ! अशि दिव्यकाय दहना स्कंधीं कशी वाहुं ती ? ॥२६॥
होतें त्वन्मानिं गे प्रिये ! तुज मृता खांदेपरी वाहवें,
येतां तें दुखणें समीप तुझिये सेवेंत गे राहवें;
इच्छा तर्पियली तुझी प्रभुवरें, केली तयानें दया,
होतों सन्निध घोर अंतसमयीं स्कंधावरी न्यावया ! ॥ २७ ॥
केलें सार्थक गे तुवां स्वतनुचें अल्पायुषीं आपुल्या,
घेवोनी कुळिं श्रेष्ठ जन्मचि पिढ्या त्वां सात उद्धारिल्या !
नाना सौख्य–सुभोग भोगुनि सखे होतीस जैशी इथें,
त्याहूनी शतकोटिकोटिपट गे होई सुखी तूं तिथें ! ॥ २८ ॥
मी, अवघें जिणें मम तसें, पाण्याहुनी पातळ,
नेवोनी गगनास वृक्ष वसुधें पाडी जसें वातळ;
येतां भूवरती विदारुन पडे, जीवा पुनः तो न ये,
तैसा मी पडलों, अनेक तुकडे झाले स्वदारा–लयें ! ॥ २९ ॥

( ३ )

शिखरिणी.

घरा यावें तेव्हां मज दिसतसे चंद्रवदनी !
अतां कोठें गेली ? कुणि लपविली काय सदनीं ?
पहावें धुंडोनी सकल गृह खालीं वर तरी
दिसेना ती कोठें ! अनिश उठती दुःखलहरी ! ॥ ३० ॥
कुठें पाहूं आतां सुमुखि, तुझिया हास्यवदना !
पडे कर्णी तूझें मृदुवचन येतांचि सदना !
करूं आतां वर्ण–श्रवण वद कैचें कमलिनी ?
विझालीशी ज्योती ? बहु तळमळें मी निशिदिनीं ॥ ३१ ॥

अहोरात्री जीवा तरफड, न कांहीं गमत, गे !
जरा येता निद्रा दिससि मज स्वप्नीं जिवलगे !
तुझ्या संगें भार्ये ! सकल कुल–सौभाग्य बुडलें !
अकालीं त्वां जावें, कवण असलें पाप घडलें ? ॥ ३२ ॥

रडोनि स्फुंदोनी नयन सुजले अश्रु गळती !
निशीं निद्रा नाहीं, तनु विरहवन्हींत जळती !
ह्मणावें गेलेशी रुसुनि मशिं दावा करुनिया,
कसें तैसें होई ?–तुजसम न शाता भुवनिं या ॥ ३३ ॥

सदा जी चित्ता दे सुख मधुर वाणी वदुनियां,
महामाया लावी सतत सकलां दावुनि दया ;
बहू ज्ञाती स्त्री ती परि तिज नसे गर्व तिळही,
गुणां गाई तीच्या सकल बहु संतोषित मही ॥ ३४ ॥

महा मिथ्या माया सकल जग साचें मृगजळ !
उलाढाली होती विविध, परि लागे नचि पळ;
प्रभा जीची पूर्णा शशिसम पडे नित्य सुखदा,
तिथें आतां झालें तिमिरमय; मी भोगिं विपदा ! ॥ ३५ ॥

पृथ्वी.

कसा अतुल भार हा विरहजन्य साहूं शिरीं ?
कसा सखि ! तुझ्याविणें क्रमिन काळ या मंदिरीं ?
कसें क्षणिंच अंतरे अमित सौख्य–भांडार तें,
जपोन उपभोगिलें सुधन दिव्य जें म्यां रतें ! ॥ ३६ ॥

विनोद करुनी महा रमविशी तुझा ‘ सोबती.’
प्रिये हृदयरंजने ! कवण हांक मारील ती ?
न सोबत अतां मला विरह–वन्हि वाचूनियां !
जगेल तनु जोंवरीं, स्मृति तुझी न पावो लया ! ॥ ३७ ॥

मालिनी.

परम विबुधकन्या, प्रेमला, ज्ञानखाणी,
विनयहि किति अंगीं ! काय ती गोड वाणी !
अविहित सुखभोगा नेणती वाऽनृतातें !
अति विमल सुचित्तें वाढवीली स्व-तातें ॥ ३८ ॥
किततरी गुण तूझे राजसे आठवावे !
शतयुग तप तूझ्या नामिं गे म्या जपावें ;
परि न मम मनाची तृप्ति होई कदा ती,
सकल भवसुखाची मूर्ति तूं पूर्ण शांती ! ॥ ३९ ॥

द्रुतविलंबित.

त्यजुनि गेलिस येशिल गे कधीं ?
सुख मला नुरलें जगतामधीं !
वद किं येशिल तूं परतोनियां ?
विरस जीवन अंतरतां प्रिया ! ॥ ४० ॥

पृथ्वी.

सखे ! सुखद एकदा मजशि भेट देई गडे !
मनीं तळमळें पहा मज न चैन कांहीं पडे !
पडेल मजला कसा विसर गे तुझा राजसे ?
बघे जिथतिथें तुझें स्मरण-चिन्ह यातें दिसे ॥ ४१ ॥
विझेल कशि अंगिची प्रबळ पेटली आग ही !
उडी त्वरित घालतों, जरि विभक्त होई मही ;
अगे धरणि माय ! घे त्हदिं तुझ्या मला सत्वरीं,
न सोसवत दुःख हें, कितिक आठवूं अंतरीं ! ॥ ४२ ॥

( ४ )

शार्दूलविक्रीडित.

प्रातःकाळिं जयीं उठें, सुरुचिरा मुद्रा दिसे शांत ती,
भाळीं केश पडोन ते कुरळसे वायूसवें नाचती;

न्हाळीं प्रेमभरें अशी पडलिया निद्रिस्त तूं मंचकीं,
ऐसें हें सुख भासलें, उठति तैं या अंगिं रोमांच की ॥ ४३ ॥
नाना चित्रविचित्र नित्य करि मीं थट्टा तुझ्या गे किती !
' माझें सोंग ' सुनाम प्रेमल असें तैं पावलों निश्चिती;
'सोंगा या,' ' अमुकें करा ' 'करूं नका सोंगा' 'अरे सोंगड्या,'
हाका तूं मज कोमले ! मधुरशा मारीस तूझ्या गड्या ! ॥ ४४ ॥
गंधें ते भरलें सुकेश कुरळे, सोडोनि त्यां मोकळे,
लेवोनी फुलहार दक्षिण करीं, दो मोतियाचें कळे,
बैसे सुंदर नार पत्र पढती, हर्षें नहाती सुखी,
घाली सोलुनि येलचि विलसती ती वामहस्तें मुखीं ॥ ४५ ॥
स्वानंदें रमतां अशी स्वसदनीं एकाकि एके दिनीं,
त्या मीं मागुनि देखिलें सुगुणिला, जी गंधर्वी मेदिनी ;
यत्नें आकलुनी हंसें, नकळतां बैसे हळू तत्स्थलीं,
खुर्चीं आड लपोन ' सोन ! ' ह्मणुनी म्यां हांक मारियली ॥४६॥
ऐकोनी मम शब्द, तेथ परि ना नेत्रीं मला देखतां,
पाहे चोंहिकडे, मनीं दचकली ! आलों पुढें हांसता ;
पोटाशीं धरिलें तिला कवळुनी, राहें समोरा उभा,
केला फार विनोद-या मज अतां क्रीडा महा दुर्लभा ॥४७॥
रात्रंदीन अतां विचार पडला, गेली तृषा वा क्षुधा,
झालें जीवित तेविं, जेविं गरळें आम्लत्व येई दुधा ;
भेला हस्तकिं लागला बहु कटू, जावोनि श्रेष्ठा सुधा,
आलें कां अजि हें कपाळिं समजे त्या एकत्या सद्बुधा ॥४८॥
संभारा वपुच्या कशी कटि तिची वाहे तिलाची कळे,
शोभे नूतन पुष्प फुल्लित जसें सर्वांग तें कोंवळें !
कांतीचें पडतां सुतेज तिचिया, हृन्मंदिरा मोहरी,
रम्या ती नयनांसि हर्षवि सदा संताप वा संहरी ॥ ४९ ॥

जेवीं बाह्य सुरेख निर्मळ असे, शुद्धा तशी अंतरीं,
दुःखार्चीं परिहारका सुतरणी, साक्षात् सुधन्वंतरी;
सोना साजत नाम, चोखट सदा होतीस सोन्यासमा !
ज्येष्ठा जेविं सुता अपूर्व वनिता, तैशीच सर्वोत्तमा ॥५०॥
सोने ! तूं जनकासमान अपुल्या लोकप्रिया, सद्गुणी,
सौम्या, सभ्य, अलभ्य, दिव्य करूनी गेलीस आह्मा ऋणी !
सेवा केलिस अमुची, झिजविलें त्वां अल्पशा गे वया,
नाहीं कां तरि राहिलीस आमुची सेवा प्रिये घ्यावया ॥ ५१ ॥
देवा ! जें तुझिया मनास रुचलें केलें तुवां हें खरें,
नेलें त्वां नसतें अकालिं तिजला होतें अनेकां बरें;
कल्याणार्थ परांचिया झिजविली काया तिणें आपुली,
होती पूर्ण जशी अपूर्व दुहिता, दीनां तशी माउली ॥ ५२ ॥
शांता ती अनिवार गांजिली, महा दुःखानळें पोळली !
काया पुष्पलतासमा प्रखरशा दुष्टज्वरें जाळली !
गेले खोल कपोल वर्ण तयिंचा सारा दिसे कोमला,
झालें गोंडस अंग शुष्क, हृदया दुःखाग्नि ह्या झोंबला ॥ ५३ ॥
बोले एक दिनीं सकाकलुत तीः—' होईन केव्हां बरी ?
' शक्ति क्षीण गमे दिसेंदिस मला आराम ना अंतरीं !
' चित्तीं वाटत स्वस्थता नचि मला सांगा करूं का तरी ?
' देतें कष्ट तुह्मांस मी करवुनी घेतें खडी चाकरी ! ॥ ५४ ॥
' वारा संतत घालतां, श्रमतसां, मी धन्य ही नोवरी !
' केव्हां कामिं पडेन हो ?—थकतसां, बैसा पलंगावरी !
' लावावा अवघा सुकाळ तुमच्या सेवेंत सौख्यें सदा,
' आहे मानसिं हें, घडे परि दुजें; तेणें न शांती हृदा ! ' ॥ ५५ ॥
ऐसें ती करुणस्वरें वदत जों छाती तियेची भरे,
स्फुंदे, म्लान मुखावरोनि कुरळ्यां सारोनि केशा करें ;

बोलें मी कुरवाळुनी दिसत जी निस्तेज पुष्पापरीः–
'स्वेच्छेनें प्रभुराय रक्षिल सखे ! होऊं नको घाबरी !' ॥५६॥

(५)

शार्दूलविक्रीडित.

वायू अंबरिंचे सुशीतल न कां कायेवरी सूटले,
आरामार्थ उपाव जे करियले, सारे कसे खुंटले !
नाना योग्य वनस्पती हरगुणी योजूनियां दीधल्या,
होत्या गे गुटिका कटू परि सखे, सप्रेम म्या पाजिल्या !॥ ५७ ॥
कोणेही परि हो बरी जशितशी, इच्छीत होतें मन,
हातीं संजिवनी जरी असति या, देतों तुला जीवन !
आहों मानव दीन दुर्बळ परी, जातां न लागे क्षण !
शिंपोनी स्वदयामृता प्रभुवरें केलें न कां रक्षण ! ॥ ५८ ॥
नाना रे अवतार त्वां धरियले भक्तांचिया पालना;
रक्षायासि न धांवलासि ह्मणि कां देवा ! सुदिव्यांगना ?
नाहीं दुःख लहानसान, सुखदा हृद्रंजनीलोप हा !
माझें दैव अजी समूळ फुटलें ! हृद्भग्न झालों अहा ! ॥ ५९ ॥
केलेंसी प्रभुराय ! मानित असे जें योग्य वाटे तुला,
मी दुःखें बहु गांजलों ह्मणुनि हे उद्गार येती मला;
भोगी शाश्वत सौख्य, अमृत तिला ठेवा असे लाभला,
जाणें मी, परि प्रीय पत्निविरहें हृत्ताप हा क्षोभला ॥ ६० ॥
मोठ्या सांपडलों प्रचंड पवनीं चौफेरसा घेरलों !
आहा कोसळलों धरातळवटीं ! निर्जीव मी जाहलों;
येवो येइल जीव तो पुनरुपी, केव्हां कुणेहीपरी,
गेलेलें सुख ना कदा मज मिळे, भार्याहि कल्पांतरीं ॥ ६१ ॥
जैसा तस्कर दावुनी गुळ बरा प्राणासि गांठी मुला,
तैसा दावुनि गोड घांस मजला, काळें गळा कापिला !

लागोनी ममता मला अधिं महा, झाला असा अंत हा !
शातीतें सति पावली, भडकला माझ्यात अंतर्दहा ! ।। ६२ ॥
आला हा अजि गौरिचा दिन महा गौरी घरीं मांडिती,
लक्ष्मीचा अवतार गेलि सुखदा माझी कुठें गौर ती ?
नाहीं तूं पतिच्या घरीं दिसत गे, माहेरिं का गेलिशी ?
तेशें शोधियलें परी न दिसशी ! केव्हां अतां भेटशी ॥ ६३ ॥
आला हा दसरा अजी, जन पहा सोनें सुखें वाटती,
गेलें सोज्वल हातिचें मम अहा ! सोनें प्रिया ती सती;
का कोणी मम मित्र येउनि घरीं सोनें ह्मणोनी तिला,
साक्षात् ठेविल हस्तकीं अजिदिनीं सोना प्रिया कोमला ॥६४॥
गंधें नाहति आजि लोक सुखि हे, लावोनियां ऊटणीं,
अश्रूपूरिं अह्मीं नहात बसलों भोगीत ही जाचणी !
आह्मांला दिपवाळीचा सण नसे, होळी सदा जाहली !
का ही आग विझेल अश्रुंत जरी काया सदा नाहली ॥ ६५ ॥
मित्रांनों ! जरि येतसे सुहृदयीं माझी तुह्मां हो दया,
गाळा अश्रु सुमित्रभाव धरुनी, एकत्र आणा तयां,
अश्रूंचा बनवा सुसागर जयीं राहीन मी बूडला !
योजा थंड उपाय आगटिमधीं हा जीव हो कोंडला ! ॥ ६६ ॥
सन्यासा आजिं घेउनी कठिण हा संसार मी सोडितों,
जावोनी मठिं बैसतों निवळसें वैराग्य तें जोडितों;
योग्यांचा करुनी समागम अतां मिथ्या प्रपंचा ! तुला,
लत्ता दुर्घिचि मारितों क्षणिं असा हा देह वैतागला ॥ ६७ ॥
चित्तीं शब्द परी सखे ! उमटले ‘ मायेस सोडूं नका ! ’
मायेच्या मठिं बैसुनी तिथ तिच्या सेविन मी पादुका;
योगा साधिन मी सुकोमल जिथें माता स्वकीया वसे,
रक्षा लावुं कशास? का तनुचि या रक्षा न झाली असे? ॥६८॥

## वेंचें भक्तिसुधेंतील.

### ( ईश्वरस्तोत्र. )

आर्या.

संकट मजवरि पडतां धांवत ये शीघ्र त्यासि हाराया,
ताराया मज दीना कोण तुझ्याविण समर्थ हा राया ॥ १ ॥
हे राया जगताच्या ! विनवित तुजला तुझाचि हा दास,
द्यावें दर्शन यातें हृदयीं धरितों तुझ्या सुपादास ॥ २ ॥
जेविं निशा ती हरपे पावुनियां दिव्य भानुतेजातें,
दुर्बुद्धिही तशी प्रभु ! स्तवितां तुजला स्वमानसीं, जाते ॥३॥
लोभा न मिळे थारा, मानस होतें तुझ्या स्तवें शुद्ध,
मत्सर बंधुजनाचा न करी, मन्मति न होय ती क्रुद्ध ॥४॥
संचरता मद्‌हृदयीं स्थानचि कोठें मिळे न मोहाला,
मंगल गान तुझें प्रभु ! भासे तें सत्य त्यासि विष-भेला ॥५॥
मन तव पदिं रत होतां देई आश्रय कदा न कामाला,
सत्वर मर्दुनि त्यातें धावें प्रेमें तुझ्या सु-धामाला ॥ ६ ॥
सद्गुरु सज्जन ह्मणती ज्या तो माझा असे सहाकारी,
तो अति संकटसमयीं साह्या मातें कधीं न नाकारी ॥७॥
मी त्या सद्गुरुलागीं प्रेमलभक्तीसि अर्पितों भावें,
सौख्यद मोक्षपदातें पावाया मधुर आठवीं नांवें ॥ ८ ॥
मी होउनि विषयीं रत, शाश्वत सुख दे तयासि विसरूं कसा ?
आठविं नाम तयाचें, ध्याया हृदयांत भेटि उत्सुकता ॥ ९ ॥
भीमातिरीं तयाच्या भेटीलागीं कदा न मी जाई,
हृदयीं बसुनि दिसेना तरि मज भेटे प्रभू तिथें काई ? ॥१०॥

त्यजुनी सन्मार्गातें कैसा मंत्रें प्रभूस आळविशी ?
ढोंगें असार करुनी भावाविण कैशि मुक्ति मेळविशी ? ॥११॥
शतकोटी जप जपशी, भक्तिविणें परि कसा घडे स्वार्थ,
भावाविण मन चंचळ, नोहे स्थिर, बा उपाय हे व्यर्थ ॥१२॥
सोडुनि दुर्मद अवघा ईशपदातें सदैव जोडावें,
जाउनि शरण विभूला या भवपाशास शीघ्र तोडावें ॥ १३ ॥
न गमे मज मूढाला केवीं गावें तुझ्या विभो महिम्या,
तव लीलादर्शक ही आनंदें बहु विलोकिली महि म्यां ॥ १४ ॥
गगना भेदिति ऐसे नग केले त्वा विशाळ या भुवनीं,
नाना औषधतरुच्या असती सादर सदैव जे अवनीं ॥१५॥
निर्मल नीर नद्यांचें वाहे झुळझुळ तया नगावरि तें,
जाणों मार्गी जातां मंगलगायन तुझें प्रभो ! करितें ॥ १६ ॥
भजनीं निमग्न असतां जसि सरितां जाय सिंधु–सदनाला,
तैसें सन्मार्गें म्यां व्हावें पदिं रत तुझ्या जगत्पाला ॥१७॥
निर्मियला तेजोमय दिनकर सुखकर असा तुवां भानू ,
जो जीवन विश्वाचें, वात्सल्य तुझें प्रभो ! किती वानूं ! ॥१८॥
मृदुशीतल प्रकाशें तोषवि रजनीस तो जनां इंदू ,
जाणों तुझ्या कृपेनें नयनीं सेवित असो सुधाबिंदू ॥१९॥
आद्यंत ज्या नसे तो पाहुनि जलधि प्रभो ! स्तवीं तुजला,
ओहटि भरती लाटा वात्सल्यें रे तुझ्याच येति जला ॥२० ॥
कोमलपल्लवयुक्तहि नाना तरु शोभताति पुष्पानीं,
तच्छाया गंधि फळें सेवुनि जग हें प्रभो ! तुला वानी ॥२१॥
ऐसें हे भगवंता ! चातुर्य तुझें अतर्क्य, अति थोर,
लीला विविध तुझ्या ह्या आठविता भय टळे, चुके घोर ॥२२॥
यास्तव लीलागानीं देउनि रुचि मज सदैव रक्षावें.
प्रभु ! तवचरणांवाचुनि अन्य कदा काहि मीं न लक्षावें ॥२३॥

विश्वांचें कारण तूं हे प्रभु ! मी तुज कदा नुपेक्षावें,
पीडित बंधुजनातें साह्य यथाशक्ति करुनि रक्षावें ॥ २४ ॥
विहित सुखें जीं भुवनीं असती तीं म्यां यथेच्छ सेवावीं,
परि वृत्ति प्रभुभजनीं नित्य सुखास्तव सदैव ठेवावी ॥ २५ ॥

## दांभिक पितृप्रेम.

अभंग.

मातापित्यां अन्नां, तळमळवीशी ॥ मेल्या पिंड देशी कशासाठीं ? ॥ १ ॥
पाणी पाणी जितां, वदतां शिणलीं॥ मेल्या तिलांजली, कशासाठीं ? ॥२॥
वस्त्रें फाटकींही, जित्या न त्यां देशी ॥ मेल्या तीं, अर्पिशी, शेला कोणा ॥३॥
पिता वृद्ध तुझा, करपला उन्हांत॥ मेल्या तो, तें छत्र, कोणा लागीं ?॥४॥
असे हीं मनुजा, दुःसह करणी ॥ सुख रे स्मरणीं, नेदी कान्हा ॥ ५ ॥

## धांवा.

पद.

( चाल " धांव विभो करुणाकर माधव ")

येइं प्रभो ! सुख-कारक तारकं, पालक सकलां अखिल दुरितहर॥ध्रु०॥
निर्वाणींचा प्राणसखा तूं, म्हणुनि शरण तुज हा तव किंकर ॥
ध्यान भजन हें जीवन याचें, इतर सकलही भासे नश्वर ॥
पडतां मजवरी संकट कांहीं, धांव लवकरि त्यांतुनि उद्धर ॥
धरुनी हृदयीं तव पदकमला, प्रेमें गुण मी गाइं निरंतर ॥
देउनि मजला ठाव तव पदीं, मोक्ष पदा ने हे करुणाकर ॥

# विठ्ठल भगवंत लेंभे.

हे कवि, पुणें जिल्ह्यांत ढमढेरे यांचे तळेगांवीं इ. स. १८५० (चैत्र शुद्ध १२ शके १७७२ ह्या वर्षी जन्मले. हे जातीचे यजुर्वेदी ब्राम्हण. ह्यांचा मराठी अभ्यास तळेगांवीं झाला. नंतर पुणें येथें प्रसिद्ध कै. वा. बाबा गोखले यांच्या इंग्रजी शाळेंत ह्यांस प्रवेश परीक्षेपर्यंत प्राथमिक शिक्षण मिळालें. ह्यांचे मामा कै. वा. हरिशास्त्री, जे प्रसिद्ध कै. वा. कृष्णशास्त्री चिपळूणकर यांचे सहाध्यायी होते, त्यांनीं यांस नवनीतांतील मोरोपंताच्या सर्व कविता शिकविल्या. त्यामुळें ह्यांस "काव्य करण्याची इच्छा निर्माण झाली." पुढें वृत्तदर्पणाचा अभ्यास करून ह्यांनीं कित्येक किरकोळ कविता केल्या. घरगुती अडचणीमुळें शाळेंतील शिक्षणक्रम चालू न ठेवितां ह्यांस 'रेलवे' ची नोकरी पतकरावी लागली. नंतर पाकणी येथें असतां ह्यांचा, रा. रा. शंकर गणेश देशपांडे बी. ए., एल्.एल्. बी., ह्यांच्याशीं परिचय झाला. त्यांच्याजवळ ह्यांनीं कित्येक प्रसिद्ध संस्कृत काव्यांचें अध्ययन केलें. त्याच-प्रमाणें रसमाधुर्य, अलंकार, वनश्रीवर्णन इत्यादि उदात्त कवितेस लागणाऱ्या साहित्याचेंहि ह्यांनीं परिशीलन केलें. त्यायोगें ह्यांची कविताशक्ति प्रगल्भ झाली. ह्यांनीं मित्रदर्शन, विष्णुनिधन, शोकावर्त आणि इतर बऱ्याच स्फुट कविता केल्या आहेत. पैकीं शोकावर्त्त हें काव्य अत्यंत हृदयंगम उतरलें आहे.

---

## शोकावर्त.

पृथ्वी.

प्रसन्न उदयाचलीं अरुण चंद्रमा येतसे,  
सुरम्य रजनीमुखा अरुण राग तो देतसे;  
गमे प्रियतमे तुझ्या हृदयमंदिरा सोडुनी,  
जगीं प्रणयगोल हा उदय पावला रुक्मिणि ! ॥१॥

सुनीलगगनोदरीं चमकताति या तारका,
न होय पतिदर्शनें नववधूसि आनंद कां ?
पडे धवल शीतसें तरुत-तींतुनी चांदणें,
तरंग, कवि हे तुझ्यां विमल मानसाचे म्हणे ! ॥२॥
गुलाब फुलले पहा वनलता लवूं लागल्या,
सुगंधसुखदायिनी कुमुदिनी वनीं शोभल्या;
सुधांशु कुसुमावरी अमृतबिंदु सोडी करें,
वनस्थल करी जणों धवल दुग्धधाराभरें ! ॥ ३ ॥
असा धवल चंद्रमा सुखद जाहला चक्षुला,
तुझ्या सुविमला यशा परम मित्र हा शोभला;
गभीरगुरुघोष ये दुरुनि नर्मदेचा तया,
मृदंग रव हा मिळे, श्रवणयुग्म तर्पावया ! ॥ ४ ॥
उडे गगनमंडलीं मदनसारीका स्वैरिणी,
सुमंजुरव दे जिचा सुखचि कर्णरंध्रां झणीं;
प्रसन्न मन हें सखे क्षणभरी अहा ! जाहलें,
कळे न मज दुःख कीं अहह यापुढें वाढिलें ! ॥ ५ ॥
कशी अजुनि लागली तुजसि घोर निद्रा अहा !
प्रसन्न रजनी अशी परमसौख्यदा ही पहा !
रसज्ञ कविची सखे ह्मणविशी प्रिया धर्मिणी,
स्वभावचतुरे ! कशी नयन घेशि तूं झांकुनी ? ॥ ६ ॥
सुरम्यमुखपंकजावरि अहा ! दिसे म्लानता,
जरा न करही चळे, चलनहीन ही भूलता ;
गमे हृदय शून्यसें जणुं समाधि लागे अहा !
कळे न मज, नीज, कीं तुजसि येइ मूर्च्छा महा ! ॥७॥
सुनील कचभार हा विखुरला न ऐसा प्रिये !
कधींहि नच मौन हें ! नच असा कधीं रोष ये !

सुहास्यमुख, सर्वदा विनय, लोभही अंतरीं,
सुधेपरिस गोड ती हृदय रंजवी वैखरी ! ॥ ८ ॥
तुझ्या प्रणयदृष्टिचा सतत लोभ लागे जया,
न कां स्मितमुखें सखे ! बघासि आज तूं त्या प्रिया ?
सखे ! मृदुल देह हा परम सौख्य देतां मला,
पळांत अगदींच कीं अहह ! गार हा जाहला ! ॥ ९ ॥
जिथें सुख, तिथेंचि दे विकलता तुझा स्पर्श हा,
मला भ्रमाचि जाहला प्रणयबंधनानें पहा !
जडत्व सकलेंद्रियांवरि वरानने ! येतसे,
सुके सुखझरी जरी तरि मला कळेना कसें ? ॥ १० ॥
न लेश उरली अहा ! अरुणता कपोलांवरि,
सुकोनि अगदीं दिसे तनुलता तुझी पांढरी ;
रुसोनि जणुं बैसलीं सकल आजि गात्रें पहा !
गमे भ्रमाचि कीं, जडे प्रखर भूतबाधा महा ! ॥ ११ ॥
मिटोनि नयनें पुन्हां पतिमुखा न गे ! पाहणें,
असेंचि वरिलें जरी पतिरते ! तुझ्या या मनें ;
कशास हरिलें मना प्रकृतिरम्यमंदेक्षणे ?
गमे उचित काय गे प्रियजना प्रिये ! सोडणें ? ॥१२॥
सुमंजुवचनामृतें प्रियजना तुवां तर्पिलें,
रसाळ वदना अशा अहह ! मौन कां शोभलें ?
जरी परम निष्ठुरा प्रकृति मानली ही तुला,
कशास चटका मना गुणगणें प्रिये ! लाविला ? ॥ १३ ॥
गृहांत नससी ह्मणों, तरि पहा मला दीसशी,
खरीच असशी म्हणो तरि अहा ! न तूं बोलशी ;
म्हणूं तुजसि रुष्ट मी, तरि न वक्र ही भ्रूलता,
भ्रमासि वरि चित्त हें अहह ! पाहतां पाहतां ॥ १४ ॥

क्षणोंक्षणिं जरी तुझा विकल जीव गे होतसे,
पळांत गुण ये अशी हृदयिं थोर आशा वसे;
जरा उघडुनी पुन्हां नयन झांकिले त्या क्षणीं,
मनांत भलतीच ये अहह ! कल्पना वैरिणी ॥ १५ ॥
पहा विकल जाहली रडुनि वत्सला माउली !
सुता-निधन-शोक-जाऽनल-शिखेंत ही भाजली !
सखे ! रडति लेंकुरें अहह ! दीनवाणीं अशीं,
न आजि कुरवाळिशी, सदय दृष्टिनें पाहसी ! ॥ १६ ॥
दयार्द्रहृदयान्तरीं प्रणयजीवनाचे झरे,
सदैव असल्यातरी, प्रिय ममत्व बाकी उरे;
"प्रिया प्रियतमा" असे मधुर बोल बोलोनि ही,
तुवां त्यजियलें मला ! अहह ! शून्य झाली मही ! ॥१७॥
न तूं भुवनसुंदरी, कनकपंचकाची कळी,
न चंद्रवदना सुरद्रुमसुमंजरी कोंवळी;
न कंजनयना तशी, वरतनु प्रिये ! पद्मिनी,
मनोरम परंतु तूं निखिल सद्गुणांची खनी ! ॥ १८ ॥
जिथें प्रणय त्या स्थलीं वरिल रूप कां थोरवी ?
दया, सुविनयापुढें कवण कान्तिला गौरवी ?
कशास नखरा ? जिथें हृदय सद्गुणें शोभलें,
रतिप्रतिहि लाजवी गुणवती गुणांच्या बलें ॥ १९ ॥
अहा ! हृदय थोर तें ! परम संकटीं धैर्य तें !
सदाचरण सर्वदा ! अनृतभीति ! सौजन्य तें !
अहा ! प्रणय तो ! तशी दयितरंजनीं लालसा
जगीं न उरली; अहा ! गमंति शून्य दाही दिशा ! ॥२०॥
हरी अदय काळ जै रुचिर बालकें कोंवळीं,
अहा ! भरियलीस तैं रडुनि मस्तकीं गे धुळी;

बळेंचि गिळिला जरी प्रखर शोकवन्हि प्रिये !
पुन्हां धुमसुनी करी हृदय दग्ध हा निश्चयें ॥ २१ ॥
अहा ! प्रियतमे ! कसे प्रणयबंध तोडी खळ,
कसें हरियलें प्रिये ! अदयभागधेयें फळ;
फुटेल तरु तोडिला ह्मणुनि आस जों लागली,
सुवंशतरुची कशी खणुनि काढिली तों मुळी ! ॥ २२ ॥
सुहास्यवदना जणों अमृत सिंचिते भाषणें,
प्रिया बघुनियां अशी गणियलें न कांहीं उणें;
अहा ! परि न शेवटीं मजसि लाधली ती सती,
उरे न 'सुख' शब्द हा ! त्रिभुवनीं ह्मणें मन्मति ॥२३॥
भराभर सुखामधें अमित संपल्या गे निशा,
कथा प्रणयजा तुझ्या बहुत लागल्या गोडशा;
सुमंजु मधुरा गिरा अहह ! ती कशाची जनी ?
युगासमचि आजही मज गमे निशा वैरिणी ॥ २४ ॥
श्रमांबुकणिकांवरी पवन शीत लागे क्षणीं,
ह्मणूनि, नवमंडपी बससि नर्मदेच्या वनीं;
सुहास्यमुख तें तुझें बघुनि शीण सारा हरे,
स्मरे प्रणय मात्र तें हृदयरंजयित्री ! त्वरें ॥ २५ ॥
तनु प्रियतमे ! जणों सुमनवासितावल्लरी,
प्रभा सुवदनीं जणों विमल चंद्रिका पांडुरी;
सुरम्य नयनें जणों विकचपंकजें शोभलीं,
गिरा सुमधुरा जणों अमृतवृष्टि ती जाहली ! ॥ २६ ॥
अहा ! स्मरति गे तुझ्या सकल रम्य लीला मला,
सुहास्यवदनें ! तुला दयित जीव जैं भासला;
स्मरे सुवचनीं दिलीं गुरुजनें तुला मंगलें,
स्वभद्रकर तीं शिरीं धरुनि वंदिलीं पाउलें ॥ २७ ॥

अहो ! प्रणयरोष तो स्मरतसे अझोनी मला,
क्षणार्धहि न राहिला जरि बळेंचि तो आणिला;
अहा ! स्मितमुखें पुन्हां भुजलता गळां घातली,
क्षणैक तनुवृत्ति तैं पतिमयीं तिची जाहली ॥ २८ ॥
असोचि अथवा नसो निज गृहांत ती इंदिरा,
प्रसन्नहृदयीं तुझ्या वसतसे सुखाचा झरा;
उदार मन तें तुझें तुजसि संकटीं धीर दे,
सुखें स्वपतिचीं तुवां नमियलीं दरिद्री पदें ॥ २९ ॥
अहो स्वजन 'आपुलें' ह्मणवुनी धनें पोशिले,
परंतु परकेचि ते परमसंकटीं जाहले;
प्रसंग बघुनी अहा ! सकल भूषणें अर्पिलीं,
तुवांचि पतिची प्रिये ! सकल लाज तैं रक्षिली ॥ ३० ॥
अहो, नवल केवढें ! स्वधन मी जयासि ह्मणे,
दुजा लुटुनि ने तया, कर दिला मला स्त्रीधनें;
न दैव सुख दे, तरी मन सदैव संतोषलें,
प्रसन्नवदने ! तुवां कधिं न दैन्य गे दाविलें ॥ ३१ ॥
सुरम्य सुमनें दिलीं निजकरें ! प्रिये ! म्यां तुला,
तयेंचि तनुभूषणें तुजसि मोद गे जाहला !
गुणांसहि विभूषणा असासि तूं कळे या जना,
कशास पुसशील तूं कनककंकणां भूषणां ! ॥ ३२ ॥
प्रसन्न जननी तुला मजसि देउनी जाहली,
कवीस मधुरा गिरा जणुं सरस्वतीनें दिली !
खरें सुख जनीं वसे सकल सद्गुणांच्या गणीं,
गुणज्ञ न वरील कां गुणवती प्रिया धार्मिणी ? ॥ ३३ ॥
अनर्थ बहु जाहले वरिवरी धनाच्या भ्रमें,
जना गुणगणांहुनी तरिहि थोर लक्ष्मी गमे;

उदारहृदये ! तुवा पडुनि निर्धनाच्या करीं,
सुखें सदनि सेविल्या निवळ कोरड्या भाकरी ! ॥ ३४ ॥
असेहि दिन ते बरे ह्मणविती अहा ! या क्षणीं,
गमे सुखचि तैं तिच्या प्रणयभारलोलेक्षणीं !
श्रमाउपरि भाकरी अमृततुल्य त्या लागल्या,
सुहास्यवदनें तिनें निजकरेंचि ज्या वाढिल्या ॥ ३५ ॥
सदैव हुरडा मिळे मधुर कोंवळा भाजला,
तसा हरभरा हुळा मधुर फार हो ! लागला ;
तशीं मधुरशीं नवीं विपुल हो ! मिळालीं फळें,
अहो ! सुख मना दिलें विमल ओढियाच्या जलें ॥ ३६ ॥
सुखास अमुच्या तदा अहह ! अल्प सीमा असे,
कदान्न धड वस्त्र यावरि न लेश आशा वसे ;
गुरुत्व, धनही नसे ह्मणुनि गर्वतृष्णा नसे,
पदार्थहरणीं न धी, मग कशास चिंता डसे ? ॥ ३७ ॥
प्रसन्नवदना प्रिया हृदय रंजवाया असे,
अशा सुजनसंगमें सुख न मंदिरीं कां वसे ?
असे दिवस चांगले ह्मणवती न आतां कसें ?
भयाण गृह आज हें भिववितें अहा शून्यसें ॥ ३८ ॥
मिळोत मिळतील तीं अमित भूषणें या जना,
विभूषणाचि जी अशी परि मिळे न ती अंगना;
अहो ! बहुचमत्कृतिप्रचुरविश्व आहे जरी,
तयांत न दिसे कशी नयनसौख्यदा सुंदरी ? ॥३९॥
करिल धन काय हें हृदयरंजना दर्शनें ?
करील तनु गार का मृदुलशीतलालिंगनें ?
करील वचनामृतें सुरसपूर्ण हे कर्ण कां ?
करील विनयें मना मुदित काय पैका टका ? ॥४०॥

असे परमसंकटीं कवण धीर हो द्यावया ?
तसाच हितमंत्र हो कवण मित्र सांगावया ?
स्वदुःख हलकें करूं कथुनि हाय कोणाप्रती ?
विचार मनिंच्या मनीं विरुनि राहिले संप्रति ॥४१॥
सुखा सहचरि तशी परमसंकटीं मैत्रिणी,
बघोनि मज खिन्न जी गहिंवरेचि हो तत्क्षणीं;
अशा तुजविना दुजी कळवळेल गे कोणती ?
बघोनि दयितास या परमसंकटीं संप्रति ॥ ४२ ॥
नकोत जड जाहलीं ह्मणुनि भूषणें त्यागिलीं,
तशीच अझुनीहि तीं अहह ! बंधनीं राहिलीं;
करांमधुनि सोडिलें सकलमंगलेनें जयां,
कशास मग हो तयां उशिर दैन्य तें यावया ? ॥ ४३ ॥
अलंकरणसंघहो ! ह्मणवितां वृथा भूषणें,
न कां रमवितां तुम्ही मजसि आजि भूषागुणें ?
पराश्रय धरोनियां सतत हो तुम्हीं राहिला,
निराश्रित जनां तुह्मां बघुनि दुःख वाटे मला ॥ ४४ ॥
अहो ! गहिंवरोनि ये हृदय, अश्रु हे लोटती,
अहो ! दशदिशा कशा मजसि शून्यशा वाटती ?
अहो ! त्रिजग ढांसळे कडकडोनि माझ्यावरी,
अहो ! परि कठोर हें हृदय राहिलें भूवरी ! ॥ ४५ ॥
जणों दुरुनि ये शिरे प्रखर बाण हो अंतरीं,
जणों हृदय हें जवें चरचरा चिरी हो सुरी;
न शोकभर आंवरे कळवळे अहा ! जीव हा,
बलाढ्य भवितव्यता छळितसे अझोनी पहा ॥ ४६ ॥
बळेंचि हृदया तुला करुणसागरीं लोटिलें,
वियोगदहनीं तुला विधिकरें कसें अर्पिलें !

अहा ! खिळियलें असे असुखबाणजालें तुला,
असह्यचि किती किती तुजसि शोक हा जाहला ॥ ४७ ॥
म्हणोत म्हणणार ते मजसि मूढ ऐसें जनीं,
अनावरचि जाहला करुणवेग या या क्षणीं ;
विलापलहरी किती खवळल्या न या थांबती,
म्हणोनि नयनांतुनी सहज अश्रु हे वाहती ॥ ४८ ॥
नको भुवन हें जिथें अदय काळ ये पाहुणा,
नको भुवन हें मला तिळ न सौख्य जेथें मना;
नको मन विटे, नको मजसि दुःखदा संसृति,
न दे मजसि ज्या स्थळीं गुणवतीसतीसंगति ॥ ४९ ॥
कशास मज दावितां सकल भूषणें आज हो ?
कशास नव चैल हें, अदयचंदना ! दग्ध हो ?
सुरम्य सुमनें अशीं कचविभूषणा आणिलीं,
कशीं अदय हीं पहा ! अशुभकारणा लागलीं ! ॥ ५० ॥
वसोनि सुख संगमी, गुणगणीं दयानिर्झरीं,
अहा ! अडकलों तुझ्या प्रणयपंजरीं सुंदरी !
पडेल विष आजि या अमृत-पूर्ण-पात्रांतरीं,
असेंचि कळतें तरी धरुनि बैसतों अंतरीं ॥ ५१ ॥
सदैव सुख द्यावया स्मित करील जीवेश्वरी,
प्रसन्न मुख हें तुझें, हृदयरंजना जें करी ;
सदा सुजनसंगती श्रम हरील भासे मला,
अझूनि नकळे जरी सुखद काळ तो संपला ॥ ५२ ॥
पुन्हां वदन हें तुझें, स्मित करील गे सुंदरि !
असा भरंवसा असे अझुनि माझिया अंतरीं !
मनोरथ वृथा कसे अहह ! व्हावया लागले ?
कुठ मज मनोरमा विमल चंद्रलेखा मिळे ? ॥ ५३ ॥

सखे हृदय शून्य हें ! तव शरीरही थंड हें !
असो प्रियचि हें मला, हृदयमंदिरीं निश्चयें;
तुला धरुनि बैसणें ! सुखचि हें गमे गे सये !
अनन्यहृदयीं वसो कधिं न अन्यभाव प्रिये ! ॥ ५४ ॥

असह्य जरि जाहले विरहदुःख हें या जना,
धरील मन शांतिला स्मरुनियां तुझ्या सद्गुणां;
परंतु विमलप्रभा तुज सभोंवती जी वसे,
दिसेल मज ती कुठें ? बल न कल्पनेतें असे ! ॥ ५५ ॥

खरेंच तुमचें सरे सकल पुण्य हे गात्रहो !
असह्य मग दुःख हे वरिवरी तुम्हां कां न हो ?
उरे सुकृत अल्प तों बघुनि नेत्रहो ! घ्या प्रिया,
क्षणांत न मिळेल हें मुख सुरम्य देखावया ॥ ५६ ॥

भयाण अति निष्ठुरा रडुनि लोटिली मीं निशा,
अहा ! परमनिष्प्रभा दिसति धूसरा या दिशा;
समग्रसदनांतरीं गिरिशिरीं वसे दुर्दिन,
उदास रविला गमे वदन दाविणें योग्य न ! ॥ ५७ ॥

अहो ! हृदय हें पहा धडधडे, तुम्ही विप्र हो !
कशास जमलां इथें ? प्रियतमेस या भद्र हो;
बसेन हृदयीं अहा ! कवळुनी प्रिया सुंदरी,
न आजवरि म्यां दिली निजकरें पराच्या करीं ॥ ५८ ॥

कुठें मृदुल देह हा ? कठिण हीं कुठें लांकडें,
अहा ! भयचि दाविती मजासि आज हीं माकडें;
कसे अदय हात हे ह्मणति ' साह्य यांतें करूं, '
घरांतिलचि चोर, हे भरंवसा कुणाचा धरूं ? ॥ ५९ ॥

दया न तुज ये कधीं अहह ! अग्निनारायणा !
न तृप्त मन का ? जरी गिळियलेस नाना जना;

असो सुजन, संत, वा पतिरता, पवित्रा असो,
न येइ करुणा कशी ? म्हणासि सर्वपोटीं वसो ! ॥ ६० ॥
जिनें झिजवुनी तनु श्रमुनि अग्निला निर्मिलें,
अशा स्वजननीसही गिळुनियां तयें टाकिलें !
असेल करुणा कशी सकलभक्षकाला अशा ?
अहो ! खलजनीं कशा भरियल्याचि दाही दिशा ! ॥ ६१ ॥
अगे विमल नर्मदे ! शरण मी तुला शर्मदे,
तुझ्याचि विमलीं करीं पतिरता सती आज दे;
दया करुनि वत्सले ! जपुनियां प्रिया सुंदरी,
पवित्र विमलें जलें सतत न्हाणुनी उद्धरीं ॥ ६२ ॥
सतीस कुरवाळुनी जननि गार वीचीकरें,
स्वयेंचि शमवी हिचा पतिवियोगवन्हि त्वरें !
मला भरंवसा तुझा ! निरविली तुझ्या ही करीं,
अहा ! परि उचंबळे करुणसिंधु हा अंतरीं ॥ ६३ ॥
समस्त तरु हो ! करा स्वभगिनीवरी साउली,
सतीस वनदेवते ! अससि तूंचि गे माउली;
प्रफुल्लनवपल्लवें सुरभिमंदमंदानिलें,
प्रसन्न निजकन्यका करुनि पुण्य घे वत्सले ॥ ६४ ॥
तुषार वहिनीवरी हळु हळु तुम्हीं टाकुनी,
अखंड मिरवा यशा सकल निर्झरांनो ! जनीं;
न दे धवलपर्वता ! अदयहिंसका आश्रयां,
सख्या ? स्वगुरुगर्जितें भिववितील ते मत्प्रिया ? ॥ ६५ ॥
परोपकृतिच्या गुणें निशिदिनींहि जो शोभला,
पराग मकरंद तो अलिकुलांसि ज्यांनीं दिला;
अशा वनलता तुह्मी ! रुचिर मंडपीं रक्षुनी,
नणंद रमवाल कां न ? बहु धन्य व्हाया जनीं. ॥ ६६ ॥

दया करि वसुंधरे ! सकल तीर्थहो ! हे रवे !
विशाल विभुचक्षु तूं बघसि विश्व हें गौरवें ;
दयार्द्र पवना सख्या ? गहनशा नभोमंडला !
पहा निववीली प्रिया-अहह ! कंठ हा दाटला ! ॥६७॥
दिसे सदन शून्य हो ! सुमनवाटिका शून्य हो !
लतासदन शून्य हो ! रसयुता कथा शून्य हो !
वनस्थलहि शून्य हो ! सकल विश्व हें शून्य हो !
मदीय तनु शून्य हो ! हृदय शून्य हो ! शून्य हो ! ॥ ६८ ॥
असेल शिवमंदिरीं, परममैत्रिणीच्या घरीं ?
असेल जबलापुरीं, उपवनीं लतामंदिरीं ?
असेल जननीगृहीं, हृदयमंदिरीं ह्या तरी ?
दया करुनि दाखवा मजसि ती प्रिया सुंदरी ॥ ६९ ॥
अहो ! सुगृहिणी प्रिया ! विनयसुंदरा ती प्रिया !
उदारहृदया प्रिया सुरुचिरा दयार्द्रा प्रिया !
अहो ! स्मितमुखी प्रिया ! हृदयरंजयित्री प्रिया !
अहो ! गुणवती प्रिया ! सुरमणी प्रिया ! हो प्रिया ! ॥ ७० ॥
पवित्र तव नाम हें सकल सद्गुणांच्या बळें,
पवित्र जग हें पहा करितसे बुधांतें कळे ;
सदैव बसलीस तूं अढळ कीर्तीच्या मंदिरीं,
बुडे करुणसागरीं परि तुझा सखा सुंदरि ! ॥ ७१ ॥
गमे नवल हें ! कसें प्रियजना तुवां सोडिलें ?
झरे प्रणयपूर्ण ते अहह ! शुष्क कां जाहले ?
वसंतसमयीं यदा रुचिर मंजिऱ्या लागती,
त्यजील सहकार कां मधुयुता प्रिया मालती ? ॥ ७२ ॥
खरी पतिरता सती यम शिवेल कैसा तुला ?
वियोग मग कां छळी ? अहह ! हें कळेना मला ;

शची, गुणवती अशी सकलसद्गुणांची खनी
गणोनि तुज ने गृहीं सकलमंगला मैत्रिणी ॥ ७३ ॥
गभीरमन तें जिथें नच, तिथें दया कायशी?
दयाचि सरल्यावरी सुजनता कशाची अशी!
जिथें सुजनसंगति क्षण न, सौख्य कैंचें तिथें?
सुखाविण समग्र हा विफल जन्म हो! मन्मतें ॥ ७४ ॥
स्मरोनि तुझिया गुणां करुनि मोकळा कंठ हा
रडेन हृदयांत या करुणवेग दाटे पहा!
प्रियें सकलही स्थलें तव पदें जिथें लागलीं,
कशीं न करितील हीं मजसि दग्ध शोकानलीं? ॥ ७५ ॥
अहो! हृदय हें उलें, विकल देह हा जाहला,
अशा मजसि पाहुनि खचित जीव कंटाळला;
असह्य मज जाहल्या अहह! वेदना फार या,
दया करुनि भेटवा मजसि आजि माझी प्रिया! ॥ ७६ ॥

शिखरिणी.

अहा! गेलें गेलें! रुचिरतर तें रत्न निघुनी,
कशाचें हो आतां सुख मजसि या शून्य भुवनीं!
जिथें आनंदाचें शिखर!–परि तें होय परतें,
तिथें शोकावर्ती भ्रमुनि मम हें दैव फिरतें! ॥ १ ॥

---

## उद्यानभाग.

शार्दूलविक्रीडित.

नाना ताल अशोक उंच बकुली अंभोधरा चुंबिती,
ज्यांचें सुंदर पल्लवध्वजाचि ते वाऱ्यासवें हालती;
नाना फुल्लता तयांवरि जणों तीं तोरणें बांधिलीं,
सारेंहि वन माधवें नटविलें निर्मोनि पुष्पें भलीं ॥ १ ॥

नाना पांडुररक्तनीलनलिनी साऱ्या सरीं शोभती,
स्वच्छंदें मकरंद भृंग पिउनी गुंजारवें गुंगती ;
छाया देउनियां प्रसन्न करण्या कामीजनां या स्थलीं,
चातुर्यें मधुनें झणीं फुलविल्या रक्ता पलाशावली ॥ २ ॥
सौगंधी सुमनें गळोनि रचिल्या शय्या जिथें भूतलीं,
येथें नीलतमालपंक्ति रजनी ऐशी जनां भासली ;
जेथें मोहर गंध देउनि करी कामीमनें बावरीं,
तेथें रम्य लतागृहें करि मधु क्रीडावया साजिरीं ॥ ३ ॥
जागोजाग शिलातलें पुरजनां बैसावया मांडिलीं,
जीं वातेंकरुनी पराग उडतां चित्रांपरी रंगलीं ;
पुष्पांचा मकरन्द हो वरिवरी ज्याच्या जलीं कालवे,
ऐसें वाहति जागजागिं तरुतें जीवावया कालवे ॥ ४ ॥
आलिंगी सहकार, पल्लवकरें श्रीमल्लिकासुंदरी,
प्रेमें चावुनि अब्जनाल दयितातुंडांत घाली करी ;
द्याया हर्ष, कुरंग शृंगयुगलें कांतेस हो खाजवी,
ऐसा माधव विश्वरंजनपरा कामेश्वरा गौरवी ॥ ५ ॥

---

## संध्याकाळ.

मंदाक्रांता.

संध्यारागें अरुण रुचिर प्रांत सूर्यप्रभेचा,
शोभे साक्षात् प्रणयचि जणों पश्चिमादिग्वधूचा ;
जातां जातां क्षितिजसुपथें रक्तबिंब प्रियेतें,
देवोनियां विरह, बुडुनी जाय अस्ताचलातें ॥ १ ॥
झाली बाला विरहविकला रक्तरागेंचि साची,
झालीं तेणें जलदपटलें अंबरीं सोनियाचीं ;

आशाभंगा सहहृदयही भंगिलें जें तयानें,
झाला रक्त क्षितिजभुवनप्रांत हा सर्व जाणें ॥ २ ॥
उत्साहें तो अरुणतनु ये चंद्रमा पूर्वभागीं,
नक्षत्रांची चकचक दिसे अंबरीं जागजागीं ;
व्योमामध्यें कनकरजतप्रांत जे मिश्र होतीं,
त्यांच्यामध्यें भगण रुचिनें शोभतीं मौक्तिकें तीं ॥ ३ ॥

---

## गोदावरीचा प्रदेश.

शार्दूलविक्रीडित.

जेथें कोमल पल्लवें तरुलतायुग्में सदा शोभतीं,
जेथें फुल्ल-निकुंज-रेणु-निकरें गंगावनें रंगतीं ;
जेथें पद्मवनें प्रसन्न नलिनी आल्हाद देती मना,
जेथें रम्य विहंगही विहरती घेऊनिया स्वांगना ॥ १ ॥
जेथें चंदन, देवदारु, बकुली, मंदारमालेतुनी,
वाहे मंद मरंदसिक्तपुलिनीं गोदावरी ऱ्हादिनी ;
जेथें निर्झर गह्वरीं घुमत ये वेगें पडे खालती,
जेथें धौत जलौघ एकवटुनी गोदाजलीं बिंबती ॥ २ ॥
जेथें सुंदर मंजिऱ्या विलसती प्रत्येक चूतांकुरीं,
ज्यांचा सौरभ सुप्रसन्न हृदयें कामी जनांचीं करी ;
जेथें रम्य लतागृहीं अलिकुलें गुंजारवें गुंगती,
जेथें कोकिलसारिकांसि शिकवी गानें वनश्रीसती ॥ ३ ॥
जेथें वृक्षतती मनोहर अशा सूं सूं रवें गुंगती,
जेथें वंशवनीं सुमंजु मुरल्या मंदानिलें वाजती ;
जेथें धीर मृदंग नाद निघती वृक्षांचिया कोटरीं,
मंजुध्वान समस्त जेथ घुमती साऱ्या वनाभीतरीं ॥ ४ ॥

जेथें स्वैर विहंग आम्र तरुच्या स्कन्धावरी क्रीडती,
जेथें रम्य मयूरवृंद रमत। थैं थैं रवें नाचती ;
जेथें श्रीवनदेवता उपवनीं जों वाजवी किन्नरी,
तों तों मंजुळमंजुळ स्वनभरें चंडोल गाना करी ॥ ५ ॥
जेथें शीतल मंद गंधवह ये आनंद द्याया जनां,
जेथें चित्रसुवासयुक्त कुसुमीं लोला मृगांकानना ;
जेथें घेउनि सज्ज पुष्प धनु तें हिंडे मधूचा सखा,
ऐशा रम्य जनस्थळीं सुरसिका कैचें उणें हो सुखा ? ॥ ६ ॥

---

## आई आणि मूल.

मालिनी.

रुचिर हिरकण्या त्या कोंवळ्या दंतपंक्ती,
स्मित रुचिर मुखाब्जीं हांसतां शोभताती ;
भुर भुर उडताती केश त्या जावळाचे,
सुखकर न कसें तें तान्हुलें माउलीचें ? ॥ १ ॥
प्रियकर चिमण्याच्या बालवक्त्रांबुजातें,
वरि वरि वरि चुंबी वत्सला माउली ते ;
अमृतरस फिका तो ये न गोडी मरंदा,
किति तरि वदुं वाचे त्या सुतानन्दकंदा ! ॥ २ ॥
तनयसुखभरें ती मंगला लोल झाली,
कवळुनि बहु मोदें पाळणा बाळ घाली ;
मधुर मधुर " जो जो" बोलुनी गाय गाणीं,
त्रिजगिं न कवणा ती रंजवी मंजु वाणी ॥ ३ ॥
"इवलि इवलिसा दे, दे गले मामु माला,
करिति मति जिची हे बोबडे बोल लोला ;

स्तन निज तनया दे वत्सला नीलचैलें,
घनपिहितशशीसे झांकिते प्रेमलीलें ॥ ४ ॥

## शेतकरी.

शार्दूलविक्रीडित.

प्रेमें आजवरी तुवां पिकुनियां दीनांसि या रक्षिलें,
होतीं सेवित लेंकुरें मधुरशीं माते ! तुझीं तीं फळें;
पाटाचें जल थंडगार पिउनी आनंद होई तया,
आतां गे धरणी ! तुला धनिक हा आला बळें घ्यावया ॥ १ ॥
द्यूतीं लावुनियां पणासि तुजला नाहींच मीं हारिलें,
नाहीं दुर्व्यसनीं पडूनि, विकुनी निःशंक म्यां टाकिलें;
नाहीं घालविलें विलास करुनी माते ! न मी मातलों,
झालों बद्ध ऋणें मुकोनि तुजला मी दीन गे ! जाहलों ॥ २ ॥
पांचांचे शत, दोनशें, त्रिशतही झाले क्रमें पांचशें,
जैशी अग्निशिखा वनीं धुमसुनी ज्वाळा झणी वीतसे ;
माझी कापुनि मान आजि हरिलें या सावकारें तुला,
बाई ! जा धनिकाचिया करतलीं सोडोनियां मत्कुला ॥ ३ ॥

साक्या.

झालों निर्दय आजि खरा मी, देउनि तुज धनिका या ;
शंका न जया अनुपम शोभा, तव ही छिन्न कराया ॥ ४ ॥
तव बालांवरि कुठार पडतां, तळमळ करुनी बाले ;
स्मरशील मजला काय करूं मी ! माझें येथ न चाले ॥ ५ ॥
तरुवल्लीच्या हारी लावुनि, शोभविलें तुज बाले ;
मधुरमधुरसें गान जयांवरि, बसुनि खगांनीं केलें ॥ ६ ॥
बालार्काच्या तेजें होतें, चकमक बिंदु जलाचे
ज्यावरि, ऐसें आतां हिरवें, शेत गव्हांचें कैचें ? ॥ ७ ॥

हर हर ! हुरडा कैचा आतां, कैचा भाजीपाला ;
केविलवाणीं बाळें झालीं, हर हर ! या समयाला ॥ ८ ॥
अमुच्या गेहीं आलस्यातें, क्षणभरि नव्हता थारा ;
सान मुलेंही आणित होतीं, वत्सां हिरवा चारा ॥ ९ ॥
श्रमभारानें लवलों देखुनि, परम दयेनें भार्या ;
जपुनी खपुनी खुरपुनी वाहुनि, येई माझ्या कार्या ॥ १० ॥
चिमणा माळा, चिमणी गोफण, चिमणीं माझीं बाळें ;
चिमणीं शेतें रक्षण करितां, सुख बहु मजला झालें ! ॥ ११ ॥
मोटेंतुनि जें धो धो वाहे जल तें इक्षुवनातें ;
दुड दुड धांवत जाउनि द्यावें, बाळें चिमण्या हातें ॥ १२ ॥
शीतळ राईमधुनी गाई, बसुनी भाकरकाला ;
खाउनि करितां क्रीडा त्यांच्या, पार न आनंदाला ॥ १३ ॥
प्रसन्न कदली प्रफुल्ल बकुली, फुल्ललतासदनें तीं ;
वत्सांना जीं विश्रामाचीं, खचित स्थानें होतीं ॥ १४ ॥
निदाघसमयीं मंदपवन दे, सुख या स्थाना भारी ;
श्रीमंताचीं सौख्यें क्षण तैं, गमलीं दीन बिचारीं ॥ १५ ॥
येथचि रम्य शिलातल होतें, त्यावरी बैसुनी आह्मीं ;
गोड शिदोऱ्या खाउनि धालों, सुख तें नच सुरधामीं ॥ १६ ॥
श्रम करुनी जे क्षुधित, तयातें गोड शिदोऱ्या ऐशा ;
अशा मनोहर जागीं होतिल, अमृतप्रद नच कैशा ? ॥ १७ ॥
सोनें मोतीं शाल दुशाला कैच्या आह्मांपाशीं ?
रूप मनोहर असतां कां तें, इच्छिल हो कनकाशी ! ॥ १८ ॥
सुंदर कोमल कुसुमें गुंफुनि, नुसता हारचि घाली ;
तैं मत्कन्या क्षणभरि गमली वनदेवीची आली ! ॥ १९ ॥
आठवितां हीं सारीं सौख्यें, हृदय उलोनी जातें ;
हर ! हर ! कैसा दुःखद झालों, आतां मी अवघ्यांतें ॥ २० ॥

गल्या गायी बैलहि गेले, गेलीं वत्सें तींही;
स्वच्छंदें जीं बागडतांना, बघुनी सुख बहु होई ॥ २१ ॥

शिखरिणी.

अहा! गेले गेले सुफलित तरू, सुंदर फळें,
कशाचीं? बाळांनों मुठभरिहि तें धान्य न मिळे!
फुलें गेलीं, गेले सुरुचिरलतामंडप अहा!
धरायातें दांतीं तृणहि न उरे या क्षणिं पहा! २२ ॥

वसंततिलका.

लागे कलंक मजलागिं खरा अहा रे!
जीवा! त्यजोनि तनुलागिं निघोनि जा रे!
ऐसें वदोनि धरणीवरि अंग टाकी,
राखी तदा कवण शेतकऱ्यास शोकीं? ॥ २३ ॥

---

## मातेचें प्रेम.

शार्दूलविक्रीडित.

आहे पैल समुद्र, तत्तल तुवां बा काय रे पाहिलें?
किंवा तत्सिकताकणा निजबळें आहेस कां मोजिलें?
पाहें अंबर हें वरी, गणियली उंची तयाची तरी?
नाहीं? धिक्! गणिशी अगाध जननीप्रेमा कसा यावरि? ॥ १ ॥
आकाशीं प्रभुचा निदेश वरुनी राज्यीं तयाच्या फिरे,
त्या सूर्यासह दोन शब्द वदुनी आलास तूं काय रे?
स्वर्गीं इंद्रसभेंत तूं बघितलीं कार्यें सुरांचीं तरी,
नाहीं? धिक्! मग जाणशील जननी प्रेमा कसा यावरी ॥ २ ॥
पाहे तत्पर ते खपोनि जमवी रात्रंदिनीं जी मधा,—
ऐशी ती मधुमाक्षिका त्रिभुवनीं मान्या असे सर्वदा;

तीचे ते श्रम सर्वही बुधवरा आहेत तीकारणें,
मातेचे श्रम निष्कलंक अपुल्या बाळार्थची जाणणें ॥ ३ ॥

जाई तूं फिरण्या कुठेंहि जगतीं, भूगर्भदेशीं, जळीं,
जाईं उत्तरदक्षिणध्रुवपथें, वा तारकामंडळीं ;
नौकेमाजि बसोनियां जळनिधी ओलांडुनी जायरे,
प्रेमें वत्सलचित्र तें जननिचें संगें तुझ्या बा फिरे ! ॥ ४ ॥

प्रेमाचें अतिदिव्य कोमळ असें वारें बघूं पाहसी,
बुद्धीचे अति शुद्ध, सत्य अवघे सिद्धांत तूं मागसी ;
तूंतें शुद्ध, अगाध, वत्सल, असें बा पाहिजे चित्र रे ?
पाहे प्रेमळदृष्टि ती जननिची ! ब्रह्मांड जेथें भरे ॥ ५ ॥

ऐशी प्रेमळ दिव्यदृष्टि जग हें, निर्माण झालें जधीं,
तेव्हांपासुनि नीतितें शिकवुनी विद्वान् करी धीरधी ;
संता यापरि दुस्तरीं भवजलीं नौकाचि ती जाहली,
धन्या इच्छित कामदा त्रिभुवनीं ही कामधेनू भली ॥ ६ ॥

वायूच्या पटलीं, धरा तळवटीं, नीलांबरीं सारिखें,
शोभे ईश्वरवैभव ! क्षण सुधी जे पाहती कौतुकें ;
ऐसें अद्‌भुत तेज दे, करि कृपा ईशावरि जी भली !
धन्या प्रेमळदृष्टि ती त्रिभुवनीं ! धन्याचि ती माउली ॥ ७ ॥

---

# रा. ब. विष्णु मोरेश्वर महाजनी.

हे सुप्रसिद्ध कवि आणि ग्रंथकार पुणें येथें इ. स. १८५१ ह्या वर्षी जन्मले. हे जातीचे ऋग्वेदी कऱ्हाडे ब्राह्मण. ह्यांचें शिक्षण मुख्यत्वेंकरून धुळें आणि पुणें येथें झालें. इ. सन १८६६ नंतर डेक्कन कॉलेजांत गेल्यावर ह्यांस कविता करण्याची गोडी लागली. ह्यांनीं विविध विषयांवर बरीच कविता केली असून, ती 'विविधज्ञानविस्तार,' 'ज्ञानसंग्रह' वगैरे मासिकपुस्तकांतून प्रसिद्ध झाली आहे. ह्यांनीं आपल्या कवितांचा ' कुसुमांजलि ' नामक एक लहानसा संग्रह स्वतंत्र पुस्तकरूपानें छापिला आहे. प्रकृत ग्रंथांत घेतलेल्या स्फुट कविता त्यांतीलच होत. ह्यांची कविता प्रौढ व हृदयंगम आहे. हे कवि वऱ्हाडांत ' एज्युकेशनल इन्सपेक्टर' व कांहींकाळ आ. डायरेक्टर होते. त्यांची विद्वत्ता लक्षांत घेऊन सरकारांनीं त्यांस ' राव बहादूर ' ही बहुमानाची पदवी दिली होती. हे विद्वान कवी १९२३ सालीं वऱ्हाडांत अकोलें येथें दिव्हंगत झाले.

## हिमालयावर बसून केलेलें ईश्वराचें प्रातःस्तवन.

शार्दूलविक्रीडित.

बर्फानें असती पहा धवल जीं, मेघास जीं भेदिती,
आरोहून तया शिरावरि बसे हा शुक्र शुभ्रद्युति ;
वाटे स्नेह असे हिमालय ! तुझा अत्यंत त्याच्यावरि !
आहे योग्य तुह्मां, समानगुण जे त्यांचीच मैत्री खरी ॥ १ ॥

पृथ्वी

तुझ्या तनुवरि जरी अमित ओघ हे नाचती,
उड्या बहुत मारिती, बहुत खेळती, हांसती ;
तरी न सखया तुवां निज उदात्तता टाकिली !
कशी मुनिपरी अहा ! सतत शांतता सेविली ॥ २ ॥

तुझ्या प्रतितटीं तरू विविध उंच गेले पहा !
प्रभातसमयीं नसे पवन, शांत अत्यंत हा—
दिसे तरुसमूह हा जलनिधीपरी केवल,
समीर नसतां जयामधिं उचंबळेना जल ॥ ३ ॥
समीर गमतो मला परिसरी अहा धूमसा,
विभेदुनि तया कसा अचल वाढला उंचसा !
विचार करितां पुन्हा, नच विभेदिसी वाटतें,
सनातन तुझें खरें सहजधाम, दे शांतितें ॥ ४ ॥
अगा अचलनायका ! भय मनांत उत्पादिसी,
न भीति परि केवला, अमित शांतिही मानसीं ;
न दृष्टि ढळते जरी तुजवरूनि मोदाऽकरा,
तरी न मन हें तुला भजतसे, भजे ईश्वरा ॥ ५ ॥
गमे उदय पावतो रव मनोहर स्वांतरीं,
तशी मम विलासते हृदयिं मूर्ति तूझी खरी ;
प्रमोदभर मानसा विसरवी निजा चेतना,
घडेचि मग भावना त्रिजगदात्मरूपा मना ॥ ६ ॥
स्मरोनि विभुची कृपा नयन ढाळिती आंसवें !
मना ! तदुपकार तूं स्मरसि नित्य मोदोद्भवें ;
प्रमोद, उपकार, रे मधुर शब्दसंघीं वदें,
करीं मजसवें प्रभुस्तवन सानुमंता मुदें ॥ ७ ॥
तमासह तुझें निशीं सतत युद्ध शैलाग्रणी !
सहाय तुज तारका विखुरल्या नभः प्रांगणीं !
तुझें शिखर सेवितो उदय पावला शुक्र हा,
प्रभातरवि रंजवी तुज सुरम्य वर्णीं अहा ॥ ८ ॥
सखा अरुण बा तुझा तुजासि भेट देतो अधीं,
प्रकाशवृतसानुला तुज विलोकुनीयां सुधीं;

ह्मणे,—"दिवस पातला; उठुनि नित्य कर्मं करा,"
नियामक जनां खरा, नगवरा! स्तवूं ईश्वरा ॥ ९ ॥
अदृश्य रविच्या करां तव महाश्रयस्तंभ ज,
कुणीं खणुनियां धरा अचल रोविले? त्या भजें!
कुणीं विविधरंग हे—विनटतोसि ज्यांहीं—दिले?
वदें तुज दिले कुणीं नद, तुडुंबले जे जलें ॥ १० ॥
वदाल नद हो तुह्मी, स्रवतसां प्रवृद्धें मदें,
तमोमय दरींतुनी—जनन हें तुह्मां कोण दे?
कशा कठिण कातळांवरुनि इंद्रवज्राहता,
प्रसन्नजलनिर्भरें सतत या उड्या मारिता? ॥ ११ ॥
नसे खळ असा ध्वनी, धवलफेन भंगावली,
अखंडजल, वेगहा, अतुलशक्ति—कोणी दिली?
"इथें जलतरंगहो! स्थिर तुह्मी असा" हा कुणीं,
निदेश दिधला तुह्मां?—अचल जाहला त्या क्षणीं ॥ १२ ॥
नगा! तुजवरी किती हिममया नद्या सांचल्या!
मिळूनि नग जाहला अपर तो-नद्या गोठल्या!
तुझ्या शिखरिं आसरा नच तया मिळाला भला,
ह्मणूनि ढळला, परी प्रभुवचें मधें थांबला ॥ १३ ॥
प्रताप! सरिता! तुह्मां सतत शांतिदेवी वरी,
निशाकरकरीं अहा रजतसानुमानापरी;
तुह्मांस दिधला कुणीं धवलिमा? तुह्मां भास्—करें,
वदां कवण रंग दे! कवण मोद पुष्पाकरें ॥ १४ ॥
वदा "प्रभु" जलौघ हो! हिमशिला! प्रभूतें स्मरा!
नद्या "प्रभु" वदा तुह्मी! उपल हो! स्मरा ईश्वरा!
प्रपात! तव थोर हा रव, वदें प्रभूतें सदा,
भवन्मुखसमीर हा, सरल वृक्ष! ईशा वदा ॥ १५ ॥

अहो ! हिमनगोद्भवा कुसुमिता लतांनो स्मरा !
मुदें विचरतां तुह्मी गवय हो स्मरा ईश्वरा !
स्मरा जलद हो तुह्मी प्रभुवरा मनापासुनी !
सहाय तुमची सखी कानकगौर सौदामिनी ॥ १६ ॥
अगा अचलनायका ! प्रभुस पूजण्या साधनें,
समीप असती तुझ्या, भज तया प्रसन्नें मनें !
पवित्र जल घेउनी सुरनदी तटापासुनी,
करींच अभिषेक तूं, अगुरु चंदना चर्चुनी ॥ १६ ॥
स्वयें हरिणनाभिनें प्रभुस कृष्ण लावीं टिळा ;
सुगंधि सुममालिका ग्रथुनि घालि त्याच्या गळां ;
प्रसन्न विभुसी करीं, अगुरु धूप तूं लावुनी,
करील मग आरती जलदभाज सौदामिनी ॥ १७ ॥

## विश्वमंदिर.

शार्दुलविक्रीडित.

ईशें विश्व विशाल मंदिर पहा ऐसें कसें निर्मिलें !
शोभा दाखविण्यास हेर रुचिरीं द्वारीं उभे ठाकले ;
येती प्रेक्षक जे तयांस बघुनी ते वाहती सत्वरीं-
याहो, या जनहो विलोचनसुखा घ्या, या शिरा मंदिरीं ॥१॥
"याहो आंत, चमत्कृति किती ! द्या इंद्रियां तर्पण,
"नेत्रां चित्र मनोहराकृति, तसे श्रोत्रांस मंजुस्वन ;
"द्वारीं मात्र करा प्रणाम शिरसा त्या ईश्वरातें अधीं,-
"जो दे सर्व तुह्मां, तया स्तुतिसमां अर्पा तुह्मी हो सुधी "॥२॥

वसंततिलका.

येणेंपरी नमुनियां जन आंत जाती,
विश्वास पूर्ण धरुनी बहु सौख्य घेती ;

वाहे समीर, मकरंद हरी फुलांचा,
संताप सर्व शमवी म्हणिं मानसींचा ॥ ३ ॥

मालिनी.

श्रवणनयन धाले, लोटला मोदपूर,
हृदयिं विकसलें तें प्रेम-विश्वास थोर;-
नयनगतिहि तेणें बद्ध केली पुरा तें,
पटल गळुनि जातें, गूढ ना तें नरातें ॥ ४ ॥

स्वागता.

जें अगम्य मनुदृष्टिस होतें, विश्वकर्तृमुख आज दिसे तें ;
प्रीतिचा प्रभु असेच भुकेला, हा प्रसाद मनुजांवरि केला ॥ ५ ॥
जे न वंदिति पदांस विभूच्या, भावही न धरिती वरी त्याच्या ;
ते जरी प्रविशती सदनांत, त्यास हा सुखनिधी न मनांत ॥ ६ ॥

---

## माधवीचें पुष्प.

दिंड्या.

माधवीचें हें पुष्प डुले वातें, एकटें या वल्लीस शोभवीतें ;
इतर पुष्पें केव्हांच गळुनि गेलीं ! अहा गंधाची माधुरी निमाली ॥ १ ॥
नसे येथें एकही बंधु याला, नसे कलिकाही दुजी या लतेला ;
एकमेकांचा सुखस्पर्श होतां, हंसती सुमनें तो काल कुठें आतां ॥ २ ॥
रम्य सुमना ! ही दशा दीनवाणी, पाहुनीयां लोचनीं येइ पाणी ;
लतेपासुनि मी तुला खुडुनि टाकीं, नको होऊं तूं मग्न असें शोकीं ॥३॥
जेथ गेले त्वद्बंधु तेथ जाई ! सवें त्यांच्या तूं गाढ झोंप घेई !
जेथ लेपे तन्मूर्ति सुवासाची, तेथ विखुरीं पाकळ्या तुझ्या साची ॥४॥
असा होवो मद्विलय जयीं होतें, क्षीण मित्रत्व प्रेम लया जातें ;
शिथिल होती जैं प्रणयबंधनें तीं, सकल मित्रां यमदूत जयीं नेती ॥ ५ ॥

खऱ्या प्रेमाचें स्थान सखे जातां, पिता भ्राता सुत दार तशी माता ;
रहायाला इच्छील कोण मागें ! शून्य ऐशा या जगीं मला सांगें! ॥ ६ ॥

## सृष्टि

पद-( त्याचा हरिविकला-या चालीवर ).

डोळे निववूं या, निववूं या, सृष्टिस अवलोकूं या ॥ धृ० ॥
पाहूं पर्वतसानू , दीपवि ज्यांतें प्रथमचि भानू ॥ डोळे० ॥
जाऊं गंगाद्वारीं, प्राशूं तेथिल हिममयवारी ॥ डोळे० ॥
सेवूं सागर मोठा, जेथ नसे रत्नांचा तोटा ॥ डोळे० ॥
नलिका घेउनि हातीं, पाहूं रविची ग्रहमाला ती ॥ डोळे० ॥

## बालपण.

दिंड्या.

बालपणिंचे दिन रम्य किती हो ते ! मनीं आणुनियां सौख्य बहू होतें !
स्वैर फिरणें आवडे तया कालीं, रम्य पाहुनियां स्थलें दृष्टि धाली॥ १ ॥
देवमंदिरिं हरिकीर्तनासि जावें, कर्णयुगुलीं प्रभुभजन आयकावें ;
नदीतीरीं जाउनी मुलांसंगें, जलीं डुंबावें मुदित अंतरंगे ॥ २ ॥
विटी दांडू घेऊनि खेळ खेळूं , कधीं हुडसामा पाहुनियां वाळूं ;
कधीं बोरें जाउनी वनीं खाऊं, उड्या मारूं-गीतही कधीं गाऊं ॥ ३ ॥
कधीं जाऊं बाहेर कोसकोस, जेथ कोणाचा होत नसे वास ;
पुराणांतिल त्या देवदानवांच्या, गोष्टि सांगूं रणधीर मानवांच्या ॥ ४ ॥
कैकयीचें मात्सर्य ऐकुनीयां, चित्त रोषें हो क्षुब्ध न तें वायां ;
जनकवचनीं रत रामभक्ति दावी, चित्तशांता हो काय ती वदावी ॥ ५ ॥
गोष्टि ऐशा ऐकण्या असूं दंग, क्षणीं प्रेमळ—हृष्ट हो अंतरंग ;
गोड खाजें मन नित्य असें सेवी, मानसाची ती पुष्टि हो न केवी ॥६॥

दिसे सारें आयुष्य सुखाचें तें, थरारेना मानस क्रोधवातें ;
नसे ठावें तें दुःख कसें आहे, सदा चित्तीं तैं प्रेमपूर वाहे ॥ ७ ॥
परीहासें निष्कपट वर्तनांहीं, दिवस गेले मात्सर्य मनीं नाहीं ;
प्रतिक्षण जैं आनंद नवा आणी, उडे मानस आकाशिं खगावाणी ॥ ८ ॥
रमे पाहुनियां रम्य रम्य वस्तू, सर्व दिसती कीं रम्य नसे किंतू ;
किती उच्छृंखल बालपणीं हूप! अहा गेला सुखसिंधु बाल्यरूप ! ॥९॥
रवी अस्तातें जाय तेधवां मी, बसुनि शैलाग्रीं सूर्य बघें नामी ;
स्वस्थ बैसे मी पाहुनी निवांत, शुक्र राहे जों नभः प्रांगणांत ॥ १० ॥
विविध तारागण दीपवी नभास, गमे तो कीं मज साधुपुरुषवास ;
"जरी असते मज पक्ष उडायातें, म्हणे चित्तीं जातोंच त्या स्थलातें ॥११
पुनः येथें बैसोनि आठवीतों, पूर्वकाला–आनंद पुनः घेतों ;
करी जागें स्मृति नष्टसमुद्धारें, तदा परिचित जें वस्तुजात सारें ॥१२ ॥
पूर्व परिचित तीं स्थलें सर्व पाहें, चित्त विकसित आनंदरसीं पोहे ;
नयन युगुलांतुनि बाष्पपूर वाहे, ईशचरणीं अतिलीन बुद्धि राहे ॥१३ ॥

## साध्वीनदी ( रूपक ).

शार्दूलविक्रीडित.

साध्वी निर्झरिणी बघूनि नयनीं धालों मुदें मी किती!
शान्तातःकरणा, पवित्रचरणा, मंदा असे तद्गति ;
स्वानंदांत निमग्न मूढजन संमर्दा त्यजूनी दुरी,
लक्ष्मी मार्ग बरा, सदा, निजबलें विघ्नां समस्तां हरी ॥ १ ॥
जे जे ते करिते परोपकृति ते सौंदर्य तें पावते,
जाते जेथ तिथें मुदा वितरिते, आशीर्वचा लाभते ;
कैशीं निर्मलहृज्जलीं विकसलीं प्रेमांबुजें साजिरीं,
स्वर्गीचें प्रतिबिंब त्यांत पडलें–सत्वप्रिया गोजिरी ! ॥ २ ॥

## चंद्र.

शार्दूलविक्रीडित.

चंद्रा ! पांडुर कां असा ! गगन कीं आरोहतां भागसी ?
तारा या तुजसी प्रिया न गमती ? त्यांहीं न तूं मोहसी ?
रात्रीचें तम सारितां दुखरी कीं भागसी एकला ?
कीं कांहीं प्रिय ना दिसे ह्मणुनि हे वृत्ती तुझी चंचला ? ॥ १ ॥

## प्रियापेक्षिणी युवति.

पद.

अझुनि न येसी प्राणेशा, झालें तुजसाठीं विवशा ॥ ध्रु० ॥
गेला रवि तो अस्ताला, पक्षि न करिती किलबील,
काळ संध्या पट टाकी, सृष्टिस साऱ्या ती झांकी ॥ अझु० ॥
दिवसां विविधा व्यापारीं, व्यापृत राहति जे दूरी,
येती गृहास ते सारे, प्रसन्न होती सुखसारें ॥ अझु० ॥
सौधीं धनिकाची जाया, जाई काल जिचा वांया,
पतिशकटाच्या शब्दातें, उत्सुक परिसाया होते ॥ अझु० ॥
गेहीं कृषिकाची भार्या, वारुनि साऱ्या गृहकार्यां,
मार्ग पतीचा लक्षीते, घेउनि कडिये बालातें ॥ अझु० ॥
प्रियासमागम हंस करी, करिणी रिझवी यूथकरी,
येणेंपरि पतिपत्नींचा होय समागम इतरांचा ॥ अझु० ॥

## युवतीचा पश्चात्ताप.

वियोगिनी.

सुमनें फुललीं कशीं अहा ! अनुगोदातट या लतांवरी;
करिती मधुरा स्वना पहा, खरा मी केवळ खिन्न अंतरीं ! ॥ १ ॥
बसुनी विटपावरी खगा ! जरि गातोसहि गोड तूं मुदें;
मज तें न रुचे, रहा उगा ! हृदया वल्लभवृत्त दुःख दे ! ॥ २ ॥
स्मरतें दिन धन्य ते अतां, प्रिय खोटा कळला न जोंवरी;
फसलें प्रियभाषणीं रता ! वनिता सात्विकवृत्ति हो खरी ! ॥ ३ ॥
विहगा न सखीसमेत रे, विटपारूढ विहार तूं करीं !
बघुनी विहृती तुझी स्मरें, निजकेली सखया बरोबरी ॥ ४ ॥
कितिदां फिरलों तटानिकें, बघण्या वृक्षसमाश्रिताळता;
नयनोत्सव घेत कौतुकें, रमलों गीत तुझेंहि ऐकतां ! ॥ ५ ॥

माल्यभारा.

मग मीं खुडिलें गुलाबफूल, कबरीपाश सलील भूषवाया;
हिसके प्रिय तों करें दुकूल, सुमने कंटक मात्र ये करीं या ॥ ६ ॥

## रमणोपालंभन.

शिखरिणी.

अहा जेव्हां तूझी प्रथम सखया गांठ पडली,
किती तारुण्यांची तव तनुवरी कांति खुलली !
किती प्रेमाचें तें अकपट तुझें वर्तन दिसे !
गमे मातें चित्तीं तव किमपि कौटिल्य न वसे ॥ १ ॥
पुढें आलें ध्यानीं, अवचित तुझी बुद्धि फिरली,
परी वेडी आशा, करुनि मन म्यां घट्ट धरिली;

जरी झाला खोटा इतर युवतींना फसवुनी,
तरी वाटे माझा प्रियकर मला सत्यवचनी ॥ २ ॥
ठका! जाई आतां! तुजवर न विश्वास उरला!
असा खोटा नीच प्रथम मजला कां नुमगला!
अहा विश्वासातें धरुनि मन हें फार फसलें!
भलें मूर्खत्वाची कृति करुनि भग्नाश बसलें॥ ३ ॥
तुझीं खोटीं कर्मे स्मरुनि कटु बोले जरि जन,
तरी श्रोत्रीं ठेवीं कर, न समजे मी अवगुण;
ह्मणें किंवा सारे अवगुण पुढें होतिल गुण,
अहा वाटे खोटा युवतिस कसा आत्मरमण ॥ ४ ॥
तुझे स्नेही सारे पुरुषवचनीं ताडिति तुला,
अहा धिक्कारीती, तरिहि नच ये संशय मला!
तुवां जीतें आतां कपट करुनीयां फसविलें,
तुझ्यासाठीं त्या मीं असुहि असते साच दिधले॥ ५ ॥
ठका! जाई आतां दिवस समजे येइल असा,
सुखाचा जैं वाटे क्षणहि न धरावा भरंवसा;
कळोनी येईल प्रथम तुज तैं केंवि युवती,
प्रियाच्या धिक्कारें व्यथितहृदया दुःख सहती ॥ ६ ॥
सरे तारुण्याचा भर, तरि वयाचें फल न ये!
पहा स्नेही सारे त्यजिति तुज ऐशा अविनयें;
पुढें तूझ्या जे का स्तुति करिति, ते जाण अखिल,
तुझी निंदा मागें करिति! वद हें काय नवल? ॥ ७ ॥
पहा ज्यांच्या संगें रमुनि रजनी घालविसि रे,
खरा त्यांचा कैसा प्रणय? धन जातां अवसरे!
जरी वक्त्रीं हास्य प्रकट करिती प्रेम न मनीं,
विषा दुःसह्या या पय न समजावें बुधजनीं ॥ ८ ॥

ठका ! जाईं आतां तुजंजवळि राहि धन जरी,
समस्ता लोकींचें, तरि मज नको–स्वैर विहरीं !
कुबेराची संपद् जरि अनय कर्मे मिळविली,
सुखा लाभे कैसा जन, मति जयाची बिघडली ॥ ९ ॥
अलीका ! जाणें हें, अझुनि दिन येतील पुढती,
नवे हेही बंध प्रशिथिल जयीं तूज कळती ;
तुला माझ्यासाठीं अनुयश तयीं होईल किती !
वृथा मूढें त्यक्ता ह्मणशिल "सखी प्रेमलमति !" ॥ १० ॥
"विपत्ती येतां जी दृढ करुनि चित्तास बसती,
सुखीं दुःखीं जी कां निशिदिनिं समानाच असती ;
घरीं येतां कष्टी मधुर वचनीं दुःख हरिती,
पतीसाठीं देती असुहि निज, ती धन्य युवती!" ॥ ११ ॥
ठका ! जाई आता, परुषवचनीं अर्थ कसला !
तुला बोलोनीयां कवण फल लाभेल मजला ?
दशा कैशी झाली दुरित फल हें भोगुनि पहा
करी लज्जा काळें वदन ! न दुजें कष्टतर हा ! ॥ १२ ॥

## सुशील भार्या.

दिंडया.

दृष्टिविषया जेधवां प्रथम आली, मूर्ति मोदाची गमे मला आली !
नयनसुख कीं देण्यास पाठवीली, देवकुमरी पाहोनि दृष्टि धाली ॥ १ ॥
नेत्रकांती ती तारकासमान, कृष्ण कुंतल ते कृष्णरात्रिमान ;
परी जाणें तीं इतर सर्व अंगें, साव मधुनें निर्मिलीं कीं अनंगें ? ॥२॥
रूप अनुपम, लावण्य तयीं नाचे, मोह घाली ते भ्रमवि चित्त साचें ;
जाय तेव्हां हरुनीहि हृदय नेते, कशी स्त्रीची मोहनी कळों येते ? ॥३॥

रूप जैसें मन दिव्य गमे तैसें, कसा प्रणयें वदनेंदु तो विकासे !
सत्वशीला गति, धर्मपरा बुद्धि, मानसाची ही लाभलीच सिद्धि ॥ ४॥
सत्य भाषण, आचरण सत्य तीचें, मुखीं झळके प्रेमहि मानसींचें;
मला वाटे भवसागरा तराया, दिली देवें कीं हीच तरी जाया ! ॥ ५ ॥
क्षणिक दुःखें तीं बोध करुनि वारी, प्रणयकलहीं आणिते नयनिं वारी !
नर्मवचनें, स्मित मंद, मधुर वाणी ! असे सर्वांची अहा प्रिया खाणी ६
पूर्ण अवगत हो तिचें हृदय आतां, नसे अवतरली साच अशी कांता !
अतुलधैर्या, ती शांत सहनशीला, हो न कष्टी भोगितां दुःखमाला ॥७॥
दूरदृष्टी, औदार्य, विनय अंगीं, काय चातुर्ये शोभते कृशांगी !
निर्मिली ही संपूर्ण गुणनिधान, बोधवचनें करण्यास समाधान ! ॥८॥
जरी विसरे पति आपुला पुमर्थ, तरी आकळण्या त्यासही समर्थ;
देवकन्या जरि सांच भासताहे, स्वस्थचित्तें ती तरी दुःख साहे ॥ ९ ॥

---

## काल आणि प्रिया.

शार्दूलविक्रीडित.

मोठालीं सुरमंदिरें, नृपतिचे प्रासाद गेले लया,
मूर्ति छिन्नविभिन्न होउनि गता सोडुनिया स्वालया;
मोठे दुर्गम दुर्ग बांधुनि नृपीं केला धनाचा व्यय,
सारे ते पडले धुळीस मिळले सर्वांस लागे क्षय ! ॥ १ ॥
भक्षी नित्य तटासि सागर इथें संकोच पावे धरा,
गंगा सिंधु महानदी मिसळती पाहें इथें सागरा ;
जेथें नीर तिथें धरा, जल तिथें पूर्वी जिथें भूतटी !
वृद्धीनें क्षय वाढतां, क्षय करी वृद्धीस ही राहटी ! ॥ २ ॥
प्रत्येक क्षण चालतां क्षयविपर्यासासि पाहूनियां,
वाटे भीति·मनांत—काल लहरी नेईल माझी प्रिया !

ऐसा येउनियां विचार हृदयीं, मोठ्या विषादीं पडे,
जातां देईल दुःख जी, करगता होतांच ती ये रडें ॥ ३ ॥
पाषाणा न, न भूमिला, जलधिला, सोडी जरी हा क्षय,
सांगें कोमलपुष्पशा युवतिला त्याचें न कैसें भय !
कालाचे सतत प्रहार कुसुमप्रांता कसे सोडिती ?
संचूर्णा करितीहि जे घनशिला लोहासि निर्दाळिती ! ॥ ४ ॥
कोठें सुंदर रत्न हें लपविणें ? मंजूषिका कोण ते ?
जीमाजीं दडलें न रत्न गवसें कालाचिया दृष्टितें ?
मागें ओढिल कोण तच्चरण जो सौंदर्य पुष्पा चुरी ?
हें सामर्थ्य असे कशांत न कळे काव्यांत नोहे जरी ! ॥ ५ ॥

---

## कालमाहिमा.

शालिनी.

कोठें गेले थोर पृथ्वीपती ते ? सांगा गेले शूर कोण्या गतीतें ;
झाले गेले मृत्युपंथेंचि सारे ! कां देखाना सर्व कीं हें असारें ॥ १ ॥

शार्दूलविक्रीडित.

त्यांची ती रणकीर्ति शत्रुहननीं, उद्दाम तें वर्तन,
त्यांचे ते मुशलापरी भुज, जयां भ्याले अरींचे गण ;
त्यांचा तो घनघोर शब्द–चढवी आंगीं रणाची रती,
तीं आरक्त विलोचनें सकलही झालीं कथामात्र तीं ॥ २ ॥

वृत्तवैचित्र्य.

नांम काल तें थोर वाटलें, सुकृतिकीर्तनीं कर्ण कोंदले,
आज नष्ट तें, होय विस्मृती ! कीर्ति लोपली काल भक्ष्य ती !
तिमिर झांकिता गगनमंडला, तुटुनि अंबरीं क्षण झळाळला,
केतु दीपवी जनावलोचना, बों गिळी तया तम, विरोचना ॥३॥

नर हा किति दुलभ पाहे, क्षणभंगुर जीवित आहे,
नरदृष्टि असे किति कोती, किति तो भ्रमला गणगोती !
किति गर्वभरें तो मनिं फुगला, क्षण एक असे बुद्बुद तगला !
चिरकीर्ति ह्मणे मी मिळवीन ती, रविचंद्र नभीं जोंवरि तपती॥४॥

स्रग्धरा.

मोठाल्यीं देवळें तूं धन वितरुनियां बांधसी आस ही कीं,
राहो माझी सदाही अभिनवरुचिरा कीर्ति साऱ्या त्रिलोकीं !
रे मूढा ! कीर्ति कैशी अमर विलसते, मर्त्य तूं नाशवंत !
कोटीचीं कोटि वर्षें क्षणसम गमती काल आहे अनंत ॥ ५ ॥
पाहें हा भूमिभागीं उलथुनि पडला स्तंभ मोठा जयाचा,
चौबाजूंनीं जयाच्या विलिखित दिसतो लेख चारी लिपींचा;
सांगे तूं अर्थ याचा, नृपति कवण तो, कोरिला हा जयानें ?
भाषावेदी विवादा करिति ह्मणति, 'हा अर्थ' ऐसें हटानें ॥ ६ ॥

शार्दूलविक्रीडित.

गेला तो नृपती ! तदन्वय तसा ! सामंत कोठें अतां ?
त्याची ती नगरी सुरम्य वनिता झालाहि वाताहता !
मेलें वैभव ये फिरूनि कसचें ? तो काल गालीं हंसे !
कालाचा महिमा अगाध समजे तद्भक्ष्य सारें असे ॥ ७ ॥

---

## मातृविलाप.

पृथ्वी.

कुठें विचरतो वनीं सुत मदीय ?–सांगा कुणी !
कुणास तरि मी पुसूं ?–मज दिसेल कीं तो गुणी ?
सुता ! फिरुनि ये घरा–धन तुझें नको तें मला !
न वृत्त कळलें तुझें–कुशल, कीं गदें पीडिला ॥ १ ॥

अनिष्ट घडलें जरी, विधिकृपा उरे तीच ना,
तरीहि कळवा मला,-बुध तुह्मां करी याचना!
अहर्निश मनीं झुरें, हृदय काळजी जाळिते!
अकीर्ति बरवी नव्हे-मरण गोड तें वाटतें! ॥ २ ॥
नसे परिसलें मुळीं तनयवृत्त वर्षे सहा!
असे मजासि एकला-मम दशा किती दुःसहा!
धरीं हृदयिं आस कीं-"सुत पुन्हा घरीं येइल"!
निराश जरि जाहलें, मम फिरोनि तें गोंविल ॥ ३ ॥
जरीहि फसलें अहा! फिरफिरुनि आशाभ्रमें,
तरीहि धरितें पुन्हां,-मृगजलार्थि वायां भ्रमें;
सुता असासि तूं जरी, नयन एकदा नीववीं!
असेन अपराधिनी,-परि कृपा करी-जीववीं ॥ ४ ॥
गुणी गुणिगणीं असे, युवजनीं सुरम्याकृति,
सुशील, कुलभूषण, प्रचुरधैर्य, शिष्टाकृति;
प्रसन्नमन, सत्त्वधी, अविमलीं कुलीं जन्मला,
नसे किमपि तें उणें; जरठयष्टि तो हो मला ॥ ५ ॥
रडे शिशु जयीं तयीं जननिला कसें वाटतें,
कळे न इतरांसि तें-मन तिचें कसें क्षोभतें;
प्रहार अति तीक्ष्ण, तें रुदितशस्त्र मर्मी करी,
पुन्हां प्रणय जोडितो मन विदीर्ण झालें जरी ॥ ६ ॥
"मला त्यजुनियां सुता! कवण देश तो सेविला?"
"असा छळिसि कासया!-वदन काय मी वत्सला?"
अहा! तुजसि दूषिलें बहुपरीं अशा उक्तिंहीं,
ह्मणूनि जळतें मनीं-तनुसि न्हाणितें अश्रुंहीं ॥ ७ ॥
महापदिं चढूनियां विभव लोपलाही जरी,
अकिंचनहि तूं जरी, तरि न बा विषादा धरीं!

न मातृगृहिं यावया प्रियकरा ! भयातें वरी !
नको ! धन नको मला ! विभव-हौस झाली पुरी ॥ ८ ॥
किती विहग धन्य ते ! उडति पक्षयोगें नभीं,
सुखें विचरती वरी, दचकवी तयांतें न भी ;
क्षणांत निजनीड ते अवतरूनियां गांठती,
धरोसि खिळलों अह्मीं ! तव पडे कशी गांठ ती ॥ ९ ॥
न ये मज उडों नभीं, तुजसमीप येऊं जरी,
प्रभूप्रति करद्वया जुळुनियां विनंती करी ;
"कुठेंहि असला जरी तनय तूं तया रक्षणें !
"तुला न करुणा, तरी शरण कोण. तूझ्याविणें ?" ॥ १० ॥
असेल मम सूदिला तनय काय कीं बंधनीं ?
मृगेंद्र, जठरीं न कीं कवल जाहला तो वनीं ?
पयोदधिगुहा न कीं निजसुहृत्सवें सेविल्या ?
अशा विविध संशयीं दिवस, यामिनी, लोटिल्या ॥ ११ ॥
न नीज नयनांस ये जरिहि त्यास पाहूं क्षणें—
उपाय न सुचे मला-विफल साध माझें जिणें !
मनीं उठति कल्पना बहुविधा-भयें कांपतें !
धनां अगनग, पुसें निरविती न चिंतेस ते ! ॥ १२ ॥
जनांस करुणा नसे, जगहि शून्य भासे मला,-
कुणी न मज सांगती मम कुठें असे तान्हुला !
जनीं अपरिहार्य तें, विभजतां नये दुःख जें,
प्रभो ! पुरविं आस ही-शरण यें-तुला मी भजें ! ॥ १३ ॥

## मित्रवियोग.

वसंततिलका.

“ आहेत मित्र दुसरे–मरण्यासि आले
सारे–न शोक बरवा” मज एक बोले;
सर्वां वियोग घडतो-कळतेंचि मातें–
सारे परांस बरवे उपदेशदाते ॥ १ ॥
सर्वां घडे ह्मणुनि काय न दुःख दे तो ?
मातें वियोग परि तापद फार होतो !
नाहीं असा नर, जयासि वियोग नाहीं–
नाहीं असा दिन न दुःखद जो कुणांही ॥ २ ॥
ताता ! तुझा सुत असे रणधीर शूर;
आयुष्य चिंतिसि तया–तव भक्ति थोर !
संपे न चिंतनचि तों झणिं अस्त्रदग्ध
होई तुझा तनय, जो समरीं विदग्ध ! ॥ ३ ॥
माते ! प्रभूसि कर जोडुनि आळवीसी,
“ येवो मदीय सुत तो कुशली घरासी !
माथा न जों उचलिसी, तंव ते तयाला,
अब्धींत लोटिति अहा ! झषभक्ष्य झाला ! ॥ ४ ॥
होणार दुःख पुढचें नकळे नराला,
मातें न दूषण जस, न तसें तुह्माला;
केला तदा बहु विचार तुह्मांसमान,
सांगेन, हें कवन दाविन, तोषवीन ॥ ५ ॥
येईल आज परतोनि सुहृद् घराला,
ऐसा विचार मनिं मी बहुवार केला;

मार्गी दिनानुदिन मानसदूत गेला,–
आणावया निजगृहा सुहृदुत्तमाला ॥ ६ ॥
गे सुंदरी ! स्वकच विंचरिसी प्रमोदें,
पाहूनि रूप मुकुरीं ह्मणसी विनोदें ;–
" हें वल्लभा करिल तुष्ट न काक बाई ?"
आशा सुधा तव असे ! करितेस काई ? ॥ ७ ॥
" जामात येतिल घरा ह्मणुनी तयारी,
ठेवा " वदे जनक, हो तुज हर्ष भारी ;
" हें आवडे पतिसि, हें न रुचे तयांना "
ऐसें वदूनि करितेस पदार्थ नाना ॥ ८ ॥
" दृष्टी पडेल जरि हें, सुख पावतील"–
ऐसा विचार करितो नयनें विलोल ;
केशावरूनि फिरवी कर हृष्ट नारी,
पाहे फिरूनि मुकुरीं पदरासि सारी ॥ ९ ॥
जों दर्पणीं मुख बघे नयनाभिरामा,
तों तोडितो हतविधी पतिजीवदामा ;
मार्गीं नदी उतरतां बुडला विलोकीं,
अश्वावरूनि पडुनी मृत जाहला कीं ? ॥ १० ॥
वांचूनियां युवतिला वद काय आहे ?
माझेंहि काय उरलें मज सांग बाहें !
वैधव्य आमरण तें युवतीसि जाळी,
मित्रप्रणाश–शर हा भिनला जिव्हाळीं ! ॥ ११ ॥

---

## उदरंभर.

पद.–( संतपदाची जोड–या चालीवर ).

वांचुनि केलें काय, अभागी वांचुनि केलें काय ! ॥ धृ० ॥
परोपकारासाठीं झिजला नाहीं हा तव काय ! ॥ अभा० ॥

केवळ अपुलें हित साधाया? केले निंद्य उपाय ! ॥ अभा० ॥
स्वोदरपूरण याहुनि कांहीं अन्य नसे व्यवसाय ! अभा० ॥
अनन्यभावें नाहीं भजले, देवाजीचे पाय ! ॥ अभा० ॥
बहुविध पापें केलीं आतां, होइल कोण सहाय ! अभा० ॥ १ ॥

## धन्यनर.

वसंततिलका.

शोधी स्वयें सकल तत्त्व विचारयोगें,
पोठे असें ह्मणति यास्तव घे न मागें ;
सत्याविणें इतर ज्यास नसेच वर्म,
तत्त्वावबोधरत जो त्यजितो न धर्म ॥ १ ॥
जो इंद्रियां वश नसे, मरणा न जो भी,
निंदा नसे प्रिय, तरी स्तुतिचा न लोभी ;
मोठ्या पदासि चढला पर पाहुनीयां,
हर्षे मनीं भरतसे, न करी असूया ॥ २ ॥
व्याजस्तुतीहुनि असे वच दूर ज्याचें,
(जीच्यासमान न मनीं परशल्य जाचे ;)
धर्माहुनी इतर नीति नसे जयाची,
जो वाट सेवि नच राजमता नयाची ॥ ३ ॥
छिद्रें न जो परिसतो इतरा गृहींचीं,
जो आत्मसंमतपथास न सोडितोची ;
ज्याला अहंकृति शिवे नच ती स्तुतीहि,
यन्नाशसाधनिं न लाभ जनांस कांहीं ॥ ४ ॥
जो ध्यातसे निशिदिनीं पद ईश्वराचें,
निष्काम भक्तिरत मानस तें जयाचें ;
जो नित्यकर्म विचरूनि दिनावसानीं,
मित्रासवें अनुभवी सुख काव्यगानीं ॥ ५ ॥

आशा न बद्ध करितेच तया नराला,
लोकीं निराश मन दूर करी भयाला;
आत्मप्रभु, प्रभु जरी, नच भूमिकेचा,
जोडी अकिंचन जरी, परमार्थ साचा ॥ ६ ॥

त्यालाच धन्यनर सत्य सदा वदावें,
त्याचेंच आचरण निर्मल आचरावें;
त्याचेंच शिक्षण वरूत समस्त लोकीं,
त्याचेंच सौख्य विलसे जगतीं विलोकीं ॥ ७ ॥

---

## शांति.

वंशस्थ.

निशा प्रभाता, जग शांत हें अती, विषण्ण चित्ता सुख दे पहा किती !
अबाधिता शांति कशी विराजते, फलावपातें क्षण एक मोडते ॥ १ ॥
वसे वनीं कुंजनिकुंज–भीतरीं, दलांवरी मौक्तिकशा दंवावरी;
सुशुभ्र त्या कौलिकजालकांवरी, जया सुवर्णी नटवी रवी करीं ॥ २ ॥
प्रशात तें तेज वनान्त लोभवी, फलीं विनम्रा तरुनांहि शोभवी;
नदीतटीं त्या कुटि दाट थाटल्या, गिरींद्रभू उंच लहान भासल्या ॥३॥
समीर हा शांत असे, जसा मुनी, न पान हाले पिंवळे पडे वनीं,
समुद्र हा शांत, न वीचि हालती, प्रशांत ये व्योम वरूनि खालती ।४।
प्रशांत झाला मम मित्र हा कसा ? फिरूनि देतो सुख लोचनां कसा ?
ह्मणूनि ये शांति मदीय मानसा, निराश होतां वद शोक कायसा ॥५॥

## जीवितसार.

फटका.

नका गड्यानों ह्मणूं तुह्मी हो " वाचुनि नाहीं फल काहीं "—
उद्योगाला विमुख असे नर, जिवंतही तो मृत पाहीं ॥ ध्रु० ॥
असार जरि या भासति वस्तू, आहे सार तया माजीं—
इह लोकींचे जन्म नका रे दवडूं वायां, व्हा गाजी
माया नोहे तत्त्व असें हें, खरें सांगतो परिसा जी !
" आपण मेलों, लोक बुडाला," ऐसें ह्मणती ते पाजी;
देहा त्यजुनी गेलीं जरि तीं, मिळलीं होतीं भूतें जीं,
अखंड आत्मा नित्य राहतो, सत्कर्माला व्हा राजी;
सुखदुःखाचा केवळ अनुभव घ्याया जीव दिला का जी ?

प्रभुची इच्छा ही नाहीं,
प्रसन्न तो सत्कर्मीहीं;
भजा तयाला लवलाही
स्नान करा नयपरिवाहीं,—

दिवसें दिवसें सुकृतें जोडा, बरवी यापरि गति नाहीं ॥ नका० ॥ १ ॥

आयुष्याचा काल चालला, अजूनि डोळे उघडांना,
करणें आहे विहित किती तें ? अगाध शास्त्रें तीं नाना !—
शक्ति अतुलही आहे अमुची, धरूं नका या अभिमाना,
कृतांत दूती जरा न कळतां घेउनि जाइल अवसाना !
उठा गड्यानों लवकरि खालीं घालुनि बसतां कां माना ?
तुह्मां न हें हो साजे, साजे गतानुगतिकां इतरांना ;
संसाराच्या समरीं ठाकुनि उभे दंड कां ठोकांना ?

"पुढचा येईल काळ बरा"
आणा मनिं, तरि मोह खरा!
गेल्याचा नच शोक करा–
गेलें सारें तें विसरा!
आतां खटपट करा, असू द्या मन आणि प्रभु हे ग्वाही ॥ नका०॥२॥
थोर पुरुष जे होउनि गेले त्यांचीं चरितें बोधविती–
सर्वांनांही करितां येइल अल्पायासें थोर मति,
घेतां येइल सत्पथ; तेणें पुढचे जातिल लोक किती!
संसारार्णव कल्लोलांहीं विक्लव होती पुरुष अति,
सत्पथनौके माजीं बसुनी दुस्तर सागर हा तरती,
धैर्यें भारीं विघ्नें पळती, अंतीं लाभे साधुगति,
थोरांचा हा महिमा गाती, प्रेमें सत्कवि करुनि कृति.
उत्साहानें कर्म करूं,
यश देणारा प्रभु स्मरूं,
सिद्धि न होतां धैर्य धरूं,
विघ्नें तो जगदीश हरू!
आपण अपुलें कर्म करावें, चिंता सारी प्रभु वाही ॥ नका० ॥ ३ ॥
नका गड्यानों म्हणूं तुम्ही हो "वाचुनि नाहीं फळ कांहीं"

# पांडुरंग व्यंकटेश चिंतामणिपेंठकर

हे वक्ते आणि कवि इ. स. १८५१ ह्या वर्षी जन्मले. हे जातीचे देशस्थ ब्राह्मण. चिंतामणिपेंठ येथें ह्यांचे वडिलोपार्जित जोशीपणाचें वतन असे. ह्यांचे तीर्थरूप चिंतामणिपेंठेहून पुण्यास नोकरी मिळविण्याच्या हेतूनें आले. त्यांस तेथें 'रेव्हिन्यू कमिशनर' यांच्या कचेरींत कारकुनीची जागा मिळाली. पुढें ते कराची येथें दफ्तरदार नेमिले गेले. परंतु त्या जागेचा त्यांनीं राजीनामा दिला. त्यावर त्यांना भोर संस्थानांत कारभाऱ्याच्या हुद्यावर नेमिलें. पण ते लवकरच पुणें येथें येऊन कैलासवासी झाले. तेव्हां प्रस्तुत कवि सुमारें १३ वर्षांचे होते. नंतर ह्यांच्या अनाथ मातोश्रीनें ह्यांचें संगोपन करून त्यांनां शिक्षण दिलें. इ. स. १८६८ सालीं हे प्रवेशपरीक्षेंत उत्तीर्ण झाले. तेव्हां संस्कृत भाषेंतील हुशारीबद्दल ह्यांस जगन्नाथ शंकरशेठ यांचें विद्यावेतन मिळूं लागलें. इ. स. १८७२ च्या जान्युआरी महिन्याच्या २१ व्या तारखेस ह्यांना धारवाड येथील 'हायस्कुलां'त उपशिक्षकाची जागा मिळाली. नंतर इ. स. १८७४ सालीं हे बी. ए. झाले. इ. स. १८७६ त हे कानडी भाषेचे भाषांतरकार ह्मणन नेमिले गेले; व पुढें इ.स. १८७७ व ७८ ह्या वर्षी अनुक्रमें धारवाड बेळगांव येथील 'डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टरा'चे हुद्यावर ह्यांच्या नेमणुका झाल्या. परंतु दुर्दैवानें ह्यांचें आयुष्य कमी होऊन हे बेळगांव जिल्ह्यांत निपाणी येथें इ. स. १८७९ च्या फेब्रुआरी महिन्याच्या ८ व्या तारखेस निवर्तले. तेव्हां ह्यांचें वय सारें २८ वर्षांचें होतें. तथापि, एवढ्या अल्पवयांत ह्यांनीं मराठी, कानडी, संस्कृत, गुजराथी, उर्दू व इंग्रजी इतक्या भाषांचें अध्ययन केलें होतें. त्यांत मराठी व संस्कृत भाषेंत ह्यांचा अधिकार फार मोठा असे. सारांश, हे बहुभाषाकोविद आणि अस्खलित वक्ते असून मराठी भाषेंत एक नामांकित कवि होऊन गेले. ह्यांनीं 'गंगावर्णना' म्हणून एक सरस आणि सोज्ज्वल काव्य केलें आहे. त्यांतील वाक्प्रवाहांत उदात्त रसाच्या लहरीवर लहरी उसळत असून त्या स्वदेशाभिमानाच्या सूर्यप्रकाशानें सारख्या चकाकत आहेत ! त्या काव्यास दक्षिणा प्राईझ कमीटीनें ४०० रुपयांचें बक्षिस दिलें होतें. ह्यावरून त्याची योग्यता किती आहे, ती सहज दिसून येईल. दुर्दैवानें प्रस्तुत काव्यांतील दोनच वेंचे आम्हांस उपलब्ध झाले,-

# कनोज.

श्लोक.

जी वैभवश्री निज पूर्वकालीं, होती जनीं विश्रुती ती निमाली;
मौर्ख्ये स्वताच्या ह्मणऊन चित्तीं, जणो त्रपेची उपगून वृत्ती ॥ १ ॥
प्रच्छन्नअर्धाधिकभूमिपृष्टीं, पुढें दिसे हें पुर कोण दृष्टी?
अहा! अतां आठवलें! जयेनें, प्राचीनकाळीं बहुमान्यतेनें ॥ २ ॥
हें शासिलें भारतवर्ष जाणा, ती हे कनोजाख्यपुरी पुराणा!
पहा! किती दैवगती विचित्र! किती प्रभूचें अवितर्क्यसूत्र ॥ ३ ॥
रंका करी राय पहा क्षणानें! रायासही रंक तयाच मानें!
हें एकदां भारतखंड सारें, जिच्यापुढें फार भयें थरारें ॥ ४ ॥
तीच क्षितीमाजि पुरी अतां हे; जगीं त्रपेनें दडण्यास पाहे!
जेथें पुरा राहियला नृपाचा, प्रासाद विस्तीर्ण मनोज्ञ साचा ॥ ५ ॥
तेथें अतां निर्भय जंबुकास, करावया फावतसे निवास
सौंदर्यगर्वेंचि जणों नभांत, ज्या आपुली उंच शिरें करीत ॥ ६ ॥
इमारती त्या बहु जीर्ण झाल्या, आतां धुळीस दिसती मिळाल्या.
लागून गंगे! तव तीर भागा, जेथें पुरा फार सुरम्य बागा ॥ ७ ॥
रहात कीं संप्रति त्या स्थळातें, हे व्यापिती कंटकवृक्ष मातें!
जेथें पिकांच्या मधुरध्वनीतें, ऐकोनियां कामिजनांत मात ॥ ८ ॥
स्मरव्यथा, सांप्रत त्याच वृक्षीं, घूत्कारशब्दा करि घूकपक्षी.
जेथें पुरा वारवधूजनाचें, चाले सदा सुस्वर गान साचें ॥ ९ ॥
तेथें अतां कर्कश फार देतें, शिवारुत श्रोत्रपथव्यथेतें;
विलासिनीपीनपयोधरांच्या वरून माळा रुळल्या जयांच्या ॥ १० ॥
लतांवरी तींच अता प्रसूनें, छेदाविना कोमेजती उन्हानें.
या एकदां विस्तृत पत्तनाला, या रीतिची हे स्थिति यावयाला ॥ ११ ॥
कांहीं न औत्पातिक हेतु झाला, भूकंप विद्युत्पतनादि घाला.
हे कान्यकुब्जाख्य पुरा वस्ताच्या, मौर्ख्येंचि तूं निश्चित यापरीच्या १२

स्थितीसि आलेंस नसे तयाचा, कोणाहि अन्यावरी दोष साचा.
लोभामुळें घोर विपाक जे कीं, घडून येतात असंख्य लोकीं ॥१३॥
ते सर्वही शोच्य तुझी दशा हे, दृष्टीपुढें मूर्त उभारिताहे.
राठोडवंशांत विशुद्धधामा, जो भूप झाला जयचंद्र नामा ॥ १४ ॥
त्यानें, दुज्या भूपतिंची असूया, वाटून चित्तीं, द्रुत राजसूया
प्रारंभ केला मग त्या मखाला, नानापरींच्या सदुपायनाला ॥१५॥
घेऊन संगें नृप सान थोर, आले तदाज्ञेसरसे अपार.
परंतु दिल्ली पुरनाथ वीर राजा पृथू जो रणरंगधीर ॥ १६ ॥
त्यानें, स्वशक्ति स्वपराक्रमानें, रक्षावयाच्या दृढ निश्चयानें ;
युद्धांत त्या सर्वहि भूमिपातें, ससैन्य नेऊन पराजयातें ॥ १७ ॥
अंतीं जयश्रीसह चारुगात्री, हरून नेली जयचंद्रपुत्री.
हा जो स्वताचा अपमान झाला, त्याचा प्रतीकार करावयाला॥ १८॥
स्वपक्षसाह्या जयचंद्र यानें, बोलाविला, फारचि मूढधीनें;
म्लेंच्छ प्रतापी गझनीपतीचा, भ्राता शहाबुद्दिन नाम साचा ॥१९॥
येऊन तो सत्वर पारिपत्य, करून राजा पृथूचें स्वकृत्य.
सारें अटोपून पराभवातें, नेऊन राजा जयचंद्र यातें ॥ २० ॥
गंगातटप्रांत समस्त आंगें, जिंकून गेला स्वपुरास मागें.
तेथें तयाच्या अनुयात्रिकांनीं, ज्या घोर केल्या कृति त्या स्वकानीं२१
येतां क्षणीं भीतिविहस्त सारें, शरीर रोमांचभरें थरारें !
सुपीक-संपन्न धनाढ्य देश, लुटून केलें वननिर्विशेष ॥ २२ ॥
स्वातंत्र्यरक्षा दृढनिश्चयानें, जे आड आले बहु शूरतेनें,
त्या सर्व हिंदूंस अघापहारा, देहान्तनिष्कार कृपाणधारा ॥ २३ ॥
—तीर्थांत देवोन सर्व तयाला, मार्गस्थ केलें यमपत्तनाला.
ज्यांच्या यशें भूतल सर्व राजे, असेहि केले पदहीन राजे ॥ २४ ॥
तुझ्या सुसंपन्न पुरी विशाला, मोडूनियां मेळविल्या धुळीला;
पवित्र मोठींहि मताभिमानें, देवालयें बाटविलीं हटानें ॥ २५ ॥

उद्गध्रुवासन्नहिमप्रदेशीं, सारा हिंवाळाभरि बर्फ–राशी
खालीं समाच्छन्न बसून येतां, पुन्हां वसंतर्तु सुसौख्य देतां ॥ २६॥

जसे वृक क्षीणबळ क्षुधेनें, पडून बाहेर निजप्रतेनें;
करून विध्वंस बहू सभोंती, पीडा जनातें अनिवार देती ॥ २७ ॥

तशा इथें म्लेंच्छमतानुगांनीं, केल्या महा दुष्कृति ज्या करांनीं;
त्यांच्यांतलें क्रौर्य बघून सर्व, होती पशू क्रूरहि भग्नगर्व ॥ २८ ॥

स्वभावदुष्टत्वबळें करीती, जें श्वापदें क्रार्य अनेकरीती ;
न त्यांत त्यांचा अपराध साची, स्वाभाविकी वृत्तिच ती तयाची २९.

परंतु ज्यांची सदसद्विचार, शासी सदा ते नरही अपार
होती पशूहून नृशंस त्यांतें, पाहोन कीं खेद गमे मनातें ॥ ३० ॥

# कृष्णाजी नारायण आठल्ये.

हे सुप्रसिद्ध ग्रंथकार आणि कवि जिल्हा सातारा, तालुके कऱ्हाड, मौजे टेंभू येथें इ. स. १८५२ (शके १७७४) सालीं जन्मले. हे जातीचे काश्यप गोत्री कऱ्हाडे ब्राह्मण. ह्यांचे तीर्थरूप वे. मू. नारायणभट हे चांगले दशग्रंथी विद्वान् असत. त्यांनीं ह्यांजकडून लहानपणीं वेदाभ्यास करविला. पुढें बरेंच प्रौढ वय झाल्यावर ह्यांनीं स्वावलंबनानें परिश्रम करून प्रवेश परीक्षा दिली; व पुणें येथील 'ट्रेनिंग कॉलेजांत' अभ्यास करून त्यांत ते उत्तीर्ण झाले. नंतर हिंगणगांव, कऱ्हाड व अष्टे वाळवें, येथील मराठी शाळांतून ह्यांनीं शिक्षकाचें काम केलें. परंतु शेवटच्या गांवीं असतां, तेथील मुख्य शिक्षकांचें व ह्यांचें जमेनासें होऊन ह्यांनीं आपल्या नोकरीचा राजीनामा दिला. नंतर हे मुंबई, सातारा, बडोदें, वगैरे बऱ्याच ठिकाणीं फिरले; आणि आपली चित्र-कला दाखवून ह्यांनीं अनेक श्रीमान् लोकांकडून बक्षिसें व आश्रय मिळविला; पण हे कोठेंही स्थायिक झाले नाहींत. शेवटीं हे मलबारांत कोची येथें गेले; आणि तेथील कित्येक सद्गृहस्थांच्या सहानुभूतीनें, उत्तेजनानें व उदार आश्र-यानें ह्यांनीं 'केरळकोकिळ' नांवाचें एक मासिक पुस्तक काढिलें. तें लोका-दरास चांगलेंच प्राप्त झालें. ह्या मासिकाच्या द्वारें सदरहू कवींचें कवित्व आणि इतर लेखनचातुर्य लोकविश्रुत होऊन त्यांना "महाराष्ट्रभाषाचित्रमयूर" असा बहुमानाचा किताब श्री शंकराचार्यांकडून देण्यांत आला होता. प्रस्तुत ग्रंथांत ह्या कवींच्या नांवाखालीं असलेल्या बहुतेक स्फुट कविता त्यांच्या केरळकोकीळ मासिकांतून घेतल्या आहेत. रचना सुगम असून तींत शब्दलालित्य ओतप्रोत भरलें आहे. हे कवि सन १९२७ सालीं पुणे मुक्कामीं दिव्यंगत झाले.

---

## सासरची पाठवणी.

शार्दूलविक्रीडित.

आलें मूळ ह्मणोनियां प्रथम जैं कन्या निघे सासरीं,
माता घालुनि भूषणें ह्मणतसे सांभाळ तोडे सरी ;
भालां कुंकुम लावुनि फळ नवें ओटीमधें घातलें,
बाला सद्गद होय अश्रुजलही गालांवर पातलें ॥ १ ॥

मंदाक्रांत.

‘ आई येतें ’ हळुच वदली, शब्द कांहीं फुटेना,
मातृप्रेमा मृदुतरमना यत्न केल्या सुटेना ;
मातेलाही गहिंवर फुटे कंठ आला भरून,
स्नेहें सांगे मधुर वचनें घट्ट पोटीं धरून ॥ २ ॥

शिखरिणी.

नको वाटूं देऊं तिळभर मुली वाइट मना,
नको कष्टी होऊं उशिर होइल गमना ;
तुला संक्रातीला अणविन बये ! मी झडकरी ;
पुशीं बाळ डोळे किमपि हृदयीं दुःख न करीं ॥ १ ॥
तुझी सासू साध्वी बहु सदय गे फार सरळ,
सुदैवानें लाभे जगतिवर जी जोड विरळ ;
सदा ‘लक्ष्मी लक्ष्मी’ म्हणुनि तुजला कौतुक करा,
धरीं प्रेमा तूंही मजसम सुखानें तिजवरी ॥ २ ॥

शार्दूलविक्रीडित.

केलें रक्षण लाडके अजवरी मी जन्म तूतें दिला,
जन्माची सगळ्या धनीण परि ती सासूच आहे तुला ;
देणें जें सुखदुःख तें तिजकडे आहे पहा ह्यावरी,
आई तीच खरी तुझी समजुनी दुःखास ह्या आवरी ॥ ३ ॥

मंदाक्रांता.

मोठ्या खोट्या छलक कुमती बोलती दुष्ट वाचा,
बोभाटा हा अजवरि जगीं गाजतो सासवांचा ;
ऐशा खोट्या विपरित मिषें तूं न चित्ता विटाळीं,
एक्या हातें कधिं तरि मुली वाजते काय टाळी ॥ ४ ॥

पृथ्वी.

सुशब्द वदतां प्रतिध्वनि उठे तयासारखा,
वदेल कटु तो तया खचित होय कीं पारखा ;
स्वयें विनय ठेवितां सहजहीं पुरे कामना,
तिरस्कृति न कां घडे दुखवितां जनांच्या मना ॥ ५ ॥

शार्दूलविक्रीडित.

मर्यादा धरणें स्वकार्य करणें साधेपणें वागणें,
द्या द्या वस्तु म्हणोनियां नच कधीं कोणासही मागण ;
जें पानावरतीं पडेल समयीं नेमस्त तें भक्षणें,
हीं लोकप्रिय व्हावयास वरवीं आहेत गे लक्षणें ॥ ६ ॥

स्रग्धरा.

सर्वां आधीं उठावें स्मरण धरुनिया मागुनी त्या निजावें,
वस्त्रां पात्रां जपावें कधिं नच पुसल्या–वीण बाहेर जावें ;
कामीं काजीं श्रमावें अळस करुनिया त्यां न कोठें गमावें,
सद्ग्रंथानें रमावें शयनिं पहुडतां श्रीहरीतें नमावें ॥ ७ ॥

शार्दूलविक्रीडित.

हर्षे काम करीत जा झडकरी होईल जें जें तुला,
सासूच्या घरच्या धरूनि ममता सांभाळ साऱ्या मुला ;
येतां झोंप तयांस नीट निजवीं गाणीं मुखें गाउनी,
किंवा घेउनि खेळवी कटिवरी सद्वस्तुतें दाउनी ॥ ८ ॥
हें तों नित्य रडें सदा धडफडें हें शेंबडें मेकडें,
हें आहे चिपडें क्षणक्षणिं पडे बोले महावांकडें;
डोक्याला खवडे बसे नच कडे छांदिष्ट मोठें कुडें,
हें मारूनि खडे किती बडबडे फाडीतसे आंगडें ॥ ९ ॥
ऐसें बोलुं नये कधीं चिडुं नये कोणास मारूं नये,
किंवा त्यांस अरे तुरे ह्मणुनिही रागें झुगारूं नये;
बोलोनि बहु गोड कोड पुरवीं केव्हां वदें बोबडें,
पक्ष्यांना पशूंनां सुशील शिशुंनां सर्वांसही आवडे ॥ १० ॥
स्नानें घालुनि रोज निर्मल मुलें ठेवीत जावीं बरीं,
वस्त्रें देउनि घेउनी पुनरपी तीं ठेव खुंटीवरी ;
जागा, देह, मुलें मलीन असणें मोठें असें दूषण,
नाना रोग हरूनि निर्मळपणा होतो महाभूषण ॥ ११ ॥

भुजंगप्रयात.

सकाळीं मुली काढुनी केरवारे, गृहा सारवोनी करीं स्वच्छ सारें ;
फुलें स्वस्तिकें रांगुळीचीं लिहावीं, अशीं कीं जनें कौतुकें तीं पहावीं॥१२॥
निगा चांगली राख वृंदावनाची, जया पाहतां तृप्ति व्हावी मनाची
फुटोनी तरू येत जेव्हां बहार, फुलें वेंचुनी गुंफ तूं लांब हार ॥ १३ ॥

इंद्रवज्रा.

वेणी बरी घालुनियां सकाळीं, अत्यादरें कुंकुम लाव भाळीं ;
मोठें नसावें टिकली नसावी, लोकांमधें सज्जनता दिसावी ॥ १४ ॥

भुजंगप्रयात.

किती घालिती कुंचुकी फार तंग,
तसे तूं नको दाखवूं रंगढंग ;
धरावी तुवां रीत नेमस्त साधी,
बरें वागुनी कीर्तितें नित्य साधी ॥ १५ ॥
नको फार हव्यास गे भूषणाचा,
धरीं लोभ चित्तीं सदा सद्गुणांचा ;
पती-शुश्रुषा बोलणें नम्रवाचे,
अलंकार हे जाण तूं बायकांचे ॥ १६ ॥

स्रग्धरा.

पक्वान्नें शाकभाजी रुचिकर घटण्या रायतीं भात नाना,
कार्यप्रस्थीं करोनी बहुत चतुरता दाखवावी जनांना ;
टोप्या कुंच्या शिवाव्या परकर अवधीं सारुनी नित्य कामें,
द्यावा सद्बोध बाळां, कधिंच बसुं नये बायकांनीं रिकामें ॥ १७ ॥
सांगाव्या भूपतींच्या अति सुरस कथा शूरशा राउतांच्या,
खोट्या गोष्टी न सांगें भयजनक अशा राक्षसांच्या भूतांच्या ;
नीतीचें सार घेईं निवडुनि बरवें दुग्ध जैसा मराळ,
एरंडाचें, नको गे निजमुख शिणवूं, गाळुनीयां गुऱ्हाळ ॥ १८ ॥

भुजंगप्रयात.

सतीला पतीवांचुनी देव नाहीं, असो नित्य चित्तीं तुझ्या भावना ही,
मणाची बिडी बोलती हा विवाह, परी जाण तो अमृताचा प्रवाह ॥१९॥

उपजाति.

सद्बोध लग्नांतिल जो पतीचा, तो जीव कीं प्राण असे सतीचा;
अत्यादरें तो शिरसीं धरावा, पुनःपुन्हां हृत्कमळीं स्मरावा ॥ २० ॥

शार्दूलविक्रीडित.

लग्नाच्या घटिका भरोनि समयीं सारीच घाई उडे,
विप्रांचा बहुमोल बोल न पुरा ऐकावया सांपडे;
मंत्राचा सरलार्थ तैं वधुवरां कोणी सांगे खुला,
तो मी सांगतसें मुली परिस कीं कल्याणदाता तुला ॥ २१ ॥
बोले तैं पति ' तूं मला वरुनियां अत्यादरें हे स्त्रिये !
राहोनी मजसंगतीस चतुरे होणार वृद्धा स्वयें;
ह्यासाठीं कर हा तुझा धरितसें सौभाग्य द्याया महा,
देवांनीं गृहरक्षणार्थ तुजला स्वाधीन केलें पहा ॥ २२ ॥
' अग्ने ! प्रेम करी वधू अजवरी ही जन्मदात्यांवरी,
मन्मातापितरांकडे मन तिचें ओढून घे सत्वरी ;
प्रेमा वाढवुनी सुखांत विलसो जोडोनि माझ्या कुला,
होण्याला अनुरक्त नित्य मजला सद्बुद्धि द्यावी हिला ' ॥ २३ ॥

इंद्रवज्रा.

' ऋग्वेद तूं मी तरि सामरूप, आकाश तूं मी धरणिस्वरूप;
अग्निद्विजांसन्मुख लग्न लावूं, निर्मूं प्रजा आणि सुखात राहूं ॥२४॥

उपजाति.

परस्परें प्रेम सदैव ठेवूं, रूपें गुणें आवडतींच होऊं;
सोडूनि वागूं कपटास हर्षें, वांचूं स्त्रिये ! शंभर पूर्ण वर्षें ' ॥ २५ ॥

द्रुतविलंबित.

' चढुनियां दगडावरती प्रिये ! मन करीं दृढ तत्सम तूं स्वयें;
अहित जे करिती त्यजुनी नया, करिं सदाचरणें वश तूं तया ॥ २६ ॥

मिळुनि सात पदें जरि चाललें, उभयतां तरि सख्य घडे भलें ;
ह्मणुनि सप्तपदीविधि तो सुखें, करुनि बोध करी पतिही मुखें ॥ २७ ॥
उपजतो नवधर्म पदीं पदीं, पुढति वाढत जाय जशी नदी;
कथितसे पति तो प्रतिपाउलीं, परिस गे अति सादर तूं मुली ॥ २८ ॥

चामर.

'चाललीस एक पाद आज माझियासवें,
ह्यामुळें तुह्मां अह्मांत सख्य जोडलें नवें;
अन्नपूर्तता करीं सहाय होउनी मला,
पुत्र फार ते शतायु देव देउं दे तुला ॥ २९ ॥

कामदा.

'चाललीस तूं दोन पावलें, सख्य आपुलें वृद्धि पावलें,
प्रेमबुद्धिची चढतसे कळा, वाढवीं स्त्रिये! माझिया बळा' ॥ ३० ॥
'तीन पावलें चालशी सखे! माझिया धना वाढवीं सुखें;
चार पावलें चालशी बरीं, वाढवी सुखा माझिया तरी ॥ ३१ ॥
'पांच पावलें चालशी पहा, संततीस तूं वाढवीं महा;
पावलें सहा चाललीस तूं, भोग दे जसे देति हे ऋतु' ॥ ३२ ॥

भुजंगप्रयात.

'अह्मी पावलें चालुनी आज सात, खरें सख्य तें रेखिलें मानसांत;
बहु प्रीतीनें राहुनी नित्य भार्ये! गृहस्थाश्रमीं चालवूं सर्व कार्यें ॥३३॥
'सदा देत जावा विचारास मान, समस्तांवरी दृष्टि ठेवीं समान;
मला दुःखदातें करीं तूं न कृत्य, रहा तूं सुखें होय कल्याण सत्य' ॥३४॥

इंद्रवज्रा.

'पाळीव माझे पशु आणि पक्षी, वेळेस त्यां देउनि भक्ष्य रक्षीं;
संतुष्ट त्यांतें करुनी रहावें, केव्हां न तूं चंचलचित्त व्हावें' ॥ ३५ ॥
'वागें सदा ठेवुनि हें मनांत, होशील लोकप्रिय तूं जनांत;
माथां तुझ्या कीर्ति धरील छत्र, भार्ये तुला होतिल दिव्य पुत्र ॥ ३६ ॥

स्रग्धरा.

‘ सासूला सासऱ्याला सविनय करुनी नित्य सेवा जपावें,
होवोनी आवडीची बहुत उभयतांपासुनी मान पावें;
वागें तूं शुद्धभावें समजुनि नणदा दीर जावा अभिन्न,
राहें वाहें प्रपंचा मजसह सकलां ठेवुनीयां प्रसन्न ’ ॥ ३७ ॥

इंद्रवज्रा.

‘ माझ्या सखे ! भूषण तूं कुलाचें, कल्याण हो नित्य तुझें मुलांचें
आहेस तूं ह्या घरची धनीण, राहें सदा दक्ष परंतु लीन ’ ॥ ३८ ॥

भुजंगप्रयात.

पतीच्या तुझ्यामाजि जो नेम झाला, नको बाध आणूं कधींही तयाला;
जिवासारखा ठेवुनी अंतरांत, जपोनी सदा नीट वागें घरांत ॥ ३९ ॥

शार्दूलविक्रीडित.

सेवावें वडिलांस भक्ति धरुनी आज्ञा धरावी शिरीं,
जावा दीर वघूनियां पडुं नको तूं मत्सराच्या भरीं;
ठेवीं चाकरनोकरावरि दया मातेपरी सर्वदा,
पाहोनी धनवैभवा फुगुं नको गर्वाभिमानें कदा ॥ ४० ॥
नीतिबोधक पुस्तकें निवडुनी वाचीत जावीं बरीं,
शृंगारात्मक नाटकें जनकथा घेऊं नको तूं करीं;
चाली मंजुळ लावुनी कधिं कधिं गाणीं ह्मणावीं मुखें,
केव्हां नूतन चित्तवेधक अशीं आंगें रचावीं सुखें ॥ ४१ ॥

वसंततिलका.

आदाय पाहुनि मुली करिं खर्चवेंच
नाहींतरी पुढति येईल फार पेंच;
बारीक दृष्टि बहुधा पुरुषांत नाहीं,
ती बायकांस धरणें बहु इष्ट पाहीं ॥ ४२ ॥
सारे घरांतिल गडी असती अनाडी,
भाजीमधेंहि करिती बहुधा लबाडी;

ह्याकारणें वजन माप अधीं तपाशीं,
घालूं नको जिकिर फार परंतु त्यांशीं ॥ ४३ ॥
त्यांनीं धनीण बहु दक्ष असें म्हणावें,
घेवोनि धाक हृदयीं वळतीस यावें;
ठेवीं हिशोब जपुनी पुरवीं पदार्थ,
होवो तुझें ' गृहिणि ' नाम मुली ! यथार्थ ॥ ४४ ॥
बाजारभाव चढता पडतोहि केव्हां,
तोटा नफा बघुनि सांठिव धान्य तेव्हां ;
होई उदार धन खर्चुनि योग्य काळीं,
आहे ह्मणूनि सहसा न करीं दिवाळी ॥ ४५ ॥

( मंदाक्रांता. )

थेंबे थेंबे भरुनि जलही सांठतो कीं तलाव,
जोडोनीयां लघुलघु फळ्या होतसे भव्य नाव ;
पैसा पैसा जमवुनि तसा रंक होतो कुबेर,
संसारीं हें समजुनि करीं योग्य तो फारफेर. ॥ ४६ ॥

भुजंगप्रयात.

यथाशक्ति हातें करीं दानधर्म, नसे थोर त्यासारखें पुण्यकर्म ;
अनाथास देतां घडे पुण्य फार, धरीं अंतरीं त्यांतलें एक सार ॥४७॥
कुलाचार ते चालवीं भक्तिभावें, नसे चांगलें ठेवणें त्यांस नांवें ;
स्त्रियांचीं व्रतें पाळ गे तूं सदैव, जिथें भक्ति तेथें वसे नित्य देव ॥४८॥

शार्दुलविक्रीडित.

शांती सोडुं नको कधीं रुसुं नको स्वच्छंद वागूं नको,
लज्जा सोडुं नको उगी बसुं नको कोणास मागूं नको ;
रागें बोलुं नको अढी धरुं नको चोरून खाऊं नको,
कोठें जाउं नको परस्थ पुरुषां पाहून हांसूं नको. ॥ ४९ ॥

शिखरिणी.

स्त्रियांनां ह्या लोकीं समज पति हा देव पहिला,
तयायोगें पावे सकल सुखसौभाग्य महिला;
तयाच्या आज्ञेला निशिदिनिं मुली तत्पर रहा,
धरीं प्रेमा चित्तीं तनमन सुखें त्यासचि वहा ॥ ५० ॥
नसे पातिव्रत्यासम युवतिंना धर्म जगतीं,
पतीच्या सेवेनें इहपर मिळे उत्तम गती;
जरी एक्या चित्तें पतियुवति संसार करिती,
तरी स्वर्गापेक्षां सुखनिधिस येईल भरती ॥ ५१ ॥

मंदाक्रांता.

कोणी कोणी गुरु करुनियां गुप्तसा मंत्र मागे,
कोणी बोवा ह्मणूनि नमुनी नित्य पाठीस लागे;
चित्तीं आणी सकल परि तो व्याप आहे ठगांचा,
नांहीं बाई अनुभव तुला पूर्ण आला जगाचा ॥ ५२ ॥

भुजंगप्रयात.

अशांच्या नको लागु तूं व्यर्थ नादा, अपेक्षां सदा त्वत्पतीच्या प्रसादा;
तया सेवुनी घालुनी गोड अन्न, बरें वागुनियां करी सुप्रसन्न ॥ ५३ ॥

वसंततिलका.

ज्या ज्या स्त्रिया पतिवरी धरितात भक्ति,
लाभे तयांस जमतांतचि मोक्षमुक्ति;
ह्याहूनियां अधिक तें तुज सांगु काई,
घेई जनाकडुन तूंहि भली भलाई ॥ ५४ ॥
आला चुकून पतिच्या जरि कोप चित्तीं,
मानूं नको विषम तूं धरि शांतवृत्ती;
वेळीं तयाकडुनियां अपमान झाला,
सोशीं, नको उलट उत्तर देउं त्याला ॥ ५५ ॥

ओढाळ फार मन हें करि सत्यनाश,
लावूनि बद्ध करिं त्यास विवेकपाश;
जे जें मिळेल तुज त्यांतचि तृप्त राहें,
जें सौख्य तें सकल ह्यांतचि सत्य आहे ॥ ५६ ॥

मालिनी.

उशिर वहुत झाला जा बसें वाहनांत,
तिळहि धरुं नको गे खेद आतां मनांत;
जननिचरण कन्या वंदुनी दूर जाय,
फिरुनि फिरुनि पाहे नेत्र लावूनि माय. ॥ ५७ ॥
रडुनिरडुनि डोळे लाल झाले मुलीचे,
कवण कथिल सारें दुःख त्या माउलीचें!
हळुहळु मग कन्या नीट मार्गास लागे,
पुशित पुशित डोळे परतली माय मागें ॥ ५८ ॥

---

## एका नाटक्याचा पश्चात्ताप.

खोटा खोटा सकल जनहो छंद हा नाटकाचा,
नाहीं ऐसा प्रखर जगतीं हातही घातकाचा;
सर्वस्वाला मनुज मुकतो होतसे तोंड काळें,
जन्मांतूनी उठुनि पडती दुःखशोकांत बाळें ॥ १ ॥
आला आला अनुभव मला मित्रहो पूर्ण आला,
झाला झाला हरहर! पहा थोर हा घात झाला!
देवा देवा! निचळ फसलों ऐकुनी गोड थापा,
कैसा आलों पळुनि इकडे सोडुनी मायबापा! ॥ २ ॥
हातीं आल्या फुकट तिकिटा जाहलें तेंचि मूळ,
मच्चित्ताला मुरळ पडली लागलें शुद्ध खूळ;

शृंगाराचीं अठवुनि पदें गुंगलों गायनांत,
त्यावाचूनी इतर न सुचे कामधंदा मनांत ॥ ३ ॥
मातीमोलें अहह! विकिलीं पुस्तकें चट्ट सारीं,
म्यां मूर्खानें परि चुकविली नाटकाची न वारी ;
खुंटोनीयां मजल दुसऱ्या लागलों मी उपाया,
अन्याचेही हळुहळु खिसे लागलों चांचपाया ॥ ४ ॥
केव्हां येते प्रियकर निशा ती शनीची बुधाची,
वाटे धन्य त्रिभुवन मला मृत्युलोकीं सुधाची ;
शृंगाराचे अभिनय नवे पाहुनी हास्यभेद,
चेष्टांना त्या भुलुनि पडलें लागला तोचि छंद ॥ ५ ॥
रात्रीं जागें निजुनी दिवसा गाय बीभत्स गाणीं,
विद्याभ्यासीं सहज पडलें दुष्कृतीनेंच पाणी ;
पाहोनीयां भडक लुगडीं दागिने मोठमोठे,
घ्यावें ऐसें दृढतर मना एकदां सोंग वाटे ॥ ६ ॥
होता जेथें वसत सगळा नाटक्यांचा समाज,
गेलों तेथें समय बघुनी सोडिली सर्व लाज ;
वर्णे गोरा तनुही बरवी देखणा बुद्धिमान,
ऐशा मातें बघुनि भुलले देति ते थोर मान ॥ ७ ॥
येथें जेवा ह्मणति सगळे आग्रहें फार आजी,
मोठें झालें कुतुहल मना, जाहलों त्यास राजी ;
भाजी ताजी उन उन भजीं जेवलों मिष्ट-अन्न,
खेळालाही फुकट बसलों जाहलों सुप्रसन्न ॥ ८ ॥
पोरांमाजी हृदय रमलें जाहला तेथ वास,
धाकें धाकें गपुनि लपुनी काढिले मासमास ;
मायापाशें जनकजननी धुंडितां श्रांत झालीं,
तत्प्रेमाची अहह ! करुणा लेश मातें न आली ॥ ९ ॥
हौसेनें मी प्रथम नटलों वेश जेव्हां नटीचा,
झाल् मोठा, पदर जरिचा माजपटा कडाचा;

कंठीं मोत्यें खचुनि भरलीं भूषणें सर्व खोटीं,
जातां रंगीं ठुमकत मला वाटली धन्य मोठी ॥ १० ॥
तोंडाला मी बघुनि अरशी लावला रंग गोरा,
मृत्केशांचा शिरिं बसविला टोप बांधून दोरा ;
गालीं लाली सुबक टिकली भौंवया नीट काळ्या,
हर्षें नाकीं नथ डसविली घातल्या कापबाळ्या ॥ ११ ॥
नाचायाला झटुनि शिकलों बांधले चाळ पायीं,
कौसल्यानें बहु रमविले लोक नाना उपायीं ;
झोंकामध्यें नथ उडविली मोडिले काय डोळे !
प्रौढीसाठीं उर सजविला घालुनी वट्ट बोळे ॥ १२ ॥
आधीं होतें उपजत मला कंठमाधुर्य फार,
पाहोनीयां सकल नखरा मंडळी होय गार !
मोठा झालों प्रतिदिनीं मिशा काढण्याचा प्रसंग !
सांगूं ऐसे कितितरि तुह्मां एक ना दोन ढंग ॥ १३ ॥
आधीं लागे सवय विडिची मागुनी गुर्गुडीची,
केव्हां केव्हां चिमटहि मिळे तीव्र नासापुडीची ;
तंबाकूतें फुकुनि फुकुनि भाजलें सर्व टाळें,
धूम्राची त्या धरुनि मळभी जाहले ओंठ काळे ॥ १४ ॥
गाताना जैं लहर चढवीं प्रेक्षकांच्या समोर,
हर्षें टाळ्या पिटुनि अवघे गर्जती ' वन्समोर ' ;
दुष्कीर्तीनें फुकट फुगलों माडलें कर्म खोटें,
चित्तभ्रंशें मजसि उरला स्वर्गहि तीन बोटें ॥ १५ ॥
कोणी देती बसन करिंचें, अत्तरें, पुष्पगुच्छ,
तेणें झालें मजसिं जनहो स्वर्गिचें सौख्य तुच्छ !
पेला पेला उनउन चहा जेवणाला चपाती,
जन्माची, त्या हरहर ! मिषें जाहली सर्व माती ॥ १६ ॥

झालों ऐसा हलुहलु पुढें मी सुरापानभक्त,
छाती गेली जळुनि सगळी आटलें सर्व रक्त !
गात्रें झालीं शिथिल अवघीं रोडले हातपाय,
अंगें झालों जरठ, फुटला कंठ खुंटे उपाय ॥ १७ ॥
निस्तेजानें मुख कलशसें दोन गालास खाडे,
येतां रंगीं ह्मणति ' हिजडा ' काय हीं शुद्ध हाडें !
गाऊं जातां कटुरव निघे दुंदुभी शब्दशोक,
टाळ्या देतीं हुरुरु करुनी हांसती सर्व लोक ॥ १८ ॥
खेळाला तैं शपत अमुच्या पांखरूं ये न एक,
पैसा नाहीं जवळ कवडी थोर झाला विवेक;
दुःसंगानें व्यसनिं पडलों नेत्र जैसा गुलाल,
पैशासाठीं घडिघडि अह्मां नेट लावी कलाल ॥ १९ ॥
छीथू झाली वदन सुकलें तेधवां मालकांचें,
कुत्राही तैं सहन करिना हाल हो बालकांचे !
पोटा नाहीं सुकट तुकडा कोठचीं तूपपोळी ?
कांहीं पोरें नगर फिरलीं घेऊनी शुद्ध झोळी ॥ २० ॥

माजे मोठा कलह, फुटुनी एकमेकांत फांटे,
गेले रात्रीं हलुच पळुनी एक एकेक वाटे ;
मीही झालों विमल हृदयीं खाउनी शेणगोळे,
आतां सारा भ्रम उतरला वांसले स्वच्छ डोळे ! ॥ २१ ॥
खोटीं मोत्यें विटुनि फुटलीं टोप तारामतीचा,
केला गांठीं मुगुट नकली माल हा दौलतीचा !
इष्की चैनी हलकट पदें आणिलीं ऱ्यां घराशीं,
दारू गांजा व्यसनपटुता जोडिली पापराशी ॥ २२ ॥
गेला विद्यासमय निघुनी थोर दुष्कीर्ति आली,
जन्माची ह्या व्यसन जडुनी केवढी घाण झाली !

दुष्कृत्यानें जननिजनका केवढा वीट आला !
पश्चात्तापें रडुनि रडुनी अंतरीं बोध झाला ॥ २३ ॥
मेल्या मागें अमृत मिळुनी कोणता लाभ मोठा ?
झालें गेलें घडुन चुकलें रेखिलें जें ललाटा ;
मी तों वेडा तळमळ करी नाहिंहो देहभान,
मन्मित्रांनो ! तुह्मि तरि असा ऐकुनी सावधान ॥ २४ ॥

## पद्यपुष्पांजली.

पृथ्वी.

धरा फिरुनि ये बरा दिवस मागुती यामिनी,
वसंत ऋतु संपतां उठति मेघ सौदामिनी ;
विपत्ति घडते कधीं फिरुनि काळ ये चालता,
चढे विधिबळें महा-शिखरिं जो पडे खालता ॥ १ ॥
असेंच सुखदुःखही फिरफिरोनि ये मानवा,
असे क्रम अनादि हा विषय काय आहे नवा ?
तसेंच कधिं राष्ट्रही व्यसनसागरीं सांपडे,
प्रयत्न करितां तशांतहि सुयंत्र फांसा पडे ॥ २ ॥
प्रसिद्ध कनकाख्य जी सतत रक्षि गोविप्र भू,
श्रियाळ रघु विक्रमादिक असंख्य सेवी प्रभू ;
अशी सुरभि आर्यभू पडलि इंग्लिशांच्या गळीं,
सुशील पतिनिष्ठ जी कनकभूषणें आगळी ॥ ३ ॥
सुदैव ह्मणुनी अह्मीं चतुर लाधले हे धनी,
प्रजेस जपती अहा पशुप बाळसे गोधनीं ;
सदैव करि राज्ञिही अगन आपुचें माउली,
उदारमति सर्वदा तरुसवें जशी साउली ॥ ४ ॥

बघोनि चमुसागरा चळचळा अरी कापती,
जिच्या अतुल वैभवा तिळ तुळे न लंकापती;
हुताश पळतो सदा शकट घेउनी पोळसा,
अहर्निश जिच्या घरीं निवळ खाऊनी कोळसा ! ॥ ५ ॥

क्षणांत कवि काढितो अमित रम्य चित्रें करीं,
प्रचंड जल चक्रही फिरवुनी करी भाकरी;
जगांत निमिषामधें कळवि वृत्त विद्युल्लता,
दुरूनि परिसावया अजि मिळे सखा बोलता ॥ ६ ॥

सछत्र उतरी पुन्हां चढवि वायु लोकां नभीं,
जियेशीं कर जोडुनी असति पंचभूतें उभीं ;
पुरातन नृपांसही नच अशी कला साधली,
महा विधिबळें अह्मां सदय माय ही लाधली ॥ ७ ॥

मिळे सुपथ शांतता विमल न्याय विद्या नवी,
नया स्मरुनियां दया करुनि रक्षिलीं जानवीं ;
अनंत उपकार हे ह्मणसी आणखीही करूं,
तरी स्वजननीप्रती अवडि मागतें लेंकरूं ॥ ८ ॥

स्वतंत्र नृप वागतां निजजनांत माते कली,
ह्मणोनि निजराज्यही कधिं न चालवी एकली ;
सभा करित कायदा नविन 'पार्लमेंटाख्य' ही,
ठरे बहुमतें फिरे मग करीत राणी सही ॥ ९ ॥

हितार्थ जरि आमुच्या करितसे नवा कायदा,
तरी कधिं कधीं घडे तिळ न त्यामुळें फायदा
ऋषिप्रणित धर्म कीं जनरिती सदा वेगळ्या,
अहो सकल मांजरें मग कशास दावें गळ्या ! ॥ १० ॥

शार्दूलविक्रीडित.

राणी फार दयार्द्र नित्य अमुची चिंता जरी वाहते,
नाहीं गांठ समक्ष गोरगरिबां द्वीपांतरीं राहते ;
येती थोर 'गव्हर्नरा' दिक जरी मंत्री स्वदेशांत या,
भाषा भिन्न अनेक केविं कळती अंतस्थ गोष्टी तयां ? ॥ ११ ॥

आधीं देश अफाट त्यांतहि किती जाती कुळाचार ते,
मात्सर्यें कलहास नित्य उठती घेवोनि नाना मतें ;
आहे काय उणें जनांत आपुल्या कीं पाहिजे कोणतें,
मागावें नृपतीस काय न कळे ऐसे अह्मी नेणते ॥ १२ ॥

ह्यासाठीं व्यसनें समस्त अमुचीं सांगेल जो जो खरीं,
ऐसा सुज्ञ अवश्य फार असणें त्या 'पार्लमेंटां' तरीं ;
चित्तीं जाणुनि थोर थोर करितां दीर्घ प्रयत्ना बरें,
नाहीं आजवरी परंतु यश तें त्या दीधलें ईश्वरें ॥ १३ ॥

आला भाग्यरवी परंतु उदया आनंद झाला मना,
केली पूर्ण खरीच आज अमुची विश्वंभरें कामना ;
दादाभाइस आदरें निवडुनी कीं पार्लमेंटीं दिलें,
सारे फिन्सबरी जनांस ह्मणती साधो भले हो भले ॥ १४ ॥

स्रग्धरा.

झाला आनंद देशीं सकल बुधवरां वाटलें पर्व मोठें,
दादाभाई ! तुह्मांतें किति तरि कळवूं खास वाटेल खोटें !
तुह्मी दूर प्रदेशीं उपकृति ह्मणुनी धाडिल्या फक्त तारा,
खेड्यापाड्यांत राहे घुमुनि जयरवें त्वद्यशाचा नगारा ॥ १५ ॥

ठायीं ठायीं सभाही भरुनि बहु बहू गाइला धन्यवाद,
झाला तुह्मी यशस्वी निशिदिनिं झटतां ईश्वराचा प्रसाद ;
देवो आरोग्य तुह्मां धनकनक मुलें देव आयुष्यवृद्धि,
प्रार्थायाही नको कीं उपजतचि असे देशकल्याणबुद्धि ! ॥ १६ ॥

सांगा सत्यार्थवादा सविनय कळवा देशबंधू-इरादा,
येणें होईल बाधा स्वजनहित करा हाच लावा तगादा ;

आलेलें श्रेय साधा झटुनि, भिउं नका क्षुद्रलोकापवादा,
लोकांच्या धन्यवादा उचित मग तुह्मी ईश्वराच्या प्रसादा ॥१७॥

शार्दूलविक्रीडित.

दादा ! धन्य तुह्मी स्वदेशचरितीं कीर्तिध्वजा लावली !
केली आर्यजनांस कल्पतरुची बैसावया सावली ;
होऊनी उपकारबुद्ध दुरुनी जोडोनियां अंजली,
प्रेमें कोकिळ अर्पितो सविनयें ही पद्यपुष्पांजली ॥ १८ ॥

---

## मृत्यु.

शार्दूलविक्रीडित.

राजा रंक असो असो धनपती हो वृध्द कीं दांडगा,
साधू भोंदु असो असो कुशलही हो शांत वा भांडगा ;
भेदाभेद न पाहशी कधिंच तूं हा उंच ना हा खुजा,
रे रे फार कठीण दुःसह जगीं मृत्यो ! तडाका तुझा ॥ १ ॥
हा आहे कविवर्य, मूढजन हा, हा तों प्रजापालक,
बालेचा पति, एकलाच सुत हा, हें नेणतें बालक ;
हा कर्त्ता धनसंपदा मिळविता दारामुलांचा धनी,
नाहीं येत असा विचार तुझिया मूढा कसा रे मनीं ॥ २ ॥
किंवा बुद्धि नसे तुला, पदरचे मंत्रीहि सारे खुळे
चालेना तव राज्यसूत्र बरवें त्यांच्या प्रभावामुळें !
नेलेले नररत्नसंघ अपुरे रे काय झाले वरी,
ह्यासाठीं नरमौक्तिकें हुडकुनि नेतोसि चोरापरी ! ॥ ३ ॥
नाहीं लेश दया तुला तळमळे प्राणी जरी घाबरा,
रे रे फार कठोर मानस तुझें पाषाण काळा बरा !
नाहीं काळ न वेळ योग तुजला घेवोनि जाशी क्षणीं,
आल्या दूत तुझे जिवास न मिळे रक्षावयाला धणी ॥ ४ ॥

आजी जो जगतीं सुखांत मिरवे तो मित्र नाहीं उद्यां,
जेथें हर्ष वसे तिथें निपजती दुःखोदकाच्या नद्या !
जावें जों शुभ ऐकतांच करण्या स्तुत्यंबरें अर्पण,
मृत्यो ! तेथ करावयासि पडतें शोकाश्रुनें तर्पण ॥ ५ ॥

---

## कालक्षेप.

द्रुतविलंबित.

नरतनू अति दुर्लभ वास्तव, हरिहरां त्यज सर्व भया, स्तव ;
चकलली न बसेल पुन्हां घडी, फुकट तूं दवडीं न कधीं घडी ॥ १ ॥
जंव तुला जडली न जरा महा, तंव नरा भजरे भज राम हा ;
न कळतां यम घालिल रे उडी ! फुकट तूं दवडीं न कधीं घडी ॥ २ ॥
बघुनि साधु भवांबु तरे कसा, शरण जाउनि त्या उतरें कसा ;
भवनदींतुनि दाविल तो थडी, फुकट तूं दवडीं न कधीं घडी ॥ ३ ॥
भरंवसा न धरीं घडिचा पहा, कठिण मृत्यु गळ्यावरि चाप हा ;
म्हणुनि शीघ्र उठे करि तांतडी, फुकट तूं दवडीं न कधीं घडी ॥ ४ ॥
हित तुझें समजे न कसें तुला, शरण जाइ भवार्णव-सेतुला ;
सतत सत्कविवाक्सुमनें खुडीं, फुकट तूं दवडीं न कधीं घडी ॥ ५ ॥
निशिदिनीं बहु भूतदया वरीं, सुकृतधी ठसवी हृदयावरी ;
हरिकथामृत पाहुनि दे बुडी, फुकट तूं दवडीं न कधीं घडी ॥ ६ ॥
भवनदींत महाकाळि भोंवरा, मजाशिं उद्धरिं देइं विभो ! वरा ;
विनविं हेंच करीं हरि सांगडी, फुकट तूं दवडीं न कधीं घडी ॥ ७ ॥
करि सदा उपकार जनांवर, न करि तो मतिमंद जनावर ;
तुजसवें नच येइल ही कुडी, फुकट तूं दवडीं न कधीं घडी ॥ ८ ॥
पथिक दीनजना करिं सोय रे, तरि तुझे जनविश्वहि सोयरे ;
सुगति कीर्ति तुलीं मग रोकडी, फुकट तूं दवडीं न कधीं घडी ॥ ९ ॥

झटुनि निस्पृह उद्यम कीं करी, मग रमा सहजीं तव किंकरी ;
निजयशें जगतीं चढवीं गुढी, फुकट तूं दवडीं न कधीं घडी ॥ १० ॥
नरतती रतती विषयावरी, अचल वृत्ति धरी मन आवरीं ;
चढवुनी शुकवृत्ति वरी कडी, फुकट तूं दवडीं न कधीं घडी ॥ ११ ॥
धरिं मनीं समकांचन ढेंकळा, तरिच साधुपणास चढे कळा ;
टिकती दुरितें मग बापुडीं, फुकट तूं दवडीं न कधीं घडी ॥१२॥
गुरुजनासि विरुद्ध नको करूं, स्मर खुळें अटकेंतिल कोंकरूं ;
सबळ त्वत्समजाहुनि ही रुढी, फुकट तूं दवडीं न कधीं घडी ॥१३॥
फिरुनि काल सरे किति हे मही, नच मिळे क्षण देउनि हेमही ;
यम तुला वर दाविल चोपडी, फुकट तूं दवडीं न कधीं घडी ॥१४॥
पडुनि बिंदु सरोवर सांचतें, जग ह्मणे दिसतें किति साच तें ;
जुळुनि सांकळ होत कडी कडी, फुकट तूं दवडीं न कधीं घडी ॥१५॥
रुरलता धरुनी करिं चाकरी, झटुनि झोंबुनि मेळवि भाकरी ;
खटपटीविण शाल न घोंगडी, फुकट तूं दवडीं न कधीं घडी ॥१६॥
जन ह्मणे अति उत्तम ही कृषी, ह्मणुनि मानवले तिजला ऋषी ;
नृपति सेवकता जड रे बिडी, फुकट तूं दवडीं न कधीं घडी ॥१७॥
वश करी भजनें निगमागमा, बहु सुखें करि साधुसमागमा ;
हरिपदा हरिनामाचि ही शिडी, फुकट तूं दवडी न कधीं घडी ॥१८॥
तुज भुके पुरतीलच नाचणे, फुकट कां जगतीं मग नाचणें ;
पुरुनि राहिल देहहि झोंपडी, फुकट तूं दवडी न कधीं घडी ॥१९ ॥
आजि कपाळ दुखे आजि ताप हा, समय एक घडी न रिता पहा ;
कितिक सांगशि पोकळ ह्या रडी, फुकट तूं दवडीं न कधीं घडी ॥२०॥
तुज मनस्ससरिता जरि नावरे, तरि करीं हरिभक्तिच नाव रे,
न ढळतां नच होईल वांकडी, फुकट तूं दवडी न कधीं घडी ॥ २१ ॥
प्रथम तूं मन निर्मळ राख रे, मग असो तनुला जरि राख रे ;
हरि बघे नच सुंदर कातडीं, फुकट तूं दवडीं न कधीं घडी ॥ २२ ॥

परधना लुटुनी नर कातरे, खचित जाइल तो नरकांत रे;
नजर ठेवुं नको कधिं वांकडी, फुकट तूं दवडी न कधीं घडी ॥ २३ ॥

## तुफान.

मालिनी.

जवन पवन धांवें सायकाच्या गतीनें,
नदिपति खवळे हा त्याचिया संगतीनें;
अहह ! कहर केला आजि या फार वातें,
बसति कितिक झोके आमुच्या तारवातें ॥ १ ॥

पुरुषभर उडोनी मागुती येत खालीं,
खळ खळ जळ येतें आंत जैशा पखाली !
भरुनि भरुनि त्यातें श्रांत झाले खलाशी,
सुजन सदुपदेशा जेविं देतां खलाशीं ॥ २ ॥

उसळति लहरी या पर्वतप्राय तुंग !
बघुनि मति भयानें होतसे सर्व गुंग ;
क्षणहि भरवंसा या येइना तारवाचा,
विकल वदनिं चाले घोष चिंता–रवाचा ॥ ३ ॥

बघुनि मन थरारे सिंधुची उग्र मुद्रा,
व्यसनसमयिं धांवे तूं दयेच्या समुद्रा !
फिरफिरुनि उठे हा घोर कल्लोळ लाटीं,
विधिलिखित कळेना काय आहे ललाटीं ! ॥ ४ ॥

बहुत कठिण घोंघो वाहतो काय वारा !
क्षणभरि गवसेना प्राणिमात्रा निवारा ;
अटपुनि अवजारें फाटकीं छिन्न भिन्न,
दिसति मनिं खलाशी जाहले फार खिन्न ॥ ५ ॥

म्हणति शरण आम्ही तार रे वायुदेवा !
विसरुन चुकलोंसे कोणती सांग सेवा ;
नवस करुनि भावें फोडिति श्रीफलांतें,
घडि घडि अठवीती बायकांतें मुलांतें ॥ ६ ॥

डुलत डुलत तारूं आपटे एक बाजू,
धरणि पडत जेवी एकभारें तराजू ;
प्रतिसमयिं तडाका अब्धिची लाट हाणी,
हिकडुनि तिकडे हें खेळतें सर्व पाणी ॥ ७ ॥

किती तरि लहरींची होय मोठी कमान,
वळणसुद दिसे ती पर्वताच्या समान ;
गगनिं जळ चढोनी होतसें छत्र काळें,
वदन पसरलें हें खावया काय काळें ॥ ८ ॥

चढुनि चढुनि लाटा झांकिती सूर्यबिंब,
स्थळ वसन भिजोनी जाहलें सर्व चिंब ;
हुडहुडि भरुनीयां अंग झालें बधीर,
अझुनि मनिं धरावा कोठपर्यंत धीर ॥ ९ ॥

अवजड परि जोरें डोलकाठीहि हाले,
कर कर कर ऐसा सारखा शब्द चाले ;
तट तट तट जाती दोरखंडें तुटोनी,
शिव शिव ! हृदयींचा धीर गेला सुटोनी ॥ १० ॥

कवळुनि तुळयांतें बैसलों एक ठायां,
गर गर फिरतें कीं, शक्ति नाहीं उठाया ;
फिरुनि फिरुनि डोकें पित्त आलें कपाळा,
अतडिं तुटुनि गेलीं ओकतां विश्वपाळा ॥ ११ ॥

बहुत दिवस झाले अन्न नाहींच पोटा,
विकल सकल गात्रें येति पोटांत वेटा ;
बुरसुन दशम्याही जाहल्या त्या निकामी,
कधिंच पडशि झाली लाडवांची रिकामी ॥ १२ ॥

भरुनि जळमटानें नासले सर्व पोहे,
विपरित विधि झाल्या वांकडें काय नोहे ?
हर हर ! पडले कीं, गोड पाण्यांत जंतू,
आजि तर तुटतो हा वाटतें प्राणतंतू ॥ १३ ॥

वरति दिसत सारें शून्य आकाश मात्र,
जलमय भय वाटे खालतें सिंधुपात्र ;
गगनिं दिसत नाहीं एकही आज पक्षी,
कठिण समय आला, ह्यांतुनी कोण रक्षी ॥ १४ ॥

तरु नगहि दिसेना येथ कैंची जमीन,
सभय पळत जाती मोठमोठेहि मीन ;
इतर जलचरेंही धांवती सैरवैरा,
व्यसनसमयिं हा हा ! टाकुनी लोभवैरा ॥ १५ ॥

गलबत खुटवीलें टाकुनी नांगराशीं,
तरिहि जलधिसंगें ना टिके संगराशीं ;
अधिक अधिक वारा होतसे फार जोर,
अहहह ! तुटला कीं नांगराचाहि दोर ॥ १६ ॥

भडकुनि पवनानें स्वैर तारूं निघालें,
किति तरि न कळे हे दैव घालील घाले !
जलद हल खलाशी टाकिती दूसरा हो,
अझुनि तरि दमानें बापुडें स्थीर राहो ॥ १७ ॥

फिरुनि जरि हलाचा दोर तोडील वायू,
तरि मग सकलांचें संपलें खास आयू !
गमत मम मना हा दोर नोहे हलाचा,
प्रगट निवळ तंतु जीविताच्या बलाचा ॥ १८ ॥

घडि घडि जइं होतो वायुचा फार जोर,
दचकुनि तुटला कीं पाहतों काय दोर ;
निशिदिनिं सकलांना लागला तोचि घोर,
व्यसनसमयिं होतो नीचही फार थोर ॥ १९ ॥

रडुनि रडुनि झालों काय हो दीनवाणी !
नयन सुकुनि गेले आटलें सर्व पाणी ;
उगिच करुनि होतों स्वस्थ ऐसा विवेक,
नविन नविन तों तों संकटें एक एक ! ॥ २० ॥

निबिड गगनिं आल्या मेघपंक्ती भरून,
सळ सळ जळधारा ओतती कीं वरून !
गड गड गड अंगा गर्जना कांपवीते,
जलद जलद आला साह्य व्हाया पवीतें ॥ २१ ॥

चम चम चम नाचे काय विद्युल्लता ही !
कड कड कड शब्दें नाद कोंदून राही ;
घसरुनि पडतेही वाटतें मस्तकांत,
खचित खचित आलों मृत्युच्या मी मुखांत ! ॥ २२ ॥

## वृक्षोपदेश.

आर्या.

सत्वस्थ विप्र कोणी संसारातें करोनियां दमला ;
द्यावी ह्मणे समस्तां साधुगुणांची करोनि याद मला ॥ १ ॥

यांचा करीत ऐशी तीर्थक्षेत्रें समस्तही फिरला ;
सद्गुरु मिळेल ह्मणुनी धैर्यें गिरिगव्हरांतही शिरला ॥ २ ॥

बैरागी, सन्यासी, आश्रम, मठ, देव, धुंडिले सगळे ;
सर्वत्र दंभ, आशा, ओतूं येऊन शुद्ध फेस गळे ! ॥ ३ ॥

कोणी न पात्र देण्या मोक्षप्रद मज गुरूपदेशास ;
ऐसें चिंतुनि चित्तीं शीघ्र निघे जावया स्वदेशास ॥ ४ ॥

मार्गीं चालत जातां उष्णाचा ताप लागला कडक ;
पायहि थकून गेले नेटें उल्लंघितां महा खडक ॥ ५ ॥

क्षुद्बोध होय पोटीं उदकाविण फार घोपला प्राण ;
मार्गक्रमण कराया स्वल्पहि अंगीं न राहिलें त्राण ॥ ६ ॥

देवा ! दे स्नानाला पानाला उदक फार गार मला ;
प्रार्थी तो तों पुढतीं निर्झर तरु पाहुनी मनीं रमला ॥ ७ ॥

बहु रम्य आम्र तरुवर ज्याच्यावरि दाटला भला पाला ;
तापाला दूर करी कोकिल वरि काढिती अलापाला ॥ ८ ॥

तरुतलिं जाउनि एका टेंकुनि बैसे खुशाल पाळाला ;
चित्तीं म्हणे अहाहा ! येइल हें सौख्य का नृपाळाला ॥ ९ ॥

काढुनि वस्त्रें सारीं लावुनि पडशी वरी निवाऱ्यातें ;
क्षणभरि विश्रांतीस्तव आनंदें घेइ गोड वाऱ्यातें ॥ १० ॥

मग हायसा पडे तो छायेला घोंगडीस पसरोनी ;
बहु जीव तृप्त झाला, गेला तो पथिक कष्ट विसरोनी ॥ ११ ॥

जवळचि ओढा होता, निर्मळ जळ ज्यांत खळखळा वाहे ;
लाहे बहु सुख चित्तीं उत्सुकतेनें तयाकडे पाहे ॥ १२ ॥

स्वच्छंदें स्नान करी, भावें अर्घ्यप्रदान दे रविला ;
संध्यावंदन करुनी स्तोत्रांनीं वासुदेवही स्तविला ॥ १३ ॥

षट्कर्में संपवुनी सत्वर पूर्वस्थळीं पुन्हां परते ;
क्षुत्पीडाशमनार्थें विप्राचें लक्ष वेधलें वरतें ॥ १४ ॥

तों वाऱ्यानें पडले पक्क फळांचें धडधडा घड ते ;
सुख, दुःख, लाभ, हानी, दैवानें जीवजंतुला घडते ॥ १५ ॥

आंबे यथेच्छ भक्षी पाडाचे बहु रसाळ मधुरतम ;
समयीं कदान्न लागे क्षुद्विकला तें सुधारसासि सम ॥ १६ ॥

घट घट पाणी प्याला फिरवी उदरावरोनि तो करही ;
तृप्तीची खूण महा देउनि दावी असंख्य ढेंकर ही ॥ १७ ॥

आली मना हुषारी पुनरपि तद्देह जाहला ताजा ;
पहुडे विशंक तेथें पसरुनियां पाय तो जसा राजा ॥ १८ ॥

क्षणमात्र बापुड्याला झालीं सुखसाधनें पहा गोळा ;
छायेमध्यें झुळझुळ वारा येतांच लागला डोळा ॥ १९ ॥
तों विद्युत्पातासम कड कड कड कड करोनि तरु फुटला ;
सुटला तुफान वारा दाहि दिशेला प्रतिध्वनी उठला ॥ २० ॥
तरुमूलांतूनि निघे सिंहध्वनि मनुजशब्द गंभीर ;
रे रे द्विजा ! उठें तूं ऐकाया शब्द हे करी धीर ॥ २१ ॥
खडबडला गडबडला आश्चर्ये चकित जाहला विप्र !
उठला बसला वेगें जागा झाला भयामुळें क्षिप्र ॥ २२ ॥
झाला तटस्थ पाहे नयनाची पापणीहि नच हाले ;
तों अतनु-ध्वनि पुनरपि गर्जोनी शांतवृत्तिनें चाले ॥ २३ ॥
देहांत अमृत भरलें ह्मणुनि मला ह्मणति आम्र तरु लोकीं ;
तो तुज उपदेशाया आलों मी मूर्तिमंत अवलोकीं ॥ २४ ॥
बापा भिऊं नको तूं मजकडुनी तुज घडेल बाधा न ;
सत्योपदेश कथितों श्रवणें होईल बा समाधान ॥ २५ ॥
रे ब्राम्हणा ! कशाला जगभरि तुं कष्ट खात फिरतोस ?
वेड्या ! मनीं वृथा कां रुद्रु नाहीं म्हणूनि झुरतोस ॥ २६ ॥
उपदेशाया एकचि ब्रम्हांडीं मनुज काय रे उचित ?
भरल्या अनंत वस्तू देतिल उपदेश त्या तुला खचित ॥ २७ ॥
अभिमानी पुरुषाहुनि निर्जीव आम्ही पदार्थ फार बरे ;
लोहहि टिके न जेथें होइल तेथें कसा नफा 'रबरें' ॥ २८ ॥
सत्यविचारें बघतां आहे जरि बुद्धिमंत नर कुलिन ;
नाना विकार पावुनि पुढती तदबुद्धि होतसे मलिन ॥ २९ ॥
कामक्रोधविकारें मानवहस्तें घडे महापाप ;
आम्ही उद्भिजसाधू शून्यविकारी असों अपोआप ॥ ३० ॥
शत्रू, मित्र, महात्मा, आम्हां ना राव, रंक, हा भेद ;
सौख्याचा गर्व नसे दुःखाचा लेशही नसे खेद ॥ ३१ ॥

माझ्यासमान ठेवी तूंही समबुद्धि सर्व भूतांत ;
येणेंच चित्तशुद्धी होइल कीं सुप्रसन्न भूतांत ॥ ३२ ॥
झंझावत मला रे धक्के मारी कितीक ताठ्यानें ;
देवोनि पाठ त्याला सर्वहि मी सोशितों मुकाट्यानें ॥ ३३ ॥
तैसा तूंहि जगीं या राहे लोकापवाद सोसून ;
सासूचे बोल जसे खडतरही सोशिते बरी सून ॥ ३४ ॥
पर्जन्याच्या धारा, झोंबे अंगास तीव्रतर वारा ;
गारांचा वर मारा, उष्णाचा प्रखर तापही सारा ॥ ३५ ॥
पंचमहाभूतांच्या सांपडतों मी सदा सपाट्यास ;
शिरसावंद्य करीं मी जे जे येतील भोग वांट्यास ॥ ३६ ॥
केला कधीं न त्यांचा कंटाळा मुरडिलें न मीं नाक;
तूंहि तसा वाग; मिळे इहलोकीं सौख्य, शेवटीं नाक ॥ ३७ ।
विद्युत्पात शिरावरिं अडळे, कीं दुःसह प्रभा फांके ;
धाकें भीति धरोनी तरिहि कधीं संकटीं न मी वांके ॥ ३८ ॥
तूंहि तसें धैर्य धरीं, संकटसमयीं भिऊं नको लेश ;
धैर्याच्या शांतीच्या मागें आहे सदा हृषीकेश ॥ ३९ ॥
लोकीं परोपकारा ऐसें नाहींच पुण्य वा अन्य ;
जोडूनि धन्य होतों, तरुवर आह्मीं जरी असो वन्य ॥ ४० ॥
लावुनि मजला रक्षी पशुपासुनि शिशुसमान जो रानें ;
तोडुनि काढी हस्तें कीं जो मारी कुठार जोरानें ॥ ४१ ॥
दोघांवरही माझी आहे वा सममान कीं माया ;
फळ पुष्प पर्ण देतों दोघांनाही करीं बरी छाया ॥ ४२ ॥
हा माझा शत्रु असे, येईल हा मित्र भाउ कामातें ;
ऐसा भाव दुजा हा नाहीं स्वप्नांत ठाउका मातें ॥ ४३ ॥
शोषुनि दुर्गंधातें वायूंतुनि सोडितों बरा वास ;
रंकास फार कामीं येतों मी तेविं थोर रावास ॥ ४४ ॥
क्षुधिताला फळ देतों, तप्ताला देतसे बरी छाया ;
गेला प्राण तरीही सर्पण होवोनि जाळितों काया ॥ ४५ ॥

ऐसें परोपकारीं मजसम तूं झिजविशील जरि आग ;
तरि तुज मोक्ष मिळेलचि विश्वंभर दूर का ? द्विजा सांग ॥ ४६ ॥
सद्गुरु नाहीं ऐसा झालासे व्यर्थ वा तुला भ्रम हा !
स्थिरचर पदार्थ असती द्याया उपदेश कीं समर्थ महा ॥ ४७ ॥
हा स्थीर मंदबुद्धी ह्मणुनी मानूं नको तरूस मज ;
हृदयीं भरूनि ठेवीं उपदेशामृत, मला गुरू समज ॥ ४८ ॥
मत्सम जगांत वागें, स्थीर करी आत्मसंयमें मतिला ;
तेणें साधुत्वाला पावुनि, होशील पात्र सद्गतिला ॥ ४९ ॥
उत्तम बोल तुला हे कथिले याचा विचार करिं नीट ;
सद्बोधामृतपानें सुज्ञजनाला कधीं न ये वीट ॥ ५० ॥
आश्वासुनि भूदेवा ती अंतर्धान पावली मूर्ती ;
सत्यज्ञानें विप्रा वैराग्याची घडे महा स्फूर्ती ! ॥ ५१ ॥
सद्गदित कंठ झाला, अंगीं वैराग्य दाटलें फार,
साष्टांग विप्र तरुतें पूज्यत्वानें करी नमस्कार ॥ ५२ ॥
उल्हासवृत्ति झाली, मनिंचें औदास्य सर्वही सरलें,
पुरली सर्व मनीषा, ज्ञानाचें तत्त्व अंतरीं भरलें ॥ ५३ ॥
झाला थोर महात्मा, साधुगुणाचीच लागली भक्ती,
इहलोकीं सुखि झाला, अंतींही पावला पहा मुक्ती ! ॥ ५४ ॥
तात्पर्य जे कथेचें समजुनि वर्तन जगांत करितील,
साधुत्व पावुनी ते सहजीं भवसिंधुलाहि तरतील ॥ ५५ ॥

---

## स्त्रियांचे गुणधर्म.

भुजंगप्रयात.

पदार्थामधें राहती दोन धर्म, तयावीण कांहीं घडेनाच कर्म ;
गमे वस्तु अत्यंत जी सौख्यदाती, परी होतसे दुःखदाती गदा ती ॥१॥

चिरंजीव आहेत हीं दोन अंगें, दिसूं लागती भिन्नरूपें प्रसंगें ;
सुखाच्या तयामाजिं अत्यल्प वाटा, सदा आदळी दुःखलाटा ललाटा ॥२॥
परी ज्ञान कैसें पहा ह्या जनांचें, मनीं एक घेवोनियां पक्ष नाचे,
सुखामाजिं त्याला नये दुःखगंध, करी मोह सर्वांस हा शुद्ध अंध ॥ ३ ॥
जगीं आवडीच्या जरी वस्तु नाना, तरी श्रेष्ठ ही स्त्रीच वाटे जनांना ;
भुलोनी तिला तोडिती जीव फार, सदा सोशिती दुःखसंसारभार ॥ ४ ॥
तिच्यावाचुनी प्रीतिच पात्र कोण ? जिवाचें तिला होतसे लिंबलोण !
मुखाला तिच्या बोलती चंद्र पद्म, गमे कल्पवल्ली महासौख्यसद्म ॥ ५ ॥
परी सारखी ती कडू आणि गोड; गुणामागुनी तीस एकेक खोड ;
करोनि पहा सूक्ष्म थोडा विचार, तरी अंतरीं शुद्ध येईल सार ॥ ६ ॥
मृदुत्वांत लोण्याहुनी तीच थोर, असे तीच वज्राहुनीहि कठोर ;
किती गोड ती अमृताचीच लूट ! कडू होतसे तैं उगें काळकूट ॥ ७ ॥
दयाळू अशी माय कीं बाप साजे, करी घात तैं शत्रुही तीस लाजे ;
व्रतें जानकी सारखी तीच वागे, कधीं टाकते तीच वेश्येस मागें ॥ ८ ॥
कधीं स्वर्गिंच्या लाजवीते सुखाला, कधीं कालिमा तीच आणी मुखाला ;
उदारांमधें होतसे तीच कर्ण, कधीं देइना वाळलें एक पर्ण ॥ ९ ॥
मुलाचे करी लाड नाहीं सुमार; गुरासारिखें मारते मार मार ;
कधीं कष्ट काढी उगी ना निमेष, कधीं झोंप घे आळशी शुद्ध वेष ॥१०॥
कधीं नम्र बोले जणों काय गाय, कधीं राक्षसी आपटी हातपाय ;
सुशीला कधीं होतसे साधुसंत, कधीं त्राटिका कैकया मूर्तिमंत ॥ ११ ॥
कधीं लाज सोडोनि हांसे अचाट, कधीं लोचनीं अश्रुचा थोर पाट ;
कधीं शांत वृत्तींत संसार मांडी, कधीं आदळी आपटी सर्व भांडीं ॥१२॥
कधीं कंचुकी घालिते फार तंग, कधीं दाखवी सर्व लोकांस अंग ;
सजोनी कधीं लाजवीते नटाला, कधीं घेतसे जीर्ण ऐशा पटाला ॥ १३ ॥
कधीं देव पूजी म्हणे मायबाप, कधीं देत त्याला शिव्या आणि शाप !
भिकाऱ्यास दे वस्त्र रेशीम कांठीं, कधीं लागते काठि घेऊनि पाठीं ॥१४॥
नसे मूल पोटीं तई शुद्ध लाडा, प्रसूती घडे सूकराचाचि वाडा !
कधीं जेविते साखरेशीं तुपाशीं, कधीं पाणिही घोटिना ती उपाशी ॥१५॥

मनीं ठेविता रक्त मासासि जाळी, हिरावूनि घे वीर्यही स्पर्शकाळीं;
क्षणाच्या सुखाच्या मिषानेंच मोहीं, अहा घालिते जन्म हा दुःख डोहीं १६
करी नेम तैं वाहिली जेविं आण, क्षणीं मोडि शब्दास नाहीं ठिकाण !
क्षणामाजिं मागेंच टाकी सतीतें, क्षणीं कोपुनी लाथ मारी पतीतें ॥१७॥
न राहे मुखी एकही गुप्त गोष्ट, कथाया जगाला सदा सिद्ध ओष्ठ;
नसे ठाउकें प्रेम खाती कशाशीं, सदा सर्वदा लोभ ठेवी उशाशीं ॥१८॥
स्त्रियेच्यामुळें तूटती मायबाप, स्त्रियेच्यामुळें थोर संसारताप;
स्त्रियेच्यामुळें होतसे घोर पाप, स्त्रियेच्यामुळें काळजीचाहि चाप ॥१९॥
नको ह्या स्त्रिया लांकडी मृत्तिकेच्या, सदा लाविती पाठिमागें भिकेच्या ;
तयांच्या सुखाचा दिसे मात्र भास, परी शेवटीं खास ये नर्कवास ॥२०॥

---

## भीमकर्मा राघोबा.

शार्दूलविक्रीडित.

झालें युद्ध विरुद्ध पानिपतचें प्राणापहारी महा,
माजे शुद्ध अशुद्ध सागररणीं उत्पात निस्सीम हा ;
सव्वालक्ष बळी धुळीस मिळुनी गेले जयाच्या भरी,
अद्यापीहि थरारती परिसुनी रोमांच आंगावरी ॥ १ ॥

शिखरिणी.

अहा ! दत्ताजीचा चरचर पहा कंठ चिरला,
मराठ्यांचा देवा हरहर ! कसा काल फिरला ;
कसा एकाएकीं प्रिय कुमर विश्वास पडला,
कसा श्रीमंतांच्या निरुपम यशा रोग जडला ! ॥ २ ॥

कसे भाऊ नेटें यवनसमुदायांत घुसले !
जयश्री ही झाली पतित ह्मणुनी काय रुसलें ?

पळाले बाकीचे त्वरित फुटली वाट तिकडे,
प्रसंगीं पोटाला मिळीत कितिकांच्या न तुकडे ॥ ३ ॥
नसे कोणा बंडी कुडकुडत थंडींत पडले,
अरी मागें लागे ह्मणुनि किति झाडींत दडले;
हजारों लोकांचे सतत पळतां पाय सुजले,
कितीकांचे मार्गी रुधिर गळुनी काय भिजले ॥ ४ ॥
अरीनें कापोनी अगणित शिरें ढीग रचले!
महायोद्धयांचेंही बिकटसमयीं धैर्य खचलें;
चलो आगे भागे ह्मणत कडवे शत्रु उठले,
चमू फाटे वाटे चहुंकडुन आकाश फुटलें ॥ ५ ॥

स्रग्धरा.

खाना तोडी न माना अतिकरुणरवें प्रार्थिती लोक नाना,
त्राता ना बायकांना घळ घळ रडती पाहुनी अंतकांना;
याना वाचूनि नाना फडणिस पळती सोडुनी देहभाना,
प्रार्थीती प्राणदाना विकल जन पुसे कोण मानापमाना ॥ ६ ॥
नाना कष्टें उपाशीं निशिदिनिं फिरलें लावुनी राख अंगीं,
देशाचें भाग्य मोठें ह्मणुनिच समजा वांचले त्या प्रसंगीं;
दुर्दैवानें परंतु प्रियतम जननी बापुडी नष्ट झाली!
मोठ्या कष्टांत पत्नी परतुनि नगरा प्राण घेवोनि आली ॥ ७ ॥

शार्दूलविक्रीडित.

झाला घोर अनर्थ घोर पडला घाला मराठ्यांवरी!
होते शूर बलाढ्य होळकरही झुंजार शिंद्यापरी;
झाले भग्न हताश वीर, अवघें खालीं बसे पारडें,
दुःखाग्नी बहु चेतला पसरलें देशांत साऱ्या रडें!

# रावबहादुर पुरुषोत्तम बाळकृष्ण जोशी.

रावबहादुर पुरुषोत्तम बाळकृष्ण जोशी, एफ्. आर्. जी. एस्., जे. पी., यांचा जन्म ता. ५ मार्च १८५६ मध्यें मुंबई मुक्कामीं झाला. हे जातीनें शुक्ल-यजुर्वेदी देशस्थ ब्राह्मण असून यांचें शिक्षण विल्सन कॉलेजांत झालें. सर जेम्स कँबेल यांस मुंबई इलाख्याचे गॅझेटीयर तयार करण्याचे कामीं, तसेंच सर जॉर्ज फॉरेस्ट, मि. एडवर्डस, मि. एंथोव्हेन, मि. जॉकसन् इत्यादि विद्वान् लेखकांच्या ग्रंथांस रावबहादुरांनीं इतिहाससंशोधनद्वारा महत्त्वाचें सहाय्य केलें. त्यांच्या इतिहासविषयक कामगिरीबद्दल सन १९०३ च्या दिल्ली दरबारचे-वेळीं त्यांस ‘ कॉरोनेशन सर्टिफिकेट ऑफ मेरिट ’ मिळालें होतें, आणि सन १९२३ मध्यें मुंबईच्या रॉयल एशियाटिक सोसायटीकडून मुंबईचे माजी गव्हर्नर सर जॉर्ज लॉइड यांचें हस्तें ‘कॅम्बेल मेमोरियल मेडल’ नांवाचें सुवर्ण-पदक रावबहादुरांस अर्पण करण्यांत आलें होतें. हें पदक ज्यांनीं इतिहाससंशो-धनाच्या क्षेत्रांत उत्तम कामगिरी केली आहे अशा विद्वानास प्रत्येक तीन वर्षांनीं देण्यांत येतें. रावबहादुर मुंबई युनिव्हर्सिटीचे फेलो असून, युनिव्ह-र्सिटीच्या मॅट्रिक, स्कूल फायनल व एम. ए, ह्या परीक्षांचे मराठी विषयाचे बरींच वर्षें परीक्षक असत. सन १९२१ सालीं ते कोल्हापूर येथील महाराष्ट्र-कविसंमलनाचे अध्यक्ष होते, व सन १९२६ मध्यें मुंबईस भरलेल्या मराठी साहित्यसंमेलनाचे ते स्वागताध्यक्ष होते. महाराष्ट्र-कवि या नात्यानें त्यांचें नांव अनेक वर्षें प्रसिद्ध आहे. आपल्या वयाच्या १४ व्या वर्षापासून त्यांना मराठी व संस्कृत कविता करण्याचा नाद आहे. त्यांच्या अनेक कवितांपैकीं कांहींचीं नांवें येथें देण्यांत येत आहेतः—भारतवर्षिणी, समाधिशतावली, भरत-खंडाचें भावी स्वराज्य, परिषदाभिनंदन, आनंदोद्गार, श्रेष्ठत्वाचा झगडा, स्वतंत्र्याची महती इ० रावबहादुरांच्या कवितेची रचना प्रौढ हृदयंगम आहे.

## समाधिशतावली.

शार्दूलविक्रीडीत.

ज्यानें यावन सैन्य मर्दुनि सुखी केले मराठेजना,
ज्याची शौर्यपराक्रमस्मृति महा आनंद देई मना;
ज्यानें कष्टवुनी स्वकीय तनुतें सद्धर्म संरक्षिला,
जो गोब्राह्मणदीनपालक असा विद्वज्जनीं गाइला ॥ १ ॥

शिखरिणी.

शिखानष्टा दुष्टां करुनि रणिं शिक्षा निजकरीं,
शिखासूत्राचें जो अवन अमुच्या भूपति करीं;
नृपाची त्या ऐशा शिव! शिव! विभग्ना निरखुनी,
समाधी, कां आधी लवहि नुपजे सज्जनमनीं? ॥ २ ॥
महाराष्ट्रीं ज्यानें निजजन-सुसत्ता बसविली,
अह्मां स्वातंत्र्याची अभिरुचि जयानें कळविली;
नृपाची त्या भग्ना शिव! शिव! समाधी निरखितां,
मराठ्यांच्या चित्तीं नुपजत कशी हो विषमता? ॥ ३ ॥

भुजंगप्रयात.

शिवाची समाधी अहा! भग्न व्हावी!
अम्हांला कशी लाज त्याची नसावी?
स्वदेशाभिमानी सदा जे मराठे,
कुठे गुंतले? झोंप घेतात वाटे! ॥ ४ ॥
कुठें तो असे स्वीय देशाभिमानी,
सुधी रानडे? शूर लोकांस मानी;
कवी जो, करी काय तो राव कुंटे?
जयाच्या पुढें मन्मती फार कुंठे ॥ ५ ॥
कुठें सर्वगामी असे देशमूख?
हराया सदा सिद्ध जो आर्यदुःख;
सभाभ्यंतरीं भाषणें लांब लांब,
कराया न ज्या अल्प लागे विलंब ॥ ६ ॥

असे तैलधी राव तैलंग कोठें ?
करी वाटतें कार्य ता फार मोठें ?
रिकामा नसे एकही तास त्याला,
शिवाजी ! तुझी गोष्ट बापा कशाला ! ! ॥ ७ ॥

अह्मांसारिखे दीन सुज्ञानहीन,
समाधी तुझी पाहुनी होति खिन्न
परी खिन्नता काय कामास येते ?
धनावाचुनी केविं सत्कार्य होतें ? ॥ ८ ॥

शिखरिणी.

शिवाऽऽविष्टाक्लिष्टा शिव ! शिव ! समाधी तव असे !
मराठ्यांच्या कष्टां उपजवि मनीं वृत्त न कसें ?
जयांच्या सौख्यार्थ प्रतिदिन तुझा देह झिजला,
समाधीचा त्यांतें विसर नकळे केविं पडला ! ॥ ९ ॥

शार्दूलविक्रीडित.

शिंदे गायकवाड होळकरहो ! राजे मराठे अहो !
तुह्मी सुज्ञ जरी तरी निजमनीं तुम्हां न कां दुःख हो ?
श्रीमच्छत्रपती–मठस्थिति अहा ! पाहोन ऐकोन वा,
वाटे दुःख जरी, तरी मठ नवा बांधा ! वरा वाहवा ॥ १० ॥
हे श्रीमत्करवीर–भूप–जनका ! हे वीरवंशोद्भवा !
रक्षूनी निजमातुलेयमठ तो जोडा जगीं वाहवा.
श्रीमच्छत्रपती शिवाजी–नृपती नाहीं तुह्मां पारका,
सांगावें न लगे तुह्मांस मग मी, कीं तद्गुणां पारखा ॥ ११ ॥

परद्वीपस्थांचे स्फटिकमय ओंतीव पुतळे,
कराया दावाया परजनिं निजौदार्य सगळें ;
तुह्मी देतां वित्ता स्वजन ! करण्या स्मारक, पहा !
शिवाजीचें, व्हात्री निजमनिं न बुद्धी अहह ! हा ! ! ॥ १२ ॥

मंदाक्रांता.

शत्रूंच्याही स्तविति सुगुणां धन्य ते आंग्लभौम !
धन्या त्यांची स्ववश वसुधा ! धन्य तत्प्रीतिधर्म !
धन्या जी का प्रसवलि तुला डग्लसा माय धन्य !
तैसा मजासि गमसी धन्य तूं रे वदान्य ! ॥ १३ ॥

पाहूनीयां शिवनृपतिची मोडलेली समाधी,
यावी हा ! हा ! ! स्वमनिं करुणा आंग्लभौमास आधीं ;
झाले कीं हो स्वजन अवघे पारखी गाजराचे ?
रत्नें दिव्यें त्यजुनि, गमतें मानिती फार काचे ! ॥ १४ ॥

देशप्रीति प्रखर विलसे ज्याचिया हृत्प्रदेशीं,
नाहीं कीं ह्या स्वजन असला एकही आर्यदेशीं ?
नोहे ! नोहे ! बहुत असती आर्य देशाभिमानी,
गेला त्यांच्या मज गमतसे हा न वृत्तांत कानीं ॥ १५ ॥

देशासाठीं त्यजितिल सुखें प्राणही संकटीं जे,
वीरश्रीची सुरुचिर कला यन्मुखाब्जीं विराजे ;
नाहीं ऐसे निजजनिं तरी आदरायास पात्र-
शूरांतें ह्या बहुत असती भारती आर्यपुत्र ॥ १६ ॥

ऐसें आहे, तरि मग ह्मणीं केसरीकार आतां,
अस्मल्लोकीं प्रकटित करा शीघ्र ते दुःखवार्ता ;
यद्वंशाचें कुशल करण्या वास कारागृहींचा,
केला तुह्मी, मनिं कळवळा कां नसो त्या नृपाचा ? ॥ १७ ॥

तस तुह्मा कविजन अहो ! दामले ! ओक ! कुंठे !
लले ! कानिटकर ! आजि अहां मोगरे मित्र कोठें ?
ओतूनीयां सकरुण वहू वृत्तमाधुर्य गानीं ;
आर्यांच्या तें झडकरि तुह्मी जाउंद्या गान कानीं ! ॥ १८ ॥

कां रे देशी मजासि शिवबा नित्य कां त्रास देशी ?
स्वप्नांमाजीं कथिशि मज कां ‘ जाहलों मी विदेशी ? ’

देऊं कैसें सदन तुजला ? मीं असें द्रव्यहीन,
कांरे मातें शिणविशि उगा ? व्यर्थ कां होशि खिन्न ॥ १९ ॥

जाईं जाईं तुजसि शिवबा काय संबंध माझा ?
मी तों आहे धनरहितसा विप्र, तूं थोर राजा !
सांगूनीयां असुख मजला काय होणार राया ?
नाहीं नाहीं मजसि तुझिया शक्ति दुःखा हराया ॥ २० ॥

ह्यालागीं हे नरपति ! अतां भूप जेथें मराठे,
दिव्यागारीं बसति, असती वित्तसंपन्न मोठे;
जाईं तेथें कथुनि अपुलें वृत्त त्यांतें नृपाळा !
प्रार्थीं त्यां कीं ' नरपति अहो ! क्षात्रधर्मास पाळा !' ॥ २१ ॥

वसंततिलका.

ते मानितील गमतें मजला विनंती,
प्रेमें तुझी नृपति ! कां मग होशि खंती ?
धिःकारितील तुजला जरि ते शिवाजी !
मागें फिरें स्वमनिं मानुनि त्यांस पाजी ॥ २२ ॥

जाईं त्वरें पुढति पुण्यपुरींत राया !
तेथें बहूत असती ! तुज आदराया ;
विद्वान्, सुबुद्धि, निजदेशहिताभिमानी,
त्यांच्या स्वदुःख अवघें मग घाल कानीं, ॥ २३ ॥

ते मानितील गमतें मजला विनंती,
राया ! तुझी, तुजसि देतिल सौख्यशांती ;
होईं असें न जरि, येइ इथें पुन्हां तूं,
ठेवूं नको निज मनीं तिळमात्र किन्तू ! ॥ २४ ॥

मंदाक्रांता.

प्रेमाश्रूनीं सकृदपि सख्या ! सिंचुनी त्वत्समाधी,
चंडांशूच्या प्रखर किरणीं जाहलेली दुराधी ;
आनंदानें हरिन अवघी वंदुनी पादपद्म,
सद्भावानें विरचिन तिथें मी तुला पर्णसद्म ! ॥ २५ ॥

जाई जाई ! तरि मग अतां जाइ वेगें कृपाळा !
भेटे प्रेमें कडकडुनियां आप्तवर्गा नृपाळा;
पाहूनीयां स्वजन तुजला फार होतील तुष्ट,
आनंदानें करितिल तुझें आदरें ते अभीष्ट ॥ २६ ॥

---

## राजे प्रतापवंत विठ्ठल सुंदर.

( सन १९२८ इ. )

( आर्या - गीति )

निजभुजपराक्रमानें मिळविति जे थोर योग्यता लोकीं ॥
त्या नरवीरश्रेष्ठीं विठ्ठल सुंदर नृरत्न अवलोकीं ॥ १ ॥
साडेतीन शहाणे झाले म्हणतात पेशवाईंत ॥
विठ्ठल एक तयांतिल इतिहासज्ञांस हें असे विदित ॥ २ ॥
पहिला सखा शहाणा, विठ्ठल सुंदर दुजा, तिजा देवा ॥
नाना अर्धशहाणा म्हणुनि तिघांचा करी मनीं हेवा ॥ ३ ॥
नसतां साधन कांहीं बुद्धिबलानें महत्त्व संपादी ॥
विठ्ठल भागानगरीं देइ निजामास राज्यपदगादी ! ॥ ४ ॥
कथितों कथा तयांची तरुणीं जी स्वाभिमान वाढविते ॥
दाखविते उन्नतिचा पंथ, कथा तीच आवडे कवितें ॥ ५ ॥
भारत-वर्षीं कितितरि असती हल्लीं खुशामती स्वजनीं ॥
दास्य प्रियतम ज्यांतें परक्यांच्या लागतात जे भजनीं ॥ ६ ॥
त्यांतें कळेल यत्नें शक्य घडे जें अशक्यसें गमतें ॥
दीर्घ प्रयत्न करितां हिंस्त्र श्वापदहि आपणां नमतें ॥ ७ ॥
शुक्लयजुर्वेदाची शाखा माध्यंदिनाख्य जी दुसरी ॥
जींत श्रीज्ञानेश्वर, जन्मुनि गीतार्थ भारतीं प्रसरी ॥ ८ ॥
झालें त्या माध्यंदिन शाखेच्या द्विजकुलामध्यें जनन ॥
विठ्ठल सुंदर याचें अल्पवयीं तत्पित्यास ये निधन ॥ ९ ॥
होय निराश्रित तेणें परि तो सोडी न अंगचें धैर्य ॥
करिन महत्कार्य म्हणे दाऊनि अपुलें रणांगणीं शौर्य ॥ १० ॥

'करितां अटन विदेशीं पंडितमित्रत्व साधितां लोकीं ॥
मनुजा ये चतुराई' सांगति पंडित सुभाषित-श्लोकीं ॥ ११ ॥
करुनि विचार असा, तो सुंदरसुत सोडुनी निजग्रामा ॥
ये पुण्यपत्तनाला विप्रजनांच्या पवित्र विश्रामा ॥ १२ ॥
गुणिजन येति तयांतें आश्रय सानंद पेशवे देती ॥
श्रीमंतांची ऐशी कीर्ति प्रस्तुत दिगंतरीं होती ॥ १३ ॥
याकरितां सुंदरसुत सुंदर नगरांस सोडुनी अन्यां ॥
आला पुण्यपुरीला सौंदर्यें जी जगीं असामान्या ॥ १४ ॥
श्रीमंत पेशव्यांचा बंधु चुलत बोलती जया भाऊ ॥
भेटुनि सांगे त्यातें " आश्रय द्या मज नसे पिता भाऊ ॥ १५ ॥
ठेवुनि निजगेहीं मज मद्गुण लावा तुम्हीं परीक्षेला ॥
आलस्य नावडे मज मागें नच दक्षिणाख्य भिक्षेला " ॥ १६ ॥
सुंदर शिशु हा पाहुनि त्याची परिसूनि सुंदरा वाणी ॥
होय सदाशिव विस्मित आश्रय द्यावा असें मनीं आणी ॥१७॥
'मद्भवनीं तूं राहीं सांगूं जें तें करीत जा काम' ॥
बोलें भाउ तयातें 'मानीं तूं हेंच आपुलें धाम' ॥ १८ ॥
सदनीं सदाशिवाच्या राहे विश्वास यावयाकरितां ॥
झिजवुनि देह निरंतर विश्वास प्रेम जाहला वरिता ॥ १९ ॥
नृपकार्यनीतिकोविद येति तिथें जे अनेक अधिकारी ॥
त्यांचें स्वागत करि हा वाटे विठ्ठल तयांस दरबारी ॥ २० ॥
अधिकार लवहि नसतां परिचित मुत्सद्दि सर्वही यातें ॥
जाणे कोण कुणाचा कोणाचें स्थान कोणतें खातें ॥ २१ ॥
ऐसे क्रमितां बहुदिन एक दिनीं तो म्हणे 'मला न्यावें ॥
श्रीमंतदर्शनाला मद्गुण कौशल्य त्यांस सांगावें' ॥ २२ ॥
भाऊ स्वमनीं आणी विश्वासा योग्य होय बालक हा ॥
पालक आम्हीं याचे राज्यीं गुणिजन हवेत पांच दहा ॥ २३ ॥

घेऊन विठ्ठला मग सत्वर तो जाय पेशव्यांनिकट ॥
तद्गुण वर्णुनि सांगे आम्हां हा वीर लाभला फुकट ॥ २४ ॥
निकट श्रीमंतांच्या वास करायास हा असे उचित ॥
कटकीं थोर पराक्रम करुनी दावील वाटतें खचित ॥ २५ ॥
पंतप्रधान मग त्या शिशुतें बोले 'कथीं तुझें नाम ॥
कुल, गोत्र, कोण जाती, कोण पिता, काय तो करी काम' ॥२६॥
'माता पिता नसे मज, विठ्ठल सुंदर ' असें मला म्हणती ॥
ऐकून कीर्ति अपुली आलों करण्या भवत्पदीं प्रणती ॥ २७ ॥
पूर्वजकीर्ति न वर्णीं मद्गुण पाहून द्या मला जागा ॥
दाविन करुनि पराक्रम निज कर्तव्यींच मीं सदा जागा ॥ २८ ॥
कात्यायन सूत्र असे गोत्र तसें वत्स पंच ज्या प्रवर ॥
माध्यंदिन शाखेचा मम जनिता सुंदराख्य विप्रवर' ॥ २९ ॥
" वेद तुझा काय यजुः ? माध्यंदिन भिक्षुकीं तुझी गणती ॥
'माध्यंदिनाः समस्ता बुद्धिविहीनाः' असें जगीं म्हणती ॥ ३० ॥
याचकवृत्ती तुमची घेतां खांद्यावरी सदा पडशी ॥
समरीं करुनि पराक्रम भिक्षुक तूं केंवि दाविशी सरशी ?" ॥३१॥
नानाचे बोल असे विठ्ठलहृदयास शल्यसे रुतले ॥
सुटलें न धैर्य त्याचें त्यास पुसे " पेशवे तुम्ही कुठले ! ॥ ३२ ॥
आम्हां देशस्थांची नच ही तुमची असे खरी गादी ॥
पंतप्रधान पदवी हरुनी अमुचेच जाहलां वादी ! ॥ ३३ ॥
पूर्वज तुमचे सारे हरकारे हें नसे कसें ठावें ? ॥
निजकुलपरंपरेतें विसरुनि इतरांस काय निंदावें ॥ ३४ ॥
जातिद्रोह न बरवा तेणें राज्यास लागते कीड ॥
भिड कशाला तुमची, तुमची आली असे मला चीड ॥ ३५ ॥
शौर्यश्रेष्ठत्वाच्या करितां तुम्हीं कशास हो गमजा ॥
करुनि पराक्रम तुमचा उतरिन उन्माद हें पुरें समजा ॥ ३६ ॥

पूर्वज बुडवी सिद्धी म्हणुनि पितामह पळे इथें तुमचा ॥
आश्रय देशस्थांचा त्यास मिळे द्विज पुरंदरे यांचा ॥ ३७ ॥

ज्यांनीं अन्ना दिधलें त्यांच्या घरचेच मोजिले वासे ॥
निंदुनि धन्यास त्याचे सेवक होतात पेशवे खासे ॥ ३८ ॥

राजा सातान्याला पुण्यपुरीं तत्प्रधान कां राही ? ॥
सेवक होउन मालक, राजपदाची पिटी जगीं द्वाहीं ॥ ३९ ॥

याहुनि कृतघ्नतेचा अधिक दुजा सांपडे कुठे नमुना ? ॥
पावन चित्त कराया शक्त न भीमा न जान्हवी यमुना ! ॥४०॥

समरीं तुम्हांस दाविन माध्यंदिन बुद्धिहीन कीं सुमती ॥
मतिमंद ते हिऱ्यातें कांचमण्याच्या समान जे गणती ॥ ४१ ॥

प्रणती ही शेवटची आश्रय तुमचा नको नको मजला ॥
लाक्षाश्रयें न वाढे सोन्याचें तेज जें नसे *जतुला ॥ ४२ ॥

मोडीन खोड तुमची करुनी राज्यांत या घडामोडी " ॥
बोलून शब्द ऐसे सुंदरसुत सत्वेर पुणें सोडी ॥ ४३ ॥

भागानगरनिवासी भांडति ते बंधु एकमेकांशीं ॥
कार्य करावें मोठें धरुनी त्यांतील एक हाताशीं ॥ ४४ ॥

अवरंगाबादच्या दुर्गी अल्ली निजाम हा होता ॥
भेटायातें त्यातें सुंदरसुत बेत जाहला करिता ॥ ४५ ॥

जाउन त्या नगराला भेटे तेथील थोर सरदारां ॥
लोभ तयांचा मिळवि अपुली अर्पून वाक्सुधा मधुरा ॥ ४६ ॥

होते त्या दुर्गाला दरवाजे सात पाहरे सात ॥
सैनिक रक्षक तेथें परक्याला केंवि जावेवे आंत ? ॥ ४७ ॥

बुद्धि जया तीव्र असे सिद्धि तया शीघ्र लाभते म्हणती ॥
सबलहि मतिमंदत्वें धृतिला सोडूनि भीतिला वरिती ॥ ४८ ॥

विठ्ठल म्हणे मनीं कीं स्नेह करिन याच सैनिकांसंगें ॥
करुनि प्रवेश दुर्गी करिन निजामास निद्रिता जागें ॥ ४९ ॥

* लाखेला

यानंतर सुंदरसुत जाय निरंतर बसे महाद्वारीं ॥
रक्षक लोकां सांगे आहें ब्राह्मण गरीब मीं भारी ॥ ५० ॥
चंची सोडुन विठ्ठल पानसुपारी तयांस दे हातें ॥
अल्पावधींत जोडी मित्रत्वाचें तयांसवें नातें ॥ ५१ ॥
मित्रांसंगें जाई विठ्ठल असकृत् बघावया दुर्ग ॥
ध्यानीं आणी अपुल्या किल्ल्यांतिल गुप्त कोणते मार्ग ॥ ५२ ॥
एक दिनीं तो गेला प्रातःकाळीं जिथें निजाम बसे ॥
करुनि सलाम तयातें विनयानें त्यास हा सवाल पुसे ॥ ५३ ॥
" मालक असतां तुम्ही सोशितसां ताप हा उन्हाचा कां ?
हा राज्यशकट तुमचा गति देउनि चालवा स्वयें चाकां ॥ ५४ ॥
अटकेंत कां रहावें असतां सामर्थ्य आपुल्या अंगीं ॥
मर्मस्थलभेदानें मातंगालाहि मारिते मुंगी ॥ ५५ ॥
संतत यत्न करावे धैर्यानें फळ मिळे यथा काळीं ॥
करुनि पराभव समरीं अरिंचीं वक्त्रें करा त्वरें काळीं " ॥५७॥
अली म्हणे " खरें हें, स्वातंत्र्याची कळे मला महती ॥
परि मत्प्रयत्न सारे साह्यावांचून सर्वथा फसती " ॥ ५७ ॥
'साह्यास सिद्ध मी परि द्यावी आपण अशी स्वयें शपथ ॥
विसरेन नच कधींही सुंदरतनयास दावि जो सुपथ' ॥ ५८ ॥
'दोघांनीं ही घ्याव्या शपथा कीं स्नेह आज जो जडला ॥
भंगेल नच कधींही' अली उत्तर असें तदा वदला ॥ ५९ ॥
घेती मग ते शपथा धरुनी सब्जा करीं तशी तुळस ॥
" स्नेह निरंतर वाढो दोघांच्याही नसो मनीं किळस " ॥६०॥
यानंतर सुंदरसुत वेंचुनि रत्नें हिरे निजामाचे ॥
ठेवी शूर शिपायी समरीं लढण्यास हेच कामाचे ॥ ६१ ॥
एक हजार असे मग उत्तम योद्धे प्रगुप्त तो ठेवी ॥
होउन नायक त्यांचा गुप्तपणें गुप्त मार्ग समजावी ॥ ६२ ॥

एक दिनीं मग सारे करुनी एकत्र घातला हल्ला ॥
अल्ला अल्ला म्हणतां रक्षक मारून घेतला किल्ला ॥ ६३ ॥
" जय विठ्ठल " जन म्हणती विठ्ठल सुंदर खरें तुझें नांव ॥
बुडत्यास तारण्याला घेउन आलासि वाटतें नाव ॥ ६४ ॥
' सुंदर केली करणी ! केलें त्वां आपुलें खरें नाम ' ॥
अली आलिंगुन त्या बोले ' होईल आपुलें काम ' ॥ ६५ ॥
नूतन रक्षक ठेवी दुर्गावर आसपासचे प्रांत ॥
अल्पायासें झाले सारे सुंदरसुतास हस्तगत ॥ ६६ ॥
हें वृत्त श्रुत होतां भागानगरांत अलिचा भ्राता ॥
भयभीत होय बोले अल्ला अलीस जाहला त्राता ॥ ६७ ॥
सिद्ध करी निजसेना शीघ्र निघे विठ्ठलास जिंकाया ॥
शंका येती चित्तीं अल्ला रक्षील काय ही काया ॥ ६८ ॥
कळतांच वृत्त, विठ्ठल घेउनि सेना निघे पुढें जाया ॥
रिपुसंहार कराया किंवा समरीं त्यजावया काया ॥ ६९ ॥
जाउनि निशीथसमयीं छापा घालून अलिचा बंधु ॥
पाठविला स्वर्गाला " जय विठ्ठल " वीर गर्जले हिंदु ॥ ७० ॥
भागानगरीं स्थापी राज्यपदीं तो स्वयें निजामाला ॥
अली म्हणे " मला हा आला सन्मित्र फार कामाला " ॥ ७१ ॥
विठ्ठल वजीर केला देउनि सन्मान भूषणें भारी ॥
" राजे प्रताप-वंत "हि पदवी दिधली प्रचंड दरबारीं ॥ ७२ ॥
अपमान पेशव्यानें केला त्याचें घडे तया स्मरण ॥
" जिंकीन पेशव्यातें येवो युद्धांत अन्यथा मरण " ७३ ॥
निश्चय करुनि असा मग नेउनि राज्यांत शत्रुच्या सेना ॥
धारातीर्थी रिपुचे संहरिले वीर त्यां नसे गणना ॥ ७४ ॥
तिसऱ्या स्वारीमध्यें पाहुनि विठ्ठल-पराक्रमास, पळे ॥
श्रीमंताची सेना, पळतां दादास मार्गही न मिळे ॥ ७५ ॥

पडतां राघु भरारी ह्याच्या दृष्टीस धांवला पुढती ॥
पकडुनि तया पुसे कीं माध्यंदिन बुद्धिहीन कीं सुमती ? ॥ ७६ ॥
करिसह धरिला दादा, दादा पडतांच विठ्ठला-हातीं ॥
श्रीमंताची सेना मावळली जेवीं वायुनें वाती ॥ ७७ ॥

उरले सुरले सैनिक धांवत जाऊन पेशव्यांपाशीं ॥
सांगति सकंप " सांपडले शूर शत्रुच्या पाशीं " ॥ ७८ ॥

भयभीत सर्व झाले माधवजी* बोलवूनि सरदारां ॥
बोले " दादा जातां मुकलों सारे गमे घरां दारां !" ॥ ७९ ॥

इतक्यांत वृत्त आलें अह्मी घेऊनि सैनिकां फिरला ॥
गोदेच्या पैलतिरीं विठ्ठल सुंदर अलीकडे उरला ॥ ८० ॥

×मल्हारी मग बोले विजयाला वेळ चांगली गमते ॥
श्रीमंतांसह जाउनि घाला घालूं समस्त एकमतें ॥ ८१ ॥

श्रीमंतांची सेना गुप्तपणें जाय विठ्ठलानिकट ॥
भ्याला न अल्प परि तो जरि तें होतें विभागलें कटक ॥ ८२ ॥

युद्धास सिद्ध झाला, झाला संग्राम घोर त्या काळीं ॥
धैर्यें शौर्यें लढतां त्यास अस्मात लागली गोळी ॥ ८३ ॥

हर ! हर ! विठ्ठल गेला ! सुंदर हें वीररत्न हारपलें ! ! ॥
भागानगरविभूषण एका निमिषांत नष्टसें झालें ! ! ॥ ८४ ॥

विठ्ठल ! विठ्ठल ! म्हणुनी करिति मराठे विलाप, ते यवन ॥
स्तविती प्रताप त्याचा अह्मीला शून्य जाहलें भुवन ॥ ८५ ॥

जें स्वावलंबनाचा बोध करायास सर्वथा उचित ॥
तें सुंदरतनयाचें अति सुंदर संपलें इथें चरित ॥ ८६ ॥

---

* माधवराव पेशवे. × मल्हारराव. होळकर

## अहल्याबाई आणि मुक्ताबाई.

अहल्याबाई— साक्या.

"सोडीं सोडीं, सोडीं वेडे व्यर्थ दुराग्रह सोडीं !
भूलोकीं ह्या करुनि सत्कृती कीर्ति अखंडित जोडीं ॥ १ ॥
तुजविण जिवलग कोण सखे ! मज ? कोण प्रियतम अन्य ?
धरुनि निजमनीं सौजन्यातें वचन करी मम मान्य ॥ २ ॥
इंदुमुखी ! तव चंदनशीतल सुंदर कोमल काया ;
हर ! हर ! मुग्धे ! दग्ध करूनी दुखविशि जीवा कां या ॥ ३ ॥
हत्ती, घोडे, रत्नभूषणें देइन तुजला बाळे !
दासी होउन राहिन तव मीं, जाउं नको वेल्हाळे ॥ ४ ॥
पुरविन सर्व मनोरथ तव हें देइन राज्य तुला मीं ;
इंदुरनगरीं इंदुमुखी ! तूं राही सुंदर धामीं ॥ ५ ॥
नाजुक कोमल काया तव जे अरुणरश्मिनें तापे ;
सोशिल कैशी पावकतापा ? हृदय सखे ! मम कांपे ॥ ६ ॥
हंत ! हंत ! गे कृतांत तुजला वाटे कसा पसंत !
आत्मघात अति अनुचित ह्मणती लोकीं संत महंत ॥ ७ ॥
ईशें दिधला देह न त्याचा आपण नाश करावा ;
आत्मघात कां करुनि निजशिरीं पातकपर्वत घ्यावा ॥ ८ ॥
अभिमन्यूची सुंदर ललना प्रियपतिविरहा सोशी ;
सहगमनातें न करीं ऐसें कृष्ण तिला उपदेशी ॥ ९ ॥
आठिव निजमनिं सर्व सखे ! तें कलियुगकाळिं तशांत ;
सहगमन श्रेयस्कर ह्मणति न, साधू सज्जन संत ॥ १० ॥
तुजविण वत्से ! 'मुक्ते!' ऐशी हांक कुणातें मारूं ?
हर ! हर ! कैशी राहुं एकटी ? कैसें दुःख निवारूं ॥ ११ ॥
कोण सखे ! प्रिय मंजुळ वचनीं मच्चिता रिझवील ?
कोण तुझ्याविण मम हृदयांतिल दुःखाग्नी विझवील ॥ १२ ॥
आला दाटुन कंठ सखे ! मम नेत्रीं अश्रु वहाती ;
व्याकुळहृदया झालें, घेशी अपमृत्यू कां हातीं !" ॥ १३ ॥

मुक्ताबाई:—

'जननी! मज तूं उपदेशिशि तें यथार्थ आहे सारें;
परि असती ह्या मृत्युलोकिंचे व्यर्थचि सर्व पसारे! ॥ १४ ॥

टाकुनि गुंतविशी मज कां गे? मोहजालमय पाशा;
प्रियपति टाकुन ठेवूं कैशी वित्तसुखावर आशा ॥ १५ ॥

देशी मज जरि राज्यपद तरी कोणासंगें भोगूं?
पतिविण सांगें कोणासंगें सुखदुःखास विभागूं? ॥ १६ ॥

' पति स्त्रियांचें उत्तम दैवत, पतिच्या ठायीं प्रेम;
ठेवुन अनुदिन तत्पद्सेवा करणें हाचि सुधर्म' ॥ १७ ॥

ऐसें उपदेशिशी पुरा मज, काय नसे तुज ठावें?
आतां जननी! कसें तुवां हें तद्विपरीत वदावें? ॥ १८ ॥

पावकताप सुदुःखद ऐशी धरिशी का तूं भीति?
आर्यजनांच्या अबला न कधीं पावकतापा भीती! ॥ १९ ॥

जन्मुनि उत्तम आर्यकुळीं म्यां सहगमना कां भ्यावें?
पतिसह जाउन सतीपदातें कां न सखे! मिळवावें? ॥ २० ॥

नेत्रातुन तव टपटप गळती अश्रू सखे! किमर्थ!
टाकुं नको मज मायाजाळीं साधूं दे परमार्थ! ॥ २१ ॥

जातें स्वर्गी आनंदानें मग कां होशी खिन्न!
देई मजला अनुमति सदये!! होई सखे! प्रसन्न. ॥ २२ ॥

देतिल मजला मान सखे! त्या वृंदारकगणनारी,
पाहिन वंदिन नंदननायक विधि माधव मदनारी ॥ २३ ॥

येतें आतां लोभ असूंदे! खेद न चित्तीं मानी,
प्रियपतिसंगें स्वर्गी जाइन बैसुन दिव्य विमानीं" ॥ २४ ॥

## मृत्यु.

वसंततिलका.

हा नाथ नाथ वदतां असु पंच ज्यांचे, शोकानलीं अनिश विप्लुत होति साचे;
ह्याकारणें करिति ज्या तव चिंतनातें, कां दाविशी न मुख त्या विधवाजनांतें ?
ज्यांचीं अतीव मृदु कोमल रम्य अंगें, केलीं विदग्ध सुतराम् मदनें अनंगें;
द्यावें तुवां सदय होउन दर्शनातें, ह्याकारणें करिति ज्या तव चिंतनातें.
ज्यांचीं विशुद्ध हृदयें नवनीतकल्प, अत्यंत कोमल जयांत नसे विकल्प;
झालीं विदीर्ण शतधा पतिच्या वियोगें, ज्या वांच्छिती पतिसमागम मृत्युयोगें
'हे वल्लभासुहर ! अंतक ! हे कृतांत ! हे मृत्युराज ! मज भेटवि तूर्ण कांत !
ह्या रीतिनें करिति ज्या तव चिंतनातें, कां दाविशी न मुख त्या विधवाजनांतें
वासंत ते पवन मंद विमंद येती, संताप वारुन जनांस सुखी करीती;
ते भासती परम तापद ज्या स्त्रियांतें, त्यांच्या किमर्थ हरिशी प्रिय वल्लभांतें
तें कंचुकीरहित ह्यास्तव खिन्न साचें, होऊन युग्म गमतें सुपयोधरांचें;
देई निरंतर जयां विपुल व्यथेतें, हा ! हंत ! कां हरिशि त्या तरुणीपतींतें ?
आकांक्षिती जन तयांजवळीं न जाशी, जे भीति त्यांसचि बळें स्वगृहास नेशी;
ह्या कारणास्तव मिळे तुजला न मित्र, मृत्यो ! जनां तव कृती गमते विचित्र !!

पृथ्वी.

नवांकुरितयावना द्विजवधू सुचंद्रानना,
स्वकीयपतिसंगमातुरमना, मनीं कामना;
अनेकविध योजिती रतिसुखार्थ, तों दुष्ट हा,
त्वदीय गण येउनी प्रियपतीस नेतो अहा ! ! ॥ ८ ॥

सुविप्रगतभर्तृका गति कठीण बा संप्रति,
तयांस करवे सख्या ! न च पुनर्विवाहाप्रति;
ह्मणून तरुणीसती–पतिसवें न लोभा धरी,
जगांत असती बहू तुजसि योग्य त्यां आदरी ॥ ९ ॥

वसंततिलका.

जे झीजविति निजदेह परोपकारीं, ज्यांला स्वदेशजननी प्रिय होय भारी;
रत्नें सुदुर्लभ अशीं ह्मणि चोरण्यातें, लज्जा न केविं गमते तुझिया मनातें ?
नेला ह्मणी स्वसदनास गणेशपंत, तो वासुदेवसुत आर्यजनां पसंत
ज्याच्या कृती अहह रत्न असें हरावें ! मृत्यो अशा अनुचिता नच आचरावें.

मंदाक्रांता.

गुंफूनीयां रुचिर अवघीं शब्दमाधुर्यरत्नें,
ज्यानें माला रचुनि विमला मोददा सुप्रयत्नें ;
अर्पूनीयां सुरुचिरमहाराष्ट्रभाषावधूतें,
'अस्मद्भाषा प्रियपति' असें जोडिलें रम्य नातें ॥ १२ ॥

देशप्रीति प्रखर विलसे ज्याचिया हृत्प्रदेशीं,
व्हावी वाटे निजमनिं जया स्वीयसत्ता स्वदेशीं ;
अस्मद्देशास्थिति बघुनि जो खेद अत्यंत पावे,
हा ! हा ! ऐशा बुधतुतनरा काय मृत्यो हरावें ! ॥ १३ ॥

पृथ्वी.

करीति अधमा कृती, बुधजनांस संत्रासिती,
धनांध, विषयांध, भू-वरि कृतांतसे भासती;
तुझी अनुकृति स्वयें करिति, मित्रता त्यांसवें
करून, सदनास ने जमवि रम्य नातें नवें ॥ १४ ॥

---

## स्वप्नांतील हिमालय.

शार्दूलविक्रीडित.

ज्याचीं तुंग सुरम्य दिव्य शिखरें मेघोदरां भेदिती,
प्रालेयान्वित जीं गभस्तिकिरणीं रौप्याकृती भासती;
नाना दिव्य सुगंध पादप लता पुष्पें फळें शोभतीं,
यत्प्रांतीं, स्तविती कवीश्वर ज्या जो भूधरांचा पती ॥ १ ॥

वसंततिलका.

ज्याची पर्वतीं त्रिपुरनाशक शूळपाणी, सर्वस्व घेइ पण जिंकुनि जै मृडानी;
होऊन रुष्ट परिवर्जुनि भामिनीला, झाला उमापति पुरा वश भिल्लिणीला,
ज्याचा पुराण महिमा कथिती पुराणें, ज्याच्या शिरीं बसुनियां बहु रंक राणे;
गेले करून सुतपा प्रभुच्या पदातें, यावें सकृत् बघुनि त्या हिमपर्वतातें.

इंद्रवज्रा.

चित्तीं धरूनी दृढ निश्चया या, गेलों त्वरें पर्वतराजठायां ;
पाहून शोभा कमनीय त्याची, झाली विचित्र स्थिति मन्मनाची ॥ ४ ॥

उपजाति.

अवर्ण्य आहे गिरिराजशोभा, कवी कशी वर्णिल तद्यशोभा !
वृक्षांचिया तेथ असंख्य जाती, मेघोदरें भेदुनि उंच जाती ॥ ५ ॥

वसंततिलका.

कित्येक सुंदर सुधाकर पुष्पवृक्ष, गंधें जयीं जपति षट्पद लक्षलक्ष ;
भृंगांस तृप्त करिती मधुपानदानें, गुंजारवा करिति षट्पदही सुखानें. ६
मंदार, कुंद, कटुलिंब, सुरू कदंब, दाडिंब, देवतरु, सुंदर ते बिलिंब ;
विस्तीर्ण तुंग वट, पिप्पल सौख्यदायी, नेत्रांस हर्ष बहु दे घन आंबराई. ७

द्रुतविलंबित.

बहुविधा सहकार विराजती, शुक पिका वरि नाचति कूजती ;
उडति बागडती वरि माकडें; पसरिती कर आम्रफळांकडे ॥ ८ ॥

वसंततिलका.

त्या उंच नीच दिसती फळवृक्षहारी, हे साग शीसव किती घनदाट भारी
ते दीसती खदिरपादप यूपयोग्य, यूपा करूनि अमरीं वरिलें सुभाग्य, !
ह्या रम्य नूतनवयस्क–लता सकामा, रम्याकृती निजपती–सहकार–धामा;
सानंद येति परिरंभिति वल्लभातें, कामातुरां विरहदुःख न सोसवे तें.
हे दीसती पुढति पादप चंदनाचे, ज्यांच्यावरी भुजगवृंद सहर्ष नाचे;
तत्सौरभा भुलुनि सोडिति ना तयांतें, त्यांच्या सवें जमविती प्रियमित्रनातें !

हे झीजवीति निजदेह परोपकारीं, जाणून नागगण होति तयीं विहारी;
देती न दुष्ट करुं त्यास परोपकारा, सत्कार्यभंजक सुदुर्जन-वृंद सारा! १२
हें गौरिशंकर तरी किति उंच आहे! कैलास काय गमतें गगनांत राहे!
वस्त्रें करूनि हिरवीं परिधान, योद्धे, मेघासवें करिति हे जणुं काय युद्धें! १३
हे नीच पांक्ति दिसते धरणीधरांची, वाटे चमूच जणुं हे नग-सैनिकांची!
पूर्वोक्ततुंगगिरि ह्या गमती चमूचे, सेनापति प्रबल संगरधीर साचे. १४
वारिप्रवाह जणुं हे मधुर स्वरानें, संगीत गाति बहु तोषविती स्वानें!
कर्णेंद्रियांस, मृगशावक हे समस्त, वारिध्वनि श्रवुनि नाचति हर्षयुक्त!! १५

भुजंगप्रयात.

पुढें दृष्टि टाकीं दिसे रम्य झाडी, वरी शोभती दिव्य पुष्पें पहाडी;
मधें दीसली रम्य जागा बसाया, जणूं दर्शवी 'पांथ येथें बसा या!' १६

पृथ्वी.

क्षणैक तयिं बैसलों मग करीं मनीं कल्पना,
पुरा वसति सन्मुनी गिरिशिरीं न त्या जल्पना;
पुरा कुणि मुनी करी स्थळ करावया हें तपा,
अहा! किति सुरम्य हें! हरि तरी किती आतपा!॥ १७॥

वसंततिलका.

हें भासतें मज लतागृह सृष्टिजन्य,आहे किती तरिहि ईश्वर हो वदान्य!
चिंतावया सुमुनि येति वनीं पदांतें, जाणून निर्मि रमणीय लतागृहांतें! १८

भुजंगप्रयात.

इथें सन्मुनी चालवी अग्निहोत्र, असें दर्शवी शेषरक्षा पवित्र;
मुनीचें किती जीर्ण हें व्याघ्रचर्म! जयीं बैसुनी चालवी नित्यकर्म ॥१९॥

वसंततिलका.

ह्या डूलती वनलता मृदु पुष्पहारीं, हीं श्वेत ताम्र पिवळीं मधुयुक्त सारीं;
त्यांना कितीतरि सुगंध विमंद वाहे! हें स्थान सौख्यद किती रमणीय आहे!

मालिनी.

सकळ पळति चिंता चित्त होई प्रसन्न,
सुखद उटजिं ऐशा कोण होईल खिन्न ?
विसरुनि मन जातें दुःखशोकादि सारें !
विफल गमति तेथें संसृतीचे पसारे !! ॥ २१ ॥

भुजंगप्रयात,

अहा ! या अशा येउनी रम्य जागीं, गमे ज्या न आनंद तो दुःखभागी;
सदाचा ! जरी ठेविलें इंद्रलोकीं, तयाला तिथें सौख्य कैचें विलोकीं ! ॥२२॥

---

## परिषदभिनंदन.

वसंततिलका.

स्वातंत्र ज्यांस अमृतासम गोड भासे । देशाभिमानरवि यदूहृदयीं प्रकाशे ॥
श्रीशारदा भजति एकमतें जयातें । संप्रेषितों प्रणति त्या नवभूजनांतें १
हा थोर हा लघु असें न गमे जयांतें । सारे समान सकलां प्रियबंधुनातें ॥
लोकोपकार करिती रचुनी कलांतें । संप्रेषितों प्रणति त्या नवभूजनांतें २
यद्भूमिकेंत अतिनूत्न विचार युक्ती । यंत्रें नवीन पहिलीं उदयास येतीं ॥
देती सुविस्मयहि हर्षहि जे जगातें । संप्रेषितों प्रणति त्या नवभूजनांतें ३
मोठें प्रदर्शन करून जगास द्याया । सुज्ञान हर्ष बहु विस्मय, रंकरायां ॥
पाचारिती स्वनगरीस पहावयातें । संप्रेषितों प्रणति त्या नवभूजनांतें ४
सद्धर्म सर्व जगतास सुखें कळावा । चित्तीं धरून असल्या सुपवित्र भावा ॥
जे स्थापिती विबुध धर्मसभेस त्यांतें । संप्रेषितों प्रणति मी नवभूजनांतें ५
झाले महापुरुष ह्या जगतीं अनेक । वाशिंग्तनासम तयांत न थोर एक ॥
तद्देशबांधव तुह्मी तुमचें सुभाग्य । वर्णावयासहि असें बहु मी अयोग्य ॥
दासत्व गोड अमृतासम ज्यांस वाटे । देशाभिमानरति यद्हृदयीं न दाटे ॥
स्वप्रांत ऐक्यरुचि ज्यांस नसे मिळाली । विद्याकलाधन जयां त्यजुनी पळालीं

धर्मैक्य टाकुन जयीं बहु धर्मभेद । केले, निरंतर तसेच वितंडवाद ॥
जे वाढवीति बहु धर्ममिषें जनांतीं । झाल्या जयांत लघु थोर असंख्य जाती॥
सोडून विश्वपरिपालक एक देव । जे पूजिती अमित देव धरून भाव ॥
ते भारतस्थजन, बांधव मी तयांचा । कर्मावरी भरंवसा अति फार ज्यांच्या॥
ऐसें असून मग मी करण्या तुह्मांतें । धर्मोपदेश नयकोविदधार्मिकांतें ॥
कैसा धजेन? मज कां लव लाज नाहीं । कैसें हसूं मग नये? मजला जनांहीं॥
तत्रापि मान्य करुनी तुमची विनंती । आल्यादरें निजमनीं प्रियबंधुभक्ती ॥
ठेवून मी कथितसें विनयें तुह्मांतें । हे दोन शब्द नयकोविदबांधवांतें ११

शार्दूलविक्रीडित.

झालें भारतखंड आज जरि हें सर्वोपरी धाकुटें ।
झाले धर्मविचार ह्यांत जितुके तैसें न झालें कुठें ॥
झाल्या धर्मसभा असंख्य इकडे धर्मावरी पुस्तकें ।
झालीं फार पुरा विवाद ऋषींनीं केले महा कौतुकें ॥ १२ ॥
झाले वादविवाद फार इकडे त्यांच्यामुळें फायदे ।
झाले भारतभूमिकेस, न सुधी कोणीहि ऐसें वदे ॥
धर्माच्या विषयीं विवाद करणें वाटे न मातें भलें ।
सर्वांला गमतो स्वधर्म बरवा जें आपुलें चांगलें ॥ १३ ॥
हिंदूला गमतें जगांत न दुजें वेदापरी चांगलें ।
ख्रिस्ती बोलति ईश्वरेंच अपुलें सच्छास्त्र आह्मां दिलें ॥
वाटे त्या यवनां पुराण न दुजें त्यांच्या कुराणाविना ।
अग्न्यर्चा अति पुण्यदायक गमे त्या पारसीकां जनां ॥ १४ ॥
ख्रिस्ती ते म्हणती जगास न दुजें येशूविना तारण ।
देवाचा सुपवित्र पुत्र करितो दुष्पापसंक्षालन ॥
तैसी सद्गुरुवांचुनी म्हणति ते हिंदू न मुक्ती मिळे ।
लागा तच्चरणीं तरीच तुमची दुष्पापबाधा टळे ॥ १५ ॥
ज्यानें सर्व जगास ह्या विरचिलें शोधावया त्याजला ।
जाणें दूर नको असे सकळिकांच्या तो हृदीं स्थापिला ॥

त्याचें ध्यान करावयास न लगे मध्यस्थ कोणी दुजा।
रावापासुन रंकही करूं शके त्याची सुभावें पुजा ॥ १६ ॥
हिंदू, पारसि, जैन, चीन, अवघे ज्याची असों लेंकुरें।
राहों ह्या जगतीं सुखें सकळही ज्याच्या कृपा-पाझरें॥
घ्यावें त्या सदयास कां न सकळीं सोडूनियां मत्सरा ?।
स्थापावी नच कां अशी सुपरिषद् सर्वां जिथें आसरा ? ॥ १७ ॥
हें सत्कार्य करावयास दिसते तुह्मांविना योग्यता।
राष्ट्रातें दुसऱ्या न अल्पहि खरी तुम्हाकडे सिद्धता॥
आहे सर्व, करा प्रयत्न करण्या धर्मैक्य ह्या भूतली।
स्थापूनी नवभूमिकेंत* परिषद् सद्बोधिनी चांगली॥ १८ ॥

इंद्रवज्रा.

स्वार्थार्थ सत्ता परक्या जनांची। हरून जीं वाढविती स्वतःची॥
राष्ट्रें न तीं पात्र करावयातें। सुबोध धर्मी इतरां जनांतें॥ १९ ॥
लक्षावधि सैनिक बाळगूनी। साऱ्या जगाची करितात हानी॥
राष्ट्रें न तीं पात्र करावयातें। सुबोध धर्मी इतरां जनातें॥ २० ॥

स्रग्धरा.

स्वातंत्र्याची सुमाता अभिनव वसुधा पूण्यभू स्वर्णदात्री।
दासत्वाची पाहतां तटतट तुटती बंधनें जीस नेत्रीं॥
सर्वस्वीं तीच आहे सुरुचिर तुमची भूमिका पात्र व्हाया।
दीक्षा सद्धर्ममार्गी, सकलहि जगतीं शांतता वाढवाया॥ २१ ॥

उपजाति.

सर्वेश होऊन तुह्मां प्रसन्न। सिद्धीस नेवो तुमचे प्रयत्न॥
ज्यांचा झिजे देह परोपकारी। सदा तयां ईश्वर साह्यकारी॥ २२ ॥
वैधव्य-दावानल-दग्ध-गात्रा। मुग्धा सदाचारवती पवित्रा॥
अनाश्रिता भारतभूमि-बाळा। अनंत दुःखें क्रमितात काळा॥२३॥
दयार्द्र होऊन तुह्मीं तयातें। द्यावें त्वरें उत्तम आश्रयातें॥
असें जनातें करुण स्वरानें। विज्ञापिलें त्या विदुषीस्वसेनें॥ २४ ॥

* पं. रमाबाईची विधवा विषयक अमेरिकेंतलि कामगिरी.

ऐकून वार्ता भगिनीजनांची । वैधव्य-दावानल-पीडितांची ॥
दयार्द्र चित्तें नवभूजनाचीं । झालीं, न तैसीं निज बांधवांचीं !॥२५॥
स्थापूनियां भारतभूमिमाजी । तें शारदामंदिर सत्समाजीं ॥
युग्मज्जनीं मेळविलें यशातें । वर्णुं किती मी तुमच्या कृतींतें ॥ २६ ॥
सदा असा लोभ अखंड ठेवा । शुक्लेंदुवत वाढत नित्य जावा ! ॥
क्षमा दया सत्य वसे जयांच्या । चित्तीं कुणा स्नेह नको तयांचा ? २७
निःसत्व निष्कांचन आज झालों । अज्ञानसिंधूंत पुरे बुडालों ! ॥
कळे न आह्मां हितही स्वतःचें । गातों पवाडे जरि पूर्वजांचे !॥ २८ ॥
पुरा जिला बोलति कांचनाची । मही असंख्यात महारथींची ॥
मिळे तिथें आयसही न आतां । जनांस दारिद्र्य गिळी समस्तां !॥२९॥
धर्मैक्यता कार्मिक चार वर्ण । होते जिथें शुद्ध जसें सुवर्ण ॥
झाल्या तिथें आज असंख्य जाती ।! सांगू किती धर्ममतें तुह्मां तीं ? ३०
अज्ञानसारें अमुचें हराया । पाजून विद्यामृत रंकरायां ॥
प्रयत्न येथें करिती सुखानें । कित्येक इंग्रेज उदारधीनें ॥ ३१ ॥
तसाचि तो भारतभूपरत्न । राजा सयाजी करितो प्रयत्न ॥
स्वराजधानींत सुखी कराया । पाजून विद्यामृत रंकरायां ॥ ३२ ॥
थोडे बहू तेविं अह्मांत अन्य । प्रयत्न मोदें करिती वदान्य ॥
परंतु अज्ञानमहोदधीला । करावया दूर न शक्ति त्यांला ॥ ३३ ॥
ह्मणून झालों अवघे उदास । धरूं कुणाची अवनार्थ कास ॥
कळे न, हें ह्मास्तव सज्जनांतें । प्रार्थीतसों सर्व उदारधींतें ॥ ३४ ॥
तुह्मी असां सर्व कलांत भारी । निष्णात ! तैसेंचि परोपकारी ॥
अज्ञानसिंधूस हरावयातें । उपाय सांगा आमुच्या जनांतें ॥ ३५ ॥

शार्दूलविक्रीडित.

देती जे बुडत्यास हात समयीं एका दुजातें तरी ।
त्यांतें पुण्य घडे, विशेष घडतें पांचां दहांतें तरी ॥
देती जे समयीं; परंतु बुडत्या राष्ट्रास जे काढिती
अज्ञानोदधिंतून नैव दिसते पुण्यास त्यांच्या मिती ! ॥ ३६ ॥

भेदाभेद टळो ! सुहृज्जन वळो ! सन्न्यायमार्गीं, जळो ! ।
बंधुद्रोह, समूळ दूर अवघी मात्सर्यबाधा पळो ! ॥
लोकीं बंधुजनांस नित्य अपुलें कर्तव्य सारें कळो ।
सत्कार्यीं तुमच्या सभेस सुयश श्रीश प्रसादें मिळो ! ॥ ३७ ॥

---

## परिषद् प्रहसन.

पृथ्वी.

चला परिषदा भरा विविध जातींच्या, पर्वणी ।
असे परिषदांस ही, द्विजगणीं जशीं श्रावणी ॥
शरत्समय लागतां भरति दर्दुरांच्या सभा ।
महत्त्व किति त्यास ये, कळतसे न हें रासभा ॥ १ ॥

दिवा-रजनिला सभा भरिति कूपमंडूक ते ।
स्वजातिपरिषद्विना जन न कूपमंडूक ते ।
सुपात्र, ह्मणुनी सदा परिषदा भरा बोलवा ।
स्वजातिमधल्या जनां कट करा तटां चालवा ॥ २ ॥

चला परिषदा भरा परिषदा कशा कारणें ।
स्वजातिविहितार्थ, यास्तव जनीं जहालीं रणें ॥
चला परिषदा भरा. परिषदा भराव्या कुणीं ।
स्वजातिमधल्या जनीं भरति का सभा मत्कुणीं ॥ ३ ॥

स्वजातिजन मेळवा मग दुही करा बोलवा ।
तटांस आपुल्या मठांसहि करीं सुखें खेळवा ॥
रुचेल तरि मान द्या मठपतीस किंवा त्यजा ।
मठाधिप तिच्या मतां उभवुनी स्वतःची ध्वजा ॥ ४ ॥

चला परिषदा भरा परिषदा भराव्या कुठें ?
प्रभंजन जिथें सुटे, त्रिविध पंथ जेथें फुटे ॥
इथ हंसति हे पिसे गमति हे जनां तापसे ।
बघा स्थळ दुजें त्वरें गमतसे बरें ह्मापसें ॥ ५ ॥

चला परिषदा भरा स्वजन माडगांवा चला ।
तिथें ज्वर असे अरे ! अबब जीव हा वांचला ॥
फिरा त्वरित; या पुढें सकळ आडगांवास जा ।
तिथें अधिपती नवा, करि न तो फिरंगी सजा ॥ ६ ॥

चला परिषदा भरा स्वजन एकजागीं करा ।
वदा स्वजन कोणते ? निजतटांतले हें स्मरा ॥
द्विजाति असती प्रभू तट करा त्रिजाती करा ।
प्रभु प्रभु जनैक्यता-घटन -वासना विस्मरा ॥ ७ ॥

चला परिषदा भरा परिषदा भरव्या किती ।
भरा अमित, जातिंची भरतभूंत नाहीं मिती ॥
सभा विविध जातिंच्या विविध पोटभेदांतही ।
पृथक् भरुनि वाढवा भरतभूजनांची दुही ॥ ८ ॥

परीट-परिषद्-भरा तिजासि नाम द्या राजकी ।
परीट नृपतीहुनी अधिक, काय ती राजकी ॥
शिरीं नृपति जें धरी वसन, पाय त्यानें पुशी ।
परीट अपुले करा स्वनगरीं तुह्मी चौकशी ॥ ९ ॥

परीट किति चांगला ! धुवुनि टाकितो तो मल ।
कलंक नुरु दे, कलापतिहुनी करी उज्वल ॥
कलापतिहुनी कसा अतिविशुद्ध निर्णेजक !
पुसाल कथितील तें गुज " पुराणसंशोधक " ॥ १० ॥

क्षुरीजन सभा भरा तिजासि नांव कारागिरी ।
क्षुरीजन शिरीं करी किति सुरेख कारागिरी ॥
हजाम न ह्मणा, क्षुरी निजमनांत रागावतो ।
शिरीं हळुच कापितो विनवुनी क्षमा मागतो ! ॥ ११ ॥

सभा प्रतिसभांतली जरि हवी तुह्मां माहिती ।
क्षुरीस पुसतां कळे मग तुह्मांस ती आयती ॥
क्षुरीसम नसे दुजा कुशल अन्य वार्ताहर ।
पुसे सहज वृत्त तो हळुच दावितांना कर ॥ १२ ॥

दिवाकीर्ति स्फूर्ति कविमतिस दे या सुकवनीं ।
कथा सांग स्वांगें मिळवुनि भल्या अन्य-भुवनीं ।
" समर्थांचा मुण्डी गमन मम चौवाळसदनीं ॥
प्रधानांची शेंडी धरि, कर फिरे राव वदनीं ॥ १३ ॥

मला ठावे चंदावरकरहि मोठे नयपती ।
इथें या शेजारीं वसति न तिथें आज दिसती ।
महारांच्या मोठ्या भरिति भरवीतो परिषदा ।
नका त्यांना ग्याना विदित अवघ्या जो जनपदा ॥ १४ ॥

विठोबाचें श्रीचें नवभवन बांधीन ह्मणतों ।
फिरें यंदा धंदा त्यजुनि करण्या पूर्ण पण तो ॥
घरीं भक्तांच्या मी, लिहुनि मज द्या भक्तिकवनें ।
रसानें भक्तीच्या रिझविन पहा ! सज्जनमनें " ॥ १५ ॥

स्वयें ज्ञानी ध्यानीं सतत धरि तो कंसदमन ।
तुका वाची एका विषयिं धरि भक्ती मम मन ॥
हरिद्वारीं वारी सजनक करीं पंढरपुरीं ।
क्षुरीची ही सारी हकिगत खरी, तूर्त अपुरी ॥ १६ ॥

सभा जेथें तेथें भरति, परिषद् नापित जनीं ।
भरीना कां कोणी ? रत सतत मी देवभजनीं ॥
कथा ऐसा सांगे बहुविध तयांतें न गणती ।
दिवाकीर्ती मुण्डी असती कवि हें सत्य म्हणती ॥ १७ ॥

कलालपरिषद् भरा तिजासि नांव द्या शौण्डकी ।
कलालमुखिं तीर्थ दे तदिव दे न ती गण्डकी ॥
कलाल असती स्वयें मधुरमण्डहारी❀ वरें ॥
तयांस म्हणणें दिसे मज न भण्डहारी बरें ॥ १८ ॥

कलाल महिमा असे विदित मुंबईपत्तनीं ।
जनास, बहुशूर हे निजजनार्यधःपातनीं× ॥

❀ भवानीनें कलालास वर दिला आहे अशी आख्यायिका आहे.

× निजजन+अरि+अधःपातनीं=स्वजनांच्या शत्रूचा पराभव करण्याच्या कामीं

तयांस बघतां पुरा यवनधैर्य सारें गळे ।
ह्मणून म्हणती इथें जन तयांस "हे भोंगळे" ॥ १९ ॥
अनेकविध भेद जे असति वैश्यजातींतले ।
स्मरा निखिल बोलवा मग पृथक् पृथक् आपुले ॥
सभाहि तितुक्या भरा मतविभिन्नता दाखवा ।
कलिप्रिय जनांस या कलियुगीं मिळे वाहवा ॥ २० ॥
चला परिषदा भरा सकल लिंगवंताप्रती ।
निमंत्रण करा करूं शिव-महोत्सवा संप्रती ॥
न ने त्रिभुवनीं खरा इतर पंथ शैवाविना ।
वरिष्ठ शिवही नसे अहह ! वैष्णवी कल्पना ॥ २१ ॥
चला परिषदा भरा सकल वैष्णवा बोलवा ।
शिवाहुनि किती असे हरि वसिष्ठ जाणवा ॥
पुराण तितुकें स्मरा विविध भेद जे वैष्णवी ।
सभाहि तितुक्या वरा न विसरा मतें जीं नवीं ॥ २२ ॥
चला परिषदा भरा सकल जैनपंथ स्मरा ।
दिगंबर सभा भरा नवपुरांत शुभ्रांबरा ॥
पुण्यांत अथवा वटोदरपुरांत न्या वाढवा ।
जनीं मतविचित्रता, जिनयती जनीं पाठवा ॥ २३ ॥
मराठे शब्दाचा करुनि नवखा अर्थ दुसरा ।
मराठ्याची संसद् त्वरित भरुं जातांच दसरा ॥
सयाजीहि राजा नृपति अपुला त्या वटपुरीं ।
चला जाऊं राहूं नृपनिकट खाऊं क्षिरपुरी ॥ २४ ॥
विलासी लक्ष्मीच्या पहुडुनि करूं मोद अवघे ।
महाराष्ट्रीं मोठे नरपति मराठेच 'चवघे×' ।
करी गीता तो श्रीपति हरि न का यादव खरा ।
द्विजीं विद्वत्तेचा फुकट दिसतो सर्व नखरा ! ॥ २५ ॥

× गायकवाड, शिंदे, होळकर आणि कोल्हापुरकर.

सभा भरुनि अंत्यजीं तिजसि सोमवंशी ह्मणा ।
निमंत्रण करा तिथें सकल तीर्थिच्या ब्राह्मणां ॥
महार असती धनी भरतभूमिकेचे जुने ।
तयांविण न सेविती प्रखर दैवतें पूजनें ॥ २६ ॥
न धेडपरिषद् पुढें भरविण्यास मागें सरा ।
परस्थजनमंदिरीं मिळतसे तयां आसरा ॥
शिवाल न जरी तयां सुरत लालयां राग ये ।
गयेसम विशुद्ध यद्वसन त्यां शिवूं कां नये ? ॥ २७ ॥
चमारपरिषद् भरा; उपकृती तयांची किती !
उपानह करुनियां तपनताप ते वारिती ! ॥
जयांत निपजे पुरा भजक रोहिदासासम ।
क्षणीं निरसिला जयें कविकबिरचित्तभ्रम ॥ २८ ॥
"वसे या चर्माच्या नरतनुमध्यें देव जरि तो ।
न कां या चर्माच्या नरहरि सुमूर्तींत मग तो ॥
वसावा ? भावाचा हरहरि भुकेला त्रिभुवनीं ।
वसे गाती ध्याती भजति जिकडे भक्तभुवनीं" ॥ २९ ॥
कबीराला ऐसा विशद करुनी धर्म शिकवी ।
स्तवीं आर्याछंदीं नमुनि चरणां ज्यांस सुकवी ॥
हरी ज्याच्यां हस्तें बहुविध चमत्कार करवी ।
नका त्या संताची बुधजन वदा जात बरवी ॥ ३० ॥

---

## (उत्तरार्ध)

जिथें जावें तेथें भरिति भरवीती परिषदा,
स्वतःच्या जातीच्या भरतजनराष्ट्रैक्यभयदा ॥
जिथें जावें तेथें अशुभ दिसतें भेदजनन ।
सभा जातींच्या ह्या करिति न कसें ऐक्यहनन ? ॥ १ ॥

उमेशानें❀ ह्यूमें× नवरुजिसुतें राष्ट्रघटनीं ।
महायत्नें रत्नें भरतमहिची एकवटुनी ॥
सभा केली झाली सकल निजबंध्यैक्यजननीं ।
तिची आशा ऐशी सफळ न दिसे द्वैतजननीं ॥ २ ॥
स्वजाति मधल्या सभा भरविल्या भल्या चांगल्या ।
स्वजातिमधल्या जनां जरिहि गोड त्या लागल्या ॥
तथापि कविला गमे जनपदैक्यसंवर्धनीं ।
स्वजातिमधल्या सभा प्रगतिकार्यविध्वंसिनी ॥ ३ ॥
स्वजातिहितभावना जर दुणावली सज्जनीं ।
स्वदेशहितकल्पना मग न वाढ घे तन्मनीं ॥
स्वजातिभजकां सुधी ह्मणति कूपमंडूक ते ।
रमेश न रमे तिथें नच सुपात्र ते मुक्तितें ॥ ४ ॥
स्वजातिपरिषद् भरा ह्मणुनि सांगती जे जनां ।
अपाय करितात ते जनपदेक्यसंवर्धना ॥
अभेदमहिमा अहा ! विसरती शहाणे कसे ।
स्वजातिपरिपोषणप्रकृतिधर्म ते काकसे ! ॥ ५ ॥
जरी स्वजन ! ती तुह्मां सुखद एकराष्ट्रीयता ।
हवी तरि करा कमी विविधजातिंची भिन्नता ॥
सभा प्रतिसभा तुह्मी भरवितां कशाला ? दुही ।
करून किती कष्टली अहह ! आपुली ही मही ! ॥ ६ ॥
स्वजातिविषयीं मनीं प्रखर भक्ति जी ठेवितां !
तिच्या शतगुणी गणा सुखद एकराष्ट्रीयता ॥
कुलासहि सुधी त्यजी जरि सुखार्थ तो ग्राम, वा ।
हितीं जनपदाचिया त्यजुनि गांव घे वाहवा ॥ ७ ॥

❀ उमेशचंद्र बानर्जी. × ह्यूम. ÷ दादाभाई नौरोजी.

वसंत तिलका.

प्रकटलि पहिल्यानें भेदमाया अविंधीं ।
कालिभजनरतांहि पाहिली हीच संधी ॥
भरुनि परिषदांतें जातिंच्या वाढवाया ।
कलह, भरतभूची वैरिणी भेदमाया ! ॥ ८ ॥

शार्दूल विक्रीडित.

जेथें भेद कळी बळी घडतसे त्या त्या स्थळीं मंडळी ।
लोकांची दुफळी, विळीच जणुं ती ऐक्यास कापी मुळीं ॥
पोळी तेथ पिके कलिप्रियजनां चाले कुचाळी खुळी ।
पाळी ये परुषाक्षरास पहिली तंट्यास ती वेगळी ॥ ९ ॥

वसंत तिलका.

कलह करुनि केले भेद बंधूजनांत।नुमजुनि किती। झाल्या पोटजाती अनंत।
भरुनि परिषदा जे जातिभेदांस देती। अनुचित महती ते नेणती देशभक्ति !
मनीं मानिती जातिला देवता जे । स्वजातीमधें तेच शोभोत राजे ॥
जयांच्या मनीं देशभक्ती विराजे । जगीं थोर ते धन्यता त्यांस साजे ॥

शार्दूल विक्रीडित.

ही मज्जन्ममही स्वदेशसुधा ही मद्धरा माउली ।
होवो मंगल आंग्लभूजननिचें आंग्लांस ही साउली ॥
ऐसें आंग्लकवी न काय कथिती ? आम्हां न का शिक्षिती ?
दीक्षा देशहितीं ? असो प्रिय न कां आम्हां महीभारती ? ॥१२॥
मानी जाति किती शिवाजी नृपती ? सारेच हिंदू गणी ।
तो तद्बंधु न काय ? भेद करितो शूद्रीं द्विजीं ब्राह्मणीं ? ॥
विद्येचें करुनी निमित्त भरल्या जातींत त्यानें सभा ।
पूर्वीं काय ? कुठें ? विभूति असल्या भूमंडळीं दुर्लभा ? ॥१३॥

पृथ्वी.

सयाजी कां राजी नृपति भरवाया परिषदा ।
भरूं दे कां मोदें निजनगरिं त्या भेदभयदा ?

जया मानीं मानी भरत वसुधा थोर सुमती ।
नका वाली व्याली स्वजनसमतेचा वसुमती ॥ १४ ॥
स्वजातींच्या झाल्या प्रिय जरि तुह्मांतें परिषदा ।
विसंबावें भावें स्वजन तरि हें गुह्य न कदा ॥
असे आर्यांची ही भरतवसुधा आद्यजननी ।
परेशाची हीची क्षणभर नसो विस्मृति मनीं ॥ १५ ॥
मिळा या मागाया निजपरजनीं मान ' सरकी ' ।
परेशाची सेवा त्यजुनि करिती भक्ति परकी ॥
न ते मोठें जातीहुनि अधिक ज्यां जन्मधरणी ।
सदा राहो त्यांच्या प्रणति कविची पुण्य चरणीं ॥ १६ ॥

वसंत तिलका.

जातीकडे न बघती न कलत्र पुत्रीं । वित्तीं न गुंतति तसे न सुखीं परत्रीं ॥
जे भारतीय वसुधा विहितैक काम । ते 'आर्यभूतिलक' त्यांस सदा प्रणाम ॥

पृथ्वी.

जळो ! वाणी वर्णी जननमहितें जी न वदनीं ! ।
जळो ! तद्‌-सद्विद्या प्रियतम न ज्यातें स्वजननी ॥
जळो ! ज्ञातिप्रीती विसरति जिथें जन्मविषयां ।
जळो ! ख्याती ध्याती बुधजन जिथें ग्राम्यविषया ॥ १८ ॥
मला निंदा वंदा अवगुण जगाचे मम शिरीं ।
सुखें घाला बोला परुषवचनेंही तदुपरी ॥
नसे चिंता चित्ता उचित गमलें तेंच कथिलें ।
शिरीं घेतां गंगा विषभय भवाचें विशमलें ॥ १९ ॥
माझी ही प्रणती करून विनती आहे स्वबंधूप्रती ।
देशाची प्रगती हवी तरि वरा राष्ट्रैक्यता संप्रती ॥
चातुर्वर्ण्य पवित्र थोर गणुनी सर्वांस बंधु ह्मणा ।
वाढो ! प्रेम जनांत माधव करो चित्तांत ही प्रेरणा ॥ २० ॥

---

१ जन्मभूमि.

शार्दूलविक्रीडित.

सोडां ! भेद असंख्य जे करिति या राष्ट्रास निःसत्त्व ते ।
जातींच्या भरितां पृथक् परिषदा राष्ट्रैक्यता भंगते ॥
ठेवा ! नित्य रहस्य हें स्वहृदयीं सेवा सुराष्ट्रीयता ।
देवातें करुणा न येइल कशी आर्यांस सत्पात्रता ॥ २१ ॥
ऐसा येईल काल आर्यवसुधा जन्मेल पुत्रांसही ।
ज्यांच्या सत्कृतिनीं जगीं प्रमुखता पावेल अस्मन्मही ॥
ही सद्बोधपरा कवित्वरचना वाटेल त्यांतें भली ।
नाहीं प्राकृतलोकगौरवगुणीं माझी मती गुंतली ॥ २२ ॥

# श्रेष्ठत्वाचा झगडा

अथवा

## दगडाचा मानव जातीस उपदेश.

आर्या.

श्रेष्ठत्वाचा मोठा मानवजातींत लागता झगडा ।
उघडा उपदेश तया करणें का प्राप्त जाहलें दगडा ? ॥ १ ॥
उन्नतिगिरिशिरावरि चढले पडले अनेकविध शास्त्रें ।
जरि तरि झगडति मानव बांधवहननार्थ योजिती शस्त्रें ॥ २ ॥
पगडा अहंकृतीचा, पडतां प्रज्ञेवरी कसा उडला ।
सगळा सुसंस्कृतिभ्रम विश्वासाचाच भोंपळा फुटला ! ॥ ३ ॥
संक्षेपें हें कथुनी दृषदाचे बोध शब्द सांगेन ।
तत्सद्बोधश्रवणें होइल कां भरतखंड जागें न ? ॥ ४ ॥
जागेल नित्य करण्या भारतभूभद्र, भावना चित्तीं ।
उपजेल बांधवाच्या तेणें लाभेल शेवटीं मुक्ति ! ॥ ५ ॥

दिंडी.

एक दिवशीं वृत्तांत काय झाला ! सांगतों तो पाहिजे श्रवण केला;
सभा भरली विस्तीर्ण वटाखालीं । लोक जमले विख्यात शौर्यशाली ॥
मनुज तेथें पातले भिन्नदेशी । विषय आला चर्चेस त्यांजपाशीं;
"श्रेष्ठ मानव जातींत कोण आहे । करीं ज्याच्यां अधिकारसूत्र राहे" ७
एक बोले माझ्याच पुण्य देशीं । शूर असती श्रेष्ठत्व त्यांजपाशीं ।
वदे दुसरा अश्मेच इतर लोक ! श्रेष्ठ आह्मीं सर्वांत हें विलोक ॥ ८ ॥

साकी.

प्रतीचीस रवि सौभाग्यांचा आला बोले तिसरा ।
प्रतीती पहा ! नित्य दिवाळी ! नित्य अमुचा दसरा !! ॥ ९ ॥
यास्तव आह्मीं श्रेष्ठ जगीं या, दास आमुचे व्हावें ।
पौरस्त्यांनीं आह्मीं देऊं तेंच सुखें सेवावें ॥ १० ॥
बोले चवथा पौरस्त्यीं नच पाश्चात्यींही नाहीं ।
मानवलोकीं श्रेष्ठ योग्यता *नूतन महींत राही ॥ ११ ॥
सुज्ञानाचा श्रेष्ठत्वाचा हक्क आमुचा सारा ।
जगीं आमुच्या विमल यशाचा वाजे नित्य नगारा ॥ १२ ॥
स्वातंत्र्याची माय आमुची नूतन-सुवर्णभूमी ।
सर्व जनांला सौख्य सारखें अमुच्या नगरीं ग्रामीं ॥ १३ ॥
पंचम बोले निग्रोला कां छळितां निरर्थ सारे ?
गौर-कृष्ण या भेदाचे कां खेळे अंगीं वारें ? ॥ १४ ॥
प्राच्य संस्कृति प्रसर पावली धरा आमुची पूर्वी ।
ऊर्वीवरली स्वर्णमेदिनी श्रेष्ठ हीच ही गुर्वी !! ॥ १५ ॥
होते जेव्हां आंग्ल रंगवित रंगें अपुलीं अंगें ।
चर्मे नेसुनि हिंडत होते वन्यपशूंच्या संगें ॥ १६ ॥
कलासुविद्या सर्व तऱ्हेच्या संस्कृति सुधारणाही ।
शिकवित होती सर्व जगाला भारत वसुंधरा ही ॥ १७ ॥

* अमेरिकेंत.

ज्येष्ठपणाचा श्रेष्ठपणाचा मान आमुचा आहे ।
पूर्व दिशेला भाग्यरवीची अरुणप्रभा पहा हे ॥ १८ ॥
अन्य बोलती, पराधीन जे सत्त्वहीन जे त्यांला ।
श्रेष्ठपणाचा गर्व कशाला ! कोण पुसे दगडाला ? ॥ १९ ॥

वसंततिलका.

झगडति जन रागें बोलती एकमेकां ।
दगड, नवल झाले तत्क्षणीं काय ऐका ॥
जवळि दगड होता जीर्णसा त्यास वाणी ।
त्वरित फुटुनि बोले शब्द तो ज्ञानखाणी ॥ २० ॥

आर्या.

दगड ह्मणे, "मज ह्मणतां, दगड तुह्मी नेणुनी खरी महती !
मत्सुगुण सत्कृतींचे लोकीं सारेच जाणते नसती ॥ २१ ॥
यास्तव उपमा देती मूढाला, मूढलोक दगडाची ।
हें गूढ त्यांस न कळे कीं, आहे थोर योग्यता ह्याची ॥ २२ ॥
ऐका तरि मग मानव, माझें व्याख्यान देउनी चित्त ।
लाभेल ज्ञान तुह्मां सुज्ञानें लाभतें जगीं वित्त ॥ २३ ॥
शीतोष्णवारणास्तव सौख्यनिवासार्थ बांधितां सदनें ।
दीन श्रीमंतांची, राजप्रासाद देवताभवनें ॥ २४ ॥
हीं सर्व बांधण्याला करिती उपयोग लोक दगडांचा ।
हें नकळे ज्या मनुजा दगडाहुनि दगड तोच मनुजांचा ॥ २५ ॥
दगडास दगड ह्मणतां नेणुनि अपुल्यांतल्या खऱ्या दगडा ।
लोकीं अज्ञानाचा ज्ञानाशीं लागला सदा झगडा ॥ २६ ॥
पगडा अज्ञानाचा सुज्ञानावरि हरी ह्मणे बसला ।
कसला नर जरि असला मायाजालांत गुंततां फसला ! ॥ २७ ॥

सावध व्हारे सारे! घ्यारे तत्त्वावबोध मच्चरितीं ।
भ्रमतां पुनः पुनः कां? लोकीं चुकवा पुनर्भवप्रगति ॥ २८ ॥
नम्रत्व, लीनता, हीं माझ्या हृदयांत ओतिलीं असती ।
यास्तव बहुशः करितों नम्रत्वें मृत्तिकेंत मी वसती ॥ २९ ॥
करितों कधीं कधीं मी पवित्र सिंधूंत आपुली वसती ।
सिंधूदरीं कितितरि, प्राणी त्राणार्थ राहिले असती ॥ ३० ॥
तेथुनि मजला शोधिति काढिति करिती प्रहार लोहाचे ।
देहाचा होय चुरा विचार करिती जन स्वगेहाचे ॥ ३१ ॥
सोशीं घाव घणाचे जाड्यत्वें बोलतां न ये मजला ।
ह्मणती याला उचला पायामध्यें बरा चिरा बसला! ॥ ३२ ॥
पायामध्यें भरिती एकावरती अनेक ते दगड ।
ह्याचें कारण आह्मी सदना आधार हें दिसे उघड ॥ ३३ ॥
पाया झाल्यानंतर सदनाच्या भिंति बांधण्यासाठीं ।
दगडच पसंत करिती दगडाची मानमान्यता मोठी ॥ ३४ ॥
भिंती मातीवांचुनि प्रस्तरचूर्णाविणा न त्या होती ।
दगडास दाह देउनि करिति चुना घालिति मध्यें रेती ॥ ३५ ॥
वार्धक्यें ज्यां न दिसे, किंवा दृष्टी असे जयां थोडी ।
दगडी उपनेत्रांची, त्यांच्या कामास येतसे जोडी ॥ ३६ ॥
विपिनीं अकिंचनातें, अनल मिळेना न अग्निची काडी ।
दगडी गारेपासूनि पाक करायास अग्नि तो काढी ॥ ३७ ॥
दगडांस हासतां परि दगडाची लेखणी तुह्मां शिकवी ।
विद्या, दगडी पाटीवर, हें वर्णाविया नको सुकवी ॥ ३८ ॥
शिकवी विद्या तुह्मां, दगड जरी तरि कशास हो गर्व ।
विद्येचा मानावा, विद्यामृतज्ञान द्या जनां सर्व ॥ ३९ ॥
विद्या शिकवी विनया, दगडापासून हीं शिका दोन्ही ।
निष्पापवृत्ति लोकीं, शिकविति लोकांस बाळकें तान्हीं ॥ ४० ॥

मी रक्षितों सुविद्या, जैसी तैसी न रक्षिती अन्य ।
याकरिता पाषाणीं, कोरिति लेखांस भूपती धन्य ॥ ४१ ॥
देती पाषाण-शिला, दीन अकिंचन जनांस विश्रांती ।
श्रमले दमले निर्धन, बसती त्यांवर कुणी तिथें निजती ॥ ४२ ॥
माझ्या गुहांत करिती वसती योगी यतींद्र संन्यासी ।
संत महंत तपस्वी एकांतीं वास आवडे ज्यांसीं ॥ ४३ ॥
शांत गुहेंत मनाला जोडे एकाग्रता घडे भक्ती ।
संसारासक्ति उडे चिंतन करितांच लाभते मुक्ती ! ॥ ४४ ॥
वर्षति वारिपयोधर, हर्षति तिट्टिभ मयूर नरनारी ।
पंकविदूषितवीथीं[3] जावें कैसें जनीं निजागारीं ॥ ४५ ॥
ऐशा समयीं माझा, करिती उपयोग जाणते नित्य ।
ठेवुनि पाय मम शिरीं, जाति गृहीं साधण्यास गृहकृत्य ॥ ४६ ॥
प्रावृटकालिं कृषीवल, वांछिति कीं सजलता असो क्षेत्रीं[4] ।
दृषदांच्या साह्यानें, अडविति वारिप्रवाह ते क्षेत्रीं ॥ ४७ ॥
आणिक परोपकृतिचीं कार्यें करितों तुह्मांस तीं कथितों ।
मनुजसुखास्तव बनतों प्रस्तर पात्रें, न अन्न दूषवितों ॥ ४८ ॥
ताम्रारकूटपात्रीं, कळकति पातळ पदार्थ अन्नाचे ।
दगड न दूषवि त्यांतें वर्तन निर्दोष होय दगडाचें ! ॥ ४९ ॥
इतरां न दूषवावें, आपण तैसें बनूं नये दुष्ट ।
उपकृति नित्य करावी ह्यांत महापुण्य बोलती शिष्ट ॥ ५० ॥
दगडापासुनि घ्यावे सद्गुण हे श्रेष्ठ सर्व लोकांनीं ।
रानीं कशास जावें मिळतां मुक्ती अशा उपायांनीं ! ॥ ५१ ॥
अविरत कर्म करा जन, यत्न करा स्तुत्य नित्य उपकारीं ।
अपकारी परपीडा वर्जा सद्विप्र जेविं अपकारी[6] ॥ ५२ ॥

३ चिखलानें भरलेले रस्ते. ४ शेतांत. ५ तांबें व पितळ यांचीं भांडीं.
६ मद्य.

वापी कूपतटाकें बांधाया साह्य घेति दगडाचें ।
तीर्थांचे घाट तसे, पुण्यनद्यांचेहि पाट दगडाचे ॥ ५३ ॥
आरोग्यार्थ जनांच्या न्याया मलमूत्र सागरामाजी ।
करिति गटारें दगडी परजनविहितास मी सदा राजी ॥ ५४ ॥
कल्याणार्थ जगाच्या प्रस्तर देतो जगास राकेल[3] ।
राकांचेंहि[4] जयांच्या तेजानें दिव्य तेज झांकेल ॥ ५५ ॥
राकेलाचा करितां, स्वगृहीं उपयोग अज्ञ लोकांनीं ।
निष्काळजीपणानें, होतो अपघात हें धरा ध्यानीं ॥ ५६ ॥
हुतवहजलद्वयाचें[5] वैर असे स्वैर भांडती दोघे ।
जल नाशी ज्वलनातें, वारिविघातास वन्हि वाट बघे ॥ ५७ ॥
तात्पर्य यांत समजा अबलें सबलांसवें न झुंजावें ! ।
महदाश्रयाविना नच रिपुच्या मार्गांत आडवें जावें ॥ ५८ ॥
उद्यानीं कारंजीं धनिकांच्या शोभती गृहद्वारीं ।
तेविं जलाशय टांकीं प्रस्तरमय बांधितात जन सारीं ॥ ५९ ॥
ताम्राश्मसार[6] ह्यांचा फारच होतो जगांत उपयोग ।
बहुविध त्यांचीं पात्रें करिती भस्में हरावया रोग ॥ ६० ॥
कवि अश्मसार ह्मणती लोहातें नांव हें जुनें ऐका ।
यास्तव अश्म्यापासुनि लोह निघे यांत कोणती शंका ? ॥ ६१ ॥
मेध्य[7] अमूल्य जयांतें गणिती ह्मणती जनीं रजत हेम ।
माझीच संतती ती, देति परि मला अमेध्य हें नाम ॥ ६२ ॥
इतरांस नीच ह्मणती मिरविति उच्चत्व आपुलेंच जन ।
विसरति परि ते हें कीं त्यांचें तेथेंच जाहलें जनन ॥ ६३ ॥
शार्मण्य[8] गौर[9] ह्मणती दिधलें श्रेष्ठत्व ईश्वरें अवघे ।
आह्मां गौर जनांसच स्वातंत्र्याची दुजा कशी चव घे ? ॥ ६४ ॥

३ घासलेट तेल. ४ पौर्णिमेचा चंद्र किंवा पूर्णिमा. ५ अग्नि व पाणी. ६ तांबे व लाखंड. ७ यज्ञकार्यास पवित्र. ८ जर्मन. ९ गौरवर्णाचे पाश्चात्य लोक.

श्रेष्ठत्वाची ऐशी मिरविति जे मूढ आढ्यता लोकीं।
अंतीं उपरति होउनि बुडती ते दुःखसागरीं शोकीं ॥ ६५ ॥
माणिक्य नील हीरक वैदूर्यादिक अमूल्य नवरत्नें।
उपजति [३]उपलांपासुनि काढिति शोधून तज्ज्ञ हीं यत्नें ॥ ६६ ॥
उपयोग थोर अमुचा होतो मनुजांस नित्य संसारीं।
परि ही मानवजाती तोषवि आह्मां कधीं न आभारीं ॥ ६७ ॥
भारी सद्गुणभारें जरि तरि आह्मांस मानिती हलके।
बळ न कळे दगडांचें श्रेष्ठ तयाहून जाहलीं कळकें[४] ! ॥ ६८ ॥
मूढपणा मनुजांचा ऐसा पाहून वाटतें नवल।
स्वश्रेष्ठत्व मिरविती ह्मणती सर्वांत मानव प्रबल ॥ ६९ ॥
मिथ्या अभिमान असा धरिती मानव कशास हें न कळे ॥
बघतां सुविचाराच्या आदर्शीं आढ्यता पळांत पळे ॥ ७० ॥
विश्वंभराविना नच विश्वीं श्रेष्ठत्व अन्य कोणाचें।
तो करुणामय ईश्वर राहे हृदयीं पवित्र दगडाचे ॥ ७१ ॥
यास्तव मानवजाती दगडाहूनहि जगीं कनिष्ठ ठरे।
कितितरि मानव भूवरिं दुष्कृतिंनीं भरिति आपुलीं जठरें ॥ ७२ ॥
दगडांत देव राहे आहे ही कल्पना न दगडांची।
मनुजांच्याच असे ही खूण महा कल्पनातरंगांची ॥ ७३ ॥
मानवहृदयीं राहे परमेश्वर परि दिसे न तो मनुजां।
शोधित इकडे तिकडे ह्मणती दगडांत देवता समजा ॥ ७४ ॥
दगड चला ! या ! आतां पुजूं भावें समस्त नरनारी।
सापडला हरि दगडीं दगडाची थोरवी किती भारी ॥ ७५ ॥
शालिग्रामाख्य शिला जन ह्मणती गंडकींत ज्या असती।
पुण्यप्रदा बहुत त्या विष्णु करी त्यांत आपली वसती ॥ ७६ ॥
बाण श्रेयोदायक विप्र ह्मणति नर्मदानदी प्रसवे।
ते पूजिल्याविना न स्वस्थपणें भाविकां गृहीं बसवे ॥ ७७ ॥

३ दगडापासून. ४ वेळू.

यास्तव बाणांस तसें शालिग्रामांस पूजिती देही* ।
देहीं सौख्य मिळाया वैभव सन्मान संपदा गेहीं ॥ ॥ ७८ ॥
मानव पुढती ह्मणती एका देवीं न आमुची तृप्ती ।
बहुविध देव कराया स्वमनिं महा योजितात ते युक्ती ॥ ८० ॥
बहुविध सद्गुण शक्ती देवाच्या तेवढ्या करा मूर्ती ।
त्यांचें दर्शन घेतां होइल तैशीच मानसीं स्फूर्ती ॥ ८१ ॥
कालस्वरूप कालीं समरीं धरिते ह्मणून या कालीं ।
काली झाली वाली वीरांची, रक्त बिंदु तद्भालीं ॥ ८२ ॥
कालीं उचित घनातें× धाडुनि संतोषवी जनां कोण ? । ०
पिकवुनि धान्यें चुकवी दुर्भिक्ष्या कोण वांचवी प्राण ॥ ८२ ॥
इंद्र तयाची अभिधा, त्याची सहकारिता करी वरुण ।
कारण वारिसमुच्चय अधिपतिवांचून रक्षितो कोण ? ॥ ८३ ॥
सृष्टि-स्थिति-लय-शक्ती देवाच्या तीन देवही तीन ।
झाले तत्साद्दश्यें, विधि हरि हर वंदिती जयांस जन ॥ ८४ ॥
सावित्री विधिवाभा[3], दिधली रामा[4] रमा घनश्यामा ।
सोम[5] सदाशिव केला, तद्रामा तीच कालिका परमा ॥ ८५ ॥
प्रणवस्वरूप गणपति ॐकाराचीच देवता केली ।
केली करावयातें ऋद्धी सिद्धीहि आणिल्या आली ॥ ८६ ॥
आली सरस्वती मग, विद्येची देवता जनीं झाली ।
आली कविवृंदांची विद्यार्थिजनांस माउली वाली ॥ ८७ ॥
गृहदेव ते निराळे ग्रामांचे देव देवता भिन्न ।
स्थलदेव जाहले बहु भजकां वाटूं नये कधीं न्यून ॥ ८८ ॥
एकाचे तीन प्रभु तिहिंच्या तेहतीस देवताकोटी ।
स्वर्गी स्थान मिळेना धांदल उडली जगांत या मोठी ॥ ८९ ॥

---

* मनुष्य. × पर्जन्य.

३ ब्रह्मदेवाची. ४ पत्नी सुंदर स्त्री. ५ स + उमा = सोम = सांब.

आले सदार सुरवर अमरपुराहून आश्रया इकडे ।
भ्रमति विचारिति बोलति देवनिकेतन मिळेल कोणिकडे ! ॥ ९० ॥
दृषदीं आश्रय दिधला ह्मणुनी दृषदात देवता येती ।
ऐसें कल्पुनि मानव दगडी मूर्तींत देवता भरिती ॥ ९१ ॥

वसंततिलका.

मूर्ती जगीं घडविती दगडी अनेक। त्यांच्यांत कल्पिति यथा-मति देव लोक;
धात्यांस चार वदनें शिव पंचवक्त्र। विष्णूस चार कर शोभविती पवित्र.
लक्ष्मी सती गणपती दगडांत येती। लिङ्गीं सदाशिव शिरे दगडीं त्रिमूर्ती;
श्रीकृष्ण राम हनुमान् दगडी सुरेख। प्रत्यक्ष सूर्य भगवान् दगडांत देख.
सर्वत्र देव वसतो मम कां न राहे। मूर्तींत देव परि मूर्ति न देव आहे;
ही भावना न मनुजीं विसरून जावी। ठेवून भाव दृढ मूर्ति सुखें पुजावी.

पृथ्वि.

जरी सकल देवता करिति वास अश्मोदरीं ।
तरी न निज अंतरीं लवहि गर्व त्याचा धरीं ।
न वृत्ति मम पालटे तनु झिजे पराकारणें ।
प्रियव्रत मदीय कीं मनुजसौख्य विस्तारणें ॥ ९५ ॥

उपजाती.

श्रीव्यास सांगे बघतां पुराणीं। अष्टादशीं एकच देववाणी ।
परोपकारासम पुण्य नाहीं। पीडा जनां दूषवि पातकाही ॥ ९६ ॥

मालिनी.

ह्मणुनि मनुज प्यारे बांधवप्रेमवारें।
करुनि उपकृतीतें घालवा दुःख सारें ॥
नसति नयन त्यातें द्या गृहीं स्वीय थारा।
करचरणविहीनीं थाबवा पोटमारा ॥ ९७ ॥

गतधव अबला ज्या त्यास का त्रास देता ? ।
रुचिर कचकलापां कापितां दूर नेता ॥
हृदय थरथरारे देखतां दुष्ट मुंडी ।
ह्मणति मरण देईं धांव गे माय ! चंडी ! ॥ ९८ ॥
परिसुनि वच ऐसें भारती बालिकांचें ।
सदय हृदय माझें पाझरे पथ्थराचें ! ।
अकरुण मजपेक्षां निर्घृणत्वें मलीन ।
मनुज दिसतसां रे पातकी ज्ञानहीन ! ॥ ९९ ॥

द्रुतविलंबित.

हरितसा विधवानगभूषणां ! । त्वरित भंगितसां करकंकणां ! ॥
गळसरी प्रिय मंगळसूत्र तें ! करुनि भग्न कसें सुख वाटतें ! ॥१००॥
पडति त्या धरिणीवरि बालिका । विनविती नमिती चरणा फुका ॥
परि न शब्द वदा, शुभकुंकुमा । पुसितसां ! कृति हे अधमाधमा ! ॥
रुचिर कुंकुमचीर हरावया । लवहि लाज नसे न मनीं दया ॥
सदयता दयिताविषयीं कशी । विरमली भ्रमली जनमानसीं ॥ १०२ ॥
मनुज ! यापुढतीं करुनि त्वरा । चिरुनि कंचुकिचा करिती चुरा ॥
छळुनि आपुलिया प्रिय लेंकुरां । अहह ! लाजविती यमकिंकरां. ! ! ॥

मालिनी.

युवतिनिधनकालीं आपुली लांब शेंडी
त्वरित हरुनि नेण्या आणितां कां न मुंडी ? । ×
असुख जरि तुह्मां तें होय पत्नीवियोगें ।
उपटुनि न मिशा का टाकितां दुःख रागें ? ॥१०४॥

उपजाति.

व्रतस्थ व्हावें जरि बायकानीं । स्वनाथ जातां, नच कां नरांनीं ? ॥
तसें करावें ललनावियोगीं । मी सांगतों युक्ति नरोपयोगी ॥१०५॥

---

× हजाम.

शार्दूलविक्रीडित.

पत्नीच्या निधनीं अहो ! द्विज ! शिरीं काढा त्वरें पाट ते ।
प्रायश्चित्त मिळे नरांस बरवें या ब्रह्मचर्यव्रतें ॥
पाटीं सिंदुर सिंचुनी मग करा ते भांग वेणी फणी ।
पत्नीच्या स्मरणार्थ सोंग आपुलें आणा जनीं आपणीं ॥१०६॥
लोकीं जे गत-भर्तृकांस छळिती संत्रासिती गांजिती ।
वेणी-कुंतल-कृंतनार्थ जलदी मुंडीस जे आणिती ॥
जे जे निर्दय कंचुकी चिरविती जे कंकणें भंगिती ।
प्रायश्चित्त तयांस हेंच करितां लाभेल त्यां सद्गती ॥ १०७ ॥

आर्या.

मी भेद-भाव न धरीं उपकृति माझ्या जगांत सामान्य ।
यास्तव मनुजांस तसा झालों देवास सर्वथा मान्य ॥ १०८ ॥
मत्सम देवप्रियता संपादाया वरा मदीय गुणां ।
ब्रह्माचि निर्गुण मानुनि चिंता चित्तीं परात्परा सगुणा ॥ १०९ ॥
दगड कुणास न बोला सद्गुण दगडांतही बहुत असती ।
दिसती लहान गुरखे परि समरीं ते प्रताप दाखविती ॥ ११० ॥
असती सतीव भासे अनभिज्ञाला गमे सती असती ।
चमकति पदार्थ बहुविध सारे नच ते खरे हिरे असती ॥१११॥
सुज्ञीं सामर्थ्याचा अभिमान वृथा कदापि न धरावा ।
परक्यास दास अपुले करण्याचा दुष्ट हेतु विसरावा ॥ ११२ ॥
सर्वांस आत्मवशता प्रिय वाटे आवडे न परवशता ।
परसत्ता हरिती ते आवडती जन कधीं न भगवंता ॥११३॥
परदुःखें दुःखित जे उत्कर्षें हर्षती परांच्या जे ।
धन्य! जगीं ते सज्जन ! दिसती सम ज्यांस रंक वा राजे ॥११४॥
धन्य ! जगीं ते नरवर ज्यांच्या हृदयीं क्षमा दया शांती ।
उपकृतिरति सद्धर्मश्रद्धा दाक्षिण्य सत्य नयनीति ॥ ११५ ॥

देव अशांच्या हृदयीं राहे राहे न नित्य वैकुंठीं ।
दृषदीं विपिनीं न मिळे भक्तिविना माळ घालितां कंठीं ॥११६॥

वसंततिलका.

घेता निरोप करितों विनती तुम्हां मी ।
निःस्वार्थ नित्य झिजतों तुमच्याच कामीं ॥
पीडा कुणास करण्यास कुणा हणाया ।
योजा कधीं न मम ही सुपवित्र काया ! ॥ ११७ ॥
ही संपली दगडराजकथा रसाळ ।
सेवोत ! सुज्ञ सुमती लघु थोर बाळ ॥
देईल सौख्य सुरुची सकलां समान ।
पाहून होतिल हिला जन सुप्रसन्न ॥ ११८ ॥
हें श्राव्य काव्य रचिलें पुरुषोत्तमानें ।
केला प्रसाद सदयें पुरुषोत्तमानें ॥
प्रार्थी तयास सदयास कृतप्रणाम ।
ठेवीं निरंतर मुखीं मम रामनाम ॥ ११९ ॥
विश्वास जो निखिल निर्मि निजप्रभावें ।
विश्वास ठेवुनि पदाब्जिं तयास भावें ॥
प्रार्थीं, विभो ! विभव दे प्रिय भारताला ।
आरोग्य आत्मवशता अवघ्या जगाला ! ॥ १२० ॥

# भरत भूमीचें भावी स्वराज्य

## व तत्प्राप्त्यर्थ आंग्लजन व हिंदीजन यांस विनंति.

### सर्ग १ ला.

( आर्या. )

वाहे पहा ! पहा ! ! हा आला स्वातंत्र्यसिंधुला पूर ।
झाले जनपद जागे सोडिति तंद्री जगीं महाशूर ॥ १ ॥
संग्राम घोर झाला देशीं पाश्चात्य शूर वीरांचा ।
स्वातंत्र्यास्तव, तेणें लाभ जनां लाभला स्वराज्याचा ॥ २ ॥
साऱ्या युरोपखंडीं वाहे स्वातंत्र्यसिंधुची लाट ।
अपुल्या देशापुरते पाडिति निजराज्यसिंधुचे पाट ॥ ३ ॥
पोलंदाची सत्ता हरिति पुरा तीन चोरटीं राष्ट्रें ।
गेलीं रसातळाला दिसती तीं शुष्क कोरडीं काष्ठें ॥ ४ ॥
खंडांत आशियाही आली स्वातंत्र्य सिंधुची लाट ।
जनपद जागे झाले शोधिति स्वातंत्र्य मंदिरा वाट ॥ ५ ॥
अरब स्वतंत्र होती, सीरियनांतें स्वराज्य आवडतें ।
पारसिकांच्या देशीं स्वातंत्र्याचें निशाण तें उडतें ॥ ६ ॥
परवश काय रहावें दास बनावें सदैव आर्यांनीं ।
स्वामित्व आदरावें भारत भूमींत गौरकायांनीं ॥ ७ ॥
देउनि दुर्बल राष्ट्रां स्वातंत्र्यसुधा करी तयां हृष्ट ।
तीं इंग्लंदा केव्हां करिल तसें भारती जनां तुष्ट ॥ ८ ॥
मंगल मुहूर्त नलगे दात्याला सुदिन, वार, लग्न, घटी ।
अनुचित निमित्त कथिती ज्यांची अनुदार वृत्ति, जे कपटी ॥९॥
आशाभंग निरंतर वचनांचा भंगही तसाच घडे ।
दूर उडे नृपनिष्ठा जानपदाची सुबुद्धिही बिघडे ॥ १० ॥

सर्वत्र भूतलावरि दिसती स्वातंत्र्यदेवतामूर्ती ! ।
भारतवर्षीं नच कां करिती त्या दिव्य देवता वसती ॥ ११ ॥
ऐसे विचार येतां तरुणमनीं, खिन्न मानसीं होती ।
म्हणती आंग्लजनांची सद्बुद्धी होत चालली कोती ॥ १२ ॥
केलें तुम्ही शहाणे देउनि आम्हांस शिक्षण ज्ञान ।
आंग्ल ! स्वातंत्र्यप्रिय ! अमुच्या हांकांस कां न द्या कान ॥१३॥
स्वातंत्र्य ही सुधा जरि आंग्लांपुरतेंच काय तें अमृत ? ।
भारतजनप्रसंगीं होतें स्वातंत्र्य काय विषयुक्त ? ॥ १४ ॥
संकटसमयीं दिधलीं वचनें तितुकीं तरी करा पूर्ण ।
इतुकेंच मागतों, नच म्हणतों स्वातंत्र्य सर्व द्या तूर्ण ॥ १५ ॥
येतां संकट दुसरें सैनिक साहित्य वित्तही दिधलें ।
भरतजनांनीं मोदें साम्राज्याचें महत्त्व वाढविलें ॥ १६ ॥
आंग्लजनां यश आलें कृति अमुची वर्णिली प्रधानांनीं ।
धीर धरा, साह्य करा उपकृति ठेवूं सदैव ही ध्यानीं ॥ १७ ॥
सत्रा सालीं भूपति लेखीं हिंदी प्रजाजनां कळवी ।
देवूं स्वाराज्याचे हक्क, असंतोष काळजी पळवी ॥ १८ ॥
वर्षी एकोनविशीं स्वाराज्याचा दिला जनां पहिला ।
अंश तयाचा अवधी दशवर्षांचाच निश्चयें ठरला ॥ १९ ॥
जातांच आठ वत्सर नेमियली स्वीय बंधुंची कमिटी ।
अमुच्या पात्रत्वाच्या शोधाला डाव हा नवीन विटी ॥ २० ॥
शोध कशाचा करितां होतें स्वाराज्य आमुचें पूर्वी ।
हक्क स्वाराज्याचे अमुचे अमुचीच भारती उर्वी ॥ २१ ॥
आम्हीं पात्र न जरि तरि दिधले कां हक्क अल्पही सांगा ।
देउनि परतुनि घेतां दोषाला राहते न कीं जागा ? ॥ २२ ॥
स्वार्थप्रिय भारतजन भेद असंख्यात आमुच्या देशीं ।
यास्तव शिक्षण द्याया धाडी हरि आंग्लभौम परदेशीं ॥ २३ ॥

अबला सबल करावें, अज्ञानां ज्ञान देउनी बरवें ।
पात्र करावें पालक–कर्तव्यचि तें न कां तुम्हां करवे ॥ २४ ॥
फ्लँडर्सच्या रणांगणिं केली प्राणांपलीकडे मदत ।
स्वाराज्याची तेव्हां मागितली काय ? कोणती मुदत ? ॥ २५ ॥
स्वाराज्य शीघ्र देऊं संकटसमयीं दिलें तुम्हीं वचन ।
आता म्हणतां होइल स्वाराज्याचें कसें तुम्हां पचन ! ॥ २६ ॥
देऊं देऊं म्हणतां केव्हां देणार तें तरी सांगा ।
ठरवा निश्चित अवधी, वचन कराया खरें तसे वागा ॥ २७ ॥
आंग्लजनांला सविनय हीच विनंती करीतसें भावें ।
अन्योन्यविषयविहितीं दोघांचें चित्त वित्त, लोभावें ॥ २८ ॥
प्राप्ति स्वाराज्याची तुमच्या साह्याविना कठिण भारी ।
यास्तव साह्य करा या, होऊं तुमचे सदैव आभारी ॥ २९ ॥
लोहहि सुवर्ण बनतें करितां तत्साह्य मूल्यवान् परिसें ।
कांचनभूमिनिवासी आम्हीं आम्हां जगीं न मूल्य कसें ॥ ३० ॥
आंग्लद्वेष न केला केले आम्हीं अपार उपकार ।
विजनहि निजजनतुल्यच मानुनि करितों सदैव सत्कार ॥ ३१ ॥
अब्दशताधिक करितां राज्य इथें, आत्मरक्षणासाठीं ।
शिक्षण युद्धकलेचें द्याया कां आड आणितां काठी ॥ ३२ ॥
ट्रस्टी अमुचे जरि तरि ट्रस्टींचा धर्म कां न आचरिला ।
शिक्षण देऊनि बरवें अज्ञपणा आमुचा न कां हरिला ॥ ३३ ॥
आंग्ल प्राज्ञजनांतें आहे अमुची विनम्र ही विनती ।
युद्धकला राज्यकला शिकवुनि आम्हां जगांत द्या महती ॥ ३४ ॥
उपकृति कधीं न विसरूं जातिल तुमचे प्रयत्न नच वायां ।
संकटसमयीं अर्पूं तुमच्या विहितार्थ वित्त निज काया ॥ ३५ ॥

## सर्ग २ रा

## भारतस्थ तरुणास विनंति.

भारी राष्ट्रोन्नतिची आशा तरुणांवरी असे सारी ।
भारतभाग्यरवीच्या उदयाला योग्य तेच सहकारी ॥ ३६ ॥
योग्य सदा असती ते देशहिताचीं करावया कामें ।
हे दोन शब्द यास्तव कथितों मीं त्यांस आदरें प्रेमें ॥ ३७ ॥
साक्षर करा निरक्षर असती जें त्यांस देऊनि ज्ञान ।
विद्यामृत वांछिति जे त्यांच्या हांकेस द्या सदा कान ॥ ३८ ॥
समुचित उपाय योजा प्राप्त कराया स्वराज्य निजदेशीं ।
दे मातृभूमिसेवा पुण्य तसें दे न पंढरी काशी ॥ ३९ ॥
उत्तम उपाय ह्मणजे दहन करावें अनिष्ट भेदांचें ।
राष्ट्रैक्यास विघातक भेदच रिपु भारती स्वराज्याचे ॥ ४० ॥
चारच वर्ण करी हरि गुणकर्मानुक्रमेंच ते सर्व ।
हा श्रेष्ठ तो कनिष्ट स्वजनीं ऐसा धरूं नये गर्व ॥ ४१ ॥
ऐक्य न हिंदुसमाजीं पंथ किती ! जाति त्या असंख्य किती ।
अल्प स्वार्थासाठीं किती जाती भेदभाव वाढविती ॥ ४२ ॥
करितां कसलें तरि मग हिंदुमुसलमानऐक्य कृत्रिम तें ।
अब्द न एक टिके जें मासीं मासीं पुनः पुनः तुटतें ॥ ४३ ॥
सत्य परिस्थिति ऐशी असतां फसतां कशास हो तरुण ।
स्वाराज्याचा उगवे काय महात्मानुशासनें अरुण ॥ ४४ ॥
मासत्रयांत न मिळे, न मिळे स्वाराज्य तेविं नव मासीं ।
नव वर्षांत मिळे कां ? येइल अनुभव तुम्हांस कामासी ॥ ४५ ॥
तरि मग येईल कसें हातीं स्वाराज्य ही निघे शंका ।
ह्याचें उत्तर कथितों राष्ट्रैक्याचाच वाजवा डंका ॥ ४६ ॥

भेदा स्थान न द्यावें, सामाजिक हक्क सारखे द्यावे ।
ब्राह्मण–अब्राह्मण हे भेद कशाला निरर्थ मानावे ॥ ४७ ॥
द्विजकुलसुशिक्षितांनीं ऐक्याचें कार्य आपल्या हातीं ।
घ्यावें, तेणें होइल राष्ट्रीं सर्वत्र शांतता प्रगती ॥ ४८ ॥
हिंदूंत ऐक्या घडतां कां न मुसलमान, पारसी यांचें ।
होईल साह्य ? कारण भावी स्वराज्य सर्व हिंदींचें ॥ ४९ ॥
बघतांच ऐक्य राष्ट्रीं आंग्लजनांच्या मनीं न कां भीती ।
उपजे ? देतिल सत्ता टाळाया भारतप्रजाक्रांती ॥ ५० ॥
दुसरा उपाय कथितों आंग्लप्रभुशीं करूं नका वैर ।
नसतां शक्ति स्वकरीं उचित नसे बोल बोलणें स्वैर ॥ ५१ ॥
आंग्ल प्रभु करुणाघन, आंग्लजनीं थार लोकही असती ।
करुनि कुरापत त्यांचीं विघ्नें कां आणितां घरीं नसतीं ॥ ५२ ॥
सहकारें कार्य घडे तद्भावें कार्य सर्वथा बिघडे ।
सहकाराचे देती उपनिषदें वेदही न काय धडे ॥ ५३ ॥
घेउनि करीं निशाणें कोण शहाणे स्वराज्य मेळविती ।
नसतां सामर्थ्य करीं नच हरिविवरांत जाणते जाती ॥ ५४ ॥
युक्ति प्रयुक्ति कोविद विदित जयां उचित कालसंधान ।
तेच यशस्वी होती पावति ते लोकिं सर्वदा मान ॥ ५५ ॥
युद्धकलाशिक्षण द्या नृपसचिवापाशिं मागणें मागा ।
सामर्थ्य काय येतें धरितां हातांत लाकडी भागा ! ॥ ५६ ॥
अधिकाराच्या आह्मां अमुच्या सैन्यांत द्यावया जागा ।
प्रतिबंध कां असावा ऐसें निक्षून इंग्रजा सांगा ॥ ५७ ॥
निजदेशरक्षणास्तव युद्धकलाज्ञान पाहिजे आधीं ।
साम्राज्यरक्षणाचें कार्यहि तें संकटीं सुखें साधी ॥ ५८ ॥
हरिचरणीं भाव धरा, दीनांचा पांडुरंग कैवारी ।
भारतभूभक्तातें नेइल हरि तूर्ण मुक्तिच्या द्वारीं ॥ ५९ ॥
भारतभद्रपरायण दिसतां निस्वार्थ निश्चयी तरुण ।
भारतभाग्यरवीचा उदया पावेल भारतीं अरुण ॥ ६० ॥

# मोरो गणेश लोंढे.

जन्म इ. स. १८५४-मृत्यु सन १९२०

हे कवि, पेण तालुक्यांत वरसई ह्मणून एक खेडें गांव आहे, तेथें इ. स. १८५४ (कार्तिक वद्य ३० शके १७७६ ) ह्या वर्षी जन्मले. हे जातीचे कोंकणस्त आश्वलायन ब्राह्मण. यांचें मराठी व इंग्रजी प्राथमिक शिक्षण मुक्काम पेण येथें झालें. ह्यांचे वडील भगवद्भक्त असन त्यांनीं कांहीं आरत्या केल्या होत्या. त्यांचें पुस्तकविक्रिचें दुकान असे. त्यांच्याजवळ प्रस्तुत कवींनीं लहानपणीं त्या आरत्या, हरिविजय, पांडवप्रताप, इत्यादि प्राकृत कविताग्रंथ वाचिले. त्या योगानें ह्यांस कवितेचि गोडी लागली. आपल्या वयाच्या १६ व्या वर्षी शाळेंतील शिक्षणक्रम सोडून ह्यांस केवळ ६ रुपये पगारावर शिक्षकाची नोकरी धरावी लागली. तथापि, ह्यांनीं उद्योगशीलतेनें व स्वावलंबनानें आपली मानसिक उन्नति करून घेतली; विविधविषयांवर पुष्कळ कविता लिहिल्या व त्यांपैकीं बऱ्याच लघुपुस्तकरूपानें छापून प्रसिद्ध केल्या आहेत. त्या सर्वांचीं नांवें येथें स्थलसंकोचास्तव देतां येत नाहींत. तथापि, बोधशतक, बोधसुधा, बोधमाला, पुष्पगुच्छ, पुष्पावली, पुष्पमाला, वगैरे पुस्तकांतील कविता निवडून प्रस्तुत गंथांत घेतल्या आहेत. ह्यांची कविता साधी, सरळ आणि व्याकरणशुद्ध असते. शिवाय, ती नीति-बोध-पर असल्यानें विशेषतः लहान मुलांस मनोरंजनद्वारा ज्ञान करून देण्याच्या कामीं फार उपयोगी आहे. कित्येक वेंचे प्रौढवाचकांसही प्रिय होतील असे सरस व रमणीय आहेत. प्रस्तुत कवि सन १९२० सालीं दिव्यंगत झाले.

## काम कर.

पद. ( चाल—उठिं गोपालजी )

स्वच्छ झाल्या दिशा, उदय पावे रवी ।
सृष्टिच्या वैभवा काय दावी ॥
झोंप टाकीं मुला! ऊठ बा लौकरी ।
उद्यमीं आपुलें चित्त लावीं ॥ १ ॥ मुला० ॥
ऊठबा लौकरी ऊठ वेगें ।
वेळ जा गत न ये जाण मागें ॥ ध्रु० ॥ मुला० ॥
पळ न दवडीं वृथा, उद्यमावाचूनी ।
वांचूनी आळशी व्यर्थ लोकीं ॥
उद्यमें कीर्ति तुंज, उद्यमें संपदा ।
लाभत मुक्तिही उद्यमें कीं ॥ २ ॥ मुला० ॥
जन्म लाधे तुला मानवाचा बरा ।
ज्ञानठेवा वरी प्राप्त झाला ॥
आळसें दवडितां, वेळ सारा वृथा ।
शत्रू तूं आपुला मात्र ॥ ३ ॥ मुला० ॥
व्यर्थ गेली घडी, तास जाईल बा ।
पक्ष मासांप्रती लोटिशी तूं ॥
काळ यईल बा, धाक घालावया ।
तुजविणें वर तरी जीवजंतू ॥ ४ ॥ मुला० ॥

---

## तारुण्यांतील उमेदी.

मालिनी.

चल झडकर जाऊं कीर्तिशैलीं चढून
सतत नियम ज्याचा काय त्याला कठीण ?

चिरसमय रहावें आपलें नाव लोकीं,
सकल बुधजनांतें हें मनीं आवडे कीं ॥ १ ॥
जनपदहित साधी मेळवी जो जयाला,
स्वजनहित करूनी त्या सुकार्यीं निमाला;
जनपदहितकर्ता नांव हें त्यास लाधे,
सकल जन तयाला नित्य गातात मोदें ॥ २ ॥
लवकर उतरूनी ज्ञानसिंधूंत यत्नें,
निवडक वर काढूं सर्व चातुर्यरत्नें;
सविभव मिळवूं या ज्ञानरूपीं निधानें,
अधिक अवनिमाजीं जीं हिऱ्याहून मानें ॥ ३ ॥
गमन करुं पुढें या पाय मागें न घेऊं,
सुमति करिं धरूनी सत्पथांतून जाऊं;
निजगुण निजकीर्ति वाढवूं नित्य नित्य,
सुगुणचि सुख लोकीं कीर्ति सौंदर्य सत्य ॥ ४ ॥
वचन वदुं मुखानें आचरूं तेंवि हातें,
करुन वर कृतीला मार्ग दावूं दुजांतें;
सुमन गुतवुनी हें आपलें सत्कृतींत,
जनपद बनवूं हा स्वर्ग यत्नें खचीत ॥ ५ ॥

---

## मधमाशी.

स्रग्धरा.

जाशी तूं मेळवाया मध सतत सखे ! गे सकाळीं उठूनी,
गेल्या नाहींत रानीं अजुन निजगृहालागिं धेनू त्यजूनीं;
या पुष्पांच्यावरी तों तुज निरखुनियां मोद झाला मनासीं,
उद्योगें आपल्या तूं वर पथ सगळ्या मानवां दाखवीसी ॥ १ ॥

गेलें आहेत झोंपीं अमित जन पहा ! आळसें या सुवेळीं,
उद्योगीं राबतेसी बहुलघु असुनी नित्य गे तूं सकाळीं ;
मोठ्या यत्नें मधाचे, विपिन फिरुनियां, बिंदु तूं मेळवीसी,
त्याचीं पोळीं करुनी बहुत जपुनियां मानवांलागिं देसी ॥ २ ॥
आधीं कामास येसी तरि न परतसी लौकरीं तूं घराला,
पक्षी कोठ्यांत जाती, दिनमणि निघुनी जाय देशांतराला ;
गाई गोठ्यांत जाती तरि तव दिसतें काम तें चाललेलें,
उद्योगें आपल्या तूं खचित मज गमे मानवां लाजवीलें ॥ ३ ॥
नेमानें मक्षिके ! तूं खटपट करुनी सांठवीसी मधाला,
खासीना एक बिंदू चवहि न बघसी काय वाटे मनाला ?
नाहीं कार्पण्य हें गे सुखकर तुजला सत्य वाटेल अंतीं,
नेतां पोळें लुटूनी तुज दुखवुनियां पावसी खेद चित्तीं ॥ ४ ॥
उद्योगें मेळवावें मधु बहु इतकें ठावकें मात्र तूतें,
भोगावें त्यास कैसें विदित न तुजला यामुळें दुःख होतें !
चित्तीं कांहीं विचाराप्रति करिं सखये ! गेलिया प्राण काय,
सांठा मोठा मधाचा जवळ असुनियां ? तो तुला व्यर्थ होय ॥५॥

## हंगाम.

वसंततिलका.

शेतें तयार सगळीं असती पिकून, गेलीं शिरीं धरुन धान्यभरा लवून ;
तीं स्वर्णवर्ण दिसती निरखा दुरून, कोणास तोष न गमेल तयां बघून.
गर्दी उडून मग जाय कृषीवलांची, कापून तीं निजगृहाप्रति आणण्याची;
जे चार मास खपुनी बहु कष्ट केले, त्याचें तयांस फळ आज असे मिळालें.
आला अजून उदयास न अंशुमाळी, तों भोजनें उरकलीं अगदीं सकाळीं ;
सारून सर्व गृहकृत्य करून घाई, कांता निघून पतिला मिळण्यास जाई.

कोणी कृषीवल करीं धरितो शिदोरी, येईल भोजन ह्मणे दुसरा दुपारीं;
येईन मी निजगृहा तंव एक बोले, कोणी मुळीं न वदतां निजमार्ग चाले.
सोडून सर्वहि कृषीवल पंथ मोठा, ते लागलेच धरिती मग आडवाटा ;
शेतीं शिरून सगळे गुततात कामीं, गप्पांत ते दवडिती न घडी रिकामी.
औतांप्रती धरुनियां आपुल्या करांत, बाप्ये स्त्रिया जरठही बहु राबतात;
हीं बालकेंहि मधुनी करिती श्रमाला, कामाविणें न सुचतें दुसरें तयाला.
भाजीतसे जरि तयास वरून ऊन, कीं त्रास घर्म बहु दे वपुला निघून;
कोणी वदे न तरि शब्दमुळी चकार, कापीतसे परि झराझर धान्यभार.
कोणी कृषीवल मधींच लकेर ओढी, वेणूरवापरिस गोड सुरास काढी ;
त्याच्या करांतिल तरीहि न काम राही, कामांत गर्क सगळें मन होय पाहीं.
जेवावयास बसतात कितीक तेथें, हंगाम हेंच नव पर्व गमे तयांतें ;
सारून भोजन पुन्हां गुतात कामीं, याया दिनान्तसमयीं निघतात धामी.
घेऊन भार मग ते निघतात माथां, जाती थकून बहुधा स्वगृहास येतां;
घेती कितीक बसुनी सुपथीं विसांवा, येती कितीक सदनास तसेंच तेव्हां.
हंगाम आज बहुधा सगळ्या पिकाचा, मेळा करी ह्मणुन काम कृषीवलांचा;
पाहून हें निजमनामधिं बोध घ्यावा, हंगाम केवळ सुकाळ चुकूं न द्यावा.
खेळाकडे जरि असे कल या मनाचा, हंगाम होय परि तोच शिकावयाचा;
जाणून हें फुकट बाळपणा न वेंचीं, सौख्यास वाण तुजला मग होय कैंची.
तारुण्य ये तुज सुचे न बरा विचार, चित्तास मोह करिती व्यसनें अपार ;
हंगाम तो परि सुवर्तन तें धराया, बाळा ह्मणून न शिरे व्यसनांत वायां.
हंगामशीर जपतां सुख होय फार, दंगाम तो दवडितां असुखा न पार ;
हंगाम तूं न चुकवीं म्हणुनी कशाचा, हा बोध बाळग मनांत तुझ्या हिताचा.

---

## आयुष्य.

उपजाति.

तारा तुटे जो गगनीं चकाके, चोंहींकडे तेज तदीय फांके ;
क्षणांत जाई परि तो लयाला, आयुष्य त्याच्यासम जाण बाळा ।। १ ।।

पाण्यावरी बुद्बुद जो उठे तो, पाहूनियां मानव तोष घेतो;
क्षणांत जातो परी तो लयाला, आयुष्य त्याच्यासम जाण बाळा! ॥२॥
जो थेंब पानावरतीं दंवाचा, क्षोभेस घेई नव मौक्तिकाच्या;
क्षणांत जाई परि तो लयाला, आयुष्य त्याच्यासम जाण बाळा ॥ ३ ॥
वेगें सुटे जो गगनीं समीर, मेघांस नेई विलयास पार;
क्षणांत जाई परि तो लयाला, आयुष्य त्याच्यासम जाण बाळा! ॥४॥
तारा तुटे बुद्बुद लीन होय, सुकून उष्णें हिमबिंदु जाय;
जाई दिगंतास निघून वारा, मनुष्य हेंही विसरे बिचारा! ॥ ५ ॥

---

## ओढा

वृत्तवैचित्र्य.

मी येतसें उंच कड्यावरून, आहें स्वतां मी बहु वेगवान;
माझ्या मना भी न मुळीं शिवेल, दरींत मारीन उडी पहाल ॥ १ ॥
कितीक टाकूनहि टेंकड्यांला, जाईन मी एकसरें तळाला;
किंवा तयांच्या मधुनी शिरेन, हळू हळू मी तळ आक्रमीन ॥ २ ॥
जाईन खेडयांवरुनी कितीक, ओलांडुनीयां शहरें अनेक;
जाईन मी धांवत भेटण्याला, जी पूर्ण तोयें असल्या नदीला ॥ ३ ॥
जाईन जेव्हां दगडाळ मार्गीं, होतील तेथें ध्वनि जागजागीं;
खर्जास मागें ध्वनि एक सारी, दुजा ध्वनी पंचम अंगिकारी ॥ ४ ॥
वाटेंत गोटे मिळतील जेथें, मी बोबडे शब्द वदेन तेथें;
होतील माझ्यामधिं भोंवरे ते, तरंग मोठे उठतील तेथें ॥ ५ ॥
वाटेंत शेतें दिसतील कोठें, लागेल कोठें वन दाट मोठें;
गेले तृणानें अगदीं भरून, प्रदेश पाहीन सुखेंकरून ॥ ६ ॥
कोठें लव्हाळ्यांतुन मी शिरेन, घेईन पृष्ठावरि जीव दीन;
गोष्टी कुठें मी बहु चालवीन, एकाहि शब्दा न कुठें वदेन ॥ ७ ॥

कोठें रवीचीं किरणें सुतेजें, तीं शोभवीतील सुरूप माझें ;
जैसें हिऱ्याचें नव तेज फांके, तैसेंच तेणें जलही चकाके ॥ ८ ॥
शिरेन झाडींतुन एकदा मी, निघेन कोठें गवतांत नामी ;
जाईन मी पाणथळी मधून, सुशीघ्र कीं मंदगती धरून ॥ ९ ॥
धरीन कोठें मग पंथ नीट, रुचेल कोठें मज आडवाट ;
जाईन कोठें वळणांतुनीही, कोठें न मातें अटकाव होई ॥ १० ॥
असेल कोठें बहु खोल पाणी, असेल थोडें दुसऱ्या ठिकाणीं ;
कोठें न वाटे भय मानवांला, कोठें न सोसे बहु ओढ त्यांला ॥११॥
ओलांडुनी लोक कितीक जाती, एका थडीहून दुजीस येती ;
थांबें न मी ते जरि थांबताती, धांवावयाची मज आवडी ती ॥१२॥
मनाप्रमाणें करुनी विहार, भोगूनियां वैभव फार फार ;
जाईन धांवून मिळावयाला, संपूर्ण तोयें असल्या नदीला ॥ १३ ॥

## पश्चात्ताप.

वृत्तवैचित्र्य.

जो घालवी बालपणांत वळ, करूनियां व्यर्थ उगाच खेळ ;
होई तयालागिं अपार ताप, तारुण्य येतां मग तो अपाप ! ॥ १ ॥
केली न विद्या न दिली परीक्षा, मिळे न उद्योग रुचे न भिक्षा ;
स्वतंत्र उद्योग करावयाला, असे मुळीं ज्ञान न अल्प त्याला ॥ २ ॥
ह्मणे उगे मी बहु खेळ केले, वृथा कुमारत्व लयास नेलें ;
विद्या कधीं मीं अगदीं न केली, तेणें मला दुर्गति हे मिळाली ॥ ३ ॥
निर्वाह होईल कसा मदीय, लागेल कैशी मजलागिं सोय ;
दावील कोणी जरि वाट चांग, फेडीन त्याचे उपकार सांग ॥ ४ ॥
येती जरी मी शिकतोंच आतां, विद्या परी दुर्लभ ती सुत्रातां ;
गेली घडी ते न फिरून येते, हें तत्त्व तेव्हां कळलें न मातें ॥ ५ ॥

तारुण्य जो योग्यपथें न वेंची, ऐसी गती होय पुढें तयाची;
वृद्धत्व येतां बहु दीन होय, शोकीं पडे काय तया उपाय ? ॥ ६ ॥
जरी बहू मी धन जोडियेलें, लागून नादीं बहु खर्च केलें ;
आतां नसे कीं कवडीहि खाया, गेलों वृथा मी उपजून वायां ॥ ७ ॥
केला न कांहीं उपकार हातें, आतां मला कोण सहाय होतें ?
गेलें वृथा कीं तरुणत्व माझें, पाहून हें चित्त मदीय लाजे ! ॥ ८ ॥
म्यां पाहिला धर्म अधर्म नाहीं, केलें मना जे रुचलें सदाही ;
कधीं न देवाप्रति चिंतियेलें, कुणा न दुःखांतुन सोडवीलें ॥ ९ ॥
न वागलों मी नियमें कदाही, तेणें न आतां मज शक्ति राही ;
राहील तारुण्य सदा असेंच, मानून ऐसें फसलों उगाच ॥ १० ॥
वृद्धत्व मार्गांत बऱ्या न वेंची, जगांत निंदा बहु होय त्याची ;
वाटे तयाला भय सर्वदाही, येईल मृत्यू ह्मणवून पाहीं ॥ ११ ॥
पापें तयाला दिसती समोर, तीं लाविती फार मनांत घोर !
सुचे न त्याला सुविचार कांहीं, वाटे तया मी नरकास जाईं ! ॥ १२ ॥
वाटे तया व्यर्थ सुजन्म गेला, येईल आतां यम न्यावयाला;
पुढें मदीया गति काय होई, विवंचना हे हृदयास दाही ! ॥ १३ ॥
बाल्यांत ऐसें कर कृत्य हातें, तारुण्य येतां सुख दे मनातें ;
मोठेपणीं तूं न करीच पाप, वृद्धत्व तूतें न करील ताप ॥ १४ ॥
विद्या करीं बाळपणांत सारी, तारुण्य येतां व्यसनां निवारीं ;
वृद्धत्व येतां भज ईश्वरातें, वाटे तुझी भीति तरी यमातें ॥ १५ ॥
जो जन्मला तो मरणार जीव, त्याची न भीती हृदयांत ठेव;
आयुष्य वेंची अवघें सुखानें, तूं सत्कृतीच्यामधिं आदरानें ॥ १६ ॥

## उंदीर व त्याची आई.

वसंततिलका.

आई उदार बहु मालक या घराचा, झाला असा ग्रह खरोखर या मनाचा ;
बांधून दे मज नवीन सुरेख गेह, पाहून तें बहु खुशाल मदीय देह.

तारा सुरेख बसवून दिल्या तयाला, नाहीं कुठें अटक वायुस खेळण्याला;
जागा असे सुबक आंत बहू रिकामी, जायास दार उघडें टुमदार नामी.
खायास आंत न दिसे अगदींच तोटा, फोडून नारळ दिला पसरून मोठा;
लागे तहान तरि तेथ असेल सोय, सोई करी बहुत तो विसरेल काय.
जागा कशी बहुत छान निजावयाला, ठेवावयास नलगे मंनिं काळजीला;
तें द्वाड मांजर कधीं न शिरेल तेथें, होईल फार जननी सुख आपणांतें.
येशील तूं चल तरी गृह तें पहाया, जाऊं निघून मग तेथ सुखें रहाया;
होईल पाहुन तुला सुख जेविं मातें, वाटेल गोड वसणें तुजलाहि तेथें.
आई वदे अजुन तूं अससी लहान, वाईट तेंविं बरवें तुजला कळे न;
गेलास तूं न परि आंत बरेंच केलें, देवें दया करुनियां तुज रक्षियेलें.
ऐके मुला गृह न तें तुजला धराया, तो सांपळा करविला भुललास वांयां;
जाणून सत्य न शिरें सहसा तयांत, गेल्यावरी न सुटसी बहुधा जिवंत.
तें खोबरें पसरिलें तुज मोहवाया, जाऊं नको परि भुलून तयास खाया;
तें दार आंत शिरण्यास्तव मात्र पाहीं, जातांच आंत मग बंद अपाप होई.
केले जरी बहुत कष्ट न मोकळें तें, होई, धन्यास कळतां बडवील तूतें;
ऐसा असे बहुत दुष्ट तदीय हेतू, जाणून हें त्यज मनोगत आपलें तूं.
ही मोकळीक बरवी दिधली प्रभूनें, भोगूं सुखें, न दवडूं आपुल्या करानें;
खाऊं मिळेल जरि अल्प तरी सुखानें, गाऊं मुखें सतत ईश्वर आदरानें.

---

## आई.

शार्दूल विक्रीडित.

पाजी बाळपणीं तुह्मांप्रति पया ती कोण सांगा बरें?
विश्रांतिस्तव पाळण्यांत निजवी जी थोपटूनी करें;
गालाचे वरचेवरी मृदु मुके जी घेतसे फारशी,
ऐशा या जननीप्रती विसरतां हे भ्रांति होते कशी ॥ १ ॥

दुःखें व्यापुनिया तुह्मी रडतसां पाहून शोकें भरे,
ग्रासी काळ तुह्मांस काय ह्मणुनी जीतें रडें नावरें ;
जी बैसे जवळी उपायहि करी देवा स्तवी फारशी,
ऐशा या जननीप्रती विसरतां हे भ्रांति होते कशी ! ॥ २ ॥
घेऊनी कडियेवरी मिरविलें संगोपना ठेविलें,
हातें औषध तें उगाळुन जिणें प्रेमें तुह्मां पाजिलें ;
लावूनी उटणें सुवासिक जलें न्हाणून ठेवी खुशी,
ऐशा या जननीप्रती विसरतां ह भ्रांति होते कशी ! ॥ ३ ॥
ऐसे कष्ट तिचे स्मरून वचना माना तिच्या सादर,
ठेवा मान तिचा न लोभ विसरा प्रेमें करा आदर ;
होतां वृद्ध जपा तुह्मांस जपली बाल्यांत माता जशी,
ऐशा या जननीप्रती विसरतां हे भ्रांति होते कशी ! ॥ ४ ॥

---

## जन्माचें सार्थक

साक्या.

सार्थक देहाचें, होइल मानीं तरि साचें ॥ धृ ॥
संपादावें बाळपणीं त्वां उत्तमशा ज्ञानाला ।
तरुणपणीं या लोकीं मिळवी यत्नें शुद्ध यशाला ॥ १ ॥
मेळविल्या विद्येचा द्यावा अवघ्या लाभ जनांला ।
देशाच्या बाहेरी दवडा यत्नें अज्ञानाला ॥ २ ॥
मोठें मन करूनी लावावें निजदेशाच्या कामीं ।
मी मी ह्मणुनी गर्वें फुगुनी लुब्ध न व्हावें धामीं ॥ ३ ॥
सार्वजनिक कामांत असावें नित्य पुढें उत्साहें ।
देशासाठीं झीज लागतां दुःखहि होतां साहें ॥ ४ ॥
पशुपक्षीही उदरालागीं भरिती नित्य सुखानें ।
तेविं तुह्मी आचरितां त्यांशीं भेद तुह्मांस कशानें ? ॥ ५ ॥
ज्ञान तुह्मांला दिलें प्रभूनें करा विचार कशाला ।
बंधुजनांचें हित साधुनियां संतत गावें त्याला ॥ ६ ॥

# गंगाधर रामचंद्र मोगरे.

जन्म इ. स. १८५७, मृत्यु सन १९१५

हे कवि, शिरगांव येथें इ. स. १८५७ ह्या वर्षी जानेवारी महिन्याच्या २१ व्या तारखेस जन्मले. हे जातीचे शुक्ल यजुर्वेदी ब्राह्मण. ह्यांचा मराठी अभ्यास शिरगांव येथील शाळेंत झाला. नंतर इ. स. १८७३ पासून ह्यांच्या इंग्रजी शिक्षणास प्रारंभ झाला. हें शिक्षण मुंबई येथें अनुक्रमें जगन्नाथ शंकरशेट ह्यांच्या शाळेत आणि 'एलफिन्स्टन् हायस्कूलांत' प्रवेशपरीक्षेपर्यंत झालें; परंतु शरीरप्रकृति सदृढ नसल्यानें शिक्षणक्रम सोडून ह्यांस नोकरी पतकरावी लागली. ब्यांकेंत कांहीं महिने नोकरी केल्यावर मुंबई येथील 'रॉयल एशिआटिक सोसायटी'च्या ग्रंथसंग्रहालयांत इ. स. १८८६ च्या दिसेंबर महिन्यांत ह्यांस लायब्ररीयनची जागा मिळाली. ही नोकरी त्यांनीं शेवट-पर्यंत बजाऊन तेथील अपूर्व ग्रंथसंग्रहाचा चांगला उपयोग करून घेऊन त्यांनीं आपल्या ज्ञानांत विशेष भर घातली.

ह्यांस कविता करण्याचा नाद लहानपणीं मराठी शाळेंत असतांच लागला, व त्या नादानुसंधानानें जातां जातां हे कवि केवळ स्वप्रयत्नानें महाराष्ट्रभाषेंतील अर्वाचीन कवींमध्यें अग्रस्थानीं जाऊन पोंचले. यांनीं बाणकथेचें प्राकृत आर्याबद्ध काव्य केलें असून तें 'अभिनव कादंबरी' ह्या नांवानें प्रसिद्ध झालें आहे. स्फूट कविताही पुष्कळ केल्या असून त्या विविधज्ञानविस्तारांतून व क्वचित बालबोधांतूनही वेळोवेळीं प्रकाशित झाल्या आहेत. यांची कविता साधी, सरळ आणि प्रसन्न आहे. प्रस्तुत ग्रंथांत ह्यांच्या नांवाखालीं घेतलेले वेंचे ह्यांच्या अभिनव कादंबरींतील होत, हे कवि सन १९१५ सालीं दिव्यंगत झाले.

## मराठी ग्रंथकारांस विनंति.

आर्या.

ह्मणतात जे—'मराठी भाषा होणार ही असे नष्ट,
'मिळणार काय करुनी व्यर्थ हिला वांचवावया कष्ट ?' ॥ १ ॥
त्यांना हेंच पुसा कीं 'मरणोन्मुख होय आपली माय,
'ह्मणुनी औषध कांहीं पुत्रीं देऊं नये तिला काय ?' ॥ २ ॥
माता तशी स्वभाषा सेवाया होय आपणां उचित;
किंबहुना मातेहुनि अधिक हिची योग्यता असे खचित ॥ ३ ॥
दे जन्म मात्र माता, भाषा व्यवहार चालवी सकळ,
मातेशिवाय जन्महि जाय, न भाषेशिवाय एक पळ ॥ ४ ॥
रक्षी ह्मणूं, तरी ती बाल्यापुरतीच काळजी वाहे,
आबालवृद्धरक्षण–कार्यीं ही दक्ष सारखी राहे ॥ ५ ॥
उपकार थोर ऐसे नित्य जिचे आपणांवरी होती,
हो कां दीन, कधीं नच योग्य उपेक्षावया तरी हो ती ॥ ६ ॥
यास्तव ज्या कोणां ह्या निजभाषेचा असेल अभिमान,
देवोत सादरें मम विनतिकडे ग्रंथकार ते कान:—
ज्यांच्या पराक्रमांचीं आनंदें गातसां तुह्मी गाणीं,
त्या शूर पूर्वजांची तुमच्या ही चालली लया वाणी ! ॥ ८ ॥
त्यांचें तुमचेंहि तुह्मां राखायाचें असेल नांव, तरी,
द्या हात हीस द्याहो ! पुण्याचें श्रेय घ्यावया पदरीं ॥ ९ ॥
कोणी साह्य करो, वा न करो, कर्त्तव्य होय जें कर्म,
केलेंच पाहिजे तें, श्रेयस्कर हाच आपणां धर्म ॥ १० ॥
जातां कशास राज–द्वारीं ? मिळणार काय हो तेथें–
गुणदोषनिर्णयाचें काम दिलें आर्जवाकडे जेथें ? ॥ ११ ॥

स्वर्गीं प्रयाण केलें जेव्हां त्या दानशूर भोज नृपें,
समजा तयींच राज-द्वारांना घट्ट लागलीं कुलपें ! ॥ १२ ॥
लोकीं वदान्य राजे रंकहि आहोंत आपणचि आजी,
देणें घेणें सर्वहि चालूं द्या आपआपसांमाजी ॥ १३ ॥
लोकमतांवरि तैसे अवलंबुनि फारसे नका राहूं,
कोणी निंदो अथवा वंदो, तिकडे कधीं नका पाहूं ॥ १४ ॥
भ्यावें जनापवादा, तों तों भिववील फार तो कुतरा,
ह्व्यासही स्तुतीचा भ्रमवी जनमानसा जसा धुतरा ॥ १५ ॥
योग्यायोग्यपरीक्षण-शिक्षेला दीर्घकाळवरि मुकलें,
भलतीकडेच ह्मणुनी आहे इकडील लोकमत झुकलें ॥ १६ ॥
ग्रंथप्रसार पुष्कळ जनपदभाषेंत जों नसे झाला,
लागायाचें नाहीं जनमत हें तोंवरी सुमार्गाला ॥ १७ ॥
यास्तव विद्वज्जनहो ! उघडा उघडा स्वबुद्धिभांडारें,
अज्ञानध्वांत हरा नानाग्रंथप्रकाशनद्वारें ॥ १८ ॥
'व्यर्थ कशास लिहावे ग्रंथ, जरी त्यांस वाचकचि नसती?'
ह्या दुष्ट कल्पनेची होऊं देऊं नका मनीं वसती ॥ १९ ॥
येतील जे कराया साह्य, तयां आदरें म्हणा-या या !
जातील दूर त्यांच्या मागें लागूं नका तुह्मी वायां ! ॥ २० ॥
जे लाजतील कोणी तुमच्या लेखां धरावया हातीं,
समजा कृतघ्न पोरें झालीं उद्युक्त मातृघाता तीं ॥ २१ ॥
जे ही स्वमाय सोडुनि परकीचा लोभ इच्छिती लटका,
सापत्नभावनेचा लागूं द्या त्यांस चांगला चटका ॥ २२ ॥
न ह्मणा रसिकचि नुरले, दैवाचा जाहल्यामुळें कोप,
आहे संप्रति त्यांना बांधवहो ! गाढ लागली झोंप ॥ २३ ॥
त्यांतचि व्हावा तैसा होई ग्रंथप्रकाशही न जनीं,
निजतील कां न मग ते सरली नाहींच मानुनी रजनी ॥ २४ ॥

रजनीभ्रम तो त्यांचा नाहीं निःशेष पावला नाशा,
तोंवरि चीज गुणांचें तुमच्या होईल, ही नसे आशा ॥ २५ ॥
ग्रंथप्रकाश करितां यास्तव अगदीं सरूं नका मागें,
ह्मणजे उजाडलें हें जाणुनि होतील तेच हा जागे ॥ २६ ॥
ते जाहल्यास जागे, सद्भिरुचीलाहि जागवायास,
पडतात आज तैसे न तुह्मां पडतील फार आयास ॥ २७ ॥
सद्भिरुचीच्या योगें पावुनियां नित्य योग्य संस्कारा,
राहील शुद्ध होउनि जनमत, त्याचा झडोनि मळ सारा ॥२८॥
मग जो तुह्मां जनाश्रय न मिळे ह्मणुनी तुह्मी असां खिन्न,
सेवा करावयाला तुमची लागेल तो अविच्छिन्न ॥ २९ ॥
ज्याचे करहि मराठी-ग्रंथस्पर्शें विटाळती आज,
वाटेल त्यां स्वपूर्वज ह्मणत। त्यांच्याच वंशजां लाज ॥ ३० ॥
जे झांकितात संप्रति येतां पाहुनि तुह्मांस दरवाजे,
कीर्त्यर्थ तेहि तुमच्या भजनीं रततील छत्रधर राजे ॥ ३१ ॥
क्षयरोगमुक्त अंतीं तुमची होऊन देशभाषा ही,
तुमच्या भव्य यशानें भरुनी टाकील हो दिशा दाही ॥ ३२ ॥
करितां प्रयत्न इतकें श्रेय खरोखर मिळेल या कामीं,
करवे न ही प्रतीज्ञा, ऐका तरि सांगतों तुम्हांला मी ॥ ३३ ॥
कीं, सिद्ध यत्न होतां, क्लेश महाराष्ट्रभारतीचे या;
होऊन नष्ट, लोकीं निःसंशय पात्र व्हाल या श्रेया ॥ ३४ ॥
दुर्दैवानें तुमचे यत्न जरी हे न शेवटा गेले,
झालें स्वधर्मरक्षण, समजा मोठेंच कार्य हें केलें ॥ ३५ ॥
दोन्हीकडोनि अंतीं लाभाची जोड आपणां आहे,
यास्तव तरी करा हो इतका हा कार्यभाग उत्साहें ॥ ३६ ॥
आला प्रसंग म्हणुनी गेलों बोलून शब्द जे चार,
घ्या गोड मानुनी ते बुधहो ! असले जरी कडू फार ॥ ३७ ॥

## महाश्वेतेची कथा.

आर्या

चंद्रापीड निघे मग दिग्विजया राजनंदनांसहित,
जिंकून पूर्व, दक्षिण, पश्चिम, ये उत्तरेकडे त्वरित ॥ १ ॥
तिकडे हिरण्यनगरीं किंपुरुषांचा विलोकुनी जोडा,
लागे त्याच्या मागें नृपसुत वेगें पिटाळुनी घोडा ॥ २ ॥
त्यांनीं आशा दावुनी, मागें लावुनि बराच दूरवर,
नेऊन, गुप्त होऊनि, अंतीं केला निराश भूपवर ॥ ३ ॥
मार्गश्रमें तृषेनें पीडित होऊनि धुंडितां तोय,
अच्छोदाख्य सरोसर पाहुनि तो हृष्ट मानसीं होय ॥ ४ ॥
तद्दर्शनेंच त्याच्या चित्तांतील खेद सर्वही हरला,
प्याला यथेच्छ जलही स्वाद सुधेचाच ज्यामधें भरला ॥ ५ ॥
पाणी पिऊन नृपसुत बसला असतां तटीं तटाकाच्या,
पडता झाला कर्णीं मधुर मनोहारि गीतरव त्याच्या ॥ ६ ॥
कोणीकडून येतो गाण्याचा नाद तो पहाया हें,
हरिणामागुनि जातां सिद्धालय रम्य एक तो पाहे ॥ ७ ॥
शशिशेखरास भावें अर्चुनि वीणा धरूनियां हातीं,
तिकडे एक कुमारी शिवमहिमा गात बैसली होती ॥ ८ ॥
चंद्रप्रभेप्रमाणें यत्तनुची गौरकांति लखलखित,
ऐशा त्या तरुणीला पाहुनि नृप होय मानसीं चकित ॥ ९ ॥
तद्रूपसंपदेनें तेंवि तिच्या त्या मनोहरें गीतें,
पावून मोह, पाहे वृत्त तिचें तो पुसावया तीतें ॥ १० ॥
गायन समाप्त होतां वंदुनि ईशा प्रदक्षिणा करुनी,
फेंकी नृपाकडे ती अमृतोपम दृष्टि आपली तरुणी ॥ ११ ॥

‘ या आश्रमीं ’ ह्मणे ती ‘ पूज्य अतिथि मज तुह्मी, बरे आलां,
तद्वागमृतें होउनि तृप्त नरेश्वर तिच्यासवें गेला ॥ १२ ॥
ती स्वाश्रमीं सुकेशी नेउनि बसवुनि सुखासनीं त्याला,
विधिवत् पुजुनि बोले ‘कोण असां ? कोठुनी इथें आलां?’॥१३॥
तो किन्नरानुगमनापर्यंत तिला स्वजन्मवृत्त कथी,
तेव्हां स्नेहें तीहि द्रवली तद्गुणविमोहिता सुदती ॥ १४ ॥
सरुनि पुढें मग विनयें नमुनि तिला तो विचारिता झाला,–
‘ निजजननें आर्येनें भूषित सुरवंश कोणता केला ? ॥ १५ ॥
‘ निःशेष लाजवावी लावण्यें चंद्रिका जिच्या ऐशी,
‘ कांति प्रकट शरीरीं आर्येच्या होय ही तरी कैशी ? ॥ १६ ॥
‘ सर्वहि सुखोपभोगी विरक्ति नवयौवनींच कां घडली ?’
‘ इतकी कां आर्येची प्रीति तपस्येवरि असे जडली ? ॥ १७ ॥
पुसतां असें नृपें ती मौनें निःश्वास दीर्घ टाकून,
भिजवी निजाश्रुपातें धरणी स्वकरें मुखास झांकून ॥ १८ ॥
पाहुनि तिची दशा ती, अपराधी आपणास भावून,
तन्नयनें क्षाळाया नृप जळ आणी स्वयेंच जाऊन ॥ १९ ॥
प्रक्षाळुनि निज मुख निज जन्मकथा ती कथीतसे त्याला,
‘ ऐक’ म्हणे ‘कथितें मी तुज संक्षेपें स्ववृत्त भूपाला–’ ॥२०॥
असतीं कुळें चतुर्दश सुरगणिकांचीं प्रसिद्ध जीं भुवनी,
शशिकरज त्यांतलें जें, माझी त्यामाजि जन्मली जननी ॥ २१ ॥
गंधर्वापासुनि जो झाला दाक्षायणि अरिष्टेला,
तो हंस तात माझा; गौरी ह्मणती मदीय मातेला ॥ २२ ॥
राजा गंधर्वांचा झाला मत्तात किंपुरुषवर्षी,
क्रीडाविलास गौरी–सह चिर करुनी दिन क्रमी हर्षी ॥ २३ ॥
पोटीं त्या सुभगांच्या दुर्भाग्या मीच एकटी दुहिता,
मज्जन्मीं बहु उत्सव करुनि दिलें नाम मज महाश्वेता ॥ २४ ॥

गेलें बाल्य सुखानें, यौवनपदवीस पावती झालें,
स्नानार्थ एकदां ह्या अच्छोदीं माउलीसवें आलें ॥ २५ ॥
करुनी स्नान सखीसह लीलेनें हिंडतां सरोरोधीं,
पुष्पसुगंध तिथें ये कोठुनि ह्याच्याच लागलें शोधीं ॥ २६ ॥
तों पाहिला पथीं म्यां एक तरुण मदनमूर्ति मुनितनुज,
जी मंजरी वसे तत्-कर्णीं मोही तिचाच गंध मज ॥ २७ ॥
बघतांच त्यास निजशर मजवर तत्काळ पंचशर मारी,
तेणें व्यथित न हृदयचि विव्हल अंगेंहि जाहलीं सारीं ॥ २८ ॥
जवळी होता त्याचा मित्र तया मी करोनियां नमन,
वदलें 'कोण असे हा मुनि ? कैसें ह्यास हें मिळे सुमन ? ॥२९॥
'कुतुकें पुससि' ह्मणे तो 'ऐक तरी श्वेतकेतुनाम मुनी,
'पुरला काम रमेचा रूपश्रीलाच त्याचिया बघुनि ॥ ३० ॥
'तत्काळ श्री प्रसवे सुत, ती मुनिचा म्हणून त्या तो दे,
'स्वीकारुनी मुनीश्वर नाम तया पुंडरीक दे मोदें ॥ ३१ ॥
'तो लक्ष्मीचा नंदन विद्वान् झाला पितृप्रसादें हा,
'कैलासाहुनि मजसह येतां परतून आज निज गेहा ॥ ३२ ॥
'ठेवी ह्याच्या कर्णीं ह्याला बघतांच नंदनश्री ही,
'मंदारमंजरी, जी स्वसुगंधें सुंदरी तुला मोही' ॥ ३३ ॥
तंव तो तरुणहि कुतुकें मज बोलें 'स्पष्ट काय तें सांगें !
'तुज पाहिजेच तरि ही घे, मग संकोच हा कशाला गे' ॥ ३४ ॥
वदुनि असें निजकर्णा-वरुनी काढून मंजरी त्यानें,
सस्पृह पहात सन्मुख मत्कर्णीं ठेविली स्वहस्तानें ॥ ३५ ॥
त्याच्या करांगुलीचा होतांचि स्पर्श माझिया गाला,
दोघांच्याही हृदयीं कामाग्नीच्या धडाडल्या ज्वाला ॥ ३६ ॥
भान नसे त्या गळली स्मरणी हातांतली जरी खालीं,
झेलुनि वरचेवर ती प्रेमें मी आपल्या गळां घालीं ॥ ३७ ॥

आईच्या आज्ञेनें जाता मी परत तो मला वदला,
'स्मरणी हरून माझी पदहि पुढें टाकणें न योग्य तुला' ॥३८॥
परिसुनि ह्या तद्वचना 'ही घ्या' ऐसें वदोनियां त्यातें,
मुक्तावली स्वकीया दिधली म्यां त्यास आपल्या हातें ॥ ३९ ॥
ये मम सखी तरलिका मजमागें, तो पुसे तियेस झणीं–
'कोण?–कुणाची कन्या? कोठें ही आज जातसे तरुणी' ॥४०॥
मद्वृत्त मत्सखीनें कथितां, सप्रेम तीस सांगें तो–
'एकांती स्वसखीला दे हा जो लेख मी तुला देतों' ॥ ४१ ॥
लेख तमालरसें तो वल्कलपट्टावरी लिहुनि देई,
तो घेउनी सखीही माझी मजमागुनी त्वरित येई ॥ ४२ ॥
'झुरसी यद्विरहें हें पत्र तयानें दिलें' ह्मणे आली,
विरहानलतप्तेला मज ती संजीवनी तयीं झाली! ॥ ४३ ॥
पानपुड्यांतुनि काढुनि देतां मज पत्र तें तिनें, पाहें,
तों त्यामध्यें आर्या आर्यानें एक ही लिहिलि आहे ॥ ४४ ॥
"बिससित मुक्ताहारें लागुनि लोभास हंस जो गेला,
"तद्वन्मानसजन्मा माझाही दूर गे तुवां नेला" ॥ ४५ ॥
हा पत्राशय कळतां पुनरपि कामाग्नि मन्मना जाळी,
मी कोण, कोण ती, मी आहें कोठें, कळे न त्या काळीं ॥ ४६ ॥
तों छत्रधारिणी मम मज सांगे–'मुनिकुमार कासारीं,
'जे दोघे पाहियले, त्यांपैकीं एक पातला द्वारीं' ॥ ४७ ॥
'जा शीघ्र घेउनि ये त्याला'–ही ऐकतांच मम वाणी,
ती जाउनी त्वरेनें मजजवळी त्या कपिंजला आणि ॥ ४८ ॥
बघतांच त्या मुनिसुता सत्कारुनि, काय बोलतो तो हें,
ऐकावया तयाच्या संमुख मी जाउनी उभी राहें ॥ ४९ ॥
'वांचीव त्वद्विरहानलविकला मम सख्यास'–तो वदला,
'कर जोडितों पहा हे, ह्यावरि करि योग्य जे दिसे तुजला' ॥५०॥

सांगून पाठवावें काय तया ह्या विवंचनेमाजी,
असतां मी, मम सदनीं इतक्यांतचि माय येतसे माजी ॥ ५१ ॥
पाहुनि मज्जननीला मजशि न पुसतां निघून तो जाई,
कुशल प्रश्न करोनी मजला, माझीहि जातसे आई ॥ ५२ ॥
माता जातां, रात्रीं जिकडे मद्विरहतप्त तो होता,
मुनिसुत, तिथें सखीसह मीहि निघें जावयास विरहार्ता ॥५३॥
मार्गीं परिसुनि रोदन-रव, मी दचकून काय हें घडलें,
बघतां, रडे कपिंजल, तत्सखशवही महीवरी पडलें ! ॥ ५४ ॥
कारण तन्मरणा 'मी होय', असें गणुनि फार ही रडली,
सहगमनास निघें तों कर्णीं ही दिव्यपुरुषगी पडली ॥ ५५ ॥
'साहस न करीं वत्से ! पुढति समागम घडेल तुज याचा-'
आश्वासुनी असें मज, तो स्वर्गीं देह नेतसे त्याचा ॥ ५६ ॥
'काय प्रकार हा' ही पृच्छा मी त्या कपिंजलास करीं,
त्या माझ्या प्रश्नाचें उत्तर कांहींच देउनी न तरी ॥ ५७ ॥
'कोठें तूं मन्मित्रा घेउनि जातोस ?' दिव्य पुरुषाला,
ऐसें पुसतचि तोहि निज मित्राच्या समागमें गेला ॥ ५८ ॥
तेव्हांपासुनि मी त्या दिव्य गिरेचा धरोनि विश्वास,
बसलें वनीं प्रियातें चिंतीत सोडुनि सुखोपभोगांस ॥ ५९ ॥

---

## प्रेमबंधन.

( आर्या. )

केयूरक गेल्यावर चंद्रापीडा ह्मणे महाश्वेता,
'किन्नरभू बहु रम्या रमवी गंधर्वपुरहि बहु चेता ॥ १ ॥
'साधी असे स्वभावें महानुभावा सखीहि ती माजी,
'अडचण नसल्यास तिला जाऊं भेटावया चला आजी' ॥२॥

तिजला ह्मणे नराधिप ' भगवति ! मज हें विचारितां काय ?
' न्या वाटेल तिथें, हा संप्रति तुमचाच जाहला काय' ॥ ३ ॥
अश्वारूढ क्षितिपति तिजसह गंधर्वराजनगराला,
जाउनि, विचित्र शोभा पाहत कादंबरीगृहा आला ॥ ४ ॥
बघुनि महाश्वेतेला धांवुनि घालुनि तिच्या गळां हात,
कुशलप्रश्न तिला करि हरिखुनि कादंबरी स्वचित्तांत ॥ ५ ॥
हंसीहि कुमाराची देवीला सांगुनी कथा सारी,
बोले, ' गडे मला हा प्राणांपेक्षांहि आवडे भारी ॥ ६ ॥
नरमणि गुणगणनिधि या निज लावण्यें स्वराभिमान हरी,
'ह्यावरि लोभ सखे ! तूं मजवरि करिशी तसाच नित्य करीं'॥७॥
आधींच पावली जी मोह तयाच्या विलोकुनी रूपा,
स्वसखीवचनें स्वासन देउनि बसवी समीप ती भूपा ॥ ८ ॥
देवी मग मदलेखे–करवीं धुववून राजपुत्रपदां,
धुवुनी स्वयें सखीचे पाय बसे स्वस्थळीं वरोनि मुदा ॥ ९ ॥
अन्योन्यांस पहातां अन्योन्यप्रीति मानसीं जडली,
चंद्रापीडाचि न स्मर–पाशीं कादंबरीहि सांपडली ॥ १० ॥
सुदती सलज्ज वारं–वार तयाच्या मुखाकडे बघुनी,
वानी निज नयनांची नरलोकाचीहि धन्यता स्वमनीं ॥ ११ ॥
रावहि पाहुनि तिजला भावी श्रम आपले सफल झाले,
किन्नरमिथुनेंही त्या उपकारचि आपणावरी केले ॥ १२ ॥
प्रेमें करीत असतां विनोदसंवाद एकमेकींशीं,
तांबूलदानसमयीं बोले कादंबरीप्रती हंसी:— ॥ १३ ॥
'आजी प्रेमपुरस्सर आपण सत्कारिजे स्वयें ज्याला,
'त्यास रुचेल तरी त्वां द्यावा पहिला विडा सखे त्याला' ॥१४॥
देवी सलज्ज बोले ' द्यावा त्यांना विडा तुवांच गडे !
' करचि सरे न कराया साहस तें, काय मी करूं तिकडे' ॥१५॥

होतां आग्रह फाराचि, देवी द्याया विडा पुढें जाय,
दे न विडाच जणूं दे मदनाज्ञेनें तयास निजकाय ॥ १६ ॥
तत्करसंगें सात्विक–भाव शरीरीं तिच्या प्रकट झाला,
धीरस्वभाव रावहि झांकूं न शके मनोविकारांला ॥ १७ ॥
जातां हंसी मदिरा–चित्ररथांच्या निमंत्रणें तिकडे,
बोले 'आज रहाया कवण स्थळ योजिलें नृपास गडे ?' ॥१८॥
हंसत ह्मणे मनिं ती–जो सकलकुमारीमनोभवनवासी,
रम्यस्थान दुजें त्या देऊं मी कोणतें रहायासी ? ॥ १९ ॥
स्पष्ट वदे मग ' देउनि दर्शन मज नाथ जो स्वयें झाला,
' मच्छ्रीचा तनुचाही सांग रहाया रुचे तिथें त्याला ॥ २० ॥
' क्रीडामणिगिरिवर ह्या स्थान रहायास दे' वदुनियां हें,
हंसी गेली; क्रीडा–मणिगिरिवर नृपहि जाउनी राहे ॥ २१ ॥
देवी तयास झाली ज्या ज्या उपयोग्य वस्तु पाठविती,
त्या सेवुनि मध्यान्हीं बसला होता सुखासनीं नृपति ॥ २२ ॥
तों मदलेखा नामें देवीची आपणाकडेच सखी,
ये एक रम्य सुरुचिर घेउनियां हार, तो असें निरखी ॥ २३ ॥
संनिध येउनि राया वंदुनि परिचारिका म्हणे–'उदधि,
'देउनि अर्थिजनांतें वाटुनि सारा स्वकीय रत्ननिधि ॥ २४ ॥
' जो हार शेष राहे, तो हा वरुणास देउनि तर्पी,
' वरुणहि चित्ररथा दे; चित्ररथा स्वात्मजेस तो अर्पी ॥ २५ ॥
' देवीनें पाठविला तोच असे हा तुम्हांकडे हार,
' आहे क्षुद्र जरी हा तुमच्या रूपापुढें अलंकार ॥ २६ ॥
' मोडावें मन तीचें करुनि अनादर तथापि याचा हें
' नाहीं योग्य तुम्हाला, कीं पहिलाच प्रसंग हा आहे ' ॥२७॥
वदुनि असें मदलेखा घाली त्याच्या गळ्यांत तो हार,
तिजसह गुण देवीचे वर्णुनि वर्षे कुमारहि फार ॥ २८ ॥

ती गेल्यावर, देवी घेउनि कांहीं सख्या तिथें आली,
सत्कारुनि तीस बसे भूवरि नृप, तीहि बैसली खाली ॥ २९ ॥
तीस म्हणे नृप 'इतका आदर दासास पाहिजे कां या ?
' लवहि नसे मजमध्यें गुण प्रसादास पात्र ह्या व्हाया' ॥३०॥
मोही तिला अशी तो नानाविध मधुर भाषणें करुनी,
नेत्रकटाक्षें तैशी तीहि तयाच्या मानसा घे हरुनी ॥ ३१ ॥
केयूरका तिथें मग चंद्रपीडासमीप ठेवून,
कादंबरी स्वसदना जाय सर्व निज सख्यांस घेऊन ॥ ३२ ॥
हंसीचा थोरपणा, चैत्ररथीचा महानुराग, तसें,
तत्परिजनसौजन्यहि केयूरासह नृपाळ वर्णितसे ॥ ३३ ॥
दुसरे दिवशीं प्रातःकालीं परतून जावया नृपती,
आज्ञा घे देवीची, करुनी हंसीमुखें तिला विनति ॥ ३४ ॥
जातां निघून सविनय बोले देवीस तो नराभरण–
'दासकथा वदतां तरि ह्याचें व्हावें कधीं कधीं स्मरण' ॥ ३५ ॥
कष्टेंच ती तया दे अनुमत, मग जावयास राव निघे,
ये गंधर्वसुतांसह अच्छोदीं तों तिथें स्वसैन्य बघे ॥ ३६ ॥
मंत्रिसुतादिक सेना-पति सत्कारून बैसविति त्याला,
गंधर्वराजधानी-वृत्त तयां तोहि सांगता झाला ॥ ३७ ॥
दुसरे दिवशीं तिकडे घेउनि केयूर विविध भोगां ये,
'ये ये' ह्मणून, जवळीं येतां आलिंगिलें तया रायें ॥ ३८ ॥
निजविरहें अस्वस्था देवी ऐसें तदाननें कळतां,
'आणा आणा सत्वर अश्व ' असें राव जाहला ह्मणता ॥ ३९ ॥
हय आणितांचि भृत्यीं, संगें घेऊन पत्रलेखेला,
गंधर्वराजनगरा चंद्रापीड त्वरा करुनि गेला ॥ ४० ॥
तेथें निजविरहानें हृदय जिचें शून्य जाहलें आहे,
हिमसदनीं निजलेल्या ऐशा कादंबरीस तो पाहे ॥ ४१ ॥

शिरतां सदनीं आधीं हंससुतेला करोनिया प्रणति,
देवीजवळचि होतें आसन जें त्यावरी बसे नृपती ॥ ४२ ॥
मग केयूर वदे 'नृप-हृदयचि जी होउनि दुजें राही,
'तांबूलहि त्या दे जी आर्ये ती होय पत्रलेखा ही' ॥ ४३ ॥
सत्कारून बसाया स्थळ तिजला स्वासनींच दे देवी,
मोहुनि सद्गुणरूपा प्राणाधिक लोभ तीवरी ठेवी ॥ ४४ ॥
हर्षे स्वदर्शनें जी, भावि वियोगार्तिही जिला भय दे,
कादंबरीस ऐशा श्लेषोक्तीनें मनुष्यपाळ वदे ॥ ४५ ॥
'कामरतिं हृदिकृत्वा देवीला तीव्र ताप हा झाला ?'
ऐकुनि हें मदलेखा प्रत्युत्तर योग्य देतसे त्याला ॥ ४६ ॥
होईल काय काय न हिजला कौमार-भाव हा जडतां ?
झाला शंकावर्ती नृप ही श्लेषोक्ति ऐकुनी पडता ॥ ४७ ॥
तत्प्रेमपाशबंधन मग कष्टें दूर सारुनी राव,
बोले तीस 'पहा, हा तवपदसेवेस घे पुन्हां धांव' ॥ ४८ ॥
कादंबरीस सोडुनि मग पाहे राव जावया मार्ग,
तेव्हां केयूरमुखें विनवुनि त्या येवढेंच ती मागे ॥ ४९ ॥
कीं, 'जातसां तरी जा, परि जा ठेवून पत्रलेखेशी,
'कांहीं काळ इथें ती राहुनि येईल आपल्या देशीं' ॥ ५० ॥
'देवीकृपाप्रसादा उपभोगाया इथेंच राहो ती,'
ऐसें वदोनि नृपवर जाय जिथें आपली चमू होती ॥ ५१ ॥
तिकडे पत्र पित्याचें देती आणूनि दूत भूपवरा,
त्याचा आशय हा कीं–'पत्र पहातांच या निघून घरा' ॥ ५२
वाचून पत्र, होउनि देवीविषयीं निराश राजमणि,
मंत्रिसुतावर सोंपुनि दळभार, स्वालयास जाय झणीं ॥ ५३ ॥

## प्रेमसंदेश.

आर्या.

तो आपल्या अतर्कित आगमनें हर्षवी जरी बापा,
कादंबरीवियोगें फार तरी पावला स्वयें तापा ॥ १ ॥
लवकराचि पत्रलेखा आली देवीकडून परतुनियां,
कादंबरीकडिल ती वृत्त निवेदी समग्र नृपतनया ॥ २ ॥
ती बोले 'किंबहुना! धरित्ये तुमच्यावरीच ती प्राणा !
'जा जा ! विलंब करितां जग हें झालेंच आंधळें जाणा' ॥ ३ ॥
नृप ही तिची अवस्था परिसुनि मूर्च्छेस तत्क्षणीं पावे,
कष्टें सावध होतां चित्तीं, चिंती कसें तिथें जावें ? ॥ ४ ॥
क्षिप्रातटीं कदाचित् जातां स्वसखीसमेत पाहे तो,
कीं, केयूर ससेवक धांवतची आपणाकडे येतो ॥ ५ ॥
केयूरक नरनाथा बघुनि, दुरूनिच तया प्रणाम करी,
क्षेमालिंगन चंद्रा-पीडहि दे उठवुनी तया स्वकरीं ॥ ६ ॥
'देवी सुखी असे कीं?' ऐसें आधीं विचारुनी राय,
त्यास वदे 'सांग मला, आज्ञा केली असे तिनें काय?' ॥ ७ ॥
तो बोले 'कुशल तिचें तेंच तुह्मी आज जें मला पुसलें,
'ती कांहीं न ह्मणाली इकडेही मज तिनें न पाठविलें ॥ ८ ॥
'गेला कुमार ऐशी आयकिल्यापासुनी कथा, सुदती,
'शयनीं पडोनि सोडित दीर्घोच्छ्वासा अखंड तळमळती ॥ ९ ॥
'स्वसखी मदलेखेसह आह्मां निकटस्थितांसहहि कांहीं,
'तेव्हांपासुनि अगदीं राजसुता! बोललीच ती नाहीं ॥ १० ॥
'आहेत हीं कशाला मजपाशीं राहिलीं उभीं सारीं ?'
'इतकेंच मात्र वाक्य स्वमुखें ती एकवार उच्चारी ॥ ११ ॥

'जाणुनि तिचें मनोगत आलों पायांसमीप धांवत या,
'जाऊन वांचवा तरि निजविरहार्त्तेस त्या झणीं सदया!'॥ १२ ॥
केयूरकवचनें ह्या मोह द्विगुणित नृपांतरा जडला;
सावध होउनि, जावें कैसें चिंतेंत ह्या पुन्हां पडला ॥ १३ ॥
राव विचारी चित्तीं, ताताज्ञेवीण ये कसें जातां ?
काय निमित्त कथूं त्या ? कीं सांगूं ती असे वियोगार्त्ता ?॥१४॥
कोणा पुढें करूं मी ? सहाय मज कोण होय ह्या कामीं ?
वैशंपायन मत्सख असता तरि योजितों तयाला मीं ॥ १५ ॥
असता अशा विचारीं, आजचि ये दशपुरा स्वदलभार,
ऐशी वार्ता ऐकुनि चित्तीं संतोष पावला फार ॥ १६ ॥
केयूरकास हर्षें नृप बोले 'द्वार जावयास मज,
'झालें मत्सख येतां; देवीहि प्राप्त जाहली समज ॥ १७ ॥
'केयूरका ! पुढें तूं जा ह्या घेऊन पत्रलेखेतें;
'मागोमाग तुझ्या मी आलों ऐसेंच जाण तूं तेथें ॥ १८ ॥
'जी मज करावयाची आहे विज्ञापना तिला कांहीं,
'देवीस सर्वही ती स्वमुखें कळवील पत्रलेखा हीं' ॥ १९ ॥
स्वसखीसहि नृप बोले 'आधीं जातांच तूं तिला कळवी,
'कीं जोडुनि करयुग हा तुजला लववूनि मस्तका विनवी ॥२०॥
'जेणें माझें येणें विफल न व्हावें, तसेंच अंधत्वा
'हें जगहि न पावावें, ऐसें मात्र स्वयें करावें त्वां' ॥ २१ ॥

# गोविंद वासुदेव कानिटकर.

हे लोकप्रसिद्ध कवि आणि ग्रंथकार इ. स. १८५४ ह्या वर्षी जान्युआरी महिन्याच्या ९ तारखेस (पौष शु. ११ सोमवार शके १७७५) पुणें येथें जन्मले. हे जातीचे कोंकणस्थ आश्वलायन ब्राह्मण. ह्यांचें धूळाक्षरापासून एल्.एल्. बी. पर्यंतचें शिक्षण अनुक्रमें पुणें व मुंबई येथें झालें. सृष्टिसौंदर्याच्या ठायीं आणि काव्यगीतादिकांच्या ठायीं रसिक कवींचें चित्त बहुधा बाळपणापासूनच लोलुप असतें, तसें ह्यांचेंही, होतें. ह्यांनीं १ अकबर काव्य, २ नारायणराव पेशवे यांचा मृत्यु, ३ कृष्णकुमारी काव्य आणि ४ संमोहलहरी. अशीं चार मोठीं काव्यें केलीं आहेत. शिवाय, यांनीं विविध विषयांव लहानमोठीं अनेक स्फुट पद्यें रचिलीं असून तीं विविधज्ञानविस्तार, काव्यरत्नावलि, करमणूक, मासिकमनोरंजन वगैरे मासिक पुस्तकांतून व पत्रांतून प्रसिद्ध झालीं आहेत. ह्यांची कविता साधी आणि सरळ असून तींत रसाकडे विशेष लक्ष दिलेलें दिसतें. संमोहलहरी हें काव्य चिंतनपर असून त्यांतील भाषा प्रौढ व विचारसरणी नवीन आहे. सबब, तें ह्या ग्रंथांत पूर्ण घेतलें आहे.

---

## प्रभात आणि प्रमदा.

मंदाक्रांता.

प्रातःकाळीं उपवनिं दिसे रम्य शोभा तरूंची,
चारी तेव्हां उमलुनि दिशा कांति भासे रवीची;
पानें सारीं चमकति किती रात्रिच्या त्या दंवानें,
मोत्यें नेणों पसरुनि दिलीं सृष्टिच्या नायकानें! ॥ १ ॥

शिखरिणी.

जलाच्या बिंदूंची रचिली जणूं माला बहुमुदें,
जगाच्या कर्त्याची कृति अखिल जीवास सुख दे !
चिरानंदाच्या त्या बघुनि हिरवे पादप कृपें,
जणों आनंदानें धरणिवर ते गाळिति टिपे ।। २ ।। !

सकाळीं कारंजीं उडत असतां शीतळ हवा,
तशीं पुष्पें होती विकसित, सुगंधें डुलति वा ;
तयांची ज्या काळीं विलसति पहा हास्यवदनें,
जनांच्या चित्ताला रमविती अनेकाख्य सुमनें ।। ३ ।।

फुलें वेंचायाला जमति मिळुनी कांहिं अबला,
तयांचीं वारा तो उडवि लुगडीं दाउनि कला ;
जणों झोंबे अंगा तरिहि न निवारी जन तया,
झटे कीं देखाया अवयवच ते ! सोडुनि भया ।। ४ ।।

इंद्रवज्रा

माळी तुझाला करण्यास वेंचीं, पुष्पें भुईच्या वरलींच साचीं ;
किंवा करानें फलगुच्छ तोडी, ज्याची दुजा वस्तुस ये न तोडी ।। ५ ।।

प्रहर्षिणी

‘ झाडांनीं मधुरफळें बळें धरावीं, भारानें नमुनि उपासना करावी ;’
ऐसे ते विहग तदा तरूंवरोनी, गुंजातें करिति सकाळ कीं स्मरोनी.
आंब्याचे तरुगण फुल्ल फार झाले, मोहोरा रसमय पाहि, पक्षि डोले;
त्यांमध्यें स्वर मग गोड कोकिळांचा, होई तो श्रवण करोनि हर्ष साचा.

वसंततिलका.

एके दिनीं उपवनीं रमणीयकाळीं, तो राय पंडित निघे कुतुकें सकाळीं;
तेथें समोर सहसा मग पाहि कन्या, जी रूपमूर्ति विधिनें घडलीच धन्या.

द्रुतविलंबित.

मन तदीय हरोनि कुमारि ती, सुतनु मोहित त्यास करी किती!
जणुं दुजी रति वाटलि पंडिता, जयिं तया निज दर्शवि चारुता ।। ९ ।।

कुसुमकोमल देह जिचा असे, कर जिचा कुसुमें निवडीतसे;
पदर सांवरुनी वरचेवरी, सुतनु लज्जित होइ परोपरी ॥ १० ॥
धरुनि पुष्प करीं पद टाकिते, निजविलास मनोहर दाविते;
रुचिरता वदनावरि भासली, चतुरताहि तिच्यामधिं दीसली ॥ ११ ॥

इंद्रवज्रा.

जाग्यावरी राहि उभाच राया, त्याला नुरे मान पुढें चलाया;
पाहोनि तीतें मन होइ दंग, झाली तदीया मति फार गुंग ॥ १२ ॥

शिखरिणी.

कटाक्षानें त्यातें जणुं सुललना घाव करितां,
तयाच्या चित्ताला मृदु करुनि दावी चतुरता;
स्वसामर्थ्यानें कीं हरण करि त्याचें मन तदा,
तयाला त्या स्थानीं खिळुनि जणुं टाकी दृढ सदा ॥ १३ ॥

पृथ्वी.

“ असेल वनदेवता उपवनास राखावया !
“ कदाचित सुरांगना भुवन येइ देखावया !
“ उगीच अथवा मला मनिंच भास हा होतसे ?
“ न कांहिं अनुमान तें समयिं या मला हो तसें ॥ १४ ॥
“ दिसे वयहि कोंवळें अजुनि लग्न झालें नसे,
“ हिच्या वसन नेसण्यावरुनि वाटतें हें असें;
“ असंशय हिला करी मदनबाण फार व्यथा,
“ मनोहर तरी कसें वदन खिन्न जें सर्वथा ॥ १५ ॥

आर्या

“ यवनाची कन्या ही, वस्त्रांवरुनी दिसेच निश्चय हा,
“ विनय हिच्या तनुला तरि, शोभा देई किती विचित्र अहा ॥ १६ ॥

भुजंगप्रयात.

असें आपणाशीं वदे, जाय तों ती, नसें चैन तेव्हां गमे फार खंती;
कुठें चित्त त्याचें रमेना मुळींही, परी कामबाणांस दुःखार्त्त साही ॥ १७ ॥

## संमोहलहरी.

पृथ्वी.

भयंकर तमोमयीं अटविमाजिं जैं सांपडे-
चुकोनि पथ वत्स तें भ्रमत धेनुचें बापुडें ;
तशीच गति दुर्धर घडलि दीन या लेंकरा,
खरा पथ मला त्वरा करुनि दाखवीं ईश्वरा ॥ १ ॥
अवृष्टि, अतिदुष्ट हा भयद रोग लोका छळी !
अनिष्ट अतिनष्ट ही ग्रहयुति प्रभो ! हो बळी !
न मार्ग दिसतो पुढें भरंवसा क्षणाचा नसे,
कळे तुज न काय हें जन हताश झाले कसे ? ॥ २ ॥
समस्त जन दीन हे रडति बा जगन्नायका !
न कर्णि तव आमुची करुण वाणि ही जाय का ?
द्रवे जरि न दुःखित स्थिति कळून माताहि ती,
शिशु स्वजननीविणें रडत जाय कोणाप्रती ? ॥ ३ ॥
त्वदन्य वद रक्षिता कवण या महाराष्ट्रजां ?
समर्थ जरि तूं तसा सदय, मारिसी कां प्रजा ?
किती दिवस ठेविसी बुडवुनी विपत्सागरीं ?
नितान्त शिणलों प्रभो ! विकट संकटें हीं हरीं ॥ ४ ॥
सुदुस्तर विपन्नदी भयद वाटते ही कशी-
न शोकरव ऐकवे, विधुर-दीन-वाणी मशीं.
प्रकीर्तित असे तुझें प्रणत-संकटीं धावन ;
न पेटवुन देशि कां सकल जीव-बाधा-वन ? ॥ ५ ॥
जरी सदय तूं तरी भुवनिं यातना कां दिसे ?
कृपाघन समर्थ तूं स्थळचि देसि दुःखा कसें ?

छळी कुजन सज्जना बघुनि खेद वाटे मला,
किमर्थ करिसी असें भुवन सांग, ठावें तुला ! ॥ ६ ॥
समर्थ जरि तूं, न कां सकल यातना टाळिसी ?
सुखातचि सदैव कां तव न जीव हे ठेविसी ?
स्वयेंचि जग निर्मुनी करिसि तूंच संहारही—
कळे न करणी तुझी भयद सच्चिदानंद ! ही ॥ ७ ॥
स्वयेंचि रचना प्रभु प्रथम जो जगाची करी,
करी तद्रचना तरी लवकरी मुदें संहरी !
स्वयें सुफळ वृक्ष जो विविध लावुनी सिंचुनी—
न मत्त हि करी असें—उपडुनी प्रहर्षे मनीं ॥ ८ ॥
तरंग उठती मनीं भयद-कीं भुतें नाचती—
सदा प्रभुवरा ! मला भिवविती बहू जाचिती !
शवास पशुच्या जसे क्षुधित गृध्र वा कावळे,
सजीव असतां तसे मजसि टोंचिती हे बळें ॥ ९ ॥
कुसंशय, कुकल्पना छळिति नित्य दीनास या !
किति करिति हाल हे तुज न येतसे कां दया ?
तयांस दृढसंयमें पळविती विवेकें कधीं,
न भावबळ तें मला, ह्मणुनि हें तुला ऐकवीं ॥ १० ॥
न अन्त न च आदि ज्या, भवसमुद्र हा भासतो,
अनंत भरलें तिथें शिशु पदार्थ मी काय तो ?
अगण्य भुवनें नभीं फिरति चण्डचक्रांपरी !
असे विकटयंत्रिं या मनुज काय मात्रा तरी ? ॥ ११
विचार घुसतां असा मनिं, गृहांत कीं लांडगा—
धरोनि मज कोंकरा करित हाल हा दांडगा !
कुतर्क-निधिमग्न मी, परम संकटीं या तरी,
तुझ्याविण दुजा मला कवण सद्गुरो ! उद्धरी ? ॥ १२

उदास अति सृष्टि ही दिसत जीर्ण कान्तार कीं-
भयप्रद दिसे किती प्रचुरपातकी घातकी !
कृतान्तभगिनी गमे, लव न जीस माया दया-
प्रचण्ड, रुधिर-प्रिया, सतत देत कीं जांभया ! ॥ १३ ॥
प्रचण्ड अवघा तुझा भिंववि खेळ या अर्भका,
नभांगणिं अनन्त हे भ्रमत राहती गोल कां ?
विशाल तव विश्व हें उपजवी मनीं विस्मय-
करी हृदय संभ्रमाकुल मदीय निःसंशय ॥ १४ ॥
निरभ्र-नभ-पंथि या नयनीं रात्रि रत्नें किती,
मनोज्ञ दिसती ! करी कुशल कोण त्यांची मिती ?
उदात्त रस दाटला घुमट दिव्य हा पाहतां-
भयें तदपि हें भरे हृदय, नष्ट हो शांतता ॥ १५ ॥
अनादिभवसागरीं बुडुनि जीव राही, भ्रमें,
पराक्रम न मानवी मुळिंच कांहीं चाले गमे;
निराश अति होतसें बुडुनि या प्रपंचभ्रमीं-
गमे मज न रक्षिता-पतित पातकी दीन मी ? ॥ १६ ॥
कळो भुवन गूढ हें ह्मणुनि पाहिलीं दर्शनें,
तशीं विविध पुस्तकें बहुत वाचिलीं भक्तिनें;
परंतु हृदमास या लव न शांतता लाभली-
पदीं रुदन मी करीं तव रचून पद्यावली ॥ १७ ॥
रचीं 'लहरि' मूढ मी बुडुनि संशयाच्या तमीं,-
हताश करुणस्वरें रडतसें अरण्यांत मी !
मनस्तिमिर नाशुनी हृदयिं माझिया प्रेरणा
करीं, ह्मणुनि बा तुला विनवितों जगत्कारणा ? ॥ १८ ॥
टपे बक नदीतटीं टिपुनि मत्स्य भक्षावया,
तृणांत अथवा जसा भुजग दुष्ट दंशावया;

गिळी सकळ विश्व जो, लव न ज्या दया तृप्ति वा,
गिळी अधम काळ तो–नवल काय, या मानवा ? ॥ १९ ॥
विचित्र अति संसृति क्षण न लागतां नष्ट हो !
गमे मृगजलापरी मनुजजीवन स्वप्न हो !
तमोमय विशाल ती दिसत अंतकाची दरी–
तिच्यांत पडला न ये परतुनी पुन्हां तो वरी ! ॥ २० ॥
पतंग रमणीय हा भुलुनि जाय दीपा पहा–
जयास न कळेच कीं मरण यांत माझें अहा !
विरुणगणिकाजना मदनमूढ कीं, ज्योतिला
तसा कवळि; तों मिळे अचुक भक्ष्य दीपानला ॥ २१ ॥
जळांत गळ घालुनी धरित मत्स्य हा धीवर !
वधी अदय पारधी कितिक पक्षि ते सुंदर !
वनीं वधुनी धेनु ही मिळवि वाघ तो जीवना–
असा क्रम दिसे तुझ्या भुवनिं या जगज्जीवना ॥ २२ ॥
अनाथ हरणें ससे नरपशू वधी प्रत्यहीं !
अजादि पडती बळी सुरिस खाटिकाच्या गृहीं !
'मदर्थ सदयेश्वरें सकल जीव हे निर्मिले'–
विलज्ज नर सांगती कितिक शास्त्र ऐसें भलें ॥ २३ ॥
गृहांमधुनि मांजरें सतत मारिती मूषकां !
पटापटचि पाल ती टिपुनि भक्षिते कीटकां !
कसा कुशल कोळि हा धरित माशि जाळ्यांत ती !
जिवंत झुरळास या करिति भक्ष्य मुंग्या किती ॥ २४ ॥
असा कलह चालला अहह जीवनाकारणें !
अशीं भुवनिं माजलीं दिसति नित्य हीं कां रणें ?
प्रभो ! उदरपूर्तिच्याविण न हेतु कांहीं दिसे,
न कीं इतर साधनें तुजसि साध्य तो होतसे ? ॥ २५ ॥

जयावरिल वाळलें तृण अशा गिरीच्यावरी,
वनांत वणवा कसा भडकतो कृतान्तापरी !
मनोज्ञ निशि खेळणें दुरुनि अग्निचें तें दिसे—
गमे प्रलय कीटकां जळति जे असंख्यातसे ! ॥ २६ ॥
अवर्षण पडे कधीं, लहरि सृष्टिला ये पिसें !
क्षुधार्त्त जन होऊनी मरति हाय ! संख्या नसे !—
भयंकर पिशाचसे हिंडिस निर्मुनी रोग ते—
कशी अदय सृष्टि ही अमित जीव संहारिते ! ॥ २७ ॥
प्रचण्ड कधिं अग्नि तो भडकुनी गृहें भक्षितो,
सहाय मिळतो तशामधिंच सत्वरें वायु तो !
स्त्रिया, पुरुष, त्यांत तीं अहह ! बालकें गोजिरीं—
पहा, जनविघातकी अनल भस्म त्यांचें करी ! ॥ २८ ॥
विवेक न दिसे तिला-सुजन वा असो दुर्जन,
असो विबुध, अज्ञ कीं, सधन वा असो निर्धन ;
कडाडत नभांतुनि क्षितितळीं पडे वीज ती—
जयावरि पडे तया तुडवि, लोळवी, न क्षिती ! ॥ २९ ॥
विनाश जगतीवरी बहुत का घडे येवढा ?
प्रभो ! सदय जेवढा अदय भाससी तेवढा !
विपत्ति जणुं राक्षसी करित राज्य कां आढळे ॥
'दयाघन' असें तुला ह्मणति कीव तें नाकळे ॥ ३० ॥
मनुष्य भवकाननीं सुखमृगार्थ धांवे जरी,
पळे कपटि दूर तो कधिं न सांपडे तस्करीं !
कशी सतत नाचवी जन जगीं सुखाशा किती ?—
तृषार्त्त हरणें जशीं मृगजळाकडे धांवती ॥ ३१ ॥
दिसे उचित संसृति त्यजुनि पाहणें कानन,
विरक्ति उपजे, परी त्यजि न हें सुखाशा मन !

न भक्तिबळ वा असे प्रचुर शक्ति देहांत या,
न निश्चय न धैर्यही निघुनि काननीं जावया ॥ ३२ ॥
अनाथ, दुबळे, मुके, बधिर, अंध पंगू जन,
जगांत अवलोकुनी द्रवुनि फार जाई मन !
किमर्थ न कळे तुवां भुवनिं दुःख हें निर्मिलें–
तयांस रडवीनसें तुजसि कां प्रभो ! वाटलें ? ॥ ३३ ॥
अगण्य नर जन्मती अतिदरिद्रि लोकांत या–
न पोटभर अन्नही करुनि कष्ट लाभे जयां !
धनाढ्य बहुधा किती असति आळशी दुर्मती–
दुराचरणकर्दमीं कृमिसमान जे लोळती ॥ ३४ ॥
अनाथ निजबांधवां न बघतां मनीं ये दया,
न वा व्यथितरक्षणीं करिति ते स्वसंपद्व्यया ;
न एक दुसऱ्यास कां स्वहितबंधुसा ओळखे–
जगज्जननि ! तूं जरी तनुज लेखिली सारखे ? ॥ ३५ ॥
किती स्वहितसाधनास्तव परस्परें भांडती,
विकारवश होउनी करिति पातकें घोर तीं !
धनी, धनविहीन हे जन असे कसे वागती ?–
जशीं कुतरिं मांजरें बघुनि एकमेकांप्रती ! ॥ ३६ ॥
परस्वहरणें किती स्वमनिं दुष्ट आनंदती,
असंख्य निजबांधवां व्यसनसागरीं लोटिती !
स्वभूमि बुडवी परी स्वगृह मंदधी जो भरी–
असे अधम जन्मती अहह ! भूवरीं कां तरी ॥ ३७ ॥
असे विहित कर्म तें विमल सत्य वा कोणतें,
कळे न अथवा मला विशदनीतिचें तत्त्व तें ?
मुखें मधुर बोलती, मलिन वर्तनें वर्तती,
स्वबांधव लुबाडुनी धनमदें सदा डोलती ! ॥ ३८ ॥

न सृष्टिंत बळाविणें नय दिसे मला अन्य तो–
मिळे न जय सज्जना खलजनास तो लाभतो !
खरा सुपथ कोणता मज कळे न हें निश्चयें–
कुमार्गरत त्याचिया सुखधनादि वांट्यास ये ॥ ३९ ॥
अहर्निश कितीक हे जन यमालया चालती,
क्षणांत किति जन्मती ! मरति त्या क्षणीं ते किती !
सहास्य इतुक्यांत जो प्रिय सुहृत् करी भाषणा,
गतासु पडुनी अहा ! क्षितिवरीं मिटी लोचना ! ॥ ४० ॥
पडे जननि त्यावरी कवळि तच्छवा प्रीतिनें,
रडे बडवुनी उरा भिजवि भूमि ती अश्रुनें ;
वदे न च तथापि तो जननिशीं न भार्येशिंहीं,
समस्तमनुजांवरी अहह ! वेळ ये खास ही ! ॥ ४१ ॥
जमूनि मग सोयरे उचलिती कृतांतापरी !
तया पळविती असा फिरुनि कीं न ये तो घरीं ;
मला ह्मणति, ' मित्र बा परजगीं तुझा पातला,
' न दुःख करिं, जन्मले सकल जाति त्याचि स्थला ' ॥४२॥
' न पंडित गतासुचा करिति शोक' ऐशी नरा,
हंसून वदसी गिरा मज गमे प्रभो ! निष्ठुरा !
अजाण जन सर्व हे ह्मणुनि दुःख कीं मानिती ?
खरेच अविवेकि कीं स्वजन मृत्युला शोचिती ॥ ४३ ॥
दिलें हृदय कां नरा निरुपयुक्त ऐसें कसें ?
विकारयुत हें दिलें मन कशास त्यातें असें ?
स्वभक्त रणसंकटीं प्रथम तूंचना पाडिसी ?
दया-विवश पार्थ तो बघुनि त्यास कां निंदिसी ॥ ४४ ॥
स्वकर्म तव हें असे करिं अवश्य पार्था ! रणें,
खरे न, लटकेचि बा मरण तेंवि तें मारणें ;

'असे निपट अज्ञता स्वजनघातकर्मा भिणें,
'दयार्द्र तव होतसे हृदय हें विवेकाविणें ! ॥ ४५ ॥
'न पुण्य बघतां खरें समज तेंवि तू पापही,
'खरीं नसति अर्जुना ! लटकिं खास तीं दोनिही ;
'न जागृति, खरेंचि तों तुजसि सर्व हें भास तें,
'परंतु मग निश्चयें तुज कळेल कीं स्वप्न तें'. ॥ ४६ ॥
असा त्वदुपदेश हा न च कळे अह्मां मानवा,
न शांति हृदयास दे, नच मना समाधान वा ;
अस बहुत अज्ञ मी शिशुपरी, गमे विस्मय-
गभीर अति तो कळे मज न गूढ गीताशय ! ॥ ४७ ॥
'न होय कवणाहि तें तुमचियाचि लीलालसें'
मयूरकविनें तुझें चरित गाइलें बा असें ;
भयप्रद गमे प्रभो ! तंव न खेळणें हें बरें-
मदीय हृदया करी अति सकंप जें वावरें ॥ ४८ ॥
'जगद्विरचना गमे प्रभुसि खेळणें केवळ,
प्रयोजन न हेतु वा प्रकटवी स्वलीलाबळ !'
जया ह्मणति बादरायण रची असें सूत्र तें,
भयंकराचि खेळणें मज परी तुझें वाटतें ॥ ४९ ॥
जसे दगड मारुनी शिशु तळ्यांत लीला करी,
गमे व्यथितदर्दुरां जवळ काळ आल्यापरी !
स्वयें फळ नसे, परा करिसि सृष्टि दुःखावहा-
उगाच बससी न कां ? करिसि कां खटाटोप हा ॥ ५० ॥
विचित्र अति बुद्धि ही प्रखर ठेविली मानवीं,
प्रभाव कळला जिचा सकल ज्या न ऐसा कवी ;
उदात्त मन, कल्पना, रुचिर आकृती हीं दिलीं,
परंतु असती तुला मनुज मातिचीं बाहुलीं ॥ ५१ ॥

मुलें करिति बाहुलीं बहुत मृत्तिकेचीं घरीं,
तया गमति जोंवरी रमति त्यासवें तोंवरी ;
क्षणांत परि मोडुनी चहुंकडे कशीं फेंकिती-
न दुःखचि शिवे तयां, मनिं न कल्प वाटे क्षिती !॥ ५२ ॥
फुटे घट, करी पुन्हां धरुनी चक्र कुंभार तो,
तदीय सुख दुःख वा न मनिं अल्पही जाणतो ;
असंख्य तनु तूं तशा विविध निर्मुनी भंगिशी-
स्वयें करुनि टाकिशी अहह ! मृत्तिका कां अशी ? ॥ ५३ ॥
तरंगसम जीव हे भवसमुद्रिंचे भासती-
क्षणांत दिसती न जों दिसति, नाश तों पावती ;
न दुःख सुख जन्म वा मरण जया ठाउकीं,
न विश्वहृदया तया करिति अल्पही स्पर्श कीं ॥ ५४ ॥
अनंत विविधाकृतिप्रचुर विश्व तें-ही मही-
कशी घडविली प्रभो नसुनि कांहिं आधारही ?
नसे विदित सृष्टिचें सकल गूढ कोणा नरा,
सुरेन्द्रवरुणादिकां न इतिहास ठावा खरा ! ॥ ५५ ॥
तुझी ऋषिसुरां नसे प्रभवपीठिका ज्ञात ती,
श्रुतिस्मृतिहि आपुली प्रकट अज्ञता सांगती ;
अनंत भुवनें स्वयें नटुनि विश्व, जो थाटला-
विराट ह्मणती, असा प्रभु कसा कळावा मला ? ॥ ५६ ॥
यथार्थ तुज नाम दे श्रुतिहि 'विश्वकर्मा' असें-
सुतार रचितो जगीं चतुर राजवाडे जसे;
विशाल वनिं कोणत्या कवण वृक्ष वा छेदिसी ?
कुठें बसुनि तूं ! प्रभो भुवनमंदिरें बांधिसी ? ॥ ५७ ॥
तमोमय अशा स्थलीं लपुनि गुप्त कां राहशी ?
गमे नवल सांग ही सृजिलि सर्व सृष्टी कशी ?

जडात उपजे कसें कुतुककारि चैतन्य तें ?
अखंड भरला, दिसे तदपि कां न या दृष्टितें ?॥५८॥
सदैव फिरवीतसे गरगरां स्वयंत्रीं जयां–
वसे हृदयिं इश तो प्रभु समस्त भूतांचिया,
स्वयें करिसि काय तूं सकल सृष्टिचें नाटक ?
किती ह्मणती कीं, करी अखिल खेळ मायाठक ॥ ५९ ॥
जरी प्रथम एक तूं, मग अनेक होशी कसा ?
त्वदीय मनिं काम तो उपजला कळेना तसा;
वदे श्रुति खरें जरी, तुजसि आप्तकामा ! कशी
मनीं उपजली तरी ' करिन सृष्टि ' इच्छा अशी ॥ ६० ॥
असा सतत घालि जो विमल सृष्टिच्या गोंधळा,
अगा भयद गोंधळ्या ! नुमजति तुझ्या त्या कळा,
प्रयोजन–विहीन कीं विविध खेळ हे चालती ?
असे सकळ भास वा ह्मणुनि गोंधळे मन्मती ॥ ६१ ॥
सहस्र अभिधा तया विबुध देति जो ना कळे,
प्रचण्ड विणिती भलीं निबिड शब्दजालें बळें;
निरर्थक विशेषणें परिसतां करीं मी स्मय–
विषाद अति मानसीं उपजतो, गमे विस्मय ॥ ६२ ॥
' जगद्विरचना असे दुरवगम्य ही सर्वथा–
सुरांसहि न ठाउकी–करिशि शीण तूं कां वृथा ?'
प्रजापति अशी गिरा मधुर वेदकाळीं वदे,
दिला मजसि त्यांतला रस न अल्प कां शारदे ॥ ६३ ॥
लहानपणची स्मरे मज मयूरकेकावली.
तदा न कळली बरी प्रियतरा किती वाटली !
स्तुतिप्रिय नराकृति प्रबल आग्रही देव तो–
उभा कवि जयापुढें करिती आर्जवें शोभतो ॥ ६४ ॥

पुराणपुरुषा ! तुला मनुज मानवा रूप दे,
‘ असे मन, विकारही असति निर्गुणाला ’ वदे.
कळे जरिहि आपणां सदृश देव मर्त्यां कळे,
समस्त निगमांतुनी सहजवृत्तिही आढळे ॥ ६५ ॥
कधीं तरुण होउनी विषयभोग बा भोगिले
विचित्र तनु घेऊनि खळ अनेक संहारिले;
श्रियाळशिबिजानकीरमणसे हरिश्चंद्रसे,
प्रशस्तपणिं ते नृपोत्तमहि गांजिले त्वां कसे ? ॥ ६६ ॥
कसा सगुणमानवां प्रभु अमूर्त ऐसा कळे ?
ह्मणून मज वाटतें कधिं न मूर्तिपूजा टळे.
विचार करितां दिसे, सगुण ईश केल्याविना
न हो सगुणमानवां, गुण न ज्यास तत्कल्पना ॥ ६७ ॥
ह्मणो जरि जनां ‘ असे विहित मुर्तिपूजा करा,
कितीक ह्मणती भले ‘ पथ न भक्तिचा हा खरा ’
विराट ह्मणती जया, कधिं न दृश्य नेत्रांस या,
प्रतिष्ठित करा कसा कळतसे न काष्ठीं तया ॥ ६८ ॥
किती सुभग मूर्तिही घडविली तुझी नावडे,
न तृप्ति हृदया मिळे, मन वळे न देवाकडे;
समस्त भुवनांतल्या करिशि वस्तु जो सुंदर,
तया तुज सुरूपता कितिक दे बिचारा नर ॥ ६९ ॥
तुवां विविध भूतलीं मधुर गंध हे निर्मिले,
गुलाब, जुइ, मोतिया बहुत रम्य केलीं फुलें;
अशा तुजंसि धूप वा अगरबत्ति ती कायशी ?–
विचार करितां मनीं सहज येइ शंका अशी ॥ ७० ॥
तसे विविध निर्मिले भुवनिं वृक्ष तूं आगळे,
तुवांच कुसुमें दिलीं मधुर त्यांस तैशीं फळें ;

तुझीं तुजसि तीं फुलें प्रभु समर्पिणें योग्य कीं ?
विनोद उपहास वा अनय हो जगन्नायकीं ॥ ७१ ॥
सहस्ररविकांति तूं, सकल तेज वा आपुलें,
हिमांशुभगणादिकां प्रखरभानुलाही दिलें;
अशा तुजसि घेउनी स्वकरिं दीप ओंवाळिती–
असंशय गमे मला त्वदुपहास, पूजा न ती ॥ ७२ ॥
तुला धुवुनि शुद्ध गा करिति त्या क्षणीं ये हसें !
सदैव अति शुद्ध जो, तुजजि त्या धुवावें कसें ?
न जो मलिन त्यावरि मल बळेंच आरोपिला,
करील अपमान तो सहन कोण लोकीं भला ॥ ७३ ॥
तुवांच जरि निर्मिली सकल गीत शास्त्रावली,
तुवां मधुर मानवां द्विजगणांहि वाणी दिली;
कसें तुजपुढें तरी करुनि नृत्य वा गायन,
प्रसन्न न कळेंच म्यां तव विभो ! करावें मन ॥ ७४ ॥
मनुष्य भवसागरीं कणहि वालुकेचा नसे–
जगत्पत्ति अनंत तो नयनिं या न कोणा दिसे;
अचिन्त्य अविकार्य जो, नच नरास तत्कल्पना–
न हें पदरचें प्रभो ! वदसि तूंच त्या अर्जुना ॥ ७५ ॥
विराट पुरुषा ! तुला खरिंच जन्म दे देवकी ?
मनोमयाचि कल्पनाग्रथितजाल तूं देव कीं ?
विवेक न जिला खपे लवहि, भक्ति निर्भी तुला !
भवांधमनुजां अह्मां पथ खरा न कां दाविला ॥ ७६ ॥
तरंग उदकीं तसा मनुज हा पतंगापरी–
उड्या बहुत मारितां पडत मृत्युदीपावरी !
तर्यीं भ्रमनिरास कीं ? क्षण न लागतां संशय
समस्त मन पावती हृपयशल्यरूप क्षय ॥ ७७ ॥

दिलीं असति मानवा नयनमुख्य पंचेंद्रियें,
प्रकाश रविचा शिरे गृहिं, तसें मनीं ज्ञान ये;
असे दिधलि बुद्धि ही विषय बाह्य जाणावया,–
अगम्य असशी प्रभो ! सकल आमुच्या इंद्रियां ॥ ७८ ॥
ह्मणे श्रुति असें, न मी, प्रखर शंकराचार्यही–
करी यद्वतार तो खचित धन्य सारी मही;
प्रतिष्ठित करी बळें यदपि निर्गुण ब्रह्म तें,
न बुद्धि मम तृप्त हो, न मन शांति वा पावतें ॥ ७९ ॥
'स्वयंभु, न च आदि त्या, विमल सच्चिदानंद तो,
'न कारण न अन्तही'–स्वमत शंकर स्थापितो;
स्वयंभु जग हें, असें जरि ह्मणों, तरी ये मनीं–
'न कार्य भुवनीं असे दिसत कारणावांचुनी' ॥ ८० ॥
ह्मणों जरि असे तरी प्रभुस अन्य कर्त्ता दिसे–
तयास तिसरा–असा क्रम पुढें पुढें जातसे !
अनादि अविनाश हें सकल विश्व माना न कां ?
न गूढ उकलेल हें कधिंहि, वाद वाटे फुका ॥ ८१ ॥
स्वयंभु जड विश्व कीं गरगरां फिरे जें सदा,
प्रचण्ड न खळे गति क्षण अखंड ज्याची कदा;
'न नाश परमाणुला अणुगताचि चिच्छक्ति ती'–
कणादसम तत्त्ववित् स्वमत यापरी सांगती ॥ ८२ ॥
अनंत जड आगळें विकृति भिन्न होती जरी,
विचित्र रचना घडे लय न मूलतत्त्वां तरी !
अनादि परमेश तूं ? जड अनादि वाटे तसें–
न एक परि दोन कीं पति जगास मानूं असे ॥ ८३ ॥
चिदात्मक, जडात्मक, प्रबल दोन चक्रें अशीं
विराटशकटास या दिसति जोडलेलीं मशीं !

तयांत बससी विभो ! छपुनि काय तूं नाटकी ?
सदा भ्रमविसी तुझा शकट विश्वलीलेंत कीं ॥ ८४ ॥
जगत्सकल देह कीं तव असे जगज्जीवना ?
तुझ्याविण जडांत ये कुठुनि जीव वा चेतना ?
जडाविण तुझी कशी अमितशक्ति हो व्यक्त ती ?
असे हय, परी नसे रथ, तशी न हो कीं गती ॥ ८५ ॥
'असे प्रकृति अंध ही, पुरुष पंगु सज्ञान तो.
'मिळोनि जग चाललें' कपिल तत्त्व हें सांगतो.
अवश्य नच ईश या सकल वस्तुजाता, असें,
वदे प्रकट तो, परी विबुध वंद्य आर्यां असे ॥ ८६ ॥
घडे घडतसे, पुढें घडुनि येइ जें, तें तुला,
समस्त कळतें, असें कितिक सांगती बा मला;
समर्थ, सकलज्ञ, तूं असिसि सर्वही जाणता–
विरोध जणुं डोंगळे कितिक झोंबती या मता ॥ ८७ ॥
कसें करुंच देशि तूं प्रथम पाप जीवांस या,
कळे न मज दंडिशी मग सकोप बा का तयां ?
अशक्त तव लेंकरें तुजसि ठाउकीं हीं जरी–
कठोर जनकापरी छळिसी कां तयांतें तरी ॥ ८८ ॥
विशिष्ट नर या क्षणीं नियतपातका आचरी,
कळे प्रथम तें तुला जरि, कसे टळे तें तरी ?
स्वतंत्र मग राहिली वद तदीय इच्छा कशी ?.
मनांत मम ये प्रभो ! सहज योग्य शंका अशी ॥ ८९ ॥
वसे हृदयिं, जो शुभाशुभ करी मनीं प्रेरणा,
गमे नवल, दुष्कृता घडवि हातुनी आपणा !
कुकर्मचि करावया प्रथम लावि, दे दुर्गती–
न कीं परमनिर्घृण प्रभु ? कळे न वा तत्कृति ॥ ९० ॥

करी न इहलोकिंचा प्रभुहि चण्ड अन्याय हा-
प्रजेस कळवी सदा प्रथम सत्र आज्ञा पहा !
करील अपराध जो करुनि शासनोल्लंघना
न भूमिपति कीं प्रभो ! करि तयाचिया दंडना ॥९१ ॥
समस्त कळतें तुला, जरि असें नरांतें कळे,
'करीन न करीन वा' मति अशी समग्रा पळे !
तुला विदित जें असे खचित तें घडे सर्वदा,
ललाट विधि जी लिही फिरतसे न रेषा कदा ॥ ९२ ॥
विरोध दिसती किती ! भ्रमविती मनाला कसे !
'अगम्य कृति सर्व या तव विभो !-' ह्मणावें असें ;
अनर्गलचि कल्पना भडकतां कडेलोट हो !
न भाव तिज आवरी, प्रभुवरा ! करूं काय हो ॥ ९३ ॥
न जों अजुनि मृत्युनें उदरिं आपुल्या ओढिलें,
चिरंतनसुषुप्तिनें नयन जों न हे झांकिले,
सदुक्त बरवीं प्रभो ! पडति कर्णि जो अक्षरें,
करें धरुनि तों त्वरें शिशुस दर्शना दे बरें ! ॥ ९४ ॥
स्वपाश यम घालुनी हरि न जीव हा जोंवरी,
स्वरूप निज दाउनी मज कृतार्थ देवा ! करीं;
अघाचल तुवांचि ते बहुत तारिले हें खरें,
तरी मज उपेक्षिसी वद परात्परा ! कां बरें ॥ ९५ ॥
उपस्थित अजून जों यम नसे प्रभो ! तों दिसो;
त्वदीय मुखचन्द्रमा, न मम ही सदाशा फसो !
विनश्वर शरीर हें जळुनि जावयाचें जरी-
अदृश्य उरणार कीं मज कळे न आत्मा तरी ॥ ९६ ॥
अनाथ गळतांच ही तनु मदीय पृथ्वीवरी,
पतंगसम मुक्त हो त्यजुनि कोश आत्मा जरी;

असेल गति भावि यापरि, खरें तुझें वैभव,
पुढें तरि दिसो, मिळो शम, टळो पुन्हां हा भव ॥ ९७ ॥
प्रतिक्षणीं तुझ्या असें तृषित मी कृपाजीवना,
न भागविसि कां तृषा ? रुससि कीं जगज्जीवना !
नसो तव मनीं असा ग्रह–उगीच वाचाळ हा !
दयाघन खरा तरी मजकडे वळोनी पहा ॥ ९८ ॥
मयूर कविची गिरा 'शिशुहि जें मुखें वर्ण वी–
पिता पिउनि तें भुले मधुरता मुखें वर्णवी.
स्मरोनि मधुरा प्रभो ! तव पदा मनीं चिंतिलें,
तरंग हृदयांतले जवळ त्याचिया ओतिले ॥ ९९ ॥
'खरे असति भक्त जे, शरण येती भावे मला,
'अनुग्रह तयांवरी करिन'–अर्जुना बोलला;
परात्पर न तोच कां मजसवेंहि बोले स्वयें ?
उपेक्षि मज कां असें घडतसे, न लक्षांत ये ॥ १०० ॥
'मला शरण ये नरा ! अखिल धर्म ते त्यागुनी,
'तुझी सकल पातकांमधुनि मुक्तता होउनी;
मिळेल पद शाश्वत ध्रुवाचि शांतिही पावशी,
त्वदुक्ति सकलां जनीं विदित पंडुपुत्रा अशी ॥ १०१ ॥
न दर्प मनिंचा गळे, न च जळे तसा लोभही,
न मत्सर मला त्यजी, धरि मना बिळा कीं अही !
न रोष तिळ आवरे हलवि फार जो शांतिला,
अवात तरुला जसा, पृथिविकंप वा भूमिला ॥ १०२ ॥
निराश मजला तरी न करिं मागतों मागणें,–
मनोभ्रम–विनाशनें करिं कृतार्थ माझें जिणें !
प्रभो ! पसरुनी तुला पदर याचितों त्वत्कृपा !
नसे तुजसि द्यावया कठिण दान हें विश्वपा ॥ १०३ ॥

कळून न कळून वा घडति पातकें हातुनी,
भयंकर असे किती तरि विचार येती मनीं !
क्षमा करुनि लेंकरा, वद ‘ मदीय हा लाडका’ !
करील जननी जसे जन दुजा करी लाड का? ॥ १०४ ॥
तुझी करिति भक्ति जे सुख सदैव ते सेविती,
तयांवरि कृपा तुझी भिउनि जे तुला वागती;
तुझ्या भजनिं लागला कुपथ तो न सेवी कदा,
तुझे परमभक्त वा करिति बोध ऐसा सदा ॥ १०५ ॥
प्रसाद करिं गा तरी मजवरी जगन्नायका !
निवारिं भवभीति, दे अभयदान या याचका,
मनीं सहज ये, न कीं नियम सृष्टिचे भंगिशी–
प्रवृत्ति तव हो तरी पृथक–जीव–कार्यी कशी ? ॥ १०६ ॥
भवाब्धितुनि पार जो परमभक्त झाला कवी,
मनोज्ञ–कविता–सुता तुज समर्पुनी तोषवी !
मयूरसम माझिया गृहिं न जन्मली बालिका–
तुझें हृदय न द्रवे ह्मणुनि कीं जगन्नायका ॥ १०७ ॥
तुझ्या सतत चिंतनीं रमुनि दिव्य गाती यशा,
पुराणकवि वानिती बहु महर्षिमाला अशा;
न कां परि आह्मांस ते दिसती या युगीं, या जनीं,
हिमालयिं अजूनि ते वसति कीं महाकाननीं ? ॥ १०८ ॥
अनेक असती प्रभो ! क्षितितलावरी देश जे
पुराणसमयीं कशी भरतभूमि मध्यें सजे !
किती विलसती कला विविध कालिं त्या सुंदरी !
तयांस भुलवूनि ने कवण कानफाटा दुरी ॥ १०९ ॥
अनन्त उदरीं हिच्या धन भरोनियां राहिलें,
तरी करुनि उद्यमा वरति पाहिजे काढिलें;

अह्मां ह्मणति आळशी परकि लोक ते हांसती,
अहर्निश ह्मणोनि ही रडतसे सती भारती ॥ ११० ॥
कुठें कपिल बादरायण पतञ्जली जैमिनी—
कणाद बुध गौतम प्रखरबुद्धिशाली मुनी—
पवित्र कवि आद्य जो चरित राघवाचें करी,
रसज्ञ भवभूतिसे, मधुर कालिदासापरी— ॥ १११ ॥
घनांसम कसे कुठें सकल नष्ट झाले तरी ?
पुराणकविवृंद तो दिसत भूतकालोदरीं—
सरोवर जसें, निशासमयिं रम्यसा आरसा—
तयांत शशितारका वितरितात शांता रसा ॥ ११२ ॥
अहर्निश करीं जिची यदपि आर्जवें मी किती,
त्यजी मज, पळे दुरी नववधूपरी शांति ती !
मिळो मजसि मागतों अचलशांतिलक्ष्मी जरी
न ती तळमळे सदा जलविहीन मीनापरी ॥ ११३ ॥
अभाग्य नर मी मला पद तुझें दिसेना कसें ?
कृपेविण तुझ्या तुझें विशदरूप कैसें दिसे ?
स्वरूप तव वर्णिती नयन दिव्य देशी जयां,
कशी दिधलि अंधता मज अभाग्यदासास या ॥ ११४ ॥
तुझ्याच पदपंकजीं सकल आस माझी वसे,
तयीं सतत मन्मनोभ्रमर वास इच्छीतसे ;
प्रसाद तव हो ह्मणें, करिं वितृष्ण माझ्या मना,
तुझ्याविण कशी दुजा सफल कोण ही कामना ॥ ११५ ॥
अघाचल अजामिळप्रभृति ज्यां तुवां तारिले,
तयांहुनिहि पातकी अधिक मी, असें वाटलें ?
असें जरि न सांग बा मजसि हेतु देवा ! खरा,
मिळे न मज कां तरी तव कृपाजलाचा झरा ॥ ११६ ॥

अनुग्रह करीं त्वरें मजवरी जगच्चालका !
दया करुनि दिव्य दे त्वरित दृष्टि या बालका !
न सांग बुडवील कीं जल भवाब्धिचें घातकी ?
कृपा—तरि मिळे तुझी तरिच हा तरे पातकी ॥ ११७ ॥
दया करुनि सोडवीं मजसि या विमोहातुनी,
वनीं फसलि गायशी त्वरित काढि गर्तेतुनी;
नितांत शिणलों, करीं नच विलंब तारावया—
विमोह—कुहरीं बुडे, करिसि वेळ कां यावया ॥ ११८ ॥
भ्रमात्मक भुजंग हा भिववी फार, मारी उडी !
तुझ्याविण न मांत्रिक प्रबळ अन्य तो गारुडी;
अहर्निश अशांतता मज पिशाचिका पीडिते,
अगा कुशल मांत्रिका ! पळविं सर्व माझीं भुतें ॥ ११९ ॥
खराचि तुज पातकी जडचि भक्त हा लाभला—
विमोह—रिपुनें असे तुडविला सदा जो भला !
निवारिं मम संकटें प्रभुवरा ! धरोनि करा,
मनस्तिमिरकर्दमामधुनि काढिं या लेंकरा ॥ १२० ॥
तुझ्यासम नसेचि या भ्रमनदास धन्वंतरी !
नसेल दुसरा असा भ्रमगदार्त्त माझ्यापरी;
महौषधि कृपाच ती तव मिळो, करीं प्रार्थना—
मनोगदविनाशना ! पुरविं सत्वरीं कामना ॥ १२१ ॥

## स्वातंत्र्याची योग्यता.

**पद्य.**

( ' पंचतुंड नररुंड ' या चालीवर. )

स्वातंत्र्याच्या साठीं झाला सिद्ध न जो नर मरणाला,
धिक्‌धिक् त्याचें जीवित, आला प्राणि कशास्तव जन्मला ।। धृ.
स्वातंत्र्याविण दुःखद ऐसें जीवन लोकीं काशाला ?
स्वातंत्र्याचा एकहि दिन तो स्वर्गसुखा दे मनुजाला ।। १ ।।
ऐका ! ऐका ! या वीराच्या ' जयजय ' ऐशा घोषाला,
जो शत्रूचें हृदय विदारी, अवलोका या नवलाला ।। २ ।।
रक्तानें या पहा माखल्या हीन दीन निज भूमिला,
पळा ! पळा ! हो धांवा सत्वर प्रिय मातेच्या साह्याला ।। ३ ।।
रक्षण तिचें करील ऐशा आहे एका बाहूला,
असंख्यात हीं रिपुसैन्याची समता, ऐशा समयाला ।। ४ ।।
सदय अशा त्या मृत्युमुखाचा लाभ गणावा शेवटला,
मृत जे होती ते नच भीती इहलोकींच्या जुलमाला ।। ५ ।।
बांधा कंबर युद्धासाठीं, येति वीर जे धरणीला,
सद्गुणमंडित रणपंडित ते, तेच मिळविती कीर्तीला ।। ६ ।।
स्वातंत्र्य जरी इह लोकींचें जाय सर्वथा नाशाला,
निराश नच व्हा स्वर्गीं मिळे तें धरा मनीं या भावाला ।। ७ ।।

## चांदणीरात्र.

### पद्य

( चाल–जाऊं नका रे विषयटाविची )

पहा पहा हें सखे चांदणें गोड किती पडलें,
क्षणभर या स्थळिं बसूं सुखानें मन माझें रिझलें ॥ ध्रु० ॥
वाजति वाद्यें मधुर तयांचे ध्वनि उपवनिं भरले,
त्यांच्या श्रवणें श्रवण आपले तृप्त करूं सरले;
आधिंच मोहक संगीताचा गुण जनिं अनुभविलें,
शांत समय त्यांतूनि रजनिचा तल्लिन मन झालें ॥ पहा पहा! ॥
बैस गडे तर मग तूं येथें स्वस्थ चित्त करुनी,
पाहूं शोभा नभांगणाची चिंता विसरोनी;
नभांगणीं या सुंदर रत्नें असंख्य निर्मोनी,
विश्वनियंता दावि चतुरता बघ सुंदरि! नयनीं ॥ पहा पहा! ॥
किन्नरयुती वरि अनुरागें कटाक्ष फेंकोनी,
किन्नर जैसे स्वर्गीं गाती तल्लिन होवोनी;
बघसी तितुके तारे तैसे सकल गोल असुनी,
गंधर्वासम नृत्य करिति गे गुंग मधुर गानीं ॥ पहा पहा! ॥
इहलोकींचे पुण्यपुरुष ते तनु जातां गळुनी,
मुक्त होउनी अमरगणाला शोभविती गगनीं;
दिव्य असे संगीत ध्वनिगे अमराच्या भुवनीं,
परि मर्त्यांना ऐकुं न येई जड मृण्मय कर्णीं! ॥ पहा पहा! ॥

# वासुदेव वामनशास्त्री खरे.

हे प्रसिद्ध ग्रंथकार व कवि रत्नागिरी जिल्ह्यांत गुहागर येथें इ. स. १८५८ (आषाढ वद्य ११ शके १७७९) ह्यावर्षी जन्मले. हे जातीचे कोंकणस्थ हिरण्यकेशी ब्राह्मण. हे दहा वर्षांचे होईपर्यंत ह्यांचा विद्याभ्यास गुहागर येथें झाला. ह्या वयांत त्यांनीं मोरोपंतांचीं बहुतेक काव्यें वाचिलीं. तीं, वयाच्या मानानें जरी चांगलींशीं समजलीं नाहींत, तरी त्यामुळें यांना कविता करण्याचा नाद लागला. लहानपणीं हे फार खेळाडू असत. १६ व्या वर्षांपावेतों ह्यांचा ह्मणण्यासारखा विद्याभ्यास झाला नाहीं. पुढें अनुक्रमानें सातारा येथें वे. शा. सं. अनंताचार्य गजेंद्रगडकर व पुणें येथें वे. शा. सं. नारायणशास्त्री गोडबोले ह्यांजपाशीं ह्यांनीं व्याकरण शास्त्राचें अध्ययन केलें. पुण्यास असतां कै. वा. विष्णुशास्त्री चिपळूणकरांशीं ह्यांचा परमस्नेह जडला; व त्यांनीं काढलेल्या 'न्यू इंग्लिश स्कुलांत' ह्यांनीं सुमारें ८ महिने शिक्षकाचें काम केलें. नंतर ह्यांस 'मिरज हायस्कुलांत' संस्कृत शिक्षकाची जागा मिळाली. ही नोकरी मिळाल्यावर ह्यांनीं इंग्रजी भाषेचें चांगलें ज्ञान संपादन केलें; व नोकरी संभाळून खाजगी वेळांत अनेक उपयुक्त ग्रंथ आणि यशवंतराव महाकाव्य, समुद्र व इतर स्फुट कविता लिहिल्या. प्रस्तुत ग्रंथांत ह्यांच्या नांवाखालीं असलेले बहुतेक वेंचे ह्यांच्या 'यशवंतराव महाकाव्यां'तूनच घेतले आहेत. ह्या कवीच्या रचनेंत अकृत्रिमता आणि प्रसाद हे दोन गुण प्रधानत्वानें दिसून येतात. हे कवि १९२६ सालीं दिव्यंगत झाले.

---

## विक्रमादित्याची उज्जयिनी.

स्रग्धरा.

जातां अस्ताहि तेजें दिपवि रवि जसा संकटीं थोर लोक,<br>
क्षिप्रेच्या पृष्ठभागीं चमकति किरणें पीत त्याचीं सुरेख;

ऐशा वेळीं तिथें मी भटकत असतां फार झाला उदास,
तेव्हां नानाविचार प्रकटुन करिती क्षुब्ध माझ्या मनास ॥ १ ॥

मंदाक्रांता.

शास्त्रें, विद्या, ललित, कविता, धर्मनिष्ठा, प्रताप,
होतीं जेव्हां करित वसती हिंदुलोकीं अमूप,
जेव्हां होता विलसत जगीं विक्रमादित्य राया,
तेव्हां नांदे प्रथित भुवनीं ती पुरी याच ठायां ॥ २ ॥

शिखरिणी.

पुरी पूर्वीं गर्वें निरुपम निजैश्वर्य मिरवी,
जिला वर्णूं जाता थकति सुकृती संस्कृतकवी ;
तिच्या स्थानीं आता पसरत असे निर्जन वन !
बघोनी हें झालें मम समयिं त्या दुःखित मन ॥ ३ ॥

स्रग्धरा.

कोठें ते कांचनाचे कळस चमकती उंच देवालयाचे ?
हर्म्यें प्रासाद कोठें असति ? विलसले थोर ऐश्वर्य ज्याचें,
कोठें त्या नाटयशाला ? दिसति न नयना चंद्रशाला विशाला !
रत्नांनीं पूर्ण गेले विपणि तळ जणों अब्धिचे ते लयाला ! ॥ ४ ॥

मंदाक्रांत.

प्रातःकाळीं नगर-वनिता कुंकुयाच्या सड्यांनीं,
रांगोळ्यांनीं, अधिकच जयां देति शोभा झटोनी;
नानायानीं बसुन गमना पौर जेथें करीत,
नानावेषीं फुलतिच कुठें जाति ते राजपंथ ! ॥ ५ ॥

शार्दूलविक्रीडित.

जेथें नाचति मोर, मंजुळ रवें गातात जेथें पिक,
वापींच्या तटिं खेळती सुखभरें चक्रांग, हंसादिक;

पुष्पानीं लवल्या लता तरुवरां जेथें मिठी घालिती,
उद्यानें दिसतीं न तीं वसति जीं क्षिप्रा नदीच्या तटीं ॥ ६ ॥
विद्या-धर्म-सुकर्म-तत्पर असे होते इथे ब्राह्मण,
तैसे क्षत्रिय शूर मानधन ते ज्यां जीव वाटे तृण !
अर्थोत्पादक वैश्य, शूद्र खपले सेवावया भूमिला,
कोठें उज्जयिनीमधील जन ते गेले कळेना मला ! ॥ ७ ॥

रथोद्धता.

जीस विक्रम पराक्रमी गुणी,
तोषवी झटुन नित्य रक्षुनी,
राजभक्ति–वश धन्य लोक ते,
होति या नगरिं पूर्वि नांदते ॥ ८ ॥

शार्दूलविक्रीडित.

लोकीं पावसि तूंच विक्रम नृपा धन्यत्व या जन्मुनी,
काव्याभिज्ञजनांत तूंच पहिला, दात्यांमध्यें अग्रणी;
वाणी-कंठ-मणी कवीश्वर गुणी शाकुंतलाचा पिता,
होता आश्रय पूर्ण पावत तुझा ! विद्वत्सभासंमता ॥ ९ ॥

वसंततिलका.

शृंगार-वीर-करुणा-रस-पूर्ण काव्यें,
जीं कालिदास तुज ऐकवि नित्य नव्यें,
गंभीर सुस्वर रसाळ अशी सुवाणी,
त्याची नृपा परिसली असशील कानीं ! ॥ १० ॥

शार्दूल विक्रीडित.

सांगाया निजवल्लभेस वदला तो यक्ष जें जें घना,
सीतेचा पतिला निरोप, रतिचा तो शोक भेदी मना;
ज्यातें ही कविच्या मुखेंच कविता ऐंकावया सांपडे,
त्याचें भाग्य विशेष दुर्लभ जगीं तो लाभ त्यातें घडे ! ॥ ११ ॥

ज्यांनीं गर्वभरें शिरें उचललीं आकाश भेदावया,
जाती पर्वत उंच थोरहि असे ज्याच्या प्रभावें लया,
किंवा घोर अपार सागर-जळें ज्यानें बळें शोषिलीं,
तो हा धन्य अचिंत्य कालमहिमा स्वच्छंदचारी बळी ! ॥ १२ ॥

भुजंगप्रयात.

महाकाल रक्षावया सिद्ध नित्य, अवंतीस हें बोलती लोक सत्य;
कसा काल नाशावया तीस पाहे? अहो थोर आश्चर्य हें वाटताहे ! ॥ १३ ॥

मालिनी.

कविवर चिर गाती कीर्ति ज्याची अमूप,
त्यजुन भुवन गेला विक्रमादित्य भूप !
कवण रसिक भोक्ता आपणा होय आतां ?
ह्मणुन सुकविता ही पावली स्वर्ग-पंथा ! ॥ १४ ॥

वसंततिलका.

श्रीविक्रमानुज नृपाल उदार शुद्ध,
राज्यें प्रजा सुखवि भर्तृहरि प्रसिद्ध;
तो आपुल्या प्रियपुरास विनाश-काल,
येणार जाणुन असें वदला असेल ॥ १५ ॥

शार्दूलविक्रीडित.

" ती रम्या नगरी महा नृपति तो सामंतचक्रावृत्त,
त्याची राजसभा विशाल, जवळी चंद्रानना त्या स्थित,
शौर्यें गर्वित राजपुत्र-गण तो, ते भाट, तीं भाषणें,
ज्या काळें सगळें लया दवडिलें, माझीं तया वंदनें ! ॥ १६ ॥
गेली उज्जयिनी !!! तिच्या धरितसे नांवास जें लोकिं या,
आहे सांप्रत उज्जनी नगर तें राज्यांत शिंद्याचिया,
आहे नांव, परंतु वैभव दिसे कोठें न तें त्यापरी !
नाम्यैकें समता चुन्यास अमता येईल कैशी तरी ! ॥ १७ ॥

कोठें उज्जयिनी पुराणनगरी संपन्न राजन्वती !
ज्ञानी शूर सुखी स्वधर्म-निरता जेथें प्रजा राहती !
कोठें उज्जयिनी नवी जन जिथें दारिद्र्या-चिंताकुल !
राजे दुर्मद दुष्ट जीस लुटिती होती रणें तुंबळ !॥ १८ ॥

## वेंचे-यशवंतराव महाकाव्यांतलि.

### कोटा शहरांतील सायंकाळ.

वसंततिलका.

साम्राज्य भू-जलनिधींवर चालवून,
अंधार हाच रिपु या दुर घालवून;
चंडप्रताप भगवान् दिनराज चाले,
अस्ता, सवें किरणसेवकही निघाले ॥ १ ॥
अस्तास जाय निजनायक हें बघून,
भूमंडळावरुन वृक्षशिरीं, तिथून;
हे उंच डोंगरि गिरीवर राहताती,
तेथून सूर्यकिरण क्षणिं नष्ट होती ॥ २ ॥
अर्घ्यप्रदान दिधलें नियमें द्विजांनीं,
संध्येंत भक्तिरसपूरितमानसांनीं;
पाथेय तें क्षितिजमंडळवासि घेतो,
लोकान्तरास मग सिद्ध रवी निघे तो ॥ ३ ॥
होता नभीं तपत जोंवरि सूर्यकांत,
दिव्य प्रभा धरुन शोभत वस्तुजात ;
कालक्रमें बघुन अस्तगता तयास,
शोके जणों विकलसृष्टि दिसे उदास ॥ ४ ॥

अस्ता प्रतापनिधि भास्कर जात आहे,
हें विस्मयें जग चराचर पाहताहे ;
येता समीप तम भीतिभरें समस्त,
झाडें, नद्या, गिरिशिरें, दिसतीं तटस्थ ॥ ५ ॥

आकाश हें विमल नील छतासमान,
त्या झालरीसम कडेवरी पिंगवर्ण;
कांहीं स्थळीं मलिन त्यावरि मेघ दाटे,
नक्षत्र-दीप-शत-कज्जल-पुंज वाटे ॥ ६ ॥

सूर्यांशुनीं निबिड दुर्गम काननांत
होता दिला हटवुनी गिरिगव्हरांत;
तो अंधकार निज सोडुन आश्रयातें,
धैर्यें पुढें सरुन आक्रमितो जगातें ॥ ७ ॥

गेल्या सकाळिंच वनांत चरावयास,
त्या धेनु धांवति गृहाप्रति यावयास;
सप्रेम वत्स हृदयामधिं आठवीती,
पान्हा फुटे स्वपय भूमिस ओपिताती ॥ ८ ॥

चारा धरून वदनांत विहंगजाती
अत्यंत उत्सुक जवें घरट्यांस जाती ;
' चीं चीं ' पिलें करिति पाहुन एकदाची,
माया पिलांवर किती तरि पाखरांची ! ॥ ९ ॥

नेणोनि ऊन अणि भूक तहान यांतें,
काबाडकष्ट करितात धन्यासवें, ते;
शांत स्वभाव, हितकारि नरास मोठे,
यावेळिं बैल जवळी करितात गोठे ॥ १० ॥

घोड्यावरी किति पदीं किति गाडियांत,
चालोनि लांबवर मार्ग निज क्रमीत;

विश्रांति अन्नउदका मिळवावयाला,
पांथस्त शोधिति उताविळ धर्मशाला ॥ ११ ॥
भाजी, फुलें, फळफळावळ, जे पदार्थ,
होते अनेक बसले दिवसा विकीत;
झाली कशी विकरि, होय नफा कशानें,
जांती घरा पुसत लावुनियां दुकानें ॥ १२ ॥
काश्मीर, दिल्लि, मथुरा, आणि नागपूर,
अन्यस्थळांहुनिहि येति लमाण फार;
तो माल सांठवुन शोभति त्या वखारी,
दाटी जमे, गजबजाट नभा विदारी ॥ १३ ॥
गंभीर शब्द करुनी करि लोक जागे,
व्हाया तयां स्वहिततत्पर नित्य सांगे;
तो चौघडा झडतसे सुरमंदिरांत
जो लांबदूरवरही श्रवणांत येत ॥ १४ ॥
आनंद-शोक-भय-दुःख-सुखीं वसेना,
कोण्या स्थितींतहि मनुष्य जगीं असेना;
हृद्भावहारि करुणारस मिश्र फार,
ऐकेल तो सनइचे अतिगोड सूर ॥ १५ ॥

## पुणेंप्रदेशवर्णन.

द्रुतविलंबित.

द्विज अनंत असा सकलांपुढें, दवडवी स्वहया दुडक्या पदें;
जवळ रक्षक-नायक चालतो, मग अनंत तयाप्रत बोलतो ॥ १ ॥
'बघ सख्या ! रमणीय सुदेश हा, दिसुनि येइ अशा समयीं अहा !
उगवुनी नुकता मिरवे रवी, महितला कनकें जणु सारवी ! ॥ २ ॥

इथुनि तेथुनि शेत मळे किती, उठुनि भूमिस व्यापुन टाकिती !
अजुन कार्तिकमास न संपला, ह्मणुनि गारच देश दिसे भला ॥ ३ ॥
दंव नसे सुकलें अजुनी जरी. प्रखर भास्करही न करां करी;
जमिन हीच धनीण इची करीं, कठिण शेतकरी करि चाकरी ॥ ४ ॥
बसुनियां छपरावरि गोफणी, धरुनि, हांकिति पक्षिगणां कुणी;
झणझणा करिं गोफण जों फिरे, पळति दूरचि बापुडि पांखरें ॥ ५ ॥
कितिक पेटविती जन आगटी, जवळ बैसुन शीत निवारिती;
हळूहळू पडतो हुरडा मुखीं, बसुनि सांगति गोष्टि तिथें सुखी ॥ ६ ॥
वय दहा वरुषें शिशु धाकुटे, चपळ धांवति घेउनि आउतें ;
कितिक येथ पतीस गुणी स्त्रिया, मदत देति पहा तिकडे सख्या ॥७॥
हरभरा, गहुं, बाजरि, जोंधळा, पिकुनि गार इथे दिसतो मळा;
जमिन देईल धान्य सुखें जर, कितीक खाइल मानव हा तर ॥ ८ ॥
कितिक जुंपुनि मोट जन स्वतां, वृषभ सुंदर हांकिति तत्वतां;
श्रम गमो वृषभां हलका सुखें, करिती गायन सुस्वर हें मुखें ॥ ९ ॥
पसरिती निजपक्ष जशीं शिडें, उडति घारि नभीं दिसती पुढें;
नजर कोसभरी दुर फेंकिती, त्वरित शोधुन भक्ष्यहि काढिती॥१०॥
धरुनि वेष निळे, हिरवे असे, उडति पक्षि तरू वरुनी कसे !
करिति नादित देश मधु-स्वरें, सुख खरें जगिं भोगिति पांखरें॥ ११ ॥
घराटियांत बसून पिलासवें, दवडिती निशिला अति उत्सवें;
उठति जों अरुणोदय जाहला, धरिति संतत उद्यम आपुला ॥ १२ ॥
गगनराज्य अफाट तया रवी, उगवुनी नृपती बहु तोषवी;
ह्मणुनि पक्षिच भाट सुखावले, करिती गायन ही स्तुति भासलें ॥१३॥
पसरलें जरि दाट दिसे धुकें, किरण त्यांत परी शिरकूं शकें;
खुलति दोनहि एकच होउन, दिसति पारद आणखि दर्पण ॥ १४ ॥
दिसति अस्फुट त्यांतुन डोंगर, पसरलीं बहु दाट वनें वर;
ह्मणती सह्य जया गिरि हा असे, सकल पश्चिम व्यापुनियां वसे ॥१५॥

कितिक जाति नभांत निमूळते, किति सपाट शिरीं गिरि देख ते;
कितिक एकच रांग धरुनियां, असति, खिंड दिसे न कुठें तयां ॥१६॥
गरुड तो शिवभूपति यांवरी, रचुनि दुर्ग पहा घरटीं करी;
तिथुनि घालुन झेंप दिनोदिन, लुटित देश करी रिपु-मर्दन ॥ १७ ॥
ह्मणुनि पूज्य समस्त मराठियां, असति डोंगर हे न मिती तयां;
इथुन राज्यनदी उगवूनियां, पसरली अरिला करिती भया ॥ १८ ॥
शिव अचाट अशी करणी करी, स्वरिपु जिंकुनि थोर यशा वरी;
ह्मणुन तत्स्मरणार्थ असे भले, विजयदर्शक खांबच रोविले ॥ १९ ॥
भरभराट नवाच दिनादिना, सुखवि राज्य मराठि कसें जनां;
अचल बैसुन पाहति हे असे, विगतपक्षजटायुशरीरसे ॥ २० ॥
उगम पावति पुण्य-नद्या वरी, सुखविती भुवनास बहूपरी;
विलसती दृढ-दुर्ग किती वर, ह्मणुन नीट मनामधिं हे धर ॥ २१ ॥
दुरुन वाहत येति मुळा मुठा, विलसती तरुकुंज तया तटां;
भगिनी काय सशील ह्मणूनियां, करित गोष्टि सुखें फिरतात या ॥ २२ ॥

---

## पुणें आणि त्याचें रूपांतर.

द्रुतविलंबित.

दुरुन थोर पुणें दिसुं लागलें, बघुन धातिल नेत्रच आपुले!
प्रबल दैव असे ह्मणुनी पुर, घडतसे नयनांप्रत गोचर ॥ १ ॥
असुन गांव लहान भिकारडें, पुर इथें उठलें तरि केवढें!
वसति हिंदु-पदाधिपती बरे, गहन कालमहात्म्य असे खरें ॥ २ ॥
अखिल-देश-नृपाल अशा स्थळीं, नमिति येउन राजपदा बळी;
बघति वाट हुकूम कसा घडे, तदनुकूलच वर्तनही पुढें ॥ ३ ॥
यवनराज्यतमें जग घेरिलें, ह्मणुनि हिंदु महाभय पावले;
उगवती रविसे भट पेशवे, पळति शत्रु तयां नच राहवे ॥ ४ ॥

स्वपद हें दिधलें करुनी कृपा, स्तवन योग्यच शाहु महानृपा;
करि रवी निज अर्पण तेज कीं, अनळिं मावळतां नच तारकीं ॥५॥
मधुर गायन, नर्तन, वादन, उपवनांत विलास, सुभोजन;
सकल लोक इथें उपभोगिती, प्रतिदिनीं नव उत्सव चालती ॥ ६ ॥
धरुनियां तरवार–सखी करीं, भरुन चंदन रक्त तनूवरी;
रणवनीं यश–हंस धरावया, रसिक वीर तयार पुण्यांत या ॥ ७ ॥
फिरुन आठ दिशांस सुपंडित, करुन खंडित सद्गुण–मंडित;
विविधशास्त्र वनांतिल केसरी, दुरुन येउन राहति या पुरीं ॥ ८ ॥
मधुर निर्मल सौम्य सरस्वती, सुकवि जे वदनांतुनि काढिती;
करिति संतत संत–सुवर्णन, लुटुन नेति पुण्यांतुन या धन ॥ ९ ॥
करिति वाडवडील अशा कथा, नयनिं वैभव तें बघतों स्वतां;
वसतिदेश जरी अपुला दुर, परिसतों परि कीर्ति निरंतर ॥ १० ॥
झळकती दुरुनी दिसती अहा ! कळस निर्जर–मंदिरिंचे पहा;
गगन–छत्रच सांवरुनी शिरीं, दिसती दंड उभे इतुके वरी ॥ ११ ॥
उचलती स्वशिरें वरती घरें, स्वधनगर्वच त्यांस जणों भरे !
नयन हे खिडक्या उघडूनियां, बघति येतिल कोण पुरांत या' ॥१२॥
द्विज अनंत चले हळु पावलीं, उपवनें खुलतात जया स्थलीं;
दुरुन पाहुन या महितापुरा, भरतसे मनिं विस्मय कीं पुरा ॥१३॥
जरि अनंत जिवंत असोनियां, बघत आज असे नगरास या;
कुठुनि पाहिल तो नृपमंदिरें ? कुठुनि सौख्यविलास इथे खरे ॥१४॥
बघुनि आज दशेस पुण्याचिया, कवण सुज्ञ ह्मणेल पुणें तया ?
न असतें जरि चंचल वैभव, किति सुखी असते मम बांधव ॥१५॥
अससि निर्दय फारच संपदे ! पळसि काय ह्मणूनि दुरी मदें ?
न रण–शौर्य, न साहस, सद्गुण, स्थिर करूं शकती तुजला क्षण ॥१६॥
न भगवें फडकेल निशाण या, महिवरी, गत जें पुरतें लया !
परत घेउन लूट पुण्याप्रती, कधिंच येतिल वीर न संप्रती ॥ १७ ॥

सण घडे दसरा प्रतिवत्सरीं, परि न सौख्य मनाप्रत तो करी;
जमुन येउन योध निजस्थळीं, उतरती न पुण्याजवळी बळी ॥१८॥
'न रजपूत, निजाम, न हैदर, नच नजीब बघो तुमचा कर'
धुळिस त्या मिळवा न असे कधीं, सुटति आज हुकूम पुण्यामधीं ॥१९॥
रजत, कांचन, मौक्तिक, माणिक, धन जयांजवळी बहु आणिक;
विलय पावति थोर कुबेरसे, धनिक सांप्रत अन्न तयां नसे ॥ २० ॥
तरुण कोणी कुलीन महाजन, स्वकुलवैभव आठवुनी क्षण,
बघति दीन जुन्या तरवारिला, फुकट जन्म तयांप्रत भासला ॥२१॥
वसति पुण्य-पुरेश जिथें बरे, नयन सौख्यद सुंदर मंदिरें,
प्रभु-महाविरहाऽधि न सोसवे, ह्मणुन जाळुन घेति न रहावे ॥२२॥
बसुनि आरब उंच हयावरी, करिति रक्षण जेथ निशाभर,
दिसत ते शनवार-पटांगण, किति उदास ! जना बघवेच न ॥२३॥
समयिं त्या असतां चढती कला, स्वधनसंचय पुष्कळ खर्चिला;
सधन पूर्वजनीं रचिलें घरां, उठविलें नगरीं जणुं डोंगरां ॥ २४ ॥
सुखविलासनिमग्नच माणसें, बसुन उत्सव जेथ सदा असे,
पडति तीं सदनें प्रतिवत्सरीं ! कवण दागदुजीहि तयां करी ॥२५॥
अतुल वैभव, शास्त्र-कला-गुण, सकल जाति पुण्यांतुन लोपुन !
नवनवीं व्यसनें, नव दुर्गुण, नव विचार इथे, नव भाषण ! ॥२६॥
जरि पुढें आणखी शत वत्सर, स्थिति अशीचि असेल अह्मांवर,
स्वजन राज्य इथे वसलें असें, वदति कीं अमुचे पणतू कसें ॥२७॥
जनहि दुर्बल होति दिनोदिन, विसरले अपुले मुळचे गुण;
बदलु पाहति पद्धति ते जुनी, ह्मणुन फार विषाद वसे मनीं ॥२८॥
जंव विचार असे मनि खेळती, बहु उदास तया घडते स्थिति !
ह्मणुन एकिकडेच तयां करूं, पुनरपि स्वकथेस करीं धरूं-॥ २९ ॥

## महारण्यांतील चांदणीरात्र.

वसंततिलका.

ऐशा प्रसंगिं यशवंत वनीं भयाण,
विश्रांतितें क्षण शिलेवरि घे बसून;
घोड्यावर बसुन वीसहि कोस आला,
या कारणें श्रम तया सुभटास झाला ॥ १ ॥
गेला झऱ्याजवळ, सुंदर गार पाणी,
पीतां मनांत अमृताचिच गोडि आणी;
संध्येस वंदुनि, फराळ करून कांहीं,
तो आसनावर वसून सभोंति पाही ॥ २ ॥
जाईल रात्र कशि हाच विचार पोटीं,
आहे पुढें पडलि ती तरवार मोठी;
व्याघ्रादि हिंस्र पशुची मनिं भीति वाहे,
जाग्यावरी बसुनि सावध जागताहे ॥ ३ ॥
यावेळीं कुंकुमचि लावुनि भाळदेशीं,
राहे पतीस निरखूं युवतीच जैशी,-
तैशी दिशा सजलि उत्सुक काय पूर्व,
ती तांबडी धरुनि कांति दिसे अपूर्व ॥ ४ ॥
निर्वीर भूमितल पाहुनि, अंधकार,
चाले मदांध गज हर्षभरें पुढार;
पूर्वेस त्यास मृगराज मृगांक भेटे,
हे अंधकार-गज-रक्तच लाल वाटे ॥ ५ ॥
लक्षावधी उगवती गगनांत तारे,
हे भालदार शशिभूपतिचेच सारे;

बुक्का, गुलाल, उधळीतच मानपानें,
ते आणितात निजनाथ महोत्सवानें ॥ ६ ॥
अन्यस्थळीं दिवस घालवुनी विलासें,
येतो पुन्हां परत लाजत चंद्र भासे;
डोकावुनी हळुच रात्रिवधूस पाहे,
मर्जी असेल कशि काळजि हीच वाहे ॥ ७ ॥
सारून दूर पडदे जलद-स्वरूप,
आला प्रगल्भ नटराज पुढें अमूप;
जों लावितात टक एकच लोक मात्र,
तो रंग मंडपि नभीं शशि रम्यगात्र ॥ ८ ॥
चंद्रप्रभा गिरिशिरावर फांकतात,
ज्यांच्या लपे तम भयार्त्त गुहादरांत;
राजाच तो मन उदार करून ठेवी,
डोक्यावरी कर जणों अभयास दावी ॥ ९ ॥
नानालतौषधिस जीवन घालणारे,
एकाच कालि जननेत्र सुखावणारे;
पृथ्वी सुधाधवल सर्व करून धाले;
हे शीत शीतकिरणें कर धाडियेलें ॥ १० ॥
आकाश-भूमि-गिरिकंदरिं पूर्ण साचे,
ओघावरी पडति ओघच चंद्रिकेचे;
क्षिराब्धिच्या उठति या लहरीच काय !
कीं सर्व चंदनरसांत बुडून जाय ? ॥ ११ ॥
या चांदण्यांत अमृतांत जणों बुडाल्या,
हर्षांत डोलतिहि नाचति मत्त झाल्या;
वेली कशा स्वतनुनीं तरु वेढितात,
प्रेमें प्रिया धरुन तन्मय काय होत ॥ १२ ॥

नाना लता मिळुन एकच गुंत होता,
सर्वांस एक समयास फुलेंहि येतां;
त्या काननीं घमघमाट सुदूर चाले,
हर्षांत गोंधळुन चंचल चित्त डोले ॥ १३ ॥
पानें जया असति गारच काळिंभोर,
वृक्षांवरी चढति वेलि अशा अपार;
त्या वीस पंचविस हात तिथून खालीं,
झोंकावति, ह्मणुनि सांवलि गर्द झाली ॥ १४ ॥
या वेलि हालति इथें जंव ये झुळूक,
खालीं फुलें पडति भूमिवरी अनेक;
रे मारुता ! शिवुं नको ह्मणतात वेली,
हीं आंसवेंच कुसुमें पडतात खालीं ! ॥ १५ ॥
हे ताल साग सगळे गगनांत जाती,
ईर्षाभरें वरचढीच करूं पहाती;
जों जों वरी चढति, बारिक वृक्ष होती,
उच्चत्व इच्छित तयांत अशीच रीती ॥ १६ ॥
छायेंत कांहिं भरतात बिढे जमीन,
हे लक्षपक्षिभरणांत सुदक्ष जाण;
राजे वनांतिल अशा समयास शांत,
स्तब्धाकृती सुवटवृक्ष वना पहात ॥ १७ ॥
पानें करीं शिथिल हालवि कांहिं वात,
चाले सदा सळसळा ध्वनि पिंपळांत;
हा दुष्ट वायु उमळूं बघतो स्ववंश,
हें ओरडोनि कळकी कळवीत खास ॥ १८ ॥
या चांदण्यांत यशवंत पहात राहे,
शोभाभरें खुलत सर्व अरण्य आहे;

तों गर्जना जवळ आयकण्यांत येती,
कोठें तरी जवळ वाघ फिरे वनांतीं ॥ १९ ॥
घोडाहि खिंकाळतसे यशवंत याचा,
सांगे पुढील भय धूर्त नसून वाचा;
तों एक धांदल उडालि पशूंत सर्व,
व्याघ्राचिया पुढति दाविल कोण गर्व ? ॥ २० ॥
उड्डाण घेति हरणें मग ताड ताड,
धावून भीत वृक होति तरूंस आड;
आवेश रानडुरकांस परंतु आला,
ते गर्जति उडविती वरती धुळीला ॥ २१ ॥
जोरावले वनकरी थडकांस देती,
कोल्हे कुई करुन दूर पळून जाती;
भ्याला, पळे तरस लंगडशाही घाली,
गर्दी अशी उठुनि एकच रानिं झाली ॥ २२ ॥
हा रात्रिचा समय रान अफाट दाट,
स्वच्छंद हिंस्र पशु या स्थळिं हिंडतात;
घेऊन खड्ग करण्यास तयार घाव,
तो सावधान बसला यशवंतराव ॥ २३ ॥
चाले पुढें घडिघडि जंव रात्र वेगें,
त्या जागचें बदलुं रूप विचित्र लागे;
जों जों उदास दिसलें वन तन्मनांत,
जोरें घुसूनच विचार उदास येत ॥ २४ ॥
जी वस्तु भोंवति भयें निरखून घ्यावी,
शंका क्षणामधिं तिच्याविषयीं भरावी;
त्या चांदण्यांत बघतां तितुकें पदार्थ,
भीती मनांत निरुपद्रवही करीत ॥ २५ ॥

जाळींत चंद्रकिरणीं करुनि प्रवेश,
जे पाडिले कवडसे महिच्या तलास;
ते वाटले नयन कीं उघडून वाघ,
रोंखीत मारिल उडीच धरून राग ॥ २६ ।
कोठें झुडूप बहु दाट फुटून पान,
जें चांदण्यांत दिसतें अति कृष्णवर्ण;
विक्राळ तोंड पसरून सटा उभारी,
उड्डाण मारिल गमे मृगराज भारी ॥ २७ ॥
तेथें तयास दिसला अति शुभ्रवेष,
कोणी पुढें सरळ धीट उभा पुरूष;
तो कोण, कोठिल, म्हणून करून पृच्छा,
जाणावयास यशवंत धरीत इच्छा ॥ २८ ॥
कांहीं न उत्तर करी स्थिर तो पुरूष,
तें पाहतां धरि मनीं यशवंत रोष;
हातें धरून मग ‘ पिस्तुल ’ नीट झाडी,
आवाज एकच उठे, विपिना धडाडी ॥ २९ ॥
‘चीं चीं’ करीत घरट्यांतुन पक्षि आले,
बाहेर, तो परि पुरूष न लेश हाले;
झाला पुढेंच यशवंत जपून पाही,
तों वृक्षमूल दिसलें दुसरें न कांहीं ॥ ३० ।
हांसे ह्मणे 'कितितरी चुकलों भ्रमानें !
नेले पहा कितिक दूर कसे क्रमानें !'
तो रात्र घालवि अशीच असून जागा,
सोडी न निग्रह कदापि, धरून जागा ॥ ३ ॥

# एकनाथ गणेश भांडारे.

हे कवि, जुन्नर तालुक्यांत पुष्पावती नदीच्या कांठीं उंब्रज म्हणून एक ल्हानसें गांव आहे, तेथें इ. स. १८६३ सालीं आक्टोबर महिन्याच्या १७ तारखेस जन्मले. हे जातीचे देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण. ह्यांचे वडील, हे चार वर्षांचे असतांच निवर्तले, सबब ह्यांचें मराठी शिक्षण व 'म्याट्रिक्युलेशन' पर्यंत इंग्रजी प्राथमिक शिक्षण अनुक्रमें ह्यांचे मामा व ज्येष्ठ बंधु यांच्या साहाय्यानें पिंपळवंडी व जबलपूर येथें झालें. यांस कविता करण्याचा नाद अगदीं तरुण वयांतच लागला; व 'रेलवे'ची खडतर नोकरी सांभाळून ह्यांनीं ल्हानमोठीं मिळून बारा काव्यें केलीं. किरकोळ पद्येंही बरींच केलीं आहेत. त्या पैकीं कित्येक काव्यरत्नावलींतून, महाराष्ट्रकोकिलांतून, राष्ट्रभक्तांतून आणि कित्येक स्वतंत्ररीतीनें प्रसिद्ध झालीं आहेत. ह्यांची कविता साधी पण सरळ असते. इ. स. १८९९ सालीं 'जी. आय्. पी. रेलवे' वर जो 'तारमास्तरां' चा जंगी संप झाला, त्या संपाचे हे मुख्य चिटनीस होते. नोकरी सुटल्यावर ह्यांनीं सोलापूर येथील 'कल्पतरु' हें वर्तमानपत्र सुमारें १८ महिने चालविलें. 'सुवर्णमाला' मासिक पुस्तकाचे हे एक संपादक होते.

## वेंचे कीर्तिमंदिरांतील.

आकाशांतुनि खालतीं पडतसे जेव्हां प्रभातीं दंव,
जेव्हां चोंहिकडे अरण्य हिरवें होऊन जाई नव,
जेव्हां नूतन नूतनत्व सुमनें स्वीकारिती सुंदर,
जेव्हां आळविती कळ्या विकसुनी मित्राप्रती सादर ॥ १ ॥
जेव्हां सर्व धरेप्रती कवळिती बालारुणाचे कर,
जेव्हां संसृतियातना विसरुनी मोदा वरी अंतर,

प्रेमाचें भरतें नवें उसळुनी जेव्हां मनीं येतसे,
तेव्हां उत्सुकतेस या स्मृति पुन्हां सत्कीर्तिची होतसे ॥ २ ॥
विश्वाचे व्यवहार सर्व बघुंया ऐशाच कीं हेतुनें,
वाटे एक दिनीं विमानिं बसलों मी कौतुकाकारणें;
होतें तें स्थित फार वेळ जणुं त्या मेघोदरा भेदिती,
पृथ्वी, सागर, त्यांतुनी दिसत तीं होतीं मला खालतीं ॥ ३ ॥
कोठें पर्वत, खोल खोल विवरें, कोठें महासागर,
कोठें भव्य वनें, विशाल सरिता, कोठें विहारागर,
कोठें स्वच्छ सरोवरें, रुचिरशा बागा कुठें शोभती,
अद्रीच्या शिखरांतुनी धबधबे कोठें उड्या मारिती ॥ ४ ॥
कोठें उंच सुळे, पहाडचि कुठें, कोठें कडे भंगले,
झाडी किर्र कुठें, सरस्तटिं कुठें भेसूरशीं जंगलें,
मैदानें दिसती सभोंवति कुठें ओसाड रेताड तीं,
धूम्रें दाहि दिशा कुठें भडभडां ज्वालामुखी कोंदिती ॥ ५ ॥
कोठें सागरातिरिं भव्य नगरें झाडींतुनी दिसती,
कोठें सुन्दर मंदिरेंहि घुमटें देवालयें शोभती,
नौका थोर कुठें महोदधिंतुनी देशान्तरा धांवती,
तों येई उदयाचलीं सुखदसा तारापतीचा पती ॥ ६ ॥
त्याचीं तीं किरणें हिमालयगिरी-शीर्षीं न जों पोंचलीं,
मन्नेत्रीं गिरिराजदिव्यसुषमा तों ती परावर्तली;
तेणें मी दचकून त्या गिरिकडे पाहूं न जों लागलों,
'कीर्तिमंदिर' तें बघून शिखरीं मी त्याचिये तोपलों ॥ ७ ॥
बर्फाच्या अति उंच उंच शिखरीं त्या भव्य शैलावरी,
तें म्यां मंदिर पाहिलें दुरुनियां कैलास लोकापरी;
सारी सुन्दरता तयावरुनियां ओंवाळुनी टाकणें,
कैलासीं अथवा 'सुकीर्तिभुवनीं' कांहीं दिसेना उणें ॥ ८ ॥

आहे काल अनंत ! तो कधितरी जाईल अन्ता परी,
त्याहूनीहि अनन्त काल यश तें नांदे तया मंदिरीं;
त्याची सुंदर ती ध्वजा फडकते सत्कृत्य पुष्पान्वित,
येई आजवरी तिचा परिमल घ्राणेंद्रिया अद्भुत ॥ ९ ॥
यावच्चन्द्रदिवाकरौ सुकृतिचा वारा तिथें वाहतो,
उल्हासें सुमनोरथागम तिथें वाढूं जवें लागतो;
त्याला गोड फळें पुढें जसजशीं येतात कालांतरीं,
आस्वादें मन त्यांचिया तसतसें धांवें यशोमंदिरीं ॥ १० ॥
कीर्तिसुंदरिलाल आजवर जे झालेत ह्या भारतीं,
त्याचें हें त्रिदिशालय प्रिय असे, ते ये स्थलीं नांदती;
झाली राख जळून खाक जरि हो ! त्यांची असे आज ती,
तत्सत्कीर्ति सुकंठिं रम्य कवितामाला कवी घालती ॥ ११ ॥

वसंततिलका.

झाले अनेकविध आजवरी सुधीर,
यत्कीर्तिचे फडकती ध्वज थोर थोर ;
ते सर्व या रुचिर मंदिरिं नांदतात,
तापत्रया विसरुनी चिर शांततेंत ॥ १२ ॥
देवाधिदेवचरितामृतलिप्तधौत,
सर्वप्रिय प्रमुख सौख्यद मंदिरांत ;
रत्नें असंख्य भरलीं, गणती जयांची,
लावावया मति न घे मज पामराची ॥ १३ ॥
जन्मास येउन जयीं तनु कष्टवीली,
पंग्वन्धमूकबधिरावलि तुष्टवीली ;
सत्कृत्य निश्चयबळें पुरतें करूनी,
झाले कृतार्थ, अपवाद न जे गणूनी ॥ १४ ॥
ज्यांची स्वदेशजननीवर भक्ति फार,
तन्मंगला निशिदिनीं झटती अपार ;

सत्कीर्तिची प्रिय असे भगिनी गिरा ती,
ज्यांची असे चिर तदुन्नति थोर भक्ती ॥ १५ ॥
ते देव दानव, ऋषी अथवा नृपाल,
किंवा असोत कुणि मानव दीनपाल;
ते सर्व कीर्तियुवतिप्रियकांत होती,
सर्वांस जन्ममरणांतुनि मुक्ति देती ॥ १६ ॥

शार्दूलविक्रीडित.

ही कीर्तीदयिता अनेक विबुधीं आहे जरी भोगिली,
पातिव्रत्य तिचें परी न ढळलें! शुद्धा सदा माउली;
जों जों ती वरिते स्वयें नव पती, तों तों तिचें अंतर,
प्रेमें दाटुनियां उचंबळतसे सौभाग्यरत्नाकर ॥ १७ ॥
कांहींही न करी कधीं परि सदा बैसे रिकामा घरीं,
आयुष्यव्यय जो करी पशुपरी रात्रंदिनीं भूवरी;
कीर्तीसुंदरि त्याप्रती वश कधीं होणार नाहींच ती,
प्रेमाचा सुकटाक्ष लभ्य न तिचा त्या मंदभाग्याप्रती ॥ १८ ॥

वसंततिलका.

आलस्य जे हनन कष्टबळें करीती, आत्मोन्नती उपकृती चिर आदरीती;
जे संकटांत पडती उपयोगि अन्यां, त्यां कीर्तिमंदिर मिळे रमण्यास धन्यां.
माहेर हें प्रिय असे जणु शांततेचें, सौख्या उणें कधिं नसे चिरकाल सांचें;
व्हावा रिघाव असल्या सुखद स्थलांत, देहास कष्ट दिधले बहु पाहिजेत.

शार्दूलविक्रीडित.

कीर्तीमंदिरिं सन्निविष्ट जनहो! होणें कुणाला नको?
कोणाला सुखसागरांत डुबणें स्वेच्छेंकरूनी नको?
भोगाया रतिसुन्दरीसम बरें स्त्रीरत्न कोणा नको?
सांगा स्वार्थ परार्थ आणि सुखदा सत्कीर्ति कोणा नको?॥ २१ ॥
चित्तापासुन पाहिजे सकळिकां सौख्यत्रयी ही सदा,
तत्प्रीत्यर्थ परंतु यत्न करणें कोणा नको सर्वदा;

गेलेली घटिका पुन्हां परतुनी येणार नाहीं कधीं,
हें जाणून तरी करा सुजनहो! उद्योग नानाविधी ॥ २२ ॥
उद्योगीं रत जो असे निशिदिनीं निष्कामचित्तें महा,
वारंवार परोपकार करितो सर्वांवरी जो पहा;
विद्येनें स्वसुधारणा करुन जो साधील देशोन्नती,
कीर्तीसुंदरि माळ घालुन तया नेईल मुक्तीप्रती ॥ २३ ॥

## आर्यमातेचा शोक.

शार्दूलविक्रीडित.

सिंहासादृश शूर धीट मम ते सत्पुत्र गेले कुठे?
ज्यांनां पाहुनि पारणें सकल या नेत्रद्वयांचें फिटे!
गेले होउनि सर्व ते अतिबली देशाभिमानी खरे!
काळाच्या जबड्यांत तेहि पडतां आतां न कोणी उरे! ॥ १ ॥
पूर्वींच्या मम वैभवा अनुपमा बाई मनीं आणितां,
सध्यांची अति शोचनीय असली हीन स्थिती पाहतां;
रेषा मद्विधिची नसे उमटली लागे ह्मणावें मला!
लाधावी विषवल्लिंतूनि मधुरा केवीं सुधा निर्मला? ॥ २ ॥
आहे सांप्रत कालचक्र फिरलें! गेली सुनीती लया,
गेला धर्म रसातळास अवघा कोठें न थारा तया!
गेलें साहस, धैर्य, शौर्य, विलया द्रव्योदधी आटले,
तें सारें अजि नामशेष उरलें! जें म्यां स्वतः पाहिलें! ॥ ३ ॥
द्रव्याच्या सरिता झराझर जिथे होत्या सदा वाहत,
कोणा छत्रपतीहि एक न मिळे हा! हा! तिथें सांप्रत;
अन्नाच्या असती जिथें पडत त्या राशी महा दिव्यशा,
सर्वांचीच तिथें अजीं कशि असे अन्नान्न झाली दशा! ॥ ४ ॥

जेथें केवळ दानशौर्य सहजीं होतें अहा गाजत,
दुर्दैवें अपहार बुद्धि विलसे तेथें अतां शाश्वत !
जेथें शूरपणा अनंत समरीं शत्रुप्रती दीपवी,
तेथें भीरुपणा कमाल करुनी देशास ह्या लाजवी ! ॥ ५ ॥

---

## श्मशानशांतता.

दिंड्या.

उग्र भसुर हे उंच शैल नाना, सौम्यतेनें बघतात शवस्थाना;
निश्चलत्वातें अखिल पवन सेवी, महासागरगांभीर्य असे जेवीं ॥१॥
परी याहुनिही थोर शांततेंत, स्वस्थ ऐक्यें असतात समाधींत !
श्मशानाच्या अति लांब अंगणीं या, येई येथें जणुं शांतता रमाया ॥२॥
चंद्रसूर्याची गरज तिला नाहीं, दुःखशोकाचें अशुभ तिला नाहीं,
अंतकाची तिज भीति मुळीं नाहीं, मनोव्याधी कसलीहि तिला नाहीं ॥३॥

---

## प्रणयकलह.

वसंततिलका.

एकीकडे कर तुझ्या अधरांस बाले ! मिथ्यानुरागि मृदुभाषण ज्यांहिं केलें;
होऊं नको प्रियसखे ! स्वमनांत कष्टी, लावूं नको मजकडे तव शांत दृष्टी.
ज्यांचे कटाक्ष मज बांधुन मोहपाशीं, होते बळें करित नम्र तुझ्या पदाशीं;
ते नेत्र तूं मजकडे किति लावशील ? प्रेमार्द्र त्यांप्रति किती करशील ? बोल.
कांहीं असो. कवळुनी मजला परंतू—होतीस घेत शतधा मम चुंबनें तूं !
जा ! आण तीं त्वरित सुंदर चुंबनें गे ! माझीं मला परत दे चल ये शुभांगे.
तीं चुंबनेंच कुलुपें प्रणयास होतीं ! यासाठिं जा ! परत दे मज आणुनी तीं ;
ज्यां प्रेमही तुज दिलें, परि तूं कशाला, गे ! घातलें कुलुप चुंबनरूपि त्याला?

## वृद्धप्रणयी.

लावणी ( चाल 'नको नको गे ! साहस ऐसें' ).

जाणारचि तूं मग सोडुनि गे !, काय मला सुंदरीं ?
लाजेकाजेसाठीं "छे ! छे !, नाहीं !" ह्मण तूं तरी ! ॥ध्रु०॥
तव विरहानें व्याकुळ आणी, खिन्न मनीं होउनी,
एके दिवशीं जाइन सखये ! भूतल मी सोडुनी !
मन्मृत्यूच्या अपकीर्तीचें, खापर परि तव शिरीं,
फुटेल ! तेणें दूषित सखये !, होशिल भुवनांतरीं !
जाणारचि तूं मग सोडुनि गे ! काय मला सुंदरी ?
लाजेकाजेसाठीं "छे ! छे !, नाहीं !" ह्मण तूं तरी ! ॥ १ ॥
श्रीमंतीच्या डौलामध्यें, आपण दोघेंही असतां !
दुःखाचे गिरि तसे आपल्या, सुखमार्गा रोधितां,
जडलें ज्याचें तुजवर अढळ, प्रेम असे सुंदरी !
परिणय झाल्यापासुनि आहे, वास करित अंतरीं.
जाणारचि तूं मग सोडुनि गे ! काय मला सुंदरी ?
लाजेकाजेसाठीं "छे ! छे !, नाहीं!" ह्मण तूं तरी ! ॥ २ ॥
"मजला सोडुनि कधिंही सखये ! तूं नाहीं जाणार !
दुःखाची मग धाड पडो वा, न पडो अंगावर !"
ह्या आशेनें ज्यानें तुजला, ठाव दिला अंतरीं,
त्या मजला कां सोडुनि जाणें, योग्य दिसे तुज तरी !
जाणारचि तूं मग सोडुनि गे ! काय मला सुंदरी ?
लाजेकाजेसाठीं "छे ! छे !, नाहीं !" ह्मण तूं तरी ! ॥ ३ ॥
ज्यानें तुजवर स्वप्राणांहुनि, अधिक लोभ ठेविला,
झिडकारुनि कां टाकिशि सखये ! रागे तूं त्याजला !
अहा ! अहा ! हा ! किति निष्ठुर तूं, झालिस गे ! अंतरीं !
उपमा नाहीं इहलोकीं ह्या, तव नैष्ठुर्या तरी !
जाणारचि तूं मग सोडुनि गे ! काय मला सुंदरीं ?
लाजेकाजेसाठीं "छे ! छे !, नाहीं !" ह्मण तूं तरी ! ॥ ४ ॥

# हरि कृष्ण दामले.

हे प्रसिद्ध ग्रंथकार व कवि भोर संस्थानांत रावडी येथें इ. स. १८५४ ह्या वर्षाच्या सुमारास जन्मले. ह्यांचा विद्याभ्यास पुणें येथें कै. वा. बाबा गोखले ह्यांच्या शाळेंत झाला. नंतर यांनीं बरींच वर्षेंपर्यंत खानदेशांत व पुणें येथील 'न्यू इंग्लिश स्कुलां'त शिक्षकाचें काम केलें. नंतर हे कवि वरील शहरीं 'नवीन किताबखान्या'चे व्यवस्थापक ह्या नात्यानें उद्योग करूं लागले. तसेंच ' डेक्कन एज्युकेशन सोसायटी व ' डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी' अशा दोन संस्थाचे सभासद या नात्यानेंहि त्यांनीं चांगलें काम कल आहे. विद्यार्थी असतांनाच ह्यांना कविता रचण्याचा नाद लागला. ह्यांनीं 'पार्वती प्रकोप' नांवाचें एक काव्य केलें असून तें प्रसिद्ध आहे. ह्यांची कविता साधी, सरळ व सुरस आहे.

## मातृविलाप

वसंततिलका.

शोका करी जननि तों प्रिय बालकाच्या ;
दुःखास पारच नस किमपी तियेच्या-
'बाळा !' ह्मणे 'त्यजुनियां मजला त्वरेंच
गेलासि काय ! तव माय अभागि साच ! ॥ १ ॥
मी कासयास जगलें ? मज काय आतां,-
वांचूनि येथ करणें प्रिय पुत्र जातां ?
केलें त्वदर्थ नवसां बहु बाळका ! रे,
त्यांचाच काय परिणाम अघोर हा रे ? ॥ २ ॥

मालिनी.

मधुर अमृततुल्या बालका रे त्वदुक्ति !
किति तरि वदनीं त्या शोभल्या दंतपंक्ति !

मुखकमल तुझें तें काय झालें अहाहा !
हरि ! मजवरि कैसा कोप केला महा हा ! ॥ ३ ॥
स्तनिं बहुतचि पान्हा पाजुं कोणास आतां !
परिसासि नच कारे ? बाहते तूज माता !
विपरितचि कसें हें जाहलें आजि देवा !
हर हर ! बहु दैवा साधिला आजि दावा ! ' ॥ ४ ॥

द्रुतविलंबित.

तडफडोनि उठे मग माय ती, हृदय ताडुनि घे बहु ते सती;
श्रमुनि तों पडली धरणीवरी, विकळ मूर्च्छित कोणि न सांवरी ॥५॥

## पतिविलाप.

शार्दूलविक्रीडित.

स्त्रीचा शोक करीत कोणि बसला, बोले–'प्रिये कामिनी !
कैशी घातक जाहली तुजसिं गे ती निर्दया यामिनी !
मोठा दुर्गम नाकपंथहि तुवां कैसा त्वरें कंठला ?
वाटे फारचि हें मनीं नवल कीं अत्यंत तूं कोमला ! ॥ १ ॥

मंदाक्रांता.

नाहीं झाला सुसह तुजला मद्वियोग क्षणाचा !
कैसा आतां त्वरित विरला स्नेह तो अंतरींचा ?
वाटे आला मम कटुवचें कोप गे त्वन्मनाला !
टाकीं त्यांते सुमुखि सखि ! दे गाढ आलिंगनाला ! ॥ २ ॥

इंद्रवज्रा.

हाहा ! प्रिये ! टाकुनियां प्रियाला, जावें न तूं ! मी नच विप्रियाला ;
केलें तुझ्या ! जाणसि तूं नयाला, सौख्यांस आतां मिळणें न याला ॥३॥

मालिनी.

सुमुखि उभि पुढेंशी मोहिं भासे तयाला,
ह्मणवुनि परिरंभा द्यावया सिद्ध झाला ;
परि सकळ निराशा ! मात्र तें दुःख त्याला,
द्विगुणित गमलें हो शीणहि व्यर्थ झाला ॥ ४ ॥

वसंततिलका.

' ते मंद मंद मृदु बोल तुझे सुखाचे,
आतां कसे मिळति सांग तुझ्या मुखाचे ?
प्राणेश्वरी ! मज कशी तव भेट आतां ?
हे प्राण आज नच राहति सत्य जातां ॥ ५ ॥

दिंडी.

दीप सौख्याचा मालवला आजी ! क्रमूं कैसा हा काळ तमामाजीं ?
शब्द सौख्याचे बोलुं कुणासंगे ? तुला आठवितां हृदय सखे भंगे ॥६॥

मालिनी.

स्मित करुनि सुहास्या तोषवीलें मनातें,
प्रिय पुरवुनि शब्दीं इच्छितां कामना ते;
विधि बहुतचि झाला निर्दय स्पष्ट काय ?
करिलचि विरहाग्नी वाटतें दग्ध काय ! ॥ ७ ॥

---

## पत्नीविलाप.

द्रुतविलंबित.

तंव नितंबिनि शोक करी,–'पती !
त्यजुनिया मज, मुक्ति तुह्मास ती ;
प्रिय कशी गमली असतीच ! हा
जिवलगा ! ममता सरली अहा ॥ १ ॥

शार्दूलविक्रीडित.

तातानें मजला करीं तुमाचिया आणोनियां घातलें
विश्वासें, करणें मशीं कपट हें कैसें बरें वाटलें ?
पाहूं आजि कुणा तुह्माविण ? मला हें शून्यसें भासतें,
सर्वस्वें जग ! कासयास जगणें आतां अभागीस तें ॥ २ ॥

भृंगावीण कशी तरी कमलिनी पावेल सौख्याप्रती ?
पद्माची उदकाशयाविण पुढें सांगा गती कोणती ?
जैशी निष्प्रभ यामिनी शशिविणें, पृथ्वी नरेंद्राविणें,
तेवीं व्यर्थ पतीविणें पतिपरेलागीं जगीं वांचणें ॥ ३ ॥

प्रासादीं जरि एकही न वसतो, प्रासाद तो कासया ?
कासारीं जलबिंदु लब्ध न तरी, कोणी न मानी तया;
सेना व्यर्थ, तिला जरी पति नसे धैर्या रणीं द्यावया,
उद्यानीं सुफलें किमर्थ ?–न जरी कोणी रुची घ्यावया ॥ ४ ॥

द्रुतविलंबित.

मजकडूनि नसे तिळ दोषही;
प्रिय अशी ललना त्यजण्यास ही.
सवत मुक्ति कशी पडली गळां;
पडत कामिनि बोलुनि विव्हळा ॥ ५ ॥

झणि उठोनि वदेहि–'पती ! पती !"
बहुत मोहभरें मग ते सती.
पति कुठेंहि दिसे न घरेंवरी,
मृत अशी पडली मग सुंदरी ! ॥ ६ ॥

# कीर्तनकेसरी नारायण कृष्णाबुवा सुपेकर.

कीर्तन केसरी नारायण कृष्णाबुवा सुपेकर उर्फ नानाबुवा बडोदेकर यांचा जन्म बडोदें येथील सुप्रसिद्ध साधुवर्य श्री आप्पा महाराज यांच्या कन्यावंशांत शके १८०० आषाढ वद्य ३० ला झाला. हे ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण असून यांचे वडील श्रीमद्भागवताचें पुराण चांगल्यापैकीं सांगणारे, तसेंच कीर्तनही चांगलें सुश्राव्य असें करणारे होते. त्यांचे जवळ यांचा थोडेबहुत पंचकाव्य शिकून कीर्तनाचा पण अभ्यास झाला. यांचा कीर्तनाचा अभ्यास यांच्या वयाच्या ६ व्या वर्षापासूनच आहे. हे आपल्या वयाच्या सोळावे वर्षी साजंदे ( साथीदार लोकांना ) बरोबर घेऊन नवसारी, अमदावाद, सिद्धपुर, वगैरे ठिकाणीं फिरून आले. पुढें यांचे वडील यांच्या वयाच्या २२ वर्षी निवर्तल्यामुळें यांनीं आपल्या श्वशुराजवळ वेदान्तशास्त्राचें सतत ८–१० वर्षे अध्ययन करून कीर्तनाला फार चांगलें स्वरूप आणलें. यांचे गुरु महोपदेशक श्री प्रल्हाद महाराज ज्ञानेश्वरीवाले, मोठे सत्पुरुष असून न्यायशास्त्र आणि वेदान्तशास्त्र यांत निष्णात आहेत. तसाच ज्ञानेश्वरीचाही व्यासंग त्यांचा मोठा दांडगा आहे. अशा सत्पुरुषाच्या समागमामुळें यांचें आचरण अत्यन्त पवित्र असल्यामुळें यांच्या वक्तृत्वाचा समाजावर चांगला परिणाम होतो. यांचे वडील बंधु गायनकलाकोविद दादाबुवा हे कीर्तनप्रसंगीं मागें बसून यांना सुंदर साथ करितात. यांचें कंठमाधुर्य आणि बुवांचे वक्तृत्व, हें पुरुषयत्नानें संपादन केलेलें नसून परमेश्वराच्या देणगीपैकींच ही एक या दोघा बंधूंना देणगी आहे असें म्हणावें लागतें. कीर्तनद्वारा समाजांत स्वधर्मजागृती करणें हा एक यांचा मुख्य बाणा असून अत्यन्त सुलभ भाषेंत अनेक व्यवहारांतील चटकन् आबालवृद्धांना पटतील असे दृष्टान्त देऊन कठिण असा वेदान्तविषय फारच सोपा करून सांगण्याची यांची पद्धत मोठी अभिनंदनीय आहे. यांनीं महाराष्ट्रांतील बहुतेक सुप्रसिद्ध शहरांतून पर्यटण केलें असून, बडोदा, नागपुर, आकोला, त्र्यंबकेश्वर, पुणे, सोलापुर, कोल्हापुर, इत्यादि शहरांतून त्यांस विद्वानांकडून मानपत्रें मिळालीं आहेत. तसेंच श्रीकरवीर पीठाकडून 'कीर्तनकेसरी' आणि श्रीमंत सयाजीराव गायकवाड

यांचेकडून 'कीर्तनभूषण' आणि तंजावर येथें लोकसमाजांकडून 'कीर्तनाचार्य' अशा अनेक पदव्या व सुवर्णपदकें त्यांस मिळालीं आहेत. यांनीं हरिद्वारापासून थेट रामेश्वरापर्यंत प्रवास करून ठिकठिकाणीं कीर्तनें केलीं. त्यामुळें सुप्रसिद्ध कीर्तनकारांपैकीं हे एक कीर्तनकार आहेत. यांनीं कीर्तन प्रसंगीं लागणाऱ्या कांहीं कविता आणि पद-पदान्तरें बरींच केलीं आहेत. यांचीं पदें प्राचीन चालीवर असून भक्तिरसानें परिपूरित आहेत. यांनीं ' पूर्वरंग समुच्चय भाग पहिला आणि भाग दुसरा ' असे चारशें चारशें पानांचे दोन ग्रंथ केले असून त्यांतही यांच्या कांहीं कविता आहेत. त्यांपैकीं थोड्या येथें दिल्या आहेत.

---

## परमेश्वर चिंतन.

(पद. १)

( चाल--निजरूपीं जगदाकृति भासा० )

सकळ कळें, हरिलीला नकळें ।
शास्त्र मनुज जरि शिकला सगळें । धृ ।
चतुरानन शेषादिक शिणले ।
वेदकदंबा मौनचि पडलें । १ । सकळ कळें० ।
रवि शशि अनलाला भय आगळें ।
ज्या भययोगें यमवायु पळे । २ । सकळ० ।
तो श्रीहरि भक्तीनें आकळे ।
व्यासादिक ग्रंथांतरिं वदले । ३ । सकळ० ।
हें गुज प्रल्हादानें कथिलें ।
भक्तिस नारायण मन वळलें । ४ । सकळ० ।

---

## जगाची अशाश्वता.

पद हिंदुस्थानी.

झुटी दुनीया रे बाबा, झुटी दुनीया रे बाबा । धृ ।
ये दुनियेमें, बहोत हुये, पन, मरगये रह्या न कोई ।
एकदिन तूभी चले जायगा सुन सुन मेरे भाई । १ । झु० ।

हत्ती घोडा महाल मुलुख सब, औरत सुत धन मेरा।
मेरा मेरा मतकर बाबा, उसमे कछु नहि तेरा। २। झु०।
जिस देहनकु मेरा कहता, ओभी नहि सुन् तेरा।
पंचभूतका बनाहुवा हय नजीक जमका डेरा। ३। झुटी०।
देहोकों अभिमान नरककूं कारन, मुनिजन कहते हय।
तनके खातर कामिनि सुतकीं, चिंता करकर मरते हय। ४।
तनकी ममता छुटी समजना, तब छूटी सब माया।
आत्मग्यान बिन् नहीं छुटेगी, बंदनकर गुरु पाया। ५।
नारायण कहता हय श्री, प्रल्हाद गुरूका चेला।
सबके आपन सबहि आपके, झूटबात तुम् अकेला। ६।
झुटी दुनीयारे बाबा, झुटी दुनीयारे बाबा। धृ०।

---

## दामाजीपंत चरित्रांतील प्रसंग.

कथानक-( श्रीपांडुरंगानें दामाजीपंतासाठीं महाराचा वेष घेऊन वेदरपूरच्या राजाशीं भाषण केलें तें )

### पद.

( चाल-महार लोक जोहार ह्मणतात त्या चालीवर. )

जोहार मायबाप जोहार महार मी मंगळवेढ्याचा।
महार मी मंगळवेढ्याचा।
बंदा गुलाम चाकर आहे पंताच्या घरचा। जी। धृ०।
काय वानु मी गून धन्याचे असा नाहीं कोनी।
जगामदी असा नाहीं कोनी।
विठोबाची भक्ति ज्याला जन्मापासोनी॥
अधिकाराचा गर्व न ज्याला सर्वांसी मिळुनी।
वागतो सर्वांसी मिळुनी।

सोलापूर परतांत[1] ऐसा सुबा[2] नाहिं कोनी ॥
समद्यांचा मी चाकर नाहीं चाकर एकाचा ।
बंदा गुलाम चाकर आहे पंतांच्या घरचा ॥ १ ॥

बारा वरस दुकाल पडला अन्न नाहिं लोकां ।
खाया अन्न नाहिं लोकां ।
मोठे मोठे परान सोडुनि गेले परलोका ॥
अशा दुकालीं सरकाराचा [3]कीरत चहुं मुलुखा ।
व्हावी कीरत चहुं मुलुखा ।
म्हनुन त्यानीं धान्य लुटविलें काय आला धोका[4] ॥
लेकापरि जो जनां वागवी तोच धनी साचा ।
बंदा गुलाम चाकर आहे पंतांच्या घरचा । जी ॥ २ ॥

भक्ताचा छळ करुनि जगामदिं कोन सुखी झाला ।
सांगा कोन सुखी झाला ।
मायबाप मी खर सांगतय तुमच्या पायाला ॥
देव ज्याला साहाय देई कोन दुःख त्याला ।
देई कोन दुःख त्याला ।
सरकाराशीं अधिक बोललों क्षमा व्हावि मजला ॥
नारायन हा स्री गुरु परलादाच्या पायाचा ।
बंदा गुलाम चाकर आहे मंगळवेढ्याचा ॥ ३ ॥

---

१ प्रांतांत २ सुभा ३ कीर्ति ४ तोटा ५ श्री ६ प्रल्हादाच्या.

## शंकराचार्य-परकायाप्रवेश

( **कथानकः**-श्रीमदाद्यशंकराचार्यांनीं परकायाप्रवेश केला त्या वेळेस गवयांच्या वेषानें त्यांचे शिष्य हस्तामलक व पद्मपाद यांनीं श्रीपुढें गायन केलें तो प्रसंग. )

### पद.

( चाल—अवन करो तुमचें० )

कळली तरि न टळे, प्रारब्धाची गति ही न कळे ।
कळली तरि न टळे ॥ ध्रु० ॥

पूर्ण विरागी जो प्रभु शंकर, जाळी मन्मथ अनलें ।
तो गिरिजापति भिल्लिणिला वश होतां यशहि मळे ॥ १ ॥

प्रारब्धाची गति ही न कळे, कळली तरि न टळे ॥ ध्रु० ॥

चतुरानन तो बहुत चतुर परि कन्येशीं मन रमलें ।
विश्वामित्र पराशर मोठे सुरगुरु तेही फसले ॥ २ ॥
नच फसले या कामीं ऐसे शुकमुनि एकचि दिसले ।
तद्वंशज यतिराज तसा परि आज असें कां झालें ॥ ३ ॥

### अनुष्टुप्.

वाक्य हें पडतां कानीं, राजा व्यामोह पावला ।
कोण तो यति ऐसा रे, सत्वरी सांग तूं मला ॥

( चाल—वरील पदाची )

श्रीमच्छंकर नाम यतीश्वर मोठे परि ते फसले ।
कार्यपराङ्मुख होउनि ऐसे त्रिपरित हें मानवलें ॥ ४ ॥

स्मृति कार्याची होतां तत्क्षणिं नारायण मग बोले ।
सोडुनि तनुला गेला यतिवर, दुःख बहू ओढवलें ॥ ५ ॥
शंभर युवती धांवुनि आल्या पाहती तंव शव पडलें ।
आतां आम्हीं काय करावें दैव कसें हें फिरलें ॥ ६ ॥
आपुल्या देहा स्वीकारुनि यति मंडणनगरा आले ।
श्रीगुरु प्रल्हादाच्या बोलें नारायण हा बोले ॥ ७ ॥
प्रारब्धाची गति ही नकळे, कळली तरि न टळे ॥

---

## ( रामायण अयोध्याकाण्ड )

( कथानकः—श्रीरामराज्याभिषेकाची अयोध्येंतलि धामधूम. )

### पद.

( चालः—प्रगटलें गोकुळीं परब्रह्म आज गे. )

सोनियाचा दिवस आजी, जन करी उत्सवाला ।
दशरथ राय करी अभिषेक राघवाला ॥ ध्रु० ॥
झाडोनियां गृहांगण, सडा शिंपित चंदन ।
रंगवल्ल्यादि काढून, शोभवी घराला ॥ १ ॥ सोनिया० ॥
दारिं तोरणें बांधिती, गुढ्या उंच उभारिती ।
केव्हां पाहूं सीतापति, आनंद मनाला ॥ २ ॥
वेदमूर्ति विप्र भले, शास्त्री ज्योतिर्विद आले ।
राजमंदिरीं जमले, म्हणती झाली वेळा ॥ ३ ॥
चतुरंग सेना भारी, उभी सर्व महाद्वारीं ।
वाद्य वाजे नानापरी, गुरु वसिष्ठ आला ॥ ४ ॥
कृष्णसुत नारायण, ह्मणे मी तों धन्य धन्य ।
रामगुण गाया जन्म, झाला या देहाला ॥ ५ ॥

( कथानक--राज्याभिषकाचे पूर्वरात्रीं जानकीला पडलेलें स्वप्न ती आपल्या सखीजवळ सांगते. )

पद.

( चाल—आजि अक्रूर हा नेतो. )

मज स्वप्न असें सखे कसें गे पडलें, कधिं नाहीं असें पाहियलें ॥ ध्रु० ॥
अति घोर अशा विपिनीं आश्रम करुनी, राहिलों तिथें मोदानीं ।
आश्रमापुढें एक कनकमृग बघुनी, वदलें मीं जोडुनि पाणी ।
मनिं आस वसे याची कंचुकि करुनी, अंगांत घालुं हौसेनीं ।
चाल ॥ मग प्रभु गेले मृगयेला,
भाउजीस सोंपुनि मजला,
तों धांव शब्द ऐकियला,
नच कधीं असें मीं वदलें ॥ १ ॥ मज० ॥

तव दैवगती विचित्र दिसते वहिनी, गहिंवरें उदक ये नयनीं ।
या रेषेच्या आंत रहा बैसोनी, गेले मग अति त्वेषानीं ।
इतक्यांत पहा आला पुरुष एक सदनीं, भिक्षुचें रूप घेऊनी
चाल ॥ भिक्षा दे मजला वदला,
मी आलें तया देण्याला,
तो दूर उभा राहियला,
चुकून रेषेच्या बाहेर सखये गेलें,
त्या दुष्टें मजला धरिलें ॥ २ ॥ मज० ॥

( कथानकः--मंथरेचा कैकयीला उपदेश. )

पद

( चाल--बा काय घालिशी संसृतिचा पिंगा. )

कलिदूषित ती मंथरा ह्मणे कैकयिला ।
तव पती पूर्विचा वैरि डाव साधियला ॥ ध्रु० ॥
जन म्हणति भूपतिप्रीति कैकयीवरती ।
सत्य मी सांगतें नसे खरी वरवर ती ॥
मातुलास धाडी भरत अर्धी मागूती ।
अभिषेक करवि बघ ज्येष्ठ सुताला नृपति ॥
चाल । मज वाटे तव सुख आतां संपलें ।
अति कठिण दिवस तुजलागीं पातले ।
वांचण्यापरिस मरणें हें बहु भलें ।
किति कथूं प्राण मम आतां भागले ।
अति प्रेमा तुजवर कुठें आज तो गेला ।
तव पती पूर्विचा वैरि डाव साधियला ॥ ध्रु० ॥

( कथानकः—कैकयीची शोचनीय स्थिति पाहून राजाचें भाषण. )

पद

( चालः—ह्मणे राधा हरिस सोड शरम शरम )

सुदिन उदय होउनि आजि, दुश्चित तव सुमन सुमन सुमन सुमन ॥ ध्रु० ॥
सुखशय्या टाकुनियां, भूषणही फेंकुनियां ।
लोळशि भू झांकुनियां, नयन नयन नयन नयन ॥ १ ॥
भूपतिची अंतुरि तूं, इच्छिसि जें अंतरिं तूं ।
देइन वदसी जरि तूं, वचन वचन वचन वचन ॥ २ ॥

अर्पिन मत्प्राण तुला, तव प्रेमा जगिं न तुला ।
त्वद्विण जग मन्मतिला, वमन वमन वमन वमन ॥ ३ ॥
वाहतों मी रामशपथ, पुरविन तव सकल अर्थ ।
कोण नरा येइ व्यर्थ, मरण मरण मरण मरण ॥ ४ ॥
दुस्सह हा कामत्रास, शमवी त्या गुरुपदास ।
नारायण दीन दास, शरण शरण शरण शरण ॥ ५ ॥

( कथानक—कैकयीचें राजा दशरथाशीं भाषण. )

पद

( चाल—थाट माट सदनिं नवा.

दूर दूर राहिं उभा प्रेम तव पुरे ।
ठाउक मज नाहिं असा कपटि अससि रे ॥ ध्रु० ॥
वदसी मम प्राण एक तूंच मज असें ।
मधुर मधुर वदुनि मला फसविलें कसें ।
प्रेम वरी दाविसि परि कपट मनिं वसे ।
पुत्र तुझा राम भरत शत्रु तुज दिसे ।
चाल । मत्सुत मातुलगृहा, धाडुनि करि उत्सव हा ।
तव कृतिला धिक्‌ अहा, व्यर्थ जन्मलासि पहा, रविकुळांत रे ॥ १ ॥
दूर दूर राहिं उभा प्रेम तव पुरे ॥

पद.

( चाल--वंदन हे शारदे–राग काफी, ताल त्रिवट )

अधम तूं अससि रे, मज नमन करिसी ।
शिरिं चरण धरिसी, सुतमोहें मरसि रे ॥ ध्रु० ॥
अंतरा । रविकुळीं जन्मुनि, गुरुपदँ सेवुनि रे सत्यता का त्यजिसि,
अझुनि तरि समज उमज भूपा, मिळे निरयगति अधम तूं अससि रे०

( कथानक— श्रीरामरायाचें कैकयीशीं भाषण. )

पद

( चाल—अवन करो तुमचें. )

सांग मला तूं माते, काय तुला वर दिधला तातें ॥ ध्रु० ॥
तातवचन संरक्षण करणें, हें व्रत या रामाच ।
प्राणार्पण मी करिन पित्यास्तव, विष घेइन या हातें ॥ १ ॥
मम जननी कासल्या टाकिन, टाकिन मत्प्रियकांता ।
ताताधिक प्रिय कांहिं न जगतीं, राज्य नको घे तूतें ॥ २ ॥
ब्रह्मसनातन रामदयाघन, कैकयिला बहु विनवी ।
नारायणमनिं ऐसें वाटे, कां ही हरिला शिणवी ॥ ३ ॥

( कथानकः—मरणकालीं दशरथानें रामाचा केलेला धांवा. )

पद

( चालः—भजावा राम मेघश्याम० )

श्रीरामा घनश्यामा सौख्यधामा भेट दे रे ।
कमलनयना कुंदरदना, असुरदमना ये रे ये रे ॥ ध्रु० ॥
सुमित्रेला सुमंताला पुसे राजा राम कोठें ।
स्त्रिया रडती शाप देती दुष्ट म्हणती कैकयीला ॥ १ ॥
काय केलें कसें झालें ज्ञान गेलें कुठें माझें ।
लोक हंसती स्त्रण म्हणती व्यर्थ जगतीं जन्मलों मी ॥ २ ॥
एक वेळां भेट बाळा प्राण गोळा होति माझे ।
नेत्र फिरती स्मृती जाते अंक देती मंत्रिवर ते ॥ ३ ॥
रामवाणी वदुनि वदनीं तनु त्यजुनी भूप गेला ।
पांडुरंगा दे सुसंगा करीं भंगा दुष्ट कामा ॥ ४ ॥ श्रीरामा.

## रुक्मिणीस्वयंवरांतील प्रसंग

( **कथानकः**—श्रीरुक्मिणी शिशुपालाला देण्याचें ठरलें त्या वेळीं एकांतांत रुक्मिणीचें सखीशीं भाषण. )

### पद.

( **चालः**—अवन करो तुमचें० )

काय करूं मी सखये, सांग मला तूं माझी माये ॥ ध्रु० ॥
मम वैरी हा रुक्मीदादा, ऐकेना कवणाचें ।
सिंहभाग श्वानाला देणें, करणें हें नच न्याये ॥ १ ॥
हंस कुठें वायस तो कोठें, कोठें ताक सुधा ती ।
मदनमनोहर यदुविर टाकुनि, चेदी कसा मन्मनिं ये ॥ २ ॥
भक्तकृपानिधि जगिं अवतरला, पांडुरंग या नांवें ।
तेंचि रूप गुरु प्रल्हादाचें, नारायण नमि भावें ॥ ३ ॥
सांग मला तूं माझी माये, काय करूं मी सखये ॥ ध्रु० ॥

---

## कृष्णशिष्टाईंतील प्रसंग

( **कथानकः**—शिष्टाईच्या वेळेला श्रीकृष्णाचें धृतराष्ट्राशीं भाषण )

### पद

( **चालः**—थाटमाट सदनिं नवा० )

पांडुतनयपक्षपाति कृष्ण वदतसे ॥ ध्रु० ॥
राज्यासनिं अधिष्ठित, पांडव ते विपिनिं फिरत ।
पुत्र तुझा राज्य करित, न्याय हा नसे ॥ १ ॥
थोर कुलीं जन्मलासि, ज्ञानी तूं योग्य होसि ।
सुतमोहें गुंतलासि, लागलें पिसें ॥ २ ॥

अर्धराज्य त्यां देणें, तव हस्तीं नच घडणें
ग्राम पंच हें म्हणणें, देइं त्यां कसे ॥ ३ ॥
मान्य होय हें तुजला, यश येइल तरि मजला।
नाहिं तरी नाश कुळा, ठेविला असे ॥ ४ ॥
ऐकुनियां कृष्णवचन, सर्व सभा धरित मौन।
नारायण पुढें करुन, प्रल्हाद कथितसे ॥ ५ ॥
पांडुतनयपक्षपाति कृष्ण वदतसे ॥ ध्रु० ॥

( **कथानकः**—श्रीकृष्णानें धृतराष्ट्राच्या सभेंत विराट् रूप धारण केलें तें शांत होण्याबद्दल भीष्मादिकांनीं केलेली स्तुति. )

## पद

( **चाल**—श्रीक्षेत्र कृष्णातीरीं. )

श्रीमंत, रुक्मिणीकांत, होइं तूं शांत,
न पाहीं अंत कृपा करिं आतां।
साष्टांगप्रणति तव चरणिं असे भगवंता ॥ ध्रु० ॥
तूं एक, असूनि अनेक, दिससि मायीक,
श्रुतिस्मृति भाक, देति तव नाथा। साष्टांग० ॥ १ ॥
जो काळ, तयाचा काळ, तूंचि जगपाळ,
करीं सांभाळ, विरंचीताता। साष्टांग० ॥ २ ॥
तूं असें, जगाला कसें, लाविलें पिसें,
कांहिं ना दिसे, दिसे धन कांता। साष्टांग० ॥ ३ ॥
श्रीरंग, देइ सत्संग, करी भवभंग,
न ठेवी व्यंग, निवारी चिंता। साष्टांग० ॥ ४ ॥
गुरुवरद, पंत प्रल्हाद, करी सद्बोध,
देइ स्वानंद, सुख श्रीकांता। साष्टांग० ॥ ५ ॥

# वामन दाजी ओक

हे कवि इ. स. १८४५ त रत्नागिरी जिल्ह्यांतील हेदवी गांवीं जन्मले. यांचे वडील दाजी काशीनाथ ओक हे हेदवी गांवांतील मूळ रहिवासी असून तेथलि संभावित गृहस्थांत ते मोडत असत. कै. वामनराव यांचा लहानपणचा अभ्यास घरींच पंतोजींच्या हाताखालीं झाला. पुढें वडिलांनीं त्यांस रत्नागिरी येथें इंग्रजी शिकण्यास ठेवलें. त्या वेळीं तेथील हायस्कुलावर डा. रामकृष्ण गोपाळ भांडारकर हे हेडमास्तर होते. त्या शाळेंत वामनरावांचा म्याट्रिकपर्यंत अभ्यास झाला. सन १८७० त म्याट्रिकच्या परीक्षेंत ते उत्तीर्ण झाले, व त्या वेळीं संस्कृत भाषेंत त्यांची प्रगति चांगलीच दिसून आली. पुढें त्यांनीं मुंबईंतलि एलफिन्स्टन कॉलेजांत व वुइलसन कालेजांत कांहीं दिवस अभ्यास केला, पण कांहीं विशेष कारणास्तव त्यांस पुढलि विद्योपक्रम सोडून द्यावा लागला. पुढें १८७५ त त्यांनीं नागपूर येथील सिटी स्कूलमध्यें उपगुरूची नोकरी पतकरली. त्याच शाळेंत पुढें ते हेडमास्तरच्या जागेपर्यंत चढले. सन १८८४ त ते मराठी मेल नार्मल स्कूलमध्यें सुपरिंटेंडेंटच्या जागेवर गेले. तेथें कांहीं दिवस काम केल्यावर संबळपूर येथील हायस्कुलांत हेडमास्तरच्या जागेवर ते गेले. १८९१ त रायपुर हायस्कुलांतलि हेडमास्तरच्या जागीं त्यांची बदली झाली. तेथें ते शेवटपर्यंत होते. वामनराव हे एक उत्तम शिक्षक होते, तसेच उत्तम लेखक होते. निबंध लिहिण्याचा नाद यांस बालपणापासून होता. यांची भाषा भारदस्त असे. इंदुप्रकाशांतून प्रसिद्ध होत असलेल्या सरलार्थबोधिनीचे तसेंच काव्येतिहाससंग्रहाचे ते कांहीं काळ संपादक होते. श्रीमन्माधवनिधन, गणपतिनिधनविलाप, कादंबरीकथासार, कृष्णाकुमारी इत्यादि यांनीं लिहिलेलीं काव्यें रसिकमान्य झाला आहेत. काव्यसंग्रहाकारितां तर त्यांनीं आपलें सर्वस्व अर्पण केलें होतें. हे रसिक व विद्वान् कवि सन १८९७ च्या जून महिन्यांत नागपूर येथें दिवंगत झाले.

# कवि व कविता

आर्या

वैरल्यें कवि निपजे, सुख रसिकां जेविं शर्करा जीवा,
निज कृतियोगें देई, तोष करी जेविं अर्क राजीवां ॥ १ ॥
रिझवी सानां थोरां, नाचवि मोरांस जेविं मेघ रसें,
तैशी कविकृति तोषवि रसिकवरां, ती रसां गमे घरसें. ॥ २ ॥
रमणा रमवी रामा क्रीडा करितां रसाळ उक्तीनें,
तद्वत्कवितावनिता रसिकां नवरस–विलास–युक्तीनें. ॥ ३ ॥
हरवी ग्लानि मनाची; नुरवी आधींस, सर्व ताप सरे,
सेवाया रस ऐसा रसिकांचा सांग कां न 'आ' पसरे ? ॥ ४ ॥
व र्या सरसा सरला शुद्धा सार्था मनोहरा वाणी,
कवितेंत फार साजे, नादेल तिथें कशी तिची वाणी ! ॥ ५ ॥
परम गमे भाग्य तिचें कविहीरा जी महासती प्रसवे,
पंतजननिसाम्यातें कविसू विरलाच पावती प्रसवें. ॥ ६ ॥
सरसा सालंकारा सुपदन्यासा सुवर्णमय मूर्ती,
आर्या तथाहि भार्या गुणहीनाला करी न बा वर ती. ॥ ७ ॥
अति रम्य काव्य असतां तेथें दोषांसि शोधितो पिशुन,
अति रमणीय शरीरीं व्रण शोधी जेविं मक्षिका टपुन. ॥ ८ ॥
करबदरसदृश निखिला भुवनतला यत्प्रसाद लाभानें,
पाहति सूक्ष्ममति कवी; वाग्देवी ती सुवंद्य होय जनें. ॥ ९ ॥
ते वंद्य ते महात्मे, त्यांचें यश लोकिं राहतें अचल.–
ज्यांनीं काव्यें रचिलीं, किंवा स्थळ त्यांत ज्यां मिळे सकल. ॥ १० ॥
कविता वनिता उत्तम होती, जरि त्या स्वयें नरां वरिती,
परि आणितां बळानें, सरसा विरसा क्षणांत कीं होती ॥ ११ ॥

## मानसिंगाचा भीमास निरोप

आर्या

जयपुरप्रभृत्य जातां वृत्त जहालें उदेपुरीं नूत्न,—
आले अन्य नृपाचे मागाया सचिव कन्यकारत्न. ॥ १ ॥
तो जोधपुरनराधिप नामें जो मानसिंग कृष्णेतें,
वांछी वरावयाला, तृप्त करायास विषयतृष्णेतें ॥ २ ॥
पाचारुनि सचिवाला प्रेषी भीमाकडे नरां कुशल,
सांगे निरोप त्यांशीं जेणें होईल लब्ध कीं कुशल ॥ ३ ॥
जाउनि भीमा सांगा माझा आधीं प्रणाम विनयानें,
लोभ असो माझ्यावरि, वागा मजशीं सदा शुचि नयानें ॥ ४ ॥
जोडाया स्नेहाला बंधन तें प्रेमबंधनापरतें
नाहीं दुसरें कांहीं, द्या तें जेथें मदीय मन रमतें ॥ ५ ॥
कृष्णा कन्या तुमची यौवनधरसेविनी नवी रमणी,
तत्कर सेवायाला पात्र असें मीच एक वीरमणी ॥ ६ ॥
प्रथितप्रतापशाली आहें मी कीर्तिधाम हे राजा,
द्यावी कन्या मातें अन्य वराला न योग्य ही भाजा ॥ ७ ॥
देतां नृपास अन्या भीमा ! होईल विघ्न संततिला,
कृति ऐशीच करावी, कीं स्तवितिल दुष्कृतघ्न संत तिला ॥ ८ ॥
भीमा ! उदेपुरेशा ! मानीं नृप अन्य तुच्छ पामर तें,
हस्तां जोडुनि येती शरण मला त्यांचि कीं त्रपा मरते ॥ ९ ॥
संग्रामीं माझ्याशीं कोणी अद्यापि बा न ते टिकले,
पाटीरकस्तुरीचे होती राजे न लावुनि टिकले ॥ १० ॥
मजला जरी न देतां अन्याला द्याल या कुमारीला,
जाणा तरि मग तुमच्या माझी पृतना हरील राज्याला ॥ ११ ॥
कार्य न होतां माझें, योद्धे अमुचे रणास वरतील,
हरितिल तुमची कीर्ती, भट तुमचे अश्रुपात करितील ॥ १२ ॥

कृष्णेला देतां मज, जामाता हें तदां असे नातें,
उभय कुळाला भय मग अरिपासोनी कदां असेना तें ॥ १३ ॥
आहें प्रबळ नृपति मी, दुर्बल अन्यास ये न यश कांहीं,
सिंहपराभव होइल सांगा कधिं तरि बलाढ्य मशकांहीं? ॥ १४ ॥
जो नृप मत्पदिं होता, वाचादत्ता तदीय ही भार्या,
आहे विश्रुत सर्वां; सुज्ञें मोडूं नये वचा, आर्या ॥ १५ ॥
मत्पूर्व नृपा दिधली होती, मग तीच काय अन्यास,
द्यावी ? उचित न वाटे, द्यावा ज्याचा तयास कीं न्यास ॥ १६ ॥
राज्यसुखाच्या लोभें देती तनुजा धनाढ्य भूपाला,
दे सत्य करीं वचना, सेवावें त्वां कधीं न पापाला ॥ १७ ॥

शार्दूलविक्रीडित

वाचादत्त जया तुवां निजसुता केली, तयाचे पदीं,
आहें मी, मज यास्तव प्रभुवरा ! देणें चुकेना कधीं;
तो संबंध असे पदीं न पुरुषीं, चित्तीं विचारीं पहा !
देवोनी मज कन्यका मग सुखें राज्योपभोगीं रहा ॥ १८ ॥
होता पूर्वज राम एकवचनी भीमा तुझा जाणसी !
भंगाया व्रत तें न ये वद कशी लज्जा तुझ्या मानसीं ?
रे सत्यच्युत सांग कोण तरले ? सत्यें कुणा नाडिलें ?
जाणें दुष्टदुराग्रहें बहुजनां दुःखार्णवीं पाडिलें ॥ १९ ॥
मत्स्याशीं जलधींत वैर धरितां नांदेल कोणी सुखें ?
ज्ञाता तूं, तुज ठाउकें सकळही, मी काय सांगूं मुखें ?
दे कन्या, निज राज्य जीवित यशा सांभाळ भीमा नृपा !
जांवाई कर गा मला, तुजवरी होईल दैवी कृपा ॥ २० ॥
मानाला त्यजुनी जरी नरपते ! कन्या मनोहारिणी,
देशी अन्य नृपा तरीच मुकशी हा स्वच्छ मुक्तामणी !
ह्याच्याशीं समतोल कोण दिसतो ? कृष्णा सरोजेक्षणा
देवोनी उजळा करीं लवकरी भीमा स्वकीयानना ॥ २१ ॥

माझ्या या वचना न मानुनि जरी तूं वागसी अन्यथा,
थोराशीं रिपुता तरी करिशि कीं, ती त्याज्य बा सर्वथा;
यासाठीं कथितों तुला त्यजुनि या माना, न कोणाकडे,
जावें त्वां; स्वसुखार्थ ह्यांतचि असे; जातां घडे सांकडें ॥ २१ ॥

वसंततिलका

हा मानसिंग न कधीं अपमान साही!
कृष्णा न देशिल तरी गति नीट नाहीं!
काढीन चंदन पहा करितां उपेक्षा!
मानीं तशीं न इतरीं मजला अपेक्षा ॥ २३ ॥

भीमा! तुला विनवितों रिपु तूं न व्हावें,
जामातमान करुनी मग साख्य पावें;
नाहीं तरी तुजशिं वैर घडेल मोठें,
हें जाण सत्य! तिळमात्र न यांत खोटें! ॥ २४ ॥

राया! तुला कथिलि मी सुखदा सुनीती,
देऊं नको कुपतिला कधिं पद्मिनी ती;
रत्नास रत्नच मिळो! रति मन्मथाला
सेवो! नसो किमपि दूषण धातयाला ॥ २५ ॥

## राजे लोकांस दोन हिताचे शब्द

शार्दूलविक्रीडित

" राजे हो! अजि हस्त जोडुनि तुम्हां विज्ञापितों गौरवें,
" द्वेषें हानि घडे, कुबुद्धि उगवे वैषम्य वाढे जवें;
" ऐश्वर्या क्षय ये, सुभाग्य पळ घे, पुण्यास ये न्हस्वता,
" माझें ऐकुनि अल्प भाषित अहो! स्वद्वेष टाका अतां ॥ १ ॥

" टाका तो मतभेद बांधव अहो! मित्रत्व तो नाशितो,
" स्वीकारा सखिभाव अंतरिं बरा, थोरांस तो शोभतो;
" तेणें लाभ तुम्हांस एक दिवशीं होतील मोठे किती,
" सांगाया न शकें; असेंच समजा त्यांतें नसे कीं मिती ॥ २ ॥

स्रग्धरा

" रायानों ! भूपतींनों ! स्वजनसुखहिता शीघ्र काढा उपाय,
" तारा या आर्यलोकां; समजति अवघे ते तुह्मा बापमाय;
" दीनत्राणार्थ आधीं कर वर करुनी वीर हो ! सत्य यावें,
" अंतस्था वैमनस्यां विसरुनि अनवां, द्वेषधीस त्यजावें ॥ ३ ॥

हरिणी

" गृहकलह हा राज्यें लावी लयास अनेक तीं,
" अहित घडवी मोठें देशा, असें बुध सांगती;
" कलह बुडवी राज्या, भाग्या, असा परिणाम हा !
" ह्मणुनि कथितों, त्यातें टाका, यशा मिळवा महा ॥ ४ ॥

उपजाति

" परस्परां भेटुनि मित्र व्हावें, वैषम्य सारें विसरून जावें ॥
" संरक्तता ही शुभ चिन्ह आहे, स्वदेशभक्तांस न विघ्न साहे ॥ ५ ॥

## थेउरास जातेवेळीं राघोबादादाचें आनंदाबाईशीं भाषण

आर्या

" शिकविशि मजला अक्कल ! बोलाया लाज वाटते न तुला !
त्वद्वच खवळी हृदया ! मातें मानिशि मनांत काय खुळा ? ॥ १ ॥
शिव शिव शिव ! हर हर हर हर ! मातें अजि तें न ऐकवे वचन !
माधवमरणा इच्छुनि राज्या सेवील कोण गे स्वजन ॥ २ ॥
जाडी भरडी भाकर जी दैवें प्राप्त जाहली आहे,
तीच पुरे, राज्य नको ! त्यावांचुनि हा सुखांत गे राहे ! ॥ ३ ॥
जातों, त्वांहि चलावें; तेथें कांहीं असें न बोलावें,
प्रेमें बोलुन वर्तन अकपट ठेवोनि, नित्य चालावें ॥ ४ ॥
तेथें अमृताविषयीं कांहीं कांहीं न गोष्ट काढावी,
हळहळ न दाखवावी; स्वजनांची प्रीति फार जोडावी ॥ ५ ॥

अमृताची सोय पहा कांहीं काळें घडेल गे नीट,
टाकीं दुष्ट विचारां, दुर्मतिचा येउं दे तुला वीट ॥ ६ ॥
माधव गरीब साधा; मानी मज तात, तुज गणी माय,
तद्घातहेतुशब्दां माझ्यानें ऐकवेल तरि काय ? ॥ ७ ॥
बाळपणापासुनि जो प्रेमोदकसेक करुनि वाढविला,
त्या तरुचा नाश कसा चिंतावा सांग हें ! कळे न मला ॥ ८ ॥
माझें मन फिरवाया झटशी सांगोनि गोड वाटे तें,
परि हें साध्य नसे तुज; ऐकें, ह्या दुष्ट सोड वाटेतें ॥ ९ ॥
चंदन घर्षणयोगें गे देतें चारुतर सुगंधातें,
हेमहि पावकतापें पावतसे अधिक कांत वर्णातें ॥ १० ॥
तैसें मम मन होतें मृदुतर ह्या तव कुबुद्धिवादानें,
व्यर्थ कशाला ह्यास्तव वदसि मला तूं निजार्थलोभानें ? ॥ ११ ॥
खाईल धान्य धात्री, जननी मारील आपुल्या तोका,
वेलातिक्रम अंबुधि करुनि देईल जनपदा शोका ॥ १२ ॥
जाळील अग्नि भूमी, अन्नहि होईल तीव्र गे गरल,
परि तें हें मन माझें वक्र न होईल जें सदा सरल ! ॥ १३ ॥
उदक हिमानें कढतां, घृत थिजतां अग्निच्या सुतापानें,
येतां मरण सुधेनें, जीवित मिळतां सुतीव्र विषपानें ॥ १४ ॥
अथवा रात्रितें बाधा शीताची चंद्रदर्शनें होतां,
माझें मन तेव्हांही न फिरेल अगे अनर्थ हे येतां ! ॥ १५ ॥
गे इच्छिलि राज्यपदा कीं सुखदायक निधान तें आहे,
परि सांगतों तुला मी हा भ्रम लोकीं खरा पहा राहे ! ॥ १६ ॥
राज्यपदीं सौख्य नसे त्यापरि दुःखद न अन्य पद दिसतें,
डोंगर दुरुनि साजे-येथें हा न्याय युक्त गे गमतें ! ॥ १७ ॥
चिंता भूपास किती तीची गणना कुणा न करवेल,
रात्रंदिस त्यास नसे स्वास्थ्य मनाचें ! न शब्द हे फोल ॥ १८ ॥

जाणें राज्यपदाला कीं तें आहे निधान दुःखाचें,
श्रम हा निवळ असे गे, कीं तें आहे निधान सौख्याचें ॥ १९ ॥
यास्तव अनिष्ट चिंतुनि अथवा कलहा करून काय फळ ?
सुखसाधनार्थ ऐसे होतिल अवघे प्रयत्न गे विफळ ! ॥ २० ॥

हरिणी

गृहकलह हा राज्यें लावी लयास अनेक तीं,
अहित घडवी मोठें देशा असें बुध मानिती ;
कलह बुडवी राज्या, भाग्या, असा परिणाम हा !
ह्मणुनि कथितों प्रेमें वागें, यशा मिळवीं महा ! ॥ २१ ॥
गृहकलह हा रामा धाडी वनांत रहावया !
दशरथ मरे ! ऐशा दुःखा न गे सहवे तया !
तनुजविरहज्वाला सोशी न तन्मन कोमल !
ह्मणुनि कथितों प्रेमें वागें न बोल अमंगळ ! ॥ २२ ॥
गृहकलह हा धर्मा धाडी वना सहबांधव !
सुतशत मरे गांधारीचें बुडे कुल कौरव !
विदित तुजला कैशी झाली अगे गति यादवां !
कुमति पळवीं यासाठीं तूं, जपें प्रिय माधवा ! ॥ २३ ॥
कलहमुदिते ! ठायीं ऐशीं उदाहरणें तुला ;
असतिल दुजीं ह्याहीपेक्षां अघोर, न ज्यां तुला.
तरि कलह हा पेटे ऐसें कधीं न वदें बरें !
खवळुनि मनीं, त्वां दुर्वाक्यें वदावि न गे खरें ॥ २४ ॥

## कन्या

आर्या

रुचिरा बाले असती, तूं फल गे आमुच्या प्रमोदाचें,
स्वच्छफुल्ल नेत्र पाहुनि, आनंदित हृदय होय गे साचें ॥ १ ॥
देखुनि तुजला तनये, प्रेमाच्या ऊर्मि मानसीं येती,
होशिल कुलद्वयाचें तूं मंगल हे विचार मन हरिती ॥ २ ॥
होई दुःखतमानें माझें हें व्याप्त हृदय गे सकळ,
परि तें तव मुखचंद्रें विकसित होतें न लागतांचि पळ ॥ ३ ॥
स्मितमुखकमला तव मी बाले चुंबोनि सेविं जें सुख तें,
पीयुषरसीं न वसे, ऐसें वर्णावया न भय गमतें ॥ ४ ॥
कोमल आनन वत्से, शोभे तव रुचिर दंतपंक्तीनें,
बाले ! हिरकणि त्यांशीं तुलना पावेल केविं कान्तीनें ॥ ५ ॥
होशिल विवाहयोग्या देऊं तैं चतुरधी वरा बघुनी,
श्वशुरश्वश्रूगृहिंचें सुख सेवुनि राहशील तूं स्वजनीं ॥ ६ ॥
येशिल अमुच्या गेहा, जातां तुज मास पांच वा चार,
होउनि सुखप्रसूता रमशिल वत्सान्वितांमधें फार ॥ ७ ॥
जातां पतिसदनाला, संगें घेवोनि लाडक्या बाला,
पाहिन तुजला, तैं मम आनन्दा, कोव वर्णवे कविला ॥ ८ ॥
पतिची गांठ पडोनी, प्रेमें घेइल सुहास्य तोकाला,
गालीं हंसशिल तेव्हां दावुनियां रूपसाम्य गे त्याला ॥ ९ ॥
देखुनि तनयक्रीडा कुतुकें जो हर्ष होय तव पतिला,
तो लाजवील वाटे नन्दनवनिंच्याहि सौख्यसंततिला ॥ १० ॥
होइल पुत्र तुझा मुलि ! लोकीं विद्वान् सुधी धनी कुशल,
देईल तुह्मां दोघां वाहुनि संसारभार सुख विपुल ॥ ११ ॥

# जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर

यांचा जन्म इ. स १८७९ च्या सुमारास मालवण तालुक्यांतील वराड नामक गांवीं झाला. सावंतवाडी संस्थानांत आजगांव या नांवाचा गांव आहे तेथले हे रहिवासी. प्राथमिक मराठी शिक्षण व थोडेंसें इंग्रजी शिक्षण झाल्यावर मुंबईतील एकदोन कचेऱ्यांत यांनीं नोकरी केली. नंतर हे कोल्हापूर येथील एका पत्राचे संपादक होऊन तिकड गेले. पुढें पुण्यास आल्यावर ज्ञानप्रकाश, करमणूक, सुधारक या पत्रांच्या सहकारी संपादकाचें काम त्यांनीं केलें. १९११ सालीं हे पुनः मुंबईत आले व 'इंदुप्रकाश'चे मराठी संपादक झाले. हें काम त्यांनीं सुमारें चार वर्षे केलें. 'ज्ञानांजन' हें लोकप्रिय मासिक यांनीं कांहीं वर्षे चालविलें होतें. शिवाय गेल्या ३० वर्षांत महाराष्ट्रांतील बहुतेक पत्रांत व मासिकांत यांचे अनेक लेख व कविता प्रसिद्ध झालेल्या आहेत. नेपाळवर्णन, इसापनीति, भरतपुरचा वेढा, मुलांची करमणूक, सं. प्रणयानंद नाटक, हरिभजनामृत वगैरे अनेक लोकप्रिय पुस्तकें यांनीं लिहिलीं आहेत. तथापि यांच्या व्यासंगाचा मुख्य विषय 'जुनी मराठी कविता व जुन्या कवींचीं चरित्रें' हा होय. या विषयावर 'महाराष्ट्रकविचरित्र' हा प्रचंड ग्रंथ त्यांनीं लिहिला असून त्याचे सुमारें २६०० पृष्ठांचे आठ भाग आतांपर्यंत त्यांनीं प्रसिद्ध केले आहेत. प्रस्तुत विषयावर हा त्यांचा ग्रंथ बहुतेक प्रमाणभूत मानला जातो. त्यांच्या अंगीं वक्तृत्वशक्ति व वादविवादकौशल्य विलक्षण आहे. मराठी भाषेवरील त्यांचें प्रभुत्व लक्ष्यांत घेऊन श्री. शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी यांनीं त्यांस 'महाराष्ट्र भाषाभूषण' ही पदवी दिली असून मुंबई विश्वविद्यालयानें त्यांना मराठीचे परीक्षक नेमलें आहे. आजगांवकरांचें पद्यरचनाकौशल्य वाखाणण्यासारखें आहे व याविषयींच्या चढाओढींत इतर सर्व कवींचा पाडाव करून त्यांनीं बक्षिसें मिळविलीं आहेत. त्यांचें अध्ययन जरी फारसें झालेलें नाहीं तरी आपल्या दीर्घ व्यासंगानें त्यांनीं येवढी विद्वत्ता

मिळविला आहे कीं तिच्या जोरावर कै. सर डॉ. भांडारकर, कै. लोकमान्य टिळक, क. हरि नारायण आपटे यांच्यासारख्या थोर पुरुषांची कृपा त्यांनीं संपादन केली. हरिभाऊ आपटे हे तर त्यांचे अगदीं जिवलग मित्र होते. आजगांवकरांची कविता जुन्या पद्धतीची असून ती फार प्रेमळ आणि रसभरित आहे.

## आत्मनिवेदन

श्लोक

आता असो तुजवरी भरिभार माझा ।
तूं दीनबंधु भगवान् भुवनैकराजा ॥
पापें अनंत घडलीं करुणाकरा रे ! ।
होतांचि तत्स्मृति भयें मन हें थरारे ॥ १ ॥
मी हीन दीन मतिमंद अनंतपापी ।
दासानुदासचि तुझा म्हणवीं तथापि ॥
सर्वात्मना परि कुठें तुज सांग शोधूं ।
हें दीर्घदुःख मनिंचें कवणा निवेदूं ? ॥ २ ॥
क्रोधोद्धता मम मनोरचना सदाची ।
मीं दुर्वचें दुखविलीं हृदयें जनांची ॥
तारुण्यभार आजि ओसरतांच सारा ।
झाली तुझी स्मृति अतां मज विश्वसारा ! ॥ ३ ॥
प्रेमार्द्र हे नयन संस्मरणीं न झाले ।
रोमांचही तनुवरी न अधींच आले ॥
येतांचि संकट परी तुज हाक मारीं ।
निष्काम भक्ति नच हें कळलें मुरारी ॥ ४ ॥

म्यां याचिले बहु धनी उदरार्थ देवा ! ।
केली खुशामत किती अतिनीचसेवा ॥
काढोनि दांत हंसलों मज लाज नाहीं ।
धिक्कारिलें करुनि तुच्छ जरी जनांहीं ॥ ५ ॥

नाना विकार करितां विकृती मनाला ।
पावेन मी मग कसा तुज वामनाला ? ॥
नामें परी चढलि वारवधू विमानीं ।
मी कां तरेन न भवा जरि पापखाणी ? ॥ ६ ॥

हें विश्व तूं विरचिलेंस कधीं अनंता ।
याचा दिसे न कुणि दृश्य असा नियंता ॥
हा सृष्टिचा क्रम सुयंत्र सदैव चाले ।
इच्छेविणें न तुझिया तरूपर्ण हाले ॥ ७ ॥

ऐसा अगम्य विभु तूं वसतोस कोठें ? ।
कोडें न हें उलगडे मनुजास मोठें ॥
ग्रंथांतरीं विबुध वर्णिति रूप तूझें ।
तेणं न होय परि मानस तृप्त माझें ॥ ८ ॥
कोणी बसोनि मशिदींत नमाज बोले ।
कीं प्रार्थनेतचि कुणी जन मग्न झाले ॥
कोणी करी भजन नामचि गोड गातो ।
ध्यानस्थ होउनि कुणी तुजला पहातो ॥ ९ ॥

ऐशापरी अखिल विश्व तुलाच वानी ।
तूं एकलाच उरतोस विभो ! निदानीं ॥
लावोत शोध कितिही प्रलपोत कांहीं ।
तूझ्याशिवाय गति या मनुजांस नाहीं ॥ १० ॥

चाकाटल्या श्रुति विभो ! थकलीं पुराणें ।
नाहींच शोध तव लावियला कुराणें ॥
त्या बैबलांतहि कुठें दिससी न देवा ।
तूझा कळे न मज शोध कुठें करावा ॥ ११ ॥

तत्त्वज्ञ सर्व दमले थकले तपस्वी ।
झाले परंतु तव भक्त खरे यशस्वी ॥
प्रेमें तिहीं तुजसि आकळिलें अनंता ।
मीही म्हणोनि वरिलें अजि त्याच पंथा ॥ १२ ॥

भक्तीं दिलें सगुण रूप सुरेख तूतें ।
तूं नाचतोस तुज नाचविती जसे ते ॥
त्यांचें उणें न बघवे तुज मायबापा ।
हांकेसि धावुनि निवारिसि सर्व तापा ॥ १३ ॥

पृथ्वीवरी विविध धर्म जरी जनांचे ।
तूं एकलाच जगदीश उपास्य त्यांचें ॥
तो तूं अनंत वसतोस कुठें कळेना ।
तूझें चरित्र मनुजांप्रति आकळेना ॥ १४ ॥

तूं दीनवत्सल सखा करुणानिधान ।
हें एकितों सकळ संतमुखीं विधान ॥
ती कां तदीय अनुभूति मला न यावी ? ।
नामें तुझ्या न दुरितें मम कां हरावीं ? ॥ १५ ॥

तारुण्य जाउनि जरा जवळी निघाली ।
नाहीं परंतु लव शांति मनास आली ॥
अद्यापि काम मद मोह न नष्ट झाले ।
संकल्पही न मनिंचे अजुनी विराले ॥ १६ ॥

माझा जरी न धरिसी अभिमान रामा।
तूं दीनपावन कसा असला रिकामा ? ॥
जाईन मी मरुनि होइल काय माझें ॥
होईल वा बिरुद मात्र असत्य तूझें ॥ १७ ॥
रामा तुझे चरण सेविन मी सुखानें
रामा तुझेचि गुण गाइन मी मुखानें ॥
ऐसें करीं लवकरी करुनी कृपेला।
हा दर्शनास तव दास असे भुकेला ॥ १८ ॥

## स्फुट अभंग व पदें.

(१)

विषयाच्या ऊर्मि उठती घडोघडी। बिघडते घडी परपार्थाची ॥ १ ॥
स्त्रिया आणि द्रव्य यांचीच कल्पना। आणीक वासना नानापरी ॥ २ ॥
कांहीं केल्या चित्त होईना एकाग्र। रात्रंदिन व्यग्र विचारांत ॥ ३ ॥
नामस्मरणही घडेना नेमस्त। कैंचा परमार्थ मज मूढा ॥ ४ ॥
आतां काय करूं धांव जगन्नाथा। तुजवीण त्राता कोण आहे ॥ ५ ॥

(२)

माझे अपराध क्षमा। करीं आतां पुरुषोत्तमा ॥ १ ॥
केले पापाचे पर्वत। यासी साक्ष माझें चित्त ॥ २ ॥
होतां अपराधांची स्मृति। क्षणोक्षणीं वाटे खंती ॥ ३ ॥
जगन्नाथ–विज्ञापना। चरणीं ठाव द्यावा दीना ॥ ४ ॥

(३)

नाहीं भूतदया लेश। जळो त्याचा उपदेश ॥ १ ॥
नाहीं प्रेमाचा ओलावा। जळो बाह्य तो देखावा ॥ २ ॥
नाहीं अनुताप पोटीं। जळो वैराग्याची गोष्टी ॥ ३ ॥
बोलासारिखें करणें। नाहीं त्याचें जळो जिणें ॥ ४ ॥
देव प्रेमाचा भुकेला। धांव घालितो हाकेला ॥ ५ ॥
पिऊनियां नामामृत। तृप्त झाला जगन्नाथ ॥ ६ ॥

(४)

तारील शेवटीं दीनांचा कोंवसा। आहे भरंवसा ऐसा मज ॥ १ ॥
अनन्य भावें जे शरण रिघाले। नाहीं उपेक्षिले नारायणें ॥ २ ॥
योगक्षेम त्यांचा चालवोनी अंतीं। देऊनि सद्गति मुक्त केले ॥ ३ ॥
ऐसी देत आहे ग्वाही संतवाणी। वेदांतीं पुराणीं साक्ष हीच ॥ ४ ॥
नामामृतपान हें मुख्य साधन। तेणें समाधान जगन्नाथा ॥ ५ ॥

(५)

अनाथाच्या नाथा वेगें घाल उडी। दुःखाचा संवगडी जाहलों मी ॥१॥
आतां माझा धीर सुटला गोविंदा। धांव सुखकंदा लागवेगीं ॥ २ ॥
जन्मलों अभागी पापाचा पुतळा। माझे हाल डोळां पाहूं नको ॥ ३ ॥
शैशवापासोनी तुझे नामीं गोडी। तुझीच आवडी अंतरांत ॥ ४ ॥
कोणासी आळवूं कोणा मारूं हांक। येऊनियां ठाक उभा आतां ॥५॥
अनाथाचा नाथ सत्य करीं ब्रीद। जगन्नाथा छंद लागो तुझा ॥ ६ ॥

पद ( उत्तम जन्मा येउनि रामा० )

कधिं रे कधिं रे कधिं रे आतां भेटशील राम ।
संकटकालीं त्राता तुजविण कोण दुजा आम्हा ॥ ध्रु. ॥

आप्तमृत्युदुःखाचे डोंगर कडकडुनी पडती ।
पाहुनि हे देखावे धडकी भरते मम चित्तीं ।
विषाद वाटे मनास मोठा, अंधकार जगतीं- ।
दिसतो सगळा ज्ञानदीप तूं धांव घनश्यामा ॥ १ ॥
संसृतिदुःखाटवींत चुकुनी वाट भटकलों मी ।
मायबाप भगिनी बांधव ते गेले निज धामीं ।
कांताद्वय स्वर्गस्थ होउनी पडलों दुःखतमीं ।
उदासवाणें जीवित सृष्टी झाली अविरामा ॥ २ ॥

दोन बालकें गळ्यांत पडलीं, शक्ति नसे देहीं ।
आप्त धनाचे, धनावांचुनी कुणि न कुणा पाही ।
शुद्ध प्रेम न दिसे कुठेंही, सौख्य काय गेहीं ।
मत्प्रेमाचें अधिष्ठान तूं रामा सुखधामा ॥ ३ ॥
वार्धक्याची ध्वजा फडकली, मृत्यु दूर नाहीं ।
नसे धनाचा संग्रह केला, ध्यान भजन कांहीं ।
होइल कसें पुढें म्हणुनि हें चिंता मन वाही ।
आतां माझा भार तुजवरी मुनिमनोभिरामा ॥ ४ ॥
मनःशांतिदायका मुकुंदा घाल उडी आता ।
अनन्य शरणागतकैवारी ब्रीद तुझें नाथा ।
खचला धीर कृपा करिं रामा होईं धैर्यदाता ।
जगन्नाथ सिंधुतटीं गातो गोड तुझ्या नामा ॥ ५ ॥

पद–( हमीर त्रिवट )

सकलां सुखकर हो हरि तो ।
यमुनातटमृदुपुलिनिं मुर्लीसह
केलि करित फिरतो ॥ ध्रु० ॥
रासोल्लासभरें युवती ।
क्रीडामग्न विलासवती ।
असतां राधा त्यांपुढती ।
प्रणयभरें यद्वक्षालिंगन
करि तिस करिं धरितो ॥ १ ॥
अमृतकलश तव मुख हरि हें ।
ऐशा गानमिषें पाहें ।
राधा मुख चुंबित आहे ।
तें चुंबनचातुर्य विलोकुनि
सस्मित मुख करितो ॥ २ ॥

# दत्तात्रय कोंडो घाटे

हे सुप्रसिद्ध कवि ता. २६ जून १८७५ रोजीं जन्मले आणि ता. १३ मार्च १८९९ रोजीं बडोदें येथें प्लेगच्या आजारानें दिवंगत झाले. त्यांचें मूळगांव अहमदनगर जिल्ह्यांतील श्रीगोंदें. यांचे आजोबा नगरास मुखत्यार वकील होते. तेथेंच दत्त कवीचें प्राथमिक शिक्षण झाल्यावर तेथील मिशनरी शाळेंत ते इंग्रजी शिकूं लागले. १८९० सालीं ते मॅट्रिक झाले. त्या वेळीं त्यांचें वय १५ वर्षांचें होतें. याच सुमारास त्यांचें लग्नही झालें. १८९१ सालीं ते उच्चशिक्षणार्थ मुंबईस आले व तेथील विल्सन कॉलेजांत जाऊं लागले. त्यांना कविता करण्याचा नाद व ललित कलांची आवड लहानपणापासूनच होती. शेले हा आंग्ल कवि त्यांना फार प्रिय होता व त्याला अनुलक्षून त्यांनीं एक सुंदर इंग्रजी कविता लिहिली आहे. इंदूर यथील एका कॉलेजमधून ते बी. ए. झाले व नंतर नोकरीसाठीं बडोद्यास गेले. तेथें कै. शंकर मोरो रानडे, रा. चंद्रशेखर गोरे, रा. दामोदर सांवळाराम यंदे वगैरे वाङ्मयाभ्यासी मंडळींशीं त्यांचा परीचय झाला. रा. यंदे यांच्या 'सयाजीविजय' साप्ताहिकांत त्या वेळीं त्यांचे कांहीं लेख प्रसिद्ध झाले आहेत. नोकरीची व्यवस्था अवाप्त झाली नव्हती, तोंच बडोदें येथें प्लेग सुरू झाला व त्या सांथीला हें महाराष्ट्रकविरत्न वयाच्या २४ व्या वर्षी बळी पडलें. "मिलिटरी ऑफिसमध्यें सध्यां तुम्हांला जागा देण्यांत आली आहे," असा हुकूम ज्या वेळीं आला त्या वेळीं त्यांच्या अंगांतला ताप १०६ डिग्रीपर्यंत वाढत चालला होता! त्यांना शेवटपर्यंत शुद्धि होती व प्राणोत्क्रमणापूर्वी त्यांनीं आपल्या कवितांची वही रा. चंद्रशेखर ह्यांच्या हातीं दिली. दत्तकवीची कविता प्रतिभासंपन्न असून ती अगदीं स्वतंत्र बाण्याची आहे. ही सगळी कविता, त्यांचे विद्वान् चिरंजीव रा. विठ्ठल दत्तात्रय घाटे एम्. ए. यांनीं सुंदर रीतीनें छापून प्रसिद्ध केली आहे.

## जननी आर्यभूमि !

( राग बिभास, ताल धुमाळी )

अयि भुवनमनोमोहिनी, जननी,
निर्मल सूर्यकरोज्ज्वल धरिणी,
जनकजननी, जननी,
नमन तुझ्या चरणीं.
नीलसिंधुजलधौत चरणतल,
अनिलविकंपित श्यामल अंचल,
अंबुरचुंबित भाल हिमालय,
धवल मुकुट हा मस्तकिं निर्मल,
जनकजननी, जननी,
नमन तुझ्या चरणीं.
प्रथम प्रभातउदय तव गगनीं,
प्रथम सामरव तव तपोवनीं,
प्रथम प्रचारित तव वनभवनीं,
ान, धर्म, कविदैविक वाणी.
जनकजननी, जननी,
नमन तुझ्या चरणीं.
करिसी अमुचें चिरकल्याण,
देशविदेशा वितरिसि अन्न,
पुण्यतटिनिपयस्तन्य पाजून,
करिसि नित्य निज बालकपोषण.
जनकजननी, जननी,
नमन तुझ्या चरणीं.

# सखे सुमनमाले !

( दिंडी )

सुमनमाले, सोडोनि सुमनचापा,
कशी आलिस नभ त्यजुनि जशी शंपा;
बाण कुसुमाचा काय तुझ्या रूपें,
धाडिला हा मजवरी कुसुमचापें !
जरी असती सुंदरी आज येथें,
तरी पेटविती खास अनंगातें,
तदंगींची मृदुलता तुझ्या अंगीं,
दिसे ह्मणुनिच तुज ठेवितों पलंगीं.
सुवक वर्तुलशा केशकलापांत,
तुला असतें ठेविलें मी सुखांत,
तप्त ऐशा पडलीस उरीं आतां,
भाग माले ! मजसवें विरहचिंता.
अहा ! हर ! हर ! तव काय दशा झाली !
क्षणांमध्यें टवटवी तुझा गेली !
विरहवन्ही जो भाजतो मला गे !
आंच त्याची तुजलाहि काय लागे ?
मृदुल काया पाहुनी तुझी माले !
कोमलांगीचें चित्र पुढें आलें.
सोड भीती सोड ही तप्त काया,
सुखें राहीं सोडोनि दूर शय्या.
दूर राहुनि सुकलीस अधिक माले !
साग बाई ! हें काय असे झालें ?

काय सुकली मत्प्रिया तुझ्यावाणी ?
होय म्हणशी कां ? जळो तुझी वाणी !
दुष्ट माले ! जा नीघ इथुनि आतां,
तुझ्यायोगें पेटली अधिक चिंता,
प्रिया असतां मज सौख्य दिलें चित्तीं,
म्हणुनि फसलों घेवोनि तुला हातीं.
स्पर्श शीतल संताप वाढवीतो;
सुमनगंधेंही शुल शिरीं होतो;
पहा दैवाची कशी उलट रीती,
सुखद वस्तूही दुःख मना देती.

## विश्वामित्रीच्या कांठीं

डोदें येथील कमिटी बागेंतील झुलता पूल.
वेळ-पौर्णिमेची चंदणी रात्र. )
चाल-फुलें वेलीच )

बघुनि मन धालें, साफल्य दृष्टिचें झालें ॥ ध्रु० ॥
पाऊस बर्फाचा जणुं पडतो;
रजताचा जणुं मेघ वितळतो;
किंवा चंद्रकांत पाझरतो;
जणूं शीतांगी मत्प्रिया मला आलिंगी १
शीतल चंदनरसांत पडलों;
अथवा अमृतडोहिं बुडालों;
किंवा सुखस्वप्नीं सांपडलों;
न कळे कांहीं, जिव वेडावुनि हा जाई !

शांतिदेवता निराकारिणी
वसते जणुं या मंगल स्थानीं;
सांगे मजला या उद्यानीं,
" चंचल बाला ! बघ इथें जगन्नाथाला " २
सृष्टिसुंदरी नटली थटली,
सूक्ष्म धवल वल्कला नेसली;
खुलली जणुं सुमवेली फुलली;
रम्य ही शोभा, हिजपुढें काय ती रंभा ! ३
शांत तटिनि जणुं पथ स्फटिकाचा,
जातिपुष्पपथ वनदेवीचा,
किंवा ओघ सजिव रजताचा,
कीं रत्नाची, मेखलाच उद्यानाची ! ४
विश्वामित्रीजलिं या कालीं,
तटवनभूमी बिंबित झाली;
वरती तैसें दिसतें खालीं;
अद्भुत झालें, पाताळ आज पाहिलें ! ५
तारांगणही स्पष्ट बिंबलें,
स्नाना जणुं हे मुनि अवतरले;
तेजोनिधि कीं ऋषी बैसले;
ध्यान धरोनी, जलसमाधिस्थ होवोनी ! ६
शशिरायाही आंत उतरला,
कलहंसापरि पोहुं लागला;
तटिनीनें जणुं हृदयीं धरिला,
प्रेमळ कांत, पाहुनी इथें एकांत ! ७
जेथें असली श्रेष्ठ मंडळी,
तिथेंचि गरिबा जागा दिधली,

शंका सखये ! परि उद्भवली,
खरी मम काया, उदकामधिं वा भूवरि या ! ९
वरती खालीं दिसतें गगन;
मध्यें लंबित अपुलें भवन;
वातावरणीं आधाराविण
गोजिरवाणी, फेंकिला चेंडु हा कोणी ! १०
वरती खालीं ही शशिकांति;
द्विगुणित शोभा द्विगुणित शांति;
द्विगुणित आनंदाची भरती,
दृष्टि बावरली, वर पाहूं किंवा खालीं ! ११
स्मरणशक्तिके ! जागृत होईं,
दर्शनदुर्लभ शोभा पाहीं,
विसरूं नको बघ यांतिल कांहीं,
वारंवार, कोठुनी असें दिसणार ? १२

---

## शेवटचें मागणें

---

पृथ्वी

असंख्य जन भूतलीं सरस एक एकाहुन,
तयांत वद तूं कुठें अबल अज्ञ अज्ञाहुन,
पुरातन तसे नवे कवि कितीक, काव्यें किती,
तयांत वद तूं कुठें ? वद मना ! कुठें त्वत्कृति ! १
शिखा गगन भेदिती, दिपविती रविज्योतिंना,
अशी सतत दीप्त ती तळपते कविप्रेरणा;
तयांत ठिणगी कुठें वद मना ! तुझ्या स्फूर्तिंची;
विझेल निमिषांत ही; धरिसि काय आशा हिची ! २

प्रचंड कविकल्पनाविहग दिव्य पक्षावरी
महीतलिं, घनांवरी, उडत दिव्यलोकांबरीं ;
विपक्ष तव कल्पनाविहग सांग कोठें मना !
तथा सखल भूतलावरिहि चालतां येइना ! ३
निघे हृदयभूतुनी, दशदिशाहि उल्लंघुनी
विचित्र ! वरती चढे नभललामगंगेहुनी,
रसाळ वचनौघ जो प्रभुपदीं पडे तो कुठें,
पडे सतत खालतीं वचनधार ती ही कुठें ! ४
समस्तखमणिप्रभा करुनि एक जागीं मनीं
पुराणकविकीर्तिचा विमल अंश तो पाहुनी,
दिसे मज न त्यापुढें फिकट कीट खद्योत मी,
विजें नयन दीपतां नच दिसे तयाला तमीं ! ५
अनर्थ न बरा, असो ' कवि सुशब्द अन्वर्थसा,
कवित्व न लगे मला शिखितुरा जसा वायसा
यथामति करीन मी तुजपुढें सदा जल्पना,
प्रभो मधुर मान तूं तुजसि हीच अभ्यर्थना ! ६
सुवर्ण, शुचि शब्द तूं, मधुर वाक्य तूं अर्थ तूं,
रसाल रसमूर्ति तूं, यमक तूं, अलंकार तूं,
अनंतगुण काव्य तूं, कवि अनादि वागीश तूं,
तुला रसिक तूं, दुजा तुजसि कोण ? तूं एक तूं ! ७
अशा प्रभुवरा तुझे गुण किती, कुठें कोणते,
यथास्थित कथावया जगिं समर्थ या कोण ते ?
परात्पर जगद्गुरो ! कवि जगत्त्रयीं तूं खरा,
कवित्व न लगे, मिळो तव पदीं सदा आसरा ८

REFBK-0003735

REFBK-0003735